Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रिटिशांचा इतिहास

खंड दुसरा (पूर्वार्ध)

[इ. स. १६०३ ते इ. स. १८२०]

४१म
१५८व

…टक पब्लिशिंग हाउस, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म् ❀

पुस्तक-संख्या ४१५/१५२ख

पंजिका-संख्या २०१८६

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रिटिशांचा इतिहास

खंड दुसरा (पूर्वार्ध)

[इ. स. १६०३ ते इ. स. १८२०]

गुरुकुल कांगड़ी

लेखक
विष्णु सिताराम चितळे,
बी. ए., बी. टी. (मुंबई), टी. डी. (लंडन),
एस्. आर्. एस्. टी. (इंग्लंड),
' हिंदुस्थानची शासनपद्धति ' या पुस्तकाचा कर्ता,
असिस्टंट सुपरिंटेंडेंट, न्यू. इं. स्कूल, पुणें

CHECKED
Initial
स्टाक प्रमाणीकरण ...-१९८५

KARNATAK PUBLISHING HOUSE
BOMBAY 2

मूल्य दीड रुपया

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

First Edition 1940

Printed by M. N. Kulkarni at the Karnatak Printing Press, Chira Bazar, Bombay 2, and Published by him at the Karnatak Publishing House, Chira Bazar, Bombay 2.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहिल्या खंडाची प्रस्तावना

इतिहासाच्या अभ्यासानें मुलांना तत्त्वबोध होईल, त्यांची कल्पनाशक्ति फांकून तिला तेज चढेल, त्यांची स्मरणशक्ति वाढेल, त्यांच्या तर्कपद्धतीला विशिष्ट वळण लागेल, त्यांच्यांत चिकित्सक बुद्धि जागृत होईल व त्यामुळें खऱ्याखोट्याचा न्याय-निवाडा करण्याची त्यांच्यांत खरी धमक येईल ! परंतु आज शाळेंत ज्याप्रकारचें शिक्षण दिलें जातें, त्यामुळें वरील सर्व गोष्टी खरोखर घडतील का ? सध्यांच्या इतिहास-शिक्षणानें वरील हेतु क्वचितच साध्य होत असतील; कारण आमच्या शाळांतील इतिहास-शिक्षणाची दिशाच चुकीची आहे. शिवाय ज्यांना इतिहास शिकवावयाचा त्यांच्या मनाची ठेवण व मनाच्या प्रवृत्ति काय आहेत हें लक्षांत न घेतांच विषय शिकविला जातो ! इतिहास-शिक्षणानें विद्यार्थ्यांच्या बुद्धीला वळण लागावें अगर त्यांच्या मनोविकासास शिक्षण कारणीभूत व्हावें; केवळ याच हेतूनें इतिहास शिकवणें चूक होणार नाहीं का ? कारण इतिहासांत मुलांना मनुष्याचीं अचाट कृत्यें, त्याचा जीविताशीं झालेला झगडा, त्याचा विकास, त्याची प्रगति, त्याचा पराभव या व अशा गोष्टींच्या ज्ञानामुळें जो आनंद मिळतो तो कल्पनातीत असतो. इतिहास शिक-तांना अगर वाचतांना भिन्न जगांत, भिन्न परिस्थितींत, भिन्न समाजांत, भिन्न लोकांत व भिन्न संस्कृतींत विद्यार्थ्याला वावरावें लागतें; परंतु त्यामुळेंच त्याला अपरिमित आनंद मिळत असतो. तो तशा भिन्न परिस्थितींत वावरत असतांही आपण आपल्या पूर्वजांच्या अगर त्यांच्या वेळच्या इतर लोकांच्या सुखदुःखाच्या गोष्टी वाचीत आहोंत याची त्याला पूर्ण जाणीव असते व यामुळेंच त्या त्या वेळच्या लोकांच्या सुखामुळें त्याला सुख होतें, दुःखामुळें दुःख होतें व त्यांच्या जयापजया-मुळें त्याला आनंद अगर दुःख होतें. या त्याच्या समरसतेमुळेंच त्याला खरा आनंद होतो आणि तोही कशाकरितां, तर त्या पूर्वींच्या लोकांशीं आपलें अल्पस्वल्प नातें जोडून त्यांचीं सुखदुःखें त्याला समरसतेनें अनुभवावयास मिळतात म्हणून.

मुलांचा हा आनंद टिकवावयाचा असेल अगर त्यास तो अनुभविण्यास मिळावा अशी इच्छा असेल तर इतिहास-शिक्षणाची दिशाच पार बदलावयास नको काय ? एक काळ असा होता कीं, मुलांच्या वरील प्रकारच्या नैसर्गिक प्रवृत्तींकडे दुर्लक्ष करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना

व राष्ट्राच्या केवळ लष्करी उन्नतीकडेच लक्ष देऊन इतिहास शिकविण्याची व लेखनाची प्रथा रूढ होती. अर्थात् इतिहासाच्या इंग्रजी पाठ्य–पुस्तकांतून व त्यांस आधारून लिहिलेल्या मराठी पाठ्य पुस्तकांतून राष्ट्राच्या राजकीय व परराष्ट्रीय उलाढालींवरच सर्व लक्ष केंद्रीभूत होत असे. यामुळें राजकीय घडामोडींची उकल, लष्कराचे पराक्रम, त्याच्या हालचाली व डावपेंच, युद्धांतील लढायांचीं प्रात्यक्षिकें व त्यांतील मोहिमांचीं रसाळ व भावनोद्दीपक वर्णनें, मोहिमांचे कार्यक्रम, लढाईच्या वेळचे सैन्यरचनेचे नकाशे यांची रेलचेल शालेय पाठ्य-पुस्तकांतून असे. वरीलप्रमाणेंच राजघराण्यांतील पुरुषांच्या जन्ममृत्यूंच्या नोंदी, सनावळ्या, तहनामे, वेढे, खून, मारामाऱ्या, अत्याचार, पार्लमेंटचे कायदे यांचीं रुक्ष वर्णनेंही पुस्तकांतून अगदीं इत्थंभूत देण्यांत येत. अर्थात् त्याच गोष्टींवर वर्गांतून शिक्षक भर देत असतील, यांत नवल तें कसलें ! वरील सर्व गोष्टींना इतिहासाच्या अध्यापनांत स्थान नाहीं असें नाहीं; परंतु त्यांचाच केवळ अतिरेक होऊन कसा चालेल ? कारण वरील गोष्टीच शाळांतून शिकविल्या गेल्यानें विद्यार्थी उत्तम सैनिक म्हणून कदाचित् तयार होईल; परंतु उत्तम नागरिक बनण्यास लागणारे गुण त्यांच्यांत उतरतीलच असें सांगतां येईल काय ?

ही विचारसरणी मान्य केल्यास मनुष्याची हळूहळू उत्क्रांति व प्रगति कसकशी होत गेली, त्यानें कोणकोणतीं अचाट कृत्यें केलीं, त्याला कोणकोणत्या संकटांशीं तोंड द्यावें लागलें, त्यांतून तो सहीसलामत कसा निघाला, त्यानें कोणकोणत्या संस्था स्थापन केल्या व आपल्या समाजाचें पाऊल कसकसें पुढें नेलें हें इतिहासाच्या अध्ययनानें मुलांस समजण्यास नको काय ? त्याचप्रमाणें मनुष्याच्या आचाराविचारांत, राहणींत, व्यवहारांत, राजकारणांत–अर्थात् समाजाच्या आर्थिक, राजकीय, धार्मिक, लष्करविषयक व सामाजिक परिस्थितींत निरनिराळ्या काळांत कसकसा बदल होत गेला व प्रत्येक युगांत समाजाचें पाऊल कसकसें पुढें पडत गेलें हें इतिहासाशिवाय दुसरा कोणता विषय समजावून देणार आहे ? या प्रत्येक स्थित्यंतराच्या वेळीं त्या त्या वेळच्या स्त्री-पुरुषांनीं आपलें आचरण कसें ठेविलें, आपल्या चळवळी कशा चालविल्या व आपल्या संस्था स्थापून व जगवून, त्यांची प्रगति कशी करून घेतली, हें समजल्यानें विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं निसर्गतःच असलेल्या भावना एकवटून त्यांस खात्रीनें आनंद होईल. एवढेंच नव्हे, तर त्यांच्या बुद्धीचा विकास होऊन राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें ते कार्यक्षम होतील. सारांश, इतिहासाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेखन काय किंवा त्याचें अध्यापन काय, मानवी उत्क्रांति व मानव्याचा विकास लक्षांत घेऊनच करावयास पाहिजे.

या सर्व गोष्टी लक्षांत घेतां इतिहास-लेखनाचें अगर त्याच्या अध्यापनाचें कार्य किती बिकट होऊन बसतें हें समजून येण्यासारखें आहे. इतिहास हा जात्याच एक रुक्ष विषय समजला जातो व असल्या विषयाच्या लेखनाचें व अध्यापनाचें काम एखाद्या रुक्ष मनुष्यानें करावयाचें म्हटल्यास कोणता अनवस्थाप्रसंग गुदरेल हें सांगणें कठिणच ! त्याच्या अध्यापनांत जिवंतपणा उत्पन्न करण्याकरितां किती यातायात करावी लागते तें खऱ्या इतिहास-अध्यापकासच माहीत ! आणि तो जर तसा असेल तर अनेक प्रकारच्या उपलब्ध साधनांनीं तो आपला विषय अत्यंत चित्ताकर्षक रीतीनें समजावून देऊन मुलांमध्यें त्या विषयाबद्दल नुसती आवडच नव्हे, तर प्रत्येक गोष्टीचें यथायोग्य व सोपपत्तिक ज्ञान तो मुलांस करून देऊन त्यांस तो आनंदवील. एवढेंच नव्हे, तर 'मेलेले मुडदे उकरून काढूनही' त्यांना तो आपल्या मुलांपुढें जिवंतपणें नाचवील व त्यांच्यांत चेतना उत्पन्न करून त्यांच्या बुद्धीला, मनाला व आचरणाला उत्तम प्रकारचें वळण देईल.

इतिहासाच्या अध्यापनांत अशा प्रकारचा जिवंतपणा उत्पन्न करावयाचा असल्यास विद्यार्थ्यांपुढें अनेक प्रकारच्या साधनांची शिधा-सामुग्री मांडावी लागते. त्या त्या काळच्या पुरुषांचीं, स्थळांचीं, देखाव्यांचीं, जहाजांचीं, इमारतींचीं चित्रें, मूळ व अस्सल दस्तऐवज, पत्रसंग्रह, हकीकती, निरनिराळीं नाणीं वगैरेंची तर अत्यंत जरुरी असतेच; पण जुनीं ऐतिहासिक स्थळें, किल्ले, संस्था वगैरेंस प्रत्यक्ष भेटी देणेंही रास्त व उपयुक्त असतें. मूळ व अस्सल उतारे हे नेहमींच उत्तम मार्गदर्शक समजले जातात व त्यांवरून विद्यार्थ्यांस योग्य तो बोध झाल्याशिवाय रहात नाहीं. कारण हे उतारे थोडे जुनाट व त्यामुळें थोडे चमत्कारिक भासले तरी ते सोपे व तत्कालिन परिस्थिति नीट समजावून घेण्यास व देण्यास बहुमोल व यथायोग्य असतात. त्यामुळेंच विद्यार्थ्यांना—त्यांतल्या त्यांत मोठ्या विद्यार्थ्यांना—ते फार आवडतात व त्यांत त्यांचें मन सदैव रमतें. मात्र हे उतारे योग्य तऱ्हेनें शोधून काढण्यास थोडें कौशल्य लागतें. या उताऱ्यांवरून त्या त्या वेळच्या लोकांच्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीची यथार्थ जाणीव होते. तसेंच चित्रांवरूनही लोकांचे पोषाख, उद्योग-धंदे, चालीरीति वगैरे गोष्टींचा बोध होण्यास मदत होते. ऐति-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हासिक स्थळांस भेटी दिल्यानें मुलांस अनेक प्रकारचें ज्ञान प्राप्त होतें व विद्यार्थ्यांच्या चौकसपणास वाव मिळून तो वाढतो. त्याचप्रमाणें ऐतिहासिक प्रसंगावर उभारलेले वादविवाद व नाट्यरूप संवाद यांमुळें तो तो ऐतिहासिक प्रसंग विद्यार्थ्यांपुढें जिवंतपणें उभा करतां येतो. याशिवाय मुलांच्या हस्तव्यवसायास मार्गदर्शक व उपकारक होणारींही अनेक साधनें आहेत. शिक्षकांनीं आपल्या विद्यार्थ्यांकडून त्या त्या वेळचीं व प्रसंगांचीं चित्रें काढून घेतलीं, घरांचे, होड्यांचे, किल्ल्यांचे, यंत्रसामुग्रीचे कागदी, लांकडी अगर मातीचे उत्तम नमुने तयार करून घेतले तरी त्यांपासूनही मुलांस ऐतिहासिक ज्ञान आपोआप होऊन त्यांस खरा आनंद प्राप्त होईल. निरनिराळ्या प्रकारचे आलेख, कालादर्श, नकाशे वगैरे प्रत्यक्ष काढवून घेण्यानेंही अमोलिक साहाय्य मुलांस लाभेल. आधुनिक काळांत नभोवाणी, मॅजिक लँटर्न, एपिडायास्कोप, सिनेमा वगैरेंच्या मदतीनें कितीतरी ऐतिहासिक माहिती थोड्या वेळांत व थोड्या श्रमानें विद्यार्थ्यांना मिळूं शकेल. अशा तऱ्हेच्या साधनांचा उपयोग केला असतां इतिहासाच्या अध्यापनांत जिवंतपणा कां येणार नाहीं ? मात्र योजक तितका कुशल व चतुर पाहिजे.

या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन व जितक्या आधुनिक उपलब्ध साधनांचा उपयोग करून घेतां येईल तितका तो करून घेऊन, प्रस्तुत पुस्तक इंग्रजी चौथी व पांचवी या इयत्तांतील व इतर विद्यार्थ्यांकरितां लिहिलें आहे. बहुतेक सर्व आधुनिक तंत्रांचा उपयोग करून मूळ विषय मी रंगविला आहे. ज्या ज्या तऱ्हांनीं पुस्तक मार्गदर्शकच नव्हे, तर मनोरंजक व चटकदार होईल त्या त्या तऱ्हांनीं तें तसें करण्याचा मी प्रयत्न केला आहे. भाषा साधी, सोपी व मुलांस सहज समजेल अशी वापरली असून साधारण विद्यार्थ्याप्रमाणेंच बुद्धिमान् विद्यार्थ्याच्या बुद्धीलाहि योग्य प्रकारची चालना मिळेल, अशी आशा आहे. विषयाचें विवेचन सहज समजावें अशीच त्याची मुद्देसूद मांडणी केली आहे. प्रत्येक धड्याच्या शेवटीं अनेक प्रकारचे प्रश्न अभ्यासाकरितां व मुलांची विवेचकशक्ति जागृत व्हावी म्हणून दिलेले आहेत. त्यामुळें मुलांच्या हस्तव्यवसायास, नाट्याभिनयास अगर वादविवादासही वाव मिळण्यासारखा आहे. ते सगळे अगर त्यांतील निवडक प्रश्न वर्गांत अगर अन्य प्रकारांनीं शिक्षकांनीं मुलांकडून करून घेतल्यानेंही उत्तम काम होण्यासारखें आहे. अत्यंत खटपट करून मिळविलेलीं अनेक प्रकारचीं सुमारें शेंदीडशें चित्रें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या पुस्तकांत ठिकठिकाणीं विखुरलेलीं दिसतील. त्यांमुळें मुलांस त्या त्या वेळच्या लोकांचे पोषाख, चालीरीति, खेळ, उद्योगधंदे वगैरे गोष्टींसंबंधीं ज्ञान होण्यास मदत होणारी आहे. शिवाय मूळ व अस्सल उताऱ्यांचीं मराठीमध्यें सुमारें तीस-चाळीस रूपांतरें दिल्यानें पुस्तकाचें महत्त्व वाढलें आहे. त्या त्या युगांतील लोकांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय जीवनावर प्रकाश पाडील, असा अनेक प्रकारचा मजकूर या पुस्तकांत समाविष्ट केल्यानें इंग्रजांच्या राहणींत, जीवनांत, उद्योगधंद्यांत, चालीरीतींत, आचाराविचारांत, युद्धपद्धतींत कसकसा फरक होत गेला, हें विद्यार्थ्यांस सहज समजून येणार आहे. तसेंच प्रत्येक धड्याच्या शेवटीं व अन्य ठिकाणीं सुमारें तीस-चाळीस कालादर्श, वीस-पंचवीस नकाशे व आलेख व निरनिराळे वंशवृक्ष दिल्यानें पुस्तकाच्या अंतरंगाचें सौंदर्य वाढेल असें मला वाटतें. युद्धविषयक कंटाळवाण्या हकीकती अत्यंत आटोपशीर पद्धतीनें सांगितल्यानें त्या मुलांस आवडतील अशी आशा आहे. थोडक्यांत म्हणजे पुस्तकाची उपयुक्तता व सौंदर्य वाढविण्याचा व पुस्तकाचें नांव सार्थ करण्याचा शक्य तों कसोशीचा प्रयत्न केला आहे; तो सर्वांस पसंत पडल्यास मला खात्रीनें जास्त उमेद येऊन आनंद होईल.

पुस्तकाच्या शेवटच्या पानाकडे नजर फेंकल्यास एवढें मोठें पुस्तक शाळांतून पाठ्य-पुस्तक असणें योग्य आहे काय, असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होणार; पण हें पुस्तक लहानच आहे हेंच त्याला माझें उत्तर. आजपर्यंत लहान लहान पुस्तकें मराठी बोधभाषा असूनही, मुलांच्या हातीं दिल्यानें त्यांची दृष्टि आकुंचित करण्याचाच प्रयत्न केला गेला. तसें होऊं नये ही माझी इच्छा. तसेंच या पुस्तकांतील प्रत्येक गोष्ट शिक्षकानें विद्यार्थ्यांस शिकविलीच पाहिजे असें नाहीं. युक्तायुक्त विचार केला व तारतम्य वापरलें तर आपल्या विद्यार्थ्याला कोणता भाग शिकविणें योग्य व कोणता शिकवणें अयोग्य हें शिक्षकाला सहज समजून येणारें आहे. अर्थात् शिक्षकाच्या पसंती-नापसंतीस व त्याच्या निवडीला वाव देणेंही रास्त होतें. शिवाय लोकांच्या सर्वांगीण उन्नतीची व प्रगतीची आधुनिक तंत्रासहित मांडणी करावयाची तर तो मोठाच ग्रंथ होणार आहे. तशांतच चित्रांनीं, उपयुक्त व मार्गदर्शक प्रश्नांनीं व मूळ अस्सल उताऱ्यांनींही व निरनिराळ्या युगांतील ब्रिटिशांच्या सामाजिक, आर्थिक व धार्मिक घडामोडींच्या वर्णनांनींच प्रस्तुत पुस्तकांचीं निम्मीं अधिक पानें व्यापिलेलीं आहेत आणि ही वाढ अनावश्यक अशी कशी म्हणतां येईल?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना

या सर्व गोष्टींचा विचार करतां पुस्तक दिसायला मोठें दिसत असलें, तरी त्याची वाढ युक्तच आहे व ज्या हेतूनें तें लिहिलें आहे त्यालाही तें पोषकच आहे. त्यामुळें सर्व प्रकारच्या साधनांनीं व माहितीनें परिपूर्ण असें हें मराठींतील पहिलेंच पाठ्य-पुस्तक आहे, असें म्हणणें फारसें धाष्ट्यर्याचें होणार नाहीं असें वाटतें. माझी ही कृति सर्वांस पसंत पडल्यास माझ्या श्रमांचें व माझ्या गेल्या दहा-पंधरा वर्षांच्या अध्यापनक्षेत्रांतील अनुभवाचें चीज झालें असें मी कां समजूं नये ?

इतक्या मोठ्या पुस्तकाची छपाई-प्रकाशनाची जबाबदारी व्यक्तिशः अंगावर घेणें मला शक्य नव्हतें. त्यांतून मला मोकळें केल्याबद्दल मुंबईच्या कर्नाटक पब्लिशिंग हौसचे मालक श्री. मंगेशराव कुलकर्णी यांचे नुसते कोरडे आभार मानून त्यांच्या ऋणांतून मी मुक्त होणार नाहीं. त्यांनीं हरघडी वाटेल त्या प्रकारची मला मदत दिली नसती तर हें पुस्तक माझ्या हातून लिहून तयारही झालें नसतें. लंडनच्या ब्रिटिश म्यूझियमच्या ट्रस्टींनीं व नॅशनल पोर्ट्रेट गॅलरी व सायन्स म्यूझियमच्या डायरेक्टरांनीं मोठ्या उदार अंतःकरणानें अनेक चित्रें या पुस्तकांत घालण्यास परवानगी दिली, याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होणार आहेत. माझे स्नेही श्री. शि. आ. आंबर्डेकर यांनीं सुवाच्य व सुंदर अशी हस्तलिखित प्रत तयार करून दिली, श्री. प. कृ. लेले यांनीं सुंदर चित्रें व रेखीव नकाशे व आलेख तयार करून दिले व श्री. कृ. के. केळकर यांनींही बरींच चित्रें काढून दिलीं, या सर्व कामाबद्दल त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें.

शेवटची विनंति इतकीच कीं, या पुस्तकांत अनेक प्रकारच्या उणीवा, चुका व दोष राहणें शक्य आहे. पुस्तकाच्या चांगुलपणाचा तेवढा मी फायदा घ्यावयाचा, मग त्यांतील दोषांचा वांटा मी कां घेऊं नये ? अर्थात् त्या सर्वांची जबाबदारी मी अत्यंत संतोषानें घेण्यास तयार आहें. मात्र सर्वांनीं ते मला कळवावे. त्याबद्दल मी त्यांचा आभारी होईन.

पुणें शहर,
मंगळवार, ता. २ फेब्रु. १९३९

वि. सि. चितळे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसऱ्या खंडाबद्दल चार शब्द

पहिला खंड लिहितांना मी जें ध्येय व धोरण आखलें होतें, त्यास अनुसरूनच हाही कालखंड लिहून तयार केला आहे. हा खंड तयार करण्यांत एकच गोष्ट मी नवीन केली आहे. ती म्हणजे निवडक उतारे प्रत्येक धड्याच्या शेवटीं दिले आहेतच परंतु कांहीं धड्यांमध्येंही घातले आहेत. यामुळें मूळ प्रतिपाद्य विषय समजण्यास थोडा सोपा जाईल असें वाटतें. या पुस्तकांतील चित्रें जितकीं अस्सल मिळवितां येतील तितकीं मिळवून मीं घातलीं आहेत. बाकीचीं चित्रें श्री. कृ. के. केळकर यांनीं काढून दिलीं व नकाशे व आलेख श्री. मो. ब. पुरंदरे यांनीं काढून दिले. त्याबद्दल त्या दोघांचा मी आभारी आहें.

या पुस्तकाचा पहिला खंड दुय्यम शाळांकरितां सरकारी विद्याखात्यानें 'पाठ्य-पुस्तक' म्हणून मंजूर केला, याबद्दल मी त्या खात्याचा अत्यंत आभारी आहें. हाही भाग मंजूर होईल अशी मला खात्री आहे. यापुढील भाग छापावयास घेतला आहे. तोही लौकरच तयार होईल.

कर्नाटक पब्लिशिंग हौसचे मालक श्री. मंगेशराव कुलकर्णी यांनीं याही भागाची छपाई-प्रकाशनाची जबाबदारी आपल्यावर घेतली. त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहें.

माझे स्नेही श्री. शि. आ. आंबर्डेकर यांनीं मुद्रितें तपासण्यास मला मदत केली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

पुणें शहर,
ता. १५ फेब्रुवारी, १९४० }

वि. सि. चितळे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

पृष्ठांक

१. कोण श्रेष्ठ – राजा कीं पार्लमेंट १–१६
२. यादवीपूर्वीची शांतता १७–२२
३. चार्लसचा अनियंत्रित कारभार (१६२८–१६४०) ... २३–३०
४. इंग्लंडांत यादवी-युद्ध (१६४०–४९)–दीर्घ पार्लमेंटची कामगिरी. ... ३१–४८
५. इंग्लंडांत लोकशाही–ऑलिव्हर क्रॉम्वेल ४९–६३
६. इंग्लंडांत पुन्हां राजसत्ता–दुसरा चार्ल्स ६४–७९
७. रंगेल पण नियंत्रित राजाचा कार्यसाधूपणा ८०–९२
८. उज्ज्वल राज्यक्रांति–अनियंत्रित राजसत्तेचा शेवट ... ९३–१०५
९. इंग्लंडांत नियंत्रित राजसत्तेची स्थापना–तिसरा विल्यम ... १०६–१२६
१०. स्पॅनिश वारशाचें युद्ध–राणी ॲन १२७–१३८
११. स्टुअर्ट काळांतील ठळक विशेष १३९–१४९
१२. स्टुअर्ट काळांतील सामाजिक स्थिति १५०–१५९
१३. स्टुअर्ट काळांतील वसाहत-विस्तार, व्यापार व उद्योगधंदे ... १६०–१७०
१४. स्टुअर्ट काळांतील लोकांची राहणी १७१–१९६
१५. व्हिग लोकांचा कारभार-स्टॅनहोप, टाऊनशेंड व वॉलपोल ... १९७–२१३
१६. सर रॉबर्ट वॉलपोल २१४–२२६
१७. इंग्लंड व फ्रान्स यांची वाढती तेढ २२८–२४३
१८. व्हिग पक्षाच्या सत्तेची अखेरी २४४–२५१
१९. जॉर्ज, तूं खराखुरा राजा हो वरं ! २५२–२६०
२०. अमेरिका स्वतंत्र झाली २६१–२७९
२१. राजाची सत्ता वाढत आहे व ती कमी झाली पाहिजे ... २८०–२८६
२२. शांततावादी अर्थमंत्रि-विल्यम पिट २८७–३०२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२३. औद्योगिक क्रांति (१७६०–१८२०) ३०३–३१७
२४. स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व ! ३१८–३३१
२५. नेपोलियन बोनापार्ट ३३२–३६१
२६. तिसऱ्या जॉर्जची अखेरी ३६२–३७५
२७. अठराव्या शतकांतील हॅनोव्हर अमदानीचे ठळक विशेष ... ३७६–३८७
२८. अठराव्या शतकांतील लोकांची राहणी ३८८–४०६

नकाशे – आलेख – अनुक्रमणिका

पृष्ठें

१. इ. स. १६४२–४९ मधील यादवींतील इंग्लंड (नकाशा)... ३९
२. राजा व पार्लमेंट यांच्या सत्तेंतील चढउतार (आलेख) ... १०९
३. सन १६८८ च्या क्रांतीनंतरचीं ब्रिटिश बेटें (नकाशा) ... ११२
४. स्पॅनिश वारशाचें युद्ध (नकाशा) १३०
५. ब्लेनहिमचा सामरिक नकाशा १३१
६. सतराव्या शतकांतील इंग्लिश समाजाची आर्थिक विभागणी ... १५२
७. स्टुअर्ट राजघराणें (आदर्श) १९३
८. ब्रिटिश बेटें (१७१४–१७४५) (नकाशा) ... १९९
९. फ्रान्स व इंग्लंड यांच्यामधील युद्धें–(१७४०–६३) (नकाशा) २३३
१०. अमेरिकन वसाहतींची वाढ (नकाशा) २६१
११. नेपोलियनशीं युद्धें (१७९३–१८१५) (नकाशा) ... ३५०
१२. वॉटर्लूचा सामरिक नकाशा ३५५
१३. इंग्लंडच्या लोकसंख्येची वाढ (आलेख) ३६५
१४. इंग्लंडांतील धर्मस्वातंत्र्याची वाढ (आलेख) ३९०

वंशवृक्ष

१. स्पॅनिश राजघराणें १२६
२. हॅनोव्हेरियन राजघराणें १९६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

पृष्ठ

१. पहिला जेम्स (National Portrait Gallery) ... १
२. कॅटस्बी व गाय फॉक्स ४
३. ता. ५ नोव्हेंबर रोजीं अजूनही पार्लमेंटगृहाखालील तळघरें तपासतात ५
४. 'मे फ्लॉवर' जहाज (From a model in the Science Museum, London) ६
५. बेकन (National Portrait Gallery) १०
६. पहिल्या जेम्सच्या वेळची एक सभा (पोषाखाकरितां) (National Portrait Gallery) १३
७. पहिला चार्ल्स (National Portrait Gallery) ... १७
८. हेन्रीटा मराया (National Portrait Gallery) ... १७
९. बकिंगहॅम व त्याचें कुटुंब (National Portrait Gallery) १९
१०. वेंटवर्थ ऊर्फ लॉर्ड स्ट्रॅफर्ड (National Portrait Gallery) २३
११. आर्चबिशप लॉड (National Portrait Gallery) २४
१२. सन १६४२ सालचें दीर्घ पार्लमेंटचें पदक (British Museum) ३४
१३. पहिल्या चार्ल्सचीं मुलें (National Portrait Gallery) ... ३६
१४. राजपुत्र रूपर्ट (British Museum) ३७
१५. पहिल्या चार्ल्सला फाशीं दिला त्या वेळचें पदक (British Museum) ... ४३
१६. राजपक्षीयांचीं पदकें (British Museum) ४८
१७. ऑलिव्हर क्रॉम्वेल (National Portrait Gallery) ... ५०
१८. डनबारच्या लढाईनंतरचें पदक (British Museum) ... ५२
१९. डच युद्धाच्या वेळचें सोन्याचें पदक (British Museum) ५४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

पृष्ठ

२०. रिचर्ड क्रॉम्वेलचें पदक (British Museum) ६०
२१. सेनापति मंक (National Portrait Gallery)... ... ६१
२२. दुसऱ्या चार्ल्सचें राज्यारोहण पदक (British Museum)... ६४
२३. दुसरा चार्ल्स (National Portrait Gallery) ६५
२४. क्लॅरेंडन (National Portrait Gallery) ६८
२५. प्लेग–स्मारक स्तंभ ७२
२६. जुनें सेंट पॉल्स (British Museum) ७३
२७. नवें सेंट पॉल्स ७३
२८. दुसऱ्या चार्ल्सची राणी (National Portrait Gallery)... ७४
२९. दुसरा जेम्स (National Portrait Gallery) ... ९३
३०. न्यायाधीश जेफ्रिज (National Portrait Gallery) ... ९५
३१. सात बिशपांच्या खटल्याच्या वेळचें पदक (British Museum) ९९
३२. जुनें पार्लमेंटगृह व वेस्टमिन्स्टर दिवाणखाना (British Museum) १०४
३३. तिसरा विल्यम (National Portrait Gallery) ... १०६
३४. दुसरी मेरी (National Portrait Gallery) ... १०६
३५. इंग्लंडच्या बँकेची आजची इमारत ११५
३६. राणी ॲन (National Portrait Gallery) ... १२७
३७. लॉर्ड मार्लबरो (National Portrait Gallery) ... १२८
३८. सतराव्या शतकांतील जहाज (From the model formerly in the Science Museum, London) १४३
३९. एडिस्टोन दीपगृह १४४
४०. सर क्रिस्टॉफर रेन (National Portrait Gallery) ... १४६
४१. सर ऐझॅक न्यूटन (National Portrait Gallery) ... १४७
४२. सेंट पॉल्सचा अंतर्भाग (British Museum) ... १५६
४३. सुरतेची इंग्रजांची वखार १६२
४४. टेम्सवरील लंडनमधील एकच एक पूल (British Museum) १६५
४५. व्यापारी आपला माल असा नेत १६६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

पृष्ठ

४६. बोटखोडा १७३
४७. रस्त्यांतील आवाज १७४
४८. रस्त्यांतील आवाज १७५
४९. पायखोडा १७६
५०. स्टुअर्टकालीन पलंग १७७
५१. स्टुअर्टकालीन पोषाख २७९
५२. दारुड्यास होणारी शिक्षा १८३
५३. टोलनाक्याजवळील गाडी १८४
५४. सेडन खुर्ची (From an exhibit in the Scince Museum, London) ... १८५
५५. स्टुअर्ट कालांतील मुलें १८६
५६. जॉन मिल्टन (National Portrait Gallery) ... १८८
५७. जॉन बन्यन (British Museum) १८९
५८. सॅम्युअल पेप्स (British Museum) १८९
५९. वाईट रोट्या विकणाऱ्यास अशी शिक्षा होई १९१
६०. डकिंग स्टूल १९१
६१. पहिला जॉर्ज (National Portrait Gallery) ... १९७
६२. रॉबर्ट् वॉलपोल (National Portrait Gallery) ... २०६
६३. दुसरा जॉर्ज (National Portrait Gallery)... ... २१४
६४. जॉन वेस्ले (National Portrait Gallery) २२३
६५. तरुण तोतयाचें पेल्यावरील चित्र (British Museum) २३०
६६. विल्यम पिट–लॉर्ड चॅटहॅम (National Portrait Gallery) २३५
६७. सेनापति वूल्फ (National Portrait Gallery) ... २३८
६८. लॉर्ड क्लाइव्ह (National Portrait Gallery) ... २३८
६९. होरेस वॉलपोल (National Portrait Gallery) ... २३९
७०. तिसरा जॉर्ज (National Portrait Gallery) ... २५२
७१. तिसऱ्या जॉर्जची राणी (National Portrait Gallery) २५२
७२. जॉन विल्कस (National Portrait Gallery) ... २५६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

पृष्ठ

७३. ग्रेनव्हिलचा अर्ल (National Portrait Gallery) ... २६५
७४. चार्ल्स टाऊनशेंड (National Portrait Gallery) ... २६६
७५. समुद्रांत त्यांनीं चहा ओतून दिला २६८
७६. बेंजामिन फ्रँकलिन (British Museum) २६९
७७. जॉर्ज वॉशिंग्टन (National Portrait Gallery) ... २७४
७८. विल्यम पिट–धाकटा पिट (National Portrait Gallery) २८७
७९. ॲडॅम स्मिथ (National Portrait Gallery) ... २९२
८०. चरका ऊर्फ सूत काढण्याचें यंत्र (From the original in the Science Museum, London) ३०४
८१. हारग्रीव्हजचें 'स्पिनिंग जेनी' (From an exhibit in the Science Museum, London) ३०४
८२. आर्कराइट (By Courtesy of the Director of the Science Museum, London) ३०६
८३. क्रॉम्पटन (By courtesy of the Director of the Science Museum, London) ३०६
८४. कार्टराइट (By courtesy of the Director of the Science Museum, London) ३०७
८५. क्रॉम्पटनचें म्यूल (From an exhibit in the Science Museum, London) ३०७
८६. जेम्स वॅट (National Portrait Gallery) ३०९
८७. वॅटचें वाफेनें चालणारें एंजिन (From a model in the Science Museum, London) ३१०
८८. सर हंफ्री डेव्ही (National Portrait Gallery) ... ३१०
८९. केचें तार काढण्याचें यंत्र १७४९ (From an exhibit in the Science Museum, London) ३१४
९०. व्हॉल्टेर ३२१
९१. बॅस्टीलवर त्यांनीं हल्ला चढविला ३२३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांची अनुक्रमणिका

पृष्ठ

९२. एडमंड बर्क (National Portrait Gallery) ... ३२६

९३. नेपोलियन बोनापार्ट ३३३

९४. दर्यासारंग डंकन (National Portrait Gallery) ... ३३५

९५. लॉर्ड नेल्सन (National Portrait Gallery) ... ३४२

९६. नेल्सनच्या विजयार्थ उभारलेला विजयस्तंभ ३४३

९७. चार्ल्स जेम्स फॉक्स (National Portrait Gallery) ... ३४४

९८. वेलिंग्टनचा ड्यूक (National Portrait Gallery) ... ३५४

९९. लॉर्ड कॅसलरे (National Portrait Gallery) ... ३७०

१००. कॅप्टन कुक (National Portrait Gallery) ... ३८०

१०१. कुकचें ' एन्डेव्हर ' नामक जहाज (From a model ...
in the Science Museum, London) ... ३८०

१०२. डॉ. जोसेफ प्रीस्टले (National Portrait Gallery) ... ३८३

१०३. डॉ. जॉनसन (National Portrait Gallery) ... ३८४

१०४. डेव्हिड गॅरिक (National Portrait Gallery) ... ३८६

१०५. अठराव्या शतकांतील वाहतुक (From the Diorama
in the Science Museum, London)... ... ३९४

१०६. सरकारी टपालगाडी–१८२० (From an exhibit
in the Science Museum, London) ... ३९७

१०७. सन १८०७–०९ च्या सुमाराचे शास्त्रीय संशोधक
(पोषाखाकरितां) (National Portrait Gallery) ... ४००

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्टुअर्ट घराणें

१. कोण श्रेष्ठ—राजा कीं पार्लमेंट ?

१. पहिला जेम्स (१६०३–१६२५) स्वभाव :—स्कॉटलंडचा राजा सहावा जेम्स एलिझाबेथनंतर इंग्लंडचा राजा झाला. स्कॉटलंडची राणी मेरी हिचा तो मुलगा व सातव्या हेन्रीचा पणतु. एलिझाबेथनें लग्न केलें नव्हतें. जवळचा नातेवाईक म्हणून त्याला इंग्लंडचें राजपद मिळावें असें तिनें दर्शविलें व पार्लमेंटनें त्याला मान्यता दिली. यामुळें इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड हे तिन्ही देश एका छत्राखालीं येतील व ब्रिटिशबेटांचें एकीकरण होईल अशी सर्वांची कल्पना होती. जेम्स राजा झाला त्यावेळीं इंग्लंड वैभवाच्या शिखरावर होतें. व्यापार-वृद्धीमुळें देश संपन्न झाला होता. स्पेनचा पराभव झाल्यानेंही इंग्लंडला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालें होतें. या सर्व गोष्टींमुळेंच इंग्रजांचा आत्मविश्वास दुणावला होता, त्यांची दृष्टि व्यापक झाली होती व त्यामुळेंच धार्मिक स्वातंत्र्याप्रमाणेंच राजकीय स्वातंत्र्यही मिळविण्याच्या संधीची ते वाट पहात होते. अशा स्थितींत जेम्स इंग्लंडच्या गादीवर आला. त्यावेळीं त्याचें वय सदतीस वर्षांचें होतें. जन्मतःच तो राजा झाला असला तरी राजपदाला लागणारे गुण त्याच्या ठिकाणीं नव्हते. दिसण्यांत तो कुरूप दिसे. त्याचे वटवटीत डोळे व फेंगडी चाल यामुळें तो लोकांच्या मनांत भरत नसे. जात्याच भित्रा असल्यानें नागव्या तरवारीच्या नुसत्या दर्शनानेंही त्याला भीति वाटे. नेभळटपणा त्याच्या पांचवीलाच पुजिलेला ! मोठ्या छानछोकी पोषाखाची त्याला अत्यंत आवड असे व रंगेल व नटव्या दरबारीयांच्या

पहिला जेम्स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संगतींत मजेंत दिवस घालवावे असें त्याला वाटे. त्याचें जिव्हालौल्य अत्यंत जबरदस्त असल्यानें जिभेचें कोडकौतुक करण्याची त्याला हौस असे. यामुळेंच तो खादाड म्हणून प्रसिद्ध होता. व्यवहारज्ञानास तो पारखा असे. त्याला मनुष्याची नीट पारख करतां येत नसे. यामुळेंच रंगेल खुष-मस्कऱ्यांच्या संगतींत तो काळ घालवी. बाळपणापासूनच त्याचें सर्व आयुष्य व त्याचें शिक्षण प्रेसबिटेरियन लोकांच्या देखरेखीखालीं झाल्यानें तो चांग-लाच विद्यासंपन्न झाला होता हें खरें; परंतु त्यामुळेंच इतरांस तो कमी लेखी. अर्थात् पोकळ डौल, हट्टीपणा, बढाईखोरपणा, दुराग्रह व गर्विष्ठपणा वगैरे दुर्गुण त्याच्या ठिकाणीं नेहमीं दिसत व त्यामुळें इतरांच्या मतांस तो मुळींच किंमत देत नसे. या त्याच्या वृत्तीमुळेंच 'ख्रिस्ती जगांतील एक गाढा पढत मूर्ख' म्हणून फ्रान्सचा राजा चौथा हेन्री त्याचा नेहमीं उल्लेख करी. आपल्या इंग्लिश प्रजेचें अंतरंग त्याला कधीं कळलें नाहीं व तें कळून घेण्याचा त्यानें कधीं प्रयत्नही केला नाहीं. यामुळेंच त्याचा त्याच्या प्रजेशीं खटका उडाला. त्याचीं मुख्य कारणें म्हणजे त्याचीं दुराग्रही राजकीय मतें, त्याचें धार्मिक धोरण, त्याचा बेजबाबदार राज्यकारभार व बेलगामी परराष्ट्रीय धोरण हीं होत.

२. जेम्सचे सल्लागार :—स्कॉटलंडमधून येतांनाच राजानें आपल्या-बरोबर अनेक स्कॉच लोक आणले होते. ही गोष्ट इंग्रजांना खपली नाहीं व त्यामुळें इंग्रज व स्कॉच लोक यांच्यांत हेवादावा सुरू झाला. राज्यावर येतांच जेम्सनें एलिझाबेथचा हुशार प्रधान व लॉर्ड बर्लेचा मुलगा रॉबर्ट सेसिल याला मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं. तो जन्मदरिद्री नसला तरी गर्भश्रीमंतही नव्हता. मुत्सद्दीपणा व कसबी राजकारण यांचें त्याला बाळ-कडूच होतें. अशा लायक गृहस्थाच्या सल्ल्यानें जेम्स राज्यकारभार हांकत असे तोंपर्यंत ठीक होतें; पण तो १६१२ मध्यें मृत्यु पावल्यावर राजा खुषमस्क-ऱ्यांच्या तावडींत सांपडला. सुस्वरूप व सुंदर सुंदर पोषाख केलेले व दरबारी रिवाजांत मुरलेले लोक राजाला आवडूं लागले. त्यामुळें रंगदार व ढंगदार पोषाख केलेले लोक राजाच्या नजरेंत भरण्याचा प्रयत्न करीत. अशा लोकांत रॉबर्ट कार नांवाचा एक रंगेल व देखणा गृहस्थ राजाचा प्यारा बनला. साधारण कुळीचा असूनही राजा त्यावर इतका फिदा असे कीं, तासन्तास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो त्याच्या संगतींत काढी व आजारपणीं त्याचें मन रिझवी. अनेक बहुमान राजानें त्याच्यावर लादले व शेवटीं त्याला सॉमरसेटचा अर्ल केलें. त्याच्या-प्रमाणेंच जॉर्ज व्हिलियर्सनें राजाला आपल्या मोहिनी मंत्रानें भारून टाकलें होतें; इतकें कीं त्याच्याइतका उत्तम मनुष्य तोच असें राजाला वाटे. यालाच पुढें बकिंगहॅमचा ड्यूक करण्यांत आलें होतें. रॉबर्ट सेसिलनंतर या दोघा खुषमस्कऱ्यांच्याच सल्ल्यानें राजा वागत होता.

३. तत्कालीन कट (सन १६०३):—जेम्सनें सेसिलला आपला प्रधान नेमलें ही गोष्ट अनेकांना रुचली नाहीं. त्यामुळें त्याला दूर करण्याकरितां कट रचण्यांत आले. रॅले, लॉर्ड कॉबहॅम वगैरे लोकांनीं सेसिलला काढून टाकण्याकरितां व राज्याची एक वारस व जेम्सची एक दूरची चुलत बहीण ॲराबेला स्टुअर्ट हिला राज्यावर बसविण्याकरितां ' मेन प्लॉट ' नामक कट रचला. याच वेळीं वॅटसन, विल्टन, जॉर्ज ब्रूक वगैरे लोकांनीं धार्मिक मतस्वा-तंत्र्य मिळविण्याकरितां 'बाय प्लॉट' नामक कट रचला. दूरदर्शी सेसिलनें दोन्ही कट उघडकीस आणले. त्यामुळें कटवाल्यांस देहान्ताची शिक्षा सुनावण्यांत आली; परंतु रॅलेला मात्र कैदेंत टाकण्यांत आलें. वरील कटांत रोमन कॅथॉलिक व प्यूरिटन लोक होते. यामुळें त्यांच्याबद्दल राजाचें मन कलुषित झालें.

४. धार्मिक परिस्थिति :—जेम्स ज्यावेळीं इंग्लंडचा राजा झाला त्यावेळीं निरनिराळ्या धार्मिकपंथांच्या लोकांना त्याच्याबद्दल आशा वाटत होती. स्कॉटलंडची राणी मेरी हिचा तो मुलगा म्हणून कॅथॉलिकांना त्याच्या-बद्दल आपलेपणा वाटे. प्यूरिटनांना वाटे कीं, प्रेसबिटेरियनांच्या देखरेखीखालीं त्याचें शिक्षण झाल्यानें तो आपलें हित साधील; परंतु जेम्सनें एपिस्को-पेलियनपंथ उचलून धरण्याचें ठरविल्यामुळें वरील दोघांचेंही समाधान झालें नाहीं. राजाचा स्वतःचा ओढा कॅथालिकपंथाकडेच होता; परंतु तो त्यानें दिसूं दिला नाहीं. तेव्हां सन १६०४ मध्यें हॅंपटन कोर्ट नामक राज-वाड्यांत प्यूरिटन व एपिस्कोपेलियन लोकांच्या विनंतीस मान देऊन त्यानें एक सभा बोलाविली. उद्देश इतकाच कीं त्या दोन्ही धर्मपंथांतील वादाच्या मुद्यांचा नीट विचार करून त्यांच्यांत मेळ बसवावा. या सभेंत विशेष असें कांहींही घडलें नाहीं. मात्र प्रार्थनापुस्तकांत थोडा बदल करण्याचें व बायब-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बलचें नवीन भाषांतर तयार करून तें छापण्याचें ठरविण्यांत आलें. त्याप्रमाणें सन १६११ त तें छापूनही तयार झालें. या सभेमध्यें बिशप लोकांच्या हातची धार्मिक सत्ता काढून टाकावी असा प्यूरिटनांनीं हट्ट धरला होता. तेव्हां त्या सभेचा अध्यक्ष – जेम्स राजा – चिडला व ' आज तुम्ही बिशप नको म्हणतां; उद्यां राजाही नको असें म्हणाल ' असें म्हणून ती सभा त्यानें उधळून लावली ! त्यामुळें प्यूरिटन लोक असंतुष्ट झाले; एपिस्कोपेलियनपंथाला राजानें जवळ केल्यानें त्या पंथांतील लोकांचें मात्र थोडें समाधान झालें. कॅथॉलिकांना मात्र त्राता राहिला नाहीं.

५. पार्लमेंट उडवून देण्याचा कट :—अशा स्थितींत जेम्सबद्दल कॅथॉलिकांना आपलेपणा वाटेनासा झाला. कॅथॉलिक पंथाबद्दल त्याला प्रथमतः आपलेपणा वाटे; व त्यांच्यावरील धार्मिक निर्बंध सैल करण्याचाही त्यानें प्रथम प्रयत्न केला. परंतु त्याचा योग्य तो परिणाम झाला नाहीं. त्यांतच ' मेन ' व ' बाय ' कटांत कॅथॉलिक लोक सामील असल्याचें आढळल्यानें जेम्सचें पित्त खवळलें व कॅथॉलिकांचा छळ सुरू झाला. त्यांतून सुटका करून घेण्याकरितां रॉबर्ट कॅटस्बीच्या नेतृत्त्वाखालीं पार्लमेंट चालू असतां राजासह पार्लमेंटगृह उडवून देण्याकरितां एक भयंकर कट कॅथॉलिकांनीं रचला. कटवाल्यांनीं पार्लमेंटगृहाशेजारचें एक घर प्रथमतः भाड्यानें घेतलें व त्याच्या तळघरांतून उमरावमंडळाच्या खालपर्यंत एक भुयार तयार केलें. तेथें बंदुकीच्या दारूचीं पिपेंच्या पिपें, लाकडें व दगडी कोळसा यांनीं झांकून, ठेवण्यांत आलीं. ज्या

कॅटस्बी व गाय फॉक्स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिवशीं पार्लमेंट भरणार त्या दिवशीं या पिपांना आग लावून देऊन दारूच्या स्फोटानें राजासह पार्लमेंटसभा उडवून देण्याचा कटवाल्यांचा विचार होता. यामुळें या कटाला 'दारूचा कट' असें म्हणतात. कटवाल्यांपैकीं एकानें लॉर्ड माँटीगल नामक आपल्या नातेवाईकास पत्र लिहून कळविलें कीं 'कृपा करून ५ नोव्हेंबरच्या पार्लमेंटच्या सभेस हजर राहूं नये. कारण त्या दिवशीं पार्लमेंटगृहाला एक भयंकर मोठा धक्का बसणार आहे.' ही बातमी रॉबर्ट सेसिलला कळली व ती त्यानें राजाला कळविली. ताबडतोब राजानें पार्लमेंटचीं तळघरें तपासण्याची आज्ञा केली. त्यावेळीं गाय फॉक्स नांवाचा एक कटवाला हातांत एक चुडा घेऊन दारूच्या पिपांना आग लावण्याच्या तयारींत दिसला. लगेच त्याला कैद करण्यांत आलें; व त्यानंतर इतर कटवाल्यांसही पकडून त्यांना फाशीं देण्यांत आलें. या सर्व घडामोडींमुळें राजाची व पार्लमेंटचीही कॅथॉलिकांवर वक्रदृष्टि झाली व त्यांच्यावर कडक निर्बंध लादण्यांत आले. त्यांच्याविरुद्ध असलेल्या कायद्यांची अंमलबजावणीही कडक रीतीनें करण्यांत येऊं लागली व यामुळें त्यांचा अत्यंत छळ होऊं लागला. अजूनही दरवर्षी ५ नोव्हेंबर रोजीं पार्लमेंटच्या खालचीं तळघरें तपासण्यांत येतात; व इंग्लंडमधील मुलेंमुली गाय फॉक्सच्या प्रतिमांची मिरवणूक काढून त्या त्या दिवशीं जाळतात.

ता. ५ नोव्हेंबर रोजीं, अजूनही पार्लमेंटगृहाखालील तळघरें तपासतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. प्यूरिटनांचा छळ – पिल्ग्रिम फादर्स :—हँपटन राजवाड्यांत झालेल्या सभेपासून राजा प्यूरिटन लोकांवर संतापला होता. राजाची सत्ता मान्य न करतां बिशपांची सत्ता त्यांना मान्य आहे, असा त्यांच्यावर त्याचा आरोप होता. धार्मिक बाबतींत राजाची सत्ताच श्रेष्ठ होय हें तत्त्व जेम्सनें प्रतिपादिलें व त्याच्या विरोधकांचा छळ करण्यास सुरुवात केली. यासुळें इंग्लंडमध्यें राहिल्यास आपल्या पंथाला व आपल्या जीवितालाही धोका पोंचेल असें वाटून अनेक प्यूरिटनांनीं देशत्याग करावयाचें ठरविलें. त्याप्रमाणें कांहीं हॉलंडमध्यें गेले. पुढें सन १६२० मध्यें १०२ प्यूरिटनांनीं हॉलंडमधील आपल्या धर्मबांधवांबरोबर देशत्याग करावयाचें ठरवून ‘ मे फ्लॉवर ’ नामक जहाजांत बसून ते प्लीमथहून अमेरिकेस गेले. येथेंच त्यांनीं ‘ न्यू इंग्लंड ’ नांवाची वसाहत स्थापन केली व तेथें ते राहूं लागले. या ठिकाणीं आपल्याला आपल्या मताप्रमाणें धर्मप्रार्थना व धर्मविधी करतां येतील अशी त्यांची कल्पना होती. त्याप्रमाणें ती सफल झाली, परंतु आपल्या इच्छेप्रमाणें धर्मप्रार्थना व धर्मविधी करतां येत नाहींत म्हणून ज्यांनीं देशत्याग



‘ मे फ्लॉवर ’ जहाज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला त्याच या 'पिल्ग्रिम फादर्सनीं' तेथील लोकांवर आपला धर्मपंथ लादला, त्यांच्यानंतर अमेरिकेंत आलेल्या अनेक खिस्ती बांधवांचा त्यांनीं छळ केला व त्यांना आपल्या पंथाप्रमाणें धर्मविधी करण्यास भाग पाडलें! पिल्ग्रिम फादर्सनीं अमेरिकेंत वसाहत स्थापन केल्यानेंच आजच्या अमेरिकन संयुक्त संस्थानांची स्थापना झाली.

७. श्रेष्ठ कोण—राजा कीं पार्लमेंट :—राजाच्या धार्मिक धोरणामुळें लोकांचीं मनें अत्यंत कलुषित झालीं होतीं. त्यांतच राजाचे राजसत्तेबद्दलचे विचार लोकांस कळले त्यामुळें तर राजा व प्रजा यांच्यांत उघड उघड विरोध दिसूं लागला. ट्यूडर राजांनीं अनियंत्रितपणें सत्ता उपभोगिली व मन मानेल तसा राज्यकारभार केला, ही गोष्ट जमेस धरून त्यांच्याप्रमाणेंच आपण स्वच्छंदपणें कारभार करावा असें जेम्सला वाटत असे. त्यांतच त्याच्या दरबारीयांनीं व धर्मगुरूंनीही त्याचीं मतें उचलून धरलीं. यामुळें राजा हा ईश्वरी अंश असून राज्यकारभार करण्याकरितां ईश्वरानें राजाची नेमणूक केलेली असते; अर्थात् राजा हा प्रजेला जबाबदार नसून ईश्वराला आहे; व त्यामुळें राजाची अवज्ञा म्हणजे प्रत्यक्ष ईश्वराची अवज्ञा करणें होय. अमुक कर व तमुक करूं नकोस असें राजाला प्रजेनें सांगणें म्हणजे ईश्वरावज्ञा करण्यासारखें होय. राजा चांगला असो वाईट असो, जुलमी असो कीं प्रजाहिततत्पर असो त्याचे हुकूम व त्याचे कायदे बिनतक्रार मानणें हें प्रजेचें कर्तव्य होय. पापी प्रजेला पापापासून मुक्त करण्याकरितांच ईश्वरानें जुलमी राजा निर्माण केलेला असतो. अर्थात् अशा राजाविरुद्ध बंड करणें म्हणजे पापांत जास्तच रुतणें होय. राजाचे अधिकार ईश्वरदत्त व वंशपरंपरेनें त्याला मिळत असल्यामुळें ते आपल्या प्रजेला राजा देऊंच शकत नाहीं. दिलेच तर राजा ईश्वरापुढें कृतघ्न ठरेल. अशा तऱ्हेची राजसत्तेविषयीं जेम्सची विचारसरणी होती; ती लोकांना कधींही पसंत पडणारी नव्हती. राजाच्या या विचित्र विचारसरणीस पार्लमेंटनेंही चोख उत्तर दिलें होतें. पार्लमेंटचें म्हणणें असें कीं, राजा लोकनियुक्त आहे; ईश्वराचा प्रतिनिधि नाहीं. राजापेक्षां राष्ट्र श्रेष्ठ असल्यानें जुलमी राजाविरुद्ध बंड करून त्याला राज्यावरून काढून टाकण्याचा राष्ट्राला स्वयंभू अधिकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. अर्थात् पार्लमेंटचे कायदे राजा व रंक या दोघांनाही सारखेच बंधनकारक आहेत. राजा व पार्लमेंट यांचे हे परस्परविरोधी विचार असल्यामुळेंच त्यांच्यामध्यें सतराव्या शतकांत झगडा सुरू झाला; व त्यामुळें एका स्टुअर्ट राजाला फाशीं जावें लागून दुसऱ्याला राज्यत्याग करावा लागला !

८. जेम्स व पार्लमेंट :—राजाच्या या विचित्र विचारसरणीमुळेंच जेम्स व त्याचें पार्लमेंट यांच्यामध्यें अनेक वेळां खटके उडूं लागले व कित्येक वेळां त्याला हार खावी लागली. उत्पत्तीपासून ट्यूडर अंमलाअखेर पार्लमेंटला अनेक हक्क प्राप्त झाले होते व त्याबद्दल पार्लमेंटसभा अत्यंत जागरूक राहात असे. राजाला अनेक हक्क होते ही गोष्ट खरी; परंतु नवा कायदा करणें अगर जुने दुरुस्त करणें, नवे कर बसविणें अगर जुन्यांत दुरुस्त्या करणें वगैरे गोष्टी पार्लमेंटच्या संमतीखेरीज त्याला करतां येणें शक्य नव्हतें. राजाच्या मालकीच्या जमिनीचें त्याला उत्पन्न मिळे; तो सरंजामी सरदार असल्यामुळेंही त्याला जहागिरीचें उत्पन्न मिळे; टनेज व पौंडेज या करांचेंही उत्पन्न राजाला पार्लमेंटच्या संमतीनें मिळे; व कंपन्यांना सनदा देणें, मक्ते देणें व दंडवसुली वगैरेमुळेंही राजाला उत्पन्न होई. परंतु पहिला जेम्स अति खर्चिक असल्यामुळें त्याला हें सर्व उत्पन्न पुरत नसे; व तो स्वतःच्या अधिकारांत कर वाढवी व त्यामुळें त्याला पार्लमेंटचा विरोध होई. तसेंच पार्लमेंटच्या हक्कांचें उल्लंघन केल्यास पार्लमेंट गप्प बसत नसे आणि याचें प्रत्यंतर पार्लमेंटच्या पहिल्याच बैठकीच्या वेळीं राजाला आलें. मुख्यतः करवसुली व पार्लमेंटचे हक्क यांच्याबद्दल नेहमीं खटके उडत गेले.

९. पार्लमेंटच्या हक्कांसाठीं झगडा :—सन १६०४ मध्यें जेम्सनें पहिली पार्लमेंट सभा बोलाविली. त्यावेळीं गुडविन नांवाच्या एका रक्षणबाह्य गृहस्थाला लोकांनीं बकिंगहॅम परगण्यातर्फे निवडून दिलें. परंतु तो रक्षणबाह्य म्हणून राजानें त्याची निवडणूक रद्द ठरविली व फेर निवडणूक व्हावी असें जाहीर केलें. त्यामुळें पार्लमेंटला राग आला; व वादग्रस्त निवडणुकी निकालांत काढण्याचा अधिकार पार्लमेंटचा आहे, राजाचा नाहीं असें राजाला खडसावलें. तेव्हां राजानें नमतें घेऊन पार्लमेंटचा तो हक्क मान्य केला. तसेंच शर्ले या नांवाच्या पार्लमेंटच्या एका सभासदास कर्जाकरितां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजानें पकडून कैदेंत टाकलें. राजद्रोहासारख्या गुन्ह्याखेरीज पार्लमेंटच्या सभासदास राजाला पकडतां येत नसे. त्यामुळें याही वेळीं पार्लमेंटनें राजाच्या वरील कृत्याविरुद्ध ओरड करून शर्लेला बंधमुक्त करविलें. यामुळें पार्लमेंटच्या सभासदांचा अटक-स्वातंत्र्याचा हक्क मान्य केला गेला. याच-वेळीं पार्लमेंटनें आपले अधिकार कायदेशीर व परंपरागत असल्याबद्दल राजाला कळविलें; व टनेज व पौंडेज या करांचें उत्पन्न राजानें तहहयात घ्यावें असेंही पार्लमेंटनें ठरविलें. पुढें १६०६ सालच्या पार्लमेंटनें कॅथॉलिकां-विरुद्ध कडक कायदे पास केले. येथपर्यंत ठीक होतें. परंतु सन १६०७ सालीं भरलेल्या पार्लमेंटपासून भांडणास खरा रंग भरला. कारण त्या वर्षीं राजानें स्वतःच्या अधिकारांत आयात मालावर जकाती बसविल्या. या जकातीस पार्लमेंटची संमति नसल्यानें त्या कायदेशीर नाहींत असें सांगून बेट्स या व्यापाऱ्यानें त्या देण्याचें नाकारलें; तेव्हां राजानें त्याला कैदेंत टाकलें. व्यापाराचें नियंत्रण करण्याचें काम राजाचें असल्यानें वरीलप्रमाणें जादा जकाती बसविण्याचा राजाला अधिकार पोंचतो असा न्यायकोर्टानें निकाल दिल्यानें बेट्सला त्या जकाती द्याव्या लागल्या. या कृत्यानें राजाचा विजय झाला, व म्हणून त्यानें आणखीही जकाती लादल्या. अर्थात् या गोष्टी पार्लमेंट सभेला आवडल्या नाहींत व तिनें या कृत्याचा जोरानें निषेध केला. आपल्या विजयानें आनंदून जाऊन जेम्सनें नजराणे व सक्तीचीं कर्जेंही घेण्यास सुरुवात केली; अधिकाराच्या जागा विकण्यास व जो कोणी एक हजार पौंड देईल त्याला सरदारकी देण्याचीही त्यानें वहिवाट पाडली. या सर्व मार्गांनीं त्यानें पुष्कळ पैसा गांठीं मारला.

१०. जेम्सचा अनियंत्रित कारभार:—सन १६१२ मध्यें राजाचा शाहणा मुख्य प्रधान सर रॉबर्ट सेसिल मृत्यु पावला व त्याच्यानंतर राजानें बहुतेक सर्व सत्ता व कारभार आपल्या हातीं घेतला. त्यावेळीं रॉबर्ट कार व बकिंगहॅम हेच त्याचे मुख्य सल्लागार असत. सन १६१४ सालीं त्यानें दुसरी पार्लमेंट सभा बोलाविली. परंतु एकही कायदा करण्यापूर्वीच त्यानें ती बरखास्त केली; या पार्लमेंटनें कांहींच काम केलें नाहीं म्हणून तिला 'फुसकी पार्लमेंट' असें म्हणतात. पुढें सहा वर्षें त्यानें पार्लमेंटशिवायच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनियंत्रित कारभार हांकला. सन १६१६ मध्यें सर एडवर्ड कोक या न्यायाधीशानें राजाचें न ऐकतां एका खटल्याचा निकाल दिला व कायदा राजापेक्षां श्रेष्ठ आहे हें तत्त्व सिद्ध केलें. या काळांत राजानें अनेक कायदे आपल्या अधिकारांत पास केले होते व जाहीरनामेही काढले होते. त्यांना पार्लमेंटची संमति नसल्यानें त्यांना कायद्याचें स्वरूप येत नाहीं असेंही कोकचें म्हणणें होतें. या सर्व कारणांकरितां जेम्स कोकवर रुष्ट झाला व त्यानें त्याला कामावरून दूर करून लॉर्ड बेकनला त्याच्या जागीं मुख्य न्यायाधीश नेमलें. सन १६२१ सालीं बेकनवर पाळी आली. त्या सालीं राजानें तिसऱ्या वेळीं पार्लमेंटसभा बोलाविली. या पार्लमेंटनें राजाच्या प्रधानावर खटला भरण्याचा आपला अधिकार सिद्ध करण्याचा प्रयत्न केला व तो सिद्धीस नेला. लॉर्ड बेकन मुख्य न्यायाधीश असतां तो लांच खात असे असा त्याच्यावर पार्लमेंटनें आरोप ठेवला. लॉर्ड बेकन हा राजाचा प्रधान व मुख्य न्यायाधीशही होता. लांच खाल्ल्याचा आरोप त्यानें कबूल केला; पण आपल्या निकालावर त्या गोष्टीचा आपण परिणाम होऊं देत नाहीं असा त्यानें निर्वाळा दिला. परंतु यानें तो वांचणार नव्हता. लगेच त्याला चाळीस हजार पौंड दंड ठोठावण्यांत आला व कैदेची शिक्षा देण्यांत आली. राजानें त्याचा दंड माफ करून त्याला कैदेंतून मुक्त केलें. परंतु यामुळें राजाच्या प्रधानांवर खटले भरण्याचा पार्लमेंटला अधिकार आहे या तत्त्वाला आपोआपच मान्यता मिळाली. पुढच्या वर्षी भरलेल्या पार्लमेंटपुढें एक वादग्रस्त प्रश्न उत्पन्न झाला. त्या वेळीं राजपुत्राच्या लग्नाचें घाटत होतें. तेव्हां त्याचें लग्न एका प्रॉटेस्टंट राजकन्येशीं व्हावें अशी पार्लमेंटनें राजाला विनंति केली. परंतु अशा बाबतींत ढवळाढवळ

बेकन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्याचा पार्लमेंटला अधिकार नाहीं असें जेम्सनें पार्लमेंटला कळविलें. तेव्हां राष्ट्राच्या सर्व बाबींचा विचार करण्याचा पार्लमेंटला हक्क आहे असें पार्लमेंटनें राजाला बजावलें. यामुळें राजा चिडला व त्यानें पार्लमेंटचीं इतिवृत्तें मागवून घेऊन त्यांतील वरील हक्काच्या प्रतिपादनार्थ असलेला मजकूर स्वतःच्या हातानें टरकावून टाकला ! त्याच्या या कृत्यानें पार्लमेंटला चीड आली. त्याची शेवटची पार्लमेंट सभा सन १६२४ मध्यें भरली. या पार्लमेंटनें मक्तेदानपद्धति बेकायदा असल्याचें ठरविलें. अशा तऱ्हेनें जेम्सशीं भांडून राजाच्या प्रधानांवर खटले भरणें, अटक-स्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य, मक्ते देणें बेकायदा ठरविणें वगैरे अधिकार पार्लमेंटनें राजाकडून पुन्हां मान्य करून घेतले.

११. जेम्सचें परराष्ट्रीय धोरण :—वरीलप्रमाणें हक्कांकरितां भांडण चालू असतांच पार्लमेंट व राजा यांचें परराष्ट्रीय धोरणाबद्दलही बिनसलें. आपल्या मुत्सद्देगिरीवर फाजील विश्वास असल्यामुळें जेम्सला युद्ध मना-पासून आवडत नसे; प्रजेला तें पाहिजे होतें. तशांतच स्पेनसारख्या आपल्या पिढीजाद शत्रूबरोबर जेम्स तह करावयास निघाला हें पाहून लोक खवळले होते. चार्ल्स नामक आपल्या पुत्राचा स्पॅनिश राजकन्येशीं जेम्सला विवाह घडवून आणावयाचा होता. परंतु त्याचा हा घाट फसला. याच-वेळीं आपला बेत सफळ व्हावा व स्पेनच्या राजाला खूष करावें म्हणून रॅलेला त्यानें फांशीं दिलें. जेम्सच्या कारकीर्दीपासून रॅले राजद्रोहाच्या आरोपवारून कैदेंत होता. तेथें असतांच अमेरिकेंतील सोन्याच्या खाणींचा शोध लावण्याचें वचन दिल्यानें जेम्सनें त्याची सुटका केली. मात्र अमेरिकेस जात असतां अगर अमेरिकेंत गेल्यावर स्पॅनिश लोकांवर हल्ला न करण्याचें जेम्सनें रॅलेकडून वचन घेतलें होतें. सन १६१६ मध्यें रॅले आपल्या सफरीवर निघाला. परंतु तेथें सोन्याची खाण त्याला सांपडली नाहीं ती नाहींच; उलट स्पॅनिश वकिलाच्या कांहीं कारवाईमुळें स्पॅनिश लोकांशीं त्याचा झगडा झाला. ही हकीकत कळल्यावर स्पॅनिशांस खूष करण्याकरितां जेम्सनें रॅलेला फाशीं दिलें ! (१६१८). परंतु या गोष्टीमुळें जेम्सचें उद्दिष्ट सफळ झालें नाहींच. कारण यानंतर सन १६२३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें राजपुत्र चार्ल्स व बकिंगहॅम यांना जेम्सनें गुप्तरीतीनें स्पेनमध्यें पाठविलें असतां ते हात हालवीतच इंग्लंडला परत आले. कारण स्पेनच्या राजानें कॅथॉलिक धर्म स्वीकारण्याची राजपुत्राला शपथ घेण्यास सांगितलें असतां तसें करण्याचें त्यानें नाकारलें. पुढें चार्ल्सचें लग्न फ्रेंच राजकन्या हेन्रीटा मराया हिच्याशीं होण्याचें ठरलें (१६२४). याच्यापूर्वींच सन १६१३ मध्यें जेम्सनें आपली मुलगी एलिझाबेथ हिचें लग्न जर्मनींतील पॅलेटाईन प्रांताचा राजा फ्रेडरिक याच्याशीं लावून दिलें होतें. तो प्रॉटेस्टंट होता व जर्मनींतील प्रॉटेस्टंट संस्थानांचा तो पुढारी मानला जात असे. पुढें सन १६१८ सालीं जर्मनीमध्यें प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक संस्थानांमध्यें एकाएकीं युद्धास सुरुवात झाली. 'त्याला त्रिंशद्वार्षिक युद्ध' असें म्हणतात. त्या वेळीं जेम्सला आपल्या मनाविरुद्ध आपल्या जांवयाला मदत करावी लागली. याच वेळीं स्पॅनिशांनीं कॅथॉलिक संस्थानांची तळी उचलून धरून फ्रेडरिकचा पराभव केला व त्याला त्याच्या प्रांतांतून हांकून लावलें. तेव्हां जेम्सला सन १६२४ मध्यें स्पेनविरुद्ध लढाई पुकारावी लागली. त्याप्रमाणें मेसफील्डच्या नेतृत्वाखालीं त्यानें आपल्या जांवयाच्या मदतीकरितां सैन्य पाठविलें. परंतु त्याचा पराभव झाला. अशा स्थितींतच जेम्स इ. स. १६२५ मध्यें वयाच्या साठाव्या वर्षी मरण पावला.

१२. राजा जेम्स व आयर्लंड :—जेम्सच्या कारकीर्दींत आयर्लंडमध्यें सर्वत्र शांतता होती असें नाहीं. सन १६०७ मध्यें ओनील व आडोनेल या दोन्ही सरदार घराण्यांतील सर्व मंडळी आयर्लंडांतून स्पेनकडे पळून गेली. आपण आयर्लंडांत राहिलों तर आपला छळ होईल अशी त्यांस भीति होती. ती मंडळी गेल्यावर त्यांचा जमीनजुमला कायद्यानें राजाच्या मालकीचा ठरला. त्यांची बहुतेक सर्व जमीन अल्स्टरमध्यें होती ती जेम्सच्या मालकीची ठरली. त्यापैकीं कांहीं भाग राजानें आयरिश लोकांस देऊन बाकीचे सर्व भाग त्यानें इंग्लिश वसाहतवाल्यांस दिले. यामुळें इंग्लिशांनीं अल्स्टरमध्यें जाऊन तेथें वसाहती स्थापन केल्या. अर्थात् त्या भागांत जे मूळचे लोक रहात होते ते सर्व बेकार झाले व त्यांना या नव्या वसाहतवाल्यांचे दास व्हावें लागलें. अत्यंत खटपट करून वसाहतवाल्यांनीं अल्स्टर प्रांतांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तम लागवड करून तो प्रांत भरभराटीस आणला. परंतु जे आयरिश या वसाहतस्थापनेमुळें चिडले होते, त्यांनीं पुढें बंडाचें निशाण रोवलें.

१३. जेम्सची योग्यता :—राज्यकर्ता या नात्यानें जेम्सची योग्यता फारशी मोठी नाहीं. राजाच्या ईश्वरदत्त हक्कांसाठीं त्यानें जिवापाड मेहनत केली; परंतु अखेरीस त्याला यश आलें नाहीं. ट्यूडर राजांच्या पावलावर पाऊल टाकून जाण्याचा त्यानें प्रयत्न केला; परंतु ट्यूडर राजांच्या अंगीं जो दूरदर्शीपणा होता तो त्याच्या ठिकाणीं नसल्यानें त्याची फसगत झाली.

पहिल्या जेम्सच्या वेळची एक सभा (पोषाखाकरितां)

राजाच्या ईश्वरदत्त हक्कांवर ट्यूडर राजांचाही विश्वास होता; परंतु तो त्यांनीं आपल्या प्रजेवर न लादतां प्रजेला विश्वासांत घेऊन त्यांनीं आपला हेतु साधला व अनियंत्रितपणें राज्य केलें. ही गोष्ट जेम्सला साधली नाहीं. त्याचप्रमाणें प्रजेचें हित तेंच राजाचें हित हें ट्यूडरांचें यशस्वी धोरण जेम्सनें अनुसरलें नाहीं व त्यामुळेंच पार्लमेंटशीं त्याचा नेहमीं बेबनाव झाला. आपल्या प्रजेला आवडेल असें परराष्ट्रीय धोरणही त्यानें स्वीकारलें नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धार्मिक बाबतींतही त्यानें राष्ट्रास दुखविलें. या सर्व गोष्टींमुळेंच राजसत्तेच्या वैभवास व मोठेपणास त्यानें कलंक लावला असें म्हणतात; व त्यामुळें राजसत्ता लोकांच्या मनांतून जी एकदां उतरली ती कायमचीच. स्टुअर्ट काळांत राजा व पार्लमेंट यांच्यामध्यें पुढें जो झगडा झाला त्याचें बीज जेम्सच्याच कारकीर्दींत पेरलें गेलें.

अभ्यास

१. जेम्सच्या स्वभावाचें वर्णन करा. राज्यकर्ता या नात्यानें त्याची योग्यता वर्णा.
२. राजा व पार्लमेंट यांच्यांत तंटा होण्याचें कारण काय? त्याचा परिणाम काय झाला?
३. राजानें अन्याय्य अशा कोणत्या गोष्टी केल्या? पार्लमेंटनें कोणकोणते अधिकार त्याच्याकडून पुन्हां मान्य करून घेतले?
४. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा:—
   पिल्ग्रिम फादर्स, हँपटन कोर्ट सभा, अल्स्टर, सर रॉबर्ट कार, फ्रेडरिक, बकिंगहॅम, रॅले, गुडविन, कोक, बेट्स, गायफॉक्स, रॉबर्ट सेसिल, कॅंटस्त्री.
५. प्यूरिटन लोक कोण? त्यांचा जेम्सच्या कारकीर्दींत छळ कां झाला? त्याचा परिणाम काय झाला?
६. जेम्सच्या अडचणी कोणत्या? त्यांतून तो कसा निभावून गेला?

उतारे.

१. प्यूरिटनांसंबंधीं जेम्सचें मत—हँपटन कोर्ट सभेंतील भाषण—

इ. स. १६०४—"आणि या लोकांना माझ्या राजसत्तेबद्दल आजच मोठा उमाळा आलेला दिसतो! परंतु यांतील खरें गम्य माझ्या ध्यानीं आल्याशिवाय कसें राहील? आपल्या प्यूरिटन पक्षाचें बल वाढावें हा यांचा हेतु व त्याकरितां हे लोक तुम्हांस भुलवून आपल्या गटांत ओढण्याच्या प्रयत्नांत आहेत. जणूं कांहीं तुम्ही व तुमच्या पक्षांतील लोकांनीं त्यांचें ढोंग ओळखलेलेंच नाहीं! पण लक्षांत ठेवा कीं, तुम्ही एकदां पदच्युत झालांत व तुमच्या जागीं हे लोक स्थानापन्न झाले, म्हणजे यांचें खरें स्वरूप चटकन बाहेर येईल व आज ते नुसते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बिशप नको म्हणतात, तर पुढें राजाही नको म्हणतील ! कांहीं तरी भकायचें म्हणून मी हें बोलत नाहीं. त्याबद्दल मजजवळ भरपूर पुरावाही आहे. मी स्कॉटलंडमधून इंग्लंडमध्यें आल्यापासून हे लोक मला आयर्लंड, इंग्लंड, फ्रान्स व स्कॉटलंड यांचा राजा म्हणून व धर्मसंरक्षक म्हणूनही संबोधतात; परंतु माझ्या राजसत्तेबद्दल कधीं ब्रही काढीत नाहींत. अर्थात् या लोकांची मी पूर्णपणें किंमत व लायकी ओळखून आहें. या लोकांना माझें एवढेंच सांगणें आहे कीं त्यांनीं आपल्यापुरतेंच पहावें नाहींतर त्यांस हद्दपार व्हावें लागेल. अगर त्यापेक्षांही जास्त कडक असें धोरण मला स्वीकारावें लागेल."

प्रश्न :—१. राजाचें प्यूरिटनांसंबंधीं काय मत होतें ? कशावरून ?
२. वरील प्रकारचा उपदेश त्यानें कोणास केला ? त्याचें भविष्य खरें ठरलें का ? केव्हां ?

२. स्टार चेंबरपुढील जेम्सचें भाषण—राजसत्ताच श्रेष्ठ–१६१६.

तुमच्या अधिकारांनाही कांहीं मर्यादा आहेतच. पहिलें म्हणजे तुम्ही राजाधिकारांचें उल्लंघन करतां कामा नये. माझ्या अधिकारासंबंधीं एखादा प्रश्न उत्पन्न झालाच तर प्रथम मला अगर माझ्या प्रधानमंडळाला अगर दोघांनाही विचारा व मग त्याचा निकाल लावा. कारण राजाधिकारांची चर्चा करणें बेकायदेशीर व मूर्खपणाचें आहे. आणि ती तुम्हीं केलीतच तर प्रत्यक्ष ईश्वराच्या सिंहासनावर बसणाऱ्या आम्हा राजे लोकांबद्दल तुम्ही अनादर दाखवितां व त्यांचे दोष उघडकीस आणतां असें होईल. दुसरें असें कीं, तुम्ही आपल्यापुरतें पहा व दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करूं नका. खासगी बाबतींत माझ्या प्रजेला जितकें स्वातंत्र्य आहे तितकेंच मलाही आहे. राजाधिकार इतके निर्दोष आहेत कीं त्याबद्दल कोणाही कुशल व निष्णात कायदेपंडिताला शंका घेतां येणार नाहीं. तिसरें असें कीं, परमेश्वराला अमुक करतां येतें व तमुक करतां येणार नाहीं असें म्हणणें किंवा राजाला अमुक करतां येईल व तमुक करतां येईल असें म्हणणें म्हणजे ईश्वराची शुद्ध कुचेष्टा व निंदा होय. तेव्हां राजाची इच्छा म्हणजेच कायदा, असेंच तुम्ही सदैव मानीत जा.

प्रश्न :—१. वरील उताऱ्यावरून राजाचें राजसत्तेबद्दल कोणतें मत होतें ? कोणत्या वाक्यांवरून हें सिद्ध कराल ?
२. राजा व न्यायासनें यांचे संबंध, जेम्सच्या मतें, कोणते ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—इ. स. १६०३–१६२५.

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	युरोप-महत्त्वाच्या गोष्टी	हिंदुस्थान-महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ति
१६०३→	१६०३–१६२५ पहिला जेम्स			
-				रॅले, शेक्सपियर,
→	१६०४ हॅम्पटन को.स.			जहांगीर,
-	१६०५ पार्लमेंट उडवून देण्याचा कट		१६०५ अकबराचा मृत्यु	गाय फॉक्स
			१६०५–१६२७ जहांगीर	खुश्रू, बेटस्
→	१६०८ मिल्टनचा जन्म	१६०८ फ्रेंच कानडाची स्थापना	१६०८ तुकारामाचा जन्म	कॅप्टन हॉकिन्स
-		१६०९ गॅलीलियो-दुर्बिणीचा शोध		तुकाराम, केप्लर, मिल्टन
१६१०→				
	१६११ बायबलचें इंग्रजी भाषांतर		१६११ जहांगीर-नूरजहान लग्न	नूरजहान
→	१६१५		१६१५ सर टॉमस रो दिल्लीस आला	सर टॉमस रो
-			१६१६ मलिकंबरशीं युद्ध	
→	१६१८ रॅलेला फाशीं	१६१८ त्रिंशद्वार्षिक युद्ध		
१६२०→	१६२० मे फ्लॉवर-अमेरिकेकडे			लॉर्ड बेकन
		१६२१ डच वेस्ट इंडीज कं.स्था.	१६२२ नूरजहानचीं कारस्थानें	शहाजहान
१६२५→	१६२५ पहिल्या जेम्सचा मृत्यु			

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. यादवीपूर्वीची शांतता

१. पहिला चार्ल्स (१६२५–४९):—पहिल्या जेम्सनंतर त्याचा मुलगा चार्ल्स राजा झाला. त्यावेळीं त्याचें वय पंचवीस वर्षांचें होतें. लहानपणीं तो अगदीं अशक्त व निःसत्त्व दिसे; परंतु मोठेपणीं त्याचें शरीर मोठें मजबूत व बांधेसूद दिसे. दिसण्यांतही तो मोठा सुंदर होता. लांब सडक व काळेभोर केस, पाणीदार, टपोरे व सुंदर डोळे व त्याचे रेखीव अवयव यामुळें त्याची कोणावरही एकदम छाप पडे. त्याचा डौल व रुबाब त्याला शोभून दिसे. मिताहारी व मितभाषणी राजा चार्ल्स आंतल्या गांठीचा होता. लोकांमध्यें मिळून-मिसळून वागणें त्याला फारसें आवडत नसे. खेळांची त्याला आवड होती. टेनिस तो उत्तम खेळे; व घोड्यावर बसण्याची कला त्याला उत्तम अवगत होती. शूर, धाडसी, उद्योगी, शुद्धाचरणी असा चार्ल्स नमुनेदार बाप व आदर्श नवरा होता. तो हलक्या कानाचा नव्हता. स्वतःच्या आचारांविचारांवर त्याचा इतका विश्वास असे कीं, आपण चुकलों असें त्याला कधींही वाटत नसे. त्यामुळें त्याला कोणत्याही प्रकारचा विरोध खपत नव्हता. तो अत्यंत धार्मिक असल्यानें

पहिला चार्ल्स

हेन्रीटा मराया

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रार्थनेच्या वेळा तो कधींही चुकवीत नसे. एपिस्कोपेलियन पंथावर त्याची श्रद्धा होती. स्वतःविषयींच्या फाजील कल्पनामुळेंच तो हट्टी व दुराग्रही बनला होता. त्यामुळेंच तो नको त्यावेळीं नमतें घेई व पाहिजे त्यावेळीं अडून बसे! त्याचा हा स्वभावविशेषच त्याला फार नडला. मनुष्याची त्याला पारख नव्हती व त्यामुळेंच बकिंगहॅम, लॉड, स्ट्रॅफर्ड वगैरेसारख्या नादान लोकांच्या नादीं लागून त्यानें स्वतःचें सर्वस्वी नुकसान करून घेतलें. दिलेलें वचन तो पाळीत नसे. राजाच्या दैवी हक्कांवर त्याचा पुरेपूर विश्वास होता व त्यामुळें अनियंत्रित कारभार व स्वच्छंद राजकारण त्याला नेहमीं पसंत पडे. 'पार्लमेंट' म्हटलें कीं त्याच्या डोक्यांत तिडीक उठे; व त्यामुळें पार्लमेंटला हाणून पाडण्यास तो सदैव तत्पर असे. त्याच्या या धोरणामुळेंच त्याचा पार्लमेंटशीं 'न भूतो न भविष्यति' असा झगडा झाला व त्यांत त्याला आपली आहुति द्यावी लागली! धैर्याचा तो मेरूमणी होता. मरणसमयींची त्याची शांती अपूर्व होय. व्यक्ति या नात्यानें तो उत्तम असला तरी राजा या नात्यानें अंगीं असावे लागणारे गुण त्याच्या ठिकाणीं नव्हते.

२. पार्लमेंटशीं पहिली सलामी :—गादीवर आल्याबरोबर त्यानें आपली पहिली पार्लमेंट सभा बोलाविली (१६२५); व त्या सभेशीं त्याची पहिली सलामी झडली. ही सभा बोलावण्यांत टनेज व पौंडेजचें उत्पन्न आपल्याला तहहयात मिळावें व स्पेनशीं चालू असलेल्या युद्धास पार्लमेंटनें पैसा मंजूर करावा असा त्याचा दुहेरी हेतु होता. परंतु तो साध्य झाला नाहीं. कारण पार्लमेंटनें टनेज व पौंडेज फक्त एका वर्षाकरितांच मंजूर करून युद्धाकरितां अगदीं थोडीच रक्कम मंजूर केली. पार्लमेंटच्या कृत्यानें आपल्या वैभवास व थोरवीस कमीपणा आला असें वाटल्यानें तो रागावला. शिवाय पार्लमेंटनें त्याचा मुख्य व आवडता सल्लागार बकिंगहॅम याच्याविरुद्ध तक्रारी करण्यास सुरुवात केल्यानें त्याचा संताप दुणावला व त्यानें पार्लमेंट रद्द केली. पुढें बकिंगहॅमच्या सल्ल्यावरून पार्लमेंटला खूष करण्याचा त्यानें घाट घातला. केडीझवर हल्ला करून तें बंदर हस्तगत करावें व नंतर तेथें अमेरिकेहून येणारीं सोन्यारुप्यानीं भरलेलीं स्पॅनिश जहाजें लुटून इंग्लंडला अपार संपत्ति आणावी असा हा बेत होता. परंतु हा सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रेत चार्ल्सच्या अंगलट आला व त्यामुळें चार्ल्सची नाचक्की होऊन पैशा-करितां पार्लमेंट बोलावण्याशिवाय त्याला दुसरें गत्यंतर उरलें नाहीं. तेव्हां सन १६२६ मध्यें त्यानें दुसरी पार्लमेंट सभा बोलावली. परंतु या सभेनें बकिंगहॅमवर हल्ला चढवून त्याच्यावर खटला भरण्याची तयारी दाखविली. त्यामुळें राजाचा संताप वाढला व 'माझे नोकर मलाच जबाबदार अस-

बकिंगहॅम व त्याचें कुटुंब

त्यानें कॉमन्स सभेला माझ्या नोकरांच्या वर्तनावर आक्षेप घेतांच येत नाहींत—त्यांतून बकिंगहॅमसारख्या थोर मनुष्यावर नाहींच नाहीं' असे त्यानें संतापानें उद्गार काढले. लगेच त्यानें पार्लमेंट सभा रद्द केली व पार्लमेंटचा पुढारी सर जॉन ईलियट याला पकडून कैदेंत टाकलें. थोड्याच दिवसांनीं त्याला सोडून देण्यांत आलें; तरी वरील गोष्टीमुळें राजा व प्रजा यांच्यामध्यें धुसफूस सुरू झाली व ती पुढें विकोपास गेली.

३. फ्रान्सशीं युद्ध (१६२७) :—या वेळींच राजाचा मुख्य प्रधान बकिंगहॅम यानें फ्रान्सशीं युद्ध पुकारण्याची राजाला भर दिली. कोणताही विचार न करतां राजानेंही तसें केलें. खरें पाहतां बकिंगहॅम व फ्रेंच प्रधान रिचल्यू यांचें खाजगी वैर व द्वेष हेंच या युद्धाच्या बुडाशीं होतें. पण हें न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओळखतांच राजानें फ्रान्सशीं युद्ध सुरू केलें ही त्याची चूक होती. युद्ध सुरू होतांच त्याला पैशाची जरूरी भासूं लागली. पार्लमेंट पैसा मंजूर करीना तेव्हां त्याला स्वतः अन्याय्य मार्गांनीं पैसा उभा करावा लागला. त्यानें सक्तीचीं कर्जें उभारलीं व तीं न देणाराला त्यानें कोर्टापुढेंही खेंचलें. आपल्या सैनिकांना त्यानें लोकांच्या घरीं खुशाल राहण्यास सांगितलें. पार्लमेंटच्या संमतीखेरीज टनेज व पौंडेज कर त्यानें वसूल केला. या सर्व कृत्यांमुळें त्याला थोडा पैसा मिळाला पण तो पुरेसा नव्हता. याच वेळीं रॉचेल नामक फ्रेंच प्रॉटेस्टंटांचें नाकें काबीज करण्याचा रिचल्यूनें बेत केला होता. तो हाणून पाडून फ्रेंच प्रॉटेस्टंटांस मदत करण्याचें बकिंगहॅमनें ठरविलें व त्या मोहिमेवर तो स्वतः गेला; पण त्याचा प्रयत्न अयशस्वी ठरून त्याला हात हलवीत परतावें लागलें. त्याच्या नाचक्कीचें खापर त्याच्या नालायकीवर न फोडतां तें दरबारीयांनीं पार्लमेंटच्या माथीं फोडलें होतें. या युद्धामुळें चार्ल्सला बराच खर्च आला व त्यामुळें पार्लमेंट बोलावण्याशिवाय त्याला दुसरा मार्ग उरला नाहीं.

४. हक्कमागणीचा अर्ज :—सन १६२८ मध्यें त्यानें पार्लमेंटची सभा भरविली. तिनें बकिंगहॅमवरच हत्यार उपसून घरच्या व दारच्या नाचक्कीस तोच कारणीभूत असल्याचा निर्वाळा दिला. तसेंच सक्तीचीं कर्जें उभारणें, पार्लमेंटच्या संमतीशिवाय निरनिराळे कर वसूल करणें, लोकांवर सैनिकांचा खर्च लादणें वगैरे अन्याय्य कृत्यांविरुद्ध जोराची तक्रार केली; व या तक्रारी दूर केल्याशिवाय कोणतीही रक्कम मंजूर करण्याचें नाकारलें. एवढेंच नव्हे तर आपल्या हक्कांचा एक अर्ज तयार करून त्याला राजानें मान्यता दिल्यास पैसा मंजूर करण्याचें आश्वासन दिलें. वरील अर्जांत खालील गोष्टी महत्त्वाच्या होत्या. (१) कोणताही कर बसविणें तो पार्लमेंटच्या संमतीनेंच बसवून वसूल करावा. (२) नजराणे अगर सक्तीचीं कर्जेंही पार्लमेंटच्या मान्यतेनें घ्यावीं. (३) कारणाशिवाय राजानें कोणालाही कैद करतां कामा नये. (४) खाजगी कुटुंबावर लष्करी शिपाई व खलाशी व त्यांचा खर्च लादूं नये. (५) शांततेच्या वेळीं लष्करी कायदा सुरू करूं नये. या सर्व गोष्टी मान्य करणें म्हणजे आपल्या सत्तेस मर्यादा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

४१४/१५८९१ २०१-८६
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घालून घेणें होय असें चार्लसला वाटत असल्यानें वरील अर्जाला संमति देऊं नये असें त्याला वाटत होतें. परंतु पैशाच्या फिकीरींत तो असल्यानें त्यानें मोठ्या जिकीरीनें त्याला संमति दिली व वरील अर्जाला कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें. त्याबरोबर पार्लमेंटनें त्याच्याकरितां चार लक्ष पौंड मंजूर केले. यामुळें पार्लमेंटचा जय झाला. राज्यघटनेच्या दृष्टीनें पाहतां हक्कमागणीचा हा कायदा स्वातंत्र्य सनदेच्या खालोखाल महत्त्वाचा म्हणून मानला जातो. पैशाकरितां चार्लसनें या कायद्याला मान्यता दिली तरी पुढें त्यानें तो झुगारून दिला व त्याविरुद्ध तो वागूं लागला.

५. बकिंगहॅमचा खून (१६२८) :—पैसा मिळतांच चार्लसनें बकिंगहॅमला रॉचेलवर चाल करून जाण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें तयारी करून तो निघालाही. परंतु तो जात असतांच पोर्टस्मथ येथें फेल्टन नामक एका असंतुष्ट प्यूरिटन धर्मवेड्यानें त्याचा खून केला. बकिंगहॅमच्या खुनानें राजाला किती वाईट वाटलें असेल, त्याची कल्पनाच केलेली बरी. त्याच्यानंतर राजानें कोणावरही तितका विश्वास ठेवला नाहीं. बकिंगहॅमसारख्या एका नालायक माणसाच्या नेतृत्वाखालीं चार्लसचें शिक्षण झाल्यामुळेंच, अंगीं गुण असूनही, पहिल्या चार्लसचा राज्यकारभार हिणकस ठरला. बकिंगहॅमनेंच त्याला जुलमी व स्वच्छंदी बनविलें व त्याच्या अनियंत्रित राज्यकारभारास उत्तेजन दिलें. त्यामुळें त्यानें स्वतःचें व राजाचेंही अत्यंत नुकसान केलें.

६. अध्यक्षाची मुस्कटदाबी करून पार्लमेंटची सभा :—यानंतर सन १६२९ मध्यें पार्लमेंटची सभा पुन्हां भरली. त्यावेळीं सर्व सभासद जळफळतच सभेला आले. बकिंगहॅमचा खून झाल्यानें आतां सर्वांचा मारा राजाकडेच रोखला गेला. वचनें देऊनही राजानें तीं सर्व मोडलीं व जकाती वसूल करणें, नजराणे व सक्तीचीं कर्जें घेणें, वगैरे अन्याय्य गोष्टी तो उघडउघड करूं लागला. त्याशिवाय टनेज व पौंडेज न दिल्याबद्दल रोले या नांवाच्या एका, पार्लमेंटचा सभासद असलेल्या, व्यापाऱ्यास त्यानें अटक केली होती. या गोष्टींचा पार्लमेंटला राग आला. राजाचें धार्मिक धोरणही

पुस्तकालय
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सभेला पसंत नव्हतें. पार्लमेंटमध्यें प्यूरिटन लोकांचा पुष्कळ भरणा होता; व राजानें आपल्या धर्मपंथाचा प्रसार करावा असें त्या लोकांचें मत होतें. परंतु राजानें तसें करण्याचें नाकारून रोमन कॅथॉलिक व एपिस्कोपेलियन पंथालाच राजाश्रय दिला होता. वरील सर्व गोष्टी खऱ्या होत्या व त्या बाबतींत राजाची कानउघाडणी करण्याचा ईलियट, पिम वगैरेनीं बेत केला; व धार्मिक बाबतींत जो कोणी नवे प्रकार घुसडील व कॅथॉलिक धर्मास मान्यता देईल, पार्लमेंटच्या संमतीखेरीज करांस जो संमति देईल व असे अन्याय्य कर जो कोणी देईल तो राजद्रोही होय अशा तऱ्हेचे कायदे पास केले. यावेळीं पार्लमेंटचा अध्यक्ष फिंच राजाच्या सल्ल्यानें आपली खुर्ची सोडून जात होता. हें जाणून होल्स, व्हॅलेंटाईन वगैरे कांहीं सभासदांनीं त्याला त्याच्या खुर्चींत दाबून धरलें व वरील ठराव पसार करून घेतले. या सर्व प्रकारांनीं राजा इतका चिडला कीं त्यानें पार्लमेंट बरखास्त केली व सर जॉन ईलियटला कैद करून तुरुंगांत टाकलें. तेथेंच तो देशभक्त क्षयानें सन १६३२ मध्यें मरण पावला. वरील सर्व प्रकारावरून राजाविरुद्ध पार्लमेंट सभा किती खवळली होती हें स्पष्ट दिसून येतें. यापुढें मात्र पार्लमेंटशिवाय राज्यकारभार हाकण्याचें राजानें ठरवून पुढें अकरा वर्षें त्यानें अनियंत्रितपणें कारभार करून आपल्यावर आकाशाची कुऱ्हाड ओढवून घेतली !

अभ्यास

१. राजा व पार्लमेंट यांच्यामध्यें झगडा होण्यास सुरवात कशी झाली? त्याचा परिणाम काय झाला? चार्ल्सचा स्वभाव वर्णा.

२. हक्कमागणीचा अर्ज तयार करण्याचें कारण काय? इंग्लंडच्या राज्यघटनेंतील त्याचें महत्त्व सांगा. याचा परिणाम काय झाला?

३. बकिंगहॅमचें थोडक्यांत चरित्र सांगा.

४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
ईलियट, फेल्टन, टनेज, पौंडेज, रिचल्यू, रॉचेल, रोले, हेन्रीटा मराया, हक्कमागणीचा अर्ज, फिंच.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. चार्लसचा अनियंत्रित कारभार (१६२१–१६४०).

१. राजाचे बदसल्लागार—वेंटवर्थ:—चार्लसनें सन १६२१ पासून १६४० पर्यंत अगदीं स्वच्छंदपणें राज्य केलें. बकिंगहॅम हा त्याचा अत्यंत विश्वासू सल्लागार. पण त्याचा खून झाल्यावर राजानें जे सल्लागार निवडून काढले तेही नादानच होते. बकिंगहॅमवर त्याचा जितका विश्वास होता तितका टॉमस वेंटवर्थ, स्ट्रॅफर्डचा अर्ल व आर्चबिशप लॉड या दोघांवर नव्हता ही गोष्ट खरी. परंतु त्यानें आपला पुढील अकरा वर्षांचा सर्व अनियंत्रित कारभार या दोघांच्या सल्ल्यानेंच हांकला. प्रथमतः वेंटवर्थ हा पार्लमेंटच्या बाजूचा, अर्थात् राजाच्या विरोधीपक्षांतच होता. अंगीं कर्तबगारी असूनही मानवी जीविताशीं त्याला समरस होतां न आल्यानें त्याचा नाश झाला व त्याचे बेत सफळ झाले नाहींत. त्याचा जन्म सन १५९३ मध्यें झाला. त्याला शिक्षणही चांगलें मिळालें होतें. पार्लमेंटमध्यें निवडून आल्यावर बकिंगहॅमला विरोध करणें व त्याचा पाडाव करणें हा एकच त्याचा उद्देश होता. हक्क मागणीच्या वेळीं राजाविरुद्ध व पार्लमेंटच्या वतीनें त्यानें बहुमोल कामगिरी बजाविली होती. परंतु बकिंगहॅमच्या वधानंतर तो राजपक्षास मिळाला. राजाच्या अनियंत्रित कारभारावर त्याचा पूर्ण विश्वास होता. तो स्वतःला गरीबांचा कनवाळू समजत असे; परंतु

वेंटवर्थ ऊर्फ लॉर्ड स्ट्रॅफर्ड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीमंत व गरीब यांना एकाच जात्यांत भरडण्यास तो कमी करीत नसे ! राजानें प्रथमतः त्याला स्ट्रॅफर्डचा अर्ल केलें (१६२८) व 'उत्तरेकडील मंडळाचा' त्याला अध्यक्ष नेमलें. प्यूरिटन पंथाचा तो पक्का शत्रू होता. त्यामुळें त्यानें अनेकांना स्टारचेंबर कोर्टापुढें खेचून छळलें. पुढें १६३३ मध्यें राजानें त्याला आयर्लंडचा गव्हर्नर नेमलें. तेथें त्यानें लष्कराच्या मदतीनें कडक अंमल गाजवून अपकीर्ति संपादिली. लोकमताची यत्किंचित् पर्वा न करतां लष्करी सामर्थ्यावरच विसंबून लोकहित साधतां येतें, अशी त्याची विचित्र विचारसरणी होती ! यामुळें दडपशाहीचा पुरस्कार व प्रसार केल्यानेंच त्यानें आपलें नांव बद्दू करून घेतलें व लोकक्षोभास तो बळी पडला. राष्ट्रांतील लोकांच्या, समाजाच्या व व्यक्तीच्या हिताकडे पूर्णपणें दुर्लक्ष करून राजाची व राजसत्तेची अत्यंत इमानेंइतबारें सेवा करणें हाच खरा धर्म होय, असें त्याचें ठाम मत होतें. त्याच्या या पद्धतीला 'स्वयंपूर्ण' राज्यपद्धति असें तो म्हणत असे.

२. आर्चबिशप लॉड :—राजाचा दुसरा बदसल्लागार म्हणजे आर्चबिशप लॉड हा होय. विल्यम लॉडचा जन्म सन १५७३ मध्यें झाला. तो राजाचा धार्मिक व राजकीय सल्लागार होता. ऑक्सफर्डला त्याचें सर्व शिक्षण झालें व वाढतां वाढतां तो बिशप झाला. इ. स. १६३३ त राजानें त्याला कँटरबरीचा आर्चबिशप नेमलें. इंग्लिश धर्मखात्याची सुधारणा करावी, त्यांतील दोष काढून टाकावे, धर्मगुरूंचें आचरण शुद्ध करावें व सर्व धर्मपंथांची एकी घडवून आणावी असें त्याला वाटत असे. परंतु धार्मिक बाबतींत त्यानें जुलूम करून आपले विचार लोकांवर सक्तीनें लादण्याचा प्रयत्न केला

आर्चबिशप लॉड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खुजट, अंगानें किडकिडित, हंसत मुख असा लॉड, भेदक नजरेनें पाहूं लागला म्हणजे लोकांना त्याची भीतीच वाटे. त्याची स्मरणशक्ति अचाट होती; व बुद्धीही कुशाग्र असे. परंतु त्याचा तापट व उतावळा स्वभाव व बोचक बोलणें यामुळें तो लोकांस आवडत नसे. प्यूरिटनांचा तो पक्का शत्रू होता; व त्यांना शिक्षाही अत्यंत कडक करी. स्टारचेंबर व हायकमिशन या दोन्ही कोर्टांचा त्यानें मुबलक उपयोग करून घेतला. त्यामुळें तो लोकांच्या रोषास बळी पडला. कोत्या बुद्धीचा, व चातुर्यहीन लॉड राजसत्ता व त्याचप्रमाणें धर्मपीठही ईश्वरप्रणीत आहे असें म्हणे !

३. राजाचे द्रव्यार्जनाचे उपाय:—अशा प्रधानांच्या सल्ल्यानेंच राजानें आपला अकरा वर्षांचा कारभार अत्यंत अनियंत्रितपणें केला. प्रथमतः त्याला त्याच्या आर्थिक अडचणी भागवावयाच्या होत्या. पार्लमेंटचा एकसारखा विरोध त्याला नकोसा झाला होता. परंतु तिच्या संमतीशिवाय त्याला दरसालच्या खर्चाकरितां पैसाही मिळत नसे. याकरितां काटकसरीनें राहून मिळेल त्या उपायानें पैसा मिळवावयाचा असा त्यानें बेत केला व तो पार पाडला. प्रथमतः त्यानें टनेज व पौंडेज वसूल करण्यास सुरुवात केली. मक्ते देण्याची पद्धति सुरू करूनही त्यानें पैसा गांठीं मारला. या बाबतींत नवीन माल निर्माण करणारानें राजाला ‘मालकी’ हक्काकरितां कांहीं टक्के द्यावे असाही प्रघात पाडला. पहिल्या एडवर्डच्या वेळच्या कायद्याचा आधार घेऊन ‘वार्षिक चाळीस पौंड किंमतीची जमीन धारण करणारानें शिलेदारी पत्करलीच पाहिजे’ असें त्यानें फर्माविलें. या उपायानेंही त्यानें पुष्कळ पैसा मिळविला. त्यानें नजराणे व सक्तीचीं कर्जें घेण्यास सुरुवात केली. राजाच्या मालकीच्या जमिनीपैकीं बराचसा भाग त्या जमिनीच्या जवळच्या लोकांनीं आपल्या जमिनींत सामील केला होता. तेव्हां त्यानें अत्यंत कडक उपायांनीं आपली गेलेली जमीन आपल्या ताब्यांत घेऊन आपलें उत्पन्न वाढविलें. स्टारचेंबर कोर्ट, हायकमिशन कोर्ट व उत्तरेकडील मंडळ यांच्यातर्फे त्यानें दंडाच्या रूपानेंही खूप पैसा जमविला. नौकाकरही त्यानें शांततेच्या काळीं सर्व लोकांवर लादून पुष्कळ पैसा मिळविला; परंतु त्याच्या या कृत्यांचा पुष्कळच गाजावाजा झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. नौकाकर (१६३४):—सन १६३४ मध्यें राजानें सर्व लोकांकडून नौकाकर वसूल करण्याचें ठरविलें. पूर्वी हा कर राजे लोक वसूल करीत असत; परंतु तो युद्धाच्या वेळीं. जॉन हॅम्पडन या गृहस्थानें तो देण्याचें नाकारलें. तेव्हां त्याच्यावर खटला भरण्यांत आला. हॅम्पडनचें म्हणणें असें कीं आजपर्यंत हा कर किनाऱ्यावरील लोकांकडूनच घेण्यांत येत असे; तो आतां सर्वांकडून घेणें चुकीचें व अन्याय्य आहे; दुसरें असें कीं शांततेच्या वेळीं तो कर वसूल करण्याचा राजाला अधिकार नाहीं; व तिसरें म्हणजे त्या कराला पार्लमेंटची संमति नाहीं. हॅम्पडनच्या या म्हणण्याला राजातर्फे असें उत्तर देण्यांत आलें कीं आरमारी संरक्षणाची सर्वांनाच आवश्यकता असते—मग ते किनाऱ्यावर असोत किंवा देशाच्या अंतर्भागांत असोत; हा कर शांततेच्या वेळीं घेणें किंवा युद्धाच्या वेळीं घेणें या गोष्टी ठरविण्याचा राजालाच अधिकार आहे; पार्लमेंटच्या संमतीसंबंधानें बोलतां राजाची संमतीच अधिक न्याय्य होय असें सांगण्यांत आलें. शेवटीं बारा न्यायाधीशांपैकीं सातांनीं राजाच्या वतीनें व पांचांनीं हॅम्पडनच्या बाजूनें निकाल दिला. त्यामुळें हॅम्पडनला वीस शिलिंगाचा कर द्यावा लागला. नौकाकरापैकीं थोडा भाग नवीन जहाजें बांधण्यांत राजानें खर्च केला ही गोष्ट खरी असली, तरी लोकांनीं हॅम्पडनला पाठिंबा दिला व राजाच्या विरुद्ध जनसमुद्र खवळून उठला.

५. वेंटवर्थचा आयर्लंडमधील कारभार:—नौकाकर लादून पैसा उकळण्याची कल्पना वेंटवर्थनेंच राजाला सुचविलेली होती. इंग्लंडमध्यें असतांनाच तो उत्तरेकडील मंडळाचा अध्यक्ष होता. त्या अधिकारावर असतां त्यानें इंग्लंडच्या उत्तर भागांत राज्यकारभाराची घडी उत्तम बसवून थकलेला वसूल जमा केला व दडपशाही करून सर्वांना मोठ्या जरबेंत व धाकांत ठेवलें. त्याला विरोध करणें म्हणजे जबर दंड देणें अथवा कैदखाना पत्करणें होय असें लोक समजत असत. यावरून तो अनियंत्रित कारभाराचा पुरस्कर्ताच नव्हे तर त्याची जबरीनें अंमलबजावणी करणारा होता असें दिसतें. त्याच्या या कामगिरीनें खूष होऊनच कीं काय सन १६३३ मध्यें राजानें त्याला आयर्लंडचा गव्हर्नर नेमलें. तेथें आपल्या निष्ठुर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वभावानुसार त्यानें इतकी दडपशाही केली कीं आयरिश लोकांना त्याचा कारभार नको नकोसा झाला ! त्यानें आयर्लंडांत शांतता स्थापन केली ती सैन्याच्या जोरावर. आयरिश धर्मपीठांत इंग्लिश धर्मपीठाप्रमाणेंच सर्व विधी चालावेत असें त्यानें ठरविलें. त्याप्रमाणेंच प्यूरिटनांस व प्रेसबिटेरियनांस आयर्लंडमध्यें स्वतःच स्थापन केलेल्या हाय-कमिशन कोर्टापुढें त्यानें खेचलें व त्यांच्याकडून चोपून दंड घेतले. अल्स्टरमध्यें अंबाडीची लागवड करून व तेथें कांहीं डच व्यापारी आणवून त्यानें त्या भागांत तागाच्या कापडाचा धंदा सुरू केला. सैन्याची पुनर्घटना करून तें सदैव खडें ठेवलें. लांचलुचपतीचे प्रकार थांबवून लोकांस उत्तम व योग्य न्याय मिळेल अशी त्यानें व्यवस्था केली. अशा तऱ्हेनें त्यानें आपला कारभार चोख ठेवून राजसत्ता जोरकस केली. चार्ल्सला अनेक वेळां त्यानें मोठमोठ्या रकमा पाठविल्या व पत्रानें राज्यकारभारासंबंधीं अनेक सूचनाही केल्या. एकंदरींत पाहतां त्याचा कारभार राजाच्या दृष्टीनें चोख व उत्तम झाला, परंतु लोकांचा त्यानें इतका छळ केला कीं त्याच्या नाशावर सर्व लोक टपले होते. त्याची 'स्वयंपूर्ण' राज्यपद्धति अभिनव नसली तरी ती राजाच्या फायद्याची ठरली यांत शंका नाहीं.

६. लॉडचा कारभार :—दडपशाही करणारा व लोकमताला किंमत न देतां कारभार करणारा लॉड हा वेंटवर्थचा परम मित्र होता. पक्का अरेराव व प्यूरिटनांचा तो द्वेष्टा होता. पोपचा अधिकार त्याला मान्य नसला तरी रोमन कॅथॉलिकपंथाचीं बरींच तत्त्वें त्याला मान्य होतीं. तसेंच त्या पंथाप्रमाणें धर्मगुरूंनीं सर्व विधी करावेत, झगे वापरावेत असें त्याचें मत होतें. प्यूरिटनांवर त्यानें अनिष्ट निर्बंध घातले. त्यांचीं पुस्तकें त्यानें जप्त केलीं, त्यांना धर्मोपदेश करण्याची मनाई केली, त्यांच्या धर्मसंस्था रद्द केल्या, अनेकांना स्टार चेंबर व हायकमिशन या कोर्टापुढें उभें करून त्यांच्याकडून जबरदस्त दंड वसूल केले. अशा तऱ्हेनें त्यांचा छळ झाल्यानें अनेक प्यूरिटनांनीं देशत्याग केला व अमेरिकेंत जाऊन त्यांनीं नवीन वसाहती स्थापन केल्या. कनेक्टिकट, ऱ्होड आयलंड वगैरे वसाहती या प्यूरिटनांनींच स्थापन केल्या; परंतु इंग्लंडांत राहिलेल्या लोकांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लॉडचा छळ असह्य झाला. लॉडनें तयार केलेलें प्रार्थनापुस्तक त्यांच्यावर लादण्यांत आलें होतें. रविवारसारख्या प्रार्थनेच्या दिवशीं फुटबॉल, तिरंदाजीचे खेळ, नाचरंग वगैरेमध्यें आर्चबिशपच्या परवानगीनें खेड्यांतील लोक दंग झालेले पाहून प्यूरिटनांना लॉडचा वीट आला! रोमन कॅथॉलिकपंथाचा पुरस्कार करून तो पंथ इंग्लंडमध्यें कायमचा रुजविण्याचा लॉडचा विचार आहे असा प्यूरिटनांचा ग्रह झाला; आणि असा ग्रह होण्यास थोडा सबळ पुरावाही होता. कारण लॉडनें पोपच्या वकिलाचें इंग्लंडांत स्वागत केलें. अनेक लोकांस कॅथॉलिकपंथाचा स्वीकार करण्यास त्यानें उत्तेजन दिलें व कॅथॉलिकांवरील निर्बंधांची लॉडनें कसोशीनें अंमलबजावणीही केली नव्हती. वरील सर्व गोष्टींमुळें सर्व प्यूरिटन खवळून गेले होते. त्यांतच लॉडनें आपले धर्मविषयक विचार स्कॉटिश लोकांवर लादण्याचा प्रयत्न केला व तो मात्र त्याच्या आंगलट आला.

७. **स्कॉटलंडशीं युद्ध**:—सन १६३३ मध्यें चार्ल्स स्कॉटलंडमध्यें गेला व त्याला तेथें राज्याभिषेकही करण्यांत आला. चार्ल्सबरोबर लॉडही स्कॉटलंडांत गेला होता. इंग्लंड व स्कॉटलंड यांचें एकीकरण भक्कम पायावर करावें असें त्या दोघांचें धोरण होतें. हें एकीकरण घडवून आणावयाचें असल्यास इंग्लंड व स्कॉटलंड येथें एकच धर्मपंथ असणें वाजवी आहे असें लॉडनें चार्ल्सच्या मनांत भरविलें. स्कॉटलंडमध्यें कॅलव्हिनचा चेला जॉन नॉक्स, याच्या पुरस्काराखालीं चालू झालेला प्रेसबिटेरियन पंथ जोर धरून होता. लॉड त्या पंथाचा पक्का द्वेष्टा. अर्थात् एपिस्कोपेलियन पंथाचा स्कॉटलंडांत प्रसार करण्याचें ठरवून त्यानें त्या देशांत हायकमिशन कोर्ट स्थापलें व त्याच्यापुढें अनेक प्रेसबिटेरियनांस खेचलें. ही गोष्ट त्या लोकांस आवडली नाहीं. तशांतच सन १६३७ मध्यें लॉडनें एक नवीन प्रार्थनापुस्तक त्यांच्यावर लादलें. यामुळें स्कॉटिश लोक इतके खवळले कीं राजाला त्यांच्यापुढें नमतें घेणें भाग पडून तें पुस्तक लोकांनीं वापरूं नये असें त्यानें फर्माविलें व सन १६३८ मध्यें ग्लासगो येथें एक धर्मपरिषद बोलाविली. या परिषदेनें लॉडचें प्रार्थनापुस्तक अग्राह्य मानलें व सर्व नवीन सुधारणा त्याज्य ठरविल्या. परिषदेचा हा निर्णय ऐकून लॉड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संतापला; व राजानें सैन्याची जमवाजमव करून स्कॉटलंडवर चाल केली. यामुळें सर्व स्कॉटिश जनता खवळून उठली व राजाशीं दोन हात करण्या-करितां सर्वांनीं चंग बांधले. यामुळें जें युद्ध झालें त्याला 'बिशपांचें युद्ध' असें म्हणतात. स्कॉटिश सैन्याची व राजाच्या सैन्याची गांठ पडली; परंतु युद्धप्रसंग न होतांच एडिंबरो येथें दुसरी सभा बोलावण्याचें ठरलें. या सभेनेंही पहिल्या सभेचे सर्व ठराव मंजूर केलेले पाहून राजानें स्कॉटलंडवर पुन्हां चाल केली. न्यूबर्न येथें उभय सैन्याची लढाई होऊन चार्लसचा पराभव झाला (१६४०). या पराभवानें राजाची नाचक्की झाली; युद्धामुळें त्याला पैशाची टंचाई भासूं लागली. तेव्हां राजानें पार्लमेंट सभा बोलाविली होती. परंतु तिनें राजाच्या अनियंत्रित कारभारावर सपाटून टीका कर-ण्यास सुरुवात केल्यानें राजानें ती ताबडतोब रद्द केली. या पार्लमेंटलाच 'लघु पार्लमेंट' असें म्हणतात. पार्लमेंट पैसा मंजूर करीना व स्कॉटलंडशीं युद्ध करून स्कॉटिश लोकांची रग तर जिरविणें जरूर होतें. अशा पेचांत सांपडला असतां चार्लसनें वेंटवर्थला आयर्लंडांतून परत बोलाविलें. मध्यंतरीं त्यानें सर्व उमरावांचाही सल्ला घेतला. त्यांनीं व स्ट्रॅफर्डनेंही पार्लमेंट बोला-वण्याचा राजाला सल्ला दिला. तेव्हां राजानें पुन्हां पार्लमेंटची सभा बोलाविली (१६४०). ही पार्लमेंट दीर्घकाल अस्तित्वांत राहिल्यानें तिला 'दीर्घ पार्लमेंट' असें म्हणतात. तीच राजाच्या मुळावर आली.

अभ्यास

१. चार्लसचा अनियंत्रित कारभार थोडक्यांत वर्णा. त्याचा परिणाम सांगा.

२. स्ट्रॅफर्ड व लॉड यांचीं थोडक्यांत चरित्रें सांगा. ते अप्रिय कां झाले?

३. कारणें व परिणाम सांगा :–

(अ) स्कॉटलंडशीं युद्ध. (आ) फ्रान्सशीं युद्ध. (इ) स्वयंपूर्ण राज्यपद्धति.

४. राजानें अन्याय्य मार्गानें पैसा कसा मिळविला?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. हॅम्पडनचें थोडक्यांत चरित्र सांगा.

६. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—

(अ) नौकाकर, (आ) स्टारचेंबर कोर्ट, (इ) हाय-कमिशन कोर्ट (उ) बिशपांचें युद्ध.

७. सन १६२५ ते १६४० पर्यंतचा एक कालादर्श तयार करा.

८. तुम्ही स्वतः स्ट्रॅफर्ड आहांत अशी कल्पना करून न्यायासनापुढें तुम्ही स्वसमर्थनार्थ भाषण करा.

९. तुम्ही आपल्या राजाशीं भांडलां असतां? कशाकरितां? इंग्रज कां भांडले?

१०. हक्कमागणीच्या अर्जाच्या वेळीं तुम्ही हजर आहांत अशी कल्पना करून त्यासारखा एक अर्ज तयार करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. इंग्लंडांत यादवी-युद्ध (१६४०-४९)—
दीर्घ पार्लमेंटची कामगिरी.

१. स्ट्रॅफर्ड व लॉड यांना फाशीं :—सरदारांच्या व मुख्यतः स्ट्रॅफर्डच्या सल्ल्यानें राजानें पार्लमेंटची बैठक सन १६४० मध्यें बोलाविली. त्या वेळीं राजा पैशाच्या अडचणींत होता. या संधीचा भरपूर फायदा घेण्याचें सभासदांनीं ठरविलें. एवढेंच नव्हे तर राजाची अनियंत्रित सत्ता, त्याचे बदसल्लागार, त्याचीं अनिष्ट कोर्टें यांचा नाश करावयाचा असें पार्लमेंटनें ठाम ठरविलें होतें. पार्लमेंटचा पुढारी जॉन पिम होता. प्यूरिटन मतांचे लोकच पार्लमेंटमध्यें निवडून यावेत म्हणून त्यानें निवडणुकीचे वेळीं दौरे काढून प्यूरिटन मताधिक्य मिळविलें होतें. पार्लमेंटनें प्रथमतः राजाच्या सल्लागारांवर अस्त्र उपसलें; व स्ट्रॅफर्ड व लॉड यांना पकडून कैदेंत टाकलें. 'तुझ्या केसालाही धक्का लागूं देणार नाहीं' असें स्ट्रॅफर्डला राजानें वचन दिलें होतें. त्यामुळेंच तो एकनिष्ठ सेवक आयर्लंडांतून लंडनला आला होता. परंतु पार्लमेंटनें त्याच्यावर एकदम राजद्रोहाबद्दल खटलाच भरला. 'राजाची अत्यंत इमानेंइतबारें व एकनिष्ठपणें सेवा केली असतां मी राजद्रोही कसा ?' असा रोखठोक सवाल त्यानें विचारला. तेव्हां पिमनें सांगितलें 'राजा हा राष्ट्राचा केवळ प्रतिनिधि. तेव्हां त्याला राष्ट्रावर जुलूम करण्याचा सल्ला देणें हा राजद्रोहच होय.' पण हें तत्त्व अजून मान्य झालें नव्हतें. तेव्हां राजद्रोहाचा आरोप सिद्ध करणें जड आहे, असें आढळल्यावरून कॉमन्ससभेनें त्याच्यावरील खटला काढून घेऊन त्याच्याविरुद्ध राजद्रोहाचें बिल मांडलें व तें पास करून घेतलें. परंतु तें बिल उमरावमंडळ पास करीलच असा भरंवसा नव्हता. परंतु याचवेळीं पार्लमेंट बरखास्त करण्याकरितां राणी मोठें सैन्य जमा करून लंडनवर चालून येत आहे ही बातमी आली. शिवाय स्ट्रॅफर्डविरुद्ध खवळलेला जनसमुदाय पार्लमेंटच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सभागृहाजवळ जमलेला होता व तो केव्हां काय करील तें सांगणें अशक्य होतें. अशा स्थितींत उमरावमंडळानें घाबरून जाऊन त्या बिलाला संमति दिली. पुढें तें बिल राजाच्या संमतीकरितां गेलें त्यावेळीं राजाला आपल्या वचनाची आठवण झाली; व त्यामुळें तो मोठ्या पेचांत पडला. त्याच्यावर सही करावी तर आपलें वचन मोडून आपल्या प्रतिष्ठेस बाध येतो; न करावी तर पार्लमेंट पैसा मंजूर करणार नाहीं हें त्याला माहीत होतें. अशा विचलित स्थितींत असतांच स्ट्रॅफर्डनें निरोप पाठवून त्याला त्याच्या वचनांतून मुक्त करून त्या बिलावर सही करण्यास सांगितलें. तावडतोब त्यानें त्या बिलावर मान्यतादर्शक सही केली! त्याबरोबर सन १६४१ च्या १२ मे या दिवशीं स्ट्रॅफर्डला फाशीं देण्यांत आलें. मरतांना 'राजावर विश्वास ठेवूं नका' असें तो म्हणाला. स्ट्रॅफर्डविरुद्ध पास केलेल्या बिलावर राजानें सही केली हें वृत्त कळतांच पार्लमेंटचा पुढारी पिम म्हणाला 'चला आपलें काम झालें; आतां आपण मागूं ते हक्क आपणाला राजाकडून खात्रीनें मिळतील.' आणि त्याचें म्हणणें खरें ठरलें. पुढें लॉडवरही राजद्रोहाचा खटला भरण्यांत येऊन त्यालाही चार वर्षांच्या कैदेनंतर सन १६४५ मध्यें फाशीं देण्यांत आलें.

२. दीर्घ पार्लमेंटची कामगिरी :—स्ट्रॅफर्ड व लॉड यांचा निकाल लावल्यावर पार्लमेंटनें राष्ट्रहित साधण्याकरितां अनेक गोष्टी केल्या. स्कॉटिश लोकांशीं चार्ल्सनें सुरू केलेलें युद्ध संपलेलें नव्हतेंच व राजाही त्यामुळें पेचांत होता. तें युद्ध संपविण्याकरितांच त्याला पैसा हवा होता व म्हणूनच त्यानें पार्लमेंटची सभा बोलाविली. परंतु ती सभाही त्याची शत्रू ठरली. या पार्लमेंटनें राजसत्तेवर आघात करून ती खिळखिळी करून टाकली. प्रथमतः पार्लमेंटच्या संमतीशिवाय टनेज, पौंडेज, नौका कर व तत्सम अन्याय्य कर, सक्तीचीं कर्जें, नजराणे वगैरे अर्थोत्पत्तीचीं साधनें बेकायदेशीर ठरविलीं. स्टारचेंबर कोर्ट, हायकमिशन कोर्ट, उत्तरेकडील मंडळ हीं सर्व जुलमी कोर्टें रद्द केलीं. राजा वरचेवर सभा बरखास्त करतो व कधीं कधीं ती अनेक वर्षें बोलावीतच नाहीं, या गोष्टी लक्षांत घेऊन पार्लमेंटनें ठरविलें कीं पार्लमेंटची निवडणूक दर तीन वर्षांनीं व्हावी; राजानें पार्लमेंट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोलाविली नाहीं तर लॉर्ड चान्सेलरनें ती बोलवावी व त्यानेंही बोलाविली नाहीं तर लोकांनीं आपण होऊनच ती भरवावी. यामुळें पार्लमेंटशिवाय कारभार करणें यापुढें तरी राजाला शक्य नव्हतें. याच कायद्याला 'पार्लमेंटच्या त्रैवार्षिक निवडणुकीचा कायदा' असें म्हणतात (१६४१). तिच्या संमतीशिवाय दीर्घ पार्लमेंट बरखास्त करूं नये असेंही ठरविण्यांत आलें. वरील प्रकार चालू असतां राजानें येईल त्या बिलाला संमति देण्याचें काम चालू ठेवलें होतें. उद्देश इतकाच कीं आज ना उद्यां पार्लमेंट आपल्याकरितां भरपूर पैसा मंजूर करील व त्याच्या जोरावर आपण उत्तर इंग्लंड जिंकून बसलेल्या दारच्या शत्रूला—स्कॉटिश सैन्याला—हांकलून लावूं. पण याही बाबतींत त्याची निराशा झाली; कारण पार्लमेंटनें अगदीं अल्प अशी रक्कम मंजूर केली व टनेज व पौंडेज या कराचें उत्पन्न राजानें फक्त दोन महिनेच वसूल करावें असें ठरविलें. यानंतर धर्मपीठाची आमूलाग्र सुधारणा करण्याच्या हेतूनें पार्लमेंटनें एक बिल मांडून खडाजंगी वादविवादानंतर तें पास केलें. यामुळें प्रस्थापित पंथ रद्द करण्यांत येऊन प्रेसबिटेरियनपंथाप्रमाणें धर्मसत्ता बिशपांच्या हातांत न ठेवतां ती लोक-मतानुवर्ती करण्यांत आली. या बिलाला 'आमूलाग्र फरका'चा कायदा असें म्हणतात. या कायद्याला राजानें संमिति दिली नाहीं. मात्र पार्लमेंटमधील प्यूरिटनपक्षांत दोन तट पडले; व ज्यांनीं त्या कायद्याला विरोध केला ते सर्व लोक राजपक्षाला मिळाले. अर्थात् त्यामुळें प्यूरिटन पक्षाचें सामर्थ्य कमी झालें.

३. तक्रारींचा खलिता (१६४१):—या सर्व घडामोडी चालू असतां चार्ल्स स्कॉटलंडांत गेला व त्यानें स्कॉटिश प्रेसबिटेरियन लोकांच्या धार्मिक मागण्या कबूल केल्या. त्यामुळें उत्तर इंग्लंडमधील त्यांचें सैन्य स्कॉटलंड-मध्यें परत गेलें. अशातऱ्हेनें स्कॉटिश लोकांची कटकट मिटवून राजा मोकळा होतो न होतो तोंच पार्लमेंटमध्यें चालू असलेली चर्चा त्याच्या कानीं आली. तेव्हां तो लंडनला आला. त्याच सुमारास आयर्लंडमध्यें बंडाळी माजून त्या लोकांनीं अनेक इंग्रजांची कत्तल केली (१६४१). ही गोष्ट राजाच्या चिथावणीवरून झाली असा लोकांचा समज झाला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां आधींच राजसत्तेवर उठलेल्या पार्लमेंटनें राजाची कानउघाडणी करण्याकरितां त्याच्या दुष्कृत्यांचा एक खलिता तयार करून त्याची चर्चा सुरू केली होती. या खालित्यालाच 'तक्रारींचा खलिता' असें म्हणतात. याच वेळीं चार्ल्स लंडनला आला होता. हेतु इतकाच कीं, आपण आलों असें कळतांच तो खलिता पास केला जाणार नाहीं. परंतु तो लंडनला पोंचण्यापूर्वींच पार्लमेंटनें तो खलिता पास केला; व लंडनला राजा आल्याबरोबर त्याच्यासमोर सहीकरतां धरला! यामुळें राजा चवताळून गेला व त्या संतापाच्या भरांतच त्यानें एक अत्यंत मूर्खपणाची गोष्ट करून आपल्यावर संकट ओढवून घेतलें.

४. पांच सभासदांस पकडण्याचा प्रयत्न (१६४२):— वरील गोष्टी घडत असतांच राणीची चौकशी करून राजद्रोहाबद्दल तिच्यावर पार्लमेंटनें खटला भरला अशी भूमका उठली. त्याबरोबर राणी खवळली व तिनें पार्लमेंटगृहांत जाऊन जॉन पिम, हॅम्पडन, होल्स, स्ट्रोड व लॉर्ड



सन १६४२ सालचें दीर्घ पार्लमेंटचें पदक

किंबोल्टन या पार्लमेंटच्या पांच सभासदांस पकडून आणण्याची राजास आज्ञा केली. राजा थोडा कांकूं करतो आहे असें दिसतांच संतापानें ती म्हणाली, 'जा नादाना! त्या पांचही जणांस पकडून येथें आण; नाहींतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपलें काळें तोंड मला पुन्हां दाखवूं नकोस.' हे झणझणीत शब्द ऐकतांच राजा सुमारें पांचशें हत्यारबंद सैनिक बरोबर घेऊन पार्लमेंटगृहांत गेला. "त्याबरोबर सर्व सभासदांनीं आपलीं शिरोभूषणें काढून राजास उत्थापन दिलें. त्याचा स्वीकार करून राजा तडक अध्यक्षाच्या खुर्चीकडे गेला. त्या वेळीं त्यानें पिम बसत असे त्या जागेकडे पाहिलें व तो नाहींसें कळतांच त्यानें अध्यक्षास त्याची खुर्ची मोकळी करण्यास सांगितलें. मग तो स्वतः त्या खुर्चीवर बसला व उठून सर्वांकडे त्यानें बारकाईनें पाहिलें. परंतु पाहिजे असलेलीं माणसें त्याला दिसेनात. तेव्हां सर्वांस उद्देशून तो म्हणाला, 'मी तुमच्यापैकीं पांच जणांस पकडून नेण्यास आलों आहें; तरी त्यांस तुम्ही माझ्या स्वाधीन करा.' परंतु कोणाकडूनही उत्तर आलें नाहीं. तेव्हां त्यानें अध्यक्षालाही तीच गोष्ट विचारली. त्यावेळीं तो म्हणाला, 'महाराज, या सभागृहांत डोळे असून मला दिसत नाहीं व तोंड असून बोलतां येत नाहीं; या सभेचा मी बंदा गुलाम असल्यामुळें ती सांगेल तेवढीच गोष्ट मला करतां येते, बोलतां येते व पाहतां येते. तरी खावंदांनीं मज गरीबाला क्षमा करावी.' अध्यक्ष लेंथॉल याचें हें भाषण ऐकतांच राजानें सभागृहाचा त्याग केला. त्यावेळीं आनंदानें बेहोष झालेल्या पार्लमेंटच्या सभासदांनीं टाळ्या पिटल्या व 'आमचे हक्क, आमचे अधिकार' असा एकच गिल्ला चालू केला." या सर्व प्रकारानें राजानें स्वतःच स्वतांची बेअदबी करून घेतली! लष्कराच्या जोरावर राजानें पांच सभासदांस पकडण्याचा प्रयत्न केल्यानें सर्व लोकांनीं त्या पांचही सभासदांस सर्व प्रकारचा आश्रय दिला. एवढेंच नव्हे, तर लष्करी सामर्थ्याच्या जोरावर राष्ट्राला चिरडून टाकण्याचा राजाचा विचार आहे असें लोकमत झालें. अधिवेशन चालू असतां सभागृहांत स्वतः जाणें, पांच सभासदांस पकडण्याचा प्रयत्न करणें वगैरे गोष्टी राज्यघटनेच्या विरुद्ध होत्या; व त्यामुळें लोक खवळले. अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे यादवीयुद्ध जवळ आलें. वरील प्रकारानंतर मुलेंबाळें व जडजवाहीर बरोबर घेऊन राणी हॉलंडकडे पळून गेली व सैन्य जमविण्यासाठीं राजानेंही लंडन सोडलें. त्यानंतर पिम, हॅम्पडन, होल्स प्रभृति पांच सभासदांची लोकांनीं जंगी मिरवणूक लंडन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शहरांतून काढली व अनेकांनीं त्यांचा सत्कार केला. तिकडे चार्ल्सचा मात्र जळफळाट झाला.

पहिल्या चार्ल्सचीं मुलें

५. युद्धाचें रणशिंग वाजलें :—राजानें लंडन सोडल्यानंतर तो कोठें व कशाकरितां गेला या मागावर पार्लमेंटचे पुढारी होतेच. सैन्य जमविण्याकरितां राजा यॉर्क येथें गेल्याचें कळतांच पार्लमेंटनेंही सैन्याची उभारणी करण्यास सुरुवात केली. लगेच पार्लमेंटनें सन १६४२ मध्यें राजाच्या हातून लष्करी सत्ता काढून घेणारें 'लष्करी बिल' पास करून तें राजाच्या संमतीकरितां त्याच्याकडे धाडून दिलें. पण त्यानें त्याला संमति दिली नाहीं. उत्तरेमध्यें असतां तेथील लोकांनीं राजाला चांगलाच पाठिंबा दिला. तेव्हां शस्त्रास्त्रांचा जंगी पुरवठा असलेलें हल बंदर आपल्याला मिळावें या हेतूनें त्यानें त्या शहराकडे कूच केलें. परंतु हें शहर पार्लमेंटनें अगोदरच आपल्या ताब्यांत घेतलें असल्यानें, तेथील लष्करी अधिकाऱ्यांनीं व लोकांनीं त्याला शहरांतही येऊं दिलें नाहीं. त्यामुळें निराशेनें त्याला परतावें लागलें. याच सुमारास पार्लमेंटनें एकोणीस कलमी एक यादी तयार केली व ती पास करून त्याच्या संमतीकरितां पाठविली. या यादींत प्रजेच्या हक्कांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व राजसत्ता नियंत्रित करण्यासंबंधींचा उल्लेख होता. राजानें त्या यादीला संमति दिली नाहीं. तेव्हां पार्लमेंटनें त्याच्या संमतीची वाट न पहातांच ती पास झाली असें समजून सैन्याची जमवाजमव सुरू केली. अशा स्थितींत पार्लमेंटच्या हातांतील बाहुलें होऊन राजसत्ता उपभोगणें किंवा पार्लमेंटशीं युद्ध करणें हे दोनच मार्ग राजाला मोकळे होते. त्यापैकीं त्यानें दुसरा मार्ग स्वीकारला व ता. २२ ऑगस्ट १६४२ रोजीं नॉटिंगहॅम येथें यादवी युद्धाचें रणशिंग फुंकलें. सर्व राजनिष्ठांनीं आपल्या निशाणाखालीं जमावें असाही त्यानें जाहीरनामा काढला. या गोष्टींमुळें पार्लमेंटलाही युद्धाची तयारी करून राजाच्या सैन्याशीं टक्कर देण्याशिवाय दुसरा मार्ग उरला नाहीं. यानंतर जें युद्ध झालें तें इंग्लंडच्या इतिहासांत अजरामर होऊन राहिलें आहे. त्याला 'यादवीयुद्ध' असें म्हणतात.

६. **राजपक्षाचें बळ**:—राजानें नॉटिंगहॅम येथें रणशिंग फुंकतांच अनेक राजनिष्ठ लोक त्याच्या निशाणाखालीं जमा होऊं लागले. बहुतेक सर्व उमराव व बरेचसे मध्यमवर्गीय लोक त्याला मिळाले. पार्लमेंटच्या धार्मिक धोरणास कंटाळलेले रोमन कॅथॉलिक व एपिस्कोपेलियन धर्मपंथी-यही त्यालाच मिळाले. स्कॉटलंडांत दुही होती, तिचा फायदा घेऊन लांच-लुचपतीच्या मार्गांनीं राजानें मंट्रोजच्या अर्लला आपल्या बाजूस वळवून घेतलें. राजाचा भाचा, राजपुत्र रूपर्ट, हाही त्याला येऊन मिळाला. तो कसलेला घोडेस्वार होता व त्याचा हल्ला कधींही व्यर्थ जात नसे. अशा तऱ्हेनें थोड्याच दिवसांत राजाला भरपूर सैन्य मिळालें; परंतु पुरेसा पैसा त्याच्याजवळ नव्हता. मोठ्या स्वार्थ-त्यागानें स्वतःचें जडजवाहीर व किडुकमिडुक विकून त्याच्या राजनिष्ठ लोकांनीं बराच पैसा जमा करून त्याला दिला. त्यामुळेंच त्याला लढतां आलें.

राजपुत्र रूपर्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचे सैनिक कसलेले नव्हते व त्याचा तोफखानाही चांगला नव्हता. तरीही त्याची लष्करी तयारी पार्लमेंटपेक्षां चांगली होती. प्रदेशाच्या दृष्टीनें पाहतां उत्तर इंग्लंड व पश्चिम इंग्लंड यांतील सर्व लोक त्याच्या बाजूचे होते असें म्हणतां येईल. राजपक्षांतील लोकांचे केस लांब सडक असत म्हणून त्यांस 'कॅव्हेलियर्स' म्हणत. राजपक्षाच्या घोडदळाचा मुख्य अधिकार स्वतः राजा व त्याचा भाचा राजपुत्र रूपर्ट अशा दोघांकडे होता; व लॉर्ड लिंडसे सैन्याचा मुख्य सेनापति होता. ऑक्सफर्ड हेंच त्याच्या सैन्याचें मुख्य ठिकाण होतें.

७. पार्लमेंटच्या पक्षाचें बळ :—पार्लमेंटच्या पक्षांत प्यूरिटन पंथाचे अभिमानी फार होते. त्याचप्रमाणें लंडन व त्यासारख्या मोठ्या शहरांत राहणारे व्यापारी, उदमी वगैरे लोकांचा पार्लमेंटकडे ओढा होता. त्यांच्याशिवाय अगदीं खालच्या वर्गांतील लोकांचाही पुष्कळ भरणा पार्लमेंटच्या सैन्यांत होता. स्कॉटलंडचा दुसरा पुढारी अर्गाइलचा ड्यूक आपल्या सैन्यासह पार्लमेंटला मिळाला होता. पार्लमेंटच्या ताब्यांत आरमार असल्यामुळें बहुतेक सर्व प्रमुख बंदरें व परराष्ट्रीय व्यापार पार्लमेंटच्या सत्तेखालींच होता. कर बसवून ते वसूल करण्याचा अधिकारही पार्लमेंटला असल्यानें त्या पक्षाला पैशाची कधींच वाण भासली नाहीं. त्यांतच व्यापारी वर्गानेंही पार्लमेंटला भरपूर द्रव्यसाहाय्य केलें; पार्लमेंटच्या सैन्याला लष्करी शिक्षण जवळ जवळ नव्हतेंच, परंतु युद्धाच्या अनुभवानें उत्तरोत्तर तें त्यांस मिळत गेल्यानें पार्लमेंटचें सैन्य नांवाजण्यासारखें झालें. पार्लमेंटपक्षांतील लोक प्यूरिटन असल्यामुळें ते आपले केस डोक्याबरोबर कापीत. यामुळें त्यांना 'राउंड हेडस्' असें म्हणत. पार्लमेंटच्या सैन्याचा सेनापति इसेक्स होता, व पार्लमेंटच्या सैन्याचा मुख्य तळ लंडनलाच होता.

८. युद्धाची हकीकत :—दोन्ही सैन्यांची प्रथमतः एजहिल येथें गांठ पडून लढाई झाली. या लढाईत राजपक्षाचा सेनापति लिंडसे शत्रूच्या हातीं लागला. परंतु रूपर्टनें मोठा पराक्रम करून पार्लमेंटच्या घोडदळास पिटाळून लावलें. ही लढाई निर्णायक झाली नाहीं. मात्र पार्लमेंटचें सामर्थ्य कमी आहे असें निदर्शनास आलें. तेव्हां पार्लमेंटच्या सैन्यास लष्करी शिक्षण दिल्याशिवाय पार्लमेंटला जय मिळणें शक्य नाहीं असें ऑलिव्हर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्रॉम्वेल या पार्लमेंटच्या एका पुढाऱ्याच्या ध्यानांत आलें; व तो त्या उद्योगास लागला. याच सुमारास पार्लमेंटनें स्कॉटलंडशीं एक करार केला. या करारानें प्रेसबिटेरियन पंथाचा इंग्लंडमध्यें प्रसार करण्याचें पार्लमेंटनें स्कॉटिशांना आश्वासन दिलें; उलट स्कॉटलंडनें सैन्यासह पार्लमेंटला राजाविरुद्ध मदत करावी असें ठरलें. त्याप्रमाणें अलेक्झांडर लेस्लीच्या हाताखालीं सुमारें वीस हजार स्कॉटिश सैनिक पार्लमेंटला मिळाले. पिमनें हा करार घडवून आणला व पार्लमेंटचें बळ वाढविलें. परंतु त्याच वर्षी तो मरण पावला (१६४३). त्याच्या थोडें अगोदरच पार्लमेंटचा दुसरा एक पुढारी हॅम्पडनही लढाईत वारला. स्कॉटलंडच्या मदतीनें पार्लमेंटची बाजू बळकट होत असतांच क्रॉम्वेलनें आपल्या सैन्यास लष्करी शिक्षण देण्यास सुरुवात केली होती. मोठे धाडसी, देवावर अढळ निष्ठा ठेवणारे, सदाचरणी व चिकाटीनें काम करणारे जहाल प्यूरिटन लोक क्रॉम्वेलनें आपल्या सैन्यांत दाखल केले होते. त्या सर्वांना त्यानें उत्तम सैनिक तयार केले. त्यांची शिस्तही उत्तम होती. त्यांच्या सैन्याच्या पलटणींना 'अभेद्य पलटणी' म्हणत व त्याच्या सैन्याला 'आदर्श लष्कर' असें म्हणत.



(इ.स. १६४२-४९मधील यादवींतील इंग्लंड.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढें सन १६४४ मध्यें मार्स्टनमूर येथें राजपक्षांत व पार्लमेंटपक्षांत मोठी लढाई झाली. त्यांत क्रॉम्वेलच्या अभेद्य पलटणींनीं अपूर्व पराक्रम गाजवून राजाचा पराभव केला. या वेळीं पार्लमेंटनें एक कायदा करून क्रॉम्वेलशिवाय पार्लमेंटच्या इतर सभासदांस सैन्यांतील हुद्याची जागा स्वीकारण्याची मनाई केली. त्यानंतर सन १६४५ मध्यें नेसबी येथें मोठी चुरशीची लढाई होऊन राजाचा पूर्णपणें पराभव झाला; राजाचा सर्व सरंजाम पार्लमेंटच्या सैन्याच्या ताब्यांत आला व आश्रयार्थ राजाला वेल्स प्रांताकडे पळ काढावा लागला. या लढाईमुळें इंग्लंडच्या उत्तरेकडील बहुतेक सर्व भाग पार्लमेंटच्या ताब्यांत आला, मदत मिळण्याकरितां फ्रान्स, आयर्लंड, स्कॉटलंड वगैरे देशांशीं झालेला राजाचा पत्रव्यवहार पार्लमेंटला मिळाला व त्यामुळें त्याचें खरें अंतरंग उघडकीस आल्यानें त्याच्याबद्दलचा लोकांचा आपलेपणा नष्ट झाला. क्रॉम्वेलच्या नव्या सैन्याच्या पराक्रमानें पार्लमेंटची बाजू बळकट झाली; व राजपक्ष सामर्थ्यहीन ठरला. यामुळें नेसबीची लढाई फार महत्त्वाची मानली जाते. यानंतर थोड्याच दिवसांनीं राजा न्यूआर्क येथें स्कॉटिशांच्या स्वाधीन झाला (१६४६).

९. पार्लमेंटपक्षांत फूट :—आपल्या हातीं राजा आला हें पाहून स्कॉटिश लोकांस आनंद झाला व त्यांनीं त्याला न्यूकासल येथें नेलें. तेव्हां तेथूनच पार्लमेंटशीं राजाच्या वतीनें त्यांनीं समेटाचें बोलणें सुरू केलें; परंतु समेट झाला नाहीं. स्कॉटिश सैन्याला पार्लमेंटकडून खर्चाची रक्कम यावयाची होती तेव्हां पार्लमेंटकडून चार लाख पौंड घेऊन स्कॉच लोकांनीं चार्लसला पार्लमेंटच्या स्वाधीन केलें (१६४७). यावेळीं पार्लमेंटपक्षांत दुफळी माजली होती. पार्लमेंटनें प्रेसबिटेरियन पंथ राष्ट्रावर लादला हें कांहींना आवडलें नाहीं व क्रॉम्वेलच्या आदर्श सैन्याच्या हातीं सर्व सत्ता गेली हेंही कांहींना पटलें नाहीं. शिवाय राजाला राज्यावरून काढून टाकावा हेंही कांहीं लोकांस पसंत पडलें नाहीं. अशा स्थितींत राजाशीं समेट करावा असें कांहीं लोकांना वाटत होतें; तर राजसत्ता अजीबात नष्ट करावी असें पार्लमेंटच्या प्रमुख पुढाऱ्यांस वाटत होतें. परंतु यावेळीं सर्व सत्ता क्रॉम्वेल व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचें लष्कर यांच्या हातांत असल्यानें क्रॉम्वेल म्हणेल ती पूर्व दिशा होणार असा रंग दिसत होता ! या परिस्थितीचा फायदा घेऊन व संधि साधून पार्लमेंटच्या नजरकैदेंत असलेला राजा पळून गेला. 'वाईट' बेटांत त्यानें आपला तळ दिला व तेथून त्यानें आयरिश व स्कॉटिश लोकांशीं पत्र-व्यवहार सुरू केला. त्यांची मदत न मिळाल्यास तो तेथून युरोपांत जाणार होता. परंतु तें त्याला साधलें नाहीं. वाईट बेटांत असतांच अनेक राज-पक्षीयांनीं स्कॉटिश सैन्याच्या मदतीनें पार्लमेंटशीं पुन्हां युद्ध आरंभिलें. तेव्हां प्रेस्टन येथें त्यांस गाठून क्रॉम्वेलनें मोठा विजय संपादिला (१६४८). या लढाईनें आदर्श लष्करांतील लोकांस राजाची अत्यंत चीड आली. त्याच्याशीं ते प्रथम सलोखा करण्यास तयार होते; परंतु ज्याच्यामुळें युद्धास व रक्तपातास तेजी येते तो मनुष्य जिवंत राहणें योग्य नाहीं असें त्यांचें मत झालें.

१०. **प्राइडनें केलेली हकालपट्टी**:—प्रेस्टनच्या विजयानें पार्लमेंट-पेक्षांही क्रॉम्वेलचें सैन्य मोठें सामर्थ्यवान ठरलें; व त्यांतील लोक आतां कोणत्याही अटीवर चार्ल्सबरोबर तह करण्यास तयार नव्हते. इंग्लंडमधून राजसत्तेचें अजीबात उच्चाटण करणें श्रेयस्कर होय असें त्यांस वाटूं लागलें. इकडे पार्लमेंटतर्फे राजाशीं समेटाचें बोलणें चालूच होतें. हें समजतांच लष्करानें राजाला आपल्या ताब्यांत घेऊन त्याला हर्स्ट किल्ल्यांत कैदेंत ठेवलें. राजाशीं मिळतें घेऊन त्याला पुन्हां राज्यावर बसवावें असें म्हण-णारा एक पक्ष यावेळीं पार्लमेंटमध्यें होता. त्यानें 'राजाशीं तह करून देशांत एकी व शांतता स्थापन करावी' असा एक ठरावही केला होता व तो पार्लमेंटमध्यें पास व्हावा अशी इच्छा दर्शविली होती. हें समजतांच लष्क-रांतील प्राईड या लष्करी अधिकाऱ्यानें आपल्याबरोबर बरेच सैनिक घेतले व तो पार्लमेंटच्या सभागृहाच्या दारावर बसला. आंत जाणाऱ्या व बाहेर येणाऱ्या प्रत्येक इसमावर त्यानें सक्त पहारा ठेवला होता. राजाशीं समेट घडवून आणावा व सैन्याला विरोध करावा असें ज्यांचें धोरण होतें त्यांना त्यानें आंत जाऊं दिलें नाहीं. अशारीतीनें त्यानें सुमारें एकशें त्रेचाळीस सभासदांस पार्लमेंटगृहांत सोडलें नाहीं. राहतां राहिले फक्त पन्नास-साठ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सभासद. त्यांचेंच पार्लमेंट भरलें. यामुळें त्या सभेला 'रंप पार्लमेंट' असें नांव मिळालें. इंग्लंडमध्यें लोकहित व राष्ट्रहित तुडवून राजानें आपल्या प्रजेविरुद्ध युद्ध केलें म्हणून राजा देशद्रोही आहे असा ठराव या पार्लमेंटनें केला. एवढेंच नव्हे तर त्याची चौकशी करण्याकरितां सुमारें १३५ लोकांचें एक न्यायकोर्टही नेमलें. या कोर्टाचा मुख्य न्यायाधीश म्हणून जॉन ब्रॅडशॉ याची नेमणूक झाली.

११. राजाला फाशीं:—हें कोर्ट लंडनच्या प्रसिद्ध वेस्ट मिन्स्टर दिवाणखान्यांत भरलें. त्यावेळीं न्यायकोर्टातील सभासदांपैकीं फक्त ६७ न्यायाधीशच हजर होते. राजाचा पवित्र देह नष्ट करूं नये असें बाकीच्यांस वाटत होतें. अर्थात राजाला ठार करण्याची कल्पनाही त्यांस सहन होत नव्हती. अशा लोकांत पार्लमेंटपक्षाचा एक सेनापति फेअर फॅक्स हाही होता. शेवटीं राजाला गुन्हेगाराप्रमाणें कोर्टापुढें उभें करण्यांत आलें. साध्या माणसाप्रमाणें त्याला तेथें वागविण्यांत येणार होतें. तेव्हां 'माझ्या बरोबरीचा एकही सभासद या कोर्टांत नसल्यानें या कोर्टाला माझा खटला चालविण्याचा अधिकार नाहीं,' असें राजानें सांगितलें व कोर्टाच्या कामांत भाग घेण्याचें नाकारलें. शेवटीं कोर्टानें देशद्रोही, जुलमी व खुनी म्हणून त्याला देहांताची शिक्षा ठोठावली! कोर्टातील राजाची वागणूक एखाद्या राजाला शोभेल अशीच धीरगंभीर होती. आपली शांति त्यानें मुळींच ढळूं दिली नाहीं. शेवटीं ता. ३० जानेवारी १६४९ रोजीं व्हाइटहॉल नामक राजवाड्याच्या पुढील पटांगणावर त्याला सर्वांसमक्ष फाशीं देण्यांत आलें. त्यामुळें लष्कराला आनंद झाला; परंतु अनेक लोकांच्या डोळ्यांना पाणी येऊन ते रडूं लागले. एपिस्कोपेलियन पंथाच्या रक्षणाकरितां त्यानें मरण पत्करलें अशी अनेकांची समजूत असल्यानें अनेक लोक त्याला हुतात्मा समजतात. राजाच्या वधामुळें लोकांचा लष्करावरील विश्वास उडाला. यापुढें लष्कराचा जाचक अंमल इंग्लंडमध्यें सुरू होणार असल्याचीं भविष्यें लोकांस पडूं लागलीं. राजाचा वध झाला असला तरी त्याचा मुलगा अजून जिवंत होता. त्याच्याविरुद्ध पार्लमेंटला कांहीं पुरावा दाखवितां येणें शक्य नव्हतें. तेव्हां आज ना उद्यां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो राजा होईल अशी लोकांची खात्री होती. एकंदरींत पाहतां राजाला फाशीं देण्यांत पार्लमेंटच्या हातून एक मोठा अक्षम्य अपराध घडला असेंच



पहिल्या चार्ल्सला फाशीं दिला त्यावेळचें पदक

सर्वांचें मत झालें. राजाच्या वधानें यादवी युद्ध खलास झालें व राजा श्रेष्ठ कीं पार्लमेंट श्रेष्ठ या प्रश्नाचा निकाल लागून पार्लमेंट श्रेष्ठ असें ठरलें.

अभ्यास

१. यादवी युद्धाचीं कारणें थोडक्यांत सांगा. त्या यादवीयुद्धांत तुम्ही कोणता पक्ष घेतला असता ? कां ?

२. दीर्घ पार्लमेंटची कामगिरी थोडक्यांत सांगा. प्राईडनें हकालपट्टी कोणाची केली ? कां ?

३. व्यक्ती व राजा या नात्यानें चार्ल्सची योग्यता वर्णा.

४. स्ट्रॅफर्ड व लॉड यांना तुम्ही देशभक्त म्हणाल का ? कां ? त्यांचीं चरित्रें थोडक्यांत द्या.

५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—

(अ) स्ट्रॅफर्डचा वध (आ) पांच सभासदांस पकडण्याचा प्रयत्न. (इ) तक्रारींचा खलिता (ई) नेसबीची लढाई (उ) कॅव्हे-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लियर व राउंड हेड (ऊ) आदर्श लष्कर (ए) त्रैवार्षिक निवडणुकीचा कायदा.

६. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
पिम, ईलियट, फेअर फॅक्स, हॅम्पडन, क्रॉम्वेल, प्राईड, पहिला चार्ल्स, रूपर्ट, इसेक्स, लेंथॉल, ब्रॅडशॉ, हेनरीटा मराया, मंट्रोज, लॉर्ड लिंडसे, अर्गाइलचा ड्यूक.

७. प्यूरिटन लोक कोण ? त्यांचीं धार्मिक मतें कोणतीं ? प्यूरिटनांनींच यादवी घडवून आणली असें म्हणतात. खरें का ? कशावरून ?

८. चार्ल्सला फाशीं कां दिला ? त्याला फाशीं दिला ही चूक झाली ? कां ?

उतारे

१. तुरुंगांत पडलेल्या स्ट्रॅफर्डला राजाचें पत्र–१६४१

प्रिय स्ट्रॅफर्ड,

काळच फिरला व तुझ्यासारख्यावर आकाशची कुऱ्हाड कोसळली ! केवढें दुर्दैव हें !! पण काय उपाय त्याला ? यापुढें माझ्या कारभारांत तुझ्या सल्ल्याचा मला उपयोग करून घेतां येणार नाहीं याबद्दल मला हळहळ वाटते. माझ्या मनाला व सदसद्विवेकबुद्धीला समाधान मिळावें म्हणून मी तुला अशी ग्वाही देतों कीं तुझ्या संपत्तीला, तुझ्या कीर्तीला व तुझ्या जीवाला धोका पोंचणार नाहीं. हा राजाचा शब्द आहे हें विसरूं नकोस. अशी ग्वाही देणें न्याय्यही आहे. तुझ्यासारख्या लायक व इमानी नोकराला माझ्यासारख्या धन्याकडून मिळालेलें हें बक्षीस कमी किंमतवान आहे हें मी जाणून आहें; परंतु सध्यांची काळवेळ पाहतां तेंच योग्य नाहीं काय ?

व्हाइटहॉल राजवाडा, तुझा निरंतरचा प्रामाणिक मित्र,
२३ एप्रिल, १६४१. चार्ल्स.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. उमरावमंडळास चार्ल्सनें स्ट्रॅफर्डवर दया दाखविण्याकरितां पाठविलेलें पत्र

उमरावहो,

कालच मी राजद्रोहाच्या बिलावर सही केली. कोणावरही दया करणें हा राजाचा निर्दोष व स्वयंभू हक्क आहे. लॉर्ड स्ट्रॅफर्डच्या बाबतींत, मर्यादित स्वरूपांत कां होईना, तो मी उपयोजिण्याचें इच्छितों. माझ्या प्रजाजनांच्या रोषास बळी न पडतां मला जर असें करतां आलें तर मला किती आनंद होईल म्हणून सांगूं? या माझ्या सदिच्छेला आपण सर्वजण सक्रिय पाठिंबा द्याल अशी आशा आहे. कारण या उमरावमंडळांतील माझा सर्वांत लाडका सभासद जर कोणी असेल तर तो स्ट्रॅफर्ड होय. तरी तुम्ही कॉमन्ससभेचें, केवळ माझ्याकरितां, कसेंही समाधान करा व त्या सभेची संमति मिळवा. पार्लमेंटच्या दोन्हीही सभांची माझ्या कृत्याला संमति मिळाली तर तुमच्या सर्व तक्रारी मी मोठ्या आनंदानें ऐकेन व त्यांचें निराकरण करीन. परंतु स्ट्रॅफर्डचा जीव घ्यावयाचाच माझ्या प्रजेचा निश्चय असेल तर......उपायच खुंटला. माझ्या विनंतीचा आपण अव्हेर करणार नाहीं अशी अंतःकरणपूर्वक आशा आहे.

तुमचा लाडका मित्र,
राजा चार्ल्स

प्रश्न :—१. वरील दोन्ही पत्रांवरून राजा व स्ट्रॅफर्ड यांच्या मैत्रीबद्दल तुम्हांस काय वाटतें? कशावरून?

२. स्ट्रॅफर्डबद्दल राजाचें मत काय होतें? त्याला त्यानें ग्वाही कोणती दिली? ती त्यानें पाळली? कां नाहीं? त्याच्या-करितां राजा आणखी कोणत्या गोष्टी करण्यास तयार झाला?

३. चार्ल्स राजावरील आरोप—१६४९.

कोर्ट बसल्यावर शिरस्तेदारानें राजावरील आरोपांचा खालीलप्रमाणें खर्डा वाचला. ' तुला आम्हीं इंग्लंडचें राजपद दिलें. तुझी सत्ता थोडी नियंत्रित असली तरी तूं न्यायबुद्धीनें राज्य करशील असा आम्हांस विश्वास होता. तूं त्यावेळीं शपथ घेतलीस व राज्यपद स्वीकारलेंस; अर्थात् आपल्या शपथेला जागून व आपल्या सत्तेचा सदुपयोग करून तूं आपल्या प्रजेचा योग्य तो प्रति-पाल करणें न्यायाचें होतें. परंतु तुला कुबुद्धि झाली व लोकांचे हक्क व स्वातंत्र्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिरावून घेण्यास तूं सिद्ध झालास. एवढेंच नव्हे तर आपली सत्ता अमर्यादित करण्याकरितां आपल्या प्रजेशीं व पार्लमेंटशीं युद्धास सिद्ध झालास. हा शुद्ध कृतघ्नपणा नव्हे काय? या युद्धामध्यें शेंकडों स्वतंत्र नागरिकांचीं डोकीं उडालीं तीं तुझ्यामुळें; तुझ्या सैन्याचा पराभव झाला असतांही व तुला आम्हीं कैद केलें असतांही तूं आमच्याविरुद्ध अनेक बंडवाल्यांना चिथावणी दिलीस; आपल्या मुलाला पार्लमेंटबरोबर युद्ध करण्यास उत्तेजन दिलेंस. या सर्व कृत्यांमुळें पार्लमेंटचे अनेक विश्वासू सैनिक बिथरले व ते राजपुत्राला मिळाले. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां गेलीं पांच-सात वर्षें इंग्लंडमध्यें झालेले खून, अत्याचार, दंगे, मारामाऱ्या, लुटालूट, जाळपोळ, घरफोड्या व एकंदर विध्वंस वगैरेंचा तूंच कर्ता करविता आहेस असें ज्याअर्थीं आमचें निश्चित मत आहे, त्याअर्थीं आम्ही तुझ्यावर असा आरोप करतों कीं वरील सर्व अनर्थाला कारणीभूत होणारा तूं जुलमी, खुनी, देशद्रोही व राजद्रोही असून इंग्लंड-मधील लोकशाहीचा शत्रू आहेस.

प्रश्न :—१. वरील उताऱ्यावरून राजावर प्रजेनें कोणकोणते आरोप केले तें सांगा.

२. ते सर्व खरे आहेत काय? कशावरून? राजा देशद्रोही व राजद्रोही कसा?

४. चार्ल्सच्या फाशीचें वारंट—१६४९.

कर्नल फ्रॅन्सिस हॅकर, हंक्स व फ्रे यांसी,

जुलमी, खुनी, देशद्रोही व राजद्रोही म्हणून इंग्लंडचा राजा चार्ल्स, याजवरील आरोप ज्याअर्थीं या कोर्टानें मान्य केला आहे व ज्याअर्थीं त्याच्या धडापासून त्याचें शीर दूर करून त्याला ठार करण्याची शिक्षा दिली आहे त्याअर्थीं उद्यां, म्हणजे ता. ३० जानेवारी, १६४९ रोजीं, सकाळीं दहा ते सायंकाळीं पांचपर्यंत व्हाइटहॉल राजवाड्यापुढील भररस्त्यावर त्या शिक्षेची योग्य ती अंमलबजावणी करतां यावी म्हणून तुम्हांस हें वारंट देण्यांत येत आहे. सर्व लष्करी अधिकारी, सैनिक व इंग्लंडमधील सर्व सज्जनांनीं तुमच्या कामीं तुम्हांस मदत करावी अशी आमची इच्छा आहे.

जॉन ब्रॅडशॉ, टॉमस ग्रे,
ऑलिव्हर क्रॉम्वेल व इतर ५६ लोकांच्या सह्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श इ. स. १६२५–१६४९

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	यूरोप-महत्त्वाच्या गोष्टी	हिंदुस्थान-महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ति
१६२५-	१६२५-१६४९प.चार्ल्स			बकिंगहॅम
			१६२६ मलिकंबराचा मृत्यु	
	–			
	–	१६२७ फ्रान्सशीं युद्ध	१६२७–१६५८ शहाजहान	जगन्नाथ पंडित
	_१६२८ हक्क-माग.अर्ज			
	-१६२९–४० चार्ल्सचा अनियंत्रित कारभार			ईलियट,
१६३०	–		१६३० शिवाजी महाराजांचा जन्म	
	–			वेंटवर्थ, लॉड
	–			
	–			
	-१६३४ नौकाकर			
	–			
	–			
	-१६३७ हॅम्पडन नौ. ना		१६३७ निजाम.नष्ट	हॅम्पडन
	–			पिम,
	-१६३९ बिशपांचें युद्ध			फेअरफॅक्स
१६४०	-१६४०–१६६० दीर्घ पार्लमेंट			
	-१६४१ स्ट्रॅफर्डला फाशीं			न्यूटन
	-१६४२–४९ या. युद्ध	तेरावा लुई-मृत्यु (१६१०–४३)		क्रॉम्वेल
	–	चौदावा लुई (१६४३–१७१५)		शहाजी
	-१६४४ मार्स्ट. लढाई			
	-१६४५ नेसबीची लढाई			
	–		१६४६ शिवाजी. रा. स्था.	शिवाजी
	–			
	–	१६४८ वेस्टफॅलियाचा तह.		
	–			
१६४९	१६४९ चार्ल्स फाशीं			ब्रॅडशॉ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



राजपक्षीयांचीं पदकें. १–३ पहिला चार्ल्स व ४–६ दुसरा चार्ल्स.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. इंग्लंडांत लोकशाही—ऑलिव्हर क्रॉम्वेल

१. संतांचें राज्य :—पहिल्या चार्ल्सच्या वधानंतर इंग्लंडमधून राजसत्तेचें उच्चाटन झालें. राजाचा पराभव होऊन पार्लमेंटपक्ष विजयी झाला असें वरवर पाहणारास दिसतें; परंतु वस्तुस्थिति तशी नव्हती. राजाशीं झगडण्यांत पार्लमेंटनेंही आपला अंत करून घेतला. राजा, उमरावमंडळ व कॉमन्स-सभा हे पार्लमेंटचे तीन प्रमुख घटक होत. यापैकीं राजसत्ता नष्ट झाली, उमरावांनीं पार्लमेंटमधून अंग काढून घेतलें व रंप पार्लमेंटनें सन १६४९ मध्यें राजसत्ता व उमरावमंडळ रद्द केलें. प्राइडनें पार्लमेंटच्या प्रेसबिटे-रियन पंथाच्या लोकांस पार्लमेंटमधून हांकलून दिल्यानें त्या सभेंत फक्त ५०-६० सभासद कसाबसा जीव धरून लष्कराच्या मुठींत होते. वरील सर्व गोष्टी लक्षांत घेतां पार्लमेंटचाही नाश झाला असें म्हणतां येईल. राजसत्ता व उमरावमंडळ रद्द झाल्यावर राज्यकारभार करण्याकरितां ४१ जणांचें एक तात्पुरतें कारभारीमंडळ नेमलें होतें. या मंडळांतील सर्व सभासद प्यूरिटनपंथाचे होते व देशांत प्यूरिटनपंथाचा प्रसार करून 'संतांचें राज्य' स्थापन करण्याचा त्या सर्वांचा विचार होता. अशा विचारांच्या लोकांस वाटे कीं, 'रोमन, ग्रीक, पर्शियन, असीरियन वगैरे लोकांनीं निरनिराळ्या वेळीं चार साम्राज्यें स्थापन केलीं व तीं नष्ट झालीं. आतां यापुढें ख्रिस्ताचें शांततामय, पवित्र व निष्पाप असें पांचवें साम्राज्य म्हणजे 'ख्रिस्तराज्य' स्थापन व्हावयाचें आहे व तें आम्ही स्थापणार. त्याकरितां त्याचा अवतार होणारच आहे, पण तो होईपर्यंत आम्ही राज्य करणार. तेव्हां आमच्यासारख्या सदाचरणी व निष्पाप लोकांच्या हातीं राज्यकारभार राहिल्यास तो उत्त-मच होणार'. असें म्हणणारे लोक आपल्याला 'पांचवे साम्राज्यवाले' असें म्हणवून घेत. त्यांचा पुढारी क्रॉम्वेल. त्यालाही 'ख्रिस्तराज्या'ची ही कल्पना पटली होती व त्याप्रमाणें त्यानें प्रयोगही केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. ऑलिव्हर क्रॉम्वेल (१६४९–५८) :—ऑलिव्हर क्रॉम्वेलचा जन्म हंटिंग्डन परगण्यांत सन १५९९ मध्यें एका गरीब कुळांत झाला होता. केंब्रिजला त्याचा विद्याभ्यास झाला होता. सन १६२८ मध्यें तो पार्लमेंटांत प्रथम निवडून आला. पुढें अकरा वर्षें त्यानें आपली शेती सांभाळून दिवस काढले. या वेळीं लोकांच्या हक्कांबद्दल तो नेहमीं जागरूकता दाखवी व राजाच्या अनियंत्रित सत्तेस आळा कसा घालतां येईल याचा सदैव विचार करी. पुढें सन १६४० मध्यें दीर्घ पार्लमेंटमध्यें

ऑलिव्हर क्रॉम्वेल

तो निवडून आला. त्यावेळीं राजा व पार्लमेंट यांचा जोराचा झगडा चालू असतां, त्यानें लोकपक्षाच्या बाजूनें राजाला विरोध करून मान्यता मिळविली. पुढें यादवीयुद्ध सुरू झालें. त्यावेळीं त्यानें एक नवीन घोडदळ निर्माण करून तो त्याचा अधिपति झाला. मोठा लष्करीतज्ज्ञ म्हणून त्याची पुढें प्रसिद्धी होऊं लागली. पार्लमेंटच्या वतीनें लढून त्यानें राजपक्षाशीं चांगलीच लढाई दिली. एवढें झालें तरी पार्लमेंटचा ठिकठिकाणीं जो पराभव होत होता, त्यावर काय उपाय करावा, याचा तो एकसारखा विचार करीत होता. त्यावेळीं पार्लमेंटपक्षाच्या लष्करास लष्करी शिक्षण दिल्याशिवाय पार्लमेंटचें सामर्थ्य वाढणार नाहीं असें त्यास आढळून आलें. तेव्हां त्यानें पापभीरू, देवावर विश्वास असणारे, बाणेदार, स्वतंत्र वृत्तीचे व धार्मिक आचरणाचे प्यूरिटन लोक एकत्र गोळा करून त्यांस लष्करी शिक्षण देण्यास सुरुवात केली. अशा सैन्यांत काटक शेतकरी व शिलेदारी बाण्याचे लोक असल्यानें त्यांना लष्करी शिक्षण दिल्यानें ते उत्तम सैनिक झाले होते. या सैन्यालाच 'आदर्श लष्कर' असें नांव प्राप्त झालें होतें. या सैन्याच्या जोरावर क्रॉम्वेलनें मार्स्टनमूर, नेसबी वगैरे मोठ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लढाया मारून आपली व आपल्या लष्कराची कीर्ति जगभर पसरविली. पार्लमेंटमध्येंही त्याचें वजन व वर्चस्व वाढलें. अर्थात् त्याच्या जोरावरच त्यानें पार्लमेंटच्या पक्षाच्या लष्कराचें आधिपत्य आपल्याकडे घेतलें. शेवटीं त्यानें राजाचा पराभव व वध करून सर्व राजसत्ता आपल्या व आपल्या लष्कराच्या हातीं घेतली. त्याचा कल प्यूरिटनपंथाकडे होता; तरी तो परधर्मसहिष्णु होता. उत्कृष्ट सेनानी, मोठा मुत्सद्दी, करारी व बाणेदार लोकाग्रणी म्हणून तो प्रसिद्ध होता. अशा माणसाकडेच चार्ल्सनंतर लोकशाहीचीं सूत्रें हालविण्याचें काम आलें; व तो त्या लोकशाहीचा संरक्षक बनला.

३. लोकशाहीला विरोध–आयर्लंडमधील बंड :—इंग्लंडमध्यें लोकशाही स्थापन झाली ही गोष्ट अनेकांना पसंत पडली नाहीं. लोकशाहीविरुद्ध आयर्लंड व स्कॉटलंड या देशांमध्यें अनेक राजपक्षीय होते व ते योग्य संधीची वाट पाहून इंग्लंडवर हल्ला करण्याच्या बेतांत होते. तसेंच युरोपीय राजे इंग्लंडच्या लोकशाहीला मान्यता देतील असा संभव नव्हता; कारण इंग्लंडमधील लोकशाहीची जिकडे तिकडे थट्टा व अवहेलनाच सुरू झाली होती. तशांतच ज्या लष्कराच्या जोरावर क्रॉम्वेलनें लोकशाही स्थापन केली त्या लष्करांतच 'समतावादी' लोकांचा एक पंथ निर्माण होऊन 'सर्व लोक एकाच समान दर्जाचे आहेत' असें ते म्हणूं लागले. त्यांनीं पुढें बंड केलें. क्रॉम्वेलनें तें मोडलें; व त्यांचे विचार किती घातुक आहेत हें त्यांस पटवून दिलें. याच सुमारास सन १६४९ मध्यें ऑर्मंडचा ड्यूक, जेम्स बटलर, यानें राजपक्षीयांचा एक जमाव आयर्लंडांत निर्माण केला व दुसऱ्या चार्ल्सच्या नांवानें ग्वाही फिरवून लोकशाहीविरुद्ध बंड केलें. त्यावेळीं क्रॉम्वेलनें आपलें लष्कर आयर्लंडमध्यें नेऊन ड्रॉघेडा शहरास वेढा दिला. लोक शरण येत नाहींत असें पाहून त्यानें जोराची लढाई करून तें शहर घेतलें, तेथील तीन हजार शिबंदीची कत्तल केली व पांचशें रोमन कॅथॉलिकांस कंठस्थान घातलें! अशाच तऱ्हेनें अत्यंत क्रूरपणें वागून त्यानें वेक्सफर्डही घेतलें. त्यानंतर लहान मोठ्या लढाया होऊन आयर्लंडांतील बंडाचा त्यानें मोड केला. त्यानंतर त्यानें अनेक आयरिश लोकांना गुलाम म्हणून विकलें, राजपक्षांतील लोकांच्या जमिनी जप्त करून त्या आपल्या कांहीं प्यूरिटन सैनिकांस व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहीं लंडनच्या ज्या व्यापाऱ्यांनीं त्याला बंड मोडण्यास पैसा पुरविला त्यांस दिल्या. यावेळीं क्रॉम्वेलनें केलेल्या क्रौर्याची जाणीव अनेकांस कित्येक दिवस राहिली होती. इतकें काम केल्यावर क्रॉम्वेलनें आपला जांवई आयर्टन याला आयर्लंडचा गव्हर्नर नेमलें व तो लंडनला परत आला.

४. स्कॉटलंडमधील बंड :—आयर्लंडमधील बंडाळी मोडून लंडनला परत येतो न येतो तोंच क्रॉम्वेलला स्कॉटलंडमधील बंडाळीकडे लक्ष द्यावें लागलें. यादवीमध्यें शेवटीं शेवटीं स्कॉटिश लोक पार्लमेंटच्याविरुद्ध राजपक्षाच्यां बाजूनें लढत होते. राजाचा वध झाल्यावर त्याच्या मुलाच्या—चार्ल्सच्या—नांवानें त्यांनीं स्कॉटलंडांत द्वाही फिरविली; व त्याला स्कॉटलंडमध्यें येण्याबद्दल आग्रह केला. त्यावेळीं त्याचें वय वीस वर्षांचें होतें. बोलावल्याप्रमाणें तो त्या देशामध्यें गेलाही. ही बातमी कळतांच क्रॉम्वेल आपल्या लष्करासह स्कॉटलंडांत गेला व त्यानें स्कॉटिश सैन्यास डनबारजवळ गांठलें. त्या वेळीं



डनबारच्या लढाईनंतरचें पद —एक बाजू क्रॉम्वेल व दुसरी बाजू पार्लमेंटसभा

एका बलाढ्य किल्ल्याचा आश्रय घेऊन स्कॉटिश सैन्य एका मान्याच्या ठिकाणीं होतें. त्यामुळें क्रॉम्वेल मोठ्या पेंचांत पडला व त्याचे सर्व मार्ग स्कॉटिश सैन्यानें रोखून धरल्यानें त्याच्या सैन्याची कुचंबणा व उपासमार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊं लागली. इतक्यांत आपलें स्थान सोडून मोकळ्या मैदानांत येण्याची कुबुद्धि स्कॉटिश सैन्यास झाल्यानें क्रॉम्वेलला आनंद झाला. तावडतोब त्यानें आपल्या लष्कराला स्कॉटिश सैन्यावर तुटून पडण्याचा हुकूम केला; त्याबरोबर क्रॉम्वेलच्या सैन्यानें स्कॉटिश सैन्यास घेरून त्याची नुसती लांडगेतोड केली. स्कॉटिशांचा पराभव झाला व क्रॉम्वेलला मोठा जय मिळाला (१६५०). यानंतरही दुसऱ्या चार्ल्सला स्कोन येथें स्कॉटलंडचा राजा म्हणून राज्याभिषेक करण्यांत आला. ही बातमी कळतांच क्रॉम्वेलनें त्याच्यावर स्वारी करण्याचें ठरविलें. तेव्हां राजपक्षीयांची मदत मिळावी म्हणून चार्ल्स उत्तर इंग्लंडमध्यें निसटला. तावडतोब क्रॉम्वेल त्याच्या मागें लागला. तेव्हां वूर्स्टर येथें त्यांची गांठ पडून मोठी घनघोर लढाई झाली. त्यांतही स्कॉटिशांचा पूर्ण पराभव झाला. त्यानंतर मात्र चार्ल्सनें नाना अडचणींस तोंड देऊन व नाना गुप्त वेश घेऊन कसेंबसें फ्रान्स गांठलें (१६५१). यानंतर स्कॉटलंड इंग्लंडला जोडण्यांत आलें व जनरल मंक याला स्कॉटलंडची व्यवस्था पाहण्याचें काम सांगून क्रॉम्वेल इंग्लंडांत परत आला.

५. **हॉलंडशीं युद्ध** (१६५२–५४):—यानंतर क्रॉम्वेलला हॉलंडशीं युद्ध करावें लागलें. पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याकरितां ई. इं. कंपनी व डच ई. इं. कंपनी अशा दोन कंपन्या एलिझाबेथच्या कारकीर्दींतच स्थापन झाल्या होत्या व त्यांमध्यें तिकडील व्यापाराकरितां एकसारखी चुरस लागून राहिली होती. तशांतच सन १६२३ मध्यें डच लोकांनीं इंग्लिश व्यापाऱ्यांची अंबोयना बेटांत कत्तल केली होती. त्यावेळचा राजा जेम्स मूग गिळून बसला असला, तरी इंग्लिशांच्या मनांतील तेढ नष्ट झाली नव्हती व ते संधीची वाट पहात होते. अशा स्थितींतच डच लोकांनीं आपला वाहतुकीचा व्यापार वाढवून जगाशीं व्यापारी संबंध जोडला होता. त्यामुळें इंग्रजांचें अत्यंत नुकसान होऊं लागलें. हें जाणून पार्लमेंटनें सन १६५१ मध्यें 'नौकानिर्बंधाचा कायदा' पास केला. या कायद्यानें आशिया, आफ्रिका, अमेरिका वगैरे देशांतून इंग्लंडांत येणारा माल इंग्लिश जहाजांतूनच आला पाहिजे व युरोपांतून इंग्लंडमध्यें येणारा माल इंग्लिश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जहाजांतून अगर त्या त्या देशाचा माल त्या त्या देशाच्या जहाजांतून आला पाहिजे असें ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें डच जहाजांनीं इंग्लिश जहाजांस, इंग्लिश खाडींतून जात असतां, लष्करी सलामी दिली पाहिजे असेंहि इंग्रज म्हणूं लागले. त्यामुळें डच लोक चिडले. तशांतच इंग्लंडमधील लोकशाहीस विरोध करून डच लोक आपल्या देशांत चार्ल्स व त्याचे साथीदार यांना आश्रय देत असत. इंग्रजांस हें खपलें नाहीं. यामुळेंही त्या दोन देशांत धुसफुस चाले. याचवेळीं सन १६५२ मध्यें हेग येथें इंग्लिश वकिलाचा खून करण्यांत आल्यानें सर्व इंग्लिश राष्ट्राला धक्का बसला. तेव्हां डचांविरुद्ध युद्ध पुकारण्यांत येऊन ब्लेक या दर्यासारंगाला, जनरल मंकसह हॉलंडवर स्वारी करण्याकरितां पाठविण्यांत आलें (१६५२). व्हॅन ट्रॉंप हा डचांचा दर्यासारंग होता. त्यानें प्रथमतः इंग्लिशांचा ठिकठिकाणीं पराभव केला. या विजयाचें प्रतीक म्हणून व्हॅन ट्रॉंपनें आपल्या जहाजाच्या डोलकाठीस एक केरसुणी बांधून तें जहाज इंग्लिश खाडींत मिरविलें ! अर्थ इतकाच कीं, केरसुणीनें केर काढतात त्याप्रमाणें, सर्व समुद्रांतून इंग्लिशांची हकालपट्टी करण्यांत आली. परंतु ताबडतोब ब्लेकनें पोर्टलंड व टेक्सेल येथें व्हॅन ट्रॉंप याचा दोनदां पराभव केला; या लढाईंतच ट्रॉंप मारला गेला.



सन १६५३ च्या डच युद्धाच्या वेळचें सोन्याचें पदक

या विजयार्थ ब्लेकनें आपल्या जहाजाच्या डोलकाठीस एक चाबूक बांधून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तें जहाज त्यानें इंग्लिश खाडींत मिरविलें! त्याचा अर्थ इतकाच कीं, चाबकानें चोपून काढतात त्याप्रमाणें डचांस त्यानें चोपून काढलें. पुढें हॉलंडशीं सन १६५४ मध्यें तह होऊन नौकानिर्बंधाचा कायदा त्यांनीं मान्य केला, अंबोयनाच्या कत्तलीकरितां नुकसानभरपाई देण्याचें त्यांनीं कबूल केलें, इंग्लंडमधील लोकशाहीस त्यांनीं मान्यता दिली व राजपक्षीयांस आश्रय देणार नाहीं असें कबूल केलें. या आरमारी विजयानें इंग्लंडचें आरमारी वर्चस्व निर्विवाद ठरलें, त्यांचा व्यापार वाढीस लागला, डचांच्या समुद्रावरील वर्चस्वास खो बसून त्यांचा व्यापार घटूं लागला व खुद्द इंग्लंडमध्यें लोकशाहीची लोकप्रियता वाढण्यास मदत झाली.

६. 'हें घर भाड्यानें देणें आहे':—इंग्लंडांत वंडांची व डचांशीं चाललेल्या युद्धाची रणधुमाळी चालू असतांच राज्यकारभारासंबंधीं बऱ्याच भानगडी चालू होत्या. रंप पार्लमेंटनें पार्लमेंटची निवडणूक पुन्हां करावी; मात्र रंप पार्लमेंटमधील सभासद कायम असावेत असें ठरविलें होतें. क्रॉम्वेलला ही गोष्ट आवडली नाहीं व त्यानें त्या बाबतींत रंप पार्लमेंटनें कांहींही करूं नये असें फर्माविलें. परंतु त्याच्या गैरहजेरींत रंप पार्लमेंटनें तो प्रश्न पुन्हां उकरून काढून त्यावर चर्चा करण्यास सुरुवात केली. तेव्हां क्रॉम्वेल लष्करासह पार्लमेंटमध्यें गेला. सैनिकांना बाहेरच ठेवण्यांत आलें होतें. शेवटीं वादविवाद चालू असतांच तो उठला व 'पार्लमेंटचे सभासद होण्यास तुम्ही नालायक आहांत. तेव्हां ताबडतोब येथून चालते व्हा.' असें म्हणून त्यानें आपला पाय भुईवर जोरानें आपटला. त्याबरोबर त्याचे सैनिक पार्लमेंटमध्यें घुसले व त्यांच्या भीतीनें रंप पार्लमेंटच्या सभासदांनीं सर्व सभागृह मोकळें केलें. अशा तऱ्हेनें कर्तव्यशून्य व स्वार्थी रंप पार्लमेंटची हकालपट्टी केल्यावर क्रॉम्वेलनें त्या गृहास स्वतः कुलूप लावून त्याच्या किल्ल्या स्वतःच्या खिशांत घातल्या. दुसऱ्या दिवशीं एका वात्रट राजपक्षीयानें 'हें घर भाड्यानें देणें आहे' अशी पार्लमेंटगृहावर पाटी लावण्यास कमी केलें नाहीं! क्रॉम्वेलच्या या कृत्यानें इंग्लंडमध्यें त्याची एकतंत्री सत्ता व तीही लष्कराच्या जोरावर सुरू झाली (१६५३).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. घटनापत्रक (१६५३):—रंप पार्लमेंटची हकालपट्टी झाल्यानें इंग्लंडमध्यें लोकमत निदर्शक अशी सत्ता नव्हती, हें सत्य असलें तरी एखाद्या जुलमी राजाप्रमाणें कारभार करावा अशी क्रॉम्वेलची इच्छा नव्हती. मागें सांगितल्याप्रमाणें त्याला रामराज्याची ऊर्फ संतांच्या राज्याची स्थापना करावयाची होती. म्हणून त्यानें सर्व सदाचरणी, निस्वार्थी व पापभीरू लोकांची एक यादी तयार करून, त्यांच्यातर्फें पार्लमेंटची निवडणूक केली. या पार्लमेंटमध्यें बेअरबोन नांवाचा एक चांभार गृहस्थ मोठा वजनदार होता. तेव्हां त्याच्या नांवावरून या पार्लमेंटला 'बेअरबोनचें पार्लमेंट' असें नांव मिळालें (१६५३). राजकारणाचा गंधही नसलेल्या या पार्लमेंटनें एक घटनापत्रक पास करून इंग्लंडचा कारभार त्या पत्रकाप्रमाणें चालावा असें ठरविलें. त्या घटनापत्रकांत खालील गोष्टी महत्त्वाच्या होत्या:—(१) क्रॉम्वेल हा इंग्लंडचा संरक्षक म्हणून मानण्यांत यावा. संरक्षकाच्या जागेची निवडणूक व्हावी व इंग्लंडची लष्करी व नाविक सत्ता त्याच्या हातीं असावी. (२) दर तीन वर्षांनीं पार्लमेंटची निवडणूक व्हावी व प्रत्येक वर्षी निदान पांच महिनेपर्यंत तरी पार्लमेंटची सभा चालावी. (३) या पार्लमेंटमध्यें इंग्लंडतर्फे चारशें, स्कॉटलंडतर्फें तीस व आयर्लंडतर्फें तीस असे एकंदर ४६० प्रतिनिधी असावेत. (४) पार्लमेंटनें पास केलेले कायदे संरक्षकानें रद्द करूं नयेत; पण वाटल्यास त्यान वटहुकूम काढावेत. (५) संरक्षकाच्या मदतीकरितां बावीस सभासदांचें एक मंडळ असावें. (६) ज्यांचें वार्षिक उत्पन्न दोनशें पौंड असेल अशा प्रॉटेस्टंटांसच पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं मतदानाचा अधिकार असावा. (७) कॅथॉलिक व एपिस्कोपेलियन यांशिवाय इतरांस धर्मस्वातंत्र्य असावें. (८) लष्कर, आरमार व सरकारी खातीं यांच्या खर्चाकरितां पार्लमेंटनें एक नगदी रक्कम पास करून ती संरक्षकाच्या स्वाधीन करावी. या घटनापत्रकानें इंग्लंडांत एक नवी राज्यघटना स्थापन केली; तिचें स्वरूप नियंत्रित राजसत्तेसारखेंच होतें. धर्मसहिष्णुतेचें एक पाऊल पुढें पडण्यास या पत्रकामुळें मदत झाली. परंतु त्यांतील दोष म्हणजे पार्लमेंट व संरक्षक यांच्यामधील मतभेद दूर करण्याचा मार्ग त्या घटनापत्रकांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हता व त्यामुळेंच ती पुढें रद्द झाली. या घटनेप्रमाणें क्रॉम्वेलनें आपली पार्लमेंट सभा सन १६५४ मध्यें बोलाविली; परंतु सुरुवातीपासूनच ती संरक्षकाच्या अधिकारावर जास्त जास्तच नियंत्रण घालूं लागल्यानें क्रॉम्वेलनें ती सभा पांच महिन्यानंतर रद्द केली.

८. **लष्करी अंमल** (१६५५) :—सन १६५५ मध्यें क्रॉम्वेलनें आपलें पहिलें पार्लमेंट रद्द केलें. त्याच सुमारास इंग्लंडांत अनेक प्रकारचे अत्याचार सुरू झाले व त्याच सालीं क्रॉम्वेलचा खून करण्याचा एक कटही उघडकीस आला. त्यामुळें आपली सत्ता लोकांस पसंत नाहीं असें क्रॉम्वेलला वाटलें. अर्थात् यापुढें आपण आपल्या लष्करावरच जास्त विसंबून राहिलें पाहिजे, हें जाणून त्यानें सर्व इंग्लंडचे निरनिराळे अकरा लष्करी विभाग पाडून प्रत्येकावर एकेक लष्करी सुभेदार नेमला. त्यांना आपल्या भागांत सर्व प्रकारचे अधिकार चालविण्यास मोकळीक देण्यांत आली. त्यांनीं लोकांवर अनेक जुलूम करण्यास सुरुवात केली. या लष्करी-सत्तेमुळें लोक इतके नाराज झाले कीं, क्रॉम्वेलचा खून व्हावा असें अनेकांस वाटलें व 'नको ती लोकशाही; त्यापेक्षां राजसत्ता पुष्कळ चांगली' असें लोकांस वाटूं लागलें. ही लष्करी सुभेदारी क्रॉम्वेलच्या अखेरीपर्यंत टिकली होती.

९. **क्रॉम्वेलचें धार्मिक धोरण** :—लष्करी सत्तेचा गोंधळ चालू असला तरी घटनापत्रकाप्रमाणें लोकांस धार्मिक स्वातंत्र्य देणें जरूर होतें. त्याप्रमाणें क्रॉम्वेलनें कॅथॉलिकांसहि त्यांच्या समजुतीप्रमाणें धार्मिक व्यवहार करण्याची मोकळीक दिली होती. ज्यूंनाही इंग्लंडांत राहण्याची व आपल्या समजुतीप्रमाणें धार्मिक स्वातंत्र्य उपभोगण्याची त्यानें परवानगी दिली. त्या काळाच्या मानानें पाहतां धार्मिक स्वातंत्र्याच्या बाबतींत तो बराच पुढें होता असें म्हणतां येईल. एपिस्कोपेलियनांना मात्र त्यानें धार्मिक स्वातंत्र्य दिलें नाहीं. त्यांना प्रार्थनापुस्तक वाचण्याची बंदी करण्यांत आली. त्याप्रमाणें वागण्याचें अनेकांनीं नाकारल्यामुळें अनेकांना देशत्याग करावा लागला. त्यांच्या जागा क्रॉम्वेलनें प्यूरिटनांना दिल्या. क्रॉम्वेल स्वतः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्यूरिटन पंथाचा अभिमानि असल्यानें त्यानें त्या पंथाला उचलून धरलें. प्यूरिटन पंथाला साधी व पवित्र राहणी आवडत असे. नाटकें, तमाशे, जुगार, मद्यपान, सर्व प्रकारचे खेळ, बैलांच्या टकरी, अस्वलांच्या झुंजी वगैरेसारखे करमणुकीचे प्रकार त्यास आवडत नसत. अर्थात् क्रॉम्वेलनें या सर्व प्रकारांस इंग्लंडमध्यें बंदी केली. यामुळें सर्व थिएटरें ओस पडलीं, ख्रिसमससारखे सण व वसंतदिनासारखे महोत्सवही बंद झाले. वरील करमणुकींच्या वेळीं अनेक लोक एकत्र येत व ते निरनिराळ्या प्रकारचे गुप्त कट रचीत. हें जाणूनही क्रॉम्वेलनें वरील प्रकार रद्द केले होते. आपल्या धार्मिक धोरणास अनुसरूनच निरनिराळ्या धर्ममंदिरांतील उत्तमोत्तम चित्रेंही त्यानें नष्ट केलीं. वरील सर्व प्रकारांमुळें देशांतील उत्साहाचें वारें नष्ट झालें, जो तो निराशावादानें झपाटला गेला, व क्रॉम्वेलच्या अप्रियतेंत भर पडली.

१०. क्रॉम्वेलचें परराष्ट्रीय धोरण :—त्याच्या परराष्ट्रीय धोरणाचीं तीन अंगें होतीं. युरोपांत प्रॉटेस्टंट पंथाचा प्रसार करून प्रॉटेस्टंट राष्ट्रांचा संघ निर्माण करणें, स्टुअर्ट घराण्यांतील लोकांस युरोपांत आश्रय मिळूं न देणें व इंग्लंडच्या आरमारी व लष्करी सामर्थ्यानें इंग्लंडचा दर्जा व दरारा वाढवून व वसाहती स्थापून साम्राज्यविस्तार करणें. खरें पाहतां त्याचा पहिला हेतु फसला व बाकी दोन्ही थोड्या फार फरकानें यशस्वी झाले असें म्हणतां येईल. डच लोकांशीं युद्ध करून त्यानें इंग्लंडचा आरमारी दर्जा सिद्ध केला व आपल्या देशाला समुद्रावरील वर्चस्व प्राप्त करून दिलें. परंतु त्याच वर्षी (१६५४) डचांशीं तह केल्यावर त्याला आणखी एका युद्धांत भाग घेणें भाग पडलें. त्या वेळीं फ्रान्स व स्पेन हीं दोन राष्ट्रें इंग्लंडच्या मदतीची याचना करीत होतीं. त्यांपैकीं स्पेनशीं क्रॉम्वेलला मैत्री नको होती. म्हणून त्यानें सन १६५५ मध्यें फ्रान्सशीं सलोख्याचा तह करून स्पेनशीं युद्ध सुरू केलें. विल्यम पेननें सन १६५५ मध्यें वेस्ट इंडीज बेटांवर हल्ला करून जमेका नांवाचें बेट काबीज केलें. सन १६५७ मध्यें दर्यासारंग ब्लेकनें केडीज व सांताक्रूझ बेटांवर हल्ला चढवून स्पॅनिशांचा पराभव केला. तसेंच १६५८ मध्यें इंग्लिशांनीं डंकर्क बंदरही काबीज करून घेतलें. हॉलंडमधील स्पॅनिशांच्या ताब्यांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तें एक महत्त्वाचें बंदर असल्यानें इंग्लिशांचा व्यापार वाढण्यास त्यामुळें मदतच झाली.

११. क्रॉम्वेलची अखेर:—सर्वत्र लष्करी अंमल चालू असतांच क्रॉम्वेलनें सन १६५६ मध्यें आपली दुसरी पार्लमेंटसभा बोलाविली. त्यामुळें सुभेदारपद्धति तात्पुरती रद्द करण्यांत आली होती. या पार्लमेंटनें अत्यंत नम्रपणानें सन १६५७ सालीं एका अर्जानें खालील गोष्टी क्रॉम्वेलला सुचविल्या. (१) क्रॉम्वेलनें राजपद स्वीकारावें. (२) चाळीस ते सत्तर सभासदांचें उमरावमंडळ क्रॉम्वेलनें नेमावें. (३) कॅथॉलिक व एपिस्कोपेलियनांशिवाय इतरांस धार्मिक स्वातंत्र्य देण्यांत यावें. (४) क्रॉम्वेलनें आपला वारस नेमावा. घटनापत्रकांतील दोष निवारण्याकरितांच वरील प्रकारचा विनंतीवजा ठराव पार्लमेंटनें पास केला होता. आपल्या मागून आपला मुलगा रिचर्ड याला संरक्षक नेमावें असें क्राम्वेलनें ठरवून दिलें. मात्र आपण राजपद स्वीकारलें तर तें आपल्या लष्करास पसंत पडणार नाहीं असें वाटल्यावरून क्रॉम्वेलनें तें पद नाकारलें. पुढें सन १६५८ मध्यें त्यानें पार्लमेंटच्या दोन्ही सभांच्या सभासदांस निमंत्रण दिलें. पण उमरावमंडळांतील पूर्वीच्या सभासदांनीं त्याचें निमंत्रण न स्वीकारल्यानें त्यानें त्यांच्या जागीं प्यूरिटनांस नेमलें. पार्लमेंटच्या कामास सुरुवात होतांच त्या सभेनें उमरावमंडळाच्या अधिकाराबद्दल व त्याच्या धोरणाबद्दलही टीका करण्यास सुरुवात केली. तेव्हां त्यानें ती सभा रद्द केली. यानंतर थोड्याच दिवसांनीं क्रॉम्वेल सन १६५८ मध्यें मृत्यु पावला. त्याचे शेवटचे दिवस अत्यंत निराशेंत गेले. त्याच्या वधाची त्याला एकसारखी भीति वाटत असल्यानें तो दररोज चिलखत घालून वावरत असे व दररोज निरनिराळ्या खोलींत निजे. आपला कारभार लोकांस आवडत नाहीं हें त्याला माहीत होतें. कांहीं लोक त्याला देशद्रोही समजतात; तर कांहीं त्याला मोठा देशभक्त समजतात. असें असलें तरी तो एक महान् मुत्सद्दी व थोर सेनापति होता यांत शंका नाहीं. राज्यकारभाराचे बाबतींत त्यानें निरनिराळे प्रयत्न केले व ते सर्व फसले हें खरें; पण त्यानें उत्कृष्ट लष्कर तयार करून त्याच्या व आरमाराच्या मदतीनें त्यानें इंग्लंडची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढविली यांत शंका नाहीं. करारी,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाणेदार व पापभीरू असा क्रॉम्वेल व्यवहारज्ञानी होता. त्याच्या धैर्याला कुशलतेची व युक्तीची जोड मिळाल्यानेंच त्याला थोडें फार यश मिळवितां आलें. त्याच्या ठिकाणीं दुसरा एखादा असता तर त्याला तें त्या वेळच्या परिस्थितींत प्राप्त करून घेतां आलें असतें कीं काय हा मोठा बिकट प्रश्न आहे.

१२. रिचर्ड क्रॉम्वेल (१६५८-५९):—ऑलिव्हर क्रॉम्वेलनंतर त्याचा मुलगा रिचर्ड संरक्षक झाला. तो अत्यंत नेकीचा, धार्मिक वृत्तीचा, सुशील व थोडा आळशी होता. तो एक साधा गडी असल्यानें त्याचें राजकारणाकडे लक्षच नव्हतें. तो कसलेला सेनानायक नसल्यानें क्रॉम्वेलच्या लष्करास तो आवडत नसे. संरक्षक बनल्यावर त्यानें पार्लमेंटची सभा बोलाविली; परंतु त्याचें व पार्लमेंटचें पटलें नाहीं. अशा स्थितींत त्यानें पार्लमेंट रद्द केलें व संरक्षकाच्या जागेचाही राजीनामा दिला (१६५९). पुढें त्यानें खाजगी आयुष्यक्रम पत्करून आपली वतनवाडी सांभाळण्याकडेच सर्व लक्ष दिलें. संरक्षकानें राजीनामा दिल्यावर पुन्हां गोंधळ सुरू झाला. लष्करांतील एक अधिकारी लँबर्ट यानें सर्व सत्ता आपल्या हातांत यावी म्हणून प्रयत्नांस सुरुवात केली.



रिचर्ड क्रॉम्वेलचें पदक

याच सुमारास ऑलिव्हर क्रॉम्वेलनें रद्द केलेली रंप पार्लमेंट पुन्हां बोलाविण्यांत आली होती. ती लँबर्टनें रद्द केली. अशा स्थितींतच स्कॉटलंडांत क्रॉम्वेलनें नेमलेला गव्हर्नर जनरल मंक इंग्लंडांत आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पार्लमेंटच्या हक्कांचें संरक्षण करणें जरूरीचें आहे असें वाटल्यावरून त्यानें लंडनवर चाल केली व १६६० मध्यें लंडनमध्यें प्रवेश केला. त्याबरोबर त्यानें पार्लमेंट बोलावली. ही सभा राजानें बोलवावयाची असते; ती मंकनें बोलावल्यामुळें तिला 'अनधिकारी पार्लमेंट' असें म्हणतात. या पार्लमेंटनें चार्ल्सला इंग्लंडचें राजपद देण्यास आपली मान्यता दिली व चार्ल्सचा जाहीरनामा त्याच सभेंत वाचून दाखविण्यांत आला. तो मान्य झाल्यावर चार्ल्स इंग्लंडमध्यें सन १६६० त आला व अशा रीतीनें अकरा वर्षांनंतर इंग्लंडांत पुन्हां राजसत्ता सुरू झाली.

सेनापति मंक

१३. प्यूरिटन अंमलाची फलश्रुति :—चार्ल्सच्या वधानंतर सुमारें दहा वर्षें क्रॉम्वेलच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडांत प्यूरिटन लोकांचा अंमल गाजला. त्यांनीं राजसत्ता नष्ट करून लोकशाही स्थापन केली ही गोष्ट खरी; परंतु ती खऱ्या स्वरूपांत मुळींच नव्हती. खरी सत्ता क्रॉम्वेल व त्याचें लष्कर यांच्याच हातीं असल्यानें इंग्लंडवर लष्करी अंमल सुरू होता व आपण लष्करी अंमलाखालीं चिरडले जात आहोंत अशी प्रत्येकाची समजूत होती. बहुजन समाजाचा त्याला मुळींच पाठिंबा नव्हता. यामुळेंच लोकशाहीच्या मूलगामी तत्त्वांसच मूठमाती देण्यांत आली असें म्हणतां येईल. प्यूरिटन अत्यंत कोत्या बुद्धीचे होते व धार्मिक बाबतींत ते हटवादी व दुराग्रही असल्यानें, त्यांनीं आपल्या पंथाच्या प्रसाराकडेच लक्ष देऊन अनेक प्रकारचे कायदे केले व इतर पंथीयांचा थोड्या फार फरकानें छळ केला. लोकांचे साधे धार्मिक आचारविचार, त्यांचे खेळ, त्यांच्या करमणुकींचीं साधनें वगैरे संबंधींही कडक कायदे करण्यांत आले हें अनेकांस रुचलें नाहीं व त्यामुळें बहुजन समाज प्यूरिटनांचा द्वेष करूं लागला. बरें, प्यूरिटन अधिकाऱ्यांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्तन तरी ठीक असावयाचें ? ते सर्व स्वार्थी, भांडखोर व हेकेखोर असल्यामुळें आपापसांतील वैमनस्याचें खापर ते इतरांवर फोडीत; त्यामुळेंही लोक त्यांस पाण्यांत पहात. तशांतच पहिल्या चार्ल्सचा अत्यंत अमानुषपणें प्यूरिटनांनीं खून केला असें सर्वांचें मत झालें असल्यानें प्यूरिटनांबद्दल प्रत्येक जण मनांतल्या मनांत चरफडत असे व राजसत्ता इंग्लंडांत पुन्हां असावी असें त्यांस मनापासून वाटूं लागलें. बहुसंख्यांक इंग्रजांची अशा प्रकारची मनःप्रवृत्ति असल्यामुळेंच त्यांनीं दुसऱ्या चार्ल्सचें इंग्लंडमध्यें मनापासून स्वागत केलें.

अभ्यास

१. ऑलिव्हर क्रॉम्वेलचें चरित्र थोडक्यांत सांगा.

२. राज्यकारभारासंबंधीं क्रॉम्वेलनें जे प्रयोग केले ते वर्णा. ते कां फसले ?

३. खालीलसंबंधीं माहिती सांगा :—
(अ) घटनापत्रक, (आ) संतांचें राज्य, (इ) बेअरबोनचें पार्लमेंट, (ई) लष्करी सुभेदारीपद्धति, (उ) अभेद्य पलटणी व आदर्श लष्कर, (ऊ) रंपची हकालपट्टी.

४. लोकशाहीला विरोध होण्याचीं कारणें द्या. तिला कोणीं कोणीं विरोध केला ? त्याचा परिणाम काय झाला ?

५. आयर्लंड, स्कॉटलंड व हॉलंड यांच्याशीं युद्धें कां झालीं ? त्यांचा परिणाम काय झाला ?

६. प्यूरिटन अंमलाला लोक कां कंटाळले ? सोदाहरण स्पष्ट करा.

७. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
ऑर्मंडचा ड्यूक, ड्राघेडा, डनबार, अंबोयना, ट्रॉप, बेअरबोन, ब्लेक, पेन, लँबर्ट, मंक, रिचर्ड क्रॉम्वेल.

८. क्रॉम्वेल क्रूर होता काय ? कशावरून ? त्यानें राजपद कां नाकारिलें ? पार्लमेंटचा त्याच्यावरील विश्वास कां उडाला ? त्याचे शेवटचे दिवस कष्टाचे व निराशेचे कां गेले ? त्याच्या कार्याची माहती सांगा.

९. क्रॉम्वेलच्या कारकीर्दीचा कालादर्श तयार करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उतारा

१. नौकानिर्बंधाचा कायदा—१६५१

परमेश्वरी कृपेनें या राष्ट्राचें संरक्षण व कल्याण ज्यामुळें आजवर झालें त्या वाहतुकीच्या व्यापाराला व समुद्रपर्यटनाला उत्तेजन मिळावें म्हणून सध्यां भरलेली पार्लमेंटसभा असा कायदा करते कीं, ता. १ डिसेंबर, १६५१ पासून पुढें आशिया, आफ्रिका, अमेरिका अगर त्यांच्या मालकीच्या अगर त्यांच्या लगतच्या भूभागांतून कोणत्याही प्रकारचा माल—कच्चा अगर पक्का—इंग्लंडमध्यें अगर आयर्लंडमध्यें अगर इंग्लंडच्या ताब्यांतील जगांतील कोणत्याही भागामध्यें आयात करणें झाल्यास, तो इतर कोणत्याही राष्ट्राच्या जहाजांतून आयात न करतां इंग्लिश जहाजांतूनच आयात केला पाहिजे. या बाबतींत सर्व व्यवहार सचोटीनें व्हावा व त्यांत लबाडी होऊं नये. याशिवाय असेंही फर्माविण्यांत येतें कीं, वरील प्रकारच्या जहाजावरील मुख्य तांडेल, नाखवे, नावाडी वगैरे लोकही इंग्लिशच असावेत. याप्रमाणें जर कोणी वागणार नाहीं, तर तें जहाज त्यावरील मालासह व इतर सामानासुमानांसह जप्त करण्यांत येईल. जर कोणी या कायद्याविरुद्ध लबाडीनें व्यापार करणारें जहाज पकडील तर त्या जहाजावरील मालाचा निम्मा भाग सरकारजमा होऊन निम्मा भाग तें जहाज पकडणारास देण्यांत येईल. युरोपियन राष्ट्रांना आपापला माल आपापल्या जहाजांतून इंग्लंडला पाठविण्यास हरकत नाहीं.

प्रश्न :—१. वरील कायदा करण्याचें कारण काय? त्या कायद्यानें इतरांवर कोणते निर्बंध घातले? ते उल्लंघणारांस कोणतें शासन ठेवण्यांत आलें होतें?

२. युरोपियनांना कोणती सवलत होती? कां म्हणून?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. इंग्लंडांत पुन्हां राजसत्ता—दुसरा चार्ल्स

१. चार्ल्सचें स्वागत व राज्याभिषेक :—रिचर्ड क्रॉम्वेलनें राजीनामा दिल्यावर इंग्लंडमध्यें एकच गोंधळ माजला व सेनापति मंक याच्या हातीं सर्व कारभार आला. मंकचा ओढा राजसत्तेकडे होता; व तो सर्वसत्ताधारी झाल्यावर दुसऱ्या चार्ल्सला पुन्हां गादी द्यावी असें त्याला वाटूं लागलें. त्याप्रमाणें त्यानें हॉलंडमध्यें असलेल्या दुसऱ्या चार्ल्सला इंग्लंडची गादी देऊं केली व त्याच्यावर कांहीं अटी लादल्या. क्रॉम्वेलच्या लष्करांतील सैनिकांस माफी देणें, प्रस्थापित धर्मपंथास मान्यता देणें व पार्लमेंटच्या संमतीनें राज्यकारभार चालविणें वगैरे त्याच्या अटी होत्या. हॉलंडमधील



दुसऱ्या चार्ल्सचें राज्यारोहण पदक

ब्रेडा या ठिकाणाहून एक जाहीरनामा काढून, चार्ल्सनें त्या अटींस आपली मान्यता दिली (१६६०). ता. २९ मे, १६६० हा राजाच्या तिसाव्या वाढदिवसाचा दिवस होता. त्याच्या अगोदरच चार दिवस तो डोव्हर येथें उतरला. तेथें राजदर्शनाकरितां झुंडीच्या झुंडी लोटल्या होत्या. लोकांनीं गुढ्या उभारल्या, घरें शृंगारलीं, आनंददर्शक घंटा वाजविल्या, सलामी दिली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व राजाची अपूर्व थाटांत मिरवणूक काढून त्याचें स्वागत केलें. त्यानंतर चार्ल्सनें २९ 'मे'ला लंडनमध्यें प्रवेश केला. जिकडे तिकडे नुसता आनंदी-आनंद पसरला होता! मात्र क्रॉम्वेलच्या लष्करानें या सत्कारसमारंभांत कोणताही भाग घेतला नाहीं, कीं आनंद दर्शविला नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यांच्या समोरून राजाची मिरवणूक जात असतां त्यांनीं त्याला सलामही केला नाहीं! आपल्या अपूर्व स्वागतामुळें चार्ल्सला अपरिमित आनंद झाला. ताबडतोब त्याला राज्याभिषेक करण्यांत आला. गेलीं अकरा वर्षें त्यानें हालांत काढलीं व आतां राजपद मिळाल्यानें आपल्या हालांचें सार्थक झालें असें त्यास वाटलें. मिळालेलें राज्य घालवून पुन्हां वनवास पत्करण्याची त्याची तयारी नव्हती. त्याला राजसत्ता मिळाली खरी; परंतु ती मर्यादित होती व मिळाली ती केवळ ईश्वरदत्त किंवा आनुवंशिक वारशानेंच नसून पार्लमेंटच्या पसंतीनें, हें कधींही विसरून चालणार नाहीं.

२. दुसरा चार्ल्स (१६६०-१६८५)–स्वभाव व धोरण:—दुसऱ्या चार्ल्सचा सन १६३० मध्यें जन्म झाला. दहा वर्षांचा असतांच एका यःकश्चित प्रार्थना-पुस्तकाकरितां आपला बाप स्कॉटिशांशीं लढत आहे असें ऐकून तो एकसारखा रडूं लागला. त्यास विचारतां तो म्हणाला, 'बाबा, तुमच्या वडिलांनीं तुम्हाला चार देशांचें राज्य ठेवलें. तुम्ही माझ्याकरितां एखाद्या देशाचें तरी राज्य ठेवाल का?' आणि त्याचें म्हणणें सार्थ झालें; त्याच्या बापाचा वध झाल्यानंतर राजपदाऐवजीं त्याला दहा वर्षें वनवास घडला! राज्यप्राप्तीमुळें मात्र त्याला खरा आनंद झाला. तो देखणा नसला तरी मोठा रूबाबदार दिसे. तो भरपूर उंच, चलाख व आनंदी वृत्तीचा असून, त्याचें भाषण मोठें विनोदप्रचुर असे. आळस त्याच्या पांचवीला पूजिलेला असे. चंडोलवृत्तीनें रहावें, मजेंत व ख्यालीखुशालींत रमावें अशी त्याची वृत्ती होती.

दुसरा चार्ल्स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सट्टेबाजी व दारूबाजी यांचा तो उपासक होता. नीति, अनीति यांचा विचार करावयास त्याला वेळच नसे. यामुळें बाहेरख्यालीपणांतही तो रंगलेला दिसे. लोकांच्या म्हणण्याची त्यानें कधींच पर्वा केली नाहीं. या ना त्या मार्गानें पैसा मिळवावा, व तो केवळ चैनींत फस्त करावा यांतच त्याचा आनंद सामावलेला असे. यामुळेंच त्याला 'रंगेल राजा' असें लोक म्हणत. 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें त्याच्या रंगेल मार्गाचा अवलंब करून गेल्या अकरा वर्षांतील साडेसातीवर लोकांनीं सूड उगवून घेतला! एरवीं सर्व स्टुअर्ट राजांत तो सर्वांत मोठा व कर्तृत्ववान राजा होऊन गेला. निरनिराळ्या प्रकारच्या अनुभवानें त्याला मनुष्यस्वभावाचें उत्तम ज्ञान प्राप्त झालें होतें. मोठा धूर्त, व कावेबाज पण स्वार्थसाधु असल्यानें त्यानें राज्यकारभार अत्यंत दक्षतेनें हांकला. त्यानें स्वतः असा राज्यकारभार हांकलाच नाहीं. सर्व व्यवहार आपल्या प्रधानांच्या हातून करवून घेऊन आपण नामानिराळे राहण्याची कला त्याला उत्तमप्रकारें साधली होती. यामुळेंच कारभाराच्या मुख्य धोरणाची गुरुकिल्ली आपल्या हातीं ठेवून त्यानें फालतू गोष्टी आपल्या प्रधानांकडे सोंपविल्या. यामुळें सर्व चुकांचें खापर त्याच्या माथीं न फुटतां तें त्याच्या प्रधानांच्या फुटलें. अनियंत्रित राजसत्ता तर उपभोगावयाची पण पार्लमेंटला मात्र दुखवावयाचें नाहीं, अशा धोरणानेंच त्यानें सर्व राज्यकारभार केला. तो तत्त्वनिष्ठ नव्हता. अनेक प्रकारचीं वचनें देऊन तीं मोडण्यासही तो कधीं कचरला नाहीं. मोठें मिष्टास व अघळपघळ बोले, वेळेनुसार दाखवूं नये इतकी कोणावरही तो दया दाखवी व त्यास मोठ्या ममतेनें वागवी; परंतु तो नुसता देखावा! त्याच्या खोल अंतःकरणाचा कोणासही कधींच पत्ता लागला नाहीं. त्यामुळेंच तो कधीं कॅथॉलिकांस जवळ करी, तर कधीं एपिस्कोपेलियनांबद्दल ममत्व दाखवी. यामुळें त्याचा खरा कल कोणत्या पंथाकडे आहे हें कोणासच कळलें नाहीं. त्याचा मामेभाऊ व फ्रान्सचा राजा चौदावा लुई याच्याकडून, अनेक प्रकारचीं वचनें देऊन व थापा मारून, त्यानें अनेक वेळां पैसा मिळविला; व त्यालाही अनेक वेळां चकविलें. लोकमताला पाठ न देतां त्याचा आपल्या फायद्याकडे उपयोग कसा करून घ्यावा हें त्याला उत्तम माहीत होतें. एकंदरींत पाहतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो मोठा भाग्यशाली होता. इंग्लंडला राजा हवा होता; मग तो कसाही असला तरी इंग्रजांस चालता. ही खूणगांठ मारूनच चार्ल्सनें मोठ्या धोरणानें राज्यकारभार हांकून वाहवा मिळविली !

३. अनधिकारी पार्लमेंटची कामगिरी :—मंकनें बोलाविलेल्या पार्लमेंटनेंच दुसऱ्या चार्ल्सला आग्रहाचें निमंत्रण देऊन इंग्लंडांत बोलाविलें व त्याला राज्याभिषेक केला. आपली कृतज्ञता दाखवून राजानेंही मंकनें बोलाविलेली अनधिकारी पार्लमेंट रद्द केली नाहीं. त्या पार्लमेंटनें अनेक गोष्टी केल्या. (१) प्रथमतः पहिल्या चार्ल्सच्याविरुद्ध ज्यांनीं ज्यांनीं शस्त्र उपसलें व त्याच्याशीं युद्ध केलें त्या सर्वांस माफी देणारा 'माफीचा कायदा' करण्यांत आला. मात्र ज्यांनीं चार्ल्सच्या फाशीं पत्रकावर सह्या केल्या होत्या व त्यास फाशीं देण्याच्या कामीं ज्यांनीं पुढाकार घेतला त्यांस ही माफी मिळाली नाहीं. क्रॉम्वेल सही करणारांत होता; परंतु तो सर्व प्रकारच्या शिक्षेच्या अतीत होता ! तेव्हां त्याचें व चार्ल्सला फाशींची सजा देणारा न्यायाधीश ब्रॅडशॉ यांचीं शवें वेस्ट मिन्स्टर ॲबेमधून उकरून काढण्यांत येऊन त्यांस फाशीं देण्यांत आलें ! एवढेंच नव्हे, तर त्यांचीं शरीरें बरेच दिवस फांसावर लटकत ठेवण्यांत आलीं !! या भीषण कृत्यानें लोकांच्या मनाला चरका बसला. सुमारें २५ लोकांस फांशीच्या शिक्षा सुनावण्यांत आल्या व त्यांपैकीं फक्त तेरांसच फाशीं देण्यांत येऊन बाकीच्यांस तुरुंगांत टाकण्यांत आलें. (२) यानंतर राजाच्या उत्पन्नासंबंधीं पार्लमेंटनें व्यवस्था केली. जेम्स व पहिला चार्ल्स यांना पैशाची नेहमीं टंचाई असे. तेव्हां पैशाची तरतूद मुख्य होती. दुसऱ्या चार्ल्सला पार्लमेंटनें १२,००,००० पौंड वार्षिक तनखा देण्याचें मान्य केलें. टनेज व पौंडेज, राजाच्या जमिनीचें उत्पन्न व अबकारी जकात या सर्वांपासून येणारें उत्पन्न राजानें घ्यावें असें ठरविण्यांत आलें. सरंजामी सरदारांकडून राजाला मिळणारें उत्पन्न रद्द झालें होतें. तें तसेंच रद्द समजावें असें ठरलें. वरील प्रकारांनीं राजास उत्पन्न कमी पडूं लागल्यानें त्यानें अनेक अन्याय्य प्रकारांनीं आपल्या उत्पन्नांत भर घातली. (३) क्रॉम्वेलच्या लष्कराची आतां जरुरी नसल्यानें त्या सैन्यास रजा देण्यांत आली. मात्र दीर्घ पार्लमेंटनें त्या सैन्याचा पगार नाकारला होता, तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्व देण्यांत आला. राजाच्या शरीरसंरक्षणाकरितां पांच हजार घोडेस्वारांची एक तुकडी मात्र ठेवण्यांत आली. या उपक्रमामुळेंच खडें सैन्य ठेवण्यास सुरुवात झाली. (४) धार्मिक व इतर बाबतींत लोकशाहीच्या वेळीं पास झालेले बहुतेक सर्व कायदे रद्द करण्यांत आले. नौकानिर्बंधाचा कायदा पुन्हां पास करण्यांत आला (१६६०). त्या काळांत ज्या जमिनी मूळ मालकांच्या संमतीनें विकल्या गेल्या होत्या, त्या कायम ठेवण्यांत आल्या. तसेंच लोकशाही सरकारनें अनेकांच्या जमिनी जप्त केल्या होत्या, शिवाय अनेकांनीं आपल्या जमिनी विकून पहिल्या चार्ल्सला पैशाची मदत केली होती. वरील प्रकारांनीं गेलेल्या जमिनी मालकांस परत देऊं नयेत; फक्त राजाच्या खासगी जमिनी व धर्मपीठांच्या जमिनी परत द्याव्यात असें ठरलें. (५) लोकशाहीच्या काळांत धार्मिक बाबतींत हात घालून अनेक पाद्र्यांस हांकून देण्यांत येऊन त्यांच्या जागीं प्यूरिटनांस नेमण्यांत आलें होतें. तेव्हां पूर्वीच्या पाद्र्यांस त्यांच्या वृत्ती पुन्हां द्याव्या असें ठरलें. तसेंच एपिस्कोपेलियन पंथास मान्यता देण्यांत आली. वरील सर्व प्रकारची कामगिरी केल्यावर राजानें ही अनधिकारी पार्लमेंटसभा बरखास्त केली (१६६०). या पार्लमेंटमध्यें रंप पार्लमेंटचे बहुतेक सर्व सभासद बोलावण्यांत आले होते. रंप पार्लमेंट दीर्घ पार्लमेंटचाच अवशिष्ट भाग होता. अर्थात् दीर्घ पार्लमेंट या वेळींच बरखास्त झाली असें मानण्यांत येतें. इतकें झाल्यावर राजानें आपले सल्लागार नेमले. त्याच्या वनवासांतही त्याच्या बरोबर राहून चार्ल्सला हरएक प्रकारची मदत करणारा हाईड याला, क्लॅरेंडनचा ड्यूक करण्यांत येऊन त्याला मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें देण्यांत आलीं; व राजाचा भाऊ, यॉर्कचा ड्यूक, हा आरमाराचा मुख्य झाला.

क्लॅरेंडन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. कॅव्हेलियर पार्लमेंटची कामगिरी (१६६०-७१) :—क्लॅरेंडन दीर्घ पार्लमेंटचा सभासद होता; परंतु त्या पार्लमेंटनें ज्या वेळीं जहाल धोरण स्वीकारलें त्यावेळीं तो पार्लमेंटपक्षांतून फुटून राजपक्षास मिळाला होता. दुसऱ्या चार्ल्सबरोबर वनवासांत दिवस काढून त्यानें त्याची उत्तम-प्रकारें सेवा केली होती. लंडनला परत आल्यावर राजानें त्याच्यावर विश्वास टाकून प्रत्येक बाबतींत त्याचा सल्ला घेतला व त्याला मुख्य प्रधान नेमलें. अनधिकारी पार्लमेंटच्या कारभाराच्या वेळीं त्यानें बहुमोल कामगिरी केली होती; परंतु त्या पार्लमेंटनें धार्मिक बाबतींत विशेष असे कायदे केले नसल्यानें तें काम तसेंच रेंगाळत राहिलें होतें. ती पार्लमेंट बरखास्त झाल्यावर राजानें क्लॅरेंडनच्या सल्ल्यानें पहिली पार्लमेंट-सभा बोलाविली. ती ‘ कॅव्हेलियर पार्लमेंट ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. ही सभा राजपक्षीय असल्यानें तिनें क्लॅरेंडनच्या म्हणण्याप्रमाणें धार्मिक बाबतींत अनेक कायदे केले. याच वेळीं पार्लमेंटच्या सभासदांस अनेक प्रकारची लांच देण्याचा अनिष्ट उपक्रम राजानें अगदीं प्रथमच सुरू केला. त्यामुळें त्या पार्लमेंटला ‘ पेन्शन-पार्लमेंट ’ असेंही म्हणतात (१६६१). या पार्लमेंटनें प्रथमतः राजाविरुद्ध लढाई करणें अन्याय्य होय असें ठरवून, लष्कर व आरमार यांचा मुख्य अधिकार राजाच्या हातीं दिला. यानंतर धार्मिक बाबतींत सुधारणा करण्याचें ठरवून या पार्लमेंटनें क्लॅरेंडनच्या सल्ल्यानें अनेक कायदे पास केले. त्यांना ‘ क्लॅरेंडनचें कोड ’ असें म्हणतात.

५. क्लॅरेंडनचें कोड :—त्यापूर्वींच राजानें ‘ सव्हॉय ’ राजवाड्यांत सन १६६१ मध्यें एक धर्मपरिषद बोलावून धार्मिक गोष्टींचा निर्णय लावण्याची कामगिरी तीवर सोंपविली होती. परंतु त्या सभेंत प्यूरिटन व प्रेसबिटेरियन यांच्यामध्यें मतभेद झाल्यानें, त्या सभेनें कांहींच निर्णायक मत दिलेलें नव्हतें. तेव्हां धार्मिक व्यवस्था करण्याची कामगिरी कॅव्हेलियर पार्लमेंटकडे आली. सन १६६१ सालीं ‘ कॉर्पोरेशन अॅक्ट ’ पास करण्यांत आला. त्या कायद्यानें म्युनिसिपालिट्यांच्या व तत्सम इतर स्थानिक संस्थांच्या अधिकाऱ्यांनीं प्रस्थापित धर्माप्रमाणें शपथ घेतली पाहिजे असें ठरविलें. सन १६६२ मध्यें ‘एकरूपतेचा कायदा’ पास करण्यांत येऊन प्रार्थनेच्या वेळीं सर्वांनीं प्रार्थना-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तकाचा उपयोग करावा असें ठरविलें. हा कायदा पास झाल्यानें सुमारें दोन हजार पाद्र्यांनीं आपल्या वृत्ती सोडल्या व त्यांच्या जागीं नवे पाद्री नेमण्यांत आले. पुढें सन १६६४ मध्यें 'गुप्त सभाबंदीचा कायदा' पास झाला. ज्यांनीं आपल्या वृत्ती सोडल्या ते सर्व पाद्री गुप्त जागीं जमून धर्मोपदेश करीत. तेव्हां या नव्या कायद्यानें अशा गुप्त रीतीनें धर्मोपदेश करणारांस व तो ऐकणारांस कडक शिक्षा ठेवण्यांत आल्या. यामुळें अनेकांना शिक्षा झाल्या. पुढें सन १६६५ मध्यें 'पंचक्रोशीचा कायदा' पास करण्यांत येऊन प्रस्थापित धर्माची ज्यांनीं शपथ घेतली आहे अशांनींच म्युनिसिपालिटीच्या पंचक्रोशींतील शाळांतून शिकवावें, व त्यांनींच त्या हद्दींत जावें असें ठरविण्यांत आलें. वरील सर्व कायद्यांस 'क्लॅरेंडनचें कोड' असें म्हणतात.

६. **'क्लॅरेंडन कोडा'चा परिणाम :**—कॅव्हेलियर पार्लमेंटमधील लोक राजपक्षीय व राजाकडून मिळालेली लांच खाणारे असल्यानें त्यांनीं क्लॅरेंडनचे सर्व कायदे बिनबोभाट पास केले. राजसत्ता व धर्म यांचें संरक्षण करणें हा क्लॅरेंडनचा मुख्य उद्देश होता. त्याकरितां राजसत्ता व धर्मपीठ यांचें ऐक्य साधणें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें श्रेयस्कर होय, असें त्याचें मत होतें. परंतु हें ऐक्य राष्ट्रांतील निरनिराळ्या पंथांच्या लोकांच्या ऐक्यावर अवलंबून राहणार. अर्थात् या लोकांचें ऐक्य साधावयाचें म्हणजे धार्मिक पायावरच त्यांची एकजूट झाली पाहिजे. क्लॅरेंडनची अशी विचारसरणी असल्यामुळें त्यानें एपिस्कोपेलियन पंथाला उचलून धरून प्यूरिटन, कॅथॉलिक वगैरे पंथांची मुस्कटदाबी करण्याचा घाट घातला. त्याचा अंतिम हेतु चांगला असला तरी तो सफळ करण्याकरितां त्यानें ज्या मार्गाचा अवलंब केला ते मार्ग मात्र योग्य ठरले नाहींत. त्यांतल्या त्यांतही प्यूरिटन पंथाचीं पाळेंमुळें खणून काढण्याचा त्याचा विचार होता. कोडांतील कायद्याप्रमाणें न वागणारांस दंड, तुरुंग, हद्दपारी, जन्मठेप वगैरे अनेक प्रकारच्या कडक शिक्षा ठेवण्यांत आल्या व त्यांची अंमलबजावणीही अत्यंत तीव्रतेनें करण्यांत येई. त्यामुळें इंग्लंडमध्यें क्वेकर्स, नॉन्कन्फॉर्मिस्टस्, डिसेंटर्स वगैरे अनेक पंथांतील लोकांनीं वरील कायदे मोडून अनेक प्रकारच्या शिक्षा भोगल्या; पण आपलीं परमप्रिय धर्मतत्त्वें सोडलीं नाहींत. अत्यंत छळ झाल्यामुळें अने-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांनीं देशत्यागही केला. जॉन बन्यननें प्रस्थापित पंथप्रमाणें धर्मोपदेश करण्याचें नाकारल्यामुळें त्याला बारा वर्षें तुरुंगांत काढावीं लागलीं. तेथेंच त्यानें ‘ प्रगतिपथावरील यात्रेकरू ’ हा आपला जगप्रसिद्ध ग्रंथ लिहून तयार केला. त्याच्याप्रमाणेंच शेक्सपियरच्या खालोखाल ज्याला उत्तम कवि म्हणून मानतात त्या मिल्टन कवीसही छळास बळी पडावें लागलें. अशा तऱ्हेनें क्लॅरेंडनकोडामुळें धार्मिक एकीच्या गोंडस नांवाखालीं देशांत प्रथम गोंधळ व मग असंतोष माजला व क्लॅरेंडन व राजा यांच्याबद्दल लोकांचीं मनें कलुषित झालीं.

७. स्कॉटलंड व आयर्लंडमधील व्यवस्था :— इंग्लंडमध्यें वरील-प्रमाणें धार्मिक व्यवस्था चालू असतांच कॅव्हेलियर पार्लमेंटला स्कॉटलंड व आयर्लंड या देशांतही लक्ष द्यावें लागलें. सन १६६१ मध्यें एक कायदा पास करण्यांत येऊन स्कॉटलंडमध्यें सन १६३३ ते १६६० पर्यंत जे जे धार्मिक कायदे करण्यांत आले ते रद्द करण्यांत येऊन एपिस्कोपेलियन पंथ सुरू करण्यांत आला. लॉडनें लादलेलें प्रार्थनापुस्तक रद्द करण्यांत आलें व सर्व धर्मसंस्थांवर बिशपांची नेमणूक करण्यांत आली. यामुळें प्रेसबिटेरियन पंथाच्या लोकांचीं मनें बिथरलीं व त्यांचा छळ होऊं लागला. त्यांचा पुढारी अर्गाइलचा ड्यूक होता; त्याला पकडण्यांत येऊन राजद्रोहाच्या नांवाखालीं फाशीं देण्यांत आलें. वरील गोष्टींमुळें स्कॉटलंडला राजकीय स्वातंत्र्याचा लाभ झाला तरी धार्मिक स्वातंत्र्य नष्ट झाल्यानें स्कॉटिश लोक असंतुष्ट झाले. तसेंच इंग्लंड व स्कॉटलंड यांच्या एकीकरणाचा प्रश्न मागें पडून व्यापारी दृष्टीनें स्कॉटलंडचें नुकसान होऊं लागलें. आयर्लंडमध्यें राज-पक्षीयांचा जोर असल्यामुळें आपल्या जप्त जमिनी आपल्याला परत मिळतील असें त्यांस वाटत होतें. परंतु तसें केल्यास ज्या प्रॉटेस्टंटांस आयर्लंडांतील जमिनी मिळाल्या होत्या ते बेकार होऊन कदाचित् बंडही करतील असें वाटत होतें. त्यामुळें सन १६६१ सालीं कायदा पास करून प्रॉटेस्टंटांकडून जमिनी काढून घेऊं नयेत; मात्र राजपक्षीयांस दुसऱ्या जमिनी द्याव्यात असें ठरलें; परंतु त्यांस देण्यास पुरेशा जमिनी नसल्यानें पुढें सन १६६५ सालीं कायदा करून प्रॉटेस्टंट वसाहतवाल्यांनीं आपल्या एक तृतीयांश जमिनी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांस द्याव्या असें ठरलें. यानें थोडेंसें समाधान झालें. धार्मिक बाबतींत आयरिश प्रॉटेस्टंट धर्मपीठाची पुन्हां स्थापना करण्यांत आली; परंतु रोमन कॅथॉलिक पंथावर कोणत्याही प्रकारचे निर्बंध ठेवण्यांत आले नाहींत.

८. लंडनचा प्लेग व अग्निप्रलय (१६६५) :—सन १६६५ मध्यें प्लेगनें लंडनवर स्वारी केली. ही सांथ पूर्वी तुरळक तुरळक इंग्लंडभर पसरे; परंतु या वर्षी प्लेगनें कहरच केला! त्यावेळीं लंडनची राहणी अत्यंत गलिच्छ होती. कोंदट घरें, गलिच्छ व अरुंद रस्ते, शहराची आरोग्यविध्वंसक मांडणी, वगैरेमुळें प्लेगचा फैलाव अती त्वरित गतीनें झाला. प्लेगची सुरुवात होतांच श्रीमंत, सरदार, व्यापारी वगैरेनीं लंडन तावडतोब सोडलें; त्यामुळें दीनदुबळ्या लोकांचा संहार झाला. दररोज सुमारें हजार लोक बळी पडत असत व एकंदर संहार एक लक्ष लोकांचा झाला. त्यामुळें लंडन शहराची सुमारें एक चतुर्थांश लोकसंख्या घटली. प्रेतें उचलण्यासही माणसें मिळत नसत! सर्व देखावा भीषण असे. लोक हवालदील होऊन उघड्यावर पडत. प्लेगनें दूषित झालेल्या घरांवर एक तांबडी खूण करण्यांत येई व 'देवा, आतां तूंच तार' असे दयार्द्र शब्द लिहिण्यांत येत. प्लेग थांबतो न थांबतो तोंच सन १६६६ मध्यें एका भटारखान्याला आग लागली व ती सर्व लंडनभर पसरली. लांकडी घरें, अरुंद रस्ते, अनुकूल वारा व पाण्याचें दुर्भिक्ष यामुळें आगीनें अक्राळविक्राळ स्वरूप धारण केलें; व सुमारें पांच-सहा दिवसांत चौदा-पंधरा हजार घरें भस्मसात् केलीं. यांत सेंट पॉलचें प्रसिद्ध मंदिरही होतें. दोन लाख लोक उघडे पडले; त्यामुळें त्यांवर उघड्यावाघड्या जागेंत कसेंबसें राहण्याचा प्रसंग ओढवला! या आगीनें लंडनचेंसुमारें पाऊण कोट रुपयांचें नुकसान झालें. प्लेगनंतर अग्निप्रलय झाल्यानें प्लेगचे


प्लेग-स्मारक स्तंभ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



जुनें सेंट पॉल्स



नवें सेंट पॉल्स

जंतु नष्ट झाले. लंडनची पुनर्रचना होऊन आरोग्याला पोषक असे रुंद रस्ते झाले. घरांची बांधणी सुधारली. सर क्रिस्टॉफर रेननें लंडनचें सुप्रसिद्ध धर्ममंदिर बांधण्यास सुरुवात केली; व तें १६७५ मध्यें संपविलें. वाईटांतूनही कधीं कधीं चांगलें निघतें तें असें! लंडनचा नाश झाल्यानें राजदरबारीयांना मात्र आनंद झाला! अर्थात् त्यांचा सर्वांस राग आला.

९. फ्रान्सशीं स्नेह:— क्लॅरेंडन मुख्य प्रधान असतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक वाईट गोष्टी करून त्यानें लोकांचीं मनें आपल्याविषयीं अत्यंत कलुषित करून ठेविलीं होतीं. त्यांतच त्याच्या परराष्ट्रीय धोरणानें भर टाकली. फ्रान्सबरोबर स्नेह करावा असें त्याचें मत होतें. त्याचें द्योतक म्हणजे चार्ल्सचें लग्न पोर्तुगॉलच्या राजकन्येबरोबर–ब्रॅगन्झाची राजकन्या कॅथराईन–करण्यांत आलें (१६६२). त्यावेळीं आंदण म्हणून चार्ल्सला मुंबई बेट, टँजीर्स वगैरे ठिकाणें मिळून सुमारें पांच लक्ष पौंड मिळाले. शिवाय ईस्ट इंडीज बेटें व ब्राझील यांशीं व्यापार करण्याची सवलत ब्रिटिशांस मिळाली. याच्या उलट त्यानें स्पेनविरुद्ध पोर्तुगॉलला लष्करी मदत करावी असें ठरलें. यामुळें इंग्लंड व फ्रान्स यांचा स्नेह जमला. तेव्हां त्या देशाच्या राजानें–चौदाव्या लुईनें–एक लाख पौंड देऊन चार्ल्सकडून क्रॉम्वेलनें जिंकलेलें डंकर्क बंदर विकत घेतलें. हें कृत्य भविष्यकाळानें फायद्याचें ठरविलें असलें तरी या व्यवहारांत क्लॅरेंडननें आपली तुंबडी भरून घेतली असा लोकप्रवाद होता. त्यामुळेंच त्या वेळीं क्लॅरेंडन बांधीत असलेल्या घरास 'डंकर्क निवास' असें सूचक नांव, त्याला नांवें ठेवणाऱ्या लोकांनीं दिलें. यावरून क्लॅरेंडन किती अप्रिय झाला होता तें दिसून येतें.

दुसऱ्या चार्ल्सची राणी

१०. हॉलंडशीं युद्ध (१६६५):—याच सुमारास इंग्लंडला हॉलंड-बरोबर युद्ध करावें लागलें. व्यापारी बाबतींत नौकानिर्बंधाचा कायदा हॉलंडच्या व्यापाराला मारकच ठरला होता. त्यांतच कोणत्याही डच व्यापाऱ्याच्या एजंटानें इंग्लिश कॉलनींत राहूं नये असें ठरविण्यांत आलें होतें. तसेंच अनेक प्रकारचे इतरही कांहीं निर्बंध डच व्यापारावर इंग्लिशांनीं घातले होते. अशांतच डच व इंग्लिश यांमध्यें उत्तर अमेरिकेंत नेहमीं चकमकी उडत. त्याच वेळीं चार्ल्सचा पुतण्या व डचांचा राजा, विल्यम याच्यावर डचांनीं अनेक प्रकारचे राजकीय निर्बंध घातले ते चार्ल्सला खपले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहींत. या सर्व कारणांमुळें इंग्लिश व डच यांच्यांत युद्धास सुरुवात झाली (१६६५). सेनापति मंक व राजपुत्र रूपर्ट यांनीं डचांवर आरमारी हल्ला करून त्यांचें पुष्कळच नुकसान केलें. परंतु पैशाच्या अभावीं राजाला पार्लमेंटची कास धरावी लागली. पार्लमेंटनेंही सुमारें साडेबारा लक्ष पौंड डच युद्धाकरितां मंजूर केले. परंतु चार्ल्सनें त्यांतील बराचसा पैसा चैनींत उधळला! हें कळतांच पार्लमेंटनें एक कायदा करून ज्या कामाकरितां पार्लमेंटनें पैसा मंजूर केला असेल त्या कामाकरितांच राजानें तो खर्च केला पाहिजे असें ठरविलें. अशा स्थितींतच डचांनीं इंग्लिशांविरुद्ध जोर करून त्यांचा जिकडे तिकडे पराभव केला व ते टेम्स नदींत घुसले. तेथें नांगरून पडलेल्या इंग्लिश जहाजांस त्यांनीं आगी लावून दिल्या, गोद्या नष्ट केल्या व इंग्लिश आरमाराचा धुव्वा उडविला! शेवटीं सन १६६७ मध्यें ब्रेडा येथें दोन्ही राष्ट्रांत तह होऊन युद्ध थांबलें. या तहानें जिंकलेला भाग प्रत्येक राष्ट्रानें आपल्या ताब्यांत ठेवावा असें ठरलें; त्यामुळें इंग्लंडला न्यू जर्सी व न्यू ॲमस्टरडॅम या अमेरिकेंतील डच वसाहती मिळाल्या. तसेंच नौकानिर्बंधाच्या कायद्यांत सुधारणा करून डच जहाजांनीं डच, फ्लेमिश व जर्मन माल आपल्या जहाजांतून इंग्लंडांत आणावा असें ठरलें.

११. क्लॅरेंडनचा अधःपात :—डच युद्धांत अपयश येण्यास क्लॅरेंडनच कारणीभूत आहे, अशी लोकांची समजूत झालेली होती. ती खरी नसली तरी लोकांचा त्याच्यावर त्या बाबतींत विशेष कटाक्ष होता. प्रथमतः तो राजाचा मित्र म्हणून ओळखला जात असला तरी आपल्या कृत्यांनीं तो लोकांत अप्रिय झाला होता. त्याच्या पुरस्कारानें पास झालेलें 'क्लॅरेंडन कोड' प्यूरिटनां-विरुद्ध होतें. त्यामुळें सर्व प्यूरिटन लोक त्याच्यावर जळफळत. राजाच्या उधळ्या व खर्चिक स्वभावास तोच कारणीभूत आहे असें सर्वांस वाटे. डंकर्क बंदर विकण्यांत त्यानें स्वार्थ साधून वाहत्या गंगेंत हात धुऊन घेतले असा त्याच्यावर ठपका आला होता. शेवटीं डच युद्धांतील अपयशाचें खापर त्याच्या माथीं मारण्यांत आलें. तेव्हां सन १६६७ मध्यें पार्लमेंटनें त्याच्या-वर उमरावमंडळापुढें खटला भरला व त्याची चौकशी चालविली. इकडे राजाच्या उधळ्या वृत्तीबद्दल तो एकसारखी पिरपिर करीतच असे; यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजाच्याही मनांतून तो उतरलाच होता. तेव्हां त्यांच्या त्रासांतून आपली सुटका करून घेण्याकरितां, पार्लमेंटनें त्याची चौकशी सुरू केल्याचें निमित्त पुढें करून, राजानें त्याला फ्रान्समध्यें गुप्तपणें पळून जाण्यास सांगितलें; तें त्यानें ऐकलें. हें कळतांच पार्लमेंटनें त्याच्याविरुद्ध राजद्रोहाचा कायदा पास केला. पुढें तो सन १६७४ मध्यें मरण पावला. मृत्यूपूर्वी त्यानें इग्लंडांतील यादवी युद्धाचा एक सुंदर इतिहास लिहून ठेवला. क्लॅरेंडनच्या अधः-पातानें राजाचे प्रधान पार्लमेंटला जबाबदार असतात हें तत्त्व रूढ झालें व डॅन्बीच्या पुढील उदाहरणानें त्याला दुजोरा दिला गेला.

अभ्यास

१. इंग्लिशांस राजसत्ता पुन्हां मान्य होण्याचीं कारणें सांगा.
२. दुसऱ्या चार्ल्सचा स्वभाव वर्णा. त्याचें धोरण यशस्वी कां झालें ?
३. क्लॅरेंडनची कामगिरी सांगा. त्याचा अधःपात कां झाला ?
४. अनधिकारी पार्लमेंटची कामगिरी वर्णा.
५. कारणांसह परिणाम द्या :—(अ) हॉलंडशीं युद्ध (आ) क्लॅरेंडन कोड (इ) प्यूरिटनांचा छळ.
६. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—कॅव्हेलियर पार्लमेंट, माफीचा कायदा, लंडनचा प्लेग, क्लॅरेंडन कोड, लंडनची आग, स्कॉटलंड व आयर्लंडमधील व्यवस्था.
७. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
मंक, ब्रेडा, चौदावा लुई, जॉन ब्रॅडशॉ, जॉन बन्यन, मिल्टन, अर्गाइल, डंकर्क निवास.
८. दुसऱ्या चार्ल्सनें धार्मिक स्वातंत्र्य मान्य केलें का ? त्याच्या कारकीर्दींत प्यूरिटनांचा छळ कां झाला ? त्याचा परिणाम काय झाला ?

उतारे

१. ब्रेडाचा जाहीरनामा – १६६०.

मी, परमेश्वरकृपेनें इंग्लंड, आयर्लंड, स्कॉटलंड व फ्रान्स या देशांचा राजा व धर्मसंरक्षक, जातगोत लक्षांत न घेतां माझ्या सर्व प्रेमळ प्रजेला अभिवादन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करतों. आजपर्यंत या देशांत जी अव्यवस्था झाली व जो गोंधळ माजला तो नष्ट व्हावा अशी माझी अंतःकरणपूर्वक इच्छा असल्यामुळें मी असें जाहीर करतों कीं परमेश्वरानें माझी प्रार्थना ऐकावी व कोणत्याही प्रकारचा रक्तपात न होतां माझे न्याय्य अधिकार मला प्राप्त व्हावे. त्याचप्रमाणें माझी अशी इच्छा आहे कीं माझ्या सर्व प्रजेलाही आपल्या न्याय्य हक्कांचा उपभोग घेतां यावा. आपल्या कृत्यांबद्दल आपल्याला शिक्षा होईल व आपल्या पूर्वापार योग्य व न्याय्य हक्कांची गळचेपी होईल असें ज्यांस वाटत असेल त्यांना व माझ्या इतर प्रजाजनांना मी जाहीर करितों कीं हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यादिवसापासून चाळीस दिवसांत जे कोणी आपली राजनिष्ठा प्रगट करतील, त्या सर्वांना सार्वत्रिक माफी देण्यांत येईल. मात्र ज्यांना पार्लमेंटसभा वगळील त्यांना ही माफी मिळणार नाहीं. दुसरें असें कीं, राज्यकारभारांतील घोटाळ्यामुळें धार्मिक बाबतींतही निरनिराळे पंथोपपंथ या देशांत निर्माण झाले आहेत. त्या सर्वांत एकी नाहीं. तेव्हां ती घडून यावी म्हणून मी असें जाहीर करितों कीं सर्व लोकांस धार्मिक स्वातंत्र्य असावें. धार्मिक बाबतींत भिन्न मतांच्या लोकांवर केव्हांही हत्यार उपसलें जाणार नाहीं. धार्मिक बाबतींत पार्लमेंट ठरवील त्याप्रमाणें धर्मस्वातंत्र्याबद्दल कायदा करण्यांत येईल. तिसरें असें कीं, इतक्या दिवसांच्या बजबजपुरीमुळें लोकांच्या इस्टेटीसंबंधीं जे अनेक घोटाळे उत्पन्न झाले आहेत ते पार्लमेंटच्या कायद्यानें नाहींसे करण्यांत येतील. शेवटीं मी असें जाहीर करतों कीं वरील गोष्टींच्या संबंधानें पार्लमेंट जे जे कायदे पास करील त्यांस मी संमति देईन व सेनापति मंकच्या लष्करांतील लोकांची थकलेली बाकी देऊन मी त्या सर्वांस माझ्या सैन्यांत दाखल करून घेईन.

प्रश्न:—१. दुसऱ्या चार्ल्सनें ब्रेडाच्या जाहीरनाम्यानें कोणतीं अभिवचनें दिलीं ?
२. त्यांचा राष्ट्रावर काय परिणाम झाला असावा ?

२. लंडनचा प्लेग – १६६५.

प्लेगच्या सांथीच्या अगोदर बरेच महिने एक मोठा धूमकेतु लंडन शहरावरून, घरांच्या अगदीं जवळून जातांना लोकांना दिसे. तो अगदीं फिका, निस्तेज व सौम्य दिसे. त्यामुळें लोकांना कांहींतरी संकट येणार म्हणून भीति वाटूं लागली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होती. पुढील वर्षीं झालेल्या अग्निप्रलयाच्या अगोदरही एक धगधगीत व तेजाळ धूमकेतु लंडनवरून जातांना लोकांना दिसत होता.

....

प्लेगनें लंडनचें स्वरूप पार बदलून टाकलें ! जुन्या तटबंदीच्या आंतील भागावर प्लेगनें वक्रदृष्टि केली होती असें दिसतें. मात्र नव्या लंडनवर त्यानें भरपूर सूड उगवून घेतला. प्रत्येकाचा चेहरा हीनदीन व सुतकी दिसे. रस्त्यांतून जातांना शेजारच्या घरांतून आलेले विलाप व आक्रोश व स्त्रियांच्या दीन व कर्कश किंकाळ्या सदैव कानीं येत. त्यामुळें त्या ऐकणाऱ्यांच्या हृदयाचें पाणी पाणी होऊन जाई !

....

मुडदे उचलून व ते गाडींतून दफनभूमीकडे नेणाऱ्या मुडदेफरासांना आपल्या कामाचा अत्यंत वीट आला असावा. त्यामुळें रस्त्यांतून मुडद्यांचे ढीगच्या ढीग सांचत ! त्यांची कुजट घाण व दुर्गंधी इतकी सुटे कीं त्यामुळेंही प्लेग फैलावे.

प्रश्न :—१. प्लेगच्या वेळीं लंडनमध्यें कोणते भीषण प्रसंग दिसत ? प्लेग कशामुळें फैलावला ?

२. त्यावेळीं तुम्ही तेथें असतां तर काय केलें असतें ?

३. लंडनचा अग्निप्रलय—१६६६.

ता. २ सेप्टेंबरला लंडनला आग लागली व त्या रात्रीं सुमारें तीनशें घरें भस्मसात झालीं. दुसऱ्या दिवशीं मी शहरांत भटकत असतां पाहतों तों काय—जळत्या घरांतून आपलें सामानसुमान बाहेर काढण्याची प्रत्येकाची एकच धांदल ! जळत्या घरांतून सामान काढावें व तें नदींत नाहींतर एखाद्या उघड्या पडावांत भिरकावून द्यावें व पुन्हां आपल्या कामाला लागावें असें एकसारखें चालू होतें. गरीब-बापडे लोक ! आपल्या घराला प्रत्यक्ष आग लागेपर्यंत घरांतच बसून रहात व आग लागल्यावर मात्र आश्रयार्थ त्यांची एकच धांदल उडे !—बिचारीं कबुतरें—त्यांना मात्र आपल्या घरट्यांचा मोह आवरत नसे. जळत्या घरांवरून एकसारख्या घिरट्या घालाव्या व आगीनें होरपळून निघाल्यावर, अग्निनारायणाच्या स्वाधीन व्हावें ! असें त्यांचें चाले !......तिसऱ्या दिवशीं दुसऱ्या एका रस्त्यावर मी गेलों. तों

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काय, तेथें लोकांचा नुसता तोबा उडालेला ! त्या गर्दींतच गाड्या, घोडीं यांची जा-ये चाले. त्यामुळें चेंगराचेंगरीला नुसता ऊत आला होता. त्यांतून निसटून जाण्याची व जळत्या घरांतून सामान बाहेर काढण्याची लोकांची कोण ती धांदल ! ......चौथ्या दिवशीं मी लंडनच्या पुलावर गेलों व जळत्या लंडन शहराकडे मी दृष्टि टाकली. दृष्टीच्या टप्प्यांतील लंडनचा सर्व भाग अग्नीनें बेचिराख करून टाकलेला पाहतांच मला रडूं कोसळलें ! पुलापलीकडे सुमारें एक मैलभर अग्नीनें नुसता कहर उडविला होता ! घरें, इमारती, देवळें—एकजात अग्नीच्या मुखांत होतीं. उफाळणाऱ्या ज्वालांचा आवाज व पडणाऱ्या घरांचा आवाज एकंदर भेसूर-पणांत भरच टाकीत होता.......आज सांपडेल ती मोकळी जागा व्यापून टाकून लोक हवालदील होऊन उघड्यावरच आपापलें सामान सांभाळीत बसलेले होते. जिकडे तिकडे भीषण शांतता पसरलेली दिसत होती.

—सॅम्युअल पेप्सच्या डायरीवरून

प्रश्न :—१. अग्निप्रलयानें लंडनवासीयांचे कोणते हाल झाले ?

२. अग्नीनें लंडनवर उपकार केला असें तुम्हांस वाटतें काय ? कारणें द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. रंगेल पण नियंत्रित राजाचा कार्यसाधूपणा.

१. कॅबॉल मंत्रिमंडळ (१६६७):—क्लॅरेंडननंतर चार्ल्सनें कोणासही मुख्य मंत्री न नेमतां राज्यकारभाराचीं निरनिराळीं खातीं पांच लोकांकडे सोंपविलीं. क्लिफर्ड, आर्लिंग्टन, बकिंगहॅम, ॲशले व लॉडरडेल हे पांच लोक आतां राजाचे मुख्य सल्लागार झाले. त्यांच्या इंग्रजी नांवांच्या आद्याक्षरांवरून 'कॅबॉल' असा शब्द बनला. यावरून हें मंडळ म्हणजे गुप्त मसलती करणारांचें एक मंडळ होय असा लोकांमध्यें त्यांच्याबद्दल एक समज झाला होता. परंतु या मंडळाच्या हातीं सर्व सत्ता होती असें मुळींच नाहीं. त्यांच्यापैकीं एकावरही राजाचा पूर्ण विश्वास नव्हता; त्या सर्वांचीं मतेंहीं भिन्न होतीं व त्यांचे आपापसांत हेवा-दावा-मत्सर वगैरे प्रकार एकसारखे चालत. क्लिफर्ड व आर्लिंग्टन हे रोमन कॅथॉलिक होते; ॲशले (नंतरचा शॅफ्टस्बरी) व लॉडरडेल यांचा कल प्रेसबिटेरियन पंथाकडे होता; व बकिंगहॅम स्वतंत्रमतवादी होता. हें मंत्रिमंडळ स्वार्थसाधू लोकांचें आहे असें समजून लोक त्याला 'बदसल्लागारांचें मंडळ' म्हणत. कसेंही असलें तरी पुढें जी प्रधानमंडळात्मक राज्यपद्धति इंग्लंडमध्यें सुरू झाली तिचें जनकत्व थोडें फार या मंडळाकडे येतें. कारण या मंडळांतील लोक निरनिराळ्या मतांचे असले तरी त्यांचें धोरण एक असून सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वाचें पालन त्या मंडळाकडून झालें. राजानें मात्र आपल्या कुटिल कारस्थानाकरितां या मंडळाचा चांगलाच उपयोग करून घेतला.

२. डोव्हरच्या गुप्त तहाची पूर्वतयारी:—या कॅबॉल मंत्रिमंडळानें प्रथमतःच एक चांगली गोष्ट केली. त्यानें स्वीडन, हॉलंड व इंग्लंड यांचा एक संघ फ्रान्सविरुद्ध बनवला. त्याला 'त्रिवर्गांचा संघ' असें म्हणतात (१६६८). यावेळीं फ्रान्सवर चौदावा लुई हा मोठा महत्त्वाकांक्षी कॅथॉलिक राजा राज्य करीत होता. त्याला फ्रान्सच्या राज्याची सरहद्द ऱ्हाईन नदीपर्यंत वाढवावी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें वाटत होतें. अर्थात् हें साध्य होणें म्हणजे नेदरलंड जिंकून घेणें होय. यामुळेंच त्याचा हॉलंडशीं झगडा चालू होता. हॉलंड हें राष्ट्र अगदीं छोटें होतें व त्या मानानें फ्रान्स फारच बलाढ्य. अशा स्थितींत तें राष्ट्र घाबरून गेलें; व त्यामुळें त्याला एखादें मित्रराष्ट्र मिळवावें लागलें. याच सुमारास वरील त्रिवर्गाचा संघ झाला. त्याबरोबर लुईनें युद्ध थांबविलें व त्या संघांतून इंग्लंडला फोडण्याचा तो विचार करूं लागला. त्यानें बारकाईनें चौकशी करून चार्ल्स ऐषारामांत दंग असून, त्याला पैशाची फार टंचाई आहे हें ओळखलें व त्याच्याबरोबर बोलणीं करण्याकरितां चार्ल्सची बहीण, ऑर्लीन्सची डचेस, हिला त्याच्याकडे पाठविलें. चार्ल्सचें मन वळविण्यास तिला फारसा वेळ लागला नाहीं. कारण राजाला त्रिवर्गाचा संघ मनांतून आवडला नव्हताच; शिवाय तो फ्रान्सच्या स्नेहाकरितां उतावळा झाला असून त्याचा कल कॅथॉलिक पंथाकडे होता हें त्या चाणाक्ष स्त्रीनें ओळखलें होतें. अशा स्थितींत तिनें लुईच्या सल्ल्यानें चार्ल्सबरोबर डोव्हरचा गुप्त तह घडवून आणला (१६७०).

३. डोव्हरचा गुप्त तह (१६७०) :—चार्ल्स राजा पैशाच्या पंचायतींत नेहमींच असे. पार्लमेंटकडून पैसा मिळे, परंतु तो तो नेहमीं उधळून टाकी. यामुळें पार्लमेंटकडे जाऊन पैशाकरितां तोंड वेंगाडणें नेहमीं शक्य नसे. अर्थात् त्यानें अनेक अन्याय्य उपाय योजून पैसा मिळविला. डोव्हरचा गुप्त तह हा त्यांतलाच एक प्रकार होता. हा तह पार्लमेंटला माहीत नव्हता; कॅबॉल मंत्रिमंडळांतील सर्व मंत्र्यांनाही तो माहीत नव्हता. फक्त क्लिफर्ड व आर्लिंग्टन यांना त्यांतील कांहीं कलमें माहीत होतीं. त्या तहांत खालील अटी ठरल्या होत्या. (१) चार्ल्सनें डचांविरुद्ध लुईला मदत करावी. (२) चार्ल्सनें कॅथॉलिक धर्माचा स्वीकार करावा. साधेल त्याप्रमाणें त्या पंथाचा इंग्लंडांत प्रसार करावा. (३) त्यामुळें इंग्लंडांत पुन्हां यादवी झालीच तर लुईनें चार्ल्सला सहा हजार फ्रेंच सैनिक मदतीकरितां द्यावे. (४) लुईनें चार्ल्सला दरसाल दोन लक्ष पौंड द्यावेत. (५) हॉलंडच्या युद्धांत जय मिळाल्यास लुईनें चार्ल्सला झीलंड द्यावें. (६) तसेंच या युद्धांत इंग्लंडनें हॉलंडवर समुद्रावरून हल्ला करावा व लुईनें जमिनीवरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करावा असें ठरलें. या तहानें राजाचें खरें अंतरंग कळतें. जो पैसा देईल त्याच्या बाजूला तो जाणार हें ठरलेलें होतें. हा त्याचा स्वार्थी विचार परराष्ट्रीय धोरणांत नेहमीं व्यक्त होत असे. पार्लमेंटला हा तह आवडणार नाहीं अशी त्याची पक्की खात्री होती; म्हणूनच हॉलंडशीं बाहेरून दोस्ती व आंतून फ्रान्सशीं गट्टी दाखवून पार्लमेंटकडून त्यानें आरमार सुधारण्याकरितां आणखी आठ लक्ष पौंडाची रक्कम मंजूर करून घेतली व ती पार्लमेंट बरखास्त केली. दुटप्पी धोरण त्याला चांगलेंच मानवलें व परराष्ट्रीय राजकारणाच्या बाबतींत तर तें नेहमीं त्याच्या फायद्याचेंच ठरलें !

४. चार्ल्सची दिवाळखोरी :—डोव्हरच्या गुप्त तहानें चार्ल्सला खूप पैसा मिळाला ही गोष्ट खरी असली तरी त्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. त्याला देणें पुष्कळ झालें होतें व त्याच्या हातीं पैसा मुळींच शिल्लक नव्हता. आलेला पैसा उधळण्यांतच सरून गेला होता. अशा स्थितींत एके दिवशीं ‘मी यापुढें कोणाचेंही देणें लागत नाहीं; अर्थात् कोणाचें देणें असल्यास तें मी यापुढें केव्हांही देणार नाहीं.’ असें एका जाहीरनाम्यानें त्यानें सर्वांस कळविलें. राजा भांडवल परत देणार नसला तरी त्याच्यावरील व्याज मात्र तो देणार होता. या जाहीरनाम्यानें राजाच्या सावकारांचें धाबें दणाणून गेलें. कारण ज्यांनीं ज्यांनीं राजाला कर्जाऊ पैसे दिले होते, त्यांचें भयंकर नुकसान होणार होतें. राष्ट्रीय तिजोरीच्या तारणावर आजवर राजाला इंग्लंडमधील सराफ लोक अनेक रकमा कर्जाऊ देत. त्यांच्या या व्यवहारामुळें इंग्लंडमध्यें पेढ्यांच्या व्यवहारासही थोडी फार सुरुवात झाली होती. परंतु चार्ल्सनें आपल्या जाहीरनाम्यानें सर्व सराफकट्टा हादरून टाकला. राजाच्या या व्यवहारामुळें त्याचा व्यक्तिशः फायदा झाला खरा; परंतु एका दृष्टीनें त्याचा हा जाहीरनामा म्हणजे राष्ट्रीय दिवाळखोरीचा जाहीरनामाच होय ! त्यामुळें अनेक सराफांचें नुकसान झालें, व्यापार मंदावला व व्यापारी जगांत हाहा:कार उडाला ! मात्र यापुढें राजाच्या शब्दावर विश्वासून सरकारला कर्जाऊ पैसा न देण्याचें इंग्लंडच्या सराफांनीं ठरविलें असणें साहजिक आहे. हें प्रकरण संपतें न संपतें तोंच चार्ल्सनें राष्ट्राला दुसराच एक मोठा धक्का दिला. तो म्हणजे सवलतींचा जाहीरनामा प्रसिद्ध करणें हा होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. सवलतींचा जाहीरनामा (१६७२):—डोव्हरच्या तहाप्रमाणें चार्ल्सनें रोमन कॅथॉलिकांना सवलती देणें व स्वतः त्या धर्माचा स्वीकार करणें जरूर होतें. परंतु इंग्लंडमध्यें प्रस्थापित धर्माचे व प्रॉटेस्टंट धर्म-पंथाच्या पंथोपपंथांचे अनुयायी पुष्कळ. अशा स्थितींत कॅथॉलिकांस सवलती दिल्या तर पुन्हां यादवी होईल असें खुद्द चार्ल्सलाही वाटत होतें. या बाबतींत पार्लमेंटची मदत मिळणें अशक्यच होतें. तेव्हां त्यानें स्वतःच्या अधिकारांतच एक जाहीरनामा काढून पार्लमेंटनें पास केलेले व क्लॅरेंडन कोडांत समाविष्ट झालेले सर्व कायदे रद्द केले. त्यालाच 'सवलतींचा जाहीरनामा' असें म्हणतात. या जाहीरनाम्यामुळें प्रॉटेस्टंट पंथांतील, क्वेकर, स्वतंत्र, नॉनकन्फॉर्मिस्ट वगैरे लोकांना आनंद झाला; कारण त्यांना त्यांच्या मताप्रमाणें धर्म-प्रार्थना करतां येणें शक्य झालें. तसेंच रोमन कॅथॉलिकांनाही बरें वाटलें; कारण त्यांच्यावरील बंधनेंही नष्ट होणार होतीं. परंतु या जाहीरनाम्यानें एकंदर राष्ट्राला राजाचा अत्यंत राग आला. एक तर ही गोष्ट पार्लमेंटच्या अधिकारावर आक्रमण करून व त्या सभेची संमति न घेतां राजानें केली होती; व दुसरें म्हणजे त्यामुळें राजा कॅथॉलिक पंथाकडे वळणार असें लोकांना वाटूं लागलें. यामुळें सर्व राष्ट्र राजाविरुद्ध खवळून गेलें. याच्या-नंतर थोड्याच दिवसांत राजाचा भाऊ, यॉर्कचा ड्यूक, जेम्स, यानें कॅथॉलिक धर्माचा स्वीकार केल्याचें उघडपणें जाहीर केलें. त्यामुळें राजाही त्याच धर्मपंथाचा स्वीकार करणार असें सर्वांस वाटूं लागलें. अर्थात् देशांत अत्यंत खळबळ उडाली.

६. दुसरें डच युद्ध (१६७२):—डोव्हरच्या गुप्त तहांत ठरल्याप्रमाणें हॉलंडवर हल्ला करण्याकरितां राजा कोणत्या तरी संधीची वाट पहातच होता. आरमाराची सुधारणा करण्याकरितां पार्लमेंटकडून त्यानें मोठी रक्कम घेतली होतीच. त्याप्रमाणें थोडी सुधारणा करून त्यानें आपलें आरमार इंग्लिश खाडींत सोडलें. तेव्हां डच जहाजांनीं आपल्या निशाणाचा योग्य तो मान राखला नाहीं असें सांगून त्यानें डचांशीं युद्ध सुरू केलें. राजाच्या या कृत्यानें सर्व राष्ट्राला धक्का बसला. त्याच सुमारास लुईनेंही ठरल्याप्रमाणें हॉलंडवर जमिनीवरून हल्ला केला. अशा दुहेरी हल्ल्यामुळें चिमुकलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हॉलंड राष्ट्र कचाट्यांत सांपडलें. आरमारी युद्धांत इंग्लंडला प्रथमतः जय मिळाला; परंतु पुढें त्याचा पराभव झाला. मात्र लुईचा मारा डच लोकांना असह्य झाला. सर्व हॉलंड देश हादरून गेला व तशा स्थितींत त्यांनीं आपला पुढारी डी विट, याचा खून करून चार्ल्सचा भाचा व ऑरेंजचा विल्यम याला आपला पुढारी केलें. त्यानें फ्रेंचांचा पराभव करण्याकरितां मोठ्या शिताफीनें हॉलंडच्या किनाऱ्याचे बंधारे फोडून टाकून समुद्राचें पाणी फ्रेंच सैन्यावर सोडलें. त्यामुळें फ्रेंचांचा धीर खचून ते परत फिरले. फ्रेंचांचा पराभव झाला. इंग्रजांनाही हॉलंडशीं युद्ध नको होतें. चार्ल्सला पैशाची टंचाई भासूं लागली व तशा स्थितींतच त्यानें डच लोकांशीं सन १६७४ मध्यें लंडन येथें तह केला. एकमेकांनीं एकमेकांच्या शत्रूंस मदत करूं नये व इंग्लंडनें जिंकलेलीं यूरोपच्या बाहेरचीं ठिकाणें इंग्लंडकडे रहावीं, दोन्ही देशांच्या ई. इं. कंपन्यांच्या तक्रारी पंचामार्फत निकालांत काढाव्या, हॉलंडनें इंग्लंडला दोन लक्ष पौंड द्यावे वगैरे अटी त्या तहांत होत्या.

७. कॅबॉलचा पाडाव (१६७३):—डच युद्ध चालू असतांच सन १६७३ मध्यें राजाला पार्लमेंटसभा बोलवावी लागली. सवलतींचा जाहीरनामा व राजाचीं इतर अन्याय्य कृत्यें यामुळें सर्व देश खवळला होताच. पार्लमेंटनें राजावर मात करावयाची असें ठरविलें होतें. पार्लमेंटची बैठक भरल्याबरोबर सवलतींच्या जाहीरनाम्यासंबंधीं जोराची टीका होऊं लागली. पार्लमेंटनें एक तक्रार-अर्ज राजाकडे धाडून तो जाहीरनामा परत घेण्याची सूचना केली. त्यावेळीं यॉर्कचा ड्यूक व लॉर्ड शॅफ्टसबरी यांच्या सल्ल्यानें राजानें ती सूचना प्रथमतः धुडकावून लावली. परंतु त्यामुळें पार्लमेंटनें उग्र रूप धारण केलें. चार्ल्स व पार्लमेंट यांच्यामधील हें भांडण कळतांच फ्रेंच राजा लुई यानें अशा आणीबाणीच्या वेळीं (कारण त्यावेळीं डच युद्ध चालू होतें) नमतें घेणेंच योग्य होय, असा सल्ला दिल्यानें अखेरीस चार्ल्सनें सवलतींचा जाहीरनामा परत घेतला. राजा नमला हें पहातांच त्याच्या विरोधी पक्षाला जोर चढला व त्यानें पार्लमेंटमध्यें सन १६७३ मध्यें 'धर्म-कसोटीचा कायदा' पास केला. या कायद्याप्रमाणें मुलकी व लष्करी खात्यांतील अधिकाऱ्यांनीं प्रस्थापित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मप्रमाणेंच शपथ घेतली पाहिजे व त्यांनीं ती तशी घेतली तरच त्यांना सरकारी हुद्याच्या जागा देण्यांत याव्या असें ठरविलें. या कायद्याचा मुख्य कटाक्ष कॅथॉलिक लोकांवर होता. त्या कायद्याचें दडपण खुद्द राजावर नव्हतें. हें खरें असलें तरी कोणाही कॅथॉलिकास हुद्याच्या जागेवर राहणें अशक्य झालें. कायदा पास झाल्याबरोबर राजाचा भाऊ, जेम्स, यॉर्कचा ड्यूक यानें तावडतोब आपल्या दर्यासारंगाच्या जागेचा राजीनामा दिला. कॅबॉल मंत्रिमंडळांतील क्लिफर्ड व आर्लिंग्टन यांनीं राजीनामे दिले व लॉर्ड शॅफ्टस्बरीनें मंडळांतून आपलें अंग काढून घेतलें. यामुळें कॅबॉल मंत्रिमंडळ मोडलें (१६७३) व चार्ल्सनें लॉर्ड डॅन्बीला आपला मुख्य प्रधान नेमलें.

८. **लॉर्ड डॅन्बीचा कारभार** (१६७३–१६७९) :—लॉर्ड डॅन्बी प्रस्थापित पंथाचा असून हॉलंडशीं चाललेलें युद्ध चालू ठेवावें अशा मताचा तो होता. पार्लमेंटमधील तो एक वजनदार पुढारी असल्यामुळें आपल्या वजनानें राजा व पार्लमेंट यांचें सख्य जोडावें असें त्याला वाटे. आपल्या गोष्टी साध्य करण्याकरितां लांच देण्यासही तो कचरत नसे व या प्रकारानें आपण पार्लमेंटला वश करून घेऊं अशी त्याची खात्री होती. त्याच्या सल्ल्यावरूनच राजानें सन १६७४ मध्यें हॉलंडशीं तह घडवून आणला होता. चार्ल्स काय कमी स्वार्थसाधू होता ? या प्रसंगाचाही त्यानें फायदा घेण्याचें सोडलें नाहीं. तो लुईला म्हणे, "मी तरी काय करूं ? पार्लमेंटला खूष केलें नाहीं तर मला पैसा मिळत नाहीं, बरें पार्लमेंटविरुद्ध तुम्हांला मदत केली तरीही मी खोड्यांत पडणारच !" अशा पेंचातच लुईनें चार्ल्सला पुन्हां भुलवून त्याच्याशीं डोव्हर येथें दुसरा एक गुप्त तह केला (१६७५). या तहानें पार्लमेंट तावडतोब बरखास्त केल्यास चार्ल्सला लुईनें वार्षिक एक लाख पौंड द्यावे व उलट चार्ल्सनें हॉलंडविरुद्ध लुईला मदत करावी असें ठरलें. राजानें तावडतोब पार्लमेंट कांहीं दिवस बरखास्त केली; परंतु १६७७ मध्यें पार्लमेंट पुन्हां भरल्यावर नव्या निवडणुकीबद्दल सभासदांत बराच वादविवाद झाला. तेव्हां चार्ल्सनें पार्लमेंटची मुदत भरल्यानें ती कायमचीच बरखास्त केली. तेव्हां लुईनें चार्ल्सला आणखी दोन लाख पौंड दिले व पार्लमेंटची सभा लौकर न बोलावण्याची अट चार्ल्सवर घातली. या सर्व गुप्त गोष्टी डॅन्बीला माहीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतांही तो त्यांतील अवाक्षरही कोणाला बोलला नाहीं. हॉलंडशीं युद्ध न करतां तह करावा असें त्याला वाटत होतें. शेवटीं कसेंबसें त्यानें राजाचें मन वळविलें व यॉर्कचा ड्यूक जेम्स, याची प्रॉटेस्टंटपंथीय मुलगी मेरी हिचें लग्न हॉलंडचा पुढारी ऑरेंजचा विल्यम याच्याबरोबर लावून दिलें. हें लग्न चार्ल्सला आवडलें नाहीं व त्याकरितां तो डॅन्बीवर सूड घेण्याची संधि पहात होता. परंतु राजकीयदृष्ट्या हें लग्न इंग्लिश लोकांस फारच आवडलें. कारण या लग्नामुळें इंग्लंड हॉलंडला फ्रान्सविरुद्ध मदत करणार हें उघड होतें; व शिवाय चार्ल्सला मूलबाळ नसल्यानें त्याच्या मागून मेरी इंग्लंडची राणी होण्याचा संभव होता. या लग्नाची वार्ता कळतांच फ्रान्सच्या लुईचें धाबें दणाणलें. तेव्हां त्यानें चार्ल्सशीं पुन्हां गुप्तरीतीनें बोलणीं करण्यास सुरुवात केली. फ्रान्स व हॉलंड यांचें युद्ध झाल्यास आपण तटस्थ राहूं व त्याकरितां लुईनें चार्ल्सला मोठी रक्कम द्यावी असें ठरलें (१६७६). हाही गुप्त करार डॅन्बीला माहीत होता.

९. डॅन्बीचा अधःपात (१६७९):—या लग्नानंतरही हॉलंड व फ्रान्स या देशांचें युद्ध चालूच होतें. विल्यम मोठ्या धैर्यानें फ्रान्सबरोबर लढत होता. या वेळीं पार्लमेंटची सभा भरली (१६७७). या पार्लमेंटमध्यें शॅफ्टस्बरीचा पक्ष जोरदार होता. त्या पक्षाला फ्रान्सविरुद्ध हॉलंडला मदत करावी असें वाटत होतें. सन १६७७ मध्यें केलेल्या गुप्त तहांत ठरल्याप्रमाणें चार्ल्सला लुईनें पैसे दिले नाहींत. त्याबद्दल रागावून जाऊनच, लुई नको म्हणत असतांही, चार्ल्सनें वरील पार्लमेंट बोलाविली होती. त्यामुळें लुईही चार्ल्सवर रागावला होता; व त्यानें शॅफ्टस्बरीच्या पक्षाशीं संगनमत चालविलें. या वेळीं फ्रान्सबरोबर युद्ध करावें असें चार्ल्सला वाटलें व त्याबद्दल त्यानें पार्लमेंटकडे पैशाची मागणी केली. लुईनें शॅफ्टस्बरीच्या पक्षास लांच देऊन चार्ल्सची मागणी पार्लमेंटकडून फेटाळून लावली. त्यामुळें चार्ल्स चिडून गेला व त्यानें डॅन्बीतर्फे लुईशीं गुप्त तह करण्याकरितां पत्रव्यवहार सुरू केला. तेव्हां लुईनेंही चार्ल्सशीं सन १६७८ मध्यें गुप्त तह केला व त्याप्रमाणें लुईनें चार्ल्सला सुमारें सहा लक्ष पौंड द्यावे व चार्ल्सनें फ्रान्स व हॉलंड यांचा तह घडवून आणावा असें ठरलें. ठरल्याप्रमाणें सन १६७८ मध्यें फ्रान्स व हॉलंड यांचा निमोजेन येथें तह ठरला. तहानंतर डॅन्बीवर सूड घेण्याचें चार्ल्स व लुई या दोघांनींही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठरविलें व त्याप्रमाणें गुप्त तहासंबंधानें डॅन्बीनें लिहिलेलें पत्र लुईनें शॅफ्टस्-बरीकडे पाठविलें. तें पत्र कॉमन्ससभेपुढें मांडण्यांत आलें. त्याबरोबर सर्वांचा नुसता जळफळाट होऊन डॅन्बीवर खटला भरण्यांत आला. त्याला वांचवावें म्हणून राजानें ती सभा बरखास्त केली. परंतु पुढच्या सभेनें त्याच्यावर पुन्हां खटला भरून त्याला कैदेंत टाकलें (१६७९). दुसऱ्या चार्ल्सच्या कार-कीर्दींत अशा तऱ्हेनें राजाच्या प्रधानावर पार्लमेंटनें खटला भरल्याचें हें दुसरें उदाहरण व त्यावरून राजाचे प्रधान पार्लमेंटला जबाबदार असतात या तत्त्वाचा पुन्हां जय झाला.

१०. टायटस ओटस्ची कंडी (१६७८) :—या सर्व घडामोडी चालू असतांच इंग्लंडमध्यें मोठी खळबळ उडून राहिली होती. यॉर्कचा ड्यूक व दुसरा चार्ल्स यांचा वध करण्याचा एक गुप्त कट कॅथॉलिकांनीं केला आहे, अशी एक कंडी टायटस ओटस् या नांवाच्या एका नादान माणसानें उठविली. ओटस्नें सर्व गोष्टी शपथेवर सांगून सर्व प्रकारचा पुरावा देण्याचेंही कबूल केलें. त्यामुळें ओटस्च्या सांगण्यावर सर्वांचा विश्वास बसला. त्यावेळीं अशा प्रकारची माहिती देणारास, ती खरी ठरल्यास, बरेंच मोठें बक्षीस मिळे. आपल्यालाही असें बक्षीस मिळावें अशी ओटस्ची इच्छा होती. अर्थात त्याला बक्षिसें मिळालीं, एवढेंच नव्हे तर त्याच्या संरक्षणार्थ एक शरीरसंरक्षकही देण्यांत आला. याच सुमारास एडमंड बेरी गॉडफ्रे या न्यायाधीशाचा खून करण्यांत आला. त्याच्या-जवळच ओटस्नें आपली सर्व खोटी हकीकत ओकली होती. अर्थात वरील खुनामुळें त्याच्या म्हणण्यांत सत्यांश असावा असें लोक म्हणूं लागले. लागलेच अनेक कॅथॉलिकांस पकडण्यांत आलें; अनेकांना फाशीं देण्यांत आलें. चार्ल्सचा वरील कंडीवर विश्वास नसतांही त्याला कॅथॉलिकांचा होत असलेला छळ थांबवितां आला नाहीं. पुढें ओटस्च्या कंडीचा बभ्रा फार झाला व खरें सत्य उघडकीस आल्यावर त्याच्यावर खटला भरण्यांत आला.

११. व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा (१६७९) :—वरील प्रकारांचा फायदा घेण्याच्या हेतूनें शॅफ्टस्बरीनें एक नवाच उद्योग आरंभला होता. सन १६७९ च्या मार्च महिन्यांत पार्लमेंटची नवी निवडणूक होऊन प्रॉटेस्टंट पंथीय व्हिग लोक पार्लमेंटमध्यें मताधिक्यानें निवडून आले होते. त्यांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शॅफ्टस्बरी पुढारी होता. या पार्लमेंटनें प्रथमतः एक महत्त्वाचा कायदा पास करून घेतला. त्याला 'व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा' असें म्हणतात. इतके दिवस राजकीय गुन्हेगारांस चौकशीविना राजा तुरुंगांत डांबून ठेवीत असे. राजाच्या मर्जीप्रमाणें वाटेल त्या वेळीं त्याची चौकशी होई. ही स्थिति सुधारण्याकरितांच वरील कायदा पास करण्यांत आला. या कायद्यानें खालील गोष्टी ठरविल्या. (१) कोणत्याही कैद्यानें अगर आरोपीनें आपल्या चौकशीची मागणी केली तर बंदीपालानें त्याला कोणाही न्यायाधीशापुढें उभें केलें पाहिजे. (२) बंदीपालानें तसें न केल्यास त्यानें त्या कैद्याला शंभर पौंड दंडादाखल द्यावे. त्याचप्रमाणें न्यायाधीशानें खटला चालविण्याचें नाकारल्यास त्याला पांचशें पौंड दंड करण्यांत यावा. (३) आरोपी आरोपांतून सुटला तर त्याच्यावर त्याच गुन्ह्याकरितां पुन्हां खटला भरण्यांत येऊं नये. या कायद्यानें व्यक्तिस्वातंत्र्य रक्षिलें गेलें. हक्क मागणीचा अर्ज, मॅग्नाकार्टा वगैरे महत्त्वाच्या गोष्टींप्रमाणें याही कायद्याला इंग्लंडच्या राज्यघटनेंत महत्त्वाचें स्थान देण्यांत येतें. चार्ल्सनें मोठ्या नाइलाजानें या कायद्याला आपली संमति दिली; परंतु यानंतर पार्लमेंटनें वारसा रद्द ठरविण्याचें जें बिल पार्लमेंटमध्यें आणलें त्याला कसून विरोध केला.

१२. व्हिग व टोरी पक्षांची उत्पत्ति :—व्यक्ति स्वातंत्र्याचा कायदा पास झाल्यावर व्हिग पक्षानें यॉर्कचा ड्यूक, जेम्स, याच्यावर हत्यार उपसलें. सन १६७९ सालीं त्या पक्षानें इंग्लंडच्या गादीवरील जेम्सचा वारसा रद्द करण्याचें बिल पार्लमेंटपुढें मांडलें. जेम्स कॅथॉलिक पंथाचा होता व चार्ल्सनंतर तो राजा झाल्यास देशांत कॅथॉलिकांचें फावेल असें सर्वांस वाटत होतें. यामुळें त्या बिलास सर्वांचा पाठिंबा होता. त्या बिलाचीं कॉमन्स सभेंत दोन वाचनेंही पास झालीं होतीं. तेव्हां चार्ल्स राजा खवळून गेला व आपल्या भावाला वांचविण्याकरितां त्यानें ती पार्लमेंटच बरखास्त करून टाकली (१६७९). पार्लमेंटची पुन्हां निवडणूक झाली त्या वेळींही व्हिग पक्षाचीच पार्लमेंटमध्यें सरशी असल्यानें वारशाचें बिल पार्लमेंटमध्यें पुन्हां मांडण्यांत येणार होतें. परंतु राजानें ती सभाच बोलाविली नाहीं. तेव्हां शॅफ्टस्बरीनें देशांत दौरे काढून लोकांत भयंकर जागृति केली. त्याच्या सूचनांप्रमाणें अनेकांनीं राजाकडे एकसारखे अर्ज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्यास सुरवात करून पार्लमेंट बोलाविण्यास सांगितलें. अशा प्रकारचे अनेक अर्ज चार्ल्सकडे आले. या अर्ज करणारांस 'अर्जवाले' म्हणण्यांत येऊन त्या आर्जांचा ज्यांनीं निषेध केला त्यांना 'निषेधक' असें नांव ठेवण्यांत आलें. इंग्लंडमध्यें अशातऱ्हेनें उघडउघड दोन पक्ष स्थापन झाले. अर्जवाले शॅफ्टस्-बरीच्या प्रजापक्षाचे असून, निषेधक राजपक्षाचे होते. पुढें या दोन्ही पक्षांत एकसारखी हंमरी-तुमरी माजून ते एकमेकांस शिव्या देऊं लागले. उद्वेगाच्या भरांत निषेधकांनीं अर्जवाल्यांस 'व्हिग' म्हणून संबोधलें. व्हिग या पक्षाची व्युत्पत्ति मोठी मजेदार आहे. 'व्हे व्हे' करून स्कॉटिश गांवढळ आपले घोडे पिटाळीत. त्यावरून त्यांना 'व्हिगमोर' असें म्हणण्याचा प्रघात पडला होता. त्यावरूनच व्हिग हा शब्द बनला. अर्जवाले प्रॉटेस्टंट होते. त्यावरून त्यांस त्यांच्या विरोधी पक्षानें व्हिग हें निंदागर्भ नांव दिलें. लगेच व्हिग लोकांनींही आपल्या प्रतिपक्षीयांस आयरिय वंडखोरांस संबोधून वापरलें जाणारें 'टोरी' हें निंदागर्भ नांव दिलें. पुढें या दोन्ही शब्दांचा निंदागर्भ अर्थ जाऊन त्यांना इंग्लंडच्या राजकारणांत मान्यता मिळाली. हींच नांवें पुढें इंग्लंडांत सन १८३४ पर्यंत रूढ होतीं.

१३. वारसा रद्दीचें बिल (१६८१):—अर्जांवर अर्ज आले तरी चार्ल्स पार्लमेंट बोलाविना; परंतु शेवटीं कंटाळून राजानें पार्लमेंटसभा बोलाविली. ताबडतोब शॅफ्टस्बरीनें आपलें वारसा रद्द करण्याचें बिल पार्लमेंटमध्यें मांडलें. कॉमन्स सभेनें तें बिल ताबडतोब मान्य करून (१६८०) उमराव-मंडळाकडे पाठविलें. परंतु उमरावमंडळानें तें बिल नापास केलें. यामुळें कॉमन्स सभेला राग आला व त्याच्या भरांत राजाची पैशाची मागणी धुडकावून देण्यांत आली. तेव्हां राजानें पार्लमेंट बरखास्त केली. यानंतर राजानें सन १६८१ मध्यें लंडनला प्लेग असल्याच्या सबबीवर पार्लमेंटची सभा ऑक्सफर्डला बोलाविली. या ठिकाणीं राजपक्षाला नेहमींच पाठिंबा असे. शिवाय ऑक्सफर्डला लोकसमुदाय व्हिग पक्षाला उत्तेजन द्यावयाला तयार नव्हता. अशा स्थितींत व्हिग पक्षाशीं राजानें तडजोडीचें बोलणें सुरू केलें. परंतु त्या पक्षाचें समाधान झालें नाहीं. त्यावेळीं राजानें कॉमन्स सभा व उमराव-मंडळ यांना एकत्र बोलाविलें. तेव्हां आतां तरी राजा आपल्या मनाप्रमाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वारसा रद्द करण्याच्या बिलाला मान्यता देईल असें व्हिग पक्षीयांस वाटलें. परंतु राजानें त्यांच्या तोंडाला पानें पुसून पार्लमेंटसभा कायमची बरखास्त केली. ताबडतोब ऑक्सफर्ड सोडून ते लंडनला गेले. पैशाकरितां राजा वारसा रद्द करण्याच्या बिलाला मान्यता देणार होता; परंतु त्याच वेळीं लुईकडून अडीच-लाख पौंड मिळाल्यानें त्यानें पार्लमेंटला धुडकावून दिलें. जेम्सला इंग्लंडचें राज्यपद मिळालें नाहीं तर हॉलंडचा विल्यम इंग्लंडचा राजा होणार व मग तो आपलें उट्टें काढणार ही मोठी भीति लुईला असल्यानेंच त्यानें चार्ल्सचें तोंड सोन्याच्या किल्लीनें बंद केलें व आपल्यावरील संकट तात्पुरतें टाळलें.

१४. चार्ल्सचा अनियंत्रित कारभार (१६८१–८५) :—यानंतर चार्ल्सनें अनियंत्रितपणें राज्यकारभार करण्याचें ठरविलें. या काळांत व्हिग पक्षाला नेस्तनाबूद करण्याचा त्यानें मोठा यशस्वी प्रयत्न केला. त्यानें शॅफ्टस्-बरीवर राजद्रोहाबद्दल खटला भरला; परंतु ज्यूरीनें त्याला निर्दोषी ठरवून सोडून दिलें. तेव्हां राजाच्या भितीनें तो हॉलंडमध्यें पळून गेला. तेथेंच तो सन १६८३ मध्यें मरण पावला. त्यानंतर राजानें अनेक शहरांच्या सनदा या ना त्या कारणाकरितां दुरुस्त केल्या. दुरुस्त करतांना त्यानें त्या त्या शहरातर्फे राज-पक्षीय टोरी लोकच निवडून येतील अशी व्यवस्था केली होती. अर्थात् या व्यवस्थेमुळें व्हिग पक्षाला पार्लमेंटमध्यें मताधिक्य मिळणार नाहीं असें त्यास वाटलें व त्याप्रमाणें घडलेंही. कारण शहरातर्फे होणाऱ्या प्रत्येक म्युनिसिपल निवडणुकीस आपली संमति असली पाहिजे असें त्यानें ठरविलें होतें. या म्युनिसिपालिट्यांकडूनच पार्लमेंटची निवडणूक होई. अर्थात् म्युनिसिपालिटी-मध्यें टोरी मताधिक्य असलें म्हणजे राजाचें भागे. अशा तऱ्हेची दक्षता त्यानें बाळगल्यामुळें पुढें पार्लमेंटमध्यें टोरी पक्षच बळवान झाला. सन १६८३ मध्यें राजा चार्ल्स व त्याचा भाऊ जेम्स यॉर्कचा ड्यूक, यांना ठार करण्याचा एक कट रचण्यांत आला. 'राय हाऊस' या आपल्या निवासस्थानावरून राजा आपल्या भावासह परत येत असतांच त्या दोघांचा खून करावयाचा असें ठरविण्यांत आलें होतें. या कटांत अनेक व्हिग लोक सामील असल्याचें उघडकीस आलें. रंबोल्ड कटवाल्यांचा मुख्य पुढारी होता व कटांत सामील असल्याच्या संशयावरून लॉर्ड रसेल, सिडने, हॉवर्ड, राजाचा अनौरस पुत्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मन्मथ वगैरे व्हिग लोकांस पकडण्यांत आलें. लॉर्ड रसेल व सिडने यांना कटाचा गंध नसतांही त्यांस फाशीं देण्यांत आलें. मन्मथ शरण आल्यानें राजानें त्याला हॉलंडमध्यें हद्दपार केलें व हॉवर्डला माफीचा साक्षीदार ठरवून सोडून देण्यांत आलें. या कटामुळें व्हिग पक्ष रसातळास गेला; राजाचा व राजपक्षीयांचा डाव यशस्वी झाला. अशातऱ्हेनें आपल्या प्रतिपक्षीयांवर विजय मिळवीत असतांच चार्ल्स सन १६८५ मध्यें एकाएकीं मरण पावला. मरतां मरतां आपण रोमन कॅथॉलिक असल्याचें त्यानें सांगितलें.

अभ्यास

१. कॅबॉल मंत्रिमंडळासंबंधाची तुम्हांस असलेली सर्व माहिती सांगा.

२. डॅन्बी कोण होता ? त्याला प्रधान केव्हां करण्यांत आलें ? त्याच्या कारभारासंबंधीं सर्व हकीकत सांगा.

३. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या :—
धर्मकसोटीचा कायदा, चार्ल्सची दिवाळखोरी, सवलतींचा जाहीरनामा, डोव्हरचा तह (१६७०), डचांशीं युद्ध, व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा, व्हिग व टोरी, वारसारद्दीचें बिल, राय हाऊस कट, टायटस ओटस्.

४. फ्रान्स व इंग्लंड यांचे दुसऱ्या चार्ल्सच्या कारकीर्दीत कशा प्रकारचे संबंध होते ? त्याचा इंग्लंडवर काय परिणाम झाला ?

५. चार्ल्सनें सवलतींचा जाहीरनामा कां काढला ? तो धर्मस्वातंत्र्याचा खरा अभिमानी होता ? कशावरून ? त्याच्या कारकीर्दीत प्रॉटेस्टंटांचा व प्यूरिटनांचा छळ कां झाला ?

६. ज्या कायद्यांमुळें इंग्लंडची राज्यघटना तयार झाली ते कोणते ? व्यक्तिस्वातंत्र्याच्या कायद्यास त्यांत स्थान आहे का ? कशाकरितां ? त्याचें वैशिष्ट्य काय ?

७. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
चौदावा लुई, ऑर्लीन्सची डचेस, यॉर्कचा ड्यूक जेम्स, डी विट, ऑरेंजचा विल्यम, शॅफ्टसूबरी, एडमंड गॉडफ्रे, अर्जवाले, रंबोल्ड, मन्मथ.

८. दुसरा चार्ल्स कार्यसाधु व स्वार्थसाधु होता हें सोदाहरण सिद्ध करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालदर्शी—इ. स. १६६०-१६८५.

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	युरोप-महत्त्वाच्या गोष्टी	हिंदुस्थान-महत्त्वाच्या गोष्टी	प्रमुख व्यक्ति
१६६०→	१६६०–१६८५ दुसरा चार्ल्स	१६४३–१७१५ चौदावा लुई-फ्रान्सचा राजा	१६५९ अफझलखानाचा वध	औरंगजेब,
→	१६६१–१६६५ क्लॅरेंडन कोड			शिवाजी, क्लॅरेंडन,
→	१६६२ डंकर्क विकलें	१६६२ चार्ल्स-पोर्तुगालची राजकन्या यांचा विवाह-मुंबेट इंग्रजांस मि.	१६६२ बाजीप्रभूचा पराक्रम	शहाजी,
-			१६६४ शहाजीचा मृत्यु; सुरतेवर हल्ला	
→	१६६५ हॉलंडशीं युद्ध-प्लेग		१६६६ आग्र्याहून सुटका	
→	१६६६ अग्निप्रलय			
→	१६६७ ब्रेडाचा तह	१६६७ फ्रान्स व स्पेन युद्ध		
-				यॉर्कचा ड्यू
१६७०→	१६७० डोव्हरचा तह		१६७० गड आला पण सिंह गेला	डॅन्बी,
→	१६७२ सवलतींचा जाहीरनामा	१६७२ डिविटचा खू. फ्रेंच-डच युद्ध		
→	१६७३ धर्म कसो. का.			
→	१६७४ मिल्टनचा मृत्यु	१६७४ लंडनचा तह इंग्लंड-हॉलंड		मिल्टन,
-	१६७७ वि. व मेरी-लग्न		१६७७ शिवाजी.द.दि.	
-	१६७८ डॅन्बीचा अध.	१६७८ निमोजेनचा तह-फ्रा. हॉ.		टायटस,
-	१६७९ व्यक्ति स्वा.का.			ओटस,
१६८०→	१६८० व्हिग व टोरी		१६८० शिवाजीचा मृ.	शॅफ्टसबरी
-			१६८२–१७०७	
-	१६८३ राय हाऊस कट		औरंगजेबाची द. स्वारी	संभाजी,
१६८५→	दुसऱ्या चार्ल्सचा मृत्यु			

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. उज्वल राज्यक्रांति–अनियंत्रित राजसत्तेचा शेवट

१. **दुसरा जेम्स** (१६८५–१६८८) **स्वभाव** :—चार्ल्सच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ जेम्स 'दुसरा जेम्स' म्हणून इंग्लंडच्या गादीवर बसला; त्यावेळीं त्याचें वय बावन्न वर्षांचें होतें. त्याचा स्वभाव चार्ल्सच्या स्वभावापेक्षां अत्यंत भिन्न होता. सत्यनिष्ठ व स्वाभिमानी असला तरी तो मनाचा क्षुद्र व कोता होता. कोडगेपणा व क्रौर्य त्याच्या ठिकाणीं पुरतेपणीं मुरलेलें होतें. दिसण्यांत तो मोठा करारी व दृढनिश्चयी दिसे. अनियंत्रित राजसत्तेचा तो अभिलाषी असून राजाच्या ईश्वरदत्त सत्तेवर त्याचा पूर्ण विश्वास होता. क्रौर्य, हेकेखोरपणा, आळशीपणा, तुसडेपणा, बेफिकिरी वगैरे अनेक दुर्गुण त्याच्या ठिकाणीं असले तरी तो अत्यंत कष्टाळू, निष्कपटी, आनंदी व निर्व्यसनी होता. राज्यकारभाराचा त्याला उत्तम अनुभव मिळाल्यानें तो मोठा वाकबगार कारभारी बनला होता. कोणतीही गोष्ट त्याला चटकन समजत असे. त्याच्या ठिकाणीं चार्ल्सचा दुटप्पीपणा नव्हता. त्याच्या बुद्धीला एकदां कोणतीही गोष्ट पटली म्हणजे तो ती तडीस नेल्याशिवाय रहात नसे. सर्व दोष प्रधानांवर टाकून आपण नामानिराळें राहण्याची कला चार्ल्सला जशी साधली, अगर नमतें केव्हां घ्यावें व ओढून केव्हां धरावें हें जसें चार्ल्सला उत्तम समजे, तसें जेम्सला समजत नसल्यानें त्याची फजिती झाली. रोमन कॅथॉलिकपंथावर त्याचा पूर्णपणें विश्वास होता व राज्यपद हातीं आल्यावर त्या धर्माचा इंग्लंडभर फैलाव करण्याचें त्यानें ठरविलें होतें. त्याचप्रमाणें पार्लमेंटला धाब्यावर बसवून सर्व सत्ता आपल्या

दुसरा जेम्स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हातीं घेण्याचाही त्यानें निश्चय केला होता. परंतु त्याचे दोन्हीही निश्चय त्याच्या अंगलट आले.

२. जेम्सला राज्याभिषेक :—राज्यपद मिळाल्याबरोबर जेम्सनें आपला मेव्हणा रॅाचेस्टरचा अर्ल याला आपल्या सल्लागारमंडळांत घेतलें. त्याचप्रमाणें लॉर्ड हॅलिफॅक्स, लॉर्ड गोडोलफिन व लॉर्ड संदरलंड हेही त्या मंडळांत होते. राज्यप्राप्तीबरोबर त्यानें राष्ट्रास असें वचन दिलें कीं, 'प्रस्थापित धर्मव्यवस्थेंत व प्रचलित राज्यव्यवस्थेंत मी ढवळाढवळ करणार नाहीं.' त्याचा अभिषेक-समारंभही प्रस्थापित धर्माप्रमाणें झाला. मात्र किरकोळ गोष्टी कॅथॉलिक धर्म-विधीप्रमाणें करण्याचा त्यानें हट्ट धरला व तो पार पाडला. त्याला राज्यपद मिळाल्यानें कॅथॉलिकपंथीयांस व टोरीपक्षीयांसही आनंद झाला. मी कॅथॉलिक धर्माचा अभिमानी असलों तरी राज्यकर्ता या नात्यानें मी त्या पंथाचा राहणार नाहीं व व्यक्ति म्हणूनच त्या पंथाचीं बंधनें मी पाळीन, असें त्यानें राष्ट्रास सांगितल्यामुळें प्रॉटेस्टंटही मनांत खूष होते. तरी त्यांचा त्याच्यावर विश्वास नव्हता आणि त्यांचा हा अविश्वास खरा ठरला. राज्यप्राप्ति झाल्यावर त्यानें लागलीच आपलीं वचनें मोडण्यास सुरुवात केली. त्याच्या कारकीर्दीच्या सुरुवातीलाच एकंदर अनुकूल स्थिति होती; परंतु त्याचा जितका फायदा घ्यावयास पाहिजे तितका त्यानें घेतला नाहीं व आपल्या वर्तनानें राज्य घालविलें.

३. आरंभींच्या घडामोडी :—अगदीं प्रथमच जेम्सनें दिलेलें वचन मोडलें व जकातीचें उत्पन्न वसूल करण्याचे हुकूम सोडले. अशा कृत्यास पार्लमेंटची संमति असावयास पाहिजे; परंतु जेम्सनें त्या गोष्टीकडे कानाडोळा केला. पुढें सन १६८५ मध्यें त्यानें पहिली पार्लमेंट बोलाविली. दुसऱ्या चार्ल्सनें सर्व शहरांच्या सनदांमध्यें फेरफार केले असल्यानें या पार्लमेंटमध्यें राजाला अनुकूल असे टोरी लोकच निवडून आले होते. उमरावमंडळांतही नेहमींच राजाला अनुकूल वातावरण असे. यामुळें या पार्लमेंटनें राजाला एकदम एकोणीस लक्ष पौंडांची तहाहयात नेमणूक करून दिली. एवढेंच नव्हे, तर साखर व तंबाखू यांवरील जकातीचें उत्पन्नही त्याला दिलें. याच सुमारास लुईकडूनही त्याला सदुसष्ट हजार पौंड मिळालेले होते. अशा तऱ्हेनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याची पैशाची ददात कायमची नाहींशी होऊन पार्लमेंटकडे त्याला वारंवार तोंड वेंगाडावें लागणार नव्हतें. याच सुमारास टायटस ओटस् व त्याचा साथीदार डेंजरफील्ड याला खोटी माहिती व न्यायाधीशापुढें खोटी साक्ष दिल्याबद्दल पकडण्यांत आलें. ओटस्ला जेफ्रेज नांवाच्या निर्दय न्यायाधीशानें कडक शिक्षा केली. त्याला जन्मठेपीची तर शिक्षा झालीच, परंतु चालत्या गाडीच्या मागें बांधून रस्त्यानें चाबकानें झोडपीत न्यावें व वर्षातून पांच वेळां खोडा द्यावा असें ठरविण्यांत आलें. इतकें होऊनही ओटस् वांचला! पुढें त्याला विल्यमच्या कारकीर्दीत सोडून देण्यांत आलें. त्याचा साथीदार डेंजरफील्ड मात्र चाबकाचा मार खातां खातां अपघातानें मेला. याच सुमारास बॅक्स्टर नांवाच्या एका धर्मगुरूनें प्रॉटेस्टंटांच्या छळाचा निषेध केला. तेव्हां त्याच्यावर खटला होऊन त्याला भयंकर शिक्षा देण्यांत आली.

४. मन्मथचें बंड (१६८५):—जेम्सला राज्याभिषेक झाल्यानें छळाच्या भीतीनें अनेक व्हिग लोकांनीं देशत्याग केला व ते हॉलंडांत पळून गेले. हॉलंडांत यावेळीं दुसऱ्या चार्ल्सचा अनौरस पुत्र मन्मथ होता. त्याला राजा करावा असें या मंडळीस वाटत होतें. अर्गाईलचा ड्यूक व मन्मथ यांनीं हॉलंडमध्यें असतांच संगनमत करून राज्यप्राप्तीकरितां बंड करण्याचें ठरविलें. लगेच अर्गाईल स्कॉटलंडांत गेलो व त्यानें मन्मथच्या वतीनें बंड उभारलें. परंतु त्याचा पराभव होऊन त्यास सन १६८५ मध्यें फाशीं देण्यांत आलें. त्याच वेळीं मन्मथही आपल्या अनुयायांसह इंग्लंडमध्यें डॉर्सेटशायरमधील लाइमरेजिस येथें उतरला. त्यानें दौरे काढून आपल्या अनुयायांत भर घातली. 'आपण प्रॉटेस्टंट धर्माचें व इंग्लंडच्या कायद्यांचें परिपालन करूं' असें तो सांगे. शेवटीं त्याच्या अनुयायांनीं त्याला टाँटन येथें राज्याभिषेकही केला.

न्यायाधीश जेफ्रेज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां राजानें त्याच्यावर सैन्य पाठवून सेजमूर येथें त्याचा पराभव केला. मन्मथ पळून जात असतांच त्याला पकडून लंडनच्या टॉवरमध्यें असलेल्या टेकडीवर फाशीं देण्यांत आलें. त्याच वेळीं त्याच्या साथीदारांस राजाचा सेनानी कर्क व न्यायाधीश जेफ्रेज यांनीं अत्यंत निर्दयपणें वागवून त्यांची कत्तल केली. ही कत्तल इतकी अमानुष होती कीं त्यामुळें क्रौर्य म्हणजे कर्क व जेफ्रेज असें समीकरणच लोक मांडीत! मन्मथच्या सुमारें तीनशें अनुयायांस निर्दयपणें फाशीं देण्यांत आलें व आठशें लोकांस गुलाम म्हणून विकून ईस्ट इंडीज बेटांकडे रवाना करण्यांत आलें. याशिवाय अनेकांना फटके मारणें, गाडीच्यामागें बांधून चाबकानें मारीत नेणें वगैरे अनेक प्रकारच्या क्रूर शिक्षा देण्यांत आल्या होत्या! मन्मथचा पराभव झाल्यावर कर्क व जेफ्रेज ही दुक्कल गांवोगांव हिंडे, बंडखोरांस अगर ते न सांपडल्यास संशयित बंडखोरांस पकडीत, मग त्यांची न्यायाधीश जेफ्रेज यांच्यापुढें झटपट चौकशी करण्यांत येई व त्यांना अत्यंत निर्दय व अमानुष अशा शिक्षा देण्यांत येत. जेफ्रेज याच्या अमानुष वर्तनामुळें देशांत हाहाःकार उडाला; मात्र जेम्सनें शाबासकी व अनेक देणग्या देऊन त्याला लॉर्ड चॅन्सलर केलें. ज्यांना गुलाम म्हणून विकण्यांत आलें त्यांनीं गुलामगिरींतून मुक्त करण्याकरितां आपल्या मालकाला जबर रक्कम दिली. वरील व्यवहारांत अनेकांनीं पैसा मिळविला तो निराळाच! या सर्व प्रकारांमुळें जेम्सबद्दल लोकांस जरब बसली व त्यानंतर एकही बंड इंग्लंडांत झालें नाहीं.

५. **कॅथॉलिक पंथाच्या प्रसारार्थ खटपट :**—अशा तऱ्हेनें सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यावर जेम्सनें आपलें ध्येय गांठण्यास सुरुवात केली. इंग्लंड-मध्यें त्याला कॅथॉलिक पंथाचा प्रसार करून अनियंत्रित राजसत्ता उपभोगा-वयाची होती, हें मागें सांगितलेंच आहे. अर्थात् मन्मथच्या बंडांतून मुक्त झाल्यावर तो कॅथॉलिक पंथाच्या प्रसाराकडे वळला. आजपर्यंत टोरी पक्षानें त्याला बरीच मदत केली होती व त्यांच्या मदतीनें आपण वाटेल ती गोष्ट करूं असें त्याला वाटत होतें; पण ही त्याची चूक होती. कॅथॉलिक धर्माच्या प्रसाराचे कामीं धर्मकसोटीचा कायदा प्रथम त्याच्या आड आला. तेव्हां पार्लमेंटनें तो कायदा रद्द करावा अशी त्यानें आपली इच्छा दर्शविली, परंतु पार्लमेंटनें तसें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलें नाहीं. तेव्हां पार्लमेंटच्या कोणत्याही कायद्यापासून कोणत्याही व्यक्तीस माफी देण्याचा व कोणताही कायदा तात्पुरता रद्द करण्याचा अधिकार राजाला आहे असें तो म्हणूं लागला व याचा पडताळा पाहण्याकरितां सर एडवर्ड हेल्स या आपल्या कॅथॉलिक पित्त्यास त्यानें लष्करांत अधिकाराची जागा दिली. पण त्यानें कायद्याप्रमाणें धार्मिक शपथ घेतली नाहीं, हें पाहून त्याचा दुय्यम गॉडन यानें तक्रार केली. तेव्हां हेल्सला कोर्टानें बोलाविलें. त्यावेळीं राजाचें शपथ-माफीपत्र त्यानें कोर्टाला सादर करतांच कोर्टानें त्याला सोडून दिलें. यामुळें राजाला इतका आनंद झाला, कीं त्यानें कोर्टाच्या निकालाचा आधार दाखवून लष्करांत व इतरत्रही धर्मकसोटीचा कायदा झुगारून देऊन कॅथॉलिकांच्या नेमणुका करण्याचा सपाटा चालविला (१६८५). यानंतर पुढच्याच वर्षीं त्यानें एक धार्मिक कोर्ट—हाय कमिशन कोर्ट—स्थापन केलें व त्याच्या मदतीनें त्यानें कॅथॉलिक धर्माचा प्रसार करण्यास सुरुवात केली. जेफ्रेज हाच कोर्टाचा मुख्य न्यायाधीश होता. या कोर्टानें अनेक प्रकारचे हुकूम सोडून पोपविरुद्ध उपदेश करणें अन्याय्य ठरविलें; अनेक रोमन कॅथॉलिकांच्या वृत्ती सुरू केल्या व पैसा पुरवून धर्ममठ स्थापण्यास त्यांस उत्तेजन दिलें.

६. विश्वविद्यालयांवर धाड (१६८६):—विश्वविद्यालयांत तरणेबांड लोक विद्याभ्यासास येत. तेथें प्रस्थापित धर्माचाच ते अभ्यास करीत असल्यामुळें विश्वविद्यालयांतून बाहेर पडल्यावर ते त्याच धर्मपंथाचा प्रसार करणार. तेव्हां त्यांना प्रस्थापित धर्माच्या ऐवजीं रोमन कॅथॉलिक पंथाचा अभ्यास करणें भाग पाडलें तर आपलें काम आयतेंच होईल, या विचारानें असो कीं अन्य कारणामुळें असो जेम्सनें आपलें लक्ष विश्वविद्यालयांकडे दिलें. त्यावेळीं सर ऐझॅक न्यूटन हा प्रसिद्ध प्रॉटेस्टंट शास्त्रज्ञ केंब्रिज विश्वविद्यालयाचा कुलगुरु होता. एका कॅथॉलिकानें प्रस्थापित धर्माप्रमाणें शपथ घेण्याचें नाकारल्यामुळें जेम्सनें सांगितलें असतांही न्यूटननें त्याला एम्. ए. ची पदवी दिली नाहीं. हें कारण पुढें करून जेम्सनें कुलगुरुपदावरून न्यूटनला काढून टाकलें. त्याच्याबरोबरच इतर सात-आठ जणांसही त्यानें त्यांच्या जागांवरून हुसकलें. यानंतर त्याची दृष्टि ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाकडे वळली. तेथील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मॅगडेलन कॉलेजांतील फेलोंनीं अँटनी फार्मर या कॅथॉलिकास आपला अध्यक्ष निवडावा असें जेम्सनें दर्शविलें. त्यांनीं नकार देतांच त्यांची हकालपट्टी करण्यांत आली व त्यांच्या जागा कॅथॉलिकांना देण्यांत आल्या. पुढें त्यानें पार्कर नांवाच्या एका प्रच्छन्न कॅथॉलिकाची त्यांच्या अध्यक्षाच्या जागीं नेमणूक केली. अशाच तऱ्हेनें त्यानें दुसऱ्या कित्येक कॉलेजांच्या कारभारांत ढवळा-ढवळ केली. त्यामुळें जिकडेतिकडे असंतोषाचे वारे वाहूं लागले व जेम्सच्या अरेरावी वर्तनाचा निषेध होऊं लागला. आणि या सगळ्या उचापती त्यानें लष्कराच्या जोरावर केल्या हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कारण या वेळीं राजाजवळ सुमारें तेरा हजार खडी फौज होती व ती त्यानें तीस हजारांपर्यंत वाढविली होती !

७. सवलतींचा जाहीरनामा (१६८७) :—अशा तऱ्हेच्या अरेरावी कृत्यांमुळें प्रॉटेस्टंटांना त्याचा संताप आला होता. त्यामुळें त्यांचा आपल्याला पाठिंबा मिळणार नाहीं असें राजाला आतां वाटूं लागलें होतें. तशांतच सन १६८५ मध्यें फ्रान्सचा बादशाह, चौदावा लुई, यानें नँटीजच्या कायद्यानें प्रॉटेस्टंटांना दिलेल्या सवलती काढून घेतल्या. त्यामुळें अनेक फ्रेंच प्रॉटेस्टंट युरोपांतील निरनिराळ्या देशांत गेले होते. त्यांपैकीं अनेक लोक इंग्लंडांतही आले होते. ते कसलेले कारागीर होते. त्यामुळें इंग्लंडच्या उद्योगधंद्यांची वाढ होऊं लागली. त्यांनींही कॅथॉलिकांविरुद्ध इंग्लंडांत प्रचार सुरू केला. अशा परिस्थितींत टोरी पक्षही राजाच्या अरेरावी वर्तनानें खवळून गेला होता व व्हिग व टोरी सहमत करीत होते. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन प्रॉटेस्टंटांना खूष करण्याकरितां पण अंतर्यामीं कॅथॉलिकांना सवलती देण्याकरितां, जेम्सनें सन १६८७ सालीं सवलतींचा जाहीरनामा काढला. या जाहीरनाम्यानें कॅथॉलिक, प्रॉटेस्टंट, प्यूरिटन्स वगैरेविरुद्ध पास करण्यांत आलेले सर्व कायदे त्यानें रद्द केले. वस्तुतः पाहतां त्याचें हें कृत्य कायदेशीर नव्हतें. कारण या गोष्टी पार्लमेंटलाच करतां येत. शिवाय पार्लमेंटच्या परवानगीशिवाय त्यानें हा जाहीरनामा लावला होता. परंतु राजाला कोणताही कायदा तात्पुरता रद्द करतां येतो असें तो म्हणूं लागला. या कृत्यानें प्रॉटेस्टंटांचें समाधान होईल असें त्याला वाटत होतें; परंतु झाली गोष्ट उलटी ! सर्व प्रॉटेस्टंटांनीं राजाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरील कृतीचा निषेध केला. राजाचीं हीं सारीं कृत्यें लोकांचें स्वातंत्र्य हरण करण्याकरितांच आहेत हें त्यांनीं जाणलें, व त्यांनीं राजाला विरोधण्याचें ठरविलें. याच सुमारास त्यानें सवलतींचा जाहीरनामा पुन्हां प्रसिद्ध केला व सर्व धर्मगुरूंनीं दर रविवारीं प्रार्थनेच्या वेळीं तो वाचला पाहिजे असें फर्माविलें.

८. सात बिशपांवरील खटला (१६८८) :—सवलतींचा जाहीरनामा प्रार्थनेच्या वेळीं दर रविवारीं वाचला पाहिजे असा हुकूम फर्मावतांच सर्व धर्मगुरू चिडले व तो हुकूम धाब्यावर बसविण्याचें त्यांनीं ठरविलें. तो वाचण्याचें धैर्य कांहींनीं दाखविलें; परंतु त्यावेळीं सर्व लोक त्याच्या निषेधार्थ प्रार्थना सोडून निघून गेले ! अशा स्थितींत लंडनचे सर्व बिशप कँटरबरीचा आर्चबिशप सॅन्क्रॉफ्ट याच्याकडे गेले व त्यांनीं एक विनंतिअर्ज करून सवलतींच्या जाहीरनाम्याच्या वाचनाची सक्ति करूं नये, असें राजाला विनविण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें सात बिशपांनीं एक अर्ज तयार केला व ते



सात बिशपांच्या खटल्याच्या वेळचें पदक

राजाकडे गेले. त्या वेळीं रात्र होती व राजा झोंपण्यास गेला होता. बिशप आले आहेत असें कळतांच तो त्यांच्याकडे गेला व त्यांचा अर्ज वाचून तो संतापाच्या भरांत त्यांना म्हणाला, ' हा विनंतिअर्ज कसला ? हें एक राजद्रोही पत्रक आहे. ' लगेच थोड्या दिवसांनंतर त्या सातीजणांस पकडून कोर्टापुढें खेंचण्यांत आलें. त्यांना दोषी ठरवून शिक्षा व्हावी म्हणून राजानें आपलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुष्कळ वजन खर्च केलें. तरीही ज्यूरीनें सर्वजण निर्दोषी आहेत असा आपला निकाल दिला. त्या निकालानें लोकांना इतका आनंद झाला कीं लंडनमधील लोकांनीं त्या साती बिशपांच्या सन्मानार्थ रोषनाई केली, मोठा दीपोत्सव केला व प्रत्येक खिडकींत सात सात मेणबत्या (प्रत्येक बिशपाचें एकेक प्रतीक म्हणून) तेवत टेवल्या. राजाच्या सैन्यालाही वरील आनंदांत भाग घेतल्याशिवाय राहवेना व त्यांनींही आनंदानें टाळ्या पिटल्या. यामुळें जेम्सला अत्यंत त्वेष आला व त्यानें आयर्लंडांतून सुमारें पांच हजार सैनिक लंडनला बोलाविले.

९. जेम्सला पुत्ररत्नाची प्राप्ति :—येथपर्यंत जेम्सनें टोरी सरदार, मध्यमवर्गीतील लोक, धर्मपीठ, विश्वविद्यालयें व प्रॉटेस्टंट या सर्वांना दुखविलें व आपल्या धर्मपंथाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. तरी त्याची घटका पूर्णपणें भरलेली नव्हती. राजा म्हातारा आहे व त्याला मुलगा नसल्यानें त्याच्यामागून त्याची प्रॉटेस्टंट मुलगीच, . चार-दोन वर्षांनीं तो मेल्यानंतर, इंग्लंडची राणी होणार असें लोकांस वाटत होतें. बंड करावें तर राजाजवळ सैन्यही थोडेंथोडकें नव्हतें. तेव्हां त्याचा छळ शक्यतों सहन करावा असें सर्वांचें म्हणणें होतें. परंतु सन १६८८ मध्यें राजाची दुसरी राणी प्रसूत होऊन तिला मुलगा झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली. त्याबरोबर लोकांचें धाबें दणाणलें! कारण हा मुलगा पुढें राजा होणार हें निश्चित. व तोही जेम्ससारख्या कॅथॉलिक पंथाभिमान्याच्या तालमींत तयार झालेला ! अर्थात् आपला छळ येथेंच थांबत नसून त्या मुलाच्याही कारकीर्दींत तो होणार हें निश्चित. यामुळें जिकडेतिकडे विषण्णतेचें वातावरण पसरलें. तशांतच कोणीं कंडी पिकविली कीं तो जेम्सचा मुलगा नसून दुसऱ्या कोणाचा मुलगा राजानें पळविला व तो आपलाच मुलगा म्हणून प्रसिद्ध केलें ! अशा सर्व धांदलींत व्हिग व टोरी पक्षांतील सात पुढाऱ्यांनीं एक पत्र लिहून दर्यासारंग हर्बर्ट याच्या हातीं हॉलंडमध्यें मेरीचा नवरा, विल्यम, याच्याकडे तें पाठवून दिलें व इंग्लंडांतील लोकांना जेम्सच्या छळापासून मुक्त करण्याकरितां व लोकांचें स्वातंत्र्य व त्यांचा धर्म यांचें संरक्षण करण्याकरितां मोठ्या सैन्यासह इंग्लंडांत बोलाविलें. त्याप्रमाणें विल्यम इंग्लंडला येण्याकरितां निघालाही. मध्यंतरीं ही बातमी लुईकडून जेम्सला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कळली. तेव्हां तो घाबरला, सुमारें चाळीस हजार सैन्यही त्यानें जमा केलें व लोकांना वळवून घेण्याकरितां त्यानें निरनिराळे कायदे रद्द केले, हायकमिशन कोर्टाला रजा दिली, विश्वविद्यालयांस पूर्वीचे अधिकार दिले, कॅथॉलिकांच्या नेमणुका रद्द केल्या, लोकस्वातंत्र्य देईन, लोकांच्या हक्कांचें पालन करीन वगैरे वचनें दिलीं. परंतु लोकांचा आतां त्याच्यावर विश्वास बसेना. इतक्यांत विल्यम इंग्लंडांत उतरल्याची बातमी त्याला कळली. तो त्याच्यावर चाल करून जाणार होता; परंतु त्याच्या लष्करानें त्याची बाजू सोडून दिली; व एकामागून एक सर्वजण विल्यमला मिळाले. त्याची मुलगी ॲनही त्याला सोडून गेली. अशा स्थितींत पळून जाण्याशिवाय त्याला मार्गच नव्हता. तो पळत असतांच एकदां पकडला गेला व त्याला लंडनला नजर कैदेंत ठेवण्यांत आलें. परंतु तेथूनही तो पुन्हां निसटला व फ्रान्समध्यें जाऊन त्यानें लुईचा आश्रय पत्करला. त्यामुळें विल्यमचा मार्ग मोकळा झाला.

१०. जेम्सनंतरची व्यवस्था:—जेम्स पळून गेल्यानें इंग्लंडमध्यें राज्यक्रांति झाली. इंग्लंडला राजा नव्हता. त्या देशांत राजसत्ताच नसल्यानें कारभारही थंडावला. यामुळें देशांत थोडी गडबड उडाली व कनिष्ठ वर्गांतील लोकांनीं लंडनमध्यें लुटालूट करून अराजकता माजविली. कॅथॉलिक देवळांवर हल्ले होऊं लागले व कॅथॉलिकांच्या छळास सुरुवात झाली. इतक्यांत विल्यम लंडनला येऊन पोंचला व लंडनच्या कांहीं वजनदार लोकांनीं एक सरकार स्थापन करून जिकडे तिकडे स्थीरस्थावर केलें. लंडनमध्यें आल्यावर विल्यमनें लंडनचे सरदार, प्रमुख नागरिक व पूर्वीच्या पार्लमेंटचे अनेक सभासद यांची एक सभा भरविली. या सभेनें पार्लमेंटची सभा बोलावण्याचा विल्यमला सल्ला दिला. त्याप्रमाणें सन १६८९ मध्यें पार्लमेंट भरली. विल्यमला राज्याभिषेक झालेला नसल्यानें त्यानें बोलाविलेल्या या सभेला 'अनधिकृत पार्लमेंट' म्हणतात. 'जेम्स पळून गेल्यानें इंग्लंडची गादी रिकामी झालेली आहे; त्याचप्रमाणें त्याचा त्या गादीवरील अधिकार नष्ट झाला आहे; अनुभवानें इंग्लंडच्या गादीवर कॅथॉलिक राजा असणें, या राज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीनें विघातक आहे असें सिद्ध झालें आहे,' अशा तऱ्हेचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरील पार्लमेंटनें एक ठराव पास केला. यानंतर मेरीला राज्याभिषेक करण्यांत येऊन विल्यमनें राज्यपालकाचें काम करावें किंवा त्यानें जेम्सचा प्रतिनिधी म्हणून काम करावें असा एक बूट निघाला. तेव्हां विल्यमनें पार्लमेंटला खडखडीतपणें बजाविलें कीं 'पळून गेलेल्या राजाचा प्रतिनिधी किंवा राणीच्या राज्याचा पालक म्हणून मी राज्यकारभार करणार नाहीं.' तेव्हां विल्यम व मेरी या दोघांनाही एकत्र राज्याभिषेक करण्यांत येऊन दोघांनींही राज्यकारभार करावा असें ठरलें. विल्यम नाखूष होऊन जर हॉलंडला परत गेला तर फ्रान्सच्या मदतीनें जेम्स इंग्लंडवर स्वारी करील व मग तो राजा झाल्यास पुन्हां यमयातना भोगाव्या लागतील, असें सर्वांस वाटत असल्यानेंच वरील तडजोड सर्वांस मान्य झाली होती. विल्यमलाही ती मान्य झाल्यानें विल्यम व मेरी यांस राज्याभिषेक झाला.

११. हक्कांचा जाहीरनामा (१६८९):—प्रत्यक्ष राज्याभिषेक करण्यापूर्वीं या पार्लमेंटनें विल्यम व मेरी यांच्याकडून कांहीं अभिवचनें घेतलीं. जेम्सनें केलेल्या सर्व अन्याय्य गोष्टींचा एका जाहीरनाम्यांत उल्लेख करण्यांत आला व त्याला कायद्याचें स्वरूप देण्यांत येऊन तो विल्यम व मेरी यांच्या संमतीकरितां पाठविण्यांत आला. त्या जाहीरनाम्यांत खालील गोष्टी प्रमुख होत्या. (१) कायदा तात्पुरता रद्द करण्याचा अगर त्यापांसून कोणासही माफी देण्याचा राजास अधिकार नसावा. (२) हायकमिशन व तत्सम धार्मिक कोर्टें अन्याय्य होत. (३) आपल्या अधिकारांत व पार्लमेंटच्या संमतीशिवाय कोणताही कर राजानें बसविणें अन्याय्य आहे. (४) शांततेच्या वेळीं पार्लमेंटच्या मंजूरीशिवाय खडी फौज ठेवणें बेकायदा होय. (५) आपलीं गाऱ्हाणीं राजापुढें अर्जद्वारें मांडण्याचा लोकांस हक्क आहे. (६) पार्लमेंटच्या निवडणुकींत राजानें ढवळाढवळ करूं नये व त्यावेळीं लोकांवर आपलें वजन पाडूं नये. (७) भाषणस्वातंत्र्य व पार्लमेंटांतील वादविवाद हे पार्लमेंटच्या सभासदांचे हक्क आहेत व त्यांवर केव्हांही, कोठेंही व कोणत्याही कोर्टांत आक्षेप घेतला जाऊं नये. (८) जबर दंड, कैद, जामीन वगैरे कोणाकडूनही घेण्यांत येऊं नये व मिरासदारांशिवाय इतरांस राजद्रोहाच्या खटल्यांचे वेळीं ज्यूरर म्हणून नेमूं नये. (९) पार्ले-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मेंट सभा वरचेवर बोलावण्यांत यावी. (१०) विल्यम व मेरी यांनीं इंग्लंडचे संयुक्त राजे व्हावें; यापुढें कोणत्याही रोमन कॅथॉलिकाला इंग्लंडचें राज्यपद मिळूं नये. विल्यम व मेरी यांच्यामागून त्यांच्या मुलांना राज्यपद मिळावें. त्यांना मुलें न झाल्यास राजकन्या अॅन हिला व तिच्यानंतर तिच्या मुलांस राज्यपद मिळावें. तसें शक्य न झाल्यास, विल्यमला दुसऱ्या एखाद्या लग्नानंतर मुलें झाल्यास त्यांना राज्यपद मिळावें. वरीलप्रमाणें हक्कांचा जाहीरनामा तयार केल्यावर तो विल्यम व मेरी यांना सादर करण्यांत आला व त्यांनीं त्याला आपली मान्यता दिल्यावर त्यांना राज्याभिषेक झाला (१६८९).

१२. हक्कांच्या जाहीरनाम्याचें महत्त्व :—राज्याभिषेकानंतर विल्यमनें वरील जाहीरनामा तयार करणाऱ्या अनधिकारी पार्लमेंटलाच कायदेशीर पार्लमेंट म्हणून मान्यता दिली. त्या पार्लमेंटनें आपल्या पहिल्या बैठकीचे वेळींच वरील जाहीरनाम्यास कायदेशीरपणा यावा म्हणून खटपट केली व त्याप्रमाणें त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त होऊन 'हक्कांचा कायदा' असें नांव मिळालें. इंग्रजांच्या स्वातंत्र्याकरितां जे जे महत्त्वाचे कायदे आतांपर्यंत पास झाले व ज्याला राजांनींही मान्यता दिली त्यांत 'हक्कांच्या कायद्याला' तिसरें स्थान मिळतें. इंग्लंडमधील लोकशाहीच्या इतिहासांत व सनदशीर राज्यघटनेंत याला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. त्यामुळें राजसत्ता नियंत्रित होऊन सर्व सत्ता पार्लमेंटच्या हातीं गेली. अर्थात् राज्यपद हें पार्लमेंटच्या नेमणुकीवर व निवडणुकीवर अवलंबून आहे हें सिद्ध झालें. या कायद्यानें नवीन असें कांहींच केलें नाहीं; फक्त या वेळेपर्यंत लोकांनीं जे जे हक्क मिळविले व राजांनीं जे लाथाडण्याचा प्रयत्न केला, त्यांचें समर्थन करण्यांत येऊन, ते रक्षिले गेले.

१३. राज्यक्रांतीचे परिणाम :—सन १६८९ सालीं झालेली राज्यक्रांति इंग्लंडच्या इतिहासांत अजरामर झाली. तिचें स्वरूप राजकीय होतें यांत शंकाच नाहीं; परंतु स्टुअर्ट राजांनीं धार्मिक बाबतींत केलेले घोटाळे व ढवळाढवळ या क्रांतीला कारणीभूत झालेली नव्हती असें म्हणतां यावयाचें नाहीं. ही राज्यक्रांति झाली तरी १६४० च्या क्रांतीप्रमाणें यावेळीं कोणत्याही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकारचा रक्तपात झालेला नव्हता. ती अत्यंत शांतपणें पार पडूं नये म्हणूनच कीं काय रीडिंगच्या बाजारांत थोडी मारामारी झाली; व तेवढेंच एक गालबोट तिला लागलें. अर्थात् या क्रांतीला 'उज्वल राज्यक्रांति' असें म्हणतात, तें योग्य आहे. या क्रांतीमुळें इंग्लंडच्या राज्यघटनेंत फरक झाला तरी तो आमूलाग्र झालेला नव्हता. एक राजा गेला व त्याच्या जागीं दुसरा नियंत्रित राजा आला. या शिवाय दुसरा फरक न होतां इंग्लंडची पूर्वीची परंपरा व इंग्लंडची रूढी कायम राहून त्यांना स्थैर्य प्राप्त झालें. राजा श्रेष्ठ कीं पार्लमेंट श्रेष्ठ या स्टुअर्ट काळांत चाललेल्या वादाचा कायमचा निकाल लागून, पार्लमेंटच श्रेष्ठ होय असा निकाल लागला. अर्थात् राज्यपद ईश्वरदत्त नाहीं, राजा ईश्वराचा प्रतिनिधी नाहीं व पार्लमेंटचे कायदे त्याला बंधनकारक आहेत हेंच मत सिद्ध झालें. राजा हा पार्लमेंटच्या व तिच्या कायद्यांच्या अंकित राहणारा असून तो देशाचा मुख्य अधिकारी असल्यानें, त्याला त्याच्या स्थानापासून केव्हांही पदच्युत करतां येतें हें सिद्ध झालें. या सर्व गोष्टींमुळें राजांची अनियंत्रित



जुनें पार्लमेंटगृह व वेस्ट मिन्स्टर दिवाणखाना

सत्ता लयास गेली व तिची जागा सनदशीर राज्यपद्धतीनें चालणाऱ्या लोकशाहीनें घेतली. लोकांच्या स्वातंत्र्यास व त्यांच्या हक्कांस मान्यता मिळाली. धार्मिक बाबतींतील वादाचा निकाल लागून इंग्लंडनें कॅथॉलिक पंथाला कायमची मूठमाती दिली व त्यामुळें प्रॉटेस्टंट पंथाला मान्यता मिळाली. इंग्लंड;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्कॉटलंड व आयर्लंड यांच्या एकीकरणाची शक्यता निर्माण झाली. अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणांत महत्त्वाचा फरक पडून इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें अखंड वैर निर्माण झालें. याच वेळीं जगांत महत्त्व व मोठेपणा मिळविण्याकरितां त्या दोन्ही राष्ट्रांनीं धडाडीनें प्रयत्न सुरू केल्यामुळें हें वैर पुढें जवळ जवळ शंभर-दीडशें वर्षें टिकलें.

अभ्यास

१. दुसऱ्या जेम्सचें धार्मिक धोरण राज्यक्रांतीला कितपत कारणीभूत झालें ? सोदाहरण सिद्ध करा.

२. 'उज्वल राज्यक्रांती'चीं कारणें व परिणाम सांगा. त्या राज्यक्रांतीला उज्वल असें कां म्हणतात ?

३. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—
मन्मथचें बंड, सात बिशपांवरील खटला, हक्कांचा जाहीरनामा, सवलतींचा जाहीरनामा.

४. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
टायटस ओटस्, न्यूटन, अर्गाइलचा ड्यूक, डेंजरफील्ड, कर्क, हेल्स, फार्मर, सॅन्क्रॉफ्ट, हर्बर्ट, हायकमिशन कोर्ट, विल्यम.

५. जेम्सच्या स्वभावाचें वर्णन करा. त्याचा स्वभाव राज्यक्रांतीला कितपत कारणीभूत झाला ?

६. जेम्सच्या कारकीर्दीचा एक कालादर्श तयार करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. इंग्लंडांत नियंत्रित राजसत्तेची स्थापना—तिसरा विल्यम

१. तिसरा विल्यम (१६८८–१७०२) स्वभाव :—इंग्लंडच्या नव्या राजाचा जन्म सन १६५० मध्यें झाला. अगदीं लहानपणीं त्याला अनेक प्रकारचीं संकटें सोसावीं लागलीं. तारुण्यांत येतो न येतों तोंच त्याच्यावर डच लोकांचें पुढारीपण आलेलें होतें. त्यामुळें धैर्य, आत्मसंयमन, पराक्रम वगैरे उत्तम गुणांची त्याला जोड मिळालेली होती. त्याचें लहानपण हालांत, कष्टांत व एकलकोंडेपणांत गेल्यानें मुखस्तंभीपणा, कुढेपणा, धिमेपणा, गांभीर्य, थोडासा तुसडेपणा, निष्काळजीपणा वगैरे गुणावगुण त्याच्या ठिकाणीं दिसून येत. त्याच्या भाषणांत प्रेमाचा ओलावा दिसत नसे व त्याची वागणूकही निर्भीड असे. यामुळें तो लोकांत मिळून-मिसळून वागण्याचें टाळी. अर्थात् तो लोकांत अप्रिय होत असे. बाळपणापासूनच त्याची प्रकृति ठीक नव्हती व त्यामुळें पुढेंपुढें त्याला दमा व बद्धकोष्ठ यांनीं जर्जर केलें. असें असलें तरी असामान्य धैर्य, शौर्य, पराक्रम, अखंड काम करण्याची हौस, वगैरे मुत्सद्याच्या ठिकाणीं

तिसरा विल्यम

दुसरी मेरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिसणारे अनेक गुण त्याच्या ठिकाणीं वसत होते. तो जन्मतःच मुत्सद्दी होता. त्याच्या गुणांमुळेंच डच लोकांचा तो लाडका बनलेला होता. त्याचे गुणावगुण लक्षांत घेतां तो इंग्लिश लोकांस आवडणें अशक्य होतें हें खरें; तथापि त्यांस राजा पाहिजे होता व तोही फ्रान्सला विरोध करणारा प्रॉटेस्टंट राजा हवा होता. आणि तसा विल्यम होताही. इंग्लंडची गादी त्याला पाहिजे होती ती स्वार्थाकरितां नव्हे; तर फ्रान्सच्या राजाच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेस आळा घालण्याच्या त्याच्या प्रयत्नांत त्याला इंग्लंडची मदत मिळावी म्हणून. त्याला लढाईचे डावपेंच कळत नसतील, पण तो युद्धाचा जितका फायदा घेतां येईल तितका घेणारा उत्तम शिपाई होता यांत शंका नाहीं. आपल्या निश्चयी स्वभावानें अनेक मी मी म्हणणाऱ्या शिपायांसही त्यानें चकित केलें होतें. धार्मिक बाबतींत तो पक्का प्रॉटेस्टंट होता व परधर्माबद्दल तो नेहमीं सहिष्णु धोरणाचा पुरस्कार करी. प्रथम प्रथम परकीय म्हणून व त्याच्या अंगच्या अवगुणांमुळें तो इंग्लंडांत अप्रिय झाला असला, तरी त्याच्या कारकीर्दीतच इंग्लंडला युरोपमध्यें मानाचें स्थान प्राप्त झालें, त्याच्यामुळें अनियंत्रित राजसत्तेचें व कॅथॉलिक पंथाचें इंग्लंडांतून उच्चाटण झालें व लोकांच्या स्वातंत्र्याचें संरक्षण झालें. तो देखणा नव्हता; त्याची अंगयष्टि सडपातळ असे. त्याची नीतिमत्ता वाखाणण्यासारखी होती. त्याच्या बायकोवर त्याचें अत्यंत प्रेम होतें. तिचा स्वभाव त्याच्यापेक्षां अत्यंत निराळा व म्हणूनच ती लोकांना जास्त आवडे. आणि तिच्याकडे पाहूनच ना इंग्लिशांनीं त्याला इंग्लंडचें राज्यपद दिलें !

२. **विल्यमचें धोरण व त्याचें प्रधानमंडळ**:—फ्रान्सची रग जिरविण्याकरितां इंग्लंडचें राज्यपद विल्यमनें स्वीकारलें होतें खरें; परंतु त्या बाबतींत आपल्याला इंग्लिशांची मदत मिळेल कीं नाहीं याबद्दल तो जरा साशंकच होता. त्यानें प्रथम व्हिग लोकांना जवळ केलें. एकतर त्यांनींच पुढाकार घेऊन त्याला इंग्लंडचें राज्यपद देऊं केलें होतें व दुसरें म्हणजे त्याच्या फ्रेंचविद्वेषी धोरणास ते पाठिंबा देतील अशी त्याला खात्री वाटत होती. लुई जबर महात्त्वाकांक्षी होता व जेम्सला पुन्हां इंग्लंडच्या गादीवर बसविण्याचा तो आटोकाट प्रयत्न करील असें व्हिग लोकांस वाटत होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्थात् या आपत्तींतूत इंग्लंडला सोडवावयाचें असेल तर विल्यमच्या धोरणास मान्यता देणेंच योग्य होय असें व्हिग पक्षास वाटलें. त्यामुळें त्या पक्षानें विल्यमला मदत करण्याचें ठरविल्यानें विल्यमला आनंद होणें साहजिक होतें; परंतु त्याबरोबरच आपल्याला टोरी पक्षानें बोलाविलें आहे हेंही तो विसरला नव्हता. अर्थात् त्यांना दुखवूनही चालणार नाहीं असें त्यास वाटलें. तेव्हां आपलें प्रधानमंडळ नेमतांना दोन्ही पक्षांतील प्रमुख पुढाऱ्यांस बोलावून आपलें पहिलें प्रधानमंडळ त्यानें बनविलें. आपल्या दोस्तांना प्रधान नेमण्याचें धोरण या वेळेपासून मागें पडून, पार्लमेंटमधील वजनदार लोकांचें प्रधानमंडळ नेमण्याचा प्रघात पडला. प्रथमतः तें एकाच पक्षाचें नसे व त्यामुळें त्यांतील प्रधान आपापसांत भांडत. ही स्थिति लक्षांत घेऊनच पुढें एकाच पक्षाचें प्रधानमंडळ नेमण्याची रूढी पडली. विल्यमच्या पहिल्या प्रधानमंडळांत डॅन्बी, श्रुसबरी, हॅलिफॅक्स, गोडोल्फिन वगैरे व्हिग व टोरी लोक होते.

३. क्रांतीनंतरची व्यवस्था :—विल्यमनें आपली पार्लमेंट सन १६८९ मध्यें बोलाविली. या पार्लमेंटनें अनेक महत्त्वाचे कायदे पास करून इंग्लंडच्या राज्यघटनेंत महत्त्वाचे फरक घडवून आणले. सन १६८९ मध्यें प्रथमच 'हक्कांचा कायदा' पास करण्यांत आला. त्याचें वर्णन मागें आलेंच आहे. त्याच वर्षीं पार्लमेंटनें लष्करासंबंधीं एक कायदा पास केला. त्यान्वयें सैन्यावर पार्लमेंटची हुकमत चालू झाली. राजानें एक वर्षभर खडें लष्कर ठेवावें व त्यांतील सैनिकांची शिस्त योग्य रहावी म्हणून लष्करी कोर्टें स्थापण्यांत यावींत; या कोर्टांतर्फे सैनिकांची चौकशी व्हावी. लष्कराचा वार्षिक खर्च पार्लमेंटनें दरसाल मंजूर करावा. वरील अटींनीं पार्लमेंटनें राजाला बांधून घेतलें होतें. सैन्याच्या जोरावर राजा पुन्हां अनियंत्रित होऊं शकेल असें त्यावेळीं लोकांस वाटत होतें. तसेंच त्यावेळीं दुसऱ्या जेम्सला इंग्लंडच्या गादीवर बसविण्याकरितां लुई इंग्लंडवर स्वारी करणार अशी प्रत्येकाला भीति वाटत होतीच. तेव्हां सैन्याला अजीबात रजा देणेंही योग्य होणारें नव्हतें. लष्करासंबंधाच्या वरील कायद्यानें सर्व गोष्टी सुयंत्र ठरून गेल्या व सैन्याच्या खर्चाला मंजुरी देण्याकरितां दरसाल पार्लमेंट भरलीच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिजे असें आपोआप ठरलें. तसें जर न घडलें तर लष्करही नाहीं व पैसाही नाहीं अशी राजाची स्थिति होणार होती. त्यानंतर सन १६९० मध्यें सरकारी खजिन्यावर नियंत्रण घालणारा कायदा पार्लमेंटनें पास केला. त्या कायद्यानें राजाचा खाजगी खर्च व सरकारी खर्च अशी स्पष्ट वांटणी करण्यांत आली. विल्यमला वार्षिक बारा लक्ष पौंड पार्लमेंटनें मंजूर केले व



त्यापैकीं फक्त सात लक्ष पौंड त्यानें आपल्या खाजगीकडे व बाकी राज्य-कारभाराकडे खर्चावे असें पार्लमेंटनें ठरवून दिलें. राज्यकारभाराचा खर्च पार्लमेंटनें दरसाल पास केला पाहिजे व तो कोणकोणत्या बाबीकरितां खर्च

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करावा हेंही स्पष्टपणें पार्लमेंटनें ठरवावें असें वरील कायद्यानें ठरलें. या कायद्यामुळें सरकारी जमाखर्चावर पार्लमेंटचा पूर्णपणें ताबा राहूं लागला; व पैशाकरितां दरसाल पार्लमेंट बोलाविण्याची जबाबदारी राजावर येऊन पडली. याचवेळीं प्रॉटेस्टंट पंथांत राहूनही प्रस्थापित पंथाला विरोध करणारे अनेक लोक इंग्लंडांत होते; व त्यांच्यावर क्लॅरेंडन कोडांतील कायद्याप्रमाणें अनेक प्रकारचीं बंधनें होतीं. तीं दूर करून त्यांस धार्मिक स्वातंत्र्य देण्याच्या हेतूनें पार्लमेंटनें सन १६९० मध्यें 'धर्मस्वातंत्र्याचा कायदा' पास केला. या कायद्यानें ज्याच्या त्याच्या मताप्रमाणें धर्मविधी करण्याची सर्वांस पूर्ण मुभा देण्यांत आली. मात्र त्यांनीं विल्यम आणि मेरी यांच्याबद्दल राजनिष्ठेची शपथ घेतली पाहिजे असा त्यांच्यावर निर्बंध घालण्यांत आला. सात बिशपांनीं व सुमारें तीनशें धर्मगुरूंनीं हें बंधन मानावयाचें नाहीं असें ठरविलें. त्या सर्वांस व त्यांच्या अनुयायांस 'नॉन-ज्यूरर्स' असें म्हणत. त्यामुळें त्यांच्या वृत्ती गेल्या व त्यांच्या जागीं दुसरे धर्मगुरू नेमण्यांत आले. धार्मिक स्वातंत्र्याचा कायदा पास झाला तरी धर्मकसोटीचा कायदा व कॉर्पोरेशन कायदा रद्द झाला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. रोमन कॅथॉलिकांना मात्र कोणत्याही प्रकारच्या धार्मिक सवलती मिळाल्या नाहींत. अनेक कॅथॉलिकांनीं दुसऱ्या जेम्सला त्याच्या धार्मिक धोरणाच्या पुरस्कारार्थ मदत केली होती व प्रॉटेस्टंटांविरुद्ध त्यांनीं कटही रचले होते. त्यांच्यावर खटले होण्याचा संभव असल्यानें त्यांना माफी देण्यासंबंधीं एक बिल पार्लमेंटपुढें आलें. या बिलाचा टोरी लोकांस फायदा मिळूं नये म्हणून व्हिग लोकांनीं पुष्कळ खटपट केली; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें सन १६९० मध्यें पार्लमेंटनें विल्यमच्या आग्रहावरून तें बिल पास केलें. त्यामुळें व्हिग पक्षाचा पुढारी हॅलिफॅक्स यानें मंत्रिमंडळांतून आपलें अंग काढून घेतलें. तेव्हां दुसऱ्या चार्ल्सचा मुख्य प्रधान लॉर्ड डॅन्बी हा त्या पक्षाचा धुरीण झाला. सन १७०१ मध्यें 'वारशाचा कायदा' पास होऊन इंग्लंडचा राजा प्रॉटेस्टंटपंथीयच असला पाहिजे असें ठरलें.

४. स्कॉटलंडमधील बंडाळी :—राज्यक्रांतीनंतरची व्यवस्था चालू असतांच स्कॉटलंड व आयर्लंड या देशांमध्यें दंगेधोपे व बंडाळी चालूच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होती. दुसरा जेम्स फ्रान्सच्या लुईकडे आश्रयार्थ पळून गेला होता. असलें मोठें सावज आपल्या हातून सोडण्याइतका लुई मूर्ख नव्हता व त्याला मदत करण्याच्या मिषानें विल्यमला सतावून सोडतां येणें शक्य होतें. याच हेतूनें त्यानें जेम्सला आश्रय दिला. शिवाय जेम्सला स्कॉटलंड व आयर्लंड या देशांतही पाठिंबा मिळण्याची शक्यता होती. तेव्हां त्या दोन्ही देशांत उठाव करावा व विल्यमला भंडावून सोडावें असा लुईनें घाट घातला. गेलीं पन्नास वर्षें स्कॉटलंडांत प्रेसबिटेरियन पंथ दडपून टाकून एपिस्कोपेलियन पंथ स्कॉटलंडवर लादण्याचा पद्धतशीर प्रयत्न करण्यांत आला होता. त्यामुळें इंग्लंडांत राज्यक्रांति झाल्याबरोबर स्कॉटलंडांत एक अनधिकारी पार्लमेंट बोलावण्यांत आली. त्यामध्यें व्हिग पक्षाची सरशी झाल्यानें विल्यम व मेरी यांना स्कॉटलंडचे राजाराणी म्हणून त्या पार्लमेंटनें मान्यता दिली. त्या पार्लमेंटमध्यें जे टोरी होते ते जेम्सच्या बाजूचे होते. आपला पराभव झाला हें पाहून ते सर्व लोक स्कॉटलंडच्या उत्तरेकडील पहाडी भागांत पळून गेले व तेथील लोकांमध्यें त्यांनीं बंडाचें बीज रुजविण्याचा प्रयत्न चालविला. अखेर ग्रॅहॅम क्लॅव्हरहौस याच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं बंड केलें. तेव्हां विल्यमनें मॅके याला सैन्यासह त्यांच्यावर पाठविलें. त्याला किलिक्रँकी येथें गांठून बंडवाल्यांनीं पिटाळून लावलें (१६८९); त्यांचा पुढारी क्लॅव्हरहौस मात्र मारला गेला. त्यानंतर आपल्या सैन्याची नीट व्यवस्था लावून मॅके उत्तर स्कॉटलंडांत गेला व त्यानें सर्वांस राजनिष्ठेची शपथ घेण्यास सांगितलें (१६९१). मॅक्डोनाल्ड कुटुंबांतील मंडळीखेरीज करून इतर सर्वांनीं विल्यमबद्दल राजनिष्ठेची शपथ घेतलीही. ही गोष्ट लक्षांत घेऊन त्या कुटुंबीयांविरुद्ध अनेक प्रकारांनीं अनेक खऱ्याखोट्या बातम्या तिखटमीठ लावून विल्यमला सांगण्यांत आल्या. विल्यमनेंही त्यावर विश्वास ठेवून त्या कुटुंबीयांचें शिरकाण करण्याचा हुकूम सर जॉन डालरिंपल याचेजवळ दिला. त्याबरोबर त्याच्या हस्तकांनीं स्कॉटलंडांत जाऊन एके दिवशीं ग्लेंको गांवीं ठाणें दिलें, तेथील लोकांचा यथास्थित पाहुणचार स्वीकारला व त्याच रात्रीं सर्वांची अत्यंत क्रूरपणें कत्तल चालविली (१६९२). त्यामुळें जीवाच्या भीतीनें अनेक लोक रानोमाळ पळाले; कांहीं थंडीनें मेले तर कांहीं अन्नान्न करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मेले ! ग्लेकोचा हा भीषण प्रकार एका वर्षानें उघडकीस आला व तीन वर्षांनीं त्याची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमण्यांत आलें ! त्या वेळीं सर्व प्रकार उघडकीस येऊन विल्यमवर दोषारोपाचें खापर फोडण्यांत आलें. वरील भीषण प्रकार ' ग्लेंकोची कत्तल ' म्हणून प्रसिद्ध आहे.

५. आयर्लंडांतील बंडाळी :—स्कॉटलंडपेक्षांही आयर्लंडमधील लोक इंग्लिशांच्या अंमलाला कंटाळलेले होते. आयरिश लोक कॅथॉलिक

पंथाभिमानी. स्टुअर्ट घराण्याबद्दलही त्यांस अभिमान वाटत होता. जेम्सनें लॉर्ड टिर्कोनेल याला आपला गव्हर्नर नेमलें होते. जेम्स पळाला तेव्हां त्यानें बंड पुकारून फ्रेंचांची मदत मागितली, व जेम्सलाही त्यानें आयर्लंडांत बोला-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिलें. त्याप्रमाणें थोडी फ्रेंच फौज बरोबर घेऊन जेम्स आयर्लंडांत आला. ताबडतोब डब्लिन गांठून त्यानें पार्लमेंटची सभा बोलाविली. या पार्लमेंटमध्यें सर्वच सभासद कॅथॉलिक असल्यानें त्या सभेनें प्रॉटेस्टंटांच्या जमिनी काढून घेण्याचा ठराव पास केला. एवढेंच नव्हे तर प्रॉटेस्टंटांविरुद्ध राजद्रोहाचा कायदा पास केला. त्यामुळें सर्व प्रॉटेस्टंट लंडनडेरी येथें गेले व त्यांनीं जेम्सच्या अनुयायांबरोबर लढाईस सुरुवात केली. मोठा पराक्रम करून त्यांनीं शत्रूस पराभूत केलें. त्यानंतर विल्यमनेंही थोडी फौज त्यांच्या मदतीस पाठवून दिली व नंतर तोही आयर्लंडांत गेला. सन १६९० मध्यें बॉईन नदीच्या कांठीं लढाई होऊन जेम्सच्या सैन्याचा पूर्ण पराभव झाला व तेथून तो फ्रान्समध्यें पळून गेला. या लढाईत विल्यमच्या पराक्रमामुळेंच इंग्लिशांस जय मिळाला. जेम्स दूर उभा राहून लढाई पहात होता. विल्यम शूराप्रमाणें लढत होता. लढाई संपल्यावर विरुद्ध बाजूच्या लोकांत जेम्स व विल्यम यांच्याबद्दल बोलाचाली चालू असतां एकजण दुसऱ्याला म्हणाला, "उगाच गप्पा नकोत, राजांची अदलाबदल करून आपण पुन्हां लढूं व मग जय कोणाला मिळतो तें पाहूं !" पुढें इंग्लिश सैन्यानें सन १६९१ मध्यें लिमरिक हें महत्त्वाचें ठिकाण काबीज करून घेतलें. यानंतर युद्ध थांबून तह झाला; त्याला 'लिमरिकचा तह' असें म्हणतात. या तहानें ज्यांना शरण यावयाचें असेल त्यांनीं शरण यावें, बाकीच्यांनीं देशत्याग करावा असें ठरलें. त्याप्रमाणें कांहीं शरण आले व कांहीं लुईच्या फ्रेंच सैन्यांत शिरले. तसेंच या तहानें दुसऱ्या चार्ल्सच्या वेळच्या सवलती कॅथॉलिकांस मिळाल्या.

६. इंग्लिश वारशाचें युद्ध (१६८९–१६९७)–आरमारी युद्ध :— स्कॉटलंड व आयर्लंड यामधील बंडाळी चालू असतांच विल्यमला फ्रान्सकडे लक्ष देणें भाग पडलें. सन १६८६ मध्यें त्याच्या खटपटीनेंच हॉलंड, स्पेन, जर्मनी, ब्रॅंडेन्बर्ग वगैरे राष्ट्रांनीं फ्रान्सविरुद्ध 'ऑग्स्बर्गचा संघ' स्थापला होता. या संघाचा मुख्य प्रवर्तक विल्यम असल्यानें इंग्लंडलाही या संघांत सामील करून घ्यावें म्हणून त्यानें इंग्लंडचें राजपद स्वीकारलें होतें. तो इंग्लंडचा राजा झाल्याबरोबर लुईनें पॅलेटाईन प्रांतावर स्वारी केली; व जेम्सला मदत देऊन त्यानें त्याला आयर्लंडांत पाठवून, विल्यमला तिकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुंतवून ठेवलें. त्यावेळचें फ्रेंच सैन्य सर्व यूरोपमध्यें उत्तम शिस्तीचें व व्यवस्थित म्हणून गणलें जात होतें. अशा सैन्याला टक्कर द्यावयाची म्हणजे कठिण काम होतें; व तें कठिण काम विल्यमनें आपल्या अंगावर घेतलें होतें. आपला कट्टा शत्रू विल्यम, इंग्लंडचा राजा झाला ही गोष्ट लुईला आवडली नाहीं. उलट आपला शत्रू त्यामुळें बलाढ्य झाला असें त्याला वाटलें. लुईचें आरमार मात्र चांगलें नव्हतें. त्याचा प्रधान कॉलबर्ट यानें फ्रेंच आरमार उत्तम करण्याचा बराच प्रयत्न केला होता. तेव्हां आपल्या आरमाराची परीक्षा पाहण्याकरितां लुईनें सन १६९० मध्यें बिचीहेडवर अकस्मात हल्ला केला. त्यावेळीं लॉर्ड टॉरिंगटन इंग्लिश व डच आरमाराचा मुख्य दर्यासारंग होता. त्याच्या आरमारावर फ्रेंच दर्यासारंग टूरव्हिल यानें हल्ला करून त्याचा पराभव केला. त्यामुळें आपलें इंग्लिश राज्य जातें कीं काय अशी विल्यमलाही भीति वाटूं लागली. सन १६९२ मध्यें दुसरा जेम्स व लुई यांनीं इंग्लंडवर आरमारी हल्ला केला; परंतु दुर्दैव त्यांचें! दर्यासारंग रसेल यानें लाहोगजवळ फ्रेंच आरमाराचा पराभव केला व रसेलनें जेम्सच्या देखत फ्रेंचांच्या सामानासुमानास आग लावून दिली. याचें उट्टें म्हणूनच कीं काय पुढच्याच वर्षी फ्रेंच आरमारानें 'स्मर्ना आरमार' नामक इंग्लिश व्यापारी जहाजांच्या एका काफिल्यावर स्पेनच्या किनाऱ्याजवळ हल्ला केला व त्याचा नाश करून आपल्या पराभवाची भरपाई केली.

७. नामूरचा पाडाव व रिसविकचा तह:—आरमारी युद्ध चालू असतां लुई गप्प नव्हता. त्यानें लक्झेंबर्गच्या नेतृत्वाखालीं आपलें सैन्य हॉलंडवर धाडलें. लक्झेंबर्गनें आपल्या शत्रूचा प्रथम चांगलाच पराभव केला. आयरिश बंडाळींतून मुक्त झाल्यावर विल्यम सन १६९२ त हॉलंडमध्यें स्वतः दाखल झाला. तो मोठा उत्तम सेनापति होता असें नाहीं; परंतु त्याची चिकाटी व धैर्य अमूप होतें. प्रथमतः त्याचा पराभव झाला व फ्रेंचांनीं डचांचा 'नामूर' नांवाचा बळकट किल्ला घेतला. त्यानंतरही डचांचा लँडन येथें पराभव झाला. परंतु त्यानंतर विल्यमनें सन १६९५ मध्यें नामूरवर हल्ला करून मोठ्या धडाडीनें तें ठिकाण परत घेतलें. त्याच्या आयुष्यांतील तोच मोठा विजय. त्यामुळें इंग्रजांचा त्याच्यावरील विश्वासही दुणावला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यानंतर सन १६९७ मध्यें युद्धाला कंटाळून लुईनें रिसविक येथें तह केला. या तहानें लुईनें विल्यमला इंग्लंडचा राजा म्हणून मान्यता दिली व जिंकलेलीं सर्व ठिकाणेंही त्यानें परत केलीं. लुईनें थोडा अपमान पत्करूनही हा तह घडवून आणला व त्याचें कारण म्हणजे पुढें येणाऱ्या स्पॅनिश वारशाचा प्रश्न होय. परंतु रिसविकच्या तहानें परकीय आक्रमणाचें भय कमी झालें म्हणून असो किंवा राजाची सत्ता नियंत्रित करावी म्हणून असो, सन १६९८ च्या पार्लमेंटनें लष्करविषयक कायदा पास करतांना खड्या फौजेंत फक्त दहा हजार सैनिक असावेत असा कायदा पास केला. एवढेंच नव्हे, तर



इंग्लंडच्या बँकेची आजची इमारत

पुढच्याच वर्षी ही संख्या आणखी तीन हजारानें घटविण्यांत येऊन विल्यमचें डच सैन्य हॉलंडमध्यें पाठविण्यांत यावें असें पार्लमेंटनें ठरविलें. हीं दोन्हीं कृत्यें विल्यमला आवडलीं नाहींत. कारण स्पॅनिश वारशाचें युद्ध सुरू होणार व त्या वेळीं आपल्याला जास्त सैन्याची मदत लागणार हें त्यानें ओळखलें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. राष्ट्रीय कर्ज, इंग्लंडची बँक व नाण्यांची सुधारणा:—या युद्धामुळें खर्च अतिशय झाला व त्यामुळें राजाला पार्लमेंटकडे धांव घेणें भाग पडलें. तेव्हां विल्यमचा फडणीस चार्लस मॉंटेग यानें पार्लमेंटच्या संमतीनें सन १६९२ मध्यें एका पौंडामागें चार शिलिंग ह्याप्रमाणें जमिनीवर कर बसविला. तें उत्पन्नही अपुरें पडूं लागलें. तेव्हां कर्ज काढण्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं. आजपर्यंतची वहिवाट म्हणजे राजानें स्वतःच्या हमीवर राष्ट्राकरितां कर्ज उभारावयाचें; परंतु या वेळीं राष्ट्राच्या नांवानें कर्ज उभारावें व त्याची जबाबदारी राजावर न ठेवतां पार्लमेंटवर ठेवावी असें ठरलें. हें कर्ज राष्ट्राकरितां काढलेलें असल्यानें त्याला 'राष्ट्रीय कर्ज' म्हणण्याचें ठरलें. त्याप्रमाणें मॉंटेगनें सन १६९३ मध्यें शेंकडा आठ टक्के व्याजानें सुमारें दहा लक्ष पौंड कर्ज काढलें. पुढच्याच वर्षीं मॉंटेगनें आणखी एका चांगल्या गोष्टीचा उपक्रम केला. ती गोष्ट म्हणजे 'इंग्लंडच्या बँकेची' स्थापना होय (१६९४). या बँकेनें भावी राष्ट्रीय कर्जाची सर्व जबाबदारी आपल्यावर घ्यावी असें ठरलें. या बँकेचा खरा जनक पॅटर्सन नामक एक स्कॉच गृहस्थ होता. या बँकेची भरभराट मात्र फारच लवकर झाली व त्यामुळें पुढें चलनी नोटा छापण्याची व्यवस्थाही तिच्याकडे देण्यांत आली. या बँकेच्या स्थापनेचा उपक्रम व तिची वाढ व्हिग लोकांनीं केली असें लोकमत होतें. त्याचें वैषम्य वाटून टोरीनींही सन १६९८ मध्यें लँड बँक स्थापन केली; परंतु तिचें लौकरच दिवाळें निघालें. सन १६९६ मध्यें आणखी एक नवा उपक्रम करण्यांत आला. इतके दिवस व्यवहारांत असलेलीं नाणीं वाईट झालीं होतीं व लोकांनीं कापून घेतल्यानें त्यांचा मूळचा आकारही नाहींसा झाला होता. त्यामुळें व्यापारावर अनिष्ट परिणाम होऊन तो घटूं लागला. हें लक्षांत घेऊन सरकारनें नवीं नाणीं पाडलीं. या नाण्यांवर त्यांची खरी किंमत छापून त्यांना सध्यांप्रमाणें कॅगोरेही पाडण्यांत आले होते. या कामांत सरकारला थोडा पैसा खर्च करावा लागला व जुनीं नाणीं परत घेऊन त्याबद्दल नवीं नाणींही द्यावीं लागलीं. परंतु या सुधारणेमुळें लोकांचा फायदाच झाला. इंग्लंडची व्यापारी पत वाढली व त्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यापार वाढीस लागून लोकांचें कल्याण झालें. नाण्यांची सुधारणा करण्याच्या कामांत सर ऐझॅक न्यूटननें चांगलें काम केलें.

९. **मुद्रणस्वातंत्र्य** :—धर्मसुधारणेच्या वेळेपासूनच छापखान्यांवर व मुद्रणावर सरकारी निर्बंध ठेवण्यांत आले होते. उद्देश एवढाच कीं राजद्रोही अगर धर्मविरोधी अगर बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध होऊं नये. स्टार चेंबर व हाय कमिशन कोर्टें हें काम पहात. अर्थात् तीं कोर्टें रद्द झाल्यावर मुद्रणावरचें नियंत्रण उठलें. परंतु दीर्घ पार्लमेंटनें हें नियंत्रण पुन्हां बसविलें होतें. दुसऱ्या चार्ल्सच्या कारकीर्दीच्या सुरुवातीस पार्लमेंटनें कायदा पास करून मुद्रणाची सर्व जबाबदारी सरकारनें स्वतःच्या हातांत घ्यावी व लंडन, यॉर्क, ऑक्सफर्ड व केंब्रिज या ठिकाणींच फक्त मुद्रणालयें असावींत असें ठरविलें. या कायद्याची मुदत सन १६९५ मध्यें संपली. तेव्हां पार्लमेंटनें तशा तऱ्हेचा कायदा पुन्हां पास करण्याचें नाकारलें. अर्थात् मुद्रणावरचें नियंत्रण आपोआप निघून गेलें.

१०. **त्रैवार्षिक निवडणुकीचा कायदा** (१६९४) :— सन १६४१ मध्यें दीर्घ पार्लमेंटनें त्रैवार्षिक निवडणुकीचा कायदा पास केला होता; परंतु तो सन १६६४ मध्यें रद्द करण्यांत आला होता. यामुळें आपल्याला अनुकूल असलेली पार्लमेंटसभा राजाला कायम ठेवतां येई. याचा फायदा दुसऱ्या चार्ल्सनें चांगलाच घेतला होता. खरें पाहतां पैशाकरितां व सैन्यांकरितां दरसाल पार्लमेंटसभा बोलावणें जरूर होतें व त्याप्रमाणें ती भरतही होती. परंतु जर एकच पार्लमेंटसभा बरींच वर्षें कायम राहिली तर तिचा राष्ट्राशीं फारसा संबंध येत नाहीं व राजाला अनुकूल असलेली पार्लमेंट फार काळ टिकूं शकतें असे आक्षेप पूर्वीच्या पद्धतीवर घेण्यांत येऊं लागले. शिवाय निवडणुकीच्या वेळीं राष्ट्रांत जागृति होते व राष्ट्राचें खरें मत अजमावितां येतें. या गोष्टी पटूनच सन १६९४ मध्यें त्रैवार्षिक निवडणुकीचा कायदा पास करण्यांत येऊन पार्लमेंटची निवडणूक दर तीन वर्षांनीं व्हावी असें ठरविण्यांत आलें. विल्यमला ही गोष्ट प्रथमतः आवडली नाहीं; परंतु त्यानें त्या कायद्याला संमति दिली. हा कायदा पुढें सन १७१६ पर्यंत चालू राहिला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. विल्यमच्या खुनाबद्दल कट :—विल्यम परकीय व त्यांतून तो नावडता. शिवाय त्याचा सासरा, दुसरा जेम्स, त्याच्यावर जळफळणारा. जेम्सनें आपले अनेक साथीदारही इंग्लंडमध्यें गुप्तरीतीनें पेरून ठेवलेले. अशा स्थितींत विल्यमच्या खुनाचे अनेक प्रयत्न झाले. सन १६९१ मध्यें लॉर्ड प्रेस्टन या कॅथॉलिकानें एक प्रयत्न केला; पण तो फसला. पुढें सन १६९४ त राणी मेरी देवीनें वारली. ती फारच लोकप्रिय होती. विल्यमला तिच्या मृत्यूनें मोठाच धक्का बसला; व त्याला आपल्या जिवाचीही काळजी वाटूं लागली. सन १६९६ मध्यें त्याच्या खुनाचा एक मोठा कट उघडकीस आला. सर जॉर्ज बार्क्ले, सर जॉर्ज फेनविक वगैरे सुमारें चाळीस जॅकोबाईट (जेम्सचे अनुयायी) लोक या कटांत सामील असून, विल्यमचा खून झाल्याबरोबर इंग्लंडवर हल्ला करतां यावा म्हणून जेम्सनें फ्रेंच किनाऱ्यावर फ्रेंच सैन्यासह जहाजेंही सज्ज करून ठेवलीं होतीं. परंतु त्याच्या दुर्दैवानें हाही कट फसला व फेनविकविरुद्ध पार्लमेंटनें राजद्रोहाचा कायदा पास करून त्याला फाशीं दिलें. या कटामुळें जेम्सबद्दल लोकांना जास्त तिटकारा उत्पन्न झाला व विल्यमबद्दल सहानुभूति उत्पन्न झाली. एवढेंच नव्हे, तर पार्लमेंटच्या संमतीनें विल्यमच्या रक्षणाकरितां एक मंडळही स्थापन करण्यांत आलें. या कटाच्या पूर्वींच एक कायदा पास करण्यांत येऊन खटल्याची चौकशी होण्यापूर्वीं त्यावेळच्या ज्यूरीचीं नांवें व आरोपाचें स्वरूप निदान पांच दिवस तरी आरोपीला कळवावें व निदान दोन तरी साक्षीदार चौकशीच्या वेळीं असावेत असा कायदा पास करण्यांत आला होता (१६९६). या कायद्याचा फायदा घेऊनच फेनविक सुटून जाणार होता. दोन साक्षीदार मिळत नाहींत असें पाहून पार्लमेंटला त्याच्याविरुद्ध राजद्रोहाचा कायदा पास करावा लागला.

१२. पक्षनिष्ठ राज्यपद्धतीस सुरुवात :—सुरुवातीसच विल्यमनें दोन्ही पक्षांतील लोकांचें प्रधानमंडळ नेमलें होते हें मागें आलेंच आहे. कारण त्यावेळीं त्याला व्हिग व टोरी अशा दोन्ही पक्षांची सहानुभूति पाहिजे होती. परंतु पुढें पुढें व्हिग व टोरी पक्षांतील लोकांची परस्पर भिन्न मतें व त्यांच्यांतील धुसफूस यामुळें ते एकत्र नांदणें शक्य नव्हतें. तशांतच आपल्या युद्धविषयक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धोरणास टोरी लोकांची सहानुभूति मिळणें शक्य नाहीं असें विल्यमला दिसून आलें. त्याच वेळीं सन १६९३ मध्यें व्हिग पक्षाचा पुढारी संदरलंड यानें व्हिग पक्षाचेंच प्रधानमंडळ नेमण्याची विल्यमला सूचना दिली. विल्यमला ती पटली व त्याप्रमाणें त्यानें हळूहळू टोरी लोकांना प्रधानमंडळांतून दूर करून, फक्त व्हिग पक्षाचेच लोक नेमण्यास सन १६९६ पासून सुरुवातही केली. अर्थात् त्या सालीं प्रधानमंडळांत व्हिग लोकांचाच समावेश करण्यांत आला. याला 'व्हिग जंटो' अथवा 'व्हिग लोकांची जूट' असें नांव ठेवण्यांत आलें. पुढें सन १६९८ मध्यें पार्लमेंटची सार्वत्रिक निवडणूक झाली व टोरीपक्ष मताधिक्यानें निवडून आला. या पार्लमेंटनेंच खड्या फौजेवर नियंत्रण घातलें व विल्यमच्या डच सैन्याला रजा दिली. एकंदरींत टोरीपक्षाला विल्यम व विल्यमला टोरीपक्ष आवडत नसला, तरी मताधिक्यानें निवडून आलेल्या टोरीपक्षाला प्रधानमंडळांत जागा देणें रास्त वाटलें व त्याप्रमाणें त्यानें सन १७०० मध्यें आपल्या प्रधानमंडळांत सर्व टोरी लोकच नेमले. हें प्रधानमंडळ १७०२ पर्यंत टिकलें व त्यावर्षी नव्या निवडणुकींत पार्लमेंटमध्यें व्हिगपक्षाची सरशी झाल्यानें विल्यमनें टोरींना रजा देऊन व्हिगपक्षांतील लोकांचें प्रधानमंडळ नेमलें. वरील हकीकतीचें राज्यघटनेच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्व आहे; कारण त्यामध्यें तीन महत्त्वाचीं तत्त्वें आपोआपच गोंवलीं गेलीं. तीं अशीं :—(१) मिश्र प्रधानमंडळाकडून राज्यकारभाराचें काम नीट होत नाहीं. (२) ज्या पक्षाचें बहुमत पार्लमेंटमध्यें असेल त्या पक्षाचेंच प्रधानमंडळ असणें श्रेयस्कर होय. (३) राजानें आपल्या लहरीप्रमाणें प्रधानमंडळाची नेमणूक करूं नये. हीं तत्त्वें कायद्यानें मान्य केलीं नसलीं तरी रूढीनें मान्य केलीं व त्याचें अतिक्रमण बेकायदेशीर नसलें तरी क्रांतिकारक ठरूं लागलें.

१३. इंग्लिश वारशाचा कायदा (१७०१):—राणी मेरी वारल्यावर तिला मूलबाळ नसल्यानें वारशाचा प्रश्न पुन्हां उत्पन्न झाला. विल्यमनें दुसरें लग्न केलेलें नव्हतें व तो पुन्हां लग्न करील असा संभवही नव्हता. अर्थात् मागें ठरल्याप्रमाणें राजकन्या ॲन हिला इंग्लंडचें राज्यपद मिळणें न्याय्य होतें. तिचें लग्न डेन्मार्कचा राजपुत्र जॉर्ज, याच्याशीं सन १६८०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें झालें होतें. तिला पुष्कळ मुलें झालीं, परंतु तीं सर्व एकामागून एक मेलीं. अर्थात् ॲननंतर राज्यपद कोणाला मिळावें याबद्दल धोरण ठरविण्याकरितां सन १७०७ मध्यें ' वारशाचा कायदा ' पार्लमेंटनें पास केला. हक्कांच्या कायद्याप्रमाणें ॲननंतर हॅनोव्हर प्रांताची प्रॉटेस्टंट राणी व पहिल्या जेम्सची नात सोफिया हिच्याकडे व तिच्यानंतर तिचा मुलगा जॉर्ज याच्याकडे इंग्लंडचें राज्यपद जावयाचें ठरलेलें होतेंच. परंतु तीच गोष्ट या नव्या कायद्यानें पुन्हां एकदां निश्चितपणें ठरविली व कॅथॉलिक पुरुषाला, अगर ज्यानें कॅथॉलिक माणसाशीं लग्न केलें असेल त्याला इंग्लंडची गादी मिळूं नये–प्रॉटेस्टंटाला मिळावी–असें ठरविलें. परंतु या गोष्टी करूनच हा कायदा थांबला नाहीं. राजसत्तेवरही त्यानें आणखी बंधनें घातलीं. तीं अशीं :—(१) न्यायाधीशांची नेमणूक तहाहयात असावी. अक्षम्य आगळिकीकरितांच त्यांना कामावरून दूर करण्यांत यावें; मात्र त्याकरितां पार्लमेंटच्या दोन्ही सभांनीं तसा अर्ज राजाकडे करावा व मग राजानें त्यांना दूर करावें. इतके दिवस राजाला आपल्या मर्जीप्रमाणें कोणाही न्यायाधीशाला वाटेल तेव्हां काढून टाकतां येई. आतां त्याला तसें करतां येणें अशक्य झालें व न्यायाधीशांचें स्वातंत्र्य रक्षिलें गेलें. (२) पार्लमेंटच्या संमतीशिवाय राजानें इंग्लंड सोडतां कामा नये. (३) सरकारी नोकरांनीं अगर पेन्शन घेणारांनीं पार्लमेंटमध्यें सभासद म्हणून बसूं नये. (४) सरकारी कामकाज प्रिव्ही कौन्सिलच्यातर्फे चालावें. (५) इंग्लंडच्या बाहेर असलेल्या राजाच्या मालकीच्या प्रांतांच्या संरक्षणाकरितां इंग्लंडनें युद्ध करूं नये. (६) परकीयांना जमिनी देऊं नयेत व त्यांना प्रिव्ही कौन्सिलचें अगर पार्लमेंटचें सभासदत्व मिळूं नये. (७) कोणाही मनुष्यावर पार्लमेंटनें खटला भरला तर त्या माणसाच्या बाबतींत राजानें आपला दया दाखविण्याचा अधिकार उपयोगांत आणूं नये. वरील प्रकारचा कायदा टोरी प्रधानमंडळ व टोरी मताधिक्याची पार्लमेंटसभा अस्तित्वांत असतां पास झाला हें लक्षांत धरण्यासारखें आहे. मनांत येतें तर त्यांना जेम्सला अगर त्याच्या मुलांस इंग्लंडचें राज्यपद देतां आलें असतें. पण ते त्यास विटले होते. टोरी पार्लमेंट व टोरी प्रधानमंडळ यांनीं इंग्लिश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वारशाचा कायदा पास केला, तरीही व्हिग लोकांवर सूड घेण्याची कल्पना त्यांच्या मनांत होतीच व युरोपियन राजकारणांत निष्कारण लुडबुड केली असा त्यांच्यावर आरोप ठेवून रसेल, सॉमर्स, मॉंटेग वगैरे व्हिग पुढाऱ्यांवर त्यांनीं खटले भरले. हे खटले पुढें काढून घेण्यांत आले; परंतु त्यामुळें टोरींना आपलें आसन स्थिर ठेवतां आलें नाहीं.

१४. **स्पॅनिश वारशाचा प्रश्न:**—स्पॅनिश वारशाचा प्रश्न मात्र टोरींच्या मुळावरच आला व सर्व सत्ता व्हिगपक्षीयांच्या हातीं आली. तो प्रकार असा. यावेळीं स्पेनचा दुबळा राजा दुसरा चार्ल्स हा मरणाच्या दारीं बसला होता. त्याला मूलबाळ किंवा भाऊ वगैरेही जवळचें कोणीच नव्हतें. लग्न झालेल्या दोन बहिणी होत्या. वडील बहीण मराया थेरिसा व धाकटी मार्गारेट थेरिसा. मराया थेरिसाचें लग्न फ्रान्सचा राजा चौदावा लुई याच्याबरोबर झालें होतें. लग्नांत दीड लक्ष पौंड हुंडा ठरला होता. हुंडा मिळाल्यास आपण स्पेनच्या गादीवरील आपला हक्क सोडूं असें मरायानें सांगितलें होतें. अर्थात् हुंडा न मिळाल्यानें ती वचनांतून मुक्त झाली व त्यामुळें स्पेनच्या गादीवर तिचा हक्क पोंचत होता. तेव्हां लुईनें अँज्यूच्या फिलिपला—आपल्या नातवाला—स्पेनच्या गादीचा वारसदार म्हणून पुढें केलें. मार्गारेट थेरिसाचें लग्न जर्मन बादशाह पहिला लिओ-पोल्ड याच्याबरोबर झालें होतें. अर्थात् तिच्यातर्फे तिच्या एकुलत्या एक मुलीचा वारसा पुढें करण्यांत आला व तिच्यातर्फे तिचा मुलगा बव्हेरि-याचा राजपुत्र जोसेफ फर्डिनंड हा दुसरा वारसदार पुढें आला. परंतु लग्नाच्या वेळीं फर्डिनंडच्या आईनेंही स्पेनच्या गादीवरील आपला हक्क सोडून दिला होता. यामुळें मराया थेरिसा व मार्गारेट थेरिसा यांचे स्पेनच्या गादीवरील हक्क योग्य ठरत नाहींत असें पाहून चौदावा लुई व पहिला लिओपोल्ड, हे दोघेही आपल्या आईच्यातर्फे, स्वतःचाच वारसा पुढें करूं लागले. लुईची आई ॲन ही स्पेनचा राजा दुसरा चार्ल्स याची आत्या. तेव्हां तिच्यातर्फे आपण वारसदार ठरतों असें लुई म्हणूं लागला. परंतु तिनेंही आपला अधिकार सोडला होता. हें जाणून लिओपोल्डनें आपला अधिकार जास्त पोंचतो असें सिद्ध करण्याचा प्रयत्न चालविला. त्याची आई,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लुईच्या आईची बहीण होती. अर्थात् तिच्यातर्फे तो स्वतःच वारसदार ठरत होता. मात्र आपल्यातर्फे त्यानें आपल्या दुसऱ्या मुलाला—राजपुत्र चार्ल्स याला—वारसदार म्हणून पुढें केलें. एकंदरींत पाहतां अँज्यूचा फिलिप, जोसेफ फर्डिनंड व राजपुत्र चार्ल्स हे तिघे वारसदार म्हणून पुढें आले. त्यांत राजकीयदृष्ट्या जोसेफचा, न्यायाचे दृष्टीनें चार्ल्सचा व वंशानुक्रमानें फिलिपचा वारसा योग्य होता.

१५. स्पेनच्या विभागणीचे तह :—इंग्लंड व यूरोप यांच्या दृष्टीनें स्पेनच्या वारशाचा प्रश्न महत्त्वाचा होता. कारण स्पेनच्या ताब्यांत फार मोठें साम्राज्य होतें. स्पेन, बेल्जम, सिसिली, नेपल्सचें राज्य, मिलनची मोठी जहागीर, मेक्सिको, बहुतेक सर्व वेस्ट इंडीज बेटें, मध्य अमेरिका, पेरू, चिली वगैरे भाग स्पेनच्या राज्यांत मोडत होते. आफ्रिकेच्या उत्तरेकडील कांहीं बंदरेंही स्पेनच्या ताब्यांत असल्यानें भूमध्य समुद्र जवळ जवळ स्पेनच्याच सत्तेखालीं येत होता. तेव्हां अशा मोठ्या राज्याच्या स्वामित्वा-बद्दल चुरस लागणें योग्यच होतें. इंग्लंड व हॉलंड यांना वाटे कीं हें सर्व राज्य लुईच्या वांट्याला गेल्यास त्याची सत्ता व त्याचें सामर्थ्य एकदम वाढेल व तो भारी झाल्यास युरोपांत बलसमत्व टिकणार नाहीं. याच मताला जर्मन बादशहानेंही पाठिंबा दिला. आपल्याला सर्व राज्य पचणार नाहीं हें लुईही ओळखून होता. तेव्हां त्यानें विल्यम व लिओपोल्ड यांच्याशीं सन १६९८ मध्यें स्पेनच्या वांटणीचा पहिला तह केला. त्यान्वयें स्पेनचें राज्य जोसेफ फर्डिनंडला मिळावें व अमेरिकन वसाहती व बेल्जम त्याच्याकडे रहावें असें ठरलें. मात्र अँज्यूच्या फिलिपला सिसिली व नेपल्सचें राज्य व चार्ल्सला मिलनची जहागीर मिळावी असें ठरलें. परंतु या तहावरील शाई वाळते न वाळते तोंच देवीच्या आजारानें जोसेफ सन १६९९ मध्यें मेला. जोसेफचें मूळचें राज्य ऑस्ट्रियन राजपुत्र चार्ल्स अगर चौदावा लुई यांच्या राज्या-पेक्षां लहान असल्यामुळें, त्याला स्पेनचें राज्य मिळाल्यानें युरोपच्या शांततेंत बिघाड होणें शक्य नव्हतें व युरोपचें बलसमत्वही कायम राहिलें असतें. परंतु जोसेफ मेल्यानें पुन्हां घोटाळा झाला व विल्यम अडचणींत सांपडला. तरीही त्यानें पुन्हां वाटाघाटी करून लुईबरोबर सन १७०० सालीं दुसरा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विभागणीचा तह केला. या तहानें ऑस्ट्रियन राजपुत्र चार्ल्स, याला स्पेनचें राज्यपद देण्यांत यावें व स्पेन, बेल्जम, अमेरिकन वसाहती वगैरे भाग त्याला मिळून मिलनची जहागीर, सिसिली व नेपल्सचें राज्य फिलिपला मिळावें असें ठरलें. या तहाला लुईनेंही आपली संमति दिली होती; परंतु सर्व राज्य आपल्याकडेच यावें म्हणून तो खटपटही करीत होता. त्याचा हस्तक टोलेडोचा आर्चबिशप मॅड्रिडला होता व तेथें त्याचें बरेंच बस्तान बसलें होतें. त्यानें संधि साधून दुसऱ्या चार्ल्सला मृत्युपत्र करावयास लावलें व सर्व राज्य फिलिपला मिळावें असें ठरविण्यांत आलें. अर्थात् ह्या सर्व घडामोडी गुप्तरीतीनें चालल्या होत्या. शेवटीं स्पेनचा राजा दुसरा चार्ल्स सन १७०० मध्यें मेला व त्याच्या मृत्युपत्राप्रमाणें फिलिपकडे स्पेनचें सर्व साम्राज्य आलें.

१६. **चौदाव्या लुईला पेंच** :—आतां चौदाव्या लुईला पेंच पडला. चालून आलेल्या राज्याचा स्वीकार करावा तरी पंचाईत, न करावा तरी पंचाईत! स्वीकार केल्यास आपण थोड्या दिवसांपूर्वी केलेला तह लाथाडून दिल्यासारखें होणार; त्यामुळें विल्यमचा विश्वासघात होऊन सर्व इंग्लंड आपल्यावर उठणार. स्वीकार न करावा तर एवढें मोठें थोरलें चालून आलेलें राज्य हातचें जाणार! शेवटीं आपल्या प्रधानांचा सल्ला घेऊन स्पेनच्या राज्याचा स्वीकार करण्याचें त्यानें ठरविलें. लगेच स्पेनचा राजा म्हणून आपल्या नातवाच्या नांवानें त्यानें द्वाही फिरविली व 'पिरनीज सरहद्द संपली' अशी घोषणा केली. या बातमीनें विल्यमला मोठाच धक्का बसला. त्याच्या इच्छेप्रमाणें इंग्लंड लढाईस उत्सुक नव्हतें व पार्लमेंटनेंही त्याचें खडें सैन्य कमी केलें होतें. अशा पेंचांत तो असतांच त्याच्या सुदैवानें त्याला हात दिला! कारण सन १७०१ मध्यें दुसरा जेम्स मेला. त्याच्या मृत्यूच्या वेळीं लुईनें त्याला वचन देऊन सांगितलें कीं 'तुझ्या मुलाला मी इंग्लंडचा राजा म्हणून मान्य करीन.' ही बातमी कळतांच रिसविकचा तह लुईनें मोडला अशी हाकाटी झाली. ताबडतोब सर्व इंग्लंड विल्यमच्या बाजूला वळलें. 'लुई तह मोडतो; तो विश्वासघातकी आहे.—' हा एकच सूर इंग्रजांच्या तोंडून येऊं लागला. व्हिग व टोरी लढाईला उत्सुक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाले. इंग्लंडच्या लष्करांत व आरमारांतही भरती होऊं लागली व जेम्सच्या मुलाविरुद्ध राजद्रोहाचा कायदा पास करण्यांत आला. या घडामोडींचा फायदा घेण्याचें ठरवून विल्यमनें पार्लमेंट रद्द केली. नवी निवडणूक झाली; त्यांत व्हिग पक्ष मताधिक्यानें निवडून आला. लगेच जुन्या टोरी मंत्रि-मंडळाला रजा देऊन त्यानें व्हिगपक्षीयांचें प्रधानमंडळ नेमलें (१७०२).

१७. विल्यमचा मृत्यु (१७०२):—इंग्लंडमध्यें चाललेल्या या घडामोडीं-कडे लुईचें लक्ष होतेंच व विल्यमला पाठिंबा देणारें व्हिग मंत्रिमंडळ स्थापन झाल्यानें त्यालाही वाईट वाटलें. विल्यमही लढाईची सर्व सिद्धता करीत होता व फ्रान्सचा पुरा पराभव करण्याच्या स्वप्नांत असतांच तो एके दिवशीं घोड्यावरून खालीं पडला व नंतर कांहीं दिवसांनीं मेला (१७०२). त्यावेळीं त्याचें वय बावन्न वर्षांचें होतें. त्याची प्रकृति अगोदरच वाईट. त्यांतच मेरीच्या मृत्यूमुळें तो खंगतच चाललेला होता. इंग्लंडमधील घडामोडी व युरोपांतील कटकटी यांमुळेंही तो जिकिरीस आला होता. त्यामुळें सर्व प्रकारच्या काळजींनीं त्याचें शरीर पोखरून काढलें होतें. त्याच्याबद्दल गैरसमज फार असल्यामुळें त्याची खरी किंमत लोकांस कधींच कळली नाहीं. एरवीं तो मोठा धिम्मा मुत्सद्दी व चांगला सेनापति होता, यांत शंकाच नाहीं. इंग्लंड व हॉलंड यांच्या एकच एक शत्रूला–चौदाव्या लुईला–चिरडून टाकल्याशिवाय त्या दोन्ही राष्ट्रांचा व युरोपचाही तरणोपाय नाहीं, हें त्यानें पूर्णपणें ओळखलें होतें व त्यानें आपलें सर्व आयुष्य त्याकरितांच खर्च केलें असें म्हणतां येईल.

अभ्यास

१. क्रांतीनंतर राज्यकारभाराबद्दल कोणती व्यवस्था झाली? त्याकरितां कोण-कोणते कायदे पास करण्यांत आले? त्यांचें महत्त्व काय?

२. तिसऱ्या विल्यमचा स्वभाव वर्णा. तो खरा मुत्सद्दी होता काय? कशा-वरून? उदाहरणें देऊन सिद्द करा.

३. इंग्लंडमध्यें अनियंत्रित राज्यव्यवस्था बंद होऊन नियंत्रित राज्यकारभार तिसऱ्या विल्यमच्या कारकीर्दींत सुरू झाला असें म्हणतात. हें विधान सिद्ध करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. विल्यमच्या सुरुवातीच्या अडचणी सांगा. त्यांतून तो पार कसा पडला ?

५. स्पॅनिश वारशाच्या युद्धाचीं कारणें सांगा. त्या बाबतींत लुई व विल्यम यांनीं जीं कारस्थानें केलीं त्यांचें वर्णन करा. लुईनें विश्वासघात केला काय ? कशावरून ?

६. टिपणें करा :– ग्लेंकोची कत्तल, बँक ऑफ इंग्लंड, मुद्रण स्वातंत्र्य, इंग्लिश वारशाचा कायदा, नॉन ज्यूरर्स, राष्ट्रीय कर्ज, त्रैवार्षिक निवडणुकीचा कायदा, पक्षनिष्ठराज्यपद्धति.

७. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :— क्लॅव्हरहौस, डालरिंपल, कॉलबर्ट, टॉरिंगटन, ट्रूरव्हिल, मॉंटेग, पॅटर्सन, फेनविक, संदरलंड, लुई.

उतारा

१. विल्यमला आमंत्रण–१६८८

सन्माननीय महाशय,

आम्हांला पाहिजे असलेली मदत देण्यास आपण तयार आहांत हें ऐकून आम्हांस अत्यंत हर्ष होत आहे. धर्म, लोकांचें स्वातंत्र्य व त्यांचे हक्क, सार्वजनिक मालमत्ता वगैरे बाबतींत सध्यांच्या सरकारी धोरणामुळें देशांत अत्यंत अस्वस्थता उत्पन्न झाली आहे. यापुढें तींत सुधारणा न होतां लोकांस अत्यंत त्रास सोसावा लागेल, अशी आम्हांस धास्ती वाटत आहे. यामुळें देशांत इतका असंतोष पसरला आहे कीं क्रांति घडून यावी असें शेंकडा नव्याण्णव लोकांस मनापासून वाटत आहे. आपला नाश टळणार असेल तर सर्व लोक कोणत्याही प्रकारच्या बंडांत सामील होण्यास तयार आहेत व तेही एका पायावर ! आपण इंग्लंडमध्यें उतरलांत तर सर्व उमराव व सामान्य लोक आपल्या झेंड्याखालीं उभे राहतील. अशा तऱ्हेनें इंग्लंडच्या सध्यांच्या सैन्याच्या दुप्पट सैन्य आपल्याला खात्रीनें मिळेल. इंग्लिश सैन्यही असंतुष्ट आहेच व कॅथालिक पंथालाही तें विटलेलें आहे. त्यामुळें तेंही तुम्हांस मिळेल अशी खात्री बाळगा.

आपले चहाते—

श्रुसबरी, डॅन्बी, लमले, रसेल, सिडने वगैरे

प्रश्न :—१ वरील पत्र वाचून त्या वेळच्या इंग्लंडच्या स्थितीबद्दल तुम्हांस काय वाटतें ?

२ कोणकोणते वर्ग असंतुष्ट होते ? कशाकरितां ?

३ विल्यमला बोलावण्याचें कारण काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वंशवृक्ष—स्पॅनिशघराणें



वरील वंशवृक्षावरून स्पॅनिश वारशाची गुंतागुंत कळेल. जाड टाईपांतील वारसदार होत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. स्पॅनिश वारशाचें युद्ध—राणी ॲन

१. राणी ॲन (१७०२–१७१४) :—विल्यमच्यानंतर दुसऱ्या जेम्सची मुलगी व विल्यमची मेहुणी ॲन ही इंग्लंडची राणी झाली. त्यावेळीं तिचें वय सदतीस वर्षांचें होतें. तिच्या अंगीं फारसें कर्तृत्व नव्हतें. ॲन धर्मशील, प्रामाणिक, सद्गुणी व उदार असली तरी चांगली राज्यकर्ती नव्हती. ती नेहमीं दुसऱ्याच्या तंत्रानें वागत असल्यानेंच तिचा असा कारभार झालाच नाहीं. किंबहुना राज्यकारभाराकडे तिचें लक्ष नव्हतेंच. तिचें लग्न डेन्मार्कचा राजपुत्र जॉर्ज याच्याबरोबर झालेलें होतें. थंड व विशेष हालचाल करणारा नसल्यानें तोही कोठें चमकला नाहीं. अर्थात् ॲनचा स्वभाव ओळखून तिला गुंगविण्याचा अनेक दरबारीयांनीं प्रयत्न चालविलेला होता. त्या सर्वांत लॉर्ड मार्लबरो याचें साधलें. त्याची बायको ॲनची जिगरदोस्त. या बाईनें ॲनला आपल्या मुठींत ठेवलें होतें; इतकें कीं तिच्या म्हणण्याशिवाय इकडचें पान तिकडे होत नसे ! अर्थात् इंग्लंडचा सर्व राज्यकारभार लॉर्ड मार्लबरो व त्याची बायको यांच्या हातींच होता; ॲन एपिस्कोपेलियन पंथाची अभिमानी असून तिचा ओढा टोरीपक्षाकडे होता.

ॲन

२. लॉर्ड मार्लबरो :—याचें मूळ नांव जॉर्ज चर्चिल. त्याचा जन्म सन १६५० मध्यें झाला. त्याची बायको सॅरा चर्चिल ही मोठी कारस्थानी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व महत्त्वाकांक्षी स्त्री होती व तिनें अॅनवर अजब मोहिनी घातलेली होती. त्यामुळें लहानपणापासून अॅम तिच्या तंत्रानेंच वागत असे. लॉर्ड मार्लबरो

लॉर्ड मार्लबरो

अत्यंत देखणा होता व त्याची चालचलणूकही दरबारी थाटाची असल्यानें त्याचें दुसऱ्यावर तात्काळ वजन पडत असे. तो कारस्थानी पुरुष होता; तो उत्कृष्ट वक्ता होता. त्याला लेखनकलेची आवड नव्हती. प्रसिद्ध फ्रेंच सेनापति मार्शल टुरेन याच्या हाताखालीं काम करण्याची सुवर्ण-संधि मिळाल्यानें त्याला उत्तम प्रकारचें लष्करी शिक्षण मिळालेलें होतें; तो दुसऱ्या जेम्सच्या वेळीं इंग्लंडांत आला व राजाची त्यानें उत्तमप्रकारें चाकरी केली; परंतु त्यानें इंग्लंडांतून पलायन करतांच मार्लबरो विल्यमला मिळाला. त्याच वेळीं त्याचा विश्वासघातकी स्वभाव त्याच्या मित्रांनीं ओळखला. त्याच कारणाकरितां विल्यमनें त्याला सन १६९२ मध्यें पकडून तुरुंगांत ठेवलें होतें. अत्यंत स्वार्थसाधु व लोभी मार्लबरो लक्ष्मीच्या बाबतींत अत्यंत हावरा होता; त्याचप्रमाणें सत्तेचाही तो मोठा अभिलाषी होता. आपल्या पत्नीच्या मात्र तो अगदीं अर्ध्या वचनांत असे. त्याच्या सर्व चरित्रांतील सर्व ठळक गोष्टी एकत्र गुंफणारें त्याचें पत्निप्रेम विलक्षण होतें. इतकें असूनही तो उत्तम सेनापति होता. इंग्लंडच्या इतिहासांत जे उत्तम सेनापति झाले त्यांत मार्लबरो हा उत्तमांपैकीं एक समजला जातो. स्पॅनिश वारशाच्या युद्धाच्या वेळीं ब्लेनहिम, रॅमिलीज वगैरे नामांकित लढाया त्यानें मोठ्या कौशल्यानें जिंकल्या व आपलें लष्करी कसब दाखवून जगास त्यानें थक्क करून सोडलें. हा त्याचा गुण ओळखूनच मरणाच्या वेळीं विल्यमनें त्याला मुक्त केलें व सर्व सैन्याचें आधिपत्य त्याच्याकडे सोंपविलें. अॅननें त्याचीच निवड कायम केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. स्पॅनिश वारशाचें युद्ध–कारणें :—स्पॅनिश वारशाचें युद्ध कोणत्या परिस्थितींत सुरू झालें तें मागें सांगितलेंच आहे. त्यावरून लुईनें आपल्या राक्षसी महत्त्वाकांक्षेस लगाम घातला असता तर हें युद्ध कदाचित् झालेंही नसतें हें लक्षांत येईल. परंतु तसें घडलें नाहीं. उलट युद्ध चेतविण्याकरितां त्यानें अनेक गोष्टी घडवून आणल्या. डच लोकांवर त्याचा विशेष डोळा ! तेव्हां त्यांचा निःपात करण्याच्या हेतूनें त्यानें त्यांची बेल्जममधून हाकालपट्टी केली व त्यांच्या जागीं सरहद्दीवरील किल्ल्यांचें रक्षण करण्याकरितां फ्रेंच सैनिक नेमले. रिसविकच्या तहाच्या हें विरुद्ध होतें. तसेंच डच व इंग्लिश लोकांनीं स्पेनच्या ताब्यांतील मसाल्याच्या बेटांशीं व्यापार करतां कामा नये असें त्यानें फर्माविलें. सन १७०१ मध्यें त्यानें दुसऱ्या जेम्सच्या मुलाला–जेम्स एडवर्डला–इंग्लंडचा राजा म्हणून मान्यता दिली. त्यामुळें इंग्लिश लोक फारच खवळले. या सर्व कारणांमुळेंच इंग्लंडला त्याच्याशीं युद्ध करावें लागलें. सन १७०१ मध्यें विल्यमनें एक मोठा संघ स्थापन केला होता. इंग्लंड, ऑस्ट्रिया, हॉलंड व अनेक जर्मन संस्थानें त्या संघांत सामील झालीं होतीं. लुईच्या महत्त्वाकांक्षेस आळा घालून त्याच्यापासून युरोपचें संरक्षण करणें हा या संघाचा उद्देश होता. पुढें सन १७०३ मध्यें पोर्तुगालही या संघांत सामील झाला.

४. स्पॅनिश वारशाचें युद्ध (१७०२-१७१३):—सन १७०२ मध्यें लुईनें लढाईस सुरुवात केली व हॉलंडवर हल्ला केला. त्याचवर्षी मार्लबरोनें लीज, बॉन वगैरे महत्त्वाचीं ठाणीं हस्तगत करून घेतलीं. यामुळें हॉलंडची सरहद्द निर्धास्त होऊन डच लोकांचा जर्मनीशीं संबंध जोडला गेला. कारण कलोनचा राजपुत्र लुईच्या बाजूनें लढत होता. मार्लबरोच्या विजयानें ॲन राणी खूष झाली. त्याला तिनें ड्यूकची बहुमानाची पदवी दिली व वार्षिक पांच हजार पौंडांचें पेन्शन दिलें. या वेळीं बव्हेरियांत बंड उत्पन्न झालें. तेव्हां तेथील राजपुत्राच्या मदतीकरितां लुईनें एक मोठें सैन्य तिकडे पाठविलें होतें. हें सैन्य व्हिएन्नावर चाल करून ऑस्ट्रियाच्या बादशहास शरण येण्यास भाग पाडणार होतें. हें कळतांच मार्लबरो मोठ्या तांतडीनें कूच करून ऑस्ट्रियाचा राजपुत्र यूजिन याच्या मदतीस धांवला. त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोघांनीं मिळून ब्लेनहिम येथें फ्रेंच सैन्याचा नुसता फडशा उडविला ! एका बाजूस डॅन्यूब नदी व दुसरीकडे मार्लबरो व यूजिन यांचें सैन्य, अशा कचाटींत फ्रेंच सैन्य सांपडल्यानें त्यांचा निभाव लागेना. भयंकर रणकंदन होऊन फ्रेंच सेनापति टॅलर्ड, दहा-बारा हजार सैनिकांसह, मार्लबरोला शरण गेला (१७०४). या विजयानें ऑस्ट्रियाचें रक्षण झालें, लुईच्या अजिंक्य



लष्कराचा जबरदस्त पराभव झाल्यानें त्याची पत कमी झाली, उत्तम लढवय्ये म्हणून इंग्रजांची कीर्ति झाली व इंग्लंडमधील प्रॉटेस्टंटपंथीय राजघराण्यास आपोआप मान्यता मिळाली. मार्लबरोचा तर इतका सन्मान झाला कीं लोकांनीं आपण होऊन त्याला एक मोठा राजवाडा बांधून दिला व त्या वाड्याचें 'ब्लेनहिम राजवाडा' असें नांव ठेविलें. त्यावर्षी इंग्लिशांनीं स्पॅनिश लोकांकडून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भूमध्यसमुद्राचें नाक–जिब्रॉल्टर–जिंकून घेतलें. तो किल्ला घेण्यांत दर्यासारंग सर जॉर्ज रूक व क्लॉडस्ले यांनीं चांगलाच पराक्रम गाजविला. यानंतर



ब्लेनहिमचा सामरिक नकाशा

मार्लबरोनें अनेक विजय संपादन केले. त्याच्यासंबंधानें फ्रेंच ग्रंथकार व्हॉल्टेर म्हणतो कीं 'प्रत्येक लढाईत त्याला विजयश्रीनें माळच घातली. त्यानें वेढा घातला व तें शहर अगर तो किल्ला त्यानें घेतला नाहीं असें कधींही घडलें नाहीं.' ब्लेनहिमनंतर मार्लबरोनेंही अत्यंत तडफेनें व कुशलतेनें वागून सन १७०६ मध्यें रॅमिलीज येथें, सन १७०८ मध्यें ओडेनार्ड येथें व सन १७०९ मध्यें मॅलप्लॅके येथें फ्रेंचांवर फार मोठे विजय संपादिले. शेवटची लढाई होण्यापूर्वी लुईनें तहाचीं बोलणीं सुरू केलीं होतीं. फ्रेंच सैनिकांस मार्लबरो या शब्दाचीही दहशत बसली होती! फ्रेंच माता मार्लबरोची भीति दाखवून, मुलांस गप्प बसवीत असत!! अशा स्थितींत तहही झाला असता; परंतु त्याच वेळीं लुईच्या नातवानें–फिलिपनें–स्पेन देश जिंकून घेतला असल्यानें त्यानें तहास संमति दिली नाहीं. लुईच्या सुदैवानें सन १७११ मध्यें मार्लबरोचे सर्व लष्करी अधिकार काढून घेण्यांत आले. सन १७१० मध्यें व्हिग मंत्रिमंडळानें राजीनामा दिला व नव्या टोरी मंत्रिमंडळाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मार्लबरो इंग्लंडांत लष्करी सत्ता स्थापील अशी भीति वाटूं लागल्यानेंच तो स्थानभ्रष्ट झाला. तशांतच त्याच्या बायकोचें व ॲन राणीचेंही बिनसलें होतें. शेवटीं टोरी प्रधानमंडळानें सन १७१३ मध्यें युट्रेक्टचा तह घडवून आणल्यानें हें युद्ध समाप्त झालें.

५. युट्रेक्टचा तह (१७१३):—या तहानें खालील गोष्टी ठरविल्या. (१) जिब्रॉल्टर, मिनोर्का, न्यू फाऊंडलंड, नोव्हास्कोशिया व हडसन उपसागराजवळील प्रदेश, इंग्लंडकडे रहावा. (२) स्पेनच्या ताब्यांतील अमेरिकेमध्यें निग्रो लोकांस गुलाम म्हणून तीस वर्षेंपर्यंत विकण्याची व स्पेनच्या वसाहतींमध्यें दर वर्षास एक व्यापारी जहाज पाठविण्याची इंग्लंडला परवानगी असावी. (३) ॲन व तिच्यानंतर इंग्लंडच्या गादीवर येणाऱ्या प्रॉटेस्टंट राजास लुईनें मान्यता द्यावी व दुसऱ्या जेम्सच्या मुलाला फ्रान्समध्यें आश्रय देऊं नये. (४) लुईच्या नातवास पांचवा फिलिप म्हणून स्पेनच्या गादीवर बसवावें; परंतु स्पेनचें राज्य व फ्रान्सचें राज्य कधींही जोडण्यांत येऊं नये. (५) आर्चड्यूक चार्ल्स यास नेपल्सचें राज्य, बेल्जम व सार्डीनिया मिळावें. (६) सिसिली, सव्हॉयच्या ड्यूकला देण्यांत यावें. (७) डंकर्क बंदराची तटबंदी लुईनें पाडून टाकावी. हा तह टोरी मंत्रिमंडळानें घडवून आणला. त्यामुळें तो फारच निराशाजनक होता असें लोकांचें म्हणणें होतें. ज्या कारणाकरितां हें युद्ध सुरू झालें तीं कारणें—विशेषतः लुईच्या नातवाला स्पेनचें राज्य मिळूं नये—दूरच राहिलीं, असेंही लोक म्हणत. असें असलें तरी युरोपांत बलसमत्व राहणें शक्य झालें व या युद्धानें फ्रान्सच्या दुर्दम्य महत्त्वाकांक्षेस मर्यादा घातली गेली. व्हिग लोकांचें मंत्रिमंडळ असतें तर ब्रिटनला मिळाल्या त्यापेक्षांही जास्त सवलती मिळाल्या असत्या. हें खरें असलें तरी या तहानें ब्रिटनचाही कमी फायदा झालेला नाहीं. मात्र इंग्लंड व ऑस्ट्रिया यांची गट्टी जमून फ्रान्स व इंग्लंड यांची पुढील शतकभर चांगलीच जुंपली! फ्रेंच लष्करी श्रेष्ठत्वालाही चांगलाच धक्का बसला. इंग्लंडचें आरमारी श्रेष्ठत्व कसास लागून त्यानें आपलें स्थान कायम टिकविलें. ब्रिटिश व्यापार व ब्रिटिश साम्राज्य यांचा विस्तार होण्यास योग्य ती संधि प्राप्त झाली. इटलीमध्यें व बेल्जममध्यें ऑस्ट्रियाचें वर्चस्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थापन झालें. युद्ध थांबलें तरी युट्रेक्टच्या तहानें भावी युद्धाचीं बीजें पेरलीं गेलीं हें मात्र निश्चित.

६. **डॉ. सॅचेव्हरलचें प्रकरण** (१७१०):—युद्ध चालू असतांच सन १७०४ पासून स्थापन झालेलें व्हिग मंत्रिमंडळ मोडलें (१७१०). चालू युद्धाला व्हिग मंत्रिमंडळानें चांगलेंच उचलून धरलें होतें व मार्ल-बरोला जसजसे विजय मिळत गेले तसतसें व्हिगांचेंही वजन जास्त वाढत गेलें. परंतु युद्ध लांबल्यामुळें लोक कंटाळून गेले होते. तहाची आशा उत्पन्न व्हावी व ती नष्ट होऊन लोकांची निराशा व्हावी, असा एकसारखा प्रकार चालू होता व याला व्हिग मंत्रिमंडळच कारणीभूत आहे असें लोकांस वाटूं लागलें. स्वतःच्या स्वार्थासाठीं व अभ्युदयासाठीं मार्लबरो युद्ध लांबवितो अशीही लोकांची खोटी समजूत झाली. तशांतच तोही क्रॉम्वेलप्रमाणें इंग्लंडांत लष्करी सत्ता स्थापील अशी भीति लोकांस वाटूं लागल्यानें तोही त्यांच्या मनांतून उतरला! या परिस्थितीचा टोरीनीं पूर्णपणें फायदा घेतला व लोकांच्या असमाधानांत भर घातली. याच वेळीं इंग्लंडच्या धर्मपीठावर गंडांतर आलें आहे अशी हूल उठविण्यांत आली. डॉ. हेन्री सॅचेव्हरल या पाद्र्यानें सेंट पॉल्स धर्ममंदिरांत, लंडनच्या नगराध्यक्षाच्या समोर, एका प्रवचनांत निःशस्त्रप्रतिकाराचें महत्त्व वर्णन करून राजाच्या ईश्वरदत्त अधिकारांचें समर्थन केलें. एवढेंच नव्हे, तर इंग्लंडचें धर्मपीठ अमान्य करणारांस कोणत्याही सवलती न देतां त्यांच्यावर कडक निर्बंध घालावे असें त्यानें सांगून, त्यांस धार्मिक सवलती दिल्याबद्दल व्हिग मंत्रि-मंडळाची निर्भर्त्सना केली. हें कळतांच व्हिग खवळले व त्यांनीं राजद्रोहा-बद्दल डॉ. सॅचेव्हरलवर खटला भरला. टोरीनीं त्याला सर्वप्रकारें मदत केली. तरीही उमरावमंडळानें त्याला दोषी ठरवून तीन वर्षेंपर्यंत त्यानें कोठेंही प्रवचन करूं नये अशी सौम्य शिक्षा दिली. आपल्याला क्षुल्लक शिक्षा झाली व खटल्यांत आपला नैतिक विजय झाला असें सॅचेव्हरल यास वाटलें! टोरीही आनंदले व त्यांनीं आनंदोत्सव केले. या प्रकरणामुळें व्हिगांची सत्ता कमी होण्यास मदतच झाली. तशांतच ॲनच्या मनांतून याच वेळीं सॅरा मार्लबरो उतरली व दरबारांतून तिचें उच्चाटन होऊन तिची जागा अबी गेल हिल या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टोरी स्त्रीनें घेतल्यानें व्हिगपक्षही राणीच्या मनांतून उतरला. तेव्हां सन १७१० मध्यें व्हिगांनीं राजीनामा दिल्यानें हार्ले व सेंट जॉन यांच्या नेतृत्वाखालीं टोरी मंत्रिमंडळाची स्थापना झाली.

७. इंग्लंड स्कॉटलंडचें एकीकरण (१७०७) :—पराभव होण्या-पूर्वी व्हिग मंत्रिमंडळानें एक उत्तम कामगिरी केली होती. ती म्हणजे इंग्लंड व स्कॉटलंड या देशांचें एकीकरण होय. पहिला जेम्स इंग्लंडचा राजा झाल्यानें जें एकीकरण झालें तें एकांगी होतें. राजा एक झाला तरी दोन्ही देशांतील लोकांचीं मनें मिळालीं नव्हतीं. त्यांच्या स्वतंत्र पार्लमेंट सभाही होत्या व त्या स्वतंत्र होत्या. त्यामुळें दोन्ही देशांत खटके उडत. याचमुळें यादवी युद्धाच्या वेळीं स्कॉटलंडांत दुफळी झाली व एक पक्ष राजाच्या बाजूचा तर दुसरा पार्लमेंटच्या बाजूचा असा देखावा दिसला. ही दुही कायमची नष्ट करण्याचा क्रॉम्वेलनें प्रयत्न केला; पण तो फसला. सन १६८९ च्या राज्यक्रांतीच्या वेळींही दोन्ही देशांत सलोखा निर्माण झाला नाहीं. तिसऱ्या विल्यमनें दोन्ही देशांचें एकीकरण करण्याच्या प्रश्नास चांगलीच चालना दिली होती. स्कॉटिश लोकांस इंग्लिश वसाहतींशीं व्यापार करण्याचीही परवानगी मिळाली. त्यामुळें स्कॉटलंडमध्यें मध्य अमेरिकेशीं व्यापार करण्याकरितां 'डेरियन कंपनी' स्थापन झाली (१६९९). परंतु डेरियन कंपनीचे सर्व बेत फसले व तिनें त्याचें खापर इंग्रजांवर फोडलें ! यामुळें इंग्रजांवर स्कॉटिश लोक जळफळत होते. तशांतच एकी-करण झाल्यास प्रेसबिटेरियन पंथास धोका पोंचेल व इंग्लंडचें राष्ट्रीय कर्ज फेडण्याकरितां आपल्याला कर द्यावे लागतील असें स्कॉटिश लोकांस वाटत असे. ॲनच्या मागून येणाऱ्या प्रॉटेस्टंट राजास स्कॉटिश लोक मान्यता देणार नाहींत असें इंग्रजांसही वाटत होतें. अशा परिस्थितींतच तिसऱ्या विल्यमच्या सूचनेवरून सन १७०२ मध्यें एकीकरणाचा प्रश्न धसास लावण्याकरितां एक कमिशन नेमलें गेलें. परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. उलट सन १७०३ मध्यें स्कॉटिश पार्लमेंटनें एक कायदा पास करून ॲनच्या मागून इंग्लंडच्या गादीवर येणाऱ्या प्रॉटेस्टंट राजाला मान्यता देण्यांत येणार नाहीं असें ठरविलें. याला उत्तर म्हणून सन १७०५ मध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लिश पार्लमेंटनें एक कायदा पास करून स्कॉटिश लोक परकी म्हणून मानण्यांत यावेत असें ठरविलें. त्याच वेळीं स्कॉटलंडचा कोणताही माल इंग्लंडमध्यें येऊं नये व सरहद्दीची तटबंदी करावी असें ठरलें. इतकें झाल्यानें स्कॉटिश लोक वठणीवर आले व पूर्वी नेमलेल्या कमिशनचें काम सुकर होऊन सन १७०७ मध्यें दोन्ही देशांचें एकीकरण झालें.

८. एकीकरणाच्या अटी :—सन १७०७ मध्यें इंग्लंड व स्कॉटलंड यांचें जें एकीकरण झालें त्याच्या खालीलप्रमाणें अटी ठरविण्यांत आल्या. (१) इंग्लंड व स्कॉटलंड हे दोन्ही देश एक समजण्यांत यावेत; व त्यास 'ग्रेट ब्रिटन' हें नांव मिळावें. (२) दोन्ही देशांचें निशाण एक असावें व ग्रेट ब्रिटनकरितां लंडनला एकच पार्लमेंट सभा असावी. (३) स्कॉटिश उमरावांनीं निवडलेले सोळा उमराव उमरावमंडळांत असावेत व पंचेचाळीस लोकनियुक्त स्कॉटिश सभासद कॉमन्स सभेंत असावेत. (४) स्कॉटलंडचे जुने कायदे व त्यांचें प्रेसबिटेरियन धर्मपीठ कायम रहावें. त्याचप्रमाणें त्यांचीं कोर्टेंही कायम रहावींत. (५) दोन्ही देशांत अनिर्बंध व्यापार चालावा व इंग्लंडमध्यें चालू असलेलीं नाणीं व वजनें–मापें स्कॉटलंडनें मान्य करावीं. (६) स्कॉटलंडनें ॲनला राणी म्हणून मान्य करावें व सन १७०१ च्या कायद्याप्रमाणें इंग्लंडच्या गादीवर पुढें येणाऱ्या प्रॉटेस्टंट राजास मान्यता द्यावी. (७) युद्धामुळें इंग्लंडवर लादलेल्या करांची स्कॉटलंडवर सक्ति करूं नये व स्कॉटिश सरकारचें कर्ज फेडण्याकरितां व डेरियन कंपनी बुडाल्यामुळें तिच्या भागीदारांना भरपाई देण्याकरितां इंग्लंडनें सुमारें चार लक्ष पौंड द्यावे.

९. एकीकरणाचे परिणाम :—हें एकीकरण प्रथमतः लोकप्रिय होणें शक्यच नव्हतें. विशेषतः स्कॉटिश लोक मनांतून साशंकच होते. आपल्या धर्मावर हल्ला येईल ही त्यांची मुख्य भीति होती. परंतु पुढें पुढें त्यांच्या मनांतील अढी कमी होऊन इंग्लंड व स्कॉटलंड हे दोन्ही देश एकजीव होण्यास मदत झाली. त्यांच्यामधील चिरकालीन वितुष्ट नाहीसें होऊन ते देश एकदिलानें नांदूं लागले. स्कॉटलंड व इंग्लंड एकमेकांबद्दल निर्धास्त झाल्यानें त्यांचा व्यापारही उत्तम होऊं लागला व व्यापारी सवलती मिळा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ल्यानें स्कॉटलंडचा व्यापार वाढला. त्यामुळेंच ग्लासगोसारखीं शहरें व निरनिराळे कारखानें यांची वाढ झाली. इंग्लंडच्या सैन्यांत स्कॉटिश लोक दाखल होऊं लागल्यानेंही इंग्लंडचें लष्कर उत्तम बनलें. स्कॉटिश प्रेसबिटेरियन धर्मपंथास मुळींच धक्का पोंचला नाहीं. त्यामुळेंही स्कॉटिश लोकांची इंग्रजांबद्दलची साशंकता नष्ट झाली.

१०. व्हिग व टोरी पक्षांतील दुही :—एकीकरणाचा कायदा पास झाल्यानंतर व्हिग मंत्रिमंडळ नष्ट होऊन हार्ले (ऑक्सफर्डचा अर्ल) व सेंट जॉन (बोलिंगब्रोक) यांच्या नेतृत्वाखालीं टोरी मंत्रिमंडळ स्थापन झालें. या टोरी मंत्रिमंडळाला दोन गोष्टी साध्य करावयाच्या होत्या. पहिली म्हणजे युद्ध संपवून तह करणें व दुसरी म्हणजे ॲनच्या नंतर जेम्सच्या मुलाला–तोतया राजपुत्राला—इंग्लंडच्या गादीवर बसविणें. यांपैकीं पहिला हेतु साध्य करणें सोपें होतें. युट्रेक्टचा तह कॉमन्स सभेंत पास झाला, तरी व्हिग लोकांचें बहुमत असलेल्या उमरावमंडळांत तो तह पास होईलच असें नव्हतें. तेव्हां त्या मंडळांत आपलें बहुमत निर्माण व्हावें या हेतूनें हार्लेनें ॲनकडून बारा नवे उमराव बनविले. अर्थात् त्यामुळें उमरावमंडळांतही तो तह मान्य केला गेला. याच मंत्रिमंडळानें मार्लबरोला अधिकार भ्रष्ट करून ऑर्मंडच्या ड्यूकला सेनापति नेमलें. मार्लबरोचा चिटणीस सर रॉबर्ट वॉलपोल याच्यावरही खटला भरण्यांत येऊन त्याला टॉवरमध्यें कैदेंत ठेवण्यांत आलें. या कृत्यानंतर टोरी मंत्रिमंडळानें आपल्या दुसऱ्या हेतूच्या सिद्ध्यर्थ खटपट चालविली. कोणीही राजा झाला तरी इंग्लिश लोकांना तो पाहिजेच होता व या परिस्थितीचा टोरींनीं फायदा घ्यावयाचें ठरविलें. परंतु बोलिंगब्रोक व हार्ले यांच्यामध्येंच जेम्स एडवर्डनें—दुसऱ्या जेम्सच्या मुलानें—कोणता धर्मपंथ स्वीकारावा याबद्दल खुद्द ॲनच्या समोर भांडण माजलें. या गोष्टीचा वीट येऊन राणीनें हार्ले याला कामावरून दूर केलें. बोलिंगब्रोक एकटाच राहिला व आपल्या उद्देशाच्या खटपटींत असतांच राणीनें लॉर्ड श्रुसबरी या व्हिग पुढाऱ्याला हार्लेच्या जागीं नेमलें. राणीही नंतर थोड्याच दिवसांनीं मेली. ती बातमी कळतांच श्रुसबरीनें पहिल्या जॉर्जच्या नांवानें द्वाही फिरविली. परंतु या गोष्टी होण्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूर्वीच टोरी मंत्रिमंडळानें 'धर्मभेदाचा कायदा' पास करून सर्व शाळांतील शिक्षक प्रस्थापित धर्माचेच पाहिजेत असें ठरविलें. हार्लेला हा कायदा मान्य नव्हता त्यामुळें त्याचें व बोलिंगब्रोकचें बरेंच बिनसलें. त्यामुळेंच बोलिंगब्रोकच्या सल्ल्यानें ॲननें हार्लेला मंत्रिमंडळांतून कमी केलें. अशा तऱ्हेनें ॲनच्या कारकीर्दीच्या अखेरीस टोरीपक्षाच्या हातून सर्व राज्य-कारभार व्हिग लोकांच्या हातीं आला व तो पुढें जवळ जवळ साठ वर्षें त्याच पक्षाच्या हातीं राहिला. यानंतर थोड्याच दिवसांत ॲन राणी सन १७१४ मध्यें मेली. त्या वेळीं सोफिया मेली असल्यामुळें तिचा मुलगा जॉर्ज, पहिला जॉर्ज म्हणून, इंग्लंडच्या गादीवर बसला.

अभ्यास

१. स्पॅनिश वारशाच्या युद्धाचीं कारणें सांगा. युट्रेक्टच्या तहाचीं कलमें सांगून त्याचे परिणाम सांगा.

२. लॉर्ड मार्लबरो याचें चरित्र सांगा. तुम्हांस माहिती असलेल्या दुसऱ्या कोणत्याही कसलेल्या सेनापतीशीं त्याची तुलना करा व त्यांत श्रेष्ठ कोण तें कारणांसह सांगा.

३. इंग्लंड-स्कॉटलंडच्या एकीकरणाची साद्यंत हकीकत सांगा.

४. तुम्ही स्कॉटिश लोक आहांत अशी कल्पना करा. इंग्लिश लोक इंग्लंड व स्कॉटलंड यांचें एकीकरण करण्याकरितां, बोलाचाली करण्याकरितां, तुमच्याकडे आले आहेत अशी कल्पना करून तुमचा त्यांच्याशीं जो वादविवाद होईल तो लिहा. (वाटल्यास तुमच्या वादविवाद सभेकरितां तो एक चर्चा-विषय घेऊन त्याची साद्यंत चर्चा करा.)

५. ॲनच्या कारकीर्दींत व्हिग व टोरी यांच्यामध्यें भांडणें माजण्याचें कारण काय ? त्याचा परिणाम काय झाला ?

६. डॉ. सॅचेव्हरलबद्दल माहिती सांगा. त्याचा मंत्रिमंडळावर काय परिणाम झाला ?

७. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख कराः—
राणी ॲन, हार्ले, टुरेन, सॅरा चर्चिल, यूजिन, आर्चड्यूक चार्ल्स, पांचवा फिलिप, टॅलर्ड, जिब्रॉल्टर, सॅचेव्हरल, अबी गेल, रूक, डेरियन, श्रुसबरी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालसारणी इ. स. १६८८-१७१३

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	यूरोप-महत्त्वाच्या गोष्टी	हिंदुस्थान-महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ति
१६८८	उज्वल राज्यक्रांति			
१६८९	विल्यम-मेरी (१६८९-१७०२)	फ्रान्सशीं युद्ध १६८९	संभाजीचा वध १६८९	डॅन्बी, गोडोल्फिन,
	हक्कांचा कायदा १६८९			चौदावा लुई, संभाजी,
	लिमरि. पाडाव १६९१			राजाराम,
	ग्लेंकोची कत्तल १६९२	लाहोगची ल. १६९२		संताजी, संदरलंड,
	इं. बँकची स्थापना त्रै. नि. का. १६९४			प्र. निराजी, पॅटर्सन,
१६९५				मॉंटेग,
	व्हिग जंटो १६९६			
	रिसविकचा तह १६९७			ऐझाक न्यूटन
		वि. १ला तह १६९८	जिंजीचा वे. १६९८	झुल्फिकार-खान,
	विभागणीचा २ रा तह १७००	स्पेनचा राजा दुसरा चार्ल्स मृत्यु १७००	राजारामाचा मृत्यु १७००	येसूबाई, ताराबाई,
१७०१	वारशाचा का. १७०१	दु. जेम्स मृ. १७०१		
	तिसऱ्या विल्यमचा मृत्यु १७०२	स्पॅनिश वारशाचें युद्ध १७०२		मार्लबरो,
	जिब्राल्टरचा पा. १७०४	ब्लेनहिम ल. १७०४		ध. जाधव,
		रॅमिली ल. १७०६		
१७०७	इं.-स्कॉ. एकीकरण १७०७		औरंगजे. मृ. १७०७	ॲडिसन,
			शाहूमहाराजांची सुटका १७०८	कान्हो आंग्रे, बा. विश्वनाथ
	डॉ. सॅचेव्हरल प्र. १७१०		धनाजी. मृ. १७१०	
				फरुक्शियर, स्टील
				सैय्यद बंधू
१७१३		युट्रेक्टचा त. १७१३	बाळाजी विश्वनाथ पेशवा १७१४	क्रिस्टॉफर रेन
१७१४	ॲनचा मृत्यु १७१४			

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. स्टुअर्ट काळांतील ठळक विशेष

१. ट्यूडर व स्टुअर्ट राजे :—एलिझाबेथच्या उज्वल कारकीर्दीनंतर स्टुअर्ट राजांची कारकीर्द सुरू झाली. ट्यूडर राजे अनियंत्रित असत. त्यांच्या पाऊलावर पाऊल टाकून जाण्याची स्टुअर्ट राजांनीं महत्त्वाकांक्षा धरली होती; परंतु त्या बाबतींत देश, काल व परिस्थिति यांचा त्यांनीं कोणत्याही प्रकारचा विचार न केल्यानें सर्व प्रकरण त्यांच्या आंगलट आलें. अनियंत्रित असले, तरी ट्यूडर राजे देशहितच साधीत. आपल्या प्रत्येक कृत्याला त्यांनीं सनदशीरपणाचें वळण दिलें ही गोष्ट स्टुअर्ट राजांनीं दृष्टी-आड केली. लोकांमध्यें चिकित्सकबुद्धि जागृत झाली होती. राजकारणाकडे त्यांचें लक्ष वळूं लागलें होतें व आपले अधिकार वाढवून घेण्याकडे लोकांची प्रवृत्ति होऊं लागली होती. अशा स्थितींत ट्यूडर राजे ज्याप्रमाणें काळवेळ पाहून नमतें घेत, तसें स्टुअर्ट राजांनीं नमतें न घेतल्यानें एकाला फाशीं जावें लागलें व दुसऱ्याला देशत्याग करावा लागला. 'राजाचे अधिकार ईश्वरदत्त आहेत' या नव्या विचारसरणीचा स्टुअर्ट राजांनीं उपक्रम केला व सर्व राजे त्याच तत्त्वाला चिकटून राहिले. यामुळें राजा व पार्लमेंट यांच्यांत अभूतपूर्व असा लढा लागून राहिला. त्यांत अखेरीस पार्लमेंटला जय मिळाला, राजाचा पराभव होऊन इंग्लंडमध्यें सनदशीर युगाचा प्रारंभ झाला व राजसत्ता कमकुवत व सामर्थ्यहीन झाली. ट्यूडरांची राज्यकारभाराची पद्धति स्टुअर्ट राजांना अवलंबितां न आल्यानेंच परराष्ट्रीय धोरण, धार्मिक गोंधळाची उकल, पार्लमेंटचे अधिकार वगैरे बाबतींत राजा व पार्लमेंट यांचा झगडा सुरू झाला व अनियंत्रित, जुलमी व अरेरावी राजसत्ता नष्ट होऊन लोकस्वातंत्र्याला पोषक असें लोकशाहीचें युग सुरू झालें. स्टुअर्ट राजे, ट्यूडर राजांपेक्षां, हेकेखोर, एककल्ली व लहरी होते व त्यामुळें लोकमत व पार्लमेंट यांची पर्वा न करतां ते स्वतःच्या लहरीप्रमाणें वागून राज्यघटनेच्या दृष्टीनें त्यांनीं अनेक प्रकारच्या अन्याय्य गोष्टी केल्या व प्रजाक्षोभ निर्माण केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. दोन राज्यक्रांत्या :—एकंदरींत पाहतां ट्यूडर राजांपेक्षां स्टुअर्ट राजांचा अंमल लोकशाहीच्या प्रगतीच्या दृष्टीनें चांगला झाला असें लोक मानतात. या काळांत इंग्लंडमधून राजसत्तेचें कायमचें उच्चाटन करण्याचे दोनदां प्रयत्न झाले व शेवटीं इंग्लंडांत सन १६४९ मध्यें व सन १६८९ मध्यें दोन राज्यक्रांत्या होऊन नियंत्रित राजसत्ता स्थापन झाली. सन १६४०-४९ ची राज्यक्रांति 'रक्त राज्यक्रांति' म्हणून प्रसिद्ध आहे. सन १६८९ ची राज्यक्रांति 'उज्वल राज्यक्रांति' म्हणून प्रसिद्ध आहे. रक्त राज्यक्रांतीनें राजसत्तेवर ओढवलेल्या अनर्थामुळें शहाणे होऊन राजांनीं आपलें धोरण बदलणें योग्य होतें व त्याप्रमाणें दुसऱ्या चार्ल्सनें यशस्वी प्रयत्न केलाही; परंतु दुसऱ्या जेम्सनें त्याच्या अनुभवाचा फायदा न घेतां आपल्या वाडवडिलांच्या पावलांवर पाऊल टाकून राजसत्तेवर पुन्हां एकदां मोठें गंडांतर ओढवून घेतलें. लोकमत व पार्लमेंट यांना धाब्यावर बसवून केवळ स्वतःच्या अविचारी व हटवादी धोरणाचा पुरस्कार त्यानें केला. यामुळेंच उज्वल राज्यक्रांति घडून आली. या दोन्ही राज्यक्रांत्या घडल्यानें राजांची अनियंत्रित सत्ता नष्ट झाली व स्वतःच्या वैय्यक्तिक मतांवर व धोरणांवर अवलंबून राहिल्याचें राजांस पुरेपूर प्रायश्चित मिळालें ! यानंतर विल्यमच्या वेळेपासून पार्लमेंट वरचढ ठरून राजसत्ता ईश्वरदत्त नाहीं व राजा ईश्वराचा अंश असला तरीही तो पार्लमेंटला—अर्थात् लोकमताला—जबाबदार आहे, एवढेंच नव्हे, तर तो ज्यांच्यातर्फें राज्यकारभार हांकतो ते त्याचे प्रधानही पार्लमेंटला जबाबदार आहेत हें तत्त्व रूढ झालें. यामुळें इंग्लंडमध्यें सनदशीर राज्यपद्धति सुरू होऊन राजा लोकमतानुवर्ति झाल्यानें देशांत लोकशाहीला सुरुवात झाली व जुलमी, निष्ठूर, अनियंत्रित व दडपशाही करणारी राजसत्ता नष्ट झाली. यामुळें 'राजा कीं पार्लमेंट' या प्रश्नाचा कायमचा निकाल लागून राज्यकारभारावर दोघांचीही सारख्या जबाबदारीनें हुकमत चालावी असें ठरलें. अर्थात राजसत्तेमुळें प्राप्त होणारे फायदे पदरांत पडूनही इंग्लंडचा कारभार लोकमतानुवर्ति झाला.

३. पक्षनिष्ठ राजकारणाचा उदय :—इंग्लंडचा कारभार लोकमतानुवर्ति झाला हें खरें; परंतु त्याला पोषक अशी अत्यंत महत्त्वाची घटना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्टुअर्ट अमदानींत घडून आली. ती म्हणजे पक्षनिष्ठ राजकारण होय. यादवी युद्धाच्या वेळेपासूनच कॅव्हेलियर ऊर्फ शिलेदार व राउंडहेड असे दोन पक्ष इंग्लंडमध्यें स्थापन झाले. पुढें दुसऱ्या चार्ल्सच्या कारकीर्दीत व्हिग व टोरी पक्ष निर्माण झाले. परंपरा टिकवावी व जुन्या संस्था, चाली, धर्म वगैरे बाबतींत एकदम सुधारणा न करतां त्या सावकाश व हळूहळू कराव्या असें टोरीपक्षाचें मत होतें; उलट सर्व बाबतींत जुन्याचा हट्ट सोडून सुधारणा लवकर व उत्कटत्वानें कराव्यां असें व्हिग म्हणत असत. व्हिग व टोरी यांचा हा झगडा पुढें सुमारें दीडशें वर्षें चालला व अजूनही चालूच आहे. परंतु या पक्षसंघटनेंतूनच एक चांगली गोष्ट बाहेर आली व ती म्हणजे प्रधानमंडळात्मक राज्यपद्धति होय. अनुकूल परिस्थिति व प्राप्त परिस्थितीचा भरपूर उपयोग करून घेण्याचें कसब अंगीं असल्यानेंच व्हिग व टोरी पक्षांतील मुत्सद्यांस प्रधानमंडळात्मक राज्यपद्धतीचें बीजारोपण करतां आलें व निरनिराळ्या वेळीं तींत सुधारणा करून ती इंग्लंडमध्यें चिरस्थाई करतां आली. स्टुअर्ट काळांतील हें एक अत्यंत महत्त्वाचें कार्य होय.

४. राज्यघटनेची व्याप्ति :—सनदशीर राज्यपद्धति व प्रधानमंडळात्मक राज्यपद्धति यांना कांहीं बंधनें असतातच. आजपर्यंत इंग्लंडची राज्यघटना अलिखितच होती. मॅग्नाकार्टासारख्या महत्त्वाच्या गोष्टींमुळें ती लिखित होऊं लागली. स्टुअर्ट अमदानींत इंग्लंडच्या लिखित राज्यघटनेंत बरीच महत्त्वाची भर पडत गेल्यानें तिला चांगलेंच मूर्त स्वरूप प्राप्त झालें. असें असलें तरी तें पूर्णांशानें नाहीं. प्रचार व प्रघात यावरही इंग्लंडची राज्यघटना बरीच अवलंबून आहे. स्टुअर्ट अमदानींत ज्या कायद्यांच्यामुळें इंग्लंडच्या लिखित राज्यघटनेंत भर पडत गेली त्यांचें वर्णन मागेंच आलें आहे. येथें त्यांचा फक्त नामोल्लेख करणें भाग आहे. हक्कमागणीचा अर्ज, तक्रारींचा खलिता, हक्कांचा कायदा, व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा, तिजोरी व लष्कर या संबंधीं कायदा, त्रैवार्षिक निवडणुकीचा कायदा, इंग्लिश वारशाचा कायदा वगैरे महत्त्वाचे कायदे स्टुअर्ट काळांत पार्लमेंटनें केल्यानें इंग्लंडची राज्यघटना थोडीफार लिखित झाली. वरील सर्व कायद्यांमुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांचे हक्क कोणते, पार्लमेंटला काय करतां येतें व राज्यघटनेंत राजाचें स्थान काय वगैरे प्रश्नांस योग्य उत्तरें मिळतात. राज्यघटनेला अशा प्रकारें निश्चित स्वरूप आल्यानें नव्या लोकशाहीलाही निश्चित स्वरूप येण्यास मदत झाली.

५. स्टुअर्ट राजांची दिवाळखोरी:—स्टुअर्ट अमदानीचा आणखी एक विशेष म्हणजे स्टुअर्ट राजांना नेहमीं पैशाची टंचाई भासे. पार्लमेंट-सभा वश असती तर ट्यूडर राजांप्रमाणें स्टुअर्ट राजांनाही मुबलक पैसा पार्लमेंटकडून मिळाला असता. पार्लमेंटची सर्व सत्ता करांवर होती व तिच्या संमतीनेंच स्टुअर्ट राजांस नवीन कर बसवितां येत व जुने कर वसूल करतां येत. परंतु पहिल्या जेम्सच्या वेळेपासूनच आर्थिक बाबतींत राजा व पार्लमेंट यांच्यामध्यें अहिनकुलभाव निर्माण झाला. राजानें पैसा मागावा व 'आमचीं गाऱ्हाणीं दूर केल्यावरच पैसा मिळेल' असें पार्लमेंटनें म्हणावें असें एकसारखें होऊं लागलें. त्यामुळें राजांना अनेक अन्याय्य युक्त्या-प्रयुक्त्यांनीं पैसा उभा करावा लागला. पार्लमेंटला न विचारतांही राजांनीं अनेक कर देशावर लादले व आपल्यावर व देशावर आपत्ति ओढवून घेतली. पार्लमेंट ऐकत नाहीं व मंजूर केलेल्या रकमेपेक्षां एकहि पै जास्त मिळत नाहीं असें पाहून दुसरा चार्ल्स व दुसरा जेम्स यांनीं फ्रान्सच्या राजाकडून अनेक वेळां गुप्तरीतीनें मोठमोठ्या रकमा वर्षानुवर्षे स्वीकारल्या. तेवढ्या-नेंही भागत नाहीं असें पाहून दुसऱ्या चार्ल्सनें एकदां 'मी कोणाचें देणें लागत नाहीं व लागत असल्यास तें मी यापुढें केव्हांही देणार नाहीं' असें जाहीर करून खाका वर केल्या! त्यामुळें राजावरील लोकांचा विश्वास उडाला. स्वतःच्या व्यक्तिगत संपत्तीची व उत्पन्नाचीही स्टुअर्ट राजांना अनेकवार अन्याय्य मार्गांनीं वाढ करावी लागली व सक्तीचीं कर्जें, नजराणे, पदव्या, मक्तेविक्री वगैरे मार्गांनीं त्यांनीं आपलें खाजगी उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला. इतकें करूनही स्टुअर्ट राजांस आपली दिवाळखोरी नष्ट करतां आली नाहीं. ही दिवाळखोरी स्टुअर्ट राजांच्या उधळपट्टीनें निर्माण झाली होती व पार्ल-मेंटला ती नष्ट करावयाची होती. याचमुळें पार्लमेंटला राजाच्या तिजोरीवर व उधळपट्टीच्या कारभारावर कायद्यानें नियंत्रण घालावें लागलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. लष्कर व आरमार :—स्टुअर्ट राजांचा उधळपट्टीचा कारभार व त्यांची आर्थिक हलाखी यामुळें त्यांनीं लष्कर व आरमार यांकडे दुर्लक्ष केलें. विशेषतः स्टुअर्ट काळांतील इंग्लंडचें आरमार अगदींच कनिष्ठ प्रतीचें होतें. स्पेनशीं शत्रुत्व नको म्हणून पहिल्या जेम्सनें आरमाराकडे अगदींच दुर्लक्ष केलें. त्यामुळें सन १६१८ पर्यंत इंग्लिश आरमार कनिष्ठ दर्जाचेंच होतें. पुढें पहिल्या चार्ल्सनें आरमाराकडे थोडें लक्ष देण्यास सुरुवात केली.



सतराव्या शतकांतील जहाज

आरमारच्या वृद्धीकरितां त्यानें नौकाकरापासून मिळालेल्या उत्पन्नापैकीं बराच पैसा खर्च केला. परंतु इंग्लिश आरमाराची भरीव व खरी सुधारणा क्रॉम्वेलच्या कारकीर्दीतच झाली. नाविक व आरमारी बाबतींत हॉलंड देश एकसारखा पुढें जात होता व त्या देशाशीं टक्कर देणें जरूर होतें. म्हणूनच नौकानिर्बंधासारखे कायदे पास करून आपलें आरमार इंग्लंडला सामर्थ्यवान करावें लागलें. पुढें दुसऱ्या चार्ल्सच्या व जेम्सच्या कारकीर्दीतही आरमाराकडे फारसें लक्ष दिलें गेलें नाहीं. पुढें पुढें व्यापार-वृद्धीबरोबरच इंग्लंडच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आरमाराचीही वाढ झाली. सन १६९५ मध्यें आरमाराकरितां ग्रीनविचला सरकारनें एक मोठें रुग्णालय काढलें. वाहतुकीच्या व्यापारास व तसेंच आरमारी हालचाली करण्यास सोपें जावें व त्याला मार्गदर्शक व्हावें म्हणून दीपगृहें बांधण्यास सुरुवात होऊन सन १६९८ मध्यें एडिस्टोन येथें एक मोठें दीपगृह बांधण्यांत आलें. त्याचा आरमारी लोकांस फार उपयोग होऊं लागला. आरमाराप्रमाणेंच लष्कराच्या बाबतींतही स्टुअर्ट राजे निष्काळजीच होते. जेम्सनें खडें सैन्य ठेवण्यास सुरुवात केली व भाडोत्री फौजा कमी करण्याचें धोरण स्वीकारलें. पहिल्या चार्ल्सनेंही तोच कित्ता गिरविला. पुढें क्रॉम्वेलच्या आदर्श सैन्याच्या उभारणीमुळें एका नव्या युगाला सुरुवात झाली व या सैन्यांत पुढें पुढें एकसारखी सुधारणा होत गेल्यानें इंग्लंडच्या लष्कराला परराष्ट्रांतही मान मिळूं लागला. लुईकडून गुप्त धन मिळवून आपल्या लष्करांत व खड्या सैन्यांत दुसऱ्या चार्ल्सनें पुष्कळ वाढ केली; तरीही तें उत्तम प्रतीचें नव्हतें. यापुढें राजा आपल्या लष्कराच्या बळावरच अवलंबूं लागला. त्यामुळें त्याचें सामर्थ्य वाढेल असें वाटूनच पार्लमेंटला लष्करविषयक कायदे पास करावे लागले व त्यामुळें खड्या सैन्यावर नियंत्रण बसलें. स्पॅनिश वारशाच्या युद्धांत मात्र इंग्लंडच्या लष्करानें चांगलेंच नांव मिळविलें.


एडिस्टोन दीपगृह

७. युद्धपद्धतींतील फरक :—इंग्लंडच्या लष्करांत जसजशी सुधारणा होत होती तसतशी युद्धपद्धतींतही सुधारणा होऊं लागली होती. पूर्वी भालेबरच्या, धनुष्य-बाण वगैरे हत्यारें युद्धाच्या वेळीं वापरण्यांत येत. बंदुकीच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दारूचा शोध लागल्यापासून धनुष्य-बाण व भाले-बरच्या मागें पडूं लागल्या. स्टुअर्ट काळांत तर बंदुकवाल्यांच्या पलटणीच तयार होऊं लागल्या. बंदुकीच्या लढाईच्या बाबतींत असें सांगतात कीं एकदां लढाईच्या वेळीं हातघाईची लढाई सुरू असतां फ्रान्समधील एका फ्रेंच सैनिकानें आपल्या जवळची सुरी बंदुकीच्या टोकांस जोडली व लढाई दिली! तेव्हांपासून बंदुकीला 'संगीन' जोडण्यांत येऊं लागली. त्यामुळें युद्धपद्धतींत बराच फरक पडूं लागला. अनेक दिवस वेढा घालणें व शहरांतील अगर किल्ल्यांतील लोकांस शरण येण्यास लावणें अजूनही चालू होतें. सतराव्या शतकाच्या शेवटीं मार्लबरोनें एक नवीनच उपक्रम सुरू केला. एके ठिकाणीं लढत राहण्यापेक्षां शिस्तीनें लष्कर हलविलें व जलद मजला मारल्या तर त्यास उत्तम यश येतें हें त्यानें स्वतःच्या कृतीनें सिद्ध करून दाखविलें. काडतुसाच्या बाबतींतही नवा शोध लागल्यानें बंदुकीचा बार भरणें व बंदुक झाडणें अतिशय जलद होऊं लागलें. त्याचप्रमाणें हिंगणबेट व लहान लहान बॉंब उपयोगांत येऊं लागले. एका विशिष्ट पद्धतीचा गणवेशही दुसऱ्या चार्ल्सच्या वेळेपासून सैनिकांस देण्यांत येऊं लागला. त्यामुळें स्वतःचा कोण व शत्रूपक्षाचा कोण हें लढाईच्या वेळींही समजे. लढाईत जखमी झालेल्या सैनिकांकरितां लंडनजवळ चेल्सी येथें एक मोठें रुग्णालयही सुरू करण्यांत आलें. त्यामुळें त्यांची होणारी आबाळ कमी होऊं लागली.

८. **शास्त्रीय शोध व त्यांचे शोधक**:—स्टुअर्ट काळाचा आणखी एक विशेष म्हणजे या काळांत अनेक उत्तमोत्तम शास्त्रज्ञ निर्माण झाले व त्यांनीं अनेक नवीन शोध लावले. या शास्त्रज्ञांमध्यें गॅलीलियो, केपलर, बॉईल, हूक, हॉले, रेन व न्यूटन हे प्रसिद्ध आहेत. गॅलीलियोसंबंधीं माहिती मागें सांगितलीच आहे (खंड १ पान २५१ पहा). केपलर (१५७१-१६३०) हा प्रसिद्ध ज्योतिषी होता. ग्रहांची कक्षा दीर्घवर्तुळाकृति असते व सूर्यही त्यांत आहे असा एक त्याचा सिद्धांत होता. रॉबर्ट बॉईल (१६२७–९१) यानें रसायनशास्त्राचा अभ्यास करून अनेक शोध लावले. त्याच्या नांवानें प्रसिद्ध असलेला 'बॉईलचा नियम' सर्वांस मान्य झालेला होता व आहे. वायू व हवा यांच्याबद्दलचीं त्याचीं प्रमेयें प्रसिद्ध आहेत. एडमंड हॉले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१६५६-१७४२) हाही एक प्रसिद्ध ज्योतिषी होता. समुद्राची भरती-ओहटी, वारे व ग्रहमाला यांच्याबद्दलचे त्याचे सिद्धांत त्यावेळीं लोकांस पटूं लागले होते. बॅरोमीटरच्या साहाय्यानें पर्वतांची उंची मोजतां येते असें त्यानें सिद्ध केलें. सर रॉबर्ट हूक (१६३५–१७०३) हा बॉईलचा मदतनीस होता. घड्याळांच्या कमानी त्यानें शोधल्या व दुर्बिणी,होकायंत्रें वगैरेंच्या बाबतींतही त्यानें बऱ्याच सुधारणा केल्या. गुरुत्वाकर्षण व वाफेच्या साहाय्यानें यंत्रें चालवितां येणें शक्य आहे वगैरे गोष्टींची त्याला अगोदर कल्पना आलेली

सर क्रिस्टॉफर रेन

होती असें म्हणतात. विल्यम हार्वे (१५७८–१६५७) यानें रुधिराभिसरणासंबंधीं अनेक प्रयोग करून हृदयांतून सर्व शरीरांत रक्त एकसारखें जातें व शुद्ध होण्याकरितां तें पुन्हां हृदयाकडे येतें असा शोध लावला. त्याच्या शोधानें वैद्यकशास्त्रावर फारच उपकार झाले. सर क्रिस्टॉफर रेन (१६३२–१७२३) प्रथमतः मोठा शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध होता; परंतु पुढें तो एक मोठा शिल्पशास्त्री म्हणून प्रसिद्धी पावला. लंडनचें सेंट पॉल्स धर्ममंदिर व इतर अनेक मोठमोठ्या इमारती त्यानेंच बांधल्या. सर्व शास्त्रज्ञांचा शिरोमणी सर ऐझॅक न्यूटन (१६४२–१७२७) होय. उत्तम गणिती व शास्त्रज्ञ म्हणून त्याची अजूनही ख्याति आहे. गुरुत्वाकर्षणाचा शोध त्यानेंच लावला. त्रिकोणाकृति भिंगांतून इंद्रधनुष्यासारखे रंग दिसतात या तत्त्वाचा त्यानें शोध लावला. भौतिक शास्त्रांतही त्यानें अनेक शोध लावले होते. दुर्बीण, सूक्ष्मदर्शक यंत्रें वगैरेंमध्येंही त्यानें पुष्कळ सुधारणा केल्या. टांकसाळेवरही त्याची नेमणूक झाली होती.

९. रॉयल सोसायटीची स्थापना (१६६२):—अनेक शास्त्रज्ञांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मतें विश्वविद्यालयांतून वरीलपैकीं सर्व प्रकारचीं कामें होणें शक्य नव्हतें. निरनिराळ्या प्रकारचे प्रयोग करतां येतील अशी सोईस्कर जागा त्यांस

सर ऐझॅक न्यूटन

पाहिजे होती. तेव्हां त्याकरितां त्यांनीं एक संस्था स्थापन केली (१६४५). दुसऱ्या चार्ल्सला शास्त्रीय गोष्टींची आवड होती व रसायनशास्त्रांत प्रयोग करावेत व नवीन नवीन शोध लावावेत असें त्यास वाटत असे. अर्थात् त्याला वरील संस्थेबद्दल फारच आस्था वाटूं लागली. तेव्हां त्या संस्थेस मदत देण्याचें त्यानें कबूल केलें व तिचें नांव बदलून तिला 'रॉयल सोसायटी' हें नवें नांव दिलें (१६६२). ही संस्था अजूनहि अस्तित्वांत आहे. रॉबर्ट बॉईल, हॉले, रेन, हूक, न्यूटन वगैरे प्रसिद्ध शास्त्रज्ञ त्या सोसायटीचे पहिले सभासद होते. त्यांना जगभर कीर्ति मिळाली. या शास्त्रज्ञांना प्रथमतः लोकांचा पुष्कळ विरोध सहन करावा लागला; परंतु पुढें पुढें त्यांनीं प्रतिपादिलेलीं तत्त्वें खरीं ठरूं लागलीं. ट्यूडर काळांत चिकित्सा सुरू झाली. स्टुअर्ट काळांतही चिकित्सा सुरू होतीच; परंतु त्याबरोबरच 'हें असें कां होतें' व 'तें तसें कां होतें' अशा विचारांनीं प्रत्यक्ष प्रयोगांस सुरुवात झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रयोगांनंतर ठाम सिद्धांत लोकांपुढें येऊं लागले. रॉयल सोसायटीच्या सभासदांनीं हें काम अत्यंत हौशीनें व आनंदानें केल्यानेंच त्यांस कीर्तीचा लाभ झाला.

१०. वाचनालयें :—छापखान्यांचा व त्यांत छापून निघालेल्या पुस्तकांचा जसजसा प्रसार होऊं लागला तसतशीं वाचनालयेंही अस्तित्वांत येऊं लागलीं. त्यांतल्या त्यांत ऑक्सफर्ड व केंब्रिज विश्वविद्यालयांत अनेक प्रकारचीं पुस्तकें सांठूं लागल्यानें वाचनालयाची फारच तीव्रतेनें गरज भासूं लागली. सतराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं अशीं अनेक वाचनालयें इंग्लंडमध्यें निर्माण झालीं होतीं. मोठमोठ्या कपाटांतून पुस्तकें सांखळीनें बांधून वाचण्यासाठीं ठेवण्यांत येत. कपाटाच्या खालींच, वाचणाऱ्या इसमाला बसण्याकरितां बांकें ठेवण्यांत येत. वाचन उभ्या उभ्याच करावें लागे व पुस्तकें सांखळीनें बांधून टांगलेलीं असल्यानें कोणालाही तीं हलवितां येत नसत. हळूहळू हीं पुस्तकें मोकळीं ठेवण्यांत येऊं लागलीं. त्यामुळें वाचनालयांत बसून वाचतां येणें शक्य झालें.

११. वर्तमानपत्रें :—स्टुअर्ट काळांतील आणखी एक विशेष म्हणजे त्याकाळीं वर्तमानपत्रें प्रसिद्ध होऊं लागलीं. पूर्वीं फेरीवाले निरनिराळ्या बातम्या खेडोपाडीं पोंचवीत; परंतु यादवी युद्धाच्या वेळीं बातम्यांना फारच मागणी येऊं लागलीं. त्यामुळें श्रीमंत लोक पदरचे पैसे भरून बातमीवजा पत्रें लिहिणारे लोक नेमूं लागले. या पत्रांतून खाजगीरीतीनें राजदरबार, लढाया, सामाजिक व राजकीय उलाढाली वगैरेसंबंधीं उल्लेख येत. सार्वजनिक रीतीनें छापलेलीं वर्तमानपत्रें येण्यापूर्वीं बातमी-पुस्तकें प्रसिद्ध होऊं लागलीं होतीं. त्यांचा खपही चांगला होई व अशा पुस्तकांची लोक चातकाप्रमाणें मार्गप्रतीक्षा करीत. या दोन पानी पत्रकांचीं बातमीपत्रें भडक व थोडी अतिरंजित असत. दुसऱ्या चार्ल्सच्या कारकीर्दीत वरीलसारखीं बातमीपत्रें बंद पडलीं; परंतु सरकारी परवानगीनें सन १६४५ मध्यें 'ऑक्सफर्ड गॅझेट' नांवाचें वर्तमानपत्र निघूं लागलें. पुढें हेंच पत्र लंडनला सन १६६५ मध्यें अग्निप्रलयाच्या वेळीं 'लंडन गॅझेट' या नांवानें निघूं लागलें. सन १६९५ मध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'पोस्टबॉय' नांवाचें एक दैनिक निघालें. ॲन राणीच्या कारकीर्दीत मात्र बरींच वर्तमानपत्रें निघालीं. 'टॅटलर' (१७०९), 'स्पेक्टेटर' (१७११), 'रॅब्लर' (१७१३) वगैरे वर्तमानपत्रें लोकांच्या खुळ्या समजुतींवर हलु-वारपणें व राजकीय विषयावर चटकदार भाषेंत विनोदी पद्धतीनें टीका करीत. कडक अगर खोटी टीका करणारास मात्र मानखोडा, पायखोडा, तुरुंग वगैरेसारख्या शिक्षा होत असत. तरीही त्यांस न भितां संपादक लोक लोकांच्या भ्रममूलक कल्पना व आचरट समजुती घालविण्याकरितां आपल्या पत्राच्या रकान्यांचा उपयोग करीत असत.

अभ्यास

१. स्टुअर्ट काळांतील राज्यक्रांत्यांचें महत्त्व सांगून स्टुअर्ट अमलांत त्या कां घडून आल्या त्यांचें विवेचन करा.

२. ट्यूडर व स्टुअर्ट राजांच्या धोरणांतील भेद सांगा. स्टुअर्ट राजांचा पराभव कां झाला ?

३. स्टुअर्ट काळांत पार्लमेंटच्या सत्तेंत कसकसे फरक होत गेले ? तिला कोणकोणते नवे अधिकार प्राप्त झाले तें सविस्तर सांगा.

४. खालीलसंबंधीं मुद्देसूद विवेचन करा :—

पक्षनिष्ठ राजकारण, स्टुअर्टांची दिवाळखोरी, लष्करी व आरमारी कमकुवतपणा, वर्तमानपत्रांचें महत्त्व, रॉयल सोसायटी.

५. स्टुअर्ट काळांत जे शास्त्रज्ञ झाले त्यांच्यासंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. स्टुअर्ट काळांतील सामाजिक स्थिति

१. राजसत्ता :—स्टुअर्ट काळांत इंग्लिश समाजाच्या वर्गवारींत फारसा फरक झालेला नव्हता. त्यावेळीं समाजाचे एकंदर चार वर्ग होते असें म्हणण्यास फारसा प्रत्यवाय नाहीं. सर्व समाजाच्या अग्रभागीं राजाच होता व तोच समाजाचा नेता व रक्षणकर्ता समजला जाई. अर्थात् त्याचें अनुकरण करण्यांत लोकांमध्यें अहमहमिका लागलेली असे. राजाचा पोषाख, त्याच्या खाण्यापिण्याच्या व वागणुकीच्या तऱ्हा, करमणुकीचे प्रकार वगैरे बाबतींतही लोकांकडून अंधानुकरण होई. स्टुअर्ट राजे हेकेखोर, दुराग्रही, लहरी व वैय्यक्तिक विचारांस प्राधान्य देणारे असल्यामुळें त्यांचें आपल्या प्रजेशीं जुळलें नाहीं.

२. वरिष्ठ वर्ग :—राजाच्या खालोखाल वरिष्ठ वर्गांतील लोक होत. या वर्गांत सरदार-दरकदार, राजपुत्र, मोठमोठे मानकरी व धर्माधिकारी मोडत असत. ट्यूडर राजांच्या कारकीर्दींत बहुतेक जुनीं सरदार घराणीं नष्टच झालीं होतीं व मध्यम वर्गांतील लोकांस हातीं धरून त्यांना ट्यूडर राजांनीं सरदारक्या दिल्या होत्या. पिढीजाद सरदारक्या असलेले फारच थोडे सरदार अस्तित्वांत होते. या वर्गांतील लोकांचा राजाला नेहमीं फारच उपयोग होई. पैसा तर मिळेच, परंतु त्याशिवाय लढाईच्या वेळींही ते राजाला मनोभावें मदत करीत. यादवी युद्धांत सरदार वर्गानेंच राजाची तळी उचलून धरली, पैसा-अडका पुरविला व पार्लमेंटशीं झगडण्यास राजाला मदत केली. राजाच्या सान्निध्यांत हे वागत असल्यानें त्यांस राजापासून अनेक प्रकारचे स्वार्थ साधतां येत. राजाचें अंधानुकरण करून त्याचें लोण समाजाकडे पोंचविण्याचें कामही यांच्याकडून होत असे. राजा कसाही असो त्याची अनन्यसाधारणपणें भक्ति करायची हा त्यांचा धर्म !

३. मध्यमवर्ग :—सरदारवर्गाच्या खालोखाल सामान्यतः सुखवस्तु व व्यापारउदीम करणाऱ्या लोकांचा वर्ग होय. या वर्गांत निरनिराळ्या जाती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हत्या; तरी वर्ग उत्पन्न झाले होते. हे वर्ग एकमेकांशीं जरा ताठरपणानें वागत; क्वचित् प्रसंगीं आपल्यापेक्षां दर्जानें खालच्या वर्गांतील मनुष्यास हे लोक हीन लेखीत. मध्यम वर्गांत उच्च व नीच असे दोन प्रमुख भाग निर्माण झाले होते. त्यावेळच्या उच्च-मध्यम वर्गांत शिलेदार, देशमुख, वकील, अधिकारी, व्यापारी व शिष्ट लोक मोडत असत. त्या सर्वांत त्यावेळच्या शिष्टांस समाजांत फार मोठा मान मिळत असे. या शिष्ट लोकांना उत्तम प्रकारचें शिक्षण मिळालेलें असे. शासनशास्त्र, भौतिकशास्त्र वगैरे विषयांचें ज्ञान त्यांस विश्वविद्यालयांतून मिळे व ते आजीव विद्यार्थीच असत. मोलमजुरी न करतां जो आपलें पोट भरूं शके व जो आपल्या शिष्टसांप्रदायास शोभेल अशी वागणूक ठेवी त्यासच शिष्टांच्या मालिकेंत बसवीत असत. त्यांना व्यापाराची मनाई होती. आपल्या शेतीवाडीच्या गांवीं रहावें, आपल्या इस्टेटीची व्यवस्था पहावी व गांवाच्या कारभारावर देखरेख ठेवून तो नीट राखावा हेंच त्यांचें मुख्य काम. यामुळें देशमुखा-प्रमाणेंच त्यांचें आपापल्या गांवांतून बरेंच प्रस्थ असे. देशमुखाप्रमाणें यांनाही आपलें ठाणें सोडून शहरांत जातां येत नसे. मात्र या शिष्ट लोकांतूनच शेरीफ, शांततारक्षक अधिकारी वगैरे अधिकारी राजा नेमीत असे. यादवी युद्धांत यांनीं चांगलीच कामगिरी बजावून पार्लमेंटला जय मिळवून दिला. राष्ट्राच्या राजकीय, धार्मिक व सामाजिक बाबतींत यांनीं पुष्कळ पुढाकार घेऊन त्यांत सुधारणा घडवून आणल्या. यादवीनंतर क्रॉम्वेलच्या कारकी-र्दीत कांहींचा छळ होऊं लागला; तेव्हां त्यांनीं देशत्याग केला. अनेक शिष्ट लोक हॉलंड, फ्रान्स, इटली, बेलजम, स्वित्झरलंड वगैरे देशांत जाऊन राहिले व दुसऱ्या चार्ल्सच्या कारकीर्दीत ते लोक इंग्लंडांत परत आले. त्यावेळीं त्यांनीं अनेक प्रकारच्या नव्या नव्या कल्पना आपल्या-बरोबर इंग्लंडांत आणल्या व घरबांधणी, बागबगीचा, व्यापार, शेती, सडका, नौकाबंधन, वाङ्मय, नाट्य, नृत्य, वगैरे बाबतींत अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्यांची राहणीही मोठी मिजासी थाटाची व श्रीमंती चोजाची झाल्यानें खालच्या वर्गांतील लोकांचें चांगलेंच फावलें ! या शिष्टसांप्रदायांत एक प्रकारचा उसना खानदानीपणा, पोकळ मिजास व श्रीमंती डौल माज-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें त्यांच्या या थाटास कनिष्ठवर्गीय लोक नेहमीं भाळत व त्यांच्याशीं ते अत्यंत नम्रतेनें वागत.



सतराव्या शतकांतील इंग्लिश समाजाची आर्थिक विभागणी

या शिष्टसांप्रदायांतील लोकांशिवाय नीच-मध्यम वर्गांत, पाद्री, दुकानदार, लष्करी व नाविक अधिकारी, शेतकरी, कारागीर, धंदेवाले वगैरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक प्रकारचे लोक मोडत. हे लोक सर्व प्रकारच्या लोकांशीं अत्यंत खेळीमेळीनें वागत. त्यांतल्या त्यांत मिरासदार शेतकरी अत्यंत स्वतंत्र-वृत्तीचे होते. शिष्ट लोकांशींही ते त्याच वृत्तीनें वागत असल्यानें एकंदर समाज मोठ्या मजेंत रहात असे. हे लोकही खेड्यांतूनच रहात व आपला धंदा अगर व्यवसाय करीत. ते आपलें ठाणें सोडून कदापीही शहरांत जात नसत. फार तर आजूबाजूच्या गांवीं अगर जत्रेच्या ठिकाणीं जाऊन येत.

४. कनिष्ठ वर्ग :—कनिष्ठ वर्गांत मोडणारा समाज बहुसंख्य होता. त्यांत काबाडकष्ट करणारे लोक, सामान्य शेतकरी, नोकरचाकर, मजूर वगैरेंचा समावेश करतां येईल. दिवसरात्र अखंड अंगमेहनत करून स्वतःचें व स्वतःच्या कुटुंबीयांचें पोषण करावें हाच त्यांचा मुख्य धंदा होय. लष्करांतील शिपाई, आरमारांतील नावाडी वगैरे लोक याच वर्गांतून निवडलेले असत. या वर्गांतील लोक बहुधा खेड्यांतूनच रहात. देशमूख, शेरीफ वगैरे अधिकारी या वर्गांतील लोकांचा छळही करीत असत. यादवी युद्धामुळें या वर्गांतील लोकांचे अत्यंत हाल झाले. भणंग-भिकारीही याच वर्गांत मोडत असत. त्यांचें प्रमाण मात्र बरेंच होतें. या वर्गांतील लोकांना श्रम करूनही पुरेशी मजूरी मिळत नसल्यानें त्यांना भीक मागून व वेळेनु-सार चोऱ्या करूनही स्वतःचा व स्वतःच्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह करावा लागे. जाडें-भरडें अन्न खावें, मोलमजुरी करावी, देशमुखाची अगर आपल्या मालकाची मर्जी संभाळावी व आपलें काम सांभाळून रहावें हाच या वर्गांतील लोकांचा क्रम होता.

५. समाजरचनेचा विशेष :—पूर्वीप्रमाणें स्टुअर्ट काळांतही जाति-संस्था नव्हती; फक्त वर्गपद्धतीच होती. त्यामुळें वर्गकलहांना अनेक वेळां ऊत येई. देशमुख व नवीनच उदयास येऊं लागलेले शिष्ट लोक गोरगरी-बांस छळीत; परंतु त्यास न जुमानतां आपापलीं कामें चोख रीतीनें करून कर्तृत्वानें कोणत्याही वर्गांतील गृहस्थ वरच्या वर्गांत सहज स्थान पटकावीत असे. यामुळें पुढें येण्यास प्रत्येकास अवसर मिळे. वंश व जन्म यावर सरदारकी अवलंबून न राहिल्यानें समाजाचें पाऊल पुढें पडत असे. व्यापारवृद्धि, उद्योगधंद्यांची भरभराट वगैरे गोष्टी त्याचमुळें शक्य झाल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकंदरींत पाहतां समाजांतील सर्व वर्गांतील लोक खेळीमेळीनें वागत राहिल्यानें देश भरभराटला. पुढें येण्याला अनेक प्रकारच्या सवलती व अवसर प्रत्येकाला मिळे. मात्र त्यांचा सदुपयोग करण्याला त्याच्या अंगीं योग्य तें कौशल्य व हुषारी असली म्हणजे कोणतीही नड नसे.

६. धार्मिक आंदोलनें:—ट्यूडर काळांत प्रॉटेस्टंटपंथ इंग्लंडमध्यें कायमचा रुजला होता. पहिल्या जेम्सनेंही प्रस्थापित धर्मपंथ उचलून धरला व त्याला उत्तेजन दिलें. धार्मिक बाबतींत बिशप लोकांच्या हातीं सर्व सत्ता असूं नये असें प्यूरिटनांचें मत होतें व त्यामुळेंच त्यांनीं पहिल्या जेम्सला व पहिल्या चार्ल्सला विरोध केला. पहिल्या जेम्सच्या कारकीर्दींत इंग्लंडमधील सर्व धर्मपंथीयांचें एकीकरण करण्याचा प्रयत्न केला गेला; परंतु तो फसला. इंग्रजी भाषेंत बायबलचें भाषांतर मात्र झालें. त्याच्याच कारकीर्दींत रोमन कॅथॉलिकांचा व प्यूरिटनांचा छळ होऊं लागला. त्यामुळें प्यूरिटनांनीं देशत्यागही केला व अमेरिकेंत वसाहती स्थापिल्या. पहिल्या चार्ल्सनें आपल्या बापाचेंच धोरण पुढें चालू ठेवलें होतें. त्याचा हस्तक आर्चबिशप लॉड हा अत्यंत लहरी असल्यानें त्यानें इंग्लंडमधील धर्मपंथ स्कॉटलंडवर लादण्याचा प्रयोग केला. खुद्द इंग्लंडमध्येंही त्यानें अनेक सुधारणा केल्या. परंतु त्याच्या धोरणामुळें इंग्लंडमध्यें व स्कॉटलंडमध्यें बरीच खळबळ उडून इंग्लंडच्या धर्मपीठाची चिरफाड होण्यापर्यंत मजल गेली. अनेकांचा छळ झाल्यानें त्यांनीं देशत्यागही केला, त्यामुळें प्यूरिटनपंथ बळावला. एवढेंच नव्हे, तर देशावर यादवी ओढवून लॉडला व राजालाही प्राणास मुकावें लागलें. यानंतर क्रॉम्वेलच्या नेतृत्वाखालीं प्यूरिटनांनीं राज्यकारभार चालविला. स्वतः क्रॉम्वेल धार्मिक बाबतींत स्वातंत्र्यवादी पक्षाचा असल्यानें ज्यानें त्यानें स्वतःच्या कल्पनेप्रमाणें पूजा-अर्चा करावी असें त्यानें ठरविलें. त्यामुळें अनेक खेड्यांत निरनिराळ्या धर्मपंथीयांनीं आपापल्या पंथाच्या तत्त्वांप्रमाणें धर्मविधि व पूजा-अर्चा सुरू केली; धार्मिक बाबतींत हें स्वातंत्र्य देण्यांत आलें तरी क्रॉम्वेलनें सर्व प्रकारचे ख्यालीखुशालीचे प्रकार व खेळ बंद केले. त्यामुळें वसंतदिन, ईस्टर, ख्रिसमस वगैरेसारखे महोत्सव, नाच-तमाशे-नाटकें वगैरे करमणुकीचे प्रकार व निरनिराळे खेळही बंद पडले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रत्येकानें पोथ्या वाचाव्या, स्तोत्रें म्हणावीं व प्रार्थना कराव्या या एका उद्देशानेंच वरील प्रकार बंद झाले होते. या धोरणामुळें सर्व राष्ट्र धार्मिक बनून जाईल अशी जी क्रॉम्वेलची कल्पना होती ती चुकीची ठरून सर्व राष्ट्र मृत झालें. त्याची ही अवस्था दुसऱ्या चार्ल्सच्या आगमनानें पार पालटून गेली व रंगेल राजाचें अनुकरण करण्यांत लोक अहमहमिकेनें पुढें आले व त्यांनीं मागील गोष्टींचें उट्टें काढलें. क्लॅरेंडन कोडांतील कायद्यासारखे अनेक कडक कायदे पास होऊन प्यूरिटनांचा छळ होऊं लागला, अनेकांस कैदखान्यांत पडावें लागलें व अनेकांनीं देशत्याग करून अमेरिकेंत वसाहती स्थापिल्या. दुसऱ्या चार्ल्सचा व दुसऱ्या जेम्सचा ओढा कॅथॉलिकांकडे होता. त्यामुळें त्यांनीं सवलतींचा जाहीरनामा प्रसिद्ध करून कॅथॉलिकांना चुचकारण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. मात्र पार्लमेंटला राग येऊन धर्मकसोटीचा कायदा पास करण्यांत आला. कॅथॉलिक पंथाला उचलून धरून इंग्लंड कॅथॉलिकमय करण्याचें दुसऱ्या जेम्सचें धोरण हाणून पाडून पार्लमेंटनें त्यालाच पळवून लावलें. पुढें विल्यमनें धार्मिक स्वातंत्र्याचा कायदा पास केला व लोकांना त्यांच्या धार्मिक कल्पनांप्रमाणें आचार-विचार व पूजा-अर्चा करण्याची मुभा दिली, ती अजूनही आहे.

७. धार्मिक स्थिति :—स्टुअर्ट काळांत धार्मिक धोरणांत कसकसा फरक होत गेला हें वर सांगितलें. त्या काळांत प्रत्येक गांवीं धर्ममंदिर नव्हतेंच. सर्व इंग्लंडमध्यें सुमारें एक हजारच धर्ममंदिरें होतीं. त्यांची स्थितीही वाईट होती. धर्मोपदेशकांचा पगार अल्प असे. धर्ममठ नाहींसे झाल्यानें त्यांची मालमत्ता गृहस्थांच्या ताब्यांत आली होती व या नव्या चालकांचें लक्ष केवळ पैशाकडे असल्यानें ते धर्ममठांची नीट निगा ठेवीत नसत. स्टुअर्ट काळांत कॅथॉलिक, प्यूरिटन, क्वेकर, नॉनज्यूरर, स्वतंत्र, प्रेसबिटेरियन, वगैरे नाना पंथ अस्तित्वांत होते; त्यांचे हाल होत. त्यांतल्या त्यांत कॅथॉलिकांचे फारच हाल झाले. इंग्लंडच्या उत्तर भागांत जे कॅथॉलिक होते त्यांचा फारसा छळ झाला नाहीं; परंतु दक्षिण भागांत राहणाऱ्यांचा छळ फार झाला. त्यांना आपलें राहण्याचें ठिकाण सोडतां येत नसे,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रार्थनेला गेलें नाहीं, तर दंड द्यावा लागे व कैदखान्यांतही पडावें लागे. प्रस्थापित धर्माशीं ज्यांचा विरोध असेल अशांस आपल्या घरीं आश्रय देणें, गुप्तरीतीनें कॅथॉलिक प्रार्थना म्हणणें, आपल्या पंथाचा प्रसार करणें व धर्मोपदेश करणें हे प्रकार गुन्हा म्हणूनही समजण्यांत येत. इतकें असूनही अनेक कॅथॉलिक लोक—त्यांतल्या त्यांतही ज्येसुइट लोक—आपल्या धर्मपंथाप्रमाणें पूजा-अर्चा करीत, प्रार्थना करीत व गुप्तरीतीनें व गुप्त वेषानें अन्य ठिकाणीं जात. जे सांपडत त्यांना क्रूरपणानें वागविण्यांत येई; असह्य छळ सोसूनही ते लोक मोठ्या आनंदानें मृत्यूला कवटाळीत ! प्यूरिटनपंथांतील लोकांचें प्रथमतः इंग्लंडमध्यें फारसें मताधिक्य नव्हतें. ‘ साधी राहणी, उच्च विचारसरणी ’ हें त्यांच्या राहणीचें ध्येय असल्यानें करमणुकीचे प्रकार, चित्रें, आनंदोत्सव वगैरे प्रकार त्यांस आवडत नसत. त्यांच्या हातीं सत्ता आल्यावर त्यांनीं कोणकोणते प्रकार केले तें मागें सांगितलेंच आहे. वरील दोन्ही पंथांपेक्षांही अन्य असा आणखी एक पंथ त्यावेळीं इंग्लंडमध्यें होता. त्यांना बायबल मान्य असून नाचखेळ-महोत्सव वगैरे गोष्टी त्यांस मान्य होत्या. पोपची सत्ता मात्र मान्य नव्हती. प्यूरिटनांचा आत्यंतिकपणा त्यांस मान्य नव्हता. याशिवाय आणखी दोन पंथांचा



सेंट पॉल्सचा अंतर्भाग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उल्लेख करणें जरूर आहे. इंग्लंडमध्यें व्हिग व टोरी या राजकीय पंथांचा उदय झाला त्याच वेळीं 'उच्च धर्मवादी' व 'नीच धर्मवादी' असे दोन पंथ निर्माण झाले. हे पंथ राजकीय ध्येयानुसारच स्थापन झालेले होते. 'धर्माचें उच्च व उज्वल स्वरूप कायम ठेवून व्यक्तिस्वातंत्र्याचें फाजील स्तोम न माजवितां प्रस्थापित धर्माचीं तत्त्वें पाळणें हाच खरा धर्म होय,' असें म्हणणारे टोरी उच्चधर्मवादी समजण्यांत येत. उलट 'धार्मिक बाबतींत थोडीं बंधनें असणेंच श्रेयस्कर होय' असें मत प्रतिपादन करणारे व्हिग 'नीच धर्मवादी' समजले जाऊं लागले. एकंदरींत पाहतां स्टुअर्ट काळांत धर्माच्या बाबतींत इंग्लंडमध्यें अनेक चळवळी, प्रकार व पंथ उत्पन्न झाले व त्यामुळें कोणीं कोणता धर्मपंथ स्वीकारावा हें कोणासच समजत नसे. प्रस्थापित पंथाला राजाश्रय होता, हें खरें असलें तरी धार्मिक गोंधळ पूर्णपणें नष्ट झालेला नव्हता.

८. समाजाच्या खुळचा कल्पना :—स्टुअर्ट काळांतील समाजाची स्थिति वरीलप्रमाणें थोडक्यांत वर्णन करतां येण्यासारखी आहे. शिक्षणाचा प्रसार त्यावेळीं झालेला नव्हता व त्यामुळें लोकांचे आचार-विचार मागासलेलेच होते. अर्थात खुळया कल्पना चटकन् पसरत व एकदां पसरल्या म्हणजे त्या तेथें कायम रहात. ही स्थिति या काळांतही पालटलेली नव्हती. चेटूक करणें, किमया करणें, ज्योतिष पहाणें वगैरे गोष्टींवर लोकांचा फार विश्वास होता. त्यांतल्या त्यांत चेटूक करणाऱ्या व्यक्तीबद्दल लोक नेहमीं साशंक असत. चेटकिणींना तर लोक भीत व ती सांपडलीच तर तिला जिवंत जाळीत. या चेटक्या भुतांखेतांना वश करून कांहीं सिद्धी प्राप्त करून घेतात व त्याच्या आधारावर भूत-भविष्य वर्तवून लोकांकडून पैसा उपटतात, त्यांचा छळ करतात व वेळेनुसार घरें-दारें नष्ट करतात असा लोकांचा समज होता. त्यामुळें कांहीं खऱ्या चेटक्यांप्रमाणें खोट्या चेटक्यांसही जिवंत जाळण्याची अगर फाशीची शिक्षा होई. या चेटक्यांचा धंदा स्कॉटलंडमध्यें फार माजला होता. राजस्पर्शानें अनेक रोग बरे होतात असा लोकांचा दृढ विश्वास होता. पहिला चार्ल्स वधस्तंभाकडे जात असतां त्याच्या वाटेवर अनेक लोक त्याच्या दर्शनाकरितां व स्पर्शाकरितां जमलेले होते व ज्यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्यांनीं स्पर्श केला त्यांचे त्यांचे रोग बरे झाले असें म्हणतात! राजस्पर्शांची ही कल्पना पुढें बरींच वर्षें टिकून होती. वैदूंवर विश्वास ठेवून त्यांच्याकडून रोग बरे करून घेण्याकडेही लोकांची प्रवृत्ति होती.

९. **कॉफीगृहें** :—त्या काळच्या समाजाचा आणखी एक विशेष म्हणजे स्टुअर्ट काळांत नुकतीच सुरू झालेलीं कॉफीगृहें होत. चहा व कॉफी यांचा देशांत नुकताच प्रसार होऊं लागला होता व त्यांची लोकांस चटक लागली होती. त्यामुळेंच कॉफीगृहें मोठमोठ्या शहरांतून स्थापन होऊं लागलीं. हीं कॉफीगृहें म्हणजे गप्पांचे निव्वळ अड्डे होते. असे अड्डे प्रथमतः क्रॉम्वेलच्या कारकीर्दीत स्थापन झाले. पुढें पुढें हीं गृहें म्हणजे वादविवादाच्या अगर चर्चेच्या जागाच ठरल्या. आपापल्या समानवर्गीयांनीं आपआपले अड्डे ठरवूनच ठेवले होते. त्यामुळें निरनिराळ्या मतांच्या लोकांनीं निरनिराळ्या कॉफीगृहांत बसून राजकारण, वाङ्मय, धर्म, व्यापार वगैरेसंबंधीं चर्चा करावी असा प्रघातच पडला. प्रसंगविशेषीं राजदरबाराची टवाळीही तेथें चाले. त्यामुळें या गृहांत बसून टवाळखोर आपला वेळ आनंदांत घालवीत. प्रत्येक कॉफीगृहाचेंही वैशिष्ट्य ठरलेलें असे. त्यामुळें टोरींचें, व्हिगांचें, वाङ्मयोपासकांचें, प्यूरिटनांचें, व्यापाऱ्यांचें अशीं अनेक कॉफीगृहें त्यावेळीं एकाच मताच्या व विचारांच्या लोकांची म्हणून समजलीं जात. तेथील वादविवादामुळें वार्ताहरांचें व वर्तमानपत्रांचेंही काम अनायासें होई. कांहीं कांहीं वेळीं येथील चर्चा व टीका इतकी झणझणीत असे कीं त्यामुळें एखादा ग्रंथकार, नट, कवि, प्रधान, किंवा दरबारी घायाळ होई किंवा अती प्रसिद्धी पावे. या कॉफीगृहांमुळें मदिरापानाच्या व्यसनास बराच आळा बसला.

१०. **भिक्षागृहें** :—स्टुअर्ट काळांत भिकारी फार वाढले होते. धर्ममठ जप्त झाल्यानें भिकाऱ्यांचा आश्रय बंद झाला होता. भिकाऱ्यांसंबंधींचा कायदा झालेला असूनही गरीब भिकाऱ्यांना त्याचा फारसा फायदा मिळत नसे. त्यामुळें भिकाऱ्यांना कोणीही वाली उरला नव्हता. अर्थात् कांहीं धार्मिकवृत्तीच्या माणसांनीं भिक्षागृहें स्थापण्यास सुरुवात केली. क्रॉम्वेलच्या वेळीं अशीं अनेक भिक्षागृहें इंग्लंडांत स्थापन झालीं. उदार व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धनिक लोकांकडून पैसा मिळवून मोठमोठीं भिक्षागृहें उभारण्यांत येत. या गृहांतून गरीब मुलांस व म्हाताऱ्याकोताऱ्यांस आश्रय देण्यांत येत असे. या नवीन उपक्रमामुळें अनेक निराश्रित भिकाऱ्यांस आधार व आश्रय मिळण्यास मदत झाली.

११. पोस्टाची स्थापना :—ट्यूडर काळांत टपालाची चांगलीशी व्यवस्था नव्हतीच. त्यामुळें पत्रव्यवहार फार कमी होई. कारण पत्र योग्य-स्थळीं योग्य माणसाच्या हातीं पोंचेलच अशी हमी कोणीही घेत नसत. खासगी पत्रव्यवहार पुष्कळ होई, तरी तोही चोरूनमारून होई. स्टुअर्ट काळांत राजांना टपालाची व्यवस्था करावी लागली. पहिल्या चार्ल्सनें पोस्टाची सुरुवात करून लंडनहून मोठमोठ्या शहरीं पत्रें पोंचतील अशी व्यवस्था केली. त्यामुळें पूर्वीच्या पद्धतींत बराच फरक झाला. टपालगाड्या ठराविक वेळीं टपाल घेऊन निघत व ठराविक जागीं तें पोंचतें करीत. क्रॉम्वेलच्या वेळीं व त्याच्यानंतरही ही व्यवस्था सुरू होती. पुढें सन १७१० मध्यें एक जनरल पोस्ट ऑफिस लंडनला स्थापन होऊन त्याच्या-तर्फें टपालाची व्यवस्था ठेवण्यांत आली. यामुळें लोकांची व सरकारचीही पुष्कळ सोय होऊं लागली.

अभ्यास

१. स्टुअर्ट काळांतील समाजाचें वर्णन करा. त्यावेळीं कोणता वर्ग विशेष महत्त्व पावला ? कां ?

२. स्टुअर्ट काळांतील धार्मिक स्थितीचें वर्णन करा. त्या काळांत राजांनीं धर्मांत हात घातला का ? त्याचा परिणाम काय झाला ?

४. त्यावेळच्या समाजांत कॉफीगृहें लोकप्रिय कां झालीं ? तुमच्या चर्चेचा काळ दुसऱ्या चार्ल्सचा काळ आहे असें समजा. त्यावेळीं तुम्ही एका कॉफीगृहांत आहांत अशी कल्पना करून तुम्ही जी चर्चा ऐकाल ती लिहा.

४. समाजांत खुळ्या कल्पना कोणत्या होत्या ? त्या तशा असण्याचें कारण काय ?

५. भिक्षागृहें, पोस्टाची व्यवस्था, कॉफीगृहें, शिष्टसांप्रदाय, कॅथॉलिकांची स्थिति, प्यूरिटन लोक वगैरेसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३. स्टुअर्ट काळांतील वसाहत-विस्तार, व्यापार व उद्योगधंदे

१. अमेरिकन वसाहतींची स्थापना :—स्टुअर्ट काळांत इंग्लंडच्या वसाहती एकसारख्या वाढूं लागल्यानें साम्राज्याचीं बीजें रोविलीं गेलीं व इंग्लंडचा व्यापार वाढून इंग्लंडला व्यापारी जगांत महनीय स्थान प्राप्त झालें. ट्यूडर काळांत अनेक धाडसी लोक अमेरिकेंत प्रथम गेले व तेथें वसाहती स्थापण्याचे त्यांनीं अयशस्वी प्रयत्न केले. सर वॉल्टर रॅले यानें व्हर्जीनिया वसाहत स्थापन केली; परंतु तिची भरभराट न झाल्यानें त्याचे प्रयत्न वायां गेले. पुढें पहिल्या जेम्सच्या वेळीं धर्मच्छळाला कंटाळून अनेक प्यूरिटन अमेरिकेंत जाऊन राहूं लागले. सन १६०६ मध्यें जेम्सनें प्लीमथ कंपनी व लंडन कंपनी या दोन कंपन्यांना अमेरिकेंत वसाहती स्थापन करण्याकरितां सनदा दिल्या होत्या. प्लीमथ कंपनीनें व्हर्जीनिया वसाहतीची पुनर्रचना करून इतर वसाहती स्थापण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. लंडन कंपनीचे प्रयत्नही यशस्वी झाले नाहींत. त्यामुळें तेथील अनेक लोक इंग्लंडला परत येत होते; परंतु त्यांना थांबविण्यांत आलें व अनेक शेतकरी व मजूर यांचा अमेरिकेंत भरणा करण्यांत आला. पुढें सन १६२० सालीं 'पिल्ग्रिम फादर्स' अमेरिकेंत गेले व त्यांनीं 'न्यू इंग्लंडची' स्थापना केली. यानंतरच अमेरिकन वसाहतींची भक्कम पायावर स्थापना झाली. पहिल्या चार्ल्सच्या काळांत कनेक्टिकट (१६३३), मेरीलँड (१६३२), ऱ्होड आयलंड (१६३६), न्यू हॅंपशायर (१६३५) वगैरे वसाहती स्थापन झाल्या. या सर्व वसाहतींत प्यूरिटनांचें प्राधान्य होतें व डच, फ्रेंच वगैरेपासून त्यांस आपलें संरक्षण करणें जरूर असे. यामुळें ते लोक एकजुटीनें वागत. पुढें सन १६४३ मध्यें या सर्व वसाहतींनीं आपलें संयुक्त सरकार स्थापन केलें व त्यामुळें अमेरिकेंत एकछत्री कारभार सुरू झाला. पुढें क्रॉम्वेलच्या वेळीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १६५५ मध्यें स्पेनशीं युद्ध चालू असतां जमेका बेट इंग्रजांनीं काबीज करून घेतलें. दुसऱ्या चार्ल्सच्या वेळीं हॉलंडशीं युद्ध चालू असतां न्यू जर्सी, न्यू ॲमस्टरडॅम व डिलावेअर या डच वसाहती इंग्रजांना मिळाल्या (१६६७). त्याच्या अगोदरच सन १६६३ मध्यें दुसऱ्या चार्ल्सनें एक सनद देऊन कॅरोलिना नांवाची वसाहत स्थापन केली. न्यू ॲमस्टरडॅमलाच पुढें न्यूयॉर्क हें नांव देण्यांत आलें. सन १६७० मध्यें राजपुत्र रूपर्टनें 'हडसन बे कंपनी' नांवाची एक कंपनी स्थापन केली व तिनें हडसन उपसागराच्या आजूबाजूच्या प्रदेशांत व्यापार सुरू केला. सन १६८१ मध्यें विल्यम पेन या क्वेकर पंथीयानें दुसऱ्या चार्ल्सच्या परवानगीनें अमेरिकेंत जाऊन पेनसिलव्हॅनिया या नांवाची वसाहत स्थापन केली. या वसाहतीचें मुख्य शहर फिलाडेल्फिया होतें. त्याचा अर्थ बंधुप्रेम असा होतो. वरील सर्व वसाहती मोठ्या एकोप्यानें वागत. परंतु त्याच वेळीं डच, फ्रेंच वगैरे लोकांनींही तेथें वसाहती स्थापन करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळें इंग्रज, फ्रेंच व डच यांच्यामध्यें अखंड चुरस सुरू होऊन त्यांच्यामध्यें नेहमीं भांडणें, कुरबुरी, चकमकी व लढायाही होत. 'रेड इंडियन' लोकांशींही वसाहतवाल्यांस दोन हात करावे लागत. वसाहतवाल्यांना प्रारंभीं अती हाल व कष्ट करावे लागले; त्यांनीं स्वार्थत्याग किती केला त्याला गणतीच नाहीं; त्यामुळें ते सर्व अत्यंत काटक, शूर व स्वातंत्र्यप्रेमी लोक बनले होते.

२. वसाहतींशीं व्यापार :—वरील सर्व वसाहतींमध्यें वसाहतवाल्यांचीच सत्ता होती. इंग्लंडच्या राजाच्या नांवानें ते कारभार करीत. इंग्लंडच्या राजाचा गव्हर्नरही तेथें असे. वसाहतवाल्यांचा हरघडीं मातृभूमीशीं संबंध येई. अमेरिकेच्या अंतर्गत भागांत वसाहतवाले अजून गेलेले नव्हते; व त्या भागांत त्यांचा शिरकाव होणेंही शक्य नव्हतें. तसेंच या वसाहती म्हणजे मातृभूमीच्या ताबेदार समजण्यांत येत व त्यांतून अनेक प्रकारचा कच्चा माल देशीं यावा व इंग्लंडचा पक्का माल विकण्याकरितां तेथें पाठविला जावा अशीच इंग्लिशांची कल्पना होती. यामुळेंच सन १६६० च्या नौकानिर्बंधाच्या कायद्यानें अमेरिकन व्यापारावर बंधनें घालण्यांत येऊन तेथील माल इंग्लंडमध्येंच पाठविला जावा असें ठरविण्यांत आलें. यांतही मातृभूमी-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितांच वसाहती आहेत हेंच तत्त्व दिसतें. यांत वसाहतवाल्यांचाही **प्रथमतः** फायदा होता. कारण इंग्लंडशिवाय त्यावेळीं त्यांच्या मालाला दुसरें गिऱ्हाईकच नव्हतें. या सर्व वसाहतींमधून इंग्लंडमध्यें व्हर्जीनियामधून तंबाखू, जमेकामधून साखर, कॅरोलिनामधून तांदूळ हे मुख्य जिन्नस येत. निग्रो गुलामांचा व्यापारही मोठ्या प्रमाणावर चालत असे. त्याशिवाय हडसन बे कंपनीकडून आंखूड व मऊ लोकर, कॉड व इतर मासे, इंग्लंडांत येत. सागवानाचें लाकूडही इंग्लंडांत जहाजें बांधण्याकरितां येई. वरील जिनसांशिवाय अनेक प्रकारचा कच्चा माल अमेरिकेहून इंग्लंडमध्यें येत असे. इंग्लंडमधील दारुडे, हद्दपार केलेले लोक व कांहीं कैदीही पुढें पुढें अमेरिकन वसाहतींमध्यें पाठविण्यांत येऊं लागले होते. अमेरिकन व्यापार वाढल्यानें अमेरिकेची तर भरभराट होऊं शकलीच; परंतु इंग्लंडचेंही व्यापारी जगांत महत्त्व वाढलें, पुष्कळशी संपत्ति देशांत खेळूं लागली व त्यामुळें नवे नवे कर लोकांवर लादण्याची सरकारला आवश्यकता राहिली नाहीं.

३. हिंदुस्थानशीं व्यापार :—ईस्ट इंडिया कंपनीनें आपलें जाळें हिंदुस्थानांत पसरण्यास सुरुवात केलीच होती. पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याचा मक्ता या कंपनीकडेच होता. दुसरा चार्ल्स व दुसरा जेम्स यांची या कंपनीवर पूर्ण मेहेरनजर असल्यानें तिची भरभराट होऊं शकली. त्यामुळें दुसऱ्या चार्ल्सनें वार्षिक दहा पौंड घेण्याचें ठरवून मुंबई बेट त्या कंपनीला दिलें. त्यामुळें त्या कंपनीला मुंबईस वखार स्थापतां आली. त्याच्या आधींच मद्रास, सुरत वगैरे ठिकाणीं कंपनीच्या वखारी होत्या. कॅप्टन हॉकिन्स व सर टॉमस रो या दोघांनीं जहांगीरच्या भेटी घेऊन अनेक व्यापारी सवलती मिळविल्या होत्या. वेळ आल्यास सैन्य उभारून


सुरतेची इंग्रजांची वखार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तद्देशीयांशीं लढाई करण्याची परवानगी दुसऱ्या चार्ल्सनें या कंपनीला दिल्यानें तिचा व्यापार चांगलाच भरभराटला होता. त्या वेळची सुरतेची वखार उत्तम होती. तेथें सकाळीं दहापासून संध्याकाळपर्यंत पुष्कळ व्यापार चाले. सन १६८८ च्या क्रांतीनंतर या कंपनीची स्थिति थोडी चमत्कारिक झाली होती. तिचे हक्क कोणी मानीना. सन १६९८ मध्यें दुसरी एक 'ईस्ट इंडिया कंपनी' स्थापन झाली व तीही हिंदुस्थानशीं व पूर्वेकडील देशांशीं व्यापार करूं लागली. त्यामुळें जुन्या ई. इं. कंपनीचें नुकसान होऊं लागलें. हें जाणून सन १७०८ मध्यें पार्लमेंटनें या दोन्ही कंपन्यांचें एकीकरण केलें व या नव्या ई. इं. कंपनीकडे पूर्वीचे सर्व हक्क व अधिकार सोंपवून दिले. ही कंपनी कथील, शिसें, पारा, काचेचे मणी, चांदी, सोनें, नाणीं, आरसे वगैरे माल हिंदुस्थानांत पोंचवी व मिरी, लवंगा, वेलदोडे, जायफळ वगैरे मसाल्याचे पदार्थ, रेशमी कापड, नीळ, मलमल, चिटाचें कापड, कापसाचें कापड, सोन्याच्या मुलाम्याचीं हत्यारें, वगैरे अनेक प्रकारचा माल हिंदुस्थानांतून इंग्लंडांत नेई. त्याशिवाय इराणांतून औषधें व गालिचे, चीनमधून चहा, साखर, चिनीमाती, लाखेचे जिन्नस व जावा व सुमात्रामधून हस्तिदंत, सोनें व मसाल्याचे पदार्थ इंग्लंडला पोंचविले जात.

४. इतर व्यापारी कंपन्या :—ई. इं. कंपनीप्रमाणें इतर अनेक कंपन्या अस्तित्वांत होत्याच. मस्कोव्ही ऊर्फ रशिया कंपनी, लीव्हंट ऊर्फ टर्की कंपनी रशिया व तुर्कस्थान या देशांशीं व्यापार करीत. गिनी कंपनी पश्चिम आफ्रिकेशीं व हडसन बे कंपनी उत्तर अमेरिकेशीं व्यापार करी. 'रॉयल ॲफ्रिकन कंपनी' सन १६७२ मध्यें स्थापन झाली. या कंपनीला आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील देशांशीं व्यापार करण्याचा मक्ता देण्यांत आला होता. त्यामुळें जे इंग्लिश लोक आफ्रिकेशीं आजवर चोरूनमारून व्यापार करीत, त्यांचें फार नुकसान झालें व ते या कंपनीस त्रास देऊं लागले. ही कंपनी हस्तिदंत, मिरीं, सोनें, निरनिराळे रंग व गुलाम, आफ्रिकेंत खरीदून इंग्लंडमध्यें आणीत असे व त्याच्या मोबदला तांब्याचे दागिने, काचेचे मणी, लोखंड, कथील, पितळेचीं भांडीं, ताग व लोकर यांचें कापड, बंदुकीची दारू, हत्यारें वगैरे जिनसा त्यांना देत. त्यांतल्या त्यांत गुलामांचा व्यापार प्रत्येक माणशीं वीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पौंडांप्रमाणें होत असे व तो त्यांस फारच फायद्याचा होई. सन १७११ मध्यें ' साऊथ सी कंपनी ' नांवाची एक कंपनी स्थापन होऊन तिला दक्षिण समुद्रांतील भागांशीं व अमेरिकेशीं व्यापार करण्याची परवानगी देण्यांत आली. सन १७१३ च्या तहानें अठ्ठेचाळीसशें गुलाम व पांचशें टनांचें एक जहाज स्पॅनिश अमेरिकेंत पाठविण्याची या कंपनीला परवानगी देण्यांत आली. या अधिकाराचा या कंपनीनें पुढें गैरफायदा घेतला. त्यामुळें इंग्लंडला स्पेनशीं झगडावें लागलें.

५. व्यापारी चुरस :—अशा तऱ्हेनें इंग्लंडचा व्यापार एकसारखा वाढत होता; तरी त्याला त्या बाबतींत दोन मुख्य शत्रु यावेळीं निर्माण झाले होते. एक फ्रान्स व दुसरा हॉलंड. त्यापैकीं फ्रान्सशीं इंग्लंडला बरींच वर्षें झगडावें लागलें. त्या दोन्ही देशांत या वेळेपासून जी व्यापारी चुरस लागून राहिली, त्यामुळें त्या दोन देशांत पुढें शंभर-दीडशें वर्षें एकसारखीं युद्धें होत होतीं. फ्रान्समधून खुद्द इंग्लंडमध्यें रेशीम, फिती, रिबन, लेस, लोकरीचें कापड, टोप्या, पंखे, आरसे, टांचण्या, सुया, हातमोजे, कागद, तागाचें कापड, निरनिराळ्या प्रकारची दारू, मीठ वगैरे अनेक प्रकारचा माल येत असे व लोकरीचें कापड, पायमोजे, दगडी कोळसा, शिसें वगैरे माल इंग्लंडमधून फ्रान्समध्यें जाई. खुद्द हॉलंडशीं इंग्लंडचे संबंध अत्यंत चुरशीचे होते व त्या देशाचा वाहतुकीचा व्यापार मारण्याकरितां नौकानिर्बंधासारखे कायदे इंग्लंडला करावे लागले. परंतु तिसरा विल्यम इंग्लंडचा राजा झाल्यानें या दोन्ही देशांतील चुरस थोडी नष्ट झाली होती. वरील दोन्ही देशांशिवाय पोर्तुगाल, स्पेन, इटली वगैरे युरोपियन देशांशींही इंग्लंडचा व्यापार मोठ्या प्रमाणावर चाले. या व्यापारामुळें इंग्लंडची चांगलीच चलती झाली व त्या देशांत पैसा चांगलाच खेळूं लागला. खुद्द व्यापारी जगांत लंडनला अत्यंत महत्त्व प्राप्त होऊन युरोपियन व्यापाराचें तें केंद्रस्थान म्हणून ओळखलें जाऊं लागलें. लंडनच्या खालोखाल लिव्हरपूल बंदराला महत्त्व आलें होतें. कारण त्या बंदरांतून गुलामांचा व्यापार सुरू होता. तेथील गुलामांच्या व्यापाऱ्यांनीं इतर ठिकाणच्या गुलामांच्या व्यापाऱ्यांचा व्यापार मारून टाकला होता. ब्रिस्टल बंदरही महत्त्वाचें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. इंग्लंडमधील उद्योगधंदे :—खुद्द इंग्लंडमध्यें मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत नसे. जत्रा, बाजारपेठा वगैरेमध्यें व्यवहार चालत तेवढेच; कारण त्यावेळीं दळणवळणाला योग्य अशा सडकाच नव्हत्या. तसेंच



टेम्सवरील लंडनमधील एकच एक पूल

इंग्लंडमधील उद्योगधंदेही पुष्कळ वेळां खेड्यांतच चालत. मोठमोठे व्यापारी खेड्यांत जाऊन तेथें माल खरेदी करीत व परदेशीं पाठवीत. त्यांचा व्यापार नद्या, सडका व समुद्र यांवरून जास्त चाले. लोकरीचा धंदा, लोखंडाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धंदा, दगडी कोळसा खाणींतून काढण्याचा धंदा, हे त्या वेळचे मुख्य धंदे होत. त्यांतल्या त्यांत लोकरीचा धंदा महत्त्वाचा होता. त्यावेळीं लोकांजवळ मेंढ्या पुष्कळ असत. योग्य काळीं त्यांची ते लोकर कापीत; नंतर ती पिंजून व त्याचें सूत काढून कापड विणीत. हे सर्व व्यवहार हातानेंच होत असल्यानें खेड्यांतील माणसेंही हा धंदा शेतीचा जोडधंदा म्हणून करीत असत. जेथें असें होत नसे तेथील शेतकरी आपली लोकर विकीत; ती विकत घेणारे व्यापारी मग ती ज्या खेड्यांत हा धंदा चाले तेथील शेतकऱ्यांस देत व त्यांच्याकडून कापड विणून घेऊन बाजारांत विकीत किंवा परदेशीं पाठवीत. नॉरफोक, सफक, इसेक्स, केंट वगैरे पूर्वेकडील कौंटी-



व्यापारी आपला माल असा नेत

मध्यें, लँकेशायर, यॉर्कशायर, वेस्टमोरलंड वगैरे उत्तरेकडील कौंटीमध्यें तसेंच डेव्हन, ऑक्सफर्ड, सॉमरसेट, ग्लॉस्टर वगैरे कौंटीमध्येंही हा धंदा मोठ्या प्रमाणावर चाले. त्यानंतर लोखंडाचा धंदा, बंदुका, चाकूकात्र्या, तरवारी, नांगराचे फाळ, खिळे, नाल, कुलुपें व किल्ल्या, साखळ्या वगैरे-करितां त्यावेळीं लोखंड लागे. त्यावेळीं लोखंडाच्या खाणी ससेक्स, सरे, केंट, स्टॅफर्ड, वूर्स्टर, वॉरिक, उत्तर लँकेशायर वगैरे परगण्यांत होत्या. खाणींतून लोखंड काढून त्याचा रस करण्याकरितां त्यावेळीं साध्या कोळशाचा उपयोग करीत. त्यांतल्या त्यांत शेफील्डचा कारखाना प्रसिद्ध होता. दगडी कोळसा त्यावेळीं धंदेवाल्या लोकांत प्रिय नव्हता. त्याचा उपयोगच त्यांना माहीत नव्हता व म्हणूनच लोखंडाच्या धंद्यास त्याचा उपयोग झाला नाहीं. त्यावेळीं दगडी कोळसा घरांतील चुलाण्याकरितां शहरांतील लोक वापरीत. दगडी कोळशाच्या खाणी न्यूकासल, शेफील्ड, लिव्हरपूल, डार्बी वगैरे शहरांजवळ होत्या. वरील मुख्य धंद्यांशिवाय जहाजें बांधण्याचा धंदा ब्रिस्टल, प्लीमथ, पोर्टस्मथ, न्यूकासल, हल, लिव्हरपूल, एडिंबरो वगैरे ठिकाणीं चालत असे. त्याकरितां लागणारें सागवान बाहेरून येत होतें. इंग्लंडमधील रानांतूनही थोडें निघे;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परंतु तें अपुरें पडे. याशिवाय अनेक धंदे इंग्लंडांत चालू होते. ससेक्समध्यें कांचकाम चाले. डार्बीमध्यें मातीचीं भांडीं व सॉमरसेट परगण्यांत हातमोजे होत. पायमोजे नॉटिंगहॅमला व लेस्टरला होत. डार्बीला रेशमाचे कारखानेही होते. कथील कॉर्नवाल परगण्यांत सांपडे. या काळांतही परकीय व्यापारी, उत्तम विणकरी व कारागीर फ्लँडर्न्स व फ्रान्स या देशांतून इंग्लंडमध्यें आले होते. ते कसलेले असल्यानें त्यांनीं कागद, लेस, साबण, रेशमी कापड, कापसाचें कापड वगैरेसारखे अनेक प्रकारचे धंदे इंग्रजांना शिकविले. त्यामुळें ते धंदेही भरभराटीस आले.

७. जत्रा व त्यांचें महत्त्व :—मध्ययुगांत रूढ असलेला प्रकार स्टुअर्ट-काळांतही रूढ होताच. इंग्लंडमधील कारखानदार, व्यापारी, शेतकरी वगैरे लोक आपला माल तयार करीत; परंतु त्यांना तो उठविण्यास अत्यंत अडचण पडे. तेथल्या तेथें माल क्वचितच उठे. दळणवळणाची व्यवस्थाही चांगली नसल्यानें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं माल लवकर हलवितां येत नसे. यामुळें मोठमोठ्या शहरीं दरसाल मोठे बाजार अगर जत्रा भरविण्याची स्टुअर्ट काळांतही प्रथा चालू राहिली. या जत्रा साधारणतः उन्हाळ्यामध्यें भरत. कारण त्या वेळीं सडकांची स्थिति बरी असे. या जत्रांमध्यें ठिकठिकाणचा माल विकण्याकरितां येत असे व एकंदरींत व्यापाऱ्यांची देवघेव मोठ्या प्रमाणावर चाले. व्यापाराबरोबरच निरनिराळे करमणुकीचे प्रकारही येथें चालत. डोंबारी, जादुगार, नाटक-तमाशेवाले, हातचलाखी करणारे, खाणा-वळवाले वगैरे अनेक प्रकारचे लोक जत्रेच्या जागीं जात व लोकांची करमणूक करून पैसा मिळवीत. या ठिकाणीं नित्य नवे नवे विचार व बातम्या लोकांना ऐकावयास मिळत असल्यानेंही त्यांचा फायदा होत असे. बार्थलोम्यूची जत्रा, स्टरब्रिजची जत्रा, साऊथवर्कची जत्रा वगैरे जत्रा त्याकाळीं प्रसिद्ध होत्या.

८. व्यापारी व बँका :—व्यापाऱ्यांना व धंदेवाल्यांना पैशाची म्हणजेच भांडवलाची फार जरुरी असते. स्टुअर्ट काळीं मोठमोठे व्यापारी आपला पैसा जपून, पुरून अगर गुप्त ठिकाणीं ठेवीत असत. प्रवासांत असतांही ते आपला पैसा खिशांत न ठेवतां खोगीरांत लपवून ठेवीत. व्याजबट्ट्याचा व्यवहार त्यावेळीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हताच; कारण कर्ज काढण्याची कल्पना त्यांना कशीशीच वाटे. त्यावेळीं पैशाचा व्यवहार सराफांच्या हातीं असे. यादवी युद्धांत त्यांचा विक्रीचा धंदा बंद पडला व सोन्याला व रत्नांना गिऱ्हाईक मिळेना. तेव्हां व्यापारी व सधन लोकही आपल्या पैशाचें काय करावें म्हणून मोठ्या फिकिरींत पडले. सराफांनीं त्यांचे पैसे ठेव म्हणून ठेवून घेण्यास सुरुवात केली व ती रक्कम दहा टक्के दरानें हे लोक सरकारला देऊं लागले. याच लोकांस दुसऱ्या चार्ल्सनें फस-विलें होतें हें मागें आलेंच आहे. त्या वेळीं या सराफांच्या धंद्यास पेढीचें स्वरूप प्राप्त झालें व ते देखील हुंड्या काढूं लागले. नंतर सन १६९४ मध्यें विल्यम पॅटर्सनच्या सल्ल्यानें तिसऱ्या विल्यमनें इंग्लंडची बँक स्थापन केली. ती एक जॉईंट स्टॉक कंपनी होती व ती सरकारला आठ टक्क्यांनीं पैसे देई, चलनी नोटा छापी, व्यापाऱ्यांच्या ठेवी ठेवी, व कोणासही कर्जाऊ पैसा देई. या नव्या उपक्रमानें देशाचा व्यापार वाढीस लागून इंग्लंडची पत वाढली. मध्ययुगांतही इटली, नेदरलंड वगैरे देशांत बँका होत्या; परंतु तशा तऱ्हेचा इंग्लंडमध्यें आजपावेतों उपक्रम झालेला नव्हता. शिवाय ख्रिस्ती धर्माप्रमाणें रक्कम व्याजीं लावणें हाच अधर्म समजला जात असे. त्यामुळेंही पेढीचा धंदा व सावकारांचा धंदा मागें पडला. ट्यूडरांच्या वेळचा सराफ-कट्टाही आपलें काम उत्तम रीतीनें चालवीत होता.

९. शेती व शेतीची सुधारणा:—स्टुअर्ट काळांतही शेतीचा धंदा प्रमुख गणला जात होता. कारण बहुजनसमाजाच्या हातीं असलेला व इंग्लंडच्या कोनाकोपऱ्यांत मोठ्या उत्साहानें चाललेला धंदा तोच. स्टुअर्ट काळांत शेतकऱ्यांची स्थिति कशी होती व खेड्यांतील एकंदर व्यवस्था कशी होती हें पुढच्या धड्यांत सांगितलें आहे. परंतु स्टुअर्ट काळांत शेतीची जी सुधारणा झाली ती येथें पहाणें आवश्यक आहे. त्या काळचा शेतकरी मागासलेला होता व जुन्यांत सुधारणा करूं नये असेंच त्याला वाटे. त्यामुळें शेतास कुंपणें घालून मनाला येईल त्याप्रमाणें त्यांत शेती करणेंच त्याला पसंत होतें. दुसरें म्हणजे मोकळीं रानें अगर शेतें त्यावेळीं नव्हतींच. शेतांस कुंपण घालण्याच्या पद्धतीस ट्यूडर व स्टुअर्ट राजांनीं विरोध केला व त्याविरुद्ध कायदेही केले. त्याचा थोडासा उपयोग झालाही. प्रथम शेत-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कऱ्यांच्या उपकरणांतही या काळीं फारशी सुधारणा झालेली नव्हती. त्यांचा नांगर पूर्वींप्रमाणेंच लांकडाचा असे व त्याला ओढावयास चार-आठ बैल लागत. खतांचा उपयोग त्यांना माहीत नसल्यानें शेतांतून पिकें चांगलीं होत नसत. शेतांची खुरपणी करण्याची पद्धति त्यांना माहीत नव्हती. त्यामुळें शेताचें रान होई व दर तीन वर्षांनीं शेतें पडीक जमीन म्हणून पेरणीस नालायक ठरविण्यांत येत. या सर्व गोष्टींत सुधारणा घडवून आणण्याचें काम फ्रान्स, हॉलंड, नेदरलंड वगैरे देशांतून परत आलेल्या लोकांनीं केलें. या लोकांनीं प्रथमतः धान्याच्या निर्यातीवर निर्बंध घालणारे सरकारी कायदे—कॉर्न लॉ—रद्द करून घेऊन परदेशीं धान्य पाठविण्याकरितां शेतकऱ्यांना उत्तेजन दिलें व परकीय धान्यावर जकाती बसविण्यास सुरुवात झाली. सन १६७० सालीं एका क्वार्टरवर सोळा शिलिंगप्रमाणें जकात बसविण्यांत आल्यानें देशांतील धान्य महाग झालें. पुढें सरकार शेतकऱ्यांना मदत करूं लागलें. त्यामुळें धान्य स्वस्त होऊं लागून शेतकऱ्यांचा फायदा झाला. त्याचप्रमाणें गुरांची योग्य जोपासना होऊं लागून त्या बाबतींतही सरकार शेतकऱ्यांस मदत करूं लागलें. यानंतर खुद्द शेतकी सुधारण्याच्या दृष्टीनेंही अनेक नवीन पद्धती सुरू झाल्या. बैलांच्याऐवजीं शेतीच्या कामास घोडे वापरण्यास सुरुवात झाल्यामुळें शेती उत्तम होऊं लागली. दुसऱ्या चार्ल्सच्या कारकीर्दीपासून कुंपणें घालण्यास पुन्हां सुरुवात झाली व ती पद्धति पुढें वाढतच गेली. दलदलीच्या प्रदेशांतून पाटानें अगर नाल्यानें पाणी काढून टाकून ती जमीन शेतीकरितां उपयोगांत येऊं लागली. या कामीं पवनचक्क्या व पाणचक्क्या यांचाही उपयोग होऊं लागला होता. त्याचप्रमाणें नांगरणी, पेरणी व कुळवणी एकदम करतां येईल असें एक यंत्रही या काळीं वापरण्यांत येऊं लागलें. नवीन पद्धतीचे नांगरही उपयोजिण्यांत आल्यानें शेतीच्या कामांत बरीच सुधारणा झाली. या सर्व सुधारणांमुळें शेती उत्तम चालून शेतकऱ्यांचा फायदा होऊं लागला.

अभ्यास

१. अमेरिकन वसाहतींचा विस्तार कसकसा होत गेला तें सांगा. इंग्लंडशीं या वसाहतींचे संबंध कोणत्या प्रकारचे होते?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. स्टुअर्ट काळांत इंग्लंडचा कोणकोणत्या देशांशीं व्यापार चालत असे ? निरनिराळ्या देशांतून कोणकोणता माल इंग्लंडमध्यें येई ?

३. इंग्लंडमधील उद्योगधंद्यांसंबंधीं माहिती सांगा. त्या बाबतींत परकीय कारागिरांनीं कोणकोणते प्रयत्न केले ?

४. ई. इं. कंपनीच्या कार्यासंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या :—

शेतकींत सुधारणा, फ्रान्स व इंग्लंड यांतील व्यापारी चुरस, इंग्लंडची बँक, जत्रा व त्यांचें महत्त्व, हॉलंड व इंग्लंड यांची व्यापारी चुरस.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४. स्टुअर्ट काळांतील लोकांची राहणी

१. खेडेगांवांतील जीवन :—स्टुअर्ट काळांतील खेडीं अत्यंत भरभराटलेल्या स्थितींत होतीं. यादवी संपून देशांत स्थीरस्थावरता उत्पन्न झाली होती; मात्र औद्योगिक क्रांतीचा काळ अजून यावयाचा होता. या काळांतील शेतकरी अत्यंत सुखासमाधानांत होते. कवि व लेखकही त्यांचें कोडकौतुक करीत व त्यांच्या स्तुतिपर लिहीत. स्टुअर्ट काळाच्या शेवटचीं वर्षें तर शेतकऱ्यांना सोन्यासारखीं गेलीं. त्या काळचीं खेडीं पूर्वीप्रमाणेंच होतीं. त्यांमध्यें राहणाऱ्या लोकांच्या जीवनांत फारसा फरक पडलेला नव्हता. खेड्याच्या आजूबाजूच्या वस्तूंवर गुजराण करावी व आपल्या शेजाऱ्याला सर्वतोपरी मदत करावी ही प्रत्येकाची भावना होती. आपला धंदा सांभाळून दुसऱ्याला मदत करणें प्रत्येकास भूषण वाटे. त्यांचीं अत्यंत साधीं घरें ओक अगर सागवान वृक्षाच्या लाकडाचीं असत. मातीचा उपयोग घर-बांधणीच्या वेळीं भरपूर होई. गिलावा करून त्यावर ओबडधोबड चित्रें चितारण्यांत येत. हीं घरें बहुधा दुमजली व गांवाच्या मधोमध गेलेल्या एकाच रस्त्याच्या दुतर्फा वसलेलीं असत. गरीब शेतकरी झोपड्यांतून रहात. या झोपड्या लहानशा पण टुमदार असत व त्यांत एखाद-दुसरीच खोली असे. या झोपड्यांमध्यें शेतकऱ्यांचीं कुटुंबें, गुरें-ढोरें, कोंबड्या-बदकें वगैरे सर्वजण मोठ्या आनंदानें रहात ! प्रत्येक खेड्यांत अजूनही तीन मुख्य शेतें असत व त्यांचे तुकडे पाडून ते लोकांच्या दर्जाप्रमाणें वांटण्यांत येत. खेड्यांतून मुख्यतः चार प्रकारचे लोक असत. देशमुख हा त्या खेड्याचा मुख्य मालक समजला जाई. त्यानंतर शेतकऱ्यांमध्येंही, मिरासदार, पट्टेदार, खंडकरी व शेतकरी असे चार मुख्य प्रकार होते. मिरासदार जमिनीचे कायम मालक असत. पट्टेदार पट्ट्यानें जमिनी घेऊन नक्त उत्पन्न अगर रक्कम देशमुखाला देत. मुदतीनें जमीन घेऊन व ती कसून उत्पन्नाचा कांहीं भाग देशमुखाला खंड म्हणून देणारे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खंडकरी, स्वतःच्या इच्छेवर शेतीचा धंदा करणारे शेतकरी, केवळ कांहीं काळच जमीन करीत. वरील शिवाय शेतमजुरांचा भरणाही पुष्कळ असे. देशमुख मात्र पूर्वीप्रमाणें अत्यंत मिजाशींत रहात असे. आपली इस्टेट सांभाळून राहणें हा त्याचा मुख्य धंदा. त्याचें शिक्षण बेताबाताचेंच असे. त्यामुळें एखाद्या वेळीं तो शहरांत गेलाच तर शहरवासीयांकडून त्याची थट्टा होई! आपल्या खेड्यांत शांततारक्षणाचें काम त्याला करावें लागे, स्थानिक गोष्टींकडे त्याला लक्ष देणें भाग पडे व आपल्या देशमुखी कोर्टातर्फे खटले चालवून गुन्हेगारांस अल्प शिक्षाही कराव्या लागत. त्याचा दरारा मोठा असे. आपल्या खेड्यांतील रहिवाशांस थोडेंसें लष्करी शिक्षणही तोच देई.

२. खेडवळांची राहणी :—एकंदरींत पाहतां हे सर्व खेडवळ लोक अडाणी, निरक्षर व आपल्या जुन्या कल्पना उराशीं बाळगून बसणारे होते. त्यांची एकंदर स्थिति भरभराटलेली असली तरी त्यांना आपलें गांव सोडून दूर जाण्याची बुद्धि सहसा होत नसे. त्यामुळें त्यांचा इतरांशीं संबंध न आल्यानें ते लोक अज्ञानीच राहिले होते. नव्या नव्या कल्पना त्यांस अपूर्व वाटत. अर्थात् शहरांतून घरांच्या बांधणींत, पोषाखांत, रीतिरिवाजांत जे फरक होत ते त्यांस माहीत नसत. फेरीवाल्याकडून निरनिराळे प्रकार व नव्या नव्या सुधारणा ऐकून त्यांस आश्चर्य वाटे. बातम्याही तोच पुरवी व संसारोपयोगी वस्तूही त्याच्याकडूनच लोक घेत असत. अडाणी व खेडवळ वृत्तीमुळें लोकांचा शकुनावर फार विश्वास होता. एखाद्या बैलाच्या पोटांत दुखूं लागलें तर सायंकाळीं त्याला एखाद्या तळ्याजवळ चारलें म्हणजे त्याची पोटदुखी थांबते अशी त्यांची समजूत होती! नांगरणीच्या वेळीं एखादी भाकरी जमिनींत पुरून ठेविली तर पीक उत्तम येतें असें त्यांस वाटे! एकंदरींत पाहतां त्यांच्यामध्यें गांवढळपणाच फार होता. भुतांखेतांवर, चेटक्यांवर, भविष्यकथनावर, त्यांचा पूर्ण विश्वास होता. चित्तवेधक काल्पनिक गोष्टी, पोवाडे, लोकगीतें वगैरे ऐकण्याचा त्यांना अतिशय नाद होता. 'मे' दिन साजरा करण्याच्या वेळचा त्यांचा उत्साह अवर्णनीय असे. 'मॉरिस' नाच विवाहप्रसंगीं व सणांचे प्रसंगीं नाचला जात असे. या काळींही पूर्वीप्रमाणें जत्रा भरत व त्यावेळीं मोठमोठ्या देवघेवी होत. संसाराला लागणारा माल खेडेगांवचे लोक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या जत्रांतून विकत घेत. खेड्यांतील लोकांचा मुख्य धंदा शेतीचा. कुंपणें घालण्याच्या पद्धतीला या काळीं पुष्कळच आळा बसलेला होता व बहुतेक सर्व खेड्यांतून आतां शेतीचा धंदा पुन्हां सुरू झाला होता. त्यामुळें खेड्यांतील लोकांस भरपूर काम मिळे. मात्र शेतमजुरांची संख्या खेड्यांतून फारच वाढली होती. हे लोक जमिनीच्या मालकाकडून जमिनी घेत व आपल्या कामाकरितां फक्त नक्त रक्कम त्याच्याकडून घेत. शेतमजुराला साधारणतः आठवड्याला सहा-सात रुपये मजुरी मिळे व या मिळकतीवर तो समाधानी असे. धनसंचय करण्याकडे त्याची मुळींच दृष्टि नसे. परंतु शेतीमध्यें जसजशा सुधारणा होत गेल्या तसतशी पैशाकडे लोकांची जास्त दृष्टि वळूं लागली. या लोकांचें अन्न अगदींच साधें असे. रायची भाकरी हेंच त्यांचें मुख्य अन्न. हिंवाळ्यांत व उन्हाळ्यांत मांस मिळे. खेड्यांतून हिंवाळ्यामध्यें गुरें नीट रहात नसत. त्यामुळें नोव्हेंबरमध्यें त्यांस मारून त्यांचें मांस खारवून ठेवीत व तें उन्हाळ्यांत खाण्यांत येई. चहा, कॉफी वगैरे पेयांचा खेड्यांतून अजून शिरकाव झालेला नव्हता. त्यामुळें दूध, बीर नामक दारू व पाणी हींच त्यांचीं मुख्य पेयें होतीं. उडाणटप्पू लोक यावेळीं फारसे नव्हतेच, प्रत्येक खेड्यांत देऊळ बहुधा असेच. पाटील, त्याचा शिपाई, कुलकर्णी वगैरे अधिकारी प्रत्येक खेड्यांत असत. त्याचप्रमाणें खोडे, फटके-खांब वगैरे देवळाजवळच असत. स्थानिक स्वराज्याचीं सर्व प्रकारचीं कामें त्यावेळचे लोक आपलीं आपणच करीत व त्यांनीं तीं केलीं नाहींत तर त्यांस शिक्षा होत असे.

बोट-खोडा

एका गांवांत साधारणतः तीनशें लोक रहात असत. त्यामुळें तेथें भिकार फारसें नसेच; असलेंच तर त्यांस काम तरी मिळे अगर भिक्षा मिळे. खेड्यांतून प्रत्येक घरीं घरगुती धंदेही चालत. त्यांतल्या त्यांत कापूस अगर लोकर पिंजून त्याचें सूत काढणें हा मुख्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धंदा खेड्यांतील स्त्रियांचा असे. कापड विणण्याचे मागही कांहीं खेड्यांत चालत असत.

३. शहरांतील जीवन :—खेड्यांतील लोकांची राहणी व शहरांतील लोकांची राहणी यांमध्यें पुष्कळ अंतर होतें. स्टुअर्ट काळांत पुष्कळ मोठीं शहरें उदय पावलीं. व्यापाराच्या वृद्धीमुळें व ठिकठिकाणीं विशिष्ट माल निघूं लागल्यानें अनेक शहरें प्रसिद्धी पावलीं. मँचेस्टर, बर्मिंगहॅम, ब्रिस्टल, नॉर्विच, शेफील्ड, यॉर्क, लेस्टर, लीड्स, ग्लॉस्टर, ग्लासगो, लंडन वगैरे अनेक शहरें भरभराटलेलीं होतीं. या शहरांतून मोठमोठे व्यापारी, कारखानदार, श्रीमंत, सरदार वगैरे लोक रहात असत. पूर्वीच्या शहरांच्या भोंवतीं तटबंदी असे व एलिझाबेथच्या वेळेपासूनच या तटबंदीच्या बाहेर शहरें वसूं लागल्यानें तटबंदीचें महत्त्व कमी होऊं लागलें होतें. कांहीं शहरांची तटबंदी अजीबात पडून वेशी मात्र शिल्लक राहिल्या होत्या! या शहरांची वस्तीही वाढूं लागली होती. लंडनची वस्ती पांच लाख होती. तटबंदीच्या आंतील भागांतील रस्ते अत्यंत अरुंद असत. मोठमोठ्या शहरांतील रस्त्यांची रुंदी वीस फुटांपेक्षां जास्त नसे. त्यामुळें मोठ्या गाड्या शहरांतून न जातां गांवच्या वेशीपर्यंतच जात व तेथून त्यांतील माल कुत्र्यांच्या अगर घोड्यांच्या गाड्यांतून शहरांत नेत! या अरुंद व अस्वच्छ रस्त्यांतूनच लोकांची लगबग सुरू असे. 'मोड-तोड-तांबा-पितळ,' 'चाकू-सुऱ्या-कंगवे,' 'गाणारे पक्षी घ्या, गाणारे' 'पाव-बिस्किटें घ्या हो, पाव-बिस्किटें' 'शाई घ्या शाई,' 'कांचेच्या तुताऱ्या,' 'केरसुण्या घ्या केरसुण्या,' 'भाजी फळें घ्या, भाजी' वगैरे विक्यांचे आवाज व घेवा-

'चाकू-सुऱ्या-कंगवे' 'मोड-तोड-तांबा-पितळ' 'गाणारे पक्षी'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्या कर्णकर्कश आरोळ्या व पोवाडे-वाले, वर्तमानपत्रें विकणारे यांची आरडाओरड यांनीं रस्ते नुसते दुमदुमून जात! या सर्वांची कधीं कधीं पैशाऐवजीं जिन्नसा घेऊनही देवघेव चाले! प्रत्येकाला आपल्या घरापुढील रस्त्याच्या मधोमध असलेलें गटार-व तेथपर्यंतचा रस्ता



'कांचेच्या तुताऱ्या' 'शाई व्या शाई' 'पाव बिस्किटें'

साफसूफ ठेवावा लागे, त्याची दुरुस्ती करावी लागे व हिंवाळ्यांत घरापुढें कंदीलही लावावा लागे. अंधाऱ्या रात्रीं गस्तवाला कर्णकर्कश आवाजानें गस्त घाली. या रस्त्यांच्या आजूबाजूचीं घरें पूर्वींप्रमाणेंच दुमजली असत. दुसरा मजला पहिल्या मजल्याच्या पुढें येई व तिसरा दुसऱ्याच्याही पुढें रस्त्यावर झुकलेला असे. यामुळें समोरासमोरचीं घरें एकमेकास जणूं चिकटतात असें वाटे! मात्र लंडनमध्यें अग्निप्रलय झाला त्यावेळीं अशा घरांचा उपयोग फार झाला! कारण जळत्या घरांतून समोरच्या घरांत सहज उडी मारतां येई. किंवा एका घराच्या तिसऱ्या मजल्यावरून पुढच्या घराच्या तिसऱ्या मजल्यावर जिन्यानें सहज जातां येई. अग्निप्रलयानंतर लंडनमधील घरें मात्र आजूबाजूला बरीच जागा सोडून व रुंद रस्ता ठेवून बांधण्यांत आलीं. हीं सर्व घरें नवीन पद्धतीनें बांधण्यांत येत. तरी पण शिल्लक राहिलेलीं घरें पुढें एकोणिसाव्या शतकापर्यंत तशींच राहिलीं. शहरांतून कॉफीगृहें, उपाहारगृहें व खानावळी असत. त्यांतून विनोदाच्या उर्मी व नंतर हंशा उसळे. राजकारण, बातम्या, चर्चा, टीका, हास्य-विनोद वगैरे गोष्टी तेथें नित्यशः चालत. शहरांतून मोठमोठे व्यापारी अत्यंत कसोशीनें काम करीत, अत्यंत साधेपणानें रहात व प्रामाणिकपणें व्यवहार करीत. लंडनमधील व्यापारी मात्र मोठ्या ऐटींत असत. ऐटबाज पोषाख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घालावा, हातीं तलवार धरावी व नाचरंग, नाटक-तमाशे, उपाहारगृहें, कॉफीगृहें व मंडळें यांच्यामध्यें चैनींत दिवस घालवावा असें त्यांस नेहमीं वाटे. चहा, कॉफी, चाकोलेट, दारू वगैरे पेयें स्वतःच्या घरीं इष्टमित्रांस बोलावून ते देत असत. लंडन हें चैनीचें केन्द्रस्थान होतें व तेथें अनेक लोक ख्यालीखुशालीकरितां जमत! नाटकगृहें, कॉफीगृहें, पानगृहें तेथें विपुल असत. त्यामुळें लंडनबद्दल लोकांना एक प्रकारचें आकर्षण वाटे. सर्व प्रकारचा माल तेथेंच मिळे. निरनिराळे उत्सव, महोत्सव, मिरवणुकी, यात्रा, मोठ्या जत्रा, राजकीय उलाढाली वगैरे गोष्टी लंडनमध्यें उत्तम प्रकारानें होत असल्यानें श्रीमंतांचा लंडनमध्यें मजेंत वेळ जाई. इतर दृष्टीनें या काळांत शहरांतील लोकांच्या जीवनांत फारसा फरक पडलेला नव्हता. प्रत्येक शहराला एक देशमुख, एक गांवरान, गायरान असे व पंचायतीची पद्धतीही पूर्वींप्रमाणेंच कायम होती. नव्या शिष्टसांप्रदायांतील लोकही शहरांतून रहात होते. त्यांनीं नव्या नव्या कल्पना इंग्लंडमध्यें आणल्या. त्यांचे नवे विचार सामाजिक, धार्मिक व आर्थिक बाबतींत बरेच पुढारलेले होते; राजकारणावरही त्यांच्या विचारांचा पगडा बसल्याशिवाय राहिला नाहीं. लंडनमध्यें हे लोक मोठ्या प्रमाणावर रहात असत. त्यामुळें लंडनचा पश्चिम विभाग श्रीमंत व फॅशनेबल गृहस्थांचा व मजूर, कामकरी वगैरे लोक पूर्व भागांत रहात असल्यानें लंडनचा पूर्वविभाग त्यांचा असें ठरूनच गेलें होतें. शहरांतून घरफोड्या, चोऱ्या-मारामाऱ्या नेहमींच होत. रात्रीं रस्ते अंधारमय असल्यानें चोरांचें व दरोडेखोरांचें फावे. गस्तवालेही केव्हां केव्हां रस्त्यावरील मनुष्यावर हल्ले करीत व त्यांना लुबाडीत. गंमत म्हणून कांहीं चांगले लोकही रात्रीच्या वेळीं वाटसरूंवर हल्ले चढवीत, अपमान करीत व त्यांस सोडून देत! या शहरांतून व्यापार


पायखोडा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मात्र मोठ्या प्रमाणावर चाले. लंडनमध्यें मोठमोठ्या राष्ट्रांचे प्रतिनिधि असत व ते कित्येक पौंडांची देवघेव करीत.

४. घरें व इमारती :—घरें बांधण्याच्या पद्धतींत फारसा फरक झालेला नव्हता. अनेक घरें जुनींच असल्यानें त्यांची रचनाही बदललेली नव्हती. मात्र नव्या रचनेस सुरुवात झालेली होती. युरोपांतून आलेले लोक इटालियन लोकांच्या घरांप्रमाणें आपल्या घरांची मांडणी करूं लागले होते. प्रथमतः इमारतीचा नकाशा काढून घेऊन त्याप्रमाणें घरें बांधून घेत. हीं नवीं घरें तांबड्या विटांचीं असत. दारें व खिडक्या सुबक व बांधेसूद करण्याकडे प्रवृत्ति होती. घरांवर मंगलोरी कौलांसारखीं तांबडीं कौलें येऊं लागलीं होतीं. हीं घरें मोठीं टुमदार व शोभिवंत दिसत. स्वयंपाकघर व तबेले घराच्या जवळच बाहेरच्या बाजूस बांधण्यांत येत असत. यामुळें घरमालक व त्यांचे नोकर यांचा संबंध फारसा येत नसे. घरांतील जिने नक्षीदार व शोभिवंत असत. इतके दिवस भिंतीवर पडदे सोडण्यांत येत. स्टुअर्ट काळांत त्यांच्याऐवजीं जमिनीपासून छतापर्यंत ओक झाडाच्या फळ्या ठोकीत. पूर्वीप्रमाणें धुरांडींही प्रत्येक घरामध्यें असत. मात्र लांकडाऐवजीं दगडी कोळसा वापरण्यास सुरुवात झाल्यानें लोखंडाच्या शेगड्या वापरण्यांत येऊं लागल्या होत्या. सर्व घरांतून फर्निचरही उत्तम प्रकारचें वापरण्यांत येऊं लागलें. आरसे, पडदे, सुंदर फुलदाण्या, खुर्च्या, टेबलें, कोचें वगैरे वस्तू नित्याच्याच होत्या. स्नानगृहाची सोय मुद्दाम करण्यांत येऊं लागली होती. हीं स्नानगृहें उत्तम प्रकारच्या संगमरवरी दगडांची बांधण्यांत येत असत. दांत घासण्याकरितां ब्रश वापरण्यास सुरुवात झालेली होती. हे ब्रश कधीं कधीं चांदीचे अगर सोन्या-


स्टुअर्टकालीन पलंग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चेही असत व ते ठेवण्याकरितां सुंदर डब्याही असत. निजण्याचे पलंग अत्यंत शोभिवंत व नक्षीदार असत. पलंगाच्या कारनिसवर मखमल चिकटविलेली असे. पडदे, उशांचे अभ्रे वगैरे वस्तूही मखमली असत. दुसऱ्या चार्ल्सच्या राणीचा पलंग आठशें पौंडांचा होता. नवीन घरें सुंदर होतीं, जुनीं वाईट होतीं व त्यांत राहणारे लोक गलिच्छच असत. घरांतील पाणी माडीवरून टाकल्यानें तें रस्त्यांवरून जाणाऱ्या वाटसरूंच्या अंगावर नेहमीं पडे! घरांच्या आजूबाजूसही केर-कचरा पुष्कळ सांठे. नव्या घरांच्या आजूबाजूस बागबगीचे सुरू झाल्यानें घरांस शोभा येऊं लागून, घाणही कमी झाली. क्रिस्टॉफर रेननें मोठमोठ्या इमारतींच्या रचनेंत पुष्कळच क्रांति घडवून आणली होती. त्यामुळें पूर्वीची 'गोथिक पद्धति' मागें पडून डच पद्धतीप्रमाणें नव्या नव्या इमारती बांधण्यांत येऊं लागल्या. घरांना नंबर नव्हते; त्यामुळें तीं ओळखण्याकरितां घरांवर निरनिराळ्या प्रकारच्या खुणा असत.

५. कपडे-पोषाख :—इमारतींवरच डच पद्धतीचा परिणाम झाला असें नाहीं तर लोकांच्या पोषाखावरही झालेला होता. स्टुअर्ट काळांतील लोकांचे कपडे निरनिराळ्या वेळीं बदलत गेले. पहिल्या जेम्सच्या वेळीं लोकांच्या कपड्यांत फारसा फरक झालेला नव्हता; परंतु पहिल्या चार्ल्सच्या वेळीं पुष्कळच फरक झाला. राजपक्षीय कॅव्हेलियर मोठे भडक रंगाचे रेशमी कपडे अंगावर चढवीत असत. त्याच्यावर मखमलीचा मोठा झगाही ते वापरीत. कॉलरी कलाबतूच्या अगर मोठ्या किंमतवान रेशमाच्या असत. त्यांना फिती लावून शोभा आणलेली असे. कोट अंगांत घट्ट बसतील असे असत व त्यांच्या बाह्या चुणीदार व तंग असत. त्यामुळें शर्ट सहज दिसे. डोक्याच्या टोपींत अनेक प्रकारचीं पिसें लावण्याची पद्धति त्यावेळींही रूढ होती. पायांत विजारी अगर मांडचोळणे असत. पायांतील पायमोजे विजारीस अडकविण्याची सोय करण्यांत येई. या पायमोजांसही फिती लावलेल्या असत. स्टुअर्ट काळाच्या शेवटीं शेवटीं पुरुष जाकिटेंही घालूं लागले होते. पायांतील बूट बकलें लावलेले होऊं लागले होते. दाढ्या ठेवण्याची प्रथा पूर्णपणें मोडलेली नव्हती. प्यूरिटनपंथीय लोक दाढी करीत. प्यूरिटनांचा पोषाख अत्यंत साधा असे. ते केस ठेवीत; पण ते डोक्याबरोबर कापलेले. काळ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्टुअर्ट काळांतील लोकांची राहणी

कोणत्या राजाच्या वेळचा कोणता पोषाख आहे हें तुम्हांस वरील चित्रांवरून ओळखतां येणें शक्य आहे. ओळखा पाहूं !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रंगाचे कपडे ते वापरीत. त्यांच्या टोप्याही उंच व काळ्या रंगाच्या असत. पोषाखावरूनच प्यूरिटन गृहस्थ ओळखला जात असे. दुसऱ्या चार्लसच्या कारकीर्दींत पोषाखांत भपकेदारपणा जास्त येऊं लागला. केसांचे लहान-मोठे टोप डोक्यावर चढविण्यांत पुरुष भूषण मानीत. डोक्याचे केस कुरळे करण्याकडे पुरुषांची प्रवृत्ति होती. स्त्रियांच्या पोषाखांत अनेक तऱ्हा असत. चुणीदार व तंग असें भरजरी पोलकें, त्यावर मानेपासून कंबरेपर्यंत तंग व पुढें पायापर्यंत अत्यंत सैल असा झगा, त्यावर पुन्हां फुगीर झगा, असा स्त्रीचा पोषाख असे. त्यांच्या कपड्याकरितां भरजरी मखमल, रेशमी कापड अगर साधें लोकरीचें कापड ऐपतीप्रमाणें वापरण्यात येई. त्यांच्या कॉलरी चुणीदार व कडक इस्त्रीच्या असत. कुरळे केस ठेवण्याचीही प्रथा होती. त्यावर मोठ्या चमत्कृतिजन्य टोप्याही स्त्रिया वापरीत. या टोप्यांवर उंचच उंच तुरेही वापरण्यांत येत; इतके कीं मेण्यांत बसलें तर मेण्याचें छत उघडें करावें लागे! पऱ्यांप्रमाणें आपली कांति सुंदर व्हावी म्हणून कांहीं तोंडाला व ओंठांना रंग लावीत व कानांत इयर-रिंग ऊर्फ कर्णभूषणें घालीत. त्या वेळच्या मुलांचे कपडे वडील मंडळींच्या सारखेच असत. एकंदरींत पोषाख चढविलेलीं मुलें ऐटबाज दिसत असत. घोट्यापर्यंत येणारे कोट, आंत साटणीचा सूट, पायांत पायमोजे व बूट असा मुलांचा साधारणपणें पोषाख असे. त्यांचे पायमोजे मात्र अत्यंत भपकेबाज असून खारोटीचे केस मुलांस आवडत असल्यानें, ते त्यांच्या अंगरख्यांस नेहमीं लावलेले असत.

६. **अन्न-खाद्यपेयें**:—स्टुअर्ट काळांत अन्न भाजून अगर शिजवून खात. पूर्वीप्रमाणेंच नानाविध रुचकर प्रकार दररोजच्या जेवणांत येत. व्यापाराच्या वाढीमुळें निरनिराळे पदार्थ व फळें इंग्लंडमध्यें येत. असें असूनही इंग्लिश लोक जबर मांस खाणारे होते. डुकर, बैल, ससे वगैरेंचें मांस नित्य खाल्लें जात असे. कोंबडीं, बदकें, पारवे वगैरे पक्ष्यांचें मांसही त्या काळीं खाल्लें जाई. भाज्यांमध्यें कोबी, मुळे, बटाटे, टर्निप, काकड्या व निरनिराळ्या पालेभाज्या वगैरेंचा उपयोग होत असे. फळांपैकीं स्ट्रॉबेरी, केळीं, सफरचंद, नारिंग, पीच, द्राक्षें वगैरे फळें इंग्लंडमध्यें खाल्लीं जात. धान्यांपैकीं ओट, बार्ली, गहूं, वाटाणा, तांदूळ, यांचा उपयोग होत असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंडीं, मासे, लोणी, चीज, मीठ, चरबीचीं तेलें वगैरेंचा उपयोग नेहमींच होई. त्यावेळच्या लोकांना मांस फार आवडे. फळें व भाज्या यापेक्षांही ते मासे व डुकराचें व बैलाचें मांस फार खात. पुडिंग या नांवाचा पदार्थ त्यावेळीं लोकांस फार आवडत होता. जेवणांत साखर फार उपयोगांत आणली जात होती. भाकरी व रोट्या निषिद्ध नसल्या तरी श्रीमंत लोक त्या फारशा खात नसत. जेवणाच्या वेळीं त्या ते फक्त कुरतडत व टाकून देत! गरिबांना ती मिळत नसे; मिळालीच तर ती फारच हलक्या दर्जाची व थोडी मिळे. हिंवाळ्यांत गुरें मारून व त्यांचें मांस खारवून तें उन्हाळ्यापर्यंत खाण्याची पद्धति यावेळींही चालू होती. सर्व जेवण हातांनीं करण्यापेक्षां कांटे-चमचे-सुऱ्या यांच्या साहाय्यानें होत असे. पाणी पिण्याकरितां कांचेचे पेले व जेवण्याकरितां चांदीच्या ताटल्या उपयोगांत येऊं लागल्या होत्या. रम, बीर, सायडर, जिन वगैरे दारूचे प्रकार जेवणाच्या वेळीं अगर इतर वेळींही घेण्यांत येत. गाईचें दूधही लोक पीत. स्टुअर्ट काळांत चहा, कॉफी, कोको वगैरे पेयांची चव लोकांना कळलेली होती व तीं पेयें पिण्याची प्रथा, विशेषतः श्रीमंतांत पडलेली होती. त्याच काळांत कॉफीगृहें व खानावळी सुरू झाल्यानें कांहीं कांहीं वेळां घरीं जेवण्यापेक्षां तेथें जेवणही सुरू झालें होतें. इंग्रज लोक सहसा दोनदां जेवीत. एकदां दुपारीं एक-दोन वाजतां व संध्याकाळीं सहा-सात वाजतां. सकाळीं न्याहारी व निजण्याच्या सुमारास फराळ होई तो निराळाच. विविध पदार्थ कसे तयार करावे यासंबंधीं पुस्तकेंही त्यावेळीं निघूं लागलीं होतीं. इंग्लिश पद्धतीच्या पदार्थांपेक्षां फ्रेंच व डच पद्धतीचे पदार्थ लोकांस फार आवडत.

७. खेळ–करमणूक:—स्टुअर्ट काळांत पहिल्या दोन राजांच्या कारकीर्दींत नाटकें, प्रहसनें व निरनिराळ्या प्रकारचे खेळ यांना बंदी नसल्यानें ते सर्व प्रकार नेहमींच चालत; पण क्रॉम्वेलच्या प्यूरिटन अमदानींत खेळांना व वरील प्रकारांना बंदी झाल्यानें ते सर्व प्रकार थांबले होते. दुसऱ्या चार्ल्सच्या कारकीर्दीपासून त्या सर्वांना पूर्ण मुभा मिळाली. त्यामुळें दुप्पट उत्साहानें लोक खेळ खेळूं लागले, नाटकें, प्रहसनें पाहूं लागले व निरनिराळे करमणुकीचे प्रकार मोठ्या आनंदांत होऊं लागले. राजाच रंगेल, त्यामुळें लोकही रंगेल बनले व त्यामुळें छानछोकी व रंगेलपणा यांना ऊत आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाटकगृहें पुन्हां चालू झालीं. यावेळच्या नाटकांचा विशेष म्हणजे स्त्रियांचीं कामें स्त्रियाच करूं लागल्या होत्या. एकट्या लंडनमध्यें त्यावेळीं पांच-सात नाटकगृहें होतीं; पण तीं लहान असत. आंतील बाजूस तीं उघडींच असत; तरी स्टुअर्ट काळांत त्यांत पुष्कळच सुधारणा झाल्या होत्या. या नाटकगृहांतून शेकस्पियर, बेन जॉन्सन, ब्रोमॉंट, फ्लेचर, वेब्स्टर, ड्रायडन, ॲडिसन वगैरे नाटककारांचीं नाटकें होत. 'मास्क' नामक तमाशेवजा खेळही त्यावेळीं लोकप्रिय झाला होता. या खेळांत नाच, गाणें व देखावे यांनाच प्राधान्य असे. मॉरिस नाच लोकांचीं मनें नित्यशः रिझवीत असे. वसंतागमनाच्या वेळीं 'मे' दिन मोठ्या आनंदानें साजरा केला जाई. त्यावेळीं नाच, खेळ, तमाशे वगैरेंना ऊत येई. वरीलप्रमाणेंच हॉकी, फुटबॉल, गोल्फ, बिलियर्डस्, स्केटिंग, पालमाल नामक एक प्रकारचा चेंडू-दांडूचा खेळ वगैरे लहान-मोठे खेळ सर्व लोक खेळत असत; पण त्यांतही टेनिसचा खेळ फारच लोकप्रिय होता. क्रिकेटला नुकतीच सुरुवात झाली होती. बैठ्या खेळांमध्यें पत्त्यांचा खेळही लोकांचा आवडता होता. रात्रंदिवस हा खेळ खेळण्यांत लोक दंग असत. या पत्त्यांच्या मागें अनेक प्रकारचीं चित्रें–विशेषतः मार्लबरोच्या पराक्रमांचीं चित्रें–काढलेलीं असत. जुगार खेळण्यांत स्त्रीपुरुष दंग असत. बुद्धिबळें, ड्राफ्ट वगैरे खेळही चालू होते. घोड्यांच्या शर्यती लोकांना आवडूं लागल्या होत्या. कोंबड्यांच्या झुंजी लोकांस आवडत. बैलांच्या टकरा व अस्वलांच्या झुंजी सुशिक्षितांस आवडेनाशा झाल्या असल्या तरी कनिष्ठ वर्गांतील लोकांस त्या आनंदवीत होत्या. इतक्या कीं अस्वलांच्या झुंजीकरितां मुद्दाम बागा तयार करण्यांत येत. निरनिराळ्या खेळांवर पैसे लावून ते खेळ खेळण्याची प्रत्येकास चटकच लागलेली होती. श्रीमंतांना शिकारीचा फार नाद असे. हरणें, डुकरें, पक्षी, ससे, लांडगे वगैरेंच्या शिकारी करणें त्यांना आवडे. नेमबाजीचा कांहींना शोक असल्यानें निशाणबाजीचें कौशल्य दाखविण्याचे सामनेही अनेक वेळां भरत. कुस्त्या, द्वंद्वयुद्धें व बॉक्सिंग सुरू होतें. खुलीं मैदानें व उद्यानें लोकांकरितां मुद्दाम राखून ठेवण्यांत येऊं लागलीं. श्रीमंत लोक चैन व हवापालट करण्याकरितां निरनिराळ्या ठिकाणीं मुद्दाम जात व तेथें चैन करीत. कॉफीगृहें तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करमणुकीचे, चेष्टा–विनोदाचे व गप्पांचे अड्डेच होते. तंबाखू ओढणें व तपकीर ओढणें शिष्टसंमत समजण्यांत येत होतें. प्रत्येक पुरुषाजवळ तपकिरीची डबी व स्त्रीच्या हातीं पंखा असणें हें त्यावेळीं भूषण मानलें जाई. स्त्रियाही विड्या व तपकीर ओढीत असत! दारूचे गुत्ते ठिकठिकाणीं असत व दारूचें व्यसन त्यावेळीं इतकें बोकाळलें होतें कीं, अनेकांना जलोदरासारखे रोग होऊन त्यांतच त्यांचा अंत होत असे. दारू-बंदीबद्दल कायदे करूनही लोकांचें दारूचें व्यसन बंद झालें नाहीं; कॉफी-पानामुळें काय थोडा आळा बसला असेल तेवढाच! अती दारू पिणारास व विकणारासही कडक शिक्षा अगर हद्दपारी मिळत असे. संगीताची अभि-रुचि लोकांस होती. गवयाच्या गाण्यापेक्षां वाद्यसंगीतच लोकांस त्या काळीं आनंदवीत असे. व्हर्जीनल, फिड्ल, सिटर्न, सनईसारखीं वाद्यें, ऑर्गन वगैरे निरनिराळ्या प्रकारचीं वाद्यें त्यावेळीं लोक वाजवीत असत. गरिबांना महागा-ईचीं वाद्यें विकत घेणें शक्य नसल्यानें ते फक्त गात. त्यावेळीं फ्रेंच संगीताची इंग्रजांना फार आवड उत्पन्न झाली होती व पुढें पुढें त्यांच्या संगीतावर जर्मन संगीताची छाप पडल्यानें इंग्रजी संगीत मागें पडूं लागलें होतें.



दारुड्यास होणारी शिक्षा

८. सडका–प्रवास :—त्यावेळीं प्रवासास सोइस्कर अशा सडका नव्हत्याच. या सडका त्या त्या खेड्याच्या जवळच्या शेतकऱ्यांना तयार कराव्या लागत. अर्थात् खडी टाकलेले रस्ते त्यावेळीं नव्हतेच. मोठमोठे धोंडे, दगड, वाळू व रेती यांचा रस्त्यांच्या कामीं उपयोग करण्यांत येत असे. सडकांना कुंपणें नसतच. त्यामुळें सडका वाईट असल्यास गाडीवाले शेतांची सरळ नासाडी करीत जात. पावसाळ्यांत पाऊस पडला म्हणजे जिकडे तिकडे नुसता चिखल होई; इतका कीं एखादे वेळीं सबंध गाडीच्या गाडी अगर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रवाशीही पुरला जाई! आणि पाऊस पुष्कळ पडला कीं या सडकांवरून इतकें पाणी होई कीं प्रवाशास पोहत जावें लागे! अशा तऱ्हेच्या सडकांवरून प्रवास करणें व तेंही पावसाळ्यांत, किती कष्टाचें व धोक्याचें असेल हें सहज ध्यानांत येईल. प्रवासास जर इतकी अडचण तर व्यापार कसा काय चालत असेल तें कल्पनेनेंच ठरविणें योग्य होईल! त्यामुळें लोक प्रवासास कंटाळत. अत्यंत जरूर पडलीच तर ते मोठ्या मुष्कीलीनें प्रवासास निघत. त्यावेळीं त्यांना मोठ्या कष्टानें दहा-बारा तासांत वीसपंचवीस मैल प्रवास व तोही गाडींतून करतां येई. ॲन राणीच्या नवऱ्यास एकदां नऊ मैल जायला सहा तास लागले होते! त्यावेळच्या सडकांवर मैलांचे दगड बसविलेले असत; परंतु मैलाचा दगड कधीं कधीं दीड मैलावरही बसविला जाई! सन १६७५ च्या सुमारास जॉन ऑजिल्बीनें सडकांची लांबी मोजण्याचें एक यंत्र शोधून काढलें व त्यामुळें मैलांचे दगड योग्य स्थळीं बसविणें शक्य झालें. या रस्त्यांवरून जाणाऱ्या गाड्या चौचाकी अगर दुचाकी असत. प्रवाशास पेंढ्यावर बसावें लागे. या गाड्यांबरोबर गाडीवान, त्याचे सशस्त्र साथीदार व इतर नोकर इतका सरंजाम असे. हा सरंजाम असण्याचें कारण म्हणजे



टोलनाक्याजवळील गाडी

त्यावेळीं या सडकांवरून चोऱ्या-माऱ्या नेहमीं होत. त्यामुळें प्रवास अत्यंत त्रासाचा होऊन प्रवासाहून सुखरूप आल्यावर जीव भांड्यांत पडल्यासारखें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होई ! चोर, दरवडेखोर या सडकांवर दबा धरून बसत व प्रवाशांवर हल्ला करून त्यांस लुबाडीत. त्यामुळें अशा चोरांना पकडून देणारास मोठमोठीं बक्षिसें लावण्यांत येत. लंडनच्या आजूबाजूस असे दरवडेखोर पुष्कळ होते. ते रानावनांत रहात. दुसऱ्या चार्ल्सच्या वेळीं सडकांसंबंधीं कायदे करण्यांत येऊन टोलनाकींही कांहीं रस्त्यावर बसविण्यांत आलीं. प्रत्येक गाडीकडून व व्यापाऱ्याकडून टोलजकात वसूल करण्यांत येऊं लागली व तिचा विनियोग सडकांची निगा राखण्याकडे होऊं लागला. या रस्त्यांवरून जनावरांचे कळपही जात. त्यांच्याकडूनही टोलजकात घेण्यांत येत असे. मोठमोठ्या सडकांवरून प्रवास दिवसाच होई; व रात्रीं सडकांवर असणाऱ्या खानावळींत वस्ती करण्यांत येई. तेथें घोडे बदलण्यांत येत व मग सकाळीं पुन्हां प्रवासास सुरुवात होई. या काळच्या खानावळी फारच चांगल्या असत व प्रवाशांच्या सुखसोयींकडे मालक उत्तम लक्ष देत. त्यामुळें त्या फारच लोकप्रिय



‘ सेडन ’ खुर्ची

झाल्या होत्या. टपालगाड्यांतून प्रवास करण्याकरितां लोकांची धडपड असे; कारण त्या जलद जात व त्यांतील प्रवास सुखकर होई. त्यांतल्या त्यांतही गाडीवानाजवळ बसण्याकरितां लोक उतावळे असत; कारण तो अनेक प्रकारच्या बातम्या सांगे व गप्पा मारून प्रवाशांचा प्रवास कंटाळवाणा होऊं देत नसे. व्यापारी लोक आपला माल चारचार सहासहा घोड्यांच्या गाड्यांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अगर भाड्याच्या घोड्यांच्या पाठीवरून नेत. मेण्यासारख्या 'सेडन' खुर्च्या त्याकाळीं मोठ्या शहरांतून श्रीमंत स्त्रिया वापरीत. त्या नेण्यास भोई लागत. त्यांतील प्रवास अत्यंत सौख्याचा होत असे.

९. शाळा-शिक्षण :—स्टुअर्ट काळांत शिक्षणाचें पाऊल पुढें पडूं लागलें होतें. खेड्यांत शिक्षणाचा फारसा प्रसार झालेला नव्हता; तरी पण पुढारलेल्या लोकांस शिक्षणाची खरी गोडी कळून चुकली होती. चांगली वागणूक व उत्तम चालीरीती अंगीं बाणल्या म्हणजे शिक्षणाचें कार्य झालें अशी त्यावेळीं समजूत होती. त्यावेळीं शाळांतील मुलें वसतिगृहांतच रहात. तेथें मुलें सकाळीं पांच वाजतां उठत, आपलें अंथरूण गुंडाळून खोलीचा केर काढीत व तोंडबींड धुऊन सहा वाजतां शाळेस जात. बिनपाठीच्या बाकांवर बसून ते लॅटिन भाषा शिकत, जांभया देत देत व भूक व थंडी यांशीं झगडत पाठांतर म्हणून दाखवून भाषांतराचे धडे करीत! नऊ वाजतां त्यांना न्याहारी मिळे व लगेच शाळा पुन्हां सुरू होऊन ती बारा वाजतां संपे. जेवणानंतर शाळा पुन्हां दोन वाजतां सुरू होऊन पांच वाजतां बंद होई. सहा ते सातपर्यंत वरच्या वर्गातील विद्यार्थी खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांकडून दुसऱ्या दिवशींचा अभ्यास करून घेत. नंतर तासभर खेळून मुलें आठ वाजतां निजत. साधारणतः त्यावेळच्या शाळा आपल्याकडील प्राचीनकाळच्या आश्रमासारख्या असत व सर्व मुलें वसतिगृहांत राहून अभ्यास करीत. शिक्षकांच्या अगर वरिष्ठांच्या आज्ञा त्यांना मानाव्या लागत व तसें न केल्यास त्यांस 'बर्च'नें कडक शिक्षा करण्यांत येई. मुलें गोट्या, लंगडी, हूप, फुटबॉल, पालमाल, क्रिकेट वगैरे खेळ खेळत. क्रिसमसची सुटी थोडी असे; तरी उन्हाळ्याची सुटी मोठी असे. खाजगी शाळाही पुष्कळ असत; तरी पण 'पब्लिक स्कूल्स'कडे

स्टुअर्ट काळांतील मुलें : मुलीच्या डाव्या हातांत काय आहे ? तें धुळाक्षरांचें पुस्तक आहे. त्याला 'हॉर्न बुक' असें म्हणत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीमंतांचा ओढा पुष्कळ होता. त्यावेळीं वाचनाची आवड लोकांत वाढलेली होती व पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरेंचा खप पुष्कळ होत होता. शाळेचा अभ्यासक्रम संपल्यावर साधारणपणें पंधराव्या वर्षी मुलगा विश्व-विद्यालयांतील अभ्यासाकडे वळे. तेथील अभ्यासक्रम झाल्यावर विद्यार्थी परकीय देशांतही विद्याभ्यासास जात असत. ईटन, हॅरो, विंचेस्टर वगैरे 'पब्लिक स्कूल्स' व ऑक्सफर्ड व केंब्रिज विश्वविद्यालयें फार प्रसिद्ध होतीं. मुलींच्या शिक्षणासही सुरुवात झालेली होती व त्यांच्याकरितां स्वतंत्र शाळाही स्थापन होऊं लागल्या होत्या. या शाळांतून नाचणें, गाणें, व्हर्जीनल व फिडल वाजविणें, रंग करणें, काचांवर रंगीत चित्रें काढणें, पक्वान्नें व इतर खाद्य वस्तू तयार करणें, शिवणें–टिपणें, कशिदा काढणें वगैरे प्रकारचें शिक्षण मुलींना देण्यांत येत असे. मुलींना नाचतां येणें आवश्यक ठरे; नाहीं-तर त्यांचें एखादे वेळीं लग्नही न होण्याची भीति असे! मुलांना लॅटिन, ग्रीक, फ्रेंच वगैरे भाषांचें शिक्षण व धार्मिक शिक्षण आवश्यक असे व हें शिक्षण कधीं कधीं वयाच्या दुसऱ्या वर्षीही सुरू होई! गरिबांच्या शिक्षणाची सोय जवळ जवळ मुळींच नव्हती. एखाद्या संस्थेनें फंड उभारून खेड्यांत शाळा सुरू केलीच तर त्या खेड्यांतील मुलांची सोय होई. वसतिगृहांत राहणाऱ्या आपल्या मुलांस आईबाप अनेक वस्तु पाठवीत असत. त्यांत खाद्य वस्तु, पुस्तकें, जोडे, घोडे वगैरे वस्तु असत. त्याचप्रमाणें खेड्यांतील लोक शहरांत राहून शिकणाऱ्या आपल्या मुलांस सुटींत घरीं येतेवेळीं अनेक वस्तु खरीदून आणण्यास सांगत. अशा वस्तूंमध्यें कंगवे, टोप्या, लेसेस, आलेपाक, पिसें वगैरे वस्तु नेहमीं असत.

१०. **वाङ्मय व वाङ्मयसेवक**:—स्टुअर्ट काळांत मोठमोठे लेखक निर्माण झाले व उत्तम वाङ्मयही निर्माण झालें. शेक्स्पियर सन १६१६ मध्यें मेला. त्याचीं उत्तमोत्तम नाटकें पहिल्या जेम्सच्या कारकीर्दी-तच लिहिलीं गेलीं. त्याच्या खालोखाल जगांत उत्तम कवि म्हणून प्रसिद्धी पावलेला जॉन मिल्टन होय. त्याचा जन्म १६०८ मध्यें झाला व तो सन १६७४ मध्यें मेला. तो एका नक्कलकारकुनाचा मुलगा. केंब्रिजला त्याचें सर्व शिक्षण झालें. त्यानंतर इटलीमध्यें तो रहात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतांच यादवी युद्धास सुरुवात झाली. त्यावेळीं तो इंग्लंडांत परतला.

जॉन मिल्टन

आपला मुलगा उत्तम धर्मगुरु व्हावा अशी मिल्टनच्या बापाची इच्छा होती; परंतु मिल्टनला तें पसंत न पडून तो राजकारणामध्यें पडला. क्रॉम्वेलचा तो चिटणीस होता. त्याचा प्यूरिटन पंथाकडे ओढा होता. धार्मिक, सामाजिक व इतर बाबतींत लोकांस स्वातंत्र्य असावें असें त्याचें म्हणणें असे. अती वाचनानें व श्रमानें त्याचे डोळे गेले होते. तत्पूर्वीच त्यानें 'अलेग्रो' 'पेन्सेरेसो' व 'ल्युसिडस' हीं काव्यें लिहिलीं होतीं. आंधळा झाल्यावर दुसऱ्या चार्ल्सच्या वेळीं त्यानें 'पॅराडाइज लॉस्ट' व 'पॅराडाइज रीगेन्ड' लिहून प्रसिद्ध केलीं. एलिझाबेथचा मुख्य न्यायाधीश व प्रसिद्ध तत्त्ववेत्ता लॉर्ड बेकन (१५६१–१६२६) हाही एक मोठा ग्रंथकार पहिल्या जेम्सच्या कारकीर्दीत मृत्यु पावला. 'विद्येची प्रगति' या नांवाचा त्याचा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. जॉन बन्यन (१६२८–१६८८) हा मोठा लेखक होऊन गेला. तो प्यूरिटनपंथीय असून 'प्रगतिपथावरील यात्रेकरू' हा त्याचा ग्रंथ अत्यंत लोकप्रिय होता. या ग्रंथाच्या दहा वर्षांत एक लाख प्रती खपल्या. त्यानें आपलीं धर्ममतें सोडण्याचें नाकारल्यामुळें त्याला अनेक वर्षें तुरुंगांत पडावें लागलें. तेथेंच त्यानें वरील ग्रंथ लिहिला. जॉन ड्रायडन (१६३१–१७००) हाही एक उत्तम कवि, टीकाकार व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जॉन बन्यन

सॅम्युअल पेप्स

नाटककार होऊन गेला. त्याचें काव्य लोकांस फारच आवडलें. तो राजकवि होता व त्याचा कल राजाकडे असे. सॅम्युअल पेप्स (१६३३–१७०३) हा लेखक त्यावेळीं प्रसिद्धी पावला. त्यानें त्याच्या काळची डायरी लिहून ठेविली आहे. तिच्यावरून त्यावेळची बरीच माहिती कळते. त्याचीं वर्णनें हुबेहूब व वस्तुस्थितीस धरून असत. जॉन हॉब्ज (१५८८–१६७९) हा एक मोठा तत्त्वज्ञानी व मानसशास्त्रज्ञ होऊन गेला. राजाची अनियंत्रित सत्ता त्याला मान्य होती. 'लेव्हिॲथन' हा त्याचा उत्कृष्ट ग्रंथ होय. जॉन लॉक (१६३२–१७०४) हाही एक तत्त्वज्ञानी लेखक होऊन गेला. शिक्षणशास्त्रांत त्यानें आपलीं मतें जाहीर केलीं. ज्ञानेंद्रियांकडूनच आपल्याला ज्ञान मिळतें असें तो मानीत असे. राजाची नियंत्रित सत्ता त्याला मान्य होती. फ्रॅन्सिस बोमंट (१५८४–१६१६) व जॉन फ्रेचर (१५०९–१६२५) हे दोघे उत्कृष्ट नाटककार होऊन गेले. जोसेफ ॲडिसन (१६७२–१७१९) यानें टॅटलर, स्पेक्टेटर व गार्डियन वगैरे वर्तमानपत्रांत निबंध लिहून उत्तम निबंधकार म्हणून कीर्ति मिळविली. किंबहुना त्या पत्रांचा तो प्राणच होता. इंग्रजी भाषेला शुद्ध व सुंदर वळण देण्याची कामगिरी त्यानें केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रिचर्ड स्टील (१६७२–१७२९) हाही उत्तम निबंधकार होऊन गेला. टॅटलर, स्पेक्टेटर व गार्डियन वगैरे पत्रांतही तो निबंध लिहीत असे. त्यानेंही इंग्रजी भाषेला नवीन वळण दिलें. वरील सर्व ग्रंथकारांनीं ज्ञानगंगा लोकांच्या जवळ आणून ज्ञानाचें पान करण्यास त्यांस शिकविलें. या काळांतील उत्कृष्ट काव्य व वाङ्मयग्रंथ आजही सर्वमान्य आहेत.

११. कलाविकास :—उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीप्रमाणेंच त्याकाळच्या लोकांचें लक्ष शिल्पकला, चित्रकला, संगीत वगैरेकडे होतें. त्यामुळें त्या बाबतींतही पुष्कळच प्रगति झाली होती. त्याकाळचा अग्रगण्य शिल्पशास्त्री म्हणजे सर क्रिस्टॉफर रेन होय. त्यानें बांधलेल्या सर्वच इमारती मोठ्या प्रमाणबद्ध व कलापूर्ण असत. त्याच्या इमारतींचे मनोरे व शिखरांचे घुमट अत्यंत चित्ताकर्षक आहेत. पहिल्या चार्ल्सच्या कारकीर्दींत अनेक परकीय चित्रकार इंग्लंडांत आले होते. त्यांत बेल्जममधील पॉल रूबेन्स (१५७७–१६४०) हा एक नामांकित चित्रकार होऊन गेला. त्याचें रंगकाम अत्यंत मनोवेधक होतें. मानवी कृतींतील उत्साह व जोम तो आपल्या कृतींत उत्तम वठवी. तरी भावनाविष्कार त्याला फारसा साधत नसे. त्याचा शिष्य अँटनी व्हॅनडाइक (१५९९–१६४१) पहिल्या चार्ल्सचा आश्रित होता. त्यानें काढलेलीं अनेक चित्रें अजूनही इंग्लंडांत पहावयास मिळतात. सर पीटर लेली (१६१८–१६८०) हा इंग्लंडमध्यें सुमारें चाळीस वर्षें होता. त्याचीं चित्रेंही चांगलीं असत. त्यानंतर गॉडफ्रे नेलर (१६४६–१७२३) हा उत्तम चितारी व गिब्न्स (१६४८–१७२१) हा लाकडीं चित्रें कोरणारा कलावंत हे दोघेही इंग्लंडमध्यें बरेच दिवस रहात असत. संगीताच्या बाबतींतही हेन्री पर्सेल (१६५८–१६९५) व जॉर्ज हॅंडेल (१६८५–१७५९) यांनीं उत्कृष्ट कामगिरी केली. हे दोघेही उत्तम संगीतास योग्य अशीं गाणीं बसवीत. तीं त्यावेळीं फारच लोकप्रिय झालीं होतीं. पर्सेल यानें इटालियन पद्धतीवर 'ऑपेरा' नामक संगीतगृहांची स्थापना केली होती. तीच परंपरा हॅंडेलनेंही पुढें चालू ठेवून त्यांत बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या. धर्ममंदिरांतील संगीतांत या दोघांनींही पुष्कळ सुधारणा करून त्याला गोंडस स्वरूप दिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. शिक्षा व त्यांचे प्रकार :—या काळांत अनेक प्रकारच्या कडक शिक्षा देण्यांत येत. सध्यांच्या शिक्षांची त्या काळच्या शिक्षांशीं कोणत्याही प्रकारांनीं तुलना होणेंच शक्य नाहीं. देहदंड हा नित्याचाच होता; परंतु अनेक प्रकारच्या लहानसहान गुन्ह्यांसही फाशीची शिक्षा ठेवण्यांत आलेली होती. चेटकें करणारांस देहान्ताचीही शिक्षा देण्यांत येई. कर्ज-दाराला, खुनी-दरोडेखोर समजून, शिक्षा देण्यांत येई. मानखोडे, हातखोडे, पायखोडे, बोटखोडे, चालत्या गाडीच्या मागें बांधून चाबकानें मारणें, फटके मारणें हे प्रकार तर नित्याचेच असत. प्रार्थनेच्या वेळीं दारू पिणें, कुजकीं फळें अगर वाईट रोट्या अगर वाईट जिन्नस विकणें, गिऱ्हाइकांस फसवून वाईट माल देणें, खोटें बोलणें वगैरे सर्व प्रकार गुन्हे समजून त्याकरितां निरनिराळ्या प्रकारचे खोडे देण्यांत येत. वठणीवर आणण्याकरितां नाठाळ नोकरांना व भांडकुदळ माणसांना खोड्यांत ठेवीत. या शिक्षेला न भिणारे, खोड्यांत असतांही एकमेकांस लाथा मारण्यास कमी करीत नसत! दारुड्यांस हद्दपार करून कैदी अगर गुलाम म्हणून अमेरिकेंत पाठवीत व तेही कायमचे. पांच वर्षांनंतर त्यांस स्वतंत्र करीत. त्या वेळच्या शिक्षा अती क्रूर असत; तरीही गुन्हेगार गुन्हे करण्याचें सोडीत नसत.



वाईट रोट्या विकणाऱ्यास अशी शिक्षा होई.

याला 'डकिंग स्टूल' असें म्हणत. शिव्या देणाऱ्या अगर वडबड करणाऱ्या स्त्रियांस अशी शिक्षा होई.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. स्टुअर्टकालीन घरांसंबंधीं माहिती सांगा. नवीं घरें कोणत्या पद्धतीनें बांधीत ?
२. स्टुअर्ट काळांतील लंडनच्या शहरांतून आपण जात आहोंत अशी कल्पना करून लंडनमध्यें तुम्हांस दिसून येणाऱ्या चमत्कृतिजन्य गोष्टी वर्णा.
३. स्टुअर्ट काळीं लोक कोणते खेळ खेळत ? त्यांच्या करमणुकीचीं साधनें कोणतीं ?
४. त्या काळच्या लोकांच्या कपड्यांसंबंधीं वर्णनें द्या.
५. त्यावेळचीं मुलें कोणत्या शाळांतून जात ? त्यांचा अभ्यासक्रम कसा असे ?
६. स्टुअर्ट काळांतील खेडवळाचा व शहरवासीयाचा आयुष्यक्रम सांगा. त्यांत फरक कोणते होते ?
७. स्टुअर्ट काळांतील शेतकऱ्याचें जीवन वर्णन करा. त्यानें तुम्हांस जेवण्याकरितां कोणते जिन्नस दिले असते ? श्रीमंतानें कोणते दिले असते ?
८. सतराव्या शतकांतील वाङ्मयसेवकांसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.
९. त्या वेळच्या सडकांवरून तुम्ही प्रवास करीत आहांत अशी कल्पना करून तुम्हांस येणाऱ्या अनुभवांचें वर्णन करा.
१०. त्याकाळीं कोणत्या प्रकारच्या शिक्षा देत ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्टुअर्ट राजघराणें १६०४–१७१४

पहिला जेम्स (१६०३–१६२५)
जन्म १५६६; मृत्यु १६२५



पहिला चार्ल्स १६२५–१६४९
जन्म १६००; दीर्घ पार्लमेंटनें फाशीं दिलें १६४९

इंग्लंडांत लोकशाही
क्रॉमवेल (१६४९–१६५८)
जन्म १५९९; मृत्यु १६५८

दुसरा चार्ल्स (१६६०–१६८५)
जन्म १६३०; मृत्यु १६८५



दुसरा जेम्स (१६८५–१६८८)
जन्म १६३३; राज्यत्याग १६८८; मृत्यु १७०१

विल्यम व मेरी (१६८९–१७०२)
जन्म १६५०; मृत्यु १७०२ घोड्यावरून पडून.
मेरी : जन्म १६६२; मृत्यु १६९४

ॲन (१७०२–१७१४)
जन्म १६६५; मृत्यु १७१४



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श : १६०३–१७१४

राजे	लढाया	कायदे	धार्मिक गोष्टी	महत्त्वाच्या गोष्टी	प्रमुख व्यक्ति	हिंदुस्थान
पहिला जेम्स १६०३–१६२५	त्रिंशद्वार्षिक युद्ध १६१८–४८		हँ. कोर्ट स. १६०४ बाय. भाषां. १६११ पिल्. फाद. १६२०	बेटचें प्रकरण १६०६ पार्लमेंट उडवूनदेण्याचा कट १६०५ रॅलेला फाशीं १६१८	बकिंगहॅमचा ड्यूक, बेकन, सर टॉमस् रो, शेक्स्पियर, तुकाराम	जहांगीर १६०५–१६२७ सर टॉमस रो हिंदुस्थानास आ. १६१५
पहिला चार्ल्स १६२५–१६४९	फ्रा. युद्ध १६२७ स्कॉ. यु. १६३९ यादवी युद्ध १६४०–४९ मार्स्ट-ल. १६४४ नेसबी ल. १६४५	हक्क मागणीचा अर्ज १६२८ तक्रारींचा खलीता १६४१	आमूलग्र फरकाचा कायदा १६४१ स्टारचेंबर कोर्ट रद्द १६४१ उत्तरेकडील मंडळ रद्द १६४१	नौकाकर १६३४ दीर्घ पा. १६४०–६० स्ट्रॅफर्डला फाशीं १६४१ चार्ल्सला फाशीं १६४९	लॉड, स्ट्रॅफर्ड, पिम, हॅम्पडन क्रॉम्वेल, ईलियट, शिवाजी	शिवाजीची राज्य-स्थापना १६४६ शहाजहान, १६२७–१६५८
लोकशाही क्रॉम्वेल १६४९–५८	डनबारची लढाई १६५० वूर्स्टरची लढाई १६५१ हॉ. युद्ध १६५२ स्पे. यु. १६५६	घटनापत्रक १६५३ नौकानिर्बंधाचा कायदा १६५१	रवीवारीं प्रा. सक्ती. खेळ, उत्सव, नाच. वगैरे प्रकार बंद. धर्मस्वातंत्र्य होतें. प्यूरिटन पंथास महत्त्व.	राजसत्ता व उमराव मंडळ रद्द १६४९ रम्पची हकालप. १६५३ इंग्लंडमध्यें सुभेदार पद्धति १६५५	जॉन मिल्टन, सेनापति मंक, शिवाजी, औरंगजेब	अफजलखानाचा वध १६५९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजे	लढाया	कायदे	धार्मिक गोष्टी	महत्त्वाच्या गोष्टी	प्रमुख व्यक्ति	हिंदुस्थान
दुसरा चार्ल्स १६६०–१६८५	हॉलंडशीं युद्ध १६६५ हॉलंडशीं दुसरें युद्ध १६७२	एकरूप. का. १६६२ व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा १६७९ वा. रद्दीचें बिल १६८१	क्लॅ. कोड १६६१–१६६५सव. जाहीर. १६७२ धर्म कसो. का. १६७३	अग्निप्रलय १६६६ प्लेग १६६७ डोव्हरचा तह १६७०	क्लॅरेंडन, डॅन्बी, मिल्टन, टायटस ओ., शिवाजी, औरंगजेब, शॅफ्टस्बरी,	औरंगजेब १६५८–१७०७, शिवाजीस राज्याभिषेक १६७४
दुसरा जेम्स १६८५–१६८८	मन्मथचें बंड १६८५ सेजमूरची लढाई १६८५		सवलतींचा जाहीरनामा १६८७ हायकमिशन कोर्ट. स्थापना १६८६	हेल्सचें प्रकरण १६८६ सात बिशपांचा अर्ज १६८८	हेल्स, विल्यम, संभाजी, मन्मथ, जेफ्रेज, औरंगजेब,	संभाजी १६८०–८९
तिसरा विल्यम व मेरी १६८९–१७०२	फ्रान्सशीं युद्ध १६८९ लिमरिकचा वेढा १६९१	हक्कांचा का. १६८९ त्रैवार्षिक निवडणुकीचा का. १६९४ इं. वार. काय. १७०१	धर्मस्वातंत्र्याचा कायदा १६८९	ग्लेंकोची कत्तल १६९२ इंग्लंडच्या बँकेची स्थापना १६९४	चौदावा लुई, औरंगजेब, राजाराम, संदरलंड, न्यूटन,	राजारामाचा मृत्यु १७००
राणी ॲन १७०२–१७१४	स्पॅनिश वा. युद्ध १७०२–१७१३ ब्लेनहिम १७०४ रॅमिलीजची लढाई १७०६	इंग्लंड व स्कॉटलंड यांच्या एकीकरणाचा कायदा १७०७	डॉ. सॅचेव्हरल प्रकरण १७१०	जिब्रॉल्टरचा पाडाव १७०४ युट्रेक्टचा तह १७१३	हार्ले, सेंट जॉन, मार्लबरो, ॲडिसन, स्टील.	बाळाजी विश्वनाथ पेशवा १७१४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वंशवृक्ष — हॅनोव्हर घराणें

- पहिला जॉर्ज (१७१४–१७२७)
  - दुसरा जॉर्ज (१७२७–१७६०)
    - फ्रेडरिक (मृ. १७५१)
      - तिसरा जॉर्ज (१७६०–१८२०)
        - चौथा जॉर्ज (१८२०–३०)
        - फ्रेडरिक
        - चौथा विल्यम (१८३०–३७)
        - एडवर्ड-केंटचा ड्यूक
          - व्हिक्टोरिया (१८३७–१९०१)
    - कंबरलंडचा ड्यूक–विल्यम
  - सोफिया × फ्रेडरिक-प्रशियाचा राजा
    - थोर फ्रेडरिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हॅनोव्हर घराणें

१५. व्हिग लोकांचा कारभार–स्टॅनहोप, टाऊनशेंड व वॉलपोल

१. पहिला जॉर्ज (१७१४–१७२७) **स्वभाव**:—सन १७०१ च्या वारशाच्या कायद्यानें ठरवून दिल्याप्रमाणें ॲन राणीच्या मृत्यूनंतर सोफियाचा मुलगा व हॅनोव्हरचा राजपुत्र पहिला जॉर्ज इंग्लंडच्या गादीवर बसला. त्यावेळीं त्याचें वय चौपन्न वर्षांचें होतें. त्याचा जन्म सन १६६० मध्यें झाला. त्याचें सर्व शिक्षण जर्मनींतच झालेलें होतें. स्टुअर्ट राजांच्या ठिकाणीं दिसून येणारें राजतेज त्याच्या ठिकाणीं नव्हतें व तो राजा म्हणून शोभतही नव्हता. तो देखणा नव्हता. जॉर्ज राजवैभवाचा तिटकारा करी. रस्त्यानें जात असतां आपली प्रजा आपला सत्कार करील म्हणून तो आडरस्त्यानें जाई! तो उत्तम लढवय्या होता, काटकसरीनें वागणारा होता व आपल्या मित्रांस तो कधींही विसरत नसे; इतकें असलें तरी त्याचा आचरटपणा, त्याची निर्बुद्ध वागणूक व गांवढळ भाषा यांमुळें तो लोकांस आवडत नसे. इंग्रजी भाषेचा तर त्याला गंधही नव्हता; इंग्रजी चालीरीतींना तो पारखा होता. यामुळें इंग्लंडबद्दल व तेथील लोकांबद्दल त्याला फारसें प्रेम वाटत नसे. त्याचें सर्व लक्ष हॅनोव्हरवर खिळलेलें होतें व जर्मन लोक–विशेषतः स्त्रिया–त्याला फार आवडत. अंगमेहनती, कष्टाळू, मनमिळाऊ व साध्या चालचलणुकीचा असूनही तो लोकांच्या आदरास पात्र झाला नाहीं. त्याचें वैवाहिक जीवन सुखाचें नव्हतें. बदफैली म्हणून आपल्या बायकोशीं

पहिला जॉर्ज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें काडीमोड केला होता. त्यानंतर त्याला बाहेरख्यालीपणाचा नाद लागला. त्याच्या मुलाचें व त्याचें पटत नसे. यामुळेंही तो संसाराला विटलेला होता. शांततेचा तो उपासक होता. इंग्लिश लोकांनीं त्याला चालवून घेतलें, त्याचें मुख्य कारण म्हणजे त्यानें सर्व राज्यसूत्रें आपल्या प्रधानांच्या हातीं दिलीं व तो राजकारणपराङ्मुख बनला. आणि इंग्लंडलाही अशाच तऱ्हेचा राजा पाहिजे होता. एरवीं पक्षनिष्ठ राजकारण व प्रधानमंडळात्मक राज्यपद्धति यांची इंग्लंडमध्यें इतक्या लवकर वाढ झालीच नसती. व्हिग लोकांमुळें आपल्याला इंग्लंडचें राज्य मिळालें असें जॉर्ज मानीत होता व त्यामुळें त्यानें स्टॅनहोप, टाऊनशेंड, हॅलिफॅक्स, वॉलपोल वगैरे व्हिग पुढाऱ्यांचेंच मंत्रिमंडळ नेमलें.

२. **व्हिग मंत्रिमंडळाची सुरुवातीची कामगिरी** :—व्हिग मंत्रिमंडळ स्थापलें गेलें त्यामुळें आपली धडगत नाहीं असें टोरीपक्षांतील लोकांस वाटत होतेंच. सन १७१५ मध्यें सार्वत्रिक निवडणुकी झाल्या, त्यांतही व्हिग लोकांचीच सरशी झाली; त्यामुळें व्हिग मंत्रिमंडळाचें बळ वाढलें. हानिकारक असा युट्रेक्टचा तह करून टोरींनीं इंग्लंडचें नुकसान केलें असें व्हिग म्हणत असत; तसेंच त्यांचा स्टुअर्टांकडे ओढा असून दुसऱ्या जेम्सला इंग्लंडची गादी मिळवून देण्याचा त्यांचा मनोदय होता. त्याकरितां त्यांच्यावर खटला भरून पार्लमेंटपुढें टोरींची चौकशी व्हावी असें व्हिग पुढाऱ्यांचें मत होतें. ही कुणकूण कानीं येतांच बोलिंगब्रोक व ऑर्मंड फ्रान्सला पळून गेले. हार्ले ऊर्फ ऑक्सफर्डचा अर्ल हा एकटाच इंग्लंडमध्यें राहिला. त्याच्यावर खटला होऊन त्याला लंडनच्या टॉवरमध्यें कैदेंत ठेवण्यांत आलें. पळून गेलेल्या टोरींविरुद्ध खटले भरण्यांत येऊन त्यांच्या गैरहजेरींतही त्यांना शिक्षा ठोठावण्यांत आल्या. अशा रीतीनें पहिल्या जॉर्जच्या कारकीर्दीच्या सुरुवातीस व्हिगांच्या हातीं जी सत्ता आली ती पुढें सुमारें पन्नास वर्षें टिकली. जे टोरी फ्रान्समध्यें पळून गेले ते व्हिगांचे कट्टे वैरी बनले व त्यांनीं जेम्स स्टुअर्टला मनोभावें मिळण्याचें ठरविलें; त्याप्रमाणें ते त्याला मिळालेही. त्यांच्या सहानुभूतीनेंच तोतया जेम्स स्टुअर्टनें इंग्लंडांत बंड उभारण्याचें ठरविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. सन १७१५ चें जॅकोबाईट बंड :—सन १७१५ मध्यें पार्लमेंटची निवडणूक झाली. त्यावेळीं इंग्लंडांत अनेक दंगे सुरू झाले. टोरींचा होत असलेला छळही लोकांस पहावेना. त्यामुळें त्यांच्याबद्दलही अनेकांस सहानुभूति वाटूं लागली व त्यांस व्हिगांचा तिटकारा येऊं लागला. या लोकांनीं टोरींबद्दल सहानुभूति दाखविण्याकरितां ठिकठिकाणीं दंगे करण्यास सुरुवात केली. तेव्हां सरकारनें सन १७१५ मध्यें एक कायदा केला; त्या कायद्यान्वयें बारा इसमांहून अधिक लोक एकत्र जमले व त्यामुळें सार्वजनिक शांततेस धोका पोंचतो असें मॅजिस्ट्रेटला वाटलें तर त्या लोकांचा जमाव मोडून टाकण्याचा त्याला अधिकार देण्यांत आला. लोकांचा जमाव शांततेच्या मार्गांनीं मोडला नाहीं तर गोळीबार करूनही लोकांस हुसकावून लावण्याचा अधिकार वरील कायद्यानें मॅजिस्ट्रेटला मिळाल्यानें दंगे थांबूं लागले; परंतु ती वादळापूर्वीची शांतता ठरली. कारण त्यानंतर सन १७१५ मध्यें एक मोठें जॅकोबाईट बंड इंग्लंडांत उत्पन्न झालें. जेम्सचे अनुयायी जॅकोबाईट या नांवानें उल्लेखिले जात व त्यांनीं जेम्सला इंग्लंडची गादी मिळावी म्हणून जें बंड केलें त्याला जॅकोबाईट बंड असें म्हणतात. दुसरा जेम्स सन १७०१ मध्येंच वारला होता. त्याचा मुलगा जेम्स. त्याला इंग्लंडचा राजा तिसरा जेम्स असें जॅकोबाईट व टोरी संबोधीत असत. खुद्द इंग्लंडमधील लोकांस पहिला जॉर्ज, राजा म्हणून आवडत नव्हता. या गोष्टीचा फायदा जॅकोबाईट लोक घेणार होते. तरी खुद्द इंग्लंडांत त्यांना पाठिंबा मिळेलसें वाटत नव्हतें. इंग्लंड व



ब्रिटिश बेटें १७१४–१७४५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्कॉटलंड यांचें एकीकरण झालें असलें तरी त्याबद्दल स्कॉटिश लोक मनांतून जळफळत होते. या गोष्टीचाही फायदा घेण्याचें ठरवून चौदाव्या लुईच्या मदतीनें जेम्स–ज्याला इंग्लिश लोक तोतया जेम्स असें म्हणत–स्कॉटलंडांत उतरला. त्याच्या अगोदरच त्याचा सेनापति मारचा अर्ल मोठ्या सैन्या-निशीं स्कॉटलंडांत उतरला होता व तेथें त्यानें जेम्सच्या नांवानें द्वाही फिरविली. अनेक असंतुष्ट स्कॉटिश लोक त्याला मिळाले व त्यांनीं डर्वेंट-वॉटर, फॉर्स्टर वगैरेंच्या मदतीनें बंड उभारलें. ही बातमी लागतांच अर्गा-इलचा ड्यूक आपल्या सैन्यासह बंडवाल्यांवर चालून गेला. शेरीफमूर व प्रेस्टन येथील दोन्ही लढायांमध्यें बंडवाल्यांचा पूर्ण पराभव होऊन तोत-याला मारसह फ्रान्समध्यें पळून जाणें भाग पडलें. पहिलें जॅकोबाईट बंड अशा तऱ्हेनें मोडलें. डर्वेंटवॉटर, फॉर्स्टर वगैरे पुढाऱ्यांस पकडून फाशीं देण्यांत आलें. हॅनोव्हर राजवंशाचें इंग्लंडांतील आसन स्थिर झालें व प्रॉटेस्टंटां-शिवाय इतरांस इंग्लंडची गादी मिळण्याची आशा कायमची नष्ट पावली.

४. सप्तवार्षिक कायदा (१७१६):—या बंडाचा आणखी एक मह-त्त्वाचा परिणाम म्हणजे सप्तवार्षिक कायदा होय. सन १६९४ च्या त्रैवार्षिक निवडणुकीच्या कायद्यानुसार पार्लमेंटची नवी निवडणूक सन १७१७ मध्यें होणें जरूर होतें. त्या वर्षी ती झाली तर टोरी लोक बहुमतानें निवडून येतील व मग ते इंग्लंडमध्यें स्टुअर्ट राजघराणें स्थापण्याचा पुन्हां प्रयत्न करतील अशी व्हिग प्रधानमंडळाला भीति वाटत होती. ही भीति दूर करण्याकरितांच सप्तवार्षिक कायदा सन १७१६ मध्यें पास करण्यांत येऊन पार्लमेंटची निवडणूक दर सात वर्षांनीं व्हावी असें ठरविण्यांत आलें. हा कायदा तात्पुरता म्हणून पास झाला होता; परंतु तो पुढें रद्द करण्यांत न आल्यानें सन १९११ पर्यंत तसाच चालू राहिला. सप्तवार्षिक कायदा पास झाल्यानें सरकारी धोरण स्थिर राहूं लागलें, राजा व उमरावमंडळ यांच्यापासून कॉमन्स सभेला फटकून राहतां येऊं लागलें व व्हिग लोकांच्या हातीं निदान सात वर्षें सत्ता राहणार असल्यानें हॅनोव्हर घराणें त्या काळापर्यंत खात्रीनें टिकणार असें सर्वांस वाटूं लागलें आणि खुद्द कॉमन्स सभा आपल्या ताब्यांत रहावी म्हणून मंत्रिमंडळ कॉमन्स सभेच्या सभासदांस लांच देऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांस वश करून घेऊं लागलें! कारण आपण सात वर्षें पार्लमेंटमध्यें राहणार या हेतूनें सभासद बेफिकीरीनें व स्वतंत्रपणें वागूं लागले होते. अर्थात् त्यांच्याकडून लांच देऊन काम करून घेणें हा एकच उपाय होता.

५. सरदारी-नियंत्रण बिल (१७१९):—सप्तवार्षिक कायदा पास झाल्यानें कॉमन्स सभा बरीच स्वतंत्र झाली, हें उमरावमंडळांतील लोकांस सहन झालें नाहीं. तशांतच उमरावमंडळांत यावेळीं व्हिगपक्षाचें बहुमत होतें, तें जाऊं नये अशी त्या पक्षांतील उमरावांची इच्छा होती. या गोष्टी लक्षांत धरून लॉर्ड संदरलंड व स्टॅनहोप यांनीं उमरावमंडळांत सरदारी-नियंत्रण बिल मांडून तें पासही करून घेतलें (१७१९). उमराव निर्माण करण्याच्या राजाच्या सार्वभौम हक्कावर नियंत्रण घालणें हा या बिलाचा मुख्य उद्देश होता. त्या बिलांत खालील गोष्टी होत्या. एकशें अठ्याहत्तर सभासद उमरावमंडळांत होते. त्यांत राजानें यापुढें फक्त सहांचीच नवी भर घालावी; मात्र राजकुटुंबीयांस राजानें केव्हांही सरदारक्या देण्यास हरकत नसावी. निर्वंश झालेला असल्यास राजानें त्या सरदारक्या पुरुष वारस-दारांसच द्याव्या व निवडून आलेल्या सोळा स्कॉटिश उमरावांच्याऐवजीं पंचवीस पिढीजाद उमराव स्कॉटलंडतर्फे उमरावमंडळांत असावेत. वरील बिल उमरावमंडळानें तावडतोब पास केलें; परंतु तें कॉमन्ससभेच्या संमती-करितां आलें, त्यावेळीं मोठ्या खडाजंगीनंतर तें फेंटाळण्यांत आलें. विरोध करणारांत सर रॉबर्ट वॉलपोल हा प्रमुख होता. स्वमतसमर्थनार्थ त्यानें तीन प्रमुख कारणें सांगितलीं. पहिलें म्हणजे तें बिल पास झाल्यास राजाच्या अधिकारावर नियंत्रण बसलें असतें; दुसरें असें कीं उमरावमंडळ डोईजड व स्वतंत्र झाल्यानें कॉमन्स सभा व उमरावमंडळ यांचे एकसारखे खटके उडाले असते; तिसरें असें कीं योग्य कामगिरीनंतर स्वकर्तृत्वानें पुढें येणाऱ्या लोकांस यापुढें सरदारक्या मिळणें मुष्कीलीचें झालें असतें. वस्तुतः पाहतां युट्रेक्टच्या तहाच्या वेळीं हार्लेनें बारा नवे सरदार निर्माण करून घेऊन टोरींचें मताधिक्य उमरावमंडळांत स्थापन केलें होतें. ही गोष्ट वर्मी लागूनच व्हिग लोकांनीं हें बिल मांडलें होतें. शिवाय जॉर्ज राजा परकीयांसही सरदारक्या देईल हीही त्यांस भीति वाटत होती. परंतु वॉलपोलच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जोरदार विरोधामुळें हें बिल फेटाळलें गेलें व त्यामुळें त्यांचें उद्दिष्ट साध्य झालें नाहीं.

६. स्पेनविरुद्ध त्रिवर्गांचा संघ:—सरदारी-नियंत्रण बिलाच्या आधींच एक मोठी घटना घडून आली होती. युट्रेक्टचा तह ज्याप्रमाणें व्हिग लोकांस पसंत नव्हता, त्याचप्रमाणें तो युरोपांतील अनेक राजांसही पसंत नव्हता. इंग्लंडचे सहकारी रागावल्यामुळें इंग्लंडला युरोपांत मित्रराष्ट्र उरलेंच नाहीं. त्यांतच सन १७१५ मध्यें फ्रान्सचा महत्त्वाकांक्षी राजा चौदावा लुई वारल्यानें युरोपियन राजकारणांत धुसफूस सुरू झाली. त्याच्यामागून त्याचा अल्पवयी पणतू पंधरावा लुई फ्रान्सच्या गादीवर बसला. ही गोष्ट स्पेनचा राजा पांचवा फिलिप याला रुचली नाहीं व युट्रेक्टच्या तहाप्रमाणें फ्रेंच गादीवरील सर्व हक्क त्यानें सोडले असूनही, तो फ्रान्सच्या गादीवर आपला हक्क सांगूं लागला. तसेंच युट्रेक्टच्या तहानें नेपल्स, सार्डीनिया, जिब्रॉल्टर, मिनोर्का, सिसिली, नेदरलंड वगैरे आपले गेलेले भाग परत मिळविण्याची त्याची इच्छा होती. त्याचा मुख्य प्रधान आल्बेरूणी इंग्लंडचा द्वेष करणारा होता. त्यानें थोडें थांबण्याचा सल्ला फिलिपला दिला होता. परंतु फिलिपला गप्प राहवलें नाहीं. त्यानें स्वीडनच्या राजाला आपल्या बाजूला वळवून घेतलें. हॅनोव्हरच्या राजानें आपल्या राज्यापैकीं ब्रेमेन व व्हर्डन हे प्रांत बळकावून घेतले होते असा त्याचा ग्रह झालेला होता. त्यामुळें इंग्लंडबद्दलही त्याचें मन बिथरलें होतें. अर्थात् त्यावेळीं इंग्लंडविरुद्ध स्पेन व स्वीडन हीं दोन्हीं राष्ट्रें संगनमत करताहेत असें पाहून स्टॅनहोपनें स्पेनविरुद्ध इंग्लंड, फ्रान्स व हॉलंड या राष्ट्रांचा एक संघ घडवून आणला (१७१७). यामुळें युरोपियन युद्ध पुन्हां उद्भवेल असें वाटल्यानें वॉलपोल व टाऊनशेंड यांनीं प्रधानमंडळांतून आपलें अंग काढून घेतलें. पुढें या संघांत जर्मन बादशहाही सामील झाला (१७१८). त्यामुळें या संघाचें महत्त्व व बलही वाढलें.

७. स्पेनशीं युद्ध (१७१८-१७२०):—सन १७१८ मध्यें स्पेनच्या राजानें सार्डीनिया व सिसिली जिंकून घेऊन युद्धास सुरुवात केली. त्याबरोबर बिंग या दर्यासारंगाच्या नेतृत्वाखालीं इंग्लिश आरमाराचा एक काफिला स्पॅनिश आरमारावर पाठविण्यांत आला. इटलीच्या दक्षिणेस असलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पॅझॅरो भूशिराजवळ लढाई होऊन स्पॅनिशांचा पराभव झाला. स्वीडनच्या बाजूलाही इंग्लिश आरमाराचा आणखी एक काफिला धाडण्यांत आला होता. याच वेळीं अल्बेरूणीला राजीनामा देणें भाग पडलें. शेवटीं सन १७२० मध्यें लंडन येथें तह होऊन हें युद्ध संपलें. ह्या तहानें फिलिपनें वरील संघांत सामील होण्याचें कबूल केल्यानें युट्रेक्टच्या तहास त्यानें आपली पुनरपि संमति दिल्यासारखें झालें. हें युद्ध चालू असतां जॅकोबाईट लोकांस मदत करण्याच्या हेतूनें स्कॉटलंडमध्यें स्पॅनिश सैन्य उतरलें होतें; परंतु त्याचा पराभव झाला. स्वीडनचा राजा बारावा चार्ल्सही जॅकोबाईटांस मदत करणार होता. परंतु तो प्रत्यक्षपणें युद्धांत पडण्यापूर्वींच त्याचा खून झाल्यानें त्याचे सर्व बेत जागच्याजागीं राहिले! यावेळीं फ्रान्स व इंग्लंडची गट्टी जमली ती पुढें सुमारें तीस वर्षें टिकली.

८. राष्ट्रीय कर्ज व साऊथ सी कंपनी :—या युद्धाचे ढग विरतात न विरतात तोंच एक नवीनच आपत्ति इंग्लंडवर कोसळली. तो प्रकार असा. सन १७११ मध्यें हार्लेनें साऊथ सी कंपनी, पार्लमेंटच्या संमतीनें स्थापन केली होती. पॅसिफिक महासागरांतील प्रदेशांशीं व दक्षिण अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील प्रदेशांशीं व्यापार करून अपार संपत्ति मिळविण्याच्या हेतूनें ही कंपनी स्थापन झाली होती. युट्रेक्टच्या तहानें मिळालेल्या सवलतीहि सरकारनें याच कंपनीला दिल्या होत्या. यामुळें या कंपनीची चांगलीच भरभराट झाली होती व आपला व्यापार जास्त वाढावा व तो वाढविण्यास सरकारनें आपल्याला मदत करावी अशी कंपनीच्या भागीदारांची इच्छा होती. सरकारही यावेळीं मोठ्या फिकिरींत होतें. कारण त्यावेळीं राष्ट्रीय कर्जाची रक्कम वाढतां वाढतां सुमारें पांच कोट पौंडांपर्यंत वाढत गेलेली होती. सरकारचें वार्षिक उत्पन्न केवळ ऐंशी लाख पौंड होतें व त्यांतूनच दरसाल सुमारें तीस लाख पौंड राष्ट्रीय कर्जावरील व्याजापायीं खर्च होत. यामुळें हें कर्ज वारलें नाहीं तर राष्ट्राची भरभराट होणार नाहीं असें सरकारला वाटत होतें. अशा पेंचांत सरकार पडलें असतां साऊथ सी कंपनीनें राष्ट्रीय कर्जासंबंधीं एक योजना सरकारकडे पाठवून दिली (१७१९). सरकारनें जास्त सवलती दिल्यास कंपनी खालील गोष्टी करण्यास तयार होती. (१) कंपनीनें सर्व राष्ट्रीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्जाची व त्यावरील व्याजाची जबाबदारी घ्यावी. (२) कर्जावरील व्याजाचा दर पूर्वी पांच, सहा, सात, आठ असा निरनिराळ्या प्रकारचा होता. त्याच्याऐवजीं तो सरसकट फक्त पांचच असावा व सन १७२७ नंतर तो चार करण्यांत यावा. (३) सरकारच्या सावकारांनीं कंपनीचे शेअर विकत घ्यावे. ज्यानें जितके पौंड सरकारला कर्जाऊ दिले असतील तितक्या किंमतीचे कंपनीचे शेअर प्रत्येकानें घ्यावे व तसें करण्यास तयार नसतील त्यांची सर्व रक्कम कंपनीनें परत करावी. (४) कंपनीनें सरकारला पंच्याहत्तर लक्ष पौंड द्यावे. कंपनीची ही योजना सरकारला पसंत पडली व पार्लमेंटनेंही त्या योजनेस आपली संमति दिली. कारण सरकारला सालीना निदान दहा लाख पौंडांची बचत करतां येऊन राष्ट्रीय कर्जाच्या आपत्तींतून इंग्लंड सुटणार होतें. खुद्द कंपनीचाही या योजनेनें फायदाच होणार होता. तेव्हां पार्लमेंटनें कंपनीच्या योजनेला संमति दिल्याचें ऐकल्याबरोबर सगळ्यांच्या उड्या कंपनीच्या शेअरवर भराभर पडूं लागल्या. त्यांतच पन्नास टक्के नफा देण्याचें कंपनीनें जाहीर केल्यामुळें शेअर विकत घेण्याकरितां कंपनीच्या दारापुढें झुंबड माजूं लागून मारामाऱ्याही होऊं लागल्या! त्यामुळें कंपनीच्या मूळच्या शंभर पौंड किंमतीच्या शेअरची किंमत एकदम हजारावर गेली!!

९. **बुडबुड्या कंपन्यांचा बोजवारा** :—हळूहळू कंपनीचे शेअर विकत मिळेनासे झाले. त्यामुळें केवळ फायद्याकडे दृष्टि ठेवून शेअर विकत घेणाऱ्यांची तीव्र निराशा झाली. देशांतील या परिस्थितीचा फायदा घेण्याचें अनेक लबाड व बनेल लोकांनीं ठरविलें! लगेच अनेक कंपन्या निरनिराळ्या कारणांकरितां स्थापन होऊं लागून इंग्लंडमध्यें बुडबुड्या कंपन्यांचें पेंवच फुटलें! समुद्राचें पाणी गोड करून त्यापासून सोनें निर्माण करण्याकरितां एक कंपनी स्थापन झाली! स्पेनमधील गाढवें इंग्लंडमध्यें आणण्याकरितां दुसरी; तर पाऱ्यापासून सोनें तयार करणारी तिसरी कंपनी निघाली. अखंड गतीचें एक यंत्र शोधून काढण्याकरितां चौथी कंपनी स्थापन झाली. पांचव्या कंपनीच्या डायरेक्टरांनीं निर्लज्जपणें जाहीर केलें कीं, "आमच्या कंपनीचा उद्देश नंतर जाहीर करण्यांत येईल. आमच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उद्योगांत आम्हांस 'न भूतो न भविष्यति' असा फायदा होणार असल्यानें प्रत्येकानें फक्त दोन पौंड देऊन शंभराचा शेअर घेऊन जावा!" याही कंपनीचे शेअर उडाले व त्यांचे पैसे घेऊन त्या कंपनीचा डायरेक्टर पळून गेला!! इतर अनेक कंपन्यांचे शेअरही अतोनात खपले. आपण पैसे कशाकरितां देतों हेंही कोणीं पाहिलें नाहीं. अनेकांनीं शेअरचे पैसे लंबे करून स्वतःचीं उखळें पांढरीं करून घेतलीं; अनेक परदेशीं निघून गेले. यामुळें साऊथ सी कंपनीला चांगलीच ठोकर बसूं लागल्यानें तिनें अनेक बुडबुड्या कंपन्यांवर फिर्यादीही केल्या. वरील सर्व कंपन्यांना पार्लमेंटची मंजूरी नव्हती. त्या बेकायदेशीर होत्या. अर्थात् त्यांच्यावर फिर्यादी झाल्यानें त्यांचें सत्य स्वरूप बाहेर येऊं लागलें. त्यामुळें साऊथ सी कंपनीच्या भागीदारांसही आपल्या कंपनीबद्दल संशय येऊं लागला. होतां होतां त्या कंपनीच्या शेअरचीही किंमत भराभर उतरूं लागली व ती एकशें पस्तीसपर्यंत घटली. त्याच वेळीं कंपनीचा खजीनदार रॉबर्ट नाईट एकाएकीं पळून गेला! ही बातमी कळतांच सर्व घाबरून गेले. कंपनीचें दिवाळें निघणार असें कळतांच सर्वांस जोराचा धक्का बसला. अनेक लोक बुडाले व अनेक कुटुंबांची वाताहात झाली. या सर्व बोजवाऱ्याच्या बुडाशीं प्रधानमंडळांतीलही लोक आहेत असें ज्यावेळीं उघडकीस आलें त्यावेळीं त्यांची चौकशी करण्याची भाषा सुरू झाली. ठिकठिकाणीं सभा होऊन सरकारचा व मंत्रिमंडळाचा निषेध होऊं लागला. यामुळें स्टॅनहोपला जोराचा धक्का बसून तो पक्षघातानें मरण पावला; संदरलंडनें राजीनामा दिला. वरील दोघेही निर्दोषी होते. मात्र मंत्रिमंडळांतील अनेक प्रधान दोषी सांपडल्यानें त्यांना शिक्षा ठोठावण्यांत आल्या.

१०. वॉलपोलची उपाययोजना:—वरील सर्व गोष्टींमुळें साऊथ सी कंपनीचें फारसें नुकसान झालेलें नव्हतें व बाकीच्या कंपन्यांचीं जशीं दिवाळीं निघालीं होतीं तसें या कंपनीचें दिवाळें निघालेलें नव्हतें व उत्तरोत्तर तिची भरभराटच होत होती. परंतु त्या वेळच्या परिस्थितींतून लोकांची सुटका करणें अत्यंत आवश्यक होतें. स्टॅनहोप व संदरलंड यांचें मंत्रिमंडळ नष्ट झाल्यावर सर रॉबर्ट वॉलपोलनें मंत्रिमंडळ बनवून राष्ट्रीय आपत्तींतून लोकांस सोडविण्याकरितां त्यानें खालील उपाययोजना केली. (१) साऊथ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सी कंपनीच्या डायरेक्टरांची जिंदगी जप्त करावी व ती भागीदारांमध्यें वांटून टाकावी. (२) तसेंच त्या कंपनीचे ९० लक्ष पौंडांचे शेअर 'बँक ऑफ इंग्लंडनें' व नऊ लक्षांचे 'ईस्ट इंडिया कंपनीनें' विकत घ्यावे व कांहीं सरकारनें घ्यावे. (३) अशा तऱ्हेनें जी रक्कम जमेल ती कंपनीच्या भागीदारांत वांटून टाकावी. (४) खुद्द कंपनीला सत्तर लाखांचें सरकारी देणें व राष्ट्रीय कर्जावरील आठ लाख व्याज माफ करण्यांत यावें. (५) सरकारनें राष्ट्रीय कर्जाची जबाबदारी पूर्वींप्रमाणें आपल्याकडे घ्यावी. वॉल-पोलची ही योजना राजालाही पसंत पडली. त्या योजनेप्रमाणें कंपनीच्या भागीदारांस त्यांच्या शेअरच्या एकतृतीयांश भाग मिळाला. खुद्द वॉल-पोलनें या कंपनीचे अनेक शेअर विकत घेतले होते व त्यांची हजारापर्यंत किंमत वाढली असतां ते सर्व विकून अपार संपत्ति मिळविली होती, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे! एकंदरींत वॉलपोलच्या योजनेमुळें देशांतील असंतोष कमी झाला; लोक त्याला दुवा देऊं लागले. परंतु त्यामुळें इंग्लंडची जी पत गेली ती भरून येण्यास पुष्कळच अवधि लागला.

११. सर रॉबर्ट वॉलपोल :—वरील आपत्तींतून देशास सोडविणारा वॉलपोल नॉर्फोक परगण्यांतील एका जमीनदाराच्या कुळांत हूटन गांवीं सन १६७६ मध्यें जन्मला. प्रसिद्ध ईटन शाळेंत व पुढें केंब्रिजला त्याचें सर्व शिक्षण झालें. लहानपणीं तो मोठा मेहनती नसला तरी त्याच्या बुद्धीची चमक व तिचा तल्लखपणा सर्वांस विदित झाला होता. अस्खलित वक्ता म्हणूनही त्याची शाळा-कॉलेजांत प्रसिद्धी झालेली होती. त्याच्या शिक्षकांसही त्याच्याबद्दल अभिमान वाटत असे. सन १६९८ मध्यें तो आपल्या जहागिरीची व्यवस्था पाहूं लागला. सन १७०० मध्यें पार्लमेंटमध्यें

रॉबर्ट वॉलपोल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो प्रथमतः निवडून आला; त्याच वेळीं त्यानें आपल्या पक्षांतील लोकांस भारून टाकलें. पुढें सन १७०८ मध्यें तो मार्लबरोचा चिटणीस झाला. त्यावेळीं लांच खाल्ल्याच्या आरोपावरून मार्लबरोबरोबर त्यालाही तुरुंगांत जावें लागलें होतें. त्याच्यावरील हा आरोप खोटाच होता, त्यामुळें पुढें त्याची तुरुंगांतून सुटका झाली. पहिला जॉर्ज राजा झाल्यावर व्हिगपक्षाच्या हातीं राज्याचीं सर्व सूत्रें आलीं. त्यावरोबर वॉलपोललाही महत्त्व चढलें. पहिल्या जॅकोबाईट बंडाच्या वेळीं त्यानें उत्कृष्ट कामगिरी करून बरीच कीर्ति मिळविली होती. त्यामुळें त्याला फडणिसाची जागा देण्यांत आली होती; परंतु स्पेनच्या बाबतींतील प्रधानमंडळाचें धोरण त्याला पसंत नसल्यानें त्यानें व त्याचा मेहुणा टाऊनशेंड यानेंही त्या प्रधानमंडळांतून आपलें अंग काढून घेतलें. सरदारी-नियंत्रण बिलाच्या वेळची व विशेषतः साऊथ सी कंपनीच्या वेळची त्याची कामगिरी लक्षांत घेऊन स्टॅनहोपच्या मृत्यूनंतर जॉर्जनें त्याला आपला मुख्य प्रधान नेमलें (१७२१). वॉलपोलचें खाजगी आचरण तितकेंसें शुद्ध नव्हतें. खेडेगांवांत जन्म गेल्यानें त्याला संगीत, वाङ्मय व विद्या यांची मुळींच आवड नव्हती. त्याची वागणूकही रानवट असे ! लांचलुचपतीचा तो उघड उघड पुरस्कार करी. ‘ द्रव्यानें सर्व वश होतात ’ असें त्याचें ठाम मत होतें. अधिकाराचाही तो लोभी होता. अंगीं दोष असूनही वॉलपोल उत्तम मुत्सद्दी ठरला, त्याचीं कारणेंही तशींच आहेत. तो कामांत कधींही कसूर करीत नसे. माणसाची पारख उत्तम असल्यामुळें कोणतें काम कोणाकडून करून घ्यावें हें त्याला चांगलें समजे. त्याचें प्रभावी वक्तृत्व व युक्तीनें काम करण्याची त्याची हातोटी अप्रतिम होती. त्याचें प्रत्येक काम पद्धतशीर होत असे. अत्यंत चाणाक्ष व हुषार असल्यानें त्याची दुसऱ्यावर सहज छाप पडे. हजरजबाबीपणा व व्यवहारचातुर्य यामुळेंही तो लोकांस सहज वश करून घेत असे. आपलें उद्दिष्ट साध्य करून घेण्याकरितां नमतें घेण्याचीही त्याची सदैव तयारी असे. एकंदरींत त्यावेळीं राष्ट्राला पाहिजे होता तसाच मुत्सद्दी मिळाला.

१२. वॉलपोलचें प्रधानमंडळ (१७२१):—सन १७२१ मध्यें वॉलपोल मुख्य प्रधान झाला. ‘ मुख्य प्रधान ’ हें पद या वेळेपर्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अस्तित्वांत नव्हतें व कायद्यानेंही त्याला मान्यता दिली नव्हती. खुद्द वॉल-पोलही स्वतःला मुख्य प्रधान म्हणवून घेत नव्हता. परंतु त्याला पक्कें माहीत होतें कीं तो व्हिगपक्षाचा पुढारी व नेता होता. मुख्य प्रधानाची जागा अस्तित्वांत येणें जरूर आहे असेंही त्याला वाटत होतें. कसेंही असलें तरी त्याला इंग्लंडचा पहिला मुख्य प्रधान मानण्याची वहिवाट पडलेली आहे. वॉलपोल सुमारें वीस वर्षें इंग्लंडचा मुख्य प्रधान राहिला. त्याला त्याची हुषारी व लायकी हीं कारणीभूत होतींच, परंतु मुख्य म्हणजे त्याला राजाचा व दरबारचा पूर्णपणें पाठिंबा होता. सर्व राष्ट्राचाही तो लाल होता! शिवाय स्वतः लांच न घेतां पदव्या देऊन, बहुमानाचे बिल्ले व पदकें देऊन, मोठ्या पगाराच्या जागा देऊन अगर प्रत्यक्ष लांच देऊन तो लोकांना नेहमीं खूष ठेवीत असे. या सर्व उपायांचा अवलंब करून त्यानें स्वतःचा पक्ष बलवान केला व शिवाय पार्लमेंटही आपल्या बाजूला वळवून घेतली. ज्यांच्याशीं पटणार नाहीं त्यांना त्यानें युक्तीनें दूर केलें व आपल्याला विरोध करणार नाहींत अशीं माणसें त्यानें जवळ केलीं. त्याला विरोध झाला नाहीं असें नाहीं; उलट दरवर्षी तो वाढतच गेला व त्यामुळेंच त्याला राजीनामा देऊन राजकारणांतून अंग काढून घ्यावें लागलें. वॉलपोलनें आपल्या पहिल्या प्रधानमंडळांत टाऊनशेंड, पूलटने, कार्टरेट, न्यूकासल वगैरे व्हिग-पक्षीय लोक नेमले. हे सर्व लोक प्रथमतः वॉलपोलचे चाहते होते व ते सर्व वॉलपोलची योग्यता ओळखून होते. सुधारणा कराव्या, परंतु त्या सावकाश व विरोध होणार नाहीं अशा बेतानें कराव्या, असें त्याचें मत होतें. परराष्ट्रीय बाबतींत अलिप्तपणाच्या धोरणाचा तो कट्टा पुरस्कर्ता होता. मात्र जॅको-बाईट बंडाला वाव देतां कामा नये असें त्याला वाटे.

१३. जॅकोबाईट कट (१७२२):—वॉलपोलनें कारभार हातीं घेतला त्यानंतर थोड्याच दिवसांत जॅकोबाईट लोकांनीं इंग्लंडमध्यें रचलेला एक कट उघडकीस आला. साऊथ सी कंपनीचा बोजवारा उडालेला होता व त्यामुळें देशांत सर्वत्र अशांतता उत्पन्न झाली होती. याचा फायदा घेण्याच्या हेतूनेंच हा कट रचण्यांत आला. तसेंच राजा जॉर्ज लोकप्रिय नाहीं अशी जॅकोबाईटांची समजूत होती. त्यांतच तोतया जेम्सला याच वेळीं मुलगा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्यानेंही ते लोक आनंदित झाले होते. अशा स्थितींतच तोतया जेम्सनें जॉर्ज राजाला पत्र लिहून कळविलें कीं 'माझ्यासाठीं इंग्लंडचें राजपद तूं सोडशील तर मी तुला हॅनोव्हरचा राजा हा किताब देईन.' या सर्व गोष्टी वॉलपोलला कळल्या. तेव्हां त्यानें शोध करण्यास सुरुवात केली. शोधानंतर रॉचेस्टरचा बिशप ॲटरबरी याच्या नेतृत्वाखालीं जॅकोबाईटांनीं एक कट रचल्याचें उघडकीस आलें. तेव्हां त्याला पकडून हद्दपार करण्यांत आलें. त्यामुळें तो कट मोडला व जॅकोबाईटांची कंबरच मोडली. त्यानंतर जॅकोबाईटांचा एक पुरस्कर्ता लॉर्ड बोलिंगब्रोक याला वॉलपोलनें इंग्लंडांत परत येण्याची मोकळीक दिली; मात्र उमरावमंडळांत बसण्याची त्याच्यावर बंदी होती ती त्यानें उठविली नाहीं. बोलिंगब्रोकनें वॉलपोलच्या उपकाराची फेड वॉलपोलच्या विरोधी पक्षास मिळून व त्याच्यावर एकसारखी टीका करून केली हें लक्षांत धरण्यासारखें आहे.

१४. वॉलपोल व आयर्लंड :—पॉयनिंग्जचा कायदा झाल्यापासून आयरिश पार्लमेंट स्वतंत्र नव्हतीच. त्यांतच सन १७१९ मध्यें आयर्लंडसंबंधीं कायदे करण्याचा अधिकार इंग्लिश पार्लमेंटला देण्यांत आला. अर्थात आयरिश पार्लमेंटसभा बेगडी सभा झाली. यामुळें आयरिश लोक रागावले होते. पुढें सन १७२२ मध्यें वॉलपोलनें वुड नांवाच्या एका लोहाराला आयर्लंडकरितां सुमारें एक लक्ष पौंड किंमतीचीं पेन्सचीं व अर्धा पेन्सचीं तांब्याचीं नाणीं तयार करण्याचें कंत्राट दिलें. या बाबतींत त्यानें आयरिश लोकांस मुळींच विचारलेलें नव्हतें. त्यामुळें आयरिश लोक जास्त खवळले व त्यांनीं त्या कंत्राटाविरुद्ध जोराची चळवळ सुरू केली. खुद्द इंग्लंडमध्यें त्यांच्या बाजूनें डीन स्विफ्ट या टोरी गृहस्थानें 'ड्रेपियर' या टोपण नांवाखालीं वॉलपोलवर टीकेची झोड उठविली. त्यामुळें आयरिश चळवळीला जास्तच चेतना मिळून ती अधिकच तीव्र झाली. सर्व प्रकरण इतक्या थरावर गेलेलें पाहून वॉलपोलनें आपल्या स्वभावास अनुसरून पड खाल्ली व वुडला दिलेला मक्ता त्यानें रद्द केला. त्यामुळें आयर्लंडांत शांतता निर्माण झाली. सन १७२७ मध्यें पूर्वीं कॅथॉलिकांस असलेला मतदानाचा अधिकार काढून घेऊन, मतदानाचा हक्क व पार्लमेंटमध्यें बसण्याचा अधिकार फक्त आयरिश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रॉटेस्टंटांसच ठेवण्यांत आला. यामुळें आयरिश पार्लमेंटमध्यें केवळ प्रॉटेस्टंटांचाच भरणा होऊं लागल्यानें आयर्लंडांतील फक्त एकतृतीयांश आयरिश लोकांचेच प्रतिनिधि बसूं लागले. ही गोष्टही आयरिशांस पसंत पडली नाहीं.

१५. वॉलपोलला विरोध :—सन १७२४ मध्यें वॉलपोल व कॉर्टरेट यांच्यामध्यें फ्रान्ससंबंधाच्या धोरणाबद्दल मतभेद होऊन कॉर्टरेटनें आपल्या प्रधानकीचा राजीनामा दिला. पुढच्याच वर्षी पूलटनेनेंही कांहीं कारणावरून तेंच केलें. प्रधानमंडळांतून निघाल्यावर तो गप्प बसला नाहीं. त्यानें एक विरोधी पक्ष स्थापून वॉलपोलला एकसारखा विरोध करण्यास सुरुवात केली. अधिकारारूढ पक्षाला विरोध करणारा असा एखादा पक्ष त्यावेळेपर्यंत पार्लमेंटमध्यें नव्हताच. पूलटनेनें स्थापन केलेला विरोधीपक्ष पहिलाच होय. पूलटनेनें लॉर्ड बोलिंगब्रोकचें साहाय्य घेण्याचें ठरविलें. पुढें त्या पक्षांत अनेक असंतुष्ट व्हिगही मिळाले. अशा तऱ्हेनें आपला पक्ष बलवान करून पूलटने व बोलिंगब्रोक यांनीं वॉलपोलवर टीकेची सरबत्ती उडविण्यास सुरुवात केली. 'क्रॅफ्टसमन' या नांवाच्या वर्तमानपत्रांत वॉलपोलच्या मंत्रिमंडळावर कुत्सित टीका करण्याचें बोलिंगब्रोकनें ठरवून वॉलपोलच्या चांगल्या अगर वाईट कृत्यावर जळजळीत टीका करण्याचा त्यानें सपाटा चालविला. या पक्षाचे लोक आपल्याला 'देशभक्त' म्हणवीत. या देशभक्तांचें राजपुत्र जॉर्ज याच्याशीं संगनमत होतें. त्याची भरपूर स्तुति करावी व आपलें हित साधून घ्यावें असा बोलिंगब्रोक व पूलटने यांचा विचार होता. तो पुढें राजा झाल्यास त्याच्या मदतीनें वॉलपोलला अधिकारभ्रष्ट करतां येईल असाही त्यांचा डाव होता; परंतु तो फसला.

१६. वॉलपोलचें आर्थिक धोरण :—वॉलपोल खुल्या व्यापाराचा पुरस्कर्ता होता; त्यामुळें व्यापारावरील नियंत्रणें काढल्यास देशाचा व्यापार वाढेल व देशांत संपत्ति खेळूं लागेल असें त्याचें मत होतें. तेव्हां सन १७२४ मध्यें त्यानें एक योजना सुरू केली. इतके दिवस परदेशाहून येणाऱ्या मालावर बंदरावरच जकात घेण्यांत येत असे. सर्व मालावर एकदम जकात देणें व्यापाऱ्यांस परवडत नसे व त्यामुळें व्यापाऱ्यांची कुचंबणा होई. ही गोष्ट लक्षांत घेऊन वॉलपोलनें बंदरावरच सरकारतर्फें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठमोठ्या वखारी बांधवून घेऊन, त्यांमध्यें व्यापाऱ्यांनीं आपला माल सांठवून ठेवावा व जेवढा माल देशांत विक्रीकरितां नेण्यांत येईल तेवढ्यावर जकात द्यावी असें ठरविलें. त्याच्या योजनेप्रमाणें प्रथमतः चहा व कॉफी सरकारमान्य वखारींत व्यापाऱ्यांनीं सांठवावी असें ठरलें; व ही योजना यशस्वी झाल्यास ती इतर जिन्नसांस लागू करावी असा त्याचा बेत होता. चहा व कॉफी यांच्याबद्दलची वरील योजना व्यापाऱ्यांस आवडली. इतके दिवस जकात चुकविण्याकरितां चहा व कॉफीचा चोरून होणारा व्यापारही थांबला व सरकारचें जकातीचें उत्पन्नही वाढलें. व्यापाऱ्यांची कुचंबणा थांबून त्यांच्या व्यापारास उत्तेजनही मिळूं लागलें.

१७. वॉलपोलचें परराष्ट्रीय धोरण:—इंग्लंडचा व्यापार वाढला पाहिजे व इंग्लंडचे उद्योगधंदे जोरांत चालून इंग्लिश माल परदेशीं मोठ्या प्रमाणावर पाठवितां आला पाहिजे असें वॉलपोलचें धोरण होतें. या धोरणाला पोषक असें परराष्ट्रीय धोरण स्वीकारणें योग्य होय असें त्याचें मत होतें व त्याकरितां परराष्ट्रीय राजकारणांत निष्कारण पडून युद्धापायीं पाण्यासारखा पैसा खर्च करण्याच्या तो विरुद्ध होता. इंग्लंडच्या पूर्व वैभवाला मारक होणार नाहीं असें धोरण स्वीकारणेंच योग्य होय असें ठरवून त्यानें परराष्ट्रीय बाबतींत अलिप्तपणाचें धोरण स्वीकारलें व तें यशस्वी करून दाखविलें. सन १७२० मध्यें लंडनचा तह झाला तरी स्पेनचा राजा पांचवा फिलिप स्वस्थ नव्हता. इटलींतील आपले गेलेले प्रांत परत मिळवावे व डॉन कॅरलॉस व डॉन फिलिप या आपल्या मुलांना ते मिळावे असा त्याचा विचार चालला होता. त्याकरितां ऑस्ट्रियाचा बादशाह सहावा चार्ल्स याच्याशीं सहमत करावें म्हणून त्यानें लॉर्ड रिपर्टाला त्याच्याकडे बोलणें करण्याकरितां पाठविलें होतें. त्या बादशहास मराया थेरिसा नांवाची एकच मुलगी होती व आपल्या पाठीमागें तिला ऑस्ट्रियाचें राज्य मिळावें अशी त्याची इच्छा होती. तेव्हां ब्रिटन व फ्रान्स यांच्या धोरणास विटलेल्या चार्ल्सनें रिपर्टाचें स्वागत करून स्पेनशीं सख्य जोडण्याच्या हेतूनें सन १७२५ मध्यें स्पेनशीं व्हिएन्ना येथें तह केला. या तहानें जिब्रॉल्टर व मिनोर्का ब्रिटनकडून स्पेनला परत मिळवून देण्याचें चार्ल्सनें कबूल केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसेंच डॉन कॅरलॉसचा पार्मावरील वारसा चार्ल्सनें मान्य केला व फिलिपनें मराया थेरिसाचा ऑस्ट्रियावरील वारसा मान्य केला. या तहाची बातमी वॉलपोलला कळतांच त्यानें फ्रान्सचा मुख्य प्रधान कार्डिनल फ्ल्यूरी याच्याशीं संधान बांधलें व सन १७२७ मध्यें हॅनोव्हरचा तह घडवून आणून इंग्लंड, फ्रान्स व रशिया या त्रिराष्ट्रांचा एक बलवान संघ निर्माण केला. त्यानंतर हॉलंड, स्वीडन व डेन्मार्क हीं राष्ट्रेंही त्या संघांत सामील झालीं. हा संघ व्हिएन्नाच्या तहाला उत्तर म्हणूनच बनविण्यांत आला होता. तेव्हां ती बातमी पोंचतांच फिलिपनें जिब्रॉल्टरवर हल्लाही केला; युद्ध चिघळूं देऊं नये असें वॉलपोलचें मत असल्यानें शेवटीं सन १७२९ मध्यें तह होऊन युद्ध संपलें. चार्ल्स व फिलिप यांचें मात्र बिनसलें !

१८. पहिल्या जॉर्जचा मृत्यु :—वरील भानगडी चालू असतांच पहिला जॉर्ज हॅनोव्हर प्रांतांत प्रवास करीत असतां गाडींतच पक्षघाताचा झटका येऊन मरण पावला (१७२७). राजकारणांतून त्यानें आपलें अंग काढून घेऊन सर्व कारभार त्यानें आपल्या प्रधानांवर सोंपविला होता. त्यामुळें अनेक महत्त्वाच्या घटना इंग्लंडमध्यें रूढ होऊं लागल्या होत्या. त्याच्या कारकीर्दींत सर्व सत्ता व्हिगपक्षाच्या हातीं राहिली. या गोष्टीला अनेक दृष्टींनीं महत्त्व देण्यांत येतें. त्याला इंग्लिश भाषा अवगत नसल्यानें प्रधानमंडळाच्या सभांस तो कधींही हजर राहिला नाहीं. यामुळें सर्व धोरण मुख्य प्रधानच ठरवूं लागला व मंत्रिमंडळांत त्याला महत्त्व प्राप्त होऊं लागलें. याचा इंग्लंडच्या राज्यघटनेवरही अप्रत्यक्ष रीतीनें परिणाम झाला व राजाच्याऐवजीं मुख्य प्रधानानें राज्यकारभार चालवावा असा प्रघात पडूं लागला. पुढें पुढें वॉलपोलच्या हातीं सर्व राज्यकारभार आल्यावर तो प्रधानमंडळाच्या ऐक्यावर व सहकारित्वावर भर देऊं लागला व आपल्याला नको असलेले व विरोध करणारे प्रधान मंत्रिमंडळांतून तो काढून टाकूं लागला. यामुळेंही मुख्य प्रधानाच्या जागेचें महत्त्व वाढीस लागलें. एकंदरींत पाहतां राज्यघटनेच्या वाढीस पहिल्या जॉर्जची कारकीर्द कारणीभूत झाली असें म्हणतां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. सर रॉबर्ट वॉलपोलचें पूर्वचरित्र थोडक्यांत सांगून पहिल्या जॉर्जच्या कारकीर्दीत त्यानें कोणती कामगिरी बजाविली तें सांगा.

२. इंग्लंड व स्पेन यांचें युद्ध होण्याचें कारण काय ?

३. साऊथ सी कंपनीनें राष्ट्रीय कर्जाची जबाबदारी कां व कशा रीतीनें पतकरली ? त्याचा परिणाम काय झाला ? त्यावेळीं त्या आपत्तींतून राष्ट्राला कोणीं व कसें वांचविलें ?

४. पहिल्या जॅकोबाईट बंडाची थोडक्यांत हकीकत सांगा.

५. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या.
सप्तवार्षिक कायदा, सरदारी-नियंत्रण कायदा, वुडचें कंत्राट, वॉलपोलचें परराष्ट्रीय धोरण, युट्रेक्टचा तह.

६. पहिल्या जॉर्जच्या स्वभावाचें वर्णन करा. त्याच्या कारकीर्दीचें महत्त्व सांगा.

७. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.
हार्ले, बोलिंगब्रोक, फॉर्स्टर, संदरलंड, अल्बेरूणी, बिंग, स्टॅनहोप, अॅटरबरी, स्विफ्ट, पूलटने, कार्टरेट, टाऊनशेंड, क्रॅफ्टस्मन, ड्रेपियर, मराया थेरिसा.

८. पहिल्या जॉर्जच्या कारकीर्दीचा एक कालादर्श तयार करा.

९. साऊथ सी कंपनीच्या व्यवस्थेसंबंधीं अगर त्यावेळच्या इंग्लंडनें परराष्ट्रीय बाबतींत कोणतें धोरण स्वीकारणें योग्य, याबद्दल तुमच्या वादविवाद-सभेंत अगर शाळेच्या पार्लमेंटमध्यें चर्चा करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१६. सर रॉबर्ट वॉलपोल

१. वॉलपोल व दुसरा जॉर्ज :—पहिला जॉर्ज मृत्यु पावल्यानें वॉलपोलचा मोठाच आधार नाहींसा झाला. त्यांतूनही राजपुत्र जॉर्ज विरोधीपक्षांत सामील असल्यानें तो राजा झाल्यावर आपल्या हातीं सत्ता राहते किंवा नाहीं याबद्दल तो साशंकच होता; व त्याची ही शंका खरी होती. दुसरा जॉर्ज राजा झाला (१७२७) त्यावेळीं त्यानें वॉलपोलला काढूनही टाकलें; परंतु त्याची बायको वॉलपोलची किंमत ओळखून असल्यानें वॉलपोललाच मुख्य प्रधान नेमण्याची सल्ला तिनें राजाला दिली. राणीचा राजावर जबरदस्त पगडा असल्यानें त्यानेंही तिचा सल्ला मान्य केला व वॉलपोलला मुख्य प्रधानकीचीं

दुसरा जॉर्ज

वस्त्रें दोन दिवसांनीं पुन्हां दिलीं. या घटनेमुळें वॉलपोलच्या विरोधकांस मात्र वाईट वाटलें. दुसरा जॉर्ज सज्जन, सचोटीनें वागणारा, धूर्त व निष्कपटी होता. माणसाची त्याला चांगली पारख होती. तो मोठा धाडसी व शूर वीर होता. लढाईवर जाण्याची वेळ आल्यास तो कधींही डरत नसे. त्याच्या बायकोवर त्याचें नितान्त प्रेम होतें व तिच्या शब्दाबाहेर तो कधींही जात नसे. त्याचीं बरींच वर्षें इंग्लंडांत गेल्यानें त्या देशाबद्दल त्याला प्रेम वाटूं लागलें होतें. इंग्रजी भाषाही त्याला अवगत असल्यानें इंग्रजांमध्यें तो मिळून मिसळून वागत होता. असें असलें तरी हॅनोव्हरकडे त्याचा विशेष ओढा होता. इंग्लिश चालीरीतीशीं तो पूर्णपणें समरस झाला नसल्यानें कधींकधीं चमत्कारिक वागत असे. वॉलपोल-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बद्दल त्याचें मत चांगलें नसलें तरी त्याला प्रधान नेमल्यावर त्यानें त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवला व त्याच्याशीं तो मोठ्या सभ्यतेनें व प्रतिष्ठेनें वागूं लागला.

२. वॉलपोलचें धार्मिक धोरण :—दुसऱ्या जॉर्जनें मुख्य प्रधानाच्या जागेवर नेमणूक केल्यावर वॉलपोल आपल्या उद्योगास उत्साहानें लागला. राणीला त्याची खरी योग्यता पटली असल्यानें तिच्या हयातीपर्यंत राजदरबारचा त्याला पूर्ण पाठिंबा मिळत गेला व त्याच्या जोरावर त्यानें अनेक कामें केलीं. धार्मिक बाबतींत वॉलपोल फारसा आग्रही नव्हता. तरी लोकांस संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य दिलें तर घोटाळा होईल व तीव्र विरोध उत्पन्न होईल अशी त्याला भीति वाटत होती. यामुळें नॉनकन्फॉर्मिस्ट, कॅथॉलिक वगैरे लोकांविरुद्ध असलेले कायदे रद्द करूं नयेत असें त्यानें ठरविलें. नॉनकन्फॉर्मिस्टांना धार्मिक स्वातंत्र्य द्यावें असें त्याच्या मनांत असूनही त्यानें तसें केलें नाहीं. त्यांच्याविरुद्ध असलेले धर्मकसोटीचा कायदा व कॉर्पोरेशन कायदा हे दोन्ही कायदे अजूनही अस्तित्वांत होते. त्यामुळें त्यांस सरकारी नोकऱ्या स्वीकारतां येत नसत; वॉलपोलला त्या त्यांना द्याव्याशा वाटत. सन १६९० च्या धार्मिक स्वातंत्र्याच्या कायद्यानेंही त्यांना सरकारी नोकऱ्या स्वीकारण्याची मुभा ठेवलेली नव्हती. ती त्यांना मिळावी म्हणून वॉलपोलनें सन १७२७ मध्यें ‘ धार्मिक माफीचा कायदा ’ एक वर्षापुरता पास केला व दरसाल तो पास करून घेण्याची त्यानें प्रथा पाडली. यामुळें प्रॉटेस्टंट पंथांतील सर्व पक्षोपपक्षांतील लोकांस सरकारी नोकऱ्या मिळणें शक्य होऊं लागलें.

३. वॉलपोलचें आर्थिक धोरण :—वॉलपोल खुल्या व्यापाराचा पुरस्कर्ता होता हें मागें सांगितलेंच आहे. त्या धोरणास अनुसरून त्यानें इंग्लंडच्या व्यापाराची वाढ करण्याचें ठरविलें. व्यापाराची वाढ झाल्यास देशांत संपत्ति खेळूं लागेल व उद्योगधंद्यांचीही भरभराट होईल असें त्याचें ठाम मत होतें. त्यास अनुसरून सन १७२७ मध्यें त्यानें निर्यात होणाऱ्या सुमारें शंभर वस्तूंवरील व आयात होणाऱ्या सुमारें चाळीस वस्तूंवरील जकाती उठविल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याचा इष्ट तो परिणाम होऊन त्या वस्तू स्वस्त होऊं लागल्या, देशाचा व्यापार वाढला व त्यामुळें जकातीचें उत्पन्नही वाढलें. अशा तऱ्हेचें धोरण त्यानें अमेरिकन वसाहतींसंबंधींही स्वीकारलें. त्या वसाहती स्वायत्त होत्या व इंग्लिश गव्हर्नरच्या देखरेखीखालीं त्या आपला कारभार करीत असत. नौकानिर्बंधाच्या कायद्याप्रमाणें त्यांना आपला माल प्रथमतः इंग्लंडमध्यें पाठवावा लागत असल्यानें त्यांचा व्यापार चालावा तसा चालत नव्हता. वॉलपोलनें त्या बाबतींत लक्ष घालून सन १७२९ सालीं तांदुळासंबंधीं एक कायदा केला व कॅरोलिनामधील तांदूळ कोणत्याही युरोपियन देशांत परस्पर पाठविण्याची अमेरिकन वसाहतींस त्यानें परवानगी दिली. तसेंच सन १७३३ मध्यें त्यानें अमेरिकन साखरही युरोपीय देशांस परस्पर पाठविण्याची सवलत त्यांस दिली. या दोन्ही गोष्टींमुळें अमेरिकेवर लादलेले नौकानिर्बंधाचे कायदे वॉलपोलनें थोडे सैल केले असें म्हणतां येईल. त्याचें हें धोरण अमेरिकन व्यापारास उपकारकच ठरलें. त्याच्या आर्थिक धोरणामुळें व काटकसरीच्या कारभारामुळें त्याला शेतसाराही चार शिलिंगांच्या ऐवजीं एक शिलिंग करतां आला. यामुळें त्याचे अनुयायी त्याच्यावर खूष झाले.

४. वॉलपोलचें जकातीसंबंधीं धोरण :—सन १७२४ मध्यें वॉलपोलनें चहा व कॉफी यांच्या जकातीसंबंधीं नवीनच धोरण स्वीकारून तें यशस्वी करून दाखविलें होतें. खरोखर पाहतां त्याचा तो प्रयत्न योग्य दिशेनेंच होता. एकदम मिळणारें जकातीचें उत्पन्न थोड्या मुदतीनें मिळावयाचें, एवढाच वॉलपोलनें त्यांत फरक केलेला होता. एकदम जकात द्यावी लागते म्हणून व्यापारी ती चुकविण्याचा प्रयत्न करीत व त्यांचा प्रयत्न अनेक वेळां यशस्वी होत असे. अर्थात त्यामुळें सरकारचें उत्पन्नही कमी होई. या हेतूनेंच वॉलपोलनें सन १७३३ मध्यें आपलें सुप्रसिद्ध 'जकातीचें बिल' पार्लमेंटपुढें मांडलें. तें दारू व तंबाखू यांच्या आयातीपुरतेंच होतें. त्या बिलानें खालील गोष्टी सुचविल्या. (१) इंग्लंडमध्यें येणारी दारू व तंबाखू बंदरांतूनच परस्पर युरोपांत गेली तर जकात घेण्यांत येऊं नये. (२) ते जिन्नस इंग्लंडमध्यें आणावयाचे असल्यास ते व्यापाऱ्यांनीं प्रथमतः बंदरावरील सरकारमान्य वखारींत सांठवावे. (३) तेथून ते विकण्याकरितां जेव्हां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जेव्हां इंग्लंडमध्यें नेले जातील तेव्हां तेव्हां त्यांवर जकात देण्यांत यावी. (४) ज्यांना परवानगी असेल त्यांनींच तो माल आपल्या दुकानांत विकावा. (५) वखारींतील माल वारंवार तपासण्याचा हक्क सरकारी अधिकाऱ्यांस असावा. वरील बिल उत्तम होतें व अनुभवानेंही त्याची सत्यता पटविली होती. परंतु पार्लमेंटमध्यें त्यावर खडाजंगी वादविवाद झाला. शेवटीं विरोधाचा पारा कमी व्हावा म्हणून वॉलपोलनें तें परत घेतलें. विरोधकांचें मुख्य म्हणणें असें कीं इंग्रज गृहस्थाचें खाजगी घर म्हणजे त्याचा स्वतंत्र बालेकिल्ला असल्यानें त्याची झडती घेणें म्हणजे इंग्रजांच्या स्वातंत्र्याची गळचेपी करणें होय. कारण दुकानांची झडती घेतांना सरकारी अधिकारी कधीं कधीं खाजगी घरांतही शिरण्याचा संभव होता. त्याचप्रमाणें हे अधिकारी नेमून वॉलपोल पुढील निवडणुकींत यश मिळविण्याची तयारी करीत असावा असेंही विरोधी पक्ष म्हणूं लागला.

५. राष्ट्रीय कर्ज व गंगाजळीची स्थापना (१७३३):—साऊथ सी कंपनीच्या कामाचा बोजवारा झाल्यानें राष्ट्रीय कर्जाची सर्व जबाबदारी वॉलपोलनें सरकारवर घेतली होती. त्या वेळींही राष्ट्रीय कर्ज पांच कोट पौंडां-वर होतें. वॉलपोलचा एकंदर कारभार काटकसरीचा असल्यानें त्याला शिल्लक ठेवतां येत असे. या शिलकींतूनच त्यानें ऐंशी लक्ष पौंड काढून राष्ट्रीय कर्जाची फेड केली. त्यावेळीं व्यापार वाढल्यानें सरकारचें उत्पन्नही वाढलें होतें; व देशाची भरभराट होऊं लागल्यानें व्याजाचा दरही कमी होऊं लागला होता. याचा फायदा घेण्याचें ठरवून त्यानें कमी दरानें कर्ज काढून भारी दरानें काढलेल्या कर्जाची फेड केली. यामुळें जो फायदा झाला त्यांतूनही त्याला राष्ट्रीय कर्जाची फेड करतां आली; व राष्ट्रीय कर्जावरील व्याजही कमी झालें. याशिवाय त्यानें दरसाल सुमारें एक लाख पौंड शिलकेंत ठेवावयाचे व त्यांतून राष्ट्रीय कर्जाची फेड करावयाची असें धोरण ठरविल्यानें राष्ट्रीय कर्जाचा फुगत चाललेला आंकडा बराच घटला. या त्याच्या योजनेला 'गंगाजळीची योजना' असें म्हणतात. दरसाल ही गंगा-जळी फुगत चालली. आपल्या वीस वर्षांच्या कारकीर्दीत त्यानें सुमारें पन्नास लाख पौंडांची फेड केली व राष्ट्रीय कर्ज कमी केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. पोर्चसचा गोळीबार व दंगे :—सन १७३६ सालीं एक मजेदार प्रकार घडला. स्कॉटलंडमध्यें चोरून व्यापार करण्याची प्रथा बोकाळलेली होती. सरकारी अधिकाऱ्यांनीं एकदां विल्सन व रॉबर्टसन या दोघां चोरून व जकात चुकवून व्यापार करणाऱ्यांस पकडलें व त्यांना फाशींची शिक्षा ठोठावली. पोलिसांच्या पहाऱ्यांतून रस्त्यानें जात असतां दंगामस्ती करून रॉबर्टसन पळून गेला. ठरलेल्या दिवशीं एकट्या विल्सनलाच फाशीं देण्याचें ठरलें व त्याप्रमाणें त्याला फाशीं देण्यांतही आलें. त्या वेळीं तेथें जमलेल्या लोकांनीं सरकारी शिपायांवर हल्ला करण्यास सुरुवात केली. तेव्हां कॅप्टन पोर्चस या लष्करी अधिकाऱ्यानें लोकांच्या जमावावर गोळीबार केला. त्यामुळें कित्येक जखमी झाले व कांहीं मेले. त्यामुळें पोर्चसवर खटला भरण्यांत येऊन त्याला फाशींची शिक्षा झाली. परंतु पुढें ती रद्द करण्यांत आली. हें कळतांच अनेक लोक कैदखान्यांत घुसले, त्यांनीं पोर्चसला पकडलें व त्याला सर्वांसमक्ष फाशीं दिलें! या दंग्यामुळें एडिंबरोच्या मॅजिस्ट्रेटास बडतर्फ करण्यांत येऊन त्या शहराच्या लोकांस दोन हजार पौंड दंड करण्यांत आला. ती दंडाची रक्कम पोर्चसच्या विधवेस देण्यांत आली. या प्रकरणामुळें स्कॉटिश लोकांचीं मनें मात्र भडकलीं.

७. वॉलपोलला विरोध :—वॉलपोल सत्तेचा लोभी होता हें मागें सांगितलेंच आहे. हा त्याचा दोष त्याच्या विरोधकांनीं ओळखलेला होता. फ्रान्सशीं स्नेह ठेवून युरोपच्या बाबतींत अलिप्तपणाचें धोरण त्यानें स्वीकारलें हेंही लोकांस व त्याच्या सहकाऱ्यांस आवडलें नाहीं. पटेनासें झालें कीं तो आपल्या सहकाऱ्यांसही खड्यासारखा निवडून दूर फेकून देई; यामुळेंही अनेक लोक त्याचा द्वेष करीत. त्याचें आर्थिक धोरण–विशेषतः जकातीसंबंधाचें–लोकांस नीट समजलेंच नाहीं व त्यामुळें त्यांनीं त्याला विरोध केला. वॉलपोल हा लोकनियुक्त मुख्य प्रधान नसून राजानें आपल्यावर लादलेला प्रधान आहे, अशी विरोधकांची निश्चित विचारसरणी होती. आपल्यापेक्षां वरचढ होणाऱ्या सहकाऱ्यांस वॉलपोलनें दूर केलें व त्यांनीं त्याला विरोध करण्यास सुरुवात केली. वॉलपोलनें सन १७२४ मध्यें कार्टरेटला दूर केलें, सन १७२५ मध्यें पूलटनेला राजीनामा द्यावयास लावलें व जिकीरीस येऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १७३० मध्यें टाऊनशेंड त्याला सोडून गेला. सन १७३० नंतरच वॉलपोलच्या कामगिरीला तेज चढत गेलें. सर्वसामान्य लोकांचा त्याला पाठिंबा होता व त्याच्यावर त्यांचा विश्वासही होता; परंतु पूलटने, कार्टरेट, बोलिंगब्रोक वगैरेनीं जो एक विरोधी पक्ष स्थापन केला होता त्यानें मात्र त्याला भंडावून सोडलें. त्यामुळें व्हिगपक्षांतच एक पुरोगामी गट उत्पन्न झाला व त्याचें नेतृत्व कार्टरेट, पूलटने वगैरेकडे आलें. ते आपल्याला 'देशभक्त' म्हणवीत. त्या शिवाय व्हिगपक्षांत कांहीं तरणेबांड व्हिग विल्यम पिटच्या नेतृत्वाखालीं होते. विल्यम पिट हा तर वॉलपोलचा तीव्र विरोधक होता. त्याच्या पोरपणाकडे पाहून पिट व त्याचे सहकारी यांना उद्देशून वॉलपोल 'पोरं आहेत झालं!' असें नेहमीं म्हणे. राजपुत्र फ्रेडरिकही वॉलपोलच्या विरोधकांस प्रोत्साहन देत असे. बोलिंगब्रोकचा टोरीपक्षही त्याला विरोध करीत असेच. पोर्चसच्या दंग्यानंतर जे स्कॉटिश लोक ब्रिटिश पार्लमेंटमध्यें होते तेही वॉलपोलच्या विरोधीपक्षांत सामील झाले. एकंदरींत पाहतां त्याला उत्तरोत्तर विरोध होऊं लागला. तथापि वॉलपोलही कांहीं कमी नव्हता. आपलें मताधिक्य करण्याकरितां त्यानें नाना उपाय योजले. 'मूठ दाबली कीं काम होतें' या धोरणान्वयें त्यानें लोकांस नुसतें झुलविलें. त्या वेळीं पार्लमेंटच्या निवडणुकी मूठभर लोकांच्या हातीं असत. त्यांच्या मुठी दाबून प्रत्येक निवडणुकीमध्यें आपले बगलबच्चे निवडून येतील अशी त्यानें व्यवस्था केली होती; व ते पार्लमेंटमध्यें निवडून आल्यावर त्यांना पैसे चारून, पदव्या देऊन, अगर मोठ्या नोकऱ्या देऊन त्यानें खूष ठेवलें व त्यांच्याकडून आपलीं बिलें भराभर पास करून घेतलीं! त्यावेळीं पार्लमेंटमधील भाषणें प्रसिद्ध होत नसत व कोणीं कोणत्या बाजूनें मतें दिलीं हेंही लोकांस कळत नसे. या गोष्टीचाही वॉलपोलनें पुरेपूर फायदा घेतला. पुढें सन १७३७ मध्यें वॉलपोलचा मोठा आधार नाहींसा झाला. त्या वर्षी राणी कॅरोलिन मेली; राजानें त्याला पूर्वीप्रमाणें आश्रय देण्याचें धोरण स्वीकारूनही वॉलपोलला राजदरबारचा आधार मिळेनासा झाला. राष्ट्रही त्याच्याकडे पूर्वीच्या दृष्टीनें पाहीनासें झालें. सन १७३९ मध्यें स्पेनशीं होणाऱ्या युद्धाच्या वेळीं त्याला सर्व गोष्टी कळून आल्यानें त्यानें राजीनामाही दिला;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परंतु राजानें तो स्वीकारला नाहीं. पुढें त्याचें पार्लमेंटमधील वर्चस्वही कमी कमी होऊं लागल्यानें व विरोधानें तीव्र स्वरूप धारण केल्यानें त्यानें सन १७४२ मध्यें राजीनामा दिला.

८. **वॉलपोलचें परराष्ट्रीय धोरण** :—युरोपच्या राजकारणांत निष्कारण ढवळाढवळ न करतां त्या बाबतींत अलिप्तपणाचें धोरण स्वीकारणेंच योग्य होय हें वॉलपोल ओळखून होता; हें धोरण स्वीकारल्यानेंच आपल्या देशाचा फायदा होईल असें त्याचें मत होतें. युद्धामुळें व्यापार मंदावतो, अपार संपत्ति नष्ट होते व लोकांचा संहार होतो हें त्याला पटलें होतें. शिवाय त्या वेळीं युद्ध केलेंच तर स्टुअर्ट वंश स्थापन करण्याकरितां जॅकोबाईट लोक इंग्लंडमध्यें बंडें करतील असें त्याला नेहमीं वाटे व त्याचें हें भविष्य पुढें खरें ठरलेंही. जॅकोबाईट लोकांना मुख्यतः फ्रान्सचा आधार असल्यानें फ्रान्सशीं सख्य ठेवणें जरूरीचें आहे असें तो म्हणे व त्याप्रमाणें नेहमीं वागे. फ्रान्सशीं त्याचा स्नेह असे ही गोष्ट स्पेन, ऑस्ट्रिया, स्वीडन वगैरे राष्ट्रांना मुळींच आवडत नसे. इंग्लंडवर सूड उगवावा म्हणून स्पेनचा राजा संधीची वाट पहात बसलाच होता. तशा तऱ्हेचा त्यानें एक प्रयत्न सन १७२५ मध्यें करून पाहिलाही; पण तो फसला. पुढें सन १७३१ मध्यें त्याला संधि मिळाली. त्या सालीं पार्माचा ड्यूक मेला; तेव्हां ती जहागीर आपला मुलगा डॉन कॅरलॉस याला मिळावी असें स्पेनचा राजा म्हणूं लागला. ऑस्ट्रियाच्या बादशहानें त्या गोष्टीला हरकत घेतली. युद्धाचा भडका उडणार असें कळतांच वॉलपोलनें मध्यस्थी करून कॅरलॉसला ती जहागीर देवविली व ऑस्ट्रियाच्या बादशहाच्या 'प्रॅगमॅटिक सँक्शनला' ऊर्फ राजाज्ञेला संमति देऊन त्याला शांत केलें. वॉलपोलच्या चातुर्यानेंच हें युद्ध मिटलें. पुढें सन १७३३मध्यें पोलंडच्या वारशाबद्दल कटकटी सुरू झाल्या. पोलंडचा राजा दुसरा ऑगस्टस त्या समयीं मेला. तेव्हां त्याचा मुलगा ऑगस्टस याला तें राज्य मिळावें असें ऑस्ट्रियाचें म्हणणें पडलें. उलट स्पेन व फ्रान्स यांनीं त्याचा विरोधी स्टॅनिलस याचा पक्ष उचलून धरिला. त्यामुळें युद्धास सुरुवात झाली. या युद्धांत इंग्लंडनें ऑस्ट्रियाच्या बाजूनें पडावें असें लोकमत होतें; परंतु वॉलपोलनें तसें करण्याचें नाकारून तटस्थपणाचें धोरण स्वीकारलें. सन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७३३ मध्यें स्पेन व फ्रान्स या दोन देशांत एक गुप्त कौटुंबिक संघ स्थापन झाला. या संघाच्या अटीप्रमाणें इंग्लंडशीं युद्ध झालें तर परस्परांनीं एकमेकांस मदत करावी असें ठरलें होतें. परंतु तिकडे वॉलपोलनें लक्ष दिलें नाहीं.

९. जेंकिन्सच्या कानामुळें युद्ध:—वॉलपोलच्या अलिप्तपणाच्या धोरणामुळें देशाचा व्यापार सुधारला होता. ब्रिस्टल, लिव्हरपूल, लंडन वगैरे बंदरें त्यावेळीं फार पुढें आलीं होतीं. तरीही स्पेनचा व्यापार इंग्लिशांना अजून मारक वाटत होता. अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींशीं व्यापार करण्याची इंग्रजांना मोकळीक नव्हती. परंतु युट्रेक्टच्या तहांत ठरल्याप्रमाणें दरसाल एक व्यापारी जहाज अमेरिकेंतील स्पॅनिश वसाहतींमध्यें इंग्लंडला पाठवितां येत असे. त्याप्रमाणें साऊथ सी कंपनी दरसाल पांचशें टन मालानें भरलेलें एक जहाज तिकडे नेई. परंतु इंग्रज व्यापारी या सवलतींचा दुरुपयोग करीत. त्या गलबताबरोबर मालानें भरलेलीं अनेक गलबतें जात. मुख्य जहाज किनाऱ्याला लागून बंदरांत माल उतरूं लागलें कीं रात्रीच्या अंधारांत बरोबरचीं गलबतें आपला माल त्या गलबतावर चढवीत व अशा तऱ्हेनें सगळ्या गलबतावरील माल तेथें उतरविला जाई ! हा प्रकार स्पॅनिशांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनीं टेहळणी करण्यास सुरुवात केली. स्पॅनिश वसाहतींकडे येणाऱ्या जहाजांची तपासणी करण्याचा आपला अधिकार आहे असें ते म्हणत व चोरटेपणानें व्यापार करणारें जहाज पकडून त्याच्यावरील खलाशांस शिक्षा करीत. सन १७३८ मध्यें कॅप्टन जेंकिन्स नांवाचा एक गृहस्थ 'स्पॅनिश लोकांनीं आपला कान कापला' अशी तक्रार करीत इंग्लंडांत आला व कापलेला एक कान एका बाटलींत भरून तो सर्वांस दाखविण्यास त्यानें सुरुवात केली. त्याचें जहाज शत्रूंनीं तपासून तो चोरून व्यापार करीत असल्याचें सिद्ध झाल्यानें स्पॅनिश अधिकाऱ्यांनीं त्याला शिक्षा केली होती. त्याचा कान त्यांनीं खरोखर कापला किंवा नाहीं हें अजूनही गूढच आहे! लोक म्हणत कीं त्याला एकदां मानखोड्यांत अडकविला होता, त्यावेळीं त्याचा कान कापला गेला!! त्यावेळीं सर्व लोक भावनेला बळी पडले व स्पेनविरुद्ध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युद्ध पुकारणें जरूर आहे असें ते म्हणूं लागले. वॉलपोलच्या विरोधकांस ही सुवर्णसंधीच वाटली व स्पेनविरुद्ध युद्ध पुकारण्याकरितां त्यांनीं वॉलपोलला भंडावून सोडलें. एक जहाज पाठविण्याचा साऊथ सी कंपनीला मिळालेला परवाना तीस वर्षें पूर्ण झाल्यानें तो पुन्हां मिळवावयाचा होता. व स्पेन व इंग्लंड यांच्या ताब्यांतील एकमेकांजवळ असलेल्या वसाहतींच्या सरहद्दी ठरवावयाच्या होत्या. हींही यावेळीं स्पेनशीं युद्ध करण्याचीं सबळ कारणें होतीं. शेवटीं आपल्या मनाविरुद्ध वॉलपोलनें, सामोपचारानें साधत नाहीं असें पाहून, सन १७३९ मध्यें स्पेनविरुद्ध युद्ध पुकारलें. तें कळतांच लोकांनीं जयघोष केला व आपल्या आनंदाप्रीत्यर्थ देवळांतील घंटा वाजविण्यास सुरुवात केली. त्या ऐकून वॉलपोल उद्गारला, 'आज हे लोक घंटा वाजवीत आहेत; परंतु उद्यां त्यांना हात चोळीत बसावें लागेल!' सुरुवातीपासूनच वॉलपोलला हें युद्ध नको होतें व त्यामुळें त्याच्याकडे द्यावें तितकें लक्ष त्यानें दिलें नाहीं. दर्यासारंग व्हरनॉन याला स्पॅनिश वसाहतींवर हल्ला करण्यास पाठविण्यांत आलें; परंतु त्याचा पराभव झाला. त्यानंतर ॲन्सनला पाठविण्यांत आलें. त्यानें पराक्रम गाजवून इंग्लंडला बरीच संपत्ति आणली. हें युद्ध कसेंबसें चाललें होतें. मात्र तें चालू असतांच वॉलपोलनें आपल्या जागेचा सन १७४२ मध्यें राजीनामा दिला. त्यावेळीं ऑस्ट्रियाच्या वारशाबद्दल युरोपांत रणधुमाळी माजून राहिली होती, त्यांतच हें युद्ध समाविष्ट झालें.

१०. धार्मिक अवनति:—वॉलपोल व त्याचे विरोधक यांचा झगडा चालू असतांच इंग्लंडमध्यें एक नवीनच चळवळ सुरू झाली होती. तिला 'कर्मनिष्ठांची चळवळ' ऊर्फ मेथॉडिस्टांची चळवळ असें म्हणतात. गेल्या शतकभर इंग्लंडमध्यें धार्मिक अवनति चालू होती. लोकांचें धर्माबद्दलचें प्रेम ओसरत जाऊन ते पक्के धर्मलंड बनूं लागल्यानें धर्माला ग्लानी येऊं लागली. खुद्द धर्मगुरूही ख्रिस्ती धर्मावर विश्वास ठेवीत नसत. राजकारणांत भाग घ्यावा व राजदरबाराशीं दळणवळण ठेवून आपल्या वृत्ती सांभाळाव्या एवढेंच ते करीत. त्यांचें आचरणही धर्मविहित नसे. कांहीं धर्मगुरू आपल्या वृत्ती तिन्हाइतांकडून चालवून स्वतः फक्त त्यांचें उत्पन्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खात. यामुळें त्यांच्याबद्दलचा लोकांचा आदर लुप्त झाला. धर्मगुरूच धर्मलंड बनल्यानें लोकही त्यांचेंच अनुकरण करूं लागल्यास नवल तें कोणतें ? लोकांच्या मनावरील धर्माचें दडपण उडाल्याबरोबर त्यांच्यामध्यें अनेक दुर्गुण शिरले. दारू पिणें, चोऱ्या करणें, वाईट नादीं लागणें वगैरे अनेक दोष समाजामध्यें शिरल्यानें ते काढून टाकण्याकरितां सरकारलाही अनेक वेळां अत्यंत क्रूर शिक्षा कराव्या लागत. सडकांवरील दरोडे अतोनात वाढले होते. सर्वसाधारणपणें ही स्थिति सर्वत्र असूनही इंग्लंडमध्यें कर्मठ वृत्तीचे व शुद्ध आचरणाचे लोक नव्हते असें नाहीं. कांहीं धर्मगुरूही पूर्वींप्रमाणें चांगले पढिक विद्वान् होते; परंतु ते फारच थोडे. अशा स्थितींत समाजांतील धार्मिक ग्लानी घालवून लोकांना पूर्वींप्रमाणें कर्मठ बनविणें जरूर आहे असें कांहीं लोकांस वाटूं लागलें. अशा लोकांत जॉन वेस्ले व त्याचा भाऊ सॅम्युअल वेस्ले हे प्रमुख होत.

११. जॉन वेस्ले व कर्मनिष्ठांचा पंथ :—जॉन वेस्लेचा जन्म सन १७०१ मध्यें झाला. विद्यार्थीदशेंतच धार्मिक ग्लानीबद्दल त्याला वाईट वाटत असे व म्हणून तो प्रत्यहीं प्रार्थना, उपासना, बायबलचें वाचन वगैरे धार्मिक विधीनियम अत्यंत कसोशीनें पाळी. त्याच्या या कर्मठपणावरूनच त्याच्या मित्रांनीं त्याला व त्याच्या अनुयायांना ' कर्मनिष्ठ ' म्हणून हिणविण्यास सुरुवात केली. शेवटीं वेस्लेनेंही तेंच नांव आपल्या पंथाला दिल्यानें त्याच्या पंथाला ' कर्मनिष्ठांचा पंथ ' असें म्हणतात. सन १७३५ मध्यें जॉन वेस्ले अमेरिकेमध्यें गेला होता. तेथें त्याच्या मनावर एका जर्मन मिशनऱ्याच्या आचरणाचा चांगलाच ठसा उमटला. पुढें तो सन १७३९ मध्यें इंग्लंडमध्यें आला व आपल्या नव्या पंथाचीं तत्त्वें इंग्लंडमध्यें लोकांस

जॉन वेस्ले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिकवूं लागला. प्रथमतः तो धर्ममंदिरांतून उपासना चालवी व आपलीं तत्त्वें लोकांस सांगे. त्याचा धर्मगुरूंना राग आल्यानें त्यांनीं त्याला धर्ममंदिरांतून उपासना चालविण्याची बंदी केली. तेव्हां तो उघड्यावरच प्रवचनें करूं लागला. त्यानें आपल्या अस्खलित वाणीनें व मुद्देसूद विवरणानें लोकांस इतकें भारून टाकलें कीं त्याचे टीकाकारही मंत्रमुग्ध होऊन त्याचें प्रवचन ऐकत. कित्येक वेळीं त्याच्यावर दगडांचा वर्षाव होई, त्याला मार खावा लागे अगर लोकांनीं सोडलेल्या कुत्र्यांकडून चावूनही घ्यावें लागे. लोकांनीं अंगावर टाकलेल्या घाणींत बसूनही त्याला प्रवचनें करावीं लागत. इतके हाल सोसूनही त्यानें अखंड प्रवास केला व आपल्या पंथाला अनेक अनुयायी मिळविले; त्यानें लोकांत नवचैतन्य निर्माण केलें व समाजांतील धार्मिक ग्लानी घालवून धर्माला उज्वल स्वरूप प्राप्त करून दिलें. लोकांच्या राहणींतही फरक पडून त्यांचे अनेक दुर्गुण नाहींसे होऊं लागले. लोकांच्या नैतिक आचरणावरही वेस्लेच्या शिकवणुकीचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. जॉन वेस्ले सन १७९१ मध्यें मेला. त्याच्या मागें त्याचा पंथ अजूनही जगांत तग धरून आहे.

१२. वॉलपोलच्या कामगिरीचें महत्त्व :—जॉन वेस्लेच्या चळवळीचें स्वरूप वॉलपलला कळलें होतें. परंतु त्या वेळीं स्पेनशीं चाललेल्या युद्धांत त्याचें मन गुरफटलेलें असल्यानें त्याला त्याच्या चळवळीकडे लक्ष देण्यास अवसरच मिळाला नाहीं. स्पॅनिश युद्धांत इंग्लंडला अपजयावर अपजय आले व त्याचें खापर वॉलपोलच्या माथीं फोडण्यांत आलें. त्यामुळें राष्ट्रांतील सर्व लोक त्याच्यावर खवळले. खुद्द पार्लमेंटमध्यें सन १७४२ मध्यें एका साध्या बिलाच्या वेळीं त्याचा पराभव झाला. तेव्हां एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन वॉलपोलनें आपल्या जागेचा राजीनामा दिला. त्यामुळें दुसऱ्या जॉर्जला अत्यंत दुःख झालें. त्याला भरपूर पेन्शन देऊन ऑरफर्डचा अर्ल करण्यांत आलें. पुढें सन १७४५ मध्यें वॉलपोल मरण पावला. आपल्या करकीर्दीच्या शेवटीं शेवटीं वॉलपोल अत्यंत अप्रिय ठरला, तरी त्याची कामगिरी इंग्लंडच्या इतिहासांत अप्रतिम म्हणून ठरली: त्यानें इंग्लंडचा व्यापार वाढविला व देशांतील उद्योगधंद्यांस प्रोत्साहन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देऊन ते भरभराटीस आणले. त्याचा एकंदर कारभार राष्ट्राच्या कल्याणार्थ झाल्यानें देशांत संपत्ति खेळूं लागली, लोक सुखी झाले व देश वैभवाप्रत पोंचला. त्याची संस्मरणीय कामगिरी म्हणजे राज्यघटनेच्या दृष्टीनें प्रधान-मंडळात्मक राज्यपद्धतीचा विकास ही होय. तो इंग्लंडचा सुमारें वीस वर्षें मुख्य प्रधान होता. या अवधींत त्यानें प्रधानमंडळाच्या कामाला जें एक प्रकारचें पद्धतशीर वळण लावलें व त्या बाबतींत त्यानें जे प्रघात व आचार रूढ केले ते वज्रलेप झाले; इतके कीं त्यांविरुद्ध वर्तन करणें म्हणजे घटना-भंग झाला असें अजूनही मानलें जातें. प्रधानमंडळाच्या कार्यांच्या सौकर्या-साठीं त्याच्या वेळीं जे प्रघात रूढ झाले ते असे. राजानें प्रधानमंडळाच्या सभेस हजर राहूं नये; (याला पहिला जॉर्ज कारणीभूत झाला.) प्रधान-मंडळ एकाच पक्षाचें असावें; व त्यांतील प्रधान पार्लमेंटला जबाबदार असावे. प्रधान वैय्यक्तिकरीत्या मुख्य प्रधानाला जबाबदार रहावे व त्यांनीं त्याच्या सल्ल्याप्रमाणेंच सर्व कामें करावीं, नाहींतर राजीनामा द्यावा. सामुदायिकरीत्या सर्व प्रधान पार्लमेंटला जबाबदार असावेत. प्रधानमंडळा-त्मक राज्यपद्धतीचीं हीं अंगें वॉलपोलनें रूढ केलीं. या गोष्टींवरून त्याची खरी किंमत केली जाईल. सत्तेचा अभिलाष, वरचढ होऊं पाहणाऱ्या त्याच्या सहकाऱ्यांबद्दल त्याला वाटणारा मत्सर, केव्हांही नमतें घेऊन आपल्या विरोधकांस गप्प बसविण्याचें त्याचें कसब, ढिलें व नेभळें परराष्ट्रीय धोरण, लांचलुचपतीच्या प्रकारांनीं पार्लमेंटमधील मताधिक्य राखण्यांत त्यानें दाखविलेलें चातुर्य, कॉमन्ससभेंत हमखास पास होणारीं बिलें उमरावमंडळाकडून नापास करवून घेण्यांत त्यानें दर्शविलेलें कौशल्य, हे सर्व प्रकार त्याचे दोष म्हणून दाखवितां येतील. परंतु त्यानें देशांत निर्माण केलेलें स्वास्थ्य, व्यापारवृद्धि, अलिप्तपणाचें धोरण स्वीकारून त्यानें साधलेलें देशाचें हित, जॅकोबाईटांपासून देशाला प्राप्त करून दिलेली निर्भयता व प्रधानमंडळात्मक राज्यपद्धतीचा विकास या सर्व गोष्टी त्याच्या खऱ्या कर्तृ-त्वाची साक्ष पटविल्याशिवाय राहणार नाहींत. या सर्वांवरून तो इंग्लंडचा नुसता पहिला प्रधानच झाला असें नव्हे तर पुढें झालेल्या सर्व मुख्य प्रधानांचाही तो मार्गदर्शक झाला यांत तिळमात्र शंका नाहीं. युद्धमंत्र्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठिकाणीं असणारे उपजत गुण त्याच्या ठिकाणीं नव्हते व त्यामुळें उत्तम युद्धमंत्री म्हणून तो चमकला नाहीं हें खरें; परंतु त्यामुळें त्याच्या इतर कामगिरीकडे कानाडोळा करून भागणार नाहीं.

अभ्यास

१. वॉलपोलची कामगिरी सांगा. त्यानें अलिप्तपणाचें धोरण कां स्वीकारलें? त्यामुळें देशाचा काय फायदा झाला? मग विरोधकांनीं त्याला विरोध करण्याचें कारण काय?

२. वॉलपोलचें धार्मिक व जकातीसंबंधांचें धोरण वर्णा. राज्यघटनेच्या दृष्टीनें त्याची कामगिरी महत्त्वाची झाली का? कशावरून?

३. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—
पोर्चसमुळें दंगे, वॉलपोलचें वसाहतीसंबंधीं धोरण, दुसरा जॉर्ज, गंगा-जळी, कॅप्टन जेंकिन्स.

४. जॉन वेस्लेचें चरित्र थोडक्यांत द्या.

५. तुम्हांस माहीत असलेल्या कोणत्याही थोर मुत्सद्याबरोबर वॉलपोलची तुलना करा. त्यापैकीं तुम्हांस श्रेष्ठ कोण वाटतो तें कारणांसह सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—इ. स.१७१४–४२

वर्ष	महत्त्वाच्या गोष्टी-इंग्लंड	महत्त्वाच्या गोष्टी-युरोप	महत्त्वाच्या गोष्टी-हिंदुस्थान	प्रसिद्ध व्यक्ति
१७१४	पहिला जॉर्ज १७१४–१७२७		बाळाजी विश्वनाथ पेशवा	स्टॅनहोप, संदरलंड
१७१५	पहिलें जॅकोबाईट बंड	चौदावा लुई-मृत्यु.		बाळाजी विश्वनाथ,
१७१६	सप्तवार्षिक कायदा			टाऊनशेंड, विंग,
		स्पेन व स्वीडन संघ. १७१७		अल्बेरूणी,
१७१९	सरदारी-नियंत्रण कायदा		मोंगल मराठे तह, स्वराज्याची सनद	
१७२०	साउथ सी कंपनीचा बोजवारा		पेशवा बाजीराव १७२०–४०	[पोल, सर रॉबर्ट वॉल-
१७२१	वॉलपोल मुख्य प्रधान १७२१–१७४२			
१७२२	ॲटरबरीचा कट			बोलिंगब्रोक,
			निजामशाहीची स्थापना १७२४	
१७२५	हॅनोव्हरचा तह	व्हिएन्नाचा तह १७२५		चिमाजी आप्पा,
१७२७	दुसरा जॉर्ज १७२७–१७६०	पोलिश वारशाचें युद्ध १७३१–३५		
१७३३	वॉलपोलचें जकातीचें बिल	स्पेन-फ्रान्स गुप्त कौटुंबिक संघ		पिट,
१७३९	स्पेनशीं युद्ध-कर्मनिष्ठांची चळवळ		वसई जिंकली १७३९	जॉन वेस्ले,
		ऑस्ट्रियाचा सहावा चार्ल्स-मृत्यु		
१७४०	ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध १७४०–४८		बाजीरावाचा मृ. १७४०	फ्रेडरिक, मराया थेरिसा,
१७४२	वॉलपोलचा राजीनामा			

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७. इंग्लंड व फ्रान्स यांची वाढती तेढ

१. ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध (१७४०–४८)–**कारणें** :—वॉलपोलच्या राजीनाम्यानंतर लॉर्ड विलमिंगटन हा मुख्य प्रधान झाला; तरीही कार्टरेट हा त्या प्रधानमंडळांत प्रमुख सभासद होता. लॉर्ड विलमिंगटन सन १७४३ मध्यें वारल्यानंतर वॉलपोलच्या सल्ल्यावरून राजानें हेन्री पेलहॅमला मुख्य प्रधान नेमलें. या वेळीं स्पेन व इंग्लंड यांच्यामध्यें युद्ध चालू असतांच सन १७४० मध्यें ऑस्ट्रियाचा बादशाह सहावा चार्ल्स वारला. त्याचें राज्य त्या काळीं बरेंच मोठें असून त्यांत ऑस्ट्रिया, बोहेमिया, सायलेशिया, टिरोल, हंगेरी, बेलजम, मिलन संस्थान वगैरे अनेक प्रांत मोडत असत. शिवाय 'रोमन बादशाह' हा किताबही त्याच्याकडेच होता. त्याचें राज्य एकत्रित नसून त्रुटित होतें व त्यांत नाना जातीचे, नाना पंथाचे व नाना भाषा बोलणारे लोक राहत होते. सहाव्या चार्ल्सला मराया थेरिसा नांवाची एकच मुलगी होती व आपल्या मागून तिला ऑस्ट्रियाचें राज्य मिळावें अशी त्याची खटपट होती. त्याप्रमाणें त्यानें एक जाहीर राजाज्ञा ऊर्फ 'प्रॅग्मॅटिक सँक्शन' काढून त्याला इंग्लंड, हॉलंड, प्रशिया, स्पेन, पोलंड, सॅक्सनी, फ्रान्स वगैरे सर्व प्रमुख युरोपियन राष्ट्रांची संमति मिळविली होती. तसेंच मरायाच्या नवऱ्यास–टस्कनीचा ड्यूक, फ्रॅन्सिस स्टीफन–याला बादशाहीपद मिळावें असेंही त्यानें ठरविलें होतें. चार्ल्स मरण पावतांच ऑस्ट्रियावर बव्हेरियाच्या राजपुत्रानें आपल्या आईच्या तर्फे (बादशाह पहिला जोसेफ याची मुलगी व चार्ल्सची पुतणी) आपला वारसा सांगितला; तो योग्यही होता. परंतु चार्ल्सनंतर मरायाकडेच ऑस्ट्रियाचें राज्य आलें. त्याबरोबर प्रशियाचा राजा फ्रेडरिक यानें सायलेशिया प्रांतावर हल्ला केला. त्यामुळें ऑस्ट्रियन वारशाच्या युद्धास सुरुवात होऊन, बेलजम मिळण्याकरितां फ्रान्सनें, मिलनची जहागीर मिळण्याकरितां स्पेननें व ऑस्ट्रियाचें राज्य मिळण्याकरितां बव्हेरियाच्या राजपुत्रानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऑस्ट्रियावर चोहोंकडून हल्ले चढविले. बव्हेरियाशिवाय बाकीच्या सर्व राष्ट्रांनीं चार्ल्सच्या राजाज्ञेस मान्यता दिली होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

२. ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध व एलाशापेलचा तह :—आपल्यावर चोहोंबाजूंनीं शत्रूंनीं हल्ला केल्याचें कळतांच मरायानें वॉलपोलकडे मदतीची याचना केली. तेव्हां ' सर्वांत बलवान असलेल्या कुत्र्यापुढें त्याला पाहिजे असलेलें हाडाचें थोटुक टाक व स्वतःचा बचाव करून घे, ' असा त्यानें तिला सल्ला दिला! तेव्हां अत्यंत नाइलाजानें तिनें फ्रेडरिकशीं सन १७४२ मध्यें ब्रेसल्यू येथें तह करून त्याला सायलेशिया प्रांत देऊन टाकला. पुढें वॉलपोलनें राजीनामा दिल्यावर इंग्लंडनें आपल्या वचनाला जागून, मरायाला मदत करण्याच्या हेतूनें त्या युद्धांत उडी ठोकली (१७४३). तावडतोब जॉर्ज व त्याचा मुलगा कंबरलंडचा ड्यूक युरोपियन रणभूमीवर स्वतः उतरले. हॅनोव्हर प्रांताचें संरक्षण करणें हा जॉर्जचा मुख्य हेतु होता. तसेंच सन १७४३ मध्यें फ्रान्स व स्पेन यांमध्यें झालेल्या दुसऱ्या गुप्त कौटुंबिक संधाबद्दलही इंग्लिश लोक चिडले होते. युरोपांत उतरल्यावर डेटिंजन येथें जॉर्जनें फ्रेंच सैन्याचा पुरा मोड केला (१७४३). ब्रिटिश आरमारानेंही यावेळीं चांगलीच कामगिरी बजाविली. अमेरिका व हिंदुस्थान या देशांतही फ्रान्स व इंग्लंड यांच्यामध्यें युद्धास सुरवात झाली होती. सन १७४५ मध्यें बव्हेरियाचा राजा चार्ल्स वारला. तेव्हां मरायाचा नवरा फ्रॅन्सिस स्टीफन रोमन बादशाह निवडला गेला. सन १७४५ मध्यें फॉटेनॉय येथें कंबरलंडच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश फौजेचा पराभव झाला. याच वेळीं इंग्लंडमध्यें जॅकोबाईट बंड उत्पन्न झालें. तिकडे लक्ष द्यावें लागल्यानें इंग्लंडनें युद्धांतून अंग काढून घेतल्यासारखेंच झालें. शेवटीं सन १७४८ मध्यें एलाशापेल येथें तह होऊन मराया थेरिसाला ऑस्ट्रियाचें राज्य मिळावें व तिच्या नवऱ्याला रोमन बादशाह म्हणून मान्यता देण्यांत यावी असें ठरलें. प्रशियाच्या फ्रेडरिककडे सायलेशिया प्रांत रहावा, मिलनचें संस्थान सार्डीनियाच्या राजाला देण्यांत यावें, व इंग्रज-फ्रेंचांनीं जिंकलेला मुलूख एकमेकांस परत करावा असें ठरलें. हा तह नांवाचाच झाला. कारण सायलेशिया प्रांताचें शल्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भरायाच्या मनांत खुपत राहून, व्यापार व वसाहती याकरितां इंग्लंड व फ्रान्स यांमध्यें सुरू झालेला झगडा अनिर्णितच राहिला. या सर्व गोष्टींमुळें भावी युद्धाचीं बीजें या तहानें पेरून ठेविलीं असें मानण्यांत येतें.

३. जॅकोबाईटांचें दुसरें बंड (१७४५) :—वॉलपोलच्या म्हणण्याप्रमाणें, इंग्लंडनें युरोपांतील युद्धांत भाग घेतल्याबरोबर इंग्लंडांत जॅकोबाईटांचें बंड उत्पन्न झालें. तोतया जेम्सचा मुलगा चार्लस एडवर्ड सन १७४४ पर्यंत रोमला रहात होता. ऑस्ट्रियन युद्धांत इंग्लंड पडलें आहे असें कळतांच फ्रान्सची मदत घेऊन तो गुप्तपणें स्कॉटलंडमध्यें उतरला. त्या वेळीं त्याच्याजवळ केवळ सात साथीदार होते. तो स्वतः सुंदर, देखणा, तरतरीत व हुशार होता. मोठ्या हिंमतीचा असल्यानें त्यानें स्कॉटलंडांत गेल्याबरोबर बंड उभारलें.



तरुण तोतयाचें पेल्यावरील चित्र

त्याबरोबर अनेक स्कॉटिश लोक त्याच्या निशाणाखालीं जमले. हळूहळू त्यांची संख्या फुगत गेली व सन १७४५ मध्यें त्यानें एडिंबरो काबीज करून प्रेस्टनपॅन्स येथें इंग्रज सेनापति सर जॉन कोप याचा पराभव केला. या विजयानें अनेक स्कॉटिश लोक त्याला मिळाले. पुढें इंग्लंडांत शिरून तो मॅन्चेस्टरला आला. तेथेंही त्याला दोन हजार लोक मिळाले. त्याच्या अपेक्षेप्रमाणें इंग्लंडमधील जॅकोबाईट लोक त्याला मिळाले नाहींत. त्यामुळें त्याला वाईट वाटलें! तरीही धीर करून तो पुढें डार्बीपर्यंत गेला. तों काय? लीड्सकडून वेडचें सैन्य, श्रुसबरीकडून कंबरलंडचें सैन्य व फिंचलेजवळ युरोपांतून परत बोला-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वळेलें सैन्य त्याच्यावर तुटून पडून त्याच्या सैन्याचा फडशा उडविण्यास तयार असल्याचें त्याला कळलें. आपल्या सहकाऱ्यांच्या अत्याग्रहावरून तो मागें परतला. तो डार्बीपर्यंत आलेला ऐकतांच, तो लंडनवर चाल करून येणार अशी भूमका उठली. त्यामुळें लंडनवासीयांची एकच धांदल उडाली. इंग्लंडच्या बँकेवर लोकांनीं पैसे परत मिळण्याकरितां हल्ला केला, जडजवाहिरासह चंबूगवाळें घेऊन हॅनोव्हरला परत जाण्याची जॉर्जनें तयारी केली व चार्ल्स एडवर्डच्या नांवानें द्वाही फिरविण्याच्या बेतांत प्रधानमंडळही होतें. परंतु त्याच वेळीं चार्ल्स एडवर्ड परतला हें कळतांच सर्वांस हायसें झालें! डार्बीहून तो स्कॉटलंडकडे वळला. वाटेंत स्टर्लिंग घेण्याचा त्यानें निष्फळ प्रयत्न केला. शेवटीं कंबरलंडच्या सैन्याची व त्याची कलोडनमूर येथें लढाई होऊन चार्ल्सचा पराभव झाला (१७४६). तेथून तो निसटला व अनेक महिने अज्ञातवासांत कंठून तो अखेर फ्रान्समध्यें गेला. कलोडनमूरच्य विजयानंतर कंबरलंडनें स्कॉटिश लोकांची इतक्या क्रूरतेनें कत्तल केली कीं त्याला लोक 'कसाई कंबरलंड' असें म्हणूं लागले. चार्ल्स एडवर्डला पकडून देणारास तीस हजार पौंडांचें बक्षिसही लावण्यांत आलें होतें. परंतु तो स्कॉटलंडमध्यें सहा महिने गुप्त वेषानें रहात होता व तें माहीत असूनही पैशाच्या लालुचीनें एकाही स्कॉच गृहस्थानें त्याचा विश्वासघात केला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. जॅकोबाईट लोकांनीं इंग्लंडमध्यें स्टुअर्ट घराण्याची पुन्हां स्थापना करण्याकरितां हा प्रयत्न केला; परंतु तो फसल्यानें स्टुअर्ट राजवंश इंग्लंडच्या गादीवर स्थापन करण्याची त्यांची इच्छा कायमची नष्ट झाली व त्यामुळें जॅकोबाईट लोकांच्या बंडाची इंग्लंडला वाटणारी भीतीही कायमची नष्ट झाली. एलाशापेलच्या तहाप्रमाणें चार्ल्स एडवर्डची फ्रान्समधून उचल-बांगडी होऊन त्याला इटलीचा आश्रय घ्यावा लागला. पुढें तो सन १७८८ मध्यें रोम येथेंच वारला.

४. सप्तवार्षिक युद्धाचा पूर्वरंग :—एलाशापेलच्या तहानें भावी युद्धाचीं बीजें रोवून ठेविलीं होतीं, हें मागें सांगितलेंच आहे. प्रशियाच्या फ्रेडरिकनें सायलेशिया प्रांत बळकावला होता हें मराया थेरिसाला सारखें टोचत होतें; त्यामुळें तो प्रांत परत मिळविण्याची ती संधि पहात होती. तसेंच या वेळीं जर्मनीमधील प्रशियाचें वाढतें वर्चस्व मरायाला—ऑस्ट्रियाला—खपत नव्हतें; कारण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें ऑस्ट्रियाचें जर्मनींतील वजन कमी होणार होतें. यामुळें प्रशिया व ऑस्ट्रिया यांच्यामध्यें कायमची चुरस लागून राहिली होती. प्रशियाची सत्ता व त्याचें लष्करी सामर्थ्य दिवसेंदिवस एकसारखें वाढतच होतें. तें फ्रान्सला खपत नव्हतें, हें मराया जाणून होती. ऑस्ट्रियन वारशाच्या युद्धांत इंग्लंडनें आपल्याला मनोभावें मदत केली नाहीं व त्या देशाच्या सांगण्यावरून सायलेशिया प्रांतास आपल्याला मुकावें लागलें अशी तिची ठाम समजूत होती. तेव्हां यापुढें इंग्लंडशीं संबंध ठेवण्यापेक्षां प्रशियाचा शत्रू फ्रान्स त्या देशाशीं सख्य जोडावें अशी सल्ला तिचा प्रधान कॉनिट्झ यानें तिला दिली. इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें वसाहती, समुद्रावरील सत्ता व जगांतील व्यापार काबीज करण्याकरितां अखंड वैर आहे हें ती जाणून होती व त्यामुळें फ्रान्सशीं मैत्री करणें परिणामीं तिला हितकरच होतें. परंतु आज सुमारें तीनशें वर्षें ज्या देशाशीं आपण शत्रुत्व पत्करलें तो देश आपल्याशीं सख्य जोडण्यास तयार होईल असें तिला स्वप्नांतही वाटलें नाहीं. शेवटीं ही अशक्य गोष्ट शक्य करून दाखविण्यास तिचा प्रधान कॉनिट्झ तयार झाला व तो पॅरिसला गेला. तेथें मॅडम पँपेडॉर या कारस्थानी स्त्रीच्या वशिल्यानें त्यानें अखेर सन १७५६ मध्यें ऑस्ट्रिया व फ्रान्स यांचा संघ स्थापन करून आपला शब्द खरा केला. त्याच वर्षीं रशियानेंही ऑस्ट्रियाबरोबर मैत्रीचा तह केला होता. ही बातमी कळतांच इंग्लंडनेंही आपण एकाकी राहूं नये म्हणून प्रशियाच्या फ्रेडरिकशीं सन १७५६ मध्यें मैत्रीचा तह करून ऑस्ट्रिया व फ्रान्स यांच्या मैत्रीला चांगलेंच उत्तर दिलें. अशा तऱ्हेनें युरोपांत दोन तट पडले. मात्र सप्तवार्षिक युद्धाचा वणवा पेटविण्याचें काम फ्रेडरिकनें केलें.

५. इंग्लंड युद्धांत कां पडलें ? :—खरें पाहतां हें युद्ध युरोपियन राष्ट्रांतील चुरशीमुळें होऊं घातलें होतें. प्रशियाची जर्मनींतील वाढती सत्ता ऑस्ट्रिया व रशिया यांना पसंत नव्हती व ऑस्ट्रियाला प्रशियाकडून सायलेशिया प्रांत परत मिळवावयाचा होता हें सप्तवार्षिक युद्धाचें खरें कारण; परंतु इंग्लंडचा पिढीजात शत्रू या युद्धांत पडणार हें कळतांच इंग्रजांनाही गप्प बसवेना. फ्रेंच लोकांविरुद्ध त्यांच्या अनेक तक्रारी होत्या व सामोपचारानें त्या मिटण्यासारख्या नव्हत्या. त्यांच्यामधील चुरस व वैर एकसारखें वाढतच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. प्रथम म्हणजे युद्ध सुरू झाल्यास फ्रान्स हॅनोव्हर प्रांतावर स्वारी करील ही इंग्लंडला भीति होती. अमेरिकेंतील वसाहती व हिंदुस्थानांतील व्यापार याबद्दल त्या दोन्ही देशांत अखंड चुरस होती. अमेरिकेंतील कानडाच्या दक्षिण



भागांत किल्ले बांधून व आपली बळकटी करून इंग्रजांच्या अमेरिकन वसाहतवाल्यांची गळचेपी करण्याचें धोरण फ्रेंचांनीं स्वीकारलें होतें. अमेरि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केच्या अंतर्भागांत इंग्रजांना फ्रेंच लोक जाऊं देत नसत व तेथील रेडइंडियन लोकांशीं व्यापार करण्यास ते इंग्रजांस हरकत करीत. यामुळें फ्रेंच व इंग्रज यांच्यामध्यें सरहद्दीवर नेहमीं चकमकी उडत. हिंदुस्थानांतही फ्रेंच व इंग्रज यांच्यामध्यें झगडा सुरू होऊन डुप्लेनें इंग्रजांस हिंदुस्थानांतून हांकून देण्याकरितां चंग बांधला होता. तसेंच समुद्रावरील स्वामित्वाबद्दलही त्या दोन्ही राष्ट्रांत अखंड स्पर्धा चालूच होती. अशा स्थितींत सप्तवार्षिक युद्धांत इंग्लंडला तटस्थ राहून भागणार नव्हतें. आपल्या वसाहती, आपला व्यापार व समुद्रावरील आपली इभ्रत यांच्या संरक्षणाकरितां इंग्लंडला या युद्धांत पडावें लागलें.

६. युरोपांतील युद्धप्रसंग :—सप्तवार्षिक युद्धाला सन १७५६ मध्यें सुरुवात झाली. त्या वेळीं इंग्लंडचा चोहींकडे पराभव होऊं लागला. भूमध्य-समुद्रांतील इंग्रजांच्या ताब्यांतील अत्यंत महत्त्वाचें ठाणें–मिनोर्का बेट–फ्रेंचांनीं जिंकून घेतलें. त्या बेटाचें संरक्षण करणारा दर्यासारंग बिंग यानें नेभळटपणा दाखविला म्हणून पुढें त्याला फाशीं देण्यांत आलें. त्याच वेळीं फ्रेंचांनीं हॅनोव्हर प्रांतावर हल्ला करून तोही काबीज केला. त्या वेळीं दुसऱ्या जॉर्जचा मुलगा कंबरलंडचा ड्यूक हॅनोव्हरचें संरक्षण करीत होता; परंतु फ्रेंचांना शरण जाण्याशिवाय त्याला गत्यंतर न उरल्यानें त्यानें क्लॉस्टरसेव्हन येथें एक अपमानकारक तह केला. ही बातमी कळतांच दुसऱ्या जॉर्जला धक्काच बसला व 'माझ्या मुलानें माझा नाश करून माझ्या तोंडाला काळोखी फासली' असे शब्द त्याच्या तोंडांतून बाहेर पडले. हॅनोव्हरच्या विजयानें फ्रेंचांचा मारा फ्रेडरिकवर सुरू झाला. दुसऱ्या बाजूनें रशियन लोकांनींही त्याच्यावर हल्ला केला. परंतु फ्रेडरिक दोघांनाही पुरून उरला; व त्यानें फ्रेंच, ऑस्ट्रियन व रशियन सैन्यांचा ठिकठिकाणीं पराभव करण्याचा सपाटा चालविला. समुद्रावर इंग्लंडचें स्वामित्व; पण तेथेंही इंग्रजांची डाळ शिजेना. शेवटीं सर्वत्र पराभव होऊं लागल्यानें सर्व इंग्लिश लोक खवळले. विल्यम पिटला जॉर्ज राजानें राजीनामा देण्यास भाग पाडल्यानें त्यानें मंत्रि-मंडळांतील आपल्या जागेचा राजीनामा दिला. ताबडतोब मुख्य प्रधान लॉर्ड न्यूकासल यानेंही राजीनामा दिला. मोठमोठे मुत्सद्दीही निराश झाले. जिकडे तिकडे इंग्लंडची नाचक्की होऊं लागली. अशा स्थितींत विल्यम पिटनें 'मीच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या आपत्तींतून इंग्लंडला मुक्त करूं शकेन; दुसरा कोणीही नाहीं' असें स्वाभिमानयुक्त उद्गार काढले. न्यूकासल व पिट यांच्यांत छत्तीसाचा आंकडा होता. त्यामुळें व जॉर्जला पिट नको असल्यानें तो मंत्रिमंडळांत येणें अशक्य होतें. शेवटीं न्यूकासल व पिट यांच्यांत तडजोड होऊन पिटचा मंत्रिमंडळांत प्रवेश करण्याच्या अटीवर न्यूकासलनें प्रधानमंडळ बनविलें. विल्यम पिटकडे युद्धखातें सोंपविण्यांत आलें.

७. विल्यम पिट (१७०८–१७७८): पूर्वचरित्र :—विल्यम पिटचा जन्म १५ नोव्हेंबर सन १७०८ मध्यें झाला. त्याचा बाप रॉबर्ट पिट. त्याचा आजा टॉमस पिट कांहीं काळ मद्रासचा गव्हर्नर होता. ईटन व ऑक्सफर्डच्या ट्रिनिटी कॉलेजांत विल्यम पिटचें सर्व शिक्षण झालें. लहानपणापासूनच त्याला संधिवातासारखा रोग जडलेला असल्यामुळें त्याचें खेळांकडे असावें तसें लक्ष नव्हतें. मात्र अभ्यासांत तो उत्तम होता व डेमास्थेनीसच्या ग्रंथांचा व बोलिंगब्रोकच्या लिखाणाचा त्यानें उत्तम अभ्यास केला होता. प्रथमतः त्यानें लष्करांत नोकरी धरली होती. सन १७३५ मध्यें आपल्या वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी ओल्ड सॅरमतर्फे तो पार्लमेंटमध्यें प्रथम निवडून आला व त्यानें तेव्हांपासूनच वॉलपोलला विरोध करण्याचें धोरण स्वीकारलें. त्यामुळें राजा जॉर्ज त्याच्यावर रुष्ट होता; विशेषतः राजकुटुंबाबद्दलही पिटचें धोरण नीट नसल्यानें लष्करांतून त्याची हकालपट्टी झाली होती. त्या वेळीं राजपुत्र फ्रेडरिक यानें त्याला आश्रय दिल्यानें त्याचा संसार चाले. 'हॅनोव्हेरियन राजांचें सर्व लक्ष आपल्या जर्मन संस्थानाकडे असून, ते इंग्लंडचा पैसा त्याच्या कामीं खर्च करतात' असें तो नेहमीं म्हणे. ऑस्ट्रियन वारशाच्या



विल्यम पिट–लॉर्ड चॅटहॅम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युद्धाच्या वेळीं त्यानें वरील टीका केल्यानें राजाच्या मनांतून तो कायमचा उतरला होता. वॉलपोलचे व त्याचे भर पार्लमेंटमध्यें वारंवार खटके उडत. वॉलपोल त्याला ' पोर ' म्हणून चिडवी; परंतु या ' पोरानें ' त्याला सळो कीं पळो करून सोडलें होतें ! तो उत्तम वक्ता होता. असामान्य आत्मविश्वास, निष्कपट अंतःकरण, निस्वार्थी आचरण, अनन्यसाधारण देशभक्ति, निर्भय वागणूक, निर्मल चारित्र्य वगैरे गुणांमुळें त्यानें लोकांत इतकी लोकप्रियता संपादिली होती कीं लोकांनीं त्याला ' थोर देशभक्त ' म्हणून गौरविलें. पेलहॅमच्या मंत्रिमंडळांत राजाची आर्जव करून त्याची प्रथमतः नेमणूक झाली (१७४४) व नंतर सन १७४६ मध्यें सैन्याचा पगार देणाऱ्या खात्याचा प्रधान म्हणून त्याची नेमणूक झाली. पुढें सप्तवार्षिक युद्धाच्या सुरवातीस इंग्लंडची नाचक्की होऊं लागली, त्यावेळीं उत्कट देशाभिमानानें आपल्या देशाला वांचविण्याकरितां तो पुढें आला व न्यूकासलच्या प्रधानमंडळांत युद्धखात्याच्या प्रधानपदावर त्याची नेमणूक झाली (१७५७). युद्धमंत्र्याला लागणारे गुण त्याच्या ठिकाणीं उपजतच असल्यानें त्यानें इंग्लंडाला सप्तवार्षिक युद्धांत शेवटीं जय मिळवून दिला.

८. विल्यम पिटची कामगिरी :—युद्धमंत्री झाल्याबरोबर त्यानें सर्व गोष्टी बदलून टाकल्या. मनुष्याची त्याला उत्तम पारख असल्यानें योग्य माणसें निवडून त्यानें त्यांना भारून टाकलें. असें म्हणतात कीं कोणींही त्याच्याशीं थोडा वेळ बोलणें केलें कीं त्याच्यामध्यें एक प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न होई व त्याच्यांत नवचैतन्य प्रगट होई. सर्व राष्ट्रामध्यें त्यानें आपल्या वक्तृत्वानें दांडगा आत्मविश्वास उत्पन्न केला व लोकांची देशभक्ति शतपटीनें वाढविली. शत्रूवर अचूक मारा कोठें करावयाचा हें त्याला उत्तम कळे. फ्रान्सचा पराभव करावयाचा झाल्यास त्याचा अमेरिकेशीं असलेला संबंध तोडून टाकून, त्या देशाचें सर्व लक्ष यूरोपच्या समरभूमीवर खिळवून ठेवलें पाहिजे हें त्यानें ताबडतोब ओळखलें. आणि म्हणूनच ' अमेरिका जिंकावयाची असेल तर ती जर्मनीच्या समरभूमीवर ' असें तो म्हणत असे. आणि त्यानें या गोष्टीची ताबडतोब अंमलबजावणी केली. हॅनोव्हर प्रांताच्या संरक्षणाकरितां त्याला लढावें लागणार हें सिद्धच होतें; त्याकरितां त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिकडे थोडी फौज पाठवून त्याचें आधिपत्य ब्रन्सविकच्या फर्डिनंडकडे सोपविलें. त्याचप्रमाणें युरोपमध्यें फ्रान्सचें लक्ष गुंतविणें झाल्यास युरोपांत फ्रान्सशीं लढणें योग्य होतें. तेव्हां त्यासंबंधाची सर्व जबाबदारी त्यानें प्रशियाच्या फ्रेडरिकवर टाकून त्याला ताज्या दमाची फौज निर्माण करण्याकरितां व तिला हत्यारेंपात्यारें देण्याकरितां दरसाल सात लक्ष पौंडांची मदत देण्याचें कबूल केलें. यामुळें अधिक जोमानें लढून फ्रेडरिकनें फ्रेंचांना सळो कीं पळो करून टाकल्यानें फ्रेंचांना आपल्या अमेरिकन वसाहतवाल्यांस व हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांस मदत पाठविणें अशक्य झालें. मागील लढायांमध्यें अपेशी ठरलेल्या सर्व नालायक व कर्तृत्वहीन अधिकाऱ्यांना काढून टाकून त्यांच्या जागीं तरुण, कार्यक्षम व उत्साही माणसें त्यानें नेमलीं. स्कॉटलंडमधील लढवय्या हायलंडर लोकांच्या पलटणी त्यानें तयार करविल्या; या पलटणींत सुमारें वीस हजार उत्तम सैनिक होते. या सैन्याचें नेतृत्व फर्डिनंडकडे त्यानें सोपविलें होतें. नाविक दळाकडेही लक्ष पुरवून समुद्रावरही फ्रेंचांचा ठिकठिकाणीं पराभव केला पाहिजे असें त्यानें ठरविलें व त्यानें आपलें आरमार जय्यत तयार ठेवलें.

९. **पिटच्या नव्या धोरणाचा परिणाम** :—पिटनें आपल्या धडाडीच्या कार्यक्रमास एकदम सुरुवात केली. फर्डिनंडनें मिंडेन येथें फ्रेंचांचा पराभव करून हॅनोव्हर प्रांत पुन्हां काबीज करून घेतला. फ्रेडरिकनें फ्रेंच व ऑस्ट्रियन सैन्याचा पराभव केला; त्याचप्रमाणें रशियन सैन्याचाही त्यानें पराभव करून मोठा विजय संपादन केला. दर्यासारंग हॉक यानें क्वीबेरॉन उपसागरांत फ्रेंच आरमाराचा पुरा मोड केला. बॉसकॅव्हेननें भूमध्यसमुद्रांतील ‘ टुलोन आरमार ’ नामक फ्रेंच आरमाराचा पुरा मोड केला. फ्रेंचांचा याप्रमाणें समुद्रावर पराभव झाल्यानें त्यांच्या आरमारी सत्तेचा धुव्वा उडाला व त्यामुळें त्यांना अमेरिकेंत व हिंदुस्थानांत मदत पाठविणें अशक्य झालें. अमेरिकेंतही फ्रेंचांचा पूर्ण पराभव झाला. जेम्स वूल्फ नांवाच्या एका तरुण व शूर सेनापतीच्या नेतृत्वाखालीं त्यानें अमेरिकन वसाहतवाल्यांचें मोठें सैन्य निर्माण केलें व कानडा प्रांत जिंकून घेण्याची कामगिरी पिटनें वूल्फवर सोपविली. वूल्फ मोठा तडफदार व धडाडीचा सेनापति होता. कानडाची राजधानी क्विबेक शहर हस्तगत केल्यास कानडा प्रांत आपल्या ताब्यांत येईल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें त्यानें ताबडतोब ओळखलें. तेव्हां तें ठिकाण काबीज करण्याकरितां आपलें सर्व लष्कर जमा करून तो त्यावर चाल करून गेला. तेथें ॲब्राहाम नांवाची एक उभी व चढण्यास अवघड टेकडी होती. रातोरात वूल्फनें ती टेकडी विलक्षण धैर्यानें व शिताफीनें चढून काबीज केली. त्यावेळीं मॉंटकाम नांवाचा फ्रेंच गव्हर्नर क्विबेकचें रक्षण करीत होता. ॲब्राहाम टेकडी चढून आलेलें इंग्लिश सैन्य पाहून फ्रेंच सैनिक घाबरूनच गेले. त्या वेळीं तुंबळ युद्ध माजून विजयश्रीनें इंग्रजांस माळ घातली. मात्र छातींत

सेनापति वूल्फ

गोळी लागून वूल्फ मृत्युमुखीं पडला (१७५९). क्विबेक इंग्रजांना मिळालें, लगेच मॉंट्रील पडलें व सर्व कानडा प्रांत इंग्रजांच्या ताब्यांत आला. अमेरिकेंप्रमाणेंच हिंदुस्थानांतही पिटनें फ्रेंचांविरुद्ध एकदम उठावणी केली होती.



लॉर्ड क्लाइव्ह

सन १७५७मध्यें प्लासीची लढाई जिंकून लॉर्ड क्लाइव्हनें कीर्ति मिळविली होती. मद्रास प्रांतांत फ्रेंच गव्हर्नर डुप्ले यानें इंग्रजांस फारसा वाव न देतां फ्रेंचांची घडी उत्तम बसविली होती. परंतु तो सन १७५४ मध्यें परत गेल्यावर फ्रेंचांचें तेथील बस्तान बिघडत चाललें होतें. सन १७५८ मध्यें काऊंट लाली पांडीचरीस फ्रेंच गव्हर्नर असतां तें सुधारण्याचा त्यानें प्रयत्न चालविला; परंतु सन १७६० मध्यें इंग्रज व फ्रेंच यांच्यामध्यें वांदीवॉश येथें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फ्रेंचांचा पूर्ण पराभव झाल्यानें मद्रास प्रांतांतून त्यांचें कायमचें उच्चाटण झालें. अशा तऱ्हेनें पिटच्या धोरणानें इंग्रजांना ठिकठिकाणीं यश येत गेलें व फ्रेंचांचा एकसारखा पराभव होत गेला. त्यामुळें सर्व इंग्लंडभर पिटची एकसारखी स्तुति होऊं लागली. त्याच्यामुळें इंग्रजांना ठिकठिकाणीं इतके विजय मिळत गेले कीं रॉबर्ट वॉलपोलचा मुलगा व प्रसिद्ध इंग्लिश ग्रंथकार होरेस वॉलपोल म्हणे कीं ‘ प्रत्येक दिवशीं सकाळीं उठल्यावर इंग्लंडनें आज कोणता विजय मिळविला हें विचारल्याशिवाय इतर काम सुचतच नसे. ’ पिटनें सर्व देशांत एकप्रकारें नवचैतन्य निर्माण केलें, लोकांच्यांतील सुद्‌गुणांस चालना दिली; व आपल्या धडाडीच्या, जोरदार व चढावाच्या धोरणानें इंग्लंडवर आलेलें महत्संकट टाळलें. एवढेंच नव्हे तर इंग्लंडची प्रतिष्ठा वाढवून त्याला सर्व जगांत मान्यतेचें स्थान मिळवून दिलें.

होरेस वॉलपोल

१०. पिटचा राजीनामा (१७६१):—सन १७६० मध्यें दर्यासारंग रॉडने यानें हावरे मुक्कामीं फ्रेंचांचीं जहाजें पकडून फ्रेंचांना चांगलाच चोप दिला व वेस्ट इंडीज बेटांपैकीं अनेक बेटें काबीज केलीं. त्याचवेळीं सन १७६१ मध्यें स्पेन व फ्रान्स यांच्यामध्यें तिसरा गुप्त कौटुंबिक संघ झाल्याची वार्ता पिटच्या कानीं आली. ताबडतोब स्पेनविरुद्ध इंग्लंडनें युद्ध पुकारावें, असा पिटनें आग्रह धरला. त्यावेळीं सन १७६० मध्यें दुसरा जॉर्ज काळजाच्या विकारानें मृत्यु पावल्यानें त्याचा नातू तिसरा जॉर्ज इंग्लंडचा राजा झाला होता. त्याला कौटुंबिक संघाची बातमी खरी वाटली नाहीं व म्हणून त्यानें पिटची सूचना अमान्य केली. त्यामुळें पिटनें आपल्या युद्धमंत्र्याच्या जागेचा राजीनामा दिला. ताबडतोब न्यूकासलनेंही आपल्या मुख्य प्रधानाच्या जागेचा राजीनामा दिल्यानें तिसऱ्या जॉर्जनें आपला पित्त्या लॉर्ड ब्यूट, या नालायक टोरी गृहस्थाला मुख्य प्रधान नेमलें. त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्पेनविरुद्ध युद्ध पुकारलें; पण त्याला व विशेषतः तिसऱ्या जॉर्जला युद्ध नको असल्यानें सन १७६३ मध्यें पॅरिस येथें तह होऊन सप्तवार्षिक युद्धाचा शेवट झाला. पॅरिसचा तह पिटला मुळींच आवडला नाहीं. त्यानें त्याचा जोरानें निषेध व धिक्कार केला. पुढारी होण्याला लागणारे गुण पिटच्या अंगीं नव्हते. पक्षनिष्ठ राजकारण त्याला मनापासून आवडत नसे. पार्लमेंटच्या व्यवहारांत लांचलुचपतीचें वाढलेलें प्रस्थ त्याला कधींच सहन झालें नाहीं. एकंदरींत पाहतां पिटनें सप्तवार्षिक युद्धाच्या वेळीं जी कामगिरी बजाविली ती अमोल ठरली यांत शंका नाहीं. स्वभावानें तो जरा एककल्ली असल्यानें त्याचें इतर सहकाऱ्यांशीं सहसा पटत नसे. परंतु ब्रिटिश आरमाराची त्यानें केलेली संघटना भावी यशाला पोषक ठरली.

११. पॅरिसचा तह व सप्तवार्षिक युद्धाचे परिणाम :—सन १७६३ मध्यें पॅरिस येथें तह झाल्यानें सप्तवार्षिक युद्धाचा शेवट झाला. त्या तहाच्या अटी खालीलप्रमाणें होत. (१) कानडा प्रांत इंग्लंडकडे रहावा व वेस्ट इंडीज बेटांपैकीं टोबॅगो, सेंट व्हिन्सेंट, डोमिनिका, ग्रेनेडा वगैरे बेटें व युरोपांतील मिनोर्का बेट इंग्लंडच्या ताब्यांत रहावें. (२) हिंदुस्थानांतील पॉंडिचरीशिवाय इंग्रजांनीं जिंकलेला सर्व प्रदेश इंग्रजांकडे रहावा. (३) हंडूरासमधील अरण्यांतील लांकूड कापून नेण्याचा इंग्रजांना अधिकार असावा. (४) स्पेननें हॅवानाबद्दल फ्लोरिडा इंग्लंडला द्यावें व त्याबद्दल इंग्रजांनीं जिंकलेलीं फिलिपाईन बेटें स्पेनला मिळावीं. (५) फ्रेंचांना हिंदुस्थानांत व्यापाराची परवानगी असावी. परंतु त्यांनीं आपल्या बंदरांना तटबंदी करूं नये. युट्रेक्टच्या तहाप्रमाणेंच हा तह टोरीपक्षानें घडवून आणला असल्यानें तो अपमानकारक स्वरूपाचा होता असें कित्येकांचें म्हणणें पडलें. ज्या इंग्लंडनें इतक्या धडाडीनें युद्धांत फ्रेंचांचा सर्वत्र पराभव केला, त्याला मिळाले त्यापेक्षांही जास्त प्रांत मिळणें आवश्यक होतें. कसेंही असलें तरी हा तह परिणामीं इंग्लंडच्या फायद्याचाच ठरला. फ्रान्स व इंग्लंड यांच्यामधील इतक्या दिवसांच्या स्पर्धेचा कायमचा निकाल लागून इंग्लंडची समुद्रावरील सत्ता सर्वश्रेष्ठ मानण्यांत आली. अमेरिका व हिंदुस्थान यांतून फ्रेंचांची कायमची हकालपट्टी झाल्यानें जगांतील व्यापार इंग्लंडच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताब्यांत गेला व फ्रेंच साम्राज्यासंबंधाचीं फ्रेंचांचीं सुखस्वप्नें नष्ट होऊन हिंदुस्थानांत व अमेरिकेंत ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला गेला. या युद्धांत अतोनात पैसा खर्च झाल्यानें फ्रान्सची आर्थिक स्थिति खालावून फ्रेंच प्रजेवर करांचें अजस्र ओझें वाढूं लागलें. त्यामुळें फ्रेंच राज्यक्रांतीचा काळ जवळ जवळ येऊं लागला. फ्रेंच लष्कराची कीर्ति नामशेष झाल्यानें लष्करी दृष्टीनेंही फ्रान्सची अपरिमित हानि झाली व त्यांचें लष्कर कमकुवत झालें. मात्र इंग्लंडनें प्रशियाच्या फ्रेडरिकला युद्ध चालू असतांच मदत देण्याचें नाकारल्यानें तो इंग्लंडवर संतापला व पुढें तो इंग्लंडचा शत्रू बनला. तरीही ऑस्ट्रियाचें जर्मनींतील वर्चस्व त्यानें नष्ट करून आपला देश प्रतिष्ठिप्रत नेला. अमेरिकेंतून फ्रेंचांचें उच्चाटण झाल्यानें तेथील इंग्लिश वसाहती निर्भय झाल्या व त्यांच्यामध्यें निर्भेळ स्वातंत्र्याचे वारे वाहूं लागले. एकंदरींत पाहतां अपमानकारक वाटणारा हा तह इंग्लंडला थोडा लाभदायकच ठरला; मात्र या पराभवाचें शल्य फ्रान्सच्या मनांत एकसारखें सलत राहून इंग्लंडवर सूड उगविण्याच्या संधीची तो देश वाट पहात राहिला; व ही संधि त्याला लौकरच प्राप्त झाली.

अभ्यास

१. ऑस्ट्रियन वारशाच्या युद्धाचीं कारणें सांगा. त्या युद्धांत इंग्लंड कां पडलें? त्या युद्धानें काय साधलें?

२. जॅकोबाईटांच्या दुसऱ्या बंडाचीं कारणें सांगा. त्या बंडाची थोडी हकीकत द्या. बंडवाल्यांचा पराभव कां झाला? त्यापूर्वी जॅकोबाईटांनीं कधीं बंडें केलीं होतीं का? केव्हां? त्यांना जॅकोबाईट कां म्हणत?

३. विल्यम पिटचें थोडक्यांत चरित्र सांगा. सप्तवार्षिक युद्धांत त्यानें कोणती कामगिरी बजावली?

४. सप्तवार्षिक युद्धाचीं कारणें सांगा. पॅरिसच्या तहाच्या अटी सांगा. त्याचा परिणाम काय झाला?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. इंग्लंड व फ्रान्स या देशांतील चुरस सप्तवार्षिक युद्धामुळें लयास गेली का ? कशावरून ?

६. एलाशापेलचा तहच सप्तवार्षिक युद्धास कारणीभूत झाला हें म्हणणें सिद्ध करा.

७. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती द्या :—
वूल्फ व क्विबेकचा पाडाव, पॅरिसचा तह, कसाई कंबरलंड, थोर देशभक्त, एलाशापेलचा तह, दुसरें जॅकोबाईट बंड.

उतारा

सन १७१५ सालीं झालेल्या पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं टोरी पक्षाला झालेला खर्च दाखविणारें एक बिल खालीं दिलें आहे. तें उपहासगर्भित असलें तरी त्यावरून त्याकाळीं पार्लमेंटच्या निवडणुकी कशा चालत व लांचलुचपती कशा होत हें उत्तमप्रकारें दिसून येणारें आहे.

१. जमाव गुंतवून ठेवून आयत्या वेळीं आणविणें	पौं.	२०–०–०
२. जमावांतील लोकांच्या डोक्यावर घालण्याकरितां गांठाळ मुंडाशीं	पौं.	३०–०–०
३. आरडा-ओरड व हुल्लड करणारांकरितां	पौं.	४०–०–०
४. 'धर्माकरितां' म्हणून ओरडा करणारांकरितां	पौं.	४०–०–०
५. 'टोरी लोकांसच मतें द्या' असें ओरडणारांस	पौं.	४०–०–०
६. मंदिरांतील थडग्यांवर घालण्याकरितां	पौं.	३०–०–०
७. दारूच्या बाटल्या व लाठ्या यांकरितां	पौं.	२०–०–०
८. घंटा वाजविणें, अनेक प्रकारचे नाद करणें वगैरे	पौं.	१०–०–०
९. बहुरंगी व चमत्कारिक पोषाख करून लोकांस दिपवून टाकण्याकरितां	पौं.	५०–०–०
१०. धर्मलंड लोकांची नालस्ती करणारांस	पौं.	४०–०–०
११. दोन घरें पाडून टाकण्याकरितां	पौं.	२००–०–०
१२. दंगे उत्पन्न करण्याकरितां	पौं.	२००–०–०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३.	दंगेखोरांस आंतून फूस देण्याकरितां	पौं. ४०—०—०
१४.	खोट्या शपथा घेणारांस	पौं. १००—०—०
१५.	प्रवास खर्च	पौं. ५०—०—०
१६.	खिडक्या फोडण्याकरितां	पौं. २०—०—०
१७.	मोठ्या लोकांस शिव्या देणारांस	पौं. ४०—०—०
१८.	खोटें बोलून प्रतिष्ठेनें वावरणारांस	पौं. ५०—०—०
१९.	दारू पाजण्याकरितां	पौं. १००—०—०
२०.	खटले चालविण्याकरितां	पौं. ३००—०—०
	एकूण	पौंड १४६०—०—०

प्रश्न :—१ त्यावेळच्या निवडणुकी लढविण्याकरितां कोणते उपाय योजीत ? कशाकरितां ?

२ वरील उपाय योग्य कां अयोग्य ? कां म्हणून ? ते उपाय तुम्ही योजले असते ? कां नाहीं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८. व्हिग पक्षाच्या सत्तेची अखेरी

१. पेलहॅम व राष्ट्रीय कर्ज :—वॉलपोलच्या पराभवाकरितां अनेक व्हिग टपले होते व त्यांनीं शेवटीं त्याचा पाडाव करून सर्व सत्ता बळकावली हें मागें सांगितलेंच आहे. उज्वल राज्यक्रांतीच्या वेळेपासून सत्ता मिळविण्याकरितां व्हिग लोकांचे एकसारखे प्रयत्न चालू होते; परंतु सन १७१४ पर्यंत त्यांच्या हातीं पूर्णत्वानें सत्ता आली नाहीं. त्यावेळीं उमरावमंडळांत व कॉमन्स सभेंतही व्हिग लोकांचेंच मताधिक्य होतें व त्या मताधिक्याच्या जोरावरच वॉलपोलनें आपली वीस वर्षांची कारकीर्द गाजविली होती. परंतु त्याच्या विरोधकांनीं त्याचा पराभव केल्यानें कार्टरेट, पूलटने, वगैरे लोकांच्या हातीं सत्ता आली. त्यामुळें ज्या टोरी लोकांना वॉलपोलनें दूर केलें होतें त्यांना महत्त्व प्राप्त होऊन कांहीं टोरी लोकांच्या सरकारी नोकऱ्यांत वर्ण्या लागूं लागल्या. वॉलपोलनंतर लॉर्ड विलमिंगटन सन १७४२–४३ पर्यंत मुख्य प्रधान होता व त्याच्या मृत्यूनंतर हेन्री पेलहॅम सन १७४३ पासून सन १७५४ पर्यंत मुख्य प्रधान होता. तो वॉलपोलचा अनुयायी होता. आर्थिक बाबतींत त्यानें एक महत्त्वाची गोष्ट केली. त्याच्याच वेळीं ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध झालें व त्यामुळें राष्ट्रीय कर्जाची रक्कम चांगलीच फुगली. त्यापैकीं बहुतेक सर्व रक्कम भारी दरानें सरकारनें कर्जाऊ घेतली होती. तेव्हां ती रक्कम कमी करावी म्हणून सावकारांनीं कर्जाची सर्व रक्कम परत घ्यावी किंवा आपल्या कर्जावरील व्याजाचा दर कमी करून तो तीन टक्क्यांवर आणावा असें पेलहॅमनें सुचविलें. तेव्हां पेलहॅमची व्याजाचा दर कमी करण्याची सूचना सर्व सावकारांनीं मान्य केली. त्यामुळें कर्जावरील व्याजाचा बोजा कमी झाला. यावेळीं एकंदर राष्ट्रीय कर्ज ७,८०,००,००० पौंड होतें.

२. पंचांगाची सुधारणा :—सन १७५१ मध्यें पेलहॅमच्या मंत्रिमंडळानें एक उपयुक्त सुधारणा घडवून आणली. ती म्हणजे पंचांगाची सुधारणा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होय. या सुधारणेचा पुरस्कर्ता लॉर्ड चेस्टरफील्ड होय. इतके दिवस ज्यूलियस सीझरनें तयार केलेलें पंचांग सर्व युरोपियन देशांतून वापरण्यांत येत असे. त्याप्रमाणें ३६५¼ दिवसांचें वर्ष समजण्यांत येई. परंतु सोयीकरितां त्यानें ३६५ दिवसांचें वर्ष धरावें व दर चार वर्षांनीं ३६६ दिवसांचें वर्ष धरण्यांत यावें असें ठरविलें होतें. परंतु शुद्ध गणितानें ३६५¼ दिवसांचें वर्ष धरल्यास त्यांत अकरा मिनिटें जास्त धरलीं जातात असें ज्योतिषांचें म्हणणें पडलें. तेव्हां सन १५८२ मध्यें पोप तेरावा ग्रेगरी यानें त्याप्रमाणें पंचांगांत सुधारणा करून ज्या वर्षाच्या आंकड्याला चारानें भाग जात असेल तें वर्ष 'वर्धित वर्ष' ऊर्फ 'लीप वर्ष' समजून त्या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्याचे एकोणतीस दिवस धरण्यांत यावेत, असें फर्माविलें. त्याचप्रमाणें अकरा मिनिटांच्या आजपर्यंतच्या चुकीनें सन १५८२ पर्यंत अकरा दिवस जास्त झाले तेही वजा करण्यांत यावे असें त्यानें सांगितलें. त्याच्या सांगण्याप्रमाणें सर्व कॅथॉलिक राष्ट्रांनीं केलें. परंतु इंग्लंड पडलें पोपचें शत्रुराष्ट्र! अर्थात् तें पोपचें फर्मान कसें ऐकणार? त्यामुळें इंग्लंडमध्यें नवें पंचांग अनेक वर्षें रूढ होऊं शकलें नाहीं. पोपबद्दलचा वाईट ग्रह जसजसा कमी होत गेला तसतशी नव्या पंचांगाबद्दलची इंग्रजांची दृष्टीही निवळली. अखेर सन १७५१ मध्यें इंग्लंडनें नव्या पंचांगास मान्यता दिली. सन १७५२ सालच्या २ सप्टेंबर नंतर एकदम १४ सप्टेंबरचा दिवस धरावा व दरसाल २५ मार्चच्याऐवजीं १ जानेवारीला नव्या वर्षास सुरुवात धरावी असें ठरविण्यांत आलें. अर्थात् वरील गणित लोकांस न कळल्यानें आपले १४ दिवस हकनाक गेले असें त्यांस वाटलें व त्यांनीं नव्या पंचांगाच्या कायद्याविरुद्ध बराच गवगवा केला. परंतु त्याचा फारसा उपयोग न होतां इंग्लंडमध्यें नवें पंचांग रूढ झालें.

३. न्यूकासलचें प्रधानमंडळ :—सन १७५४ मध्यें हेन्री पेलहॅम मेल्यानें त्याचा भाऊ टॉमस पेलहॅम ऊर्फ न्यूकासलचा ड्यूक मुख्य प्रधान झाला. त्याचें प्रधानमंडळ दोनच वर्षें टिकलें. या मंत्रिमंडळांत विल्यम पिट ऊर्फ लॉर्ड चॅटहॅम याला सैन्याचा पगार देणाऱ्या खात्यावर प्रधान म्हणून नेमण्यांत आलें होतें. परंतु त्याची पुढें त्या जागेवरून हकालपट्टी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्यांत येऊन फॉक्सची त्याच्या जागीं नेमणूक करण्यांत आली. याच मंत्रिमंडळानें सन १७५६ मध्यें प्रशियाच्या फ्रेडरिकशीं मैत्रीचा तह केला. खरें पाहतां न्यूकासल मुख्य प्रधान होण्याच्या योग्यतेचा नव्हता. पिटचें व त्याचें कधींच जमलें नाहीं. मात्र स्वतःच्या हातीं पार्लमेंटचीं सूत्रें कशीं ठेवावीं हें त्याला पक्कें माहीत होतें. सप्तवार्षिक युद्धाच्या सुरुवातीस इंग्लिशांचा जिकडे तिकडे पराभव होऊं लागून इंग्लंडची नाचक्की झाली. त्याचें खापर आपल्या माथीं फोडलें जाईल या भीतीनें त्यानें सन १७५६ मध्यें राजीनामा दिला. त्यावेळीं पिट व डेव्हनशायरचा ड्यूक यांनीं प्रधान-मंडळ स्थापन करण्याचा प्रयत्न केला; परंतु न्यूकासलनें पार्लमेंटमधून त्या मंत्रिमंडळाला विरोध करण्यास सुरुवात केली. राजालाही पिट नकोच होता; तेव्हां त्यानें पिटला मंत्रिमंडळांतून काढून टाकलें. त्यावेळीं मंत्रिमंडळ बनविण्यास कोणीच तयार होईना. अखेर न्यूकासलनें पिटशीं सख्य जोडून सन १७५६ मध्यें प्रधानमंडळ बनविलें. त्याला पिट-न्यूकासलचें मिश्र प्रधान-मंडळ असें म्हणतात. या प्रधानमंडळानें सप्तवार्षिक युद्ध तडीस नेलें. पुढें हें युद्ध चालू असतांच दुसरा जार्ज मेला व तिसरा जॉर्ज सन १७६० मध्यें गादीवर आला. तिसऱ्या जॉर्जला व्हिग लोकांबद्दल आपलेपणा कधींच वाटत नसे; किंबहुना तो त्यांचा द्वेष करीत असे. टोरी लोकांच्या शिक्षेंत तो वाढल्यामुळें त्याला टोरींबद्दल आपलेपणा वाटूं लागला होता व राजसत्तेचें सामर्थ्य त्याला वाढविण्यास अवसर पाहिजे होता. त्यामुळें त्यानें व्हिग लोकांच्या हातची सर्व सत्ता काढून घेऊन आपल्याला अनुकूल असें टोरी मंत्रिमंडळ नेमलें. अशा तऱ्हेनें सन १७१४ पासून सन १७६० पर्यंत व्हिग लोकांनीं सत्ता भोगली व आपल्या पक्षाचा अपरिमित फायदा करून घेतला.

४. व्हिग लोकांच्या यशाचें मर्मः—सुमारें पन्नास वर्षें व्हिग लोकांच्या हातीं सत्ता राहिली, त्याला तशींच बलवत्तर कारणें घडून आलीं होतीं. सन १६८८ ची उज्वल राज्यक्रांति त्यांनीं घडवून आणली व त्यांच्याच कृपेनें आपल्याला इंग्लंडचें राजपद मिळालें अशी पहिल्या जॉर्जची कल्पना होती. त्यामुळें त्याला व्हिग लोक जवळचे वाटत. त्याला इंग्रजी भाषा येत नसे, इंग्लिश रीतिरिवाज कळत नसत व इंग्लिशांची राजकीय परंपरा त्यास अव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गत नव्हती. यामुळें तो राज्यकारभाराबद्दल अत्यंत उदासीन राहिला. त्यामुळें राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें व्हिग लोकांच्या हातीं राहण्यास मदत झाली. दुसऱ्या जॉर्जनेंही आपल्या बापाचाच कित्ता गिरविला व व्हिगांना उत्तम संधि दिली. या संधीचा व्हिग लोकांनीं चांगला फायदा करून घेतला. त्यांचा पक्ष टोरी पक्षापेक्षां चांगला संघटित व व्यवस्थित होता व त्या पक्षांत उत्तमोत्तम मुत्सद्दी निर्माण झाले. वॉलपोल, कार्टरेट, पेलहॅम, पिट वगैरे व्हिग मुत्सद्यांच्या योग्यतेचा एकही मुत्सद्दी टोरी पक्षांत नसल्यानें टोरी-पक्ष फिका पडला. त्यावेळच्या निवडणुकी व्हिग उमरावांच्या हातांत होत्या. व्हिग उमरावांच्या मालकीचीं अनेक शहरें व नगरें असल्यानें त्यांच्या वजनानें पार्लमेंटमध्यें व्हिग लोकच निवडून येत; ज्या ठिकाणीं असें होत नसे त्या ठिकाणीं पैसे चारून व्हिग लोक निवडणुकी आपल्याशा करीत. यामुळें कॉमन्ससभेंत व्हिग लोकांचेंच वर्चस्व राहिलें. उमरावमंडळांत व्हिग उमरावांचेंच मताधिक्य होतें. यामुळें मंत्रिमंडळाचा पार्लमेंटमध्यें कधींही पराभव होत नसे. खेड्यापाड्यांतील स्थानिक स्वराज्यसंस्थाही व्हिगांच्याच हातीं असत. कॅथॉलिक, डिसेंटर, नॉनकन्फॉर्मिस्ट वगैरे लोकांस व्हिगांनीं धार्मिक सवलती दिल्या व त्यांची सहानुभूति मिळविली. व्यापारीवर्ग व्हिगांचीच तळी उचलीत असे. कारण ते सरकारला पैसा पुरवीत. व्हिग लोक गेले तर स्टुअर्टवंश इंग्लंडांत पुन्हां सुरू होईल व मग आपलें कर्ज बुडेल अशी त्यांस भीति वाटत होती. यामुळें व्यापाऱ्यांनीं व्हिगपक्षालाच मदत करण्याचें ठरविलें. व्हिगपक्षानें हॅनोव्हेरियन राजवंशाचा व प्रॉटेस्टंट-पंथाचा पुरस्कार केल्यानें त्यांच्या सत्तेस लोकांनीं कधींही विरोध केला नाहीं. व्हिग मुत्सद्यांमुळें देशाची भरभराट झाली, इंग्लंडचा व्यापार वाढला, राष्ट्राची पत वाढली, अनेक प्रसंगीं त्यांनीं लोकमताला किंमत दिली, इंग्लंडचें आरमार वाढवून समुद्रावर इंग्लंडची दहशत निर्माण केली, पक्ष-निष्ठ राजकारण व प्रधानमंडळात्मक राज्यपद्धति यांचीं त्यांनीं भरभक्कम पायावर उभारणी केली. थोडक्यांत, व्हिग लोकांच्या कर्तृत्वानें इंग्लंड महत्तम राष्ट्र बनलें असा लोकांचा विश्वास असल्यानें इतक्या दीर्घ काळ त्यांच्या हातांत सत्ता राहूं शकली. परंतु शेवटीं शेवटीं त्या पक्षाची शिस्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बिघडून गेली; हातीं आलेल्या सत्तेचा अनेक व्हिग लोकांनीं स्वार्थाकडे उपयोग केला व ते अनेक लहान मोठ्या शहरांचे मालक बनले. हें लोकांस पसंत पडलें नाहीं. लांचलुचपतीचे प्रकार सर्रास चालत ते अनेकांस पसंत नव्हते. अखेरीस न्यूकासलसारख्या नालायक माणसाकडे व्हिगपक्षाचें नेतृत्व गेल्यानें त्या पक्षाचें महत्त्व संपुष्टांत आलें आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्हिग लोकांचा राजाश्रयच नष्ट झाला. तिसरा जॉर्ज व्हिग लोकांचा द्वेष्टा होता व म्हणूनच त्यानें त्यांच्या हातून सर्व सत्ता काढून घेऊन टोरी लोकांस जवळ केलें. त्यामुळें व्हिग लोकांची सत्ता संपुष्टांत आली.

अभ्यास

१. पेलहॅमनें राष्ट्रीय कर्ज निवारण्याकरितां कोणता उपाय योजिला ? त्यावेळीं राष्ट्रीय कर्ज वाढण्याचें कारण काय ? त्या बाबतींत वॉलपोलनें कोणता उपाय योजला होता ?

२. पंचांगाची सुधारणा करण्याचें कारण काय ? इंग्लंडनें ती इतक्या उशिरां कां केली ? त्याचा परिणाम काय झाला ?

३. व्हिग लोकांच्या हातांत इतकीं वर्षें सत्ता कां टिकली ? त्यांच्या हातांतून ती जाण्यास कोणतीं कारणें घडलीं ?

४. न्यूकासलसंबंधीं माहिती सांगा. तो सत्तेचा अभिलाषी होता काय ? पिटचें व त्याचें न जमण्याचें कारण काय ?

उतारे

१. साऊथ सी कंपनीवर झगझगीत प्रकाश —१७२१

आज राष्ट्राची पत नष्ट झाली, देशाचा व्यापार साफ बुडाला, उद्योगधंदे रोडावले, देशांत संपत्ति दिसेनाशी झाली, गरिबापासून श्रीमंतापर्यंत सर्व दर्जाचे लोक, आजपर्यंत कधींही सोसल्या नसतील अशा आपत्ति भोगीत आहेत. हें सर्व नग्न सत्य असून तें आज सर्वांस विदित आहे आणि या सर्व आपत्तींच्या बुडाशीं एक कुटाळ कंपू आहे. लांच खाऊन श्रीमंत होणारे हे लोक आजपर्यंत चिखलांत, घाणींत लोळत होते. परंतु या उलट्या काळजाच्या लोकांस त्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलींच जाणीव नाहीं. उलट आपल्या मढ्यांच्या शांतीकरितां ते एकसारखे धडपडत आहेत आणि हेच लोक आज तीन प्रमुख व्यापारी कंपन्यांचे धुरीण बनले आहेत. या लांडग्यांनीं दरबारच्या लोकांस भुरळ पाडली, उमरावांच्या डोळ्यांत धूळ टाकली, पराक्रमी सैनिकांना व धर्मगुरूंसही चकविलें, व्यापाऱ्यांस फसविलें, दुकानदारांस नाडलें व सर्व लोकांस भुलवून स्वतःच्या तुंबड्या भरून घेतल्या. त्यांनीं शेअर्सचे कागदी घोडे काय नाचविले व एका पौंडाची किंमत दहा पौंड होईल म्हणून काय सांगितलें ! सगळाच चोरांचा बाजार ! ! झालेला फायदा स्वतःच्या घशांत घालून व वर ढेकर देऊन या नादान व दुष्ट लोकांनीं नीच मार्गांचा अवलंब करून या देशांतील लोकांस सफ्फा नागविलें !

प्रश्न :—१. वरील उतारा कोणीं लिहिला असावा ? कशावरून ?

२. त्यांतील भाषेबद्दल तुम्हांस काय सांगतां येईल ? लेखकाची भावना स्पष्ट होते का ? कशावरून ? तुम्हीं असें केव्हां लिहिलें असतें ?

२. वुड नामक इंग्रजास कंत्राट मिळालें !—१७२४

पुढील हकीकत माझ्या देशबांधवांच्या व त्यांच्या मुलाबाळांच्या फायद्याची आहे व त्यांचे कपडे, पोट व सर्व जीवित त्यावर अवलंबून आहे. म्हणून माझ्या बांधवांनीं व आयर्लंडवर प्रेम करणारांनीं खालील हकीकत मुद्दाम वाचावी व मनन करून चित्तांत सांठवून ठेवावी. अनेक वर्षांपूर्वीं या देशांत तांब्याचीं पेन्स व अर्धा पेन्सचीं नाणीं प्रचारांत होतीं. तीं आतां दुर्मिळ झाल्यानें अनेक खोटीं नाणीं प्रचारांत येऊं लागलीं. ब्रिटिश सरकारकडे अनेक अर्ज-विनंत्या केल्या; पण दाद लागली नाहीं. नवीं नाणीं पाडण्याची परवानगीही मागण्यांत आली; तीही नाकारण्यांत आली. शेवटीं वुड नामक एका यःकश्चित् इंग्रजास एक लाख पौंडांचीं तांब्याचीं नाणीं पाडण्याची ब्रिटिश सरकारनें परवानगी दिली. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे खुद्द इंग्लंडमधील पेनी व अर्ध पेनीचीं तांब्याचीं नाणीं, त्यांच्यांतील तांब्याच्या वजनाच्या मानानें, थोडीं किंमतवान आहेत; परंतु वुडनें तयार केलेलीं नाणीं इतक्या हिणकस धातूचीं आहेत व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लिश नाण्यांपेक्षां इतकीं लहान आहेत कीं तीं बाजारांत विक्रीकरितां नेलीं तर एक शिलिंग किंमतीच्या नाण्याची एक पेनीसुद्धां हातीं लागणार नाहीं ! आणि वुडला दिलेल्या एक लक्ष पौंडांबद्दल या देशाच्या हातीं नाण्याच्या रूपानें सरासरी आठ-नऊ हजार पौंड तरी लागले म्हणजे मिळविली ! ! आतां साहजिकच असा प्रश्न उद्भवतो कीं वुडला हें नागवें कोल्हें भेटलें कसें ? या प्रश्नाचें उत्तरही अगदीं सोपें आहे. वुड जातीनें इंग्रज आहे; अर्थात् दरबारांतील लोकांस खुष करण्याचे सर्व मार्ग त्याला माहीत असणारच. मी मी म्हणणाऱ्या उमरावांस व मोठमोठ्या व्यापारी गृहस्थांस त्यानें मागें सारून हें कंत्राट मिळविलें तें कोणत्या उपायानें, हें सुज्ञांस सहज कळेल ! आमची विनंति इतकीच कीं राजेसाहेबांनीं हें कंत्राट एकदम परत घेऊन आपल्या आयरिश प्रजेचा दुवा घ्यावा.

—ड्रेपियरच्या पत्रावरून

प्रश्न :—१. वरील उतारा वाचून आयरिश लोकांस वुडला मिळालेल्या कंत्राटाबद्दल काय वाटलें तें सांगा. त्यांस तें कां आवडलें नाहीं ?

२. एखाद्या इंग्रजास न मिळतां तें एखाद्या आयरिश गृहस्थास मिळतें तर आयरिश लोकांस तें आवडलें असतें का ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श इ. स. १७४०–६०

वर्ष	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	यूरोप-महत्त्वाच्या गोष्टी	हिंदुस्थान-महत्त्वाच्या गोष्टी	प्रसिद्ध व्यक्ति
१७४०	ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध सुरू	फ्रेडरिक सायलेशिया घेतो	पेशवा नानासाहेब	वॉलपोल नानासाहेब,
१७४२	वॉलपोलचा राजीनामा			कार्टरेट,
१७४३	डेटिंजनची लढाई	दुसरा कौटुंबिक सं. फ्रान्स व स्पेन		
१७४५	दुसरें जॅकोबाईट बंड	ड्रेसडेनचा तह	लाबरडोने मद्रास घेतो	पेलहॅम,
१७४८	एलाशापेलचा तह		रघूजीची बंगालवर स्वारी	रघूजी भोसले,
१७५१	पंचांगांत सुधारणा		अर्काटचा वेढा	क्लाइव्ह,
१७५४	पेलहॅमचा मृत्यु		कुंभेरीचा वेढा	राघोबा, मल्हा.
१७५६	इंग्लंड-प्रशिया तह	फ्रान्स-ऑस्ट्रिया-रशियासंघ	अबदालीची ३ री स्वारी	थोरला पिट,
१७५६	सप्तवार्षिक युद्ध सुरू		कलकत्त्याची अंधार कोठडी	न्यूकासल,
१७५७	पिट-युद्धमंत्रि	क्लॉस्टरसेव्हनचा तह	प्लासीची लढाई	दत्ताजी शिंदे,
१७५८			राघोबा-अटके.झेंडा	लाली,
१७५९		वूल्फ क्वीबेक घेतो	उदगीरची लढाई	नजीबखान,
१७६०	दुसऱ्या जॉर्जचा मृत्यु		वांदीवॉशची लढाई कुंजपुरा काबीज	सदाशिवराव,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९. जॉर्ज, तूं खराखुरा राजा हो बरं !

१. तिसरा जॉर्ज-स्वभाव :—तिसऱ्या जॉर्जचा जन्म सन १७३३ मध्यें झाला. दुसऱ्या जॉर्जच्या मागून तो राज्यावर आला. त्या वेळीं त्याचें वय अवघें बावीस वर्षांचें होतें. त्याचा बाप फ्रेडरिक हा सन १७७१ मध्येंच मृत्यु पावल्यानें तिसऱ्या जॉर्जला आपल्या आजानंतर इंग्लंडचें राज्य मिळालें. त्याचें सर्व शिक्षण इंग्लंडमध्यें झालें होतें. इंग्लिश रीतीभाती त्याला पूर्णपणें अवगत होत्या. इंग्लिश लोकांस तो चांगला ओळखीत होता. 'इंग्लंड-बद्दल मला अभिमान वाटतो,' असें तो बोलून दाखवी. त्यामुळें तो लोकांस आवडे. 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' त्यानें प्रत्यक्ष अमलांत आणली होती. प्रेमळ, मायाळू, सद्गुणी, सत्यप्रिय, मोकळ्या मनाचा जॉर्ज थोडा कुर्रेबाज, हट्टी व हेकेखोरही होता. तो उधळ्या नव्हता व खर्चही बेताबातानें करी. बुद्धीचें बळ कमी असलें तरी त्याची भरपाई तो सततोद्योगानें करी. मनानें तो कोता होता. हॅनोव्हरबद्दल त्याला फारसें प्रेम वाटत नव्हतें व त्यामुळेंही तो इंग्रजांस आवडे. त्याचें चारित्र्य शुद्ध होतें.

तिसरा जॉर्ज

तिसऱ्या जॉर्जची राणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व त्याबद्दल कोणासही शंका घेतां येत नसे. त्याच्यावर त्याच्या आईच्या शिक्षणाचा चांगलाच पगडा बसलेला होता. ती कोत्या मनाची व टोरी पक्षाची अभिमानी होती. प्रसिद्ध टोरी पुढारी बोलिंगब्रोक याच्या 'देशभक्त राजा' या पुस्तकाचा तिच्या मनावर बराच परिणाम झालेला असल्यानें ती जॉर्जला नेहमीं म्हणे 'जॉर्ज, तूं खराखुरा राजा हो बरं.' याचा परिणाम त्याच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्यालाही 'देशभक्त राजा' या पुस्तकाच्या वाचनानें व मननानें टोरी पक्षाबद्दल सहानुभूति व व्हिग पक्षाबद्दल द्वेष वाटूं लागला होता. अर्थात् व्हिग लोकांच्या हातची सत्ता नष्ट करून राजसत्तेची इभ्रत वाढविली पाहिजे असें त्याला वाटूं लागलें. लॉर्ड ब्यूट या टोरी गृहस्थाचेंही त्याच्यावर बरेंच वजन होतें. शेतीची व शेतकऱ्यांच्या जीवनाची त्याला फार आवड होती. विंडसर किल्ल्यांतील राजवाड्यांत रहात असतां अनेक शेतकऱ्यांमध्यें तो मिसळे व त्यांच्याशीं तो आपुलकीनें वागे. शेतीची सुधारणा करण्याकरतां त्यानें पुष्कळ प्रयत्न केला. त्यामुळें 'शेतकऱ्यांचा राजा' असेंही सामान्य लोक त्याला संबोधीत.

२. तिसऱ्या जॉर्जचें ध्येय व धोरण:—सन १७६० सालीं तो गादीवर बसला. त्याच वेळीं पूर्वीच्या राजांची अनियंत्रित सत्ता आपल्याला भोगतां येणार नाहीं म्हणून त्याला अतोनात वाईट वाटलें. त्याच्या वेळचे स्पेन, प्रशिया, ऑस्ट्रिया, रशिया वगैरे देशांचे राजेही अनियंत्रित होते; मग त्यांच्यासारखी अनियंत्रित सत्ता आपल्यालाही कां उपभोगतां येऊं नये? असें त्याला नेहमीं वाटे. राजाची सत्ता नियंत्रित करण्यास कोणी कारणीभूत झाले असतील तर ते व्हिग लोक होत असें त्याचें ठाम मत होतें. आपल्या आजानें व पणजानेंही व्हिग लोकांस मदत केली होती, याचें त्याला वैषम्य वाटे. तेव्हां ज्या व्हिग लोकांनीं राजसत्ता निस्तेज करून टाकली, त्यांचें निर्दालन करून आपलें पूर्ववैभव व आपली सत्ता परत मिळविलीच पाहिजे असें त्यानें ठरविलें. अर्थात् हें ध्येय सिद्ध व्हावयाचें असल्यास व्हिग लोकांनीं आजवर जे उपाय योजले तेच उपाय योजून त्यांची सत्ता प्रथमतः नष्ट करणें योग्य होय असें त्याचें मत झालें. त्याकरितां प्रथमतः त्यानें लांचलुचपतीच्या धोरणानें पार्लमेंटमध्यें आपल्या बाजूचें मताधिक्य करण्यास सुरुवात केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचप्रमाणें पदव्या, अधिकाराच्या जागा, पेन्शनें, बक्षिसें वगैरेंची खैरात करून त्यानें आपल्या बाजूला पार्लमेंटचे सभासद मिळविण्याचें ठरविलें. एवढेंच नव्हे तर खुद्द पार्लमेंटमध्यें एक 'राजपक्ष' स्थापन करून, त्या पक्षांत शरमिंधे करून ठेवलेल्या या सगळ्या लोकांस त्यानें ओढलें. राजाला हरतऱ्हेनें मदत करावयाची, त्याची री ओढून त्याच्या प्रधानांस भरपूर साहाय्य करावयाचें व विरोधी पक्षाला नामोहरम करावयाचें एवढेंच राजपक्षाचें काम. परंतु या बाबतींत त्यानें एक मात्र सावधगिरी राखली होती. व्हिगपक्षाला नामोहरम करावयाचें असलें तरी टोरीपक्षाच्या पूर्णपणें कह्यांत जावयाचें नाहीं असें त्यानें ठरविलें होतें. एकंदरींत पाहतां नामधारी राजा होऊन राहण्यापेक्षां खराखुरा राजा होण्याचें तिसऱ्या जॉर्जनें ठरविलें होतें. राजाचा व प्रजेचा प्रत्यक्ष संबंध आला पाहिजे, राजाच्या अधिकारांचें रक्षण झालें पाहिजे, मर्जीला येईल त्याप्रमाणें त्याला आपले प्रधान निवडतां व त्यांना दूर करतां आलें पाहिजे असें त्याचें मत होतें. राजा म्हणजे लोकांचा प्रतिनिधी आहे, एखाद्या पक्षाच्या हातचें तो बाहुलें नाहीं, हें त्याला सिद्ध करावयाचें होतें. आणि याच विचारसरणीवर त्याच्या कारभाराचें मुख्य सूत्र गोवलें गेलें होतें. एकपक्षीय प्रधानमंडळाची पद्धति त्याला मोडून टाकावयाची होती व वाटेल त्या पक्षाचे प्रधान नेमून त्या सर्वांना आपल्या मुठींत ठेवण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. ती साध्य करून घेण्याला त्याला संधि व साधनेंही भरपूर होतीं.

३. राजाचे पहिले प्रयत्नः—वरील हेतूंनीं प्रेरित होऊन आपलें ध्येय गांठण्याकरितां त्यानें प्रथमतः पिट व न्यूकासल यांना राजीनामा देणें भाग पाडलें व त्यांनीं तसें केल्यावर आपला आवडता टोरी गुरु लॉर्ड ब्यूट याला त्यानें मुख्य प्रधानाचीं वस्त्रें दिलीं (१७६२). लॉर्ड ब्यूट मुख्य प्रधान झाल्याबरोबर सप्तवार्षिक युद्ध संपुष्टांत आणण्याचा लकडा राजानें त्याच्या मागें लावला. त्याप्रमाणें लॉर्ड ब्यूटनें सन १७६३ मध्यें पॅरिसचा अपमानकारक तह कसाबसा घडवून आणला. लढाईच्या कटकटींतून मोकळा झाल्यावर जॉर्ज आपल्या ध्येयाच्या पूर्ततेच्या उद्योगाला लागला. यावेळीं पार्लमेंटमध्यें व्हिगपक्षाचें बहुमत होतें. तथापि व्हिग पक्षांत लाथाळी सुरू

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होती व कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता. या गोष्टीचा फायदा घेण्याचें ठरवून जॉर्जनें अनेक उपाय योजले व ब्यूटच्या पक्षाला पार्लमेंट-मध्यें मताधिक्य मिळवून दिलें. परंतु जॉर्जला आपला उद्देश एकदम साध्य करतां येणें शक्य नव्हतें. गेल्या पंचेचाळीस वर्षांत जे राज्यघटनात्मक प्रघात व्हिग लोकांनीं रूढ केले होते ते चुटकीसरसे नष्ट होणें अशक्य होतें व त्यामुळें आपला बेत हळूहळू साध्य करून घेणें जरूरीचें आहे हें जॉर्ज ओळखून होता. त्यामुळें पहिल्या दहा वर्षांत त्यानें अनेक वेळां प्रधानमंडळांमध्यें आपल्या मर्जीप्रमाणें फेरफार केले. त्या काळीं मुख्य प्रधान म्हणून जे लोक लाभले त्यांत त्याच्या कसोटीस एकही उतरला नाहीं. शेवटीं सन १७७० मध्यें लॉर्ड नॉर्थ हा टोरी गृहस्थ त्याला मुख्य प्रधान म्हणून लाभला व राजाला तो पसंत पडला. त्यामुळें तो सुमारें बारा वर्षें मुख्य प्रधान राहिला. या काळांत जॉर्ज वाटेल तसा वागला, आपल्या ध्येयपूर्तीकरितां त्यानें वाटेल ते उपाय योजले, मन मानेल तसा कारभार केला व अत्यंत हेकेखोरपणानें वागून आपली नाच-क्कीही करून घेतली. आपल्या ध्येयपूर्तीच्या भरांत तो प्रधानमंडळाच्या सभांस हजर राहूं लागला. 'राजाच्या भाषणांत' आपल्या प्रधानांना न विचारतां वाटेल ते फरक करूं लागला व तो स्वतः पक्षनेता बनला. अर्थात् या सर्व गोष्टी गेल्या पंचेचाळीस वर्षांत जे प्रघात व ज्या रूढी पडल्या त्यांच्या विरुद्ध होत्या यांत शंका नाहीं. पार्लमेंटच्या कामकाजांत तो जातीनें लक्ष घालूं लागला व राज्यकारभारांतही त्याच्या म्हणण्याप्रमाणेंच इकडचें पान तिकडे हलूं लागलें. या सर्व गोष्टी पाहून त्याच्या आईला इतकी धन्यता वाटली, कीं 'धन्य माझा मुलगा!' असे उद्गार तिच्या मुखांतून बाहेर पडूं लागले.

४. सुरुवातीचीं प्रधानमंडळें (१७६२–७०) :—आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीला जॉर्ज लोकप्रिय होता व त्यामुळेंच त्याला वरील गोष्टी करतां आल्या. लॉर्ड ब्यूट मुख्य प्रधान झाल्यावर त्यानें पॅरिसचा तह घडवून आणला, ही गोष्ट लोकांस पसत पडली नाहीं. तो स्वतः टोरी स्कॉचमन होता व त्यानें अनेक स्कॉच लोकांस नोकऱ्या लावून दिल्या. त्याचें हें करणें लोकांस पसंत पडलें नाहीं व त्यांनीं लॉर्ड ब्यूटविरुद्ध काहूर करण्यास सुरु-वात केली. तेव्हां राजानें त्याला कामावरून दूर केलें (१७६३). पुढें जॉर्जनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जॉर्ज ग्रेनव्हिल याला मुख्य प्रधान नेमलें. तो व्हिगपक्षाचा होता. याच्याच कारकीर्दीत विल्कसचें प्रकरण उपस्थित झालें व अमेरिकन वसाहतींवर कर लादण्यास सुरुवात झाल्यानें तेंही प्रकरण चिघळूं लागलें. पुढें राजाचें व त्याचें कांहीं कारणावरून बिनसल्यानें राजानें त्याला दूर केलें (१७६५). पुढें लॉर्ड रॉकिंगहॅम या व्हिग पुढाऱ्याला राजानें मुख्य प्रधान नेमलें. अमेरिकेच्या संबंधाच्या धोरणांत त्यानें थोडा बदल करून तेथील वातावरणांत शांतता निर्माण केली. परंतु राजाला तो आवडत नसल्यानें सन १७६६ मध्यें त्यानें त्याला राजीनामा देण्यास भाग पाडलें. त्याच वर्षी पिट (लॉर्ड चॅटहॅम) व ग्रॅफ्टन यांनीं पहिलें मिश्र प्रधानमंडळ बनविलें. चॅटहॅम आजारीच होता व राज्यकारभार करण्याची ताकद त्याच्यांत नव्हती. यामुळें ग्रॅफ्टननें अमेरिकेच्या बाबतींत अनेक चुका केल्या. विल्कस प्रकरणही त्याला भंडावून सोडीत होतेंच. तेव्हां सर्व गोष्टी अंगावर आल्यानें त्यानें राजीनामा दिला (१७७०). त्यानंतर लॉर्ड नॉर्थ हा टोरी गृहस्थ इंग्लंडचा मुख्य प्रधान झाला. नॉर्थच्या नेमणुकीमुळें राजाचा विजय झाला व व्हिग लोकांचा उच्छेद करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा अंशतः सफळ झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. तरी पण याच्याच वेळीं विल्कस प्रकरण व अमेरिकन प्रकरण धसास लागून त्याच्या हेकेखोर स्वभावामुळें राजसत्ता अनियंत्रित करण्याच्या त्याच्या हेतूस जबरदस्त धक्का बसला.


जॉन विल्कस

५. विल्कसचें प्रकरण (१७६३):—जॉन विल्कस याचा जन्म सन १७२७ मध्यें झाला व तो सन १७६१ त पार्लमेंटमध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रथमतः निवडून आला. दिसण्यांत अत्यंत कुरूप व आचरणानें अत्यंत वाईट असूनही आपल्या मोहक चालचलणुकीनें त्यानें लोकांना नुसतें भारून टाकलें होतें. 'नॉर्थ ब्रिटन' नामक एका साप्ताहिक वर्तमानपत्राचा तो संपादक होता. तें पत्र त्यानें ब्यूटला विरोध करण्याकरितां सुरू केलें होतें (१७६२). त्याचें शिक्षण बेताबाताचेंच असलें तरी तें पत्र त्यानें उत्तम रीतीनें व हुषारीनें चालविलें. त्यांतील हास्य विनोद, वाङ्मयाभिरुचि व सडेतोड विचारसरणी लोकांस फार पटे व त्यामुळें तें पत्र लोकप्रिय झालें होतें. आपण कानडाचे गव्हर्नर अगर कॉन्स्टँटिनोपलचा ब्रिटिश वकील व्हावें असें त्यास वाटत होतें. परंतु त्याची ही इच्छा पूर्ण झाली नाहीं. पुढें आपल्या पत्राच्या पंचेचाळिसाव्या अंकांत त्यानें 'राजाच्या भाषणावर' सडकून टीका केली. प्रसंग असा कीं पॅरिसचा तह नुकताच झालेला व त्याच्या समर्थनार्थ पार्लमेंटमध्यें लॉर्ड ब्यूटनें राजाचें भाषण पार्लमेंटपुढें वादविवादास मांडलेलें. तेव्हां त्याला उद्देशून विल्कसनें आपल्या पत्रांत लिहिलें, "या आठवड्यांतील आपल्या निर्लज्ज कृत्यानें या देशालाच नव्हे तर जगालाही प्रधानमंडळानें थक्क करून सोडलें आहे. आमच्या मुख्य प्रधानाच्या निर्लज्ज प्रलापांस या देशाच्या इतिहासांत तोडच नाहीं! त्यामुळें राजाची अप्रतिष्ठा झाली कीं देशाची, हें सांगतां येत नाहीं. ज्याला सर्व राष्ट्र अत्यंत मान देतें, अशा आमच्या सद्गुणी राजाच्या अत्यंत पवित्र अधिकाराचा दुरुपयोग करण्यांत येऊन त्याचा आशीर्वाद एका अपमानास्पद कृत्यास प्रधानमंडळानें मिळविला, याबद्दल या देशांतील प्रत्येक जण हळहळेल! या कृत्यानें राजाच्या सत्यप्रियतेस, त्याच्या वैभवास व त्याच्या सद्गुणास काळोखी फासण्यांत येऊन त्यामुळें आमच्या मुख्य प्रधानाची परराष्ट्रांत नाचक्की झाल्याशिवाय राहणार नाहीं. 'पॅरिसच्या तहास प्रशियाच्या राजानें मान्यता दिली' असें धडधडीत खोटें विधान राजाच्या तोंडीं घालण्यांत आमच्या प्रधानाला कोणतीही दिक्कत वाटली नाहीं! एवढेंच नव्हे, तर त्या तहानें आमच्या राजेसाहेबांसही पूर्ण समाधान झालें असें आमचे मुख्य प्रधान निर्लज्जपणें सांगतात. खुद्द पार्लमेंटमध्येंही त्याचे किती धिंडवडे उडाले व तो तह तेथें कसा पास करून घेण्यांत आला तें सर्व जगाला माहीत आहे." ही टीका ऐकून जॉर्जचा संताप झाला व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एका निनांवी वारंटानें नॉर्थ ब्रिटन पत्राच्या संपादक, मुद्रक, प्रकाशक वगैरे पन्नास मंडळीस पकडण्यांत येऊन त्यांच्यावर राजद्रोहाकरितां राजाच्या आग्रहावरून खटले भरण्यांत आले. परंतु निनांवी वारंट व तेंही पार्लमेंटच्या सभासदाविरुद्ध काढणें कायदेशीर नाहीं असा युक्तिवाद भर कोर्टांत विल्कसनें लढविला. तो मान्य करून मुख्य न्यायाधीश प्रॅट यानें विल्कसला दोषमुक्त ठरवून सोडून दिलें. तेव्हां अन्याय्य अटकेबद्दल व स्वतःच्या घराची अन्याय्य झडती घेतल्याबद्दल विल्कसनें सरकारकडून पुढें सुमारें दोन हजार पौंड नुकसान भरपाई मिळविली. वरील खटल्यामुळें निनांवी वारंटें बेकायदेशीर ठरलीं व सरकारची फजीती झाल्यानें विल्कसवर सूड उगविण्याची संधि प्रधानमंडळ व राजा शोधूं लागले.

६. विल्कसचें प्रकरण चिघळलें–परिणाम :—आणि ही संधि आयतीच मिळाली. कारण ग्रेनव्हिल मुख्य प्रधान असतां सन १७६३ त त्यानें पार्लमेंटमध्यें विल्कसचें प्रकरण मांडून नॉर्थ ब्रिटनमधील लेख राजद्रोहात्मक आहे असा त्यावर पार्लमेंटकडून शिक्का मारविला; व त्याला उत्तर देण्याकरितां विल्कसला बोलावणें करण्यांत आलें. त्यावेळीं विल्कस हजरच राहिला नाहीं. तेव्हां पार्लमेंटनें त्याच्यावर खटला भरला व त्याला रक्षणबाह्य ठरवून पार्लमेंटमधून त्याची हकालपट्टी केली (१७६४). त्याच वेळीं विल्कसनें स्त्रियांसंबंधीं एक अश्लील प्रबंध लिहून प्रसिद्ध केला. तोही बदनामीकारक ठरविण्यांत आला. तेव्हां विल्कस फ्रान्समध्यें पळून गेला. पुढें सन १७६८ मध्यें तो इंग्लंडमध्यें परत आला व मिडलसेक्स परगण्यातर्फे पार्लमेंटच्या निवडणुकीस उभा राहिला. त्यावेळीं तो मोठ्या बहुमतानें निवडून आला. ही गोष्ट राजाला पसंत न पडल्यानें राजाच्या सांगण्यावरूनच पार्लमेंटनें त्याची निवडणूक अमान्य केली व पूर्वीच्या आरोपाकरितां त्याच्यावर पुन्हां खटला भरण्यांत येऊन त्याला एक हजार पौंड दंड व बावीस महिन्यांची कैदेची शिक्षा देण्यांत आली. विल्कस तुरुंगांत असतांच मिडलसेक्सची पुन्हां निवडणूक झाली. त्यांतही विल्कसच बहुमतानें निवडून आला. तीही निवडणूक अमान्य करण्यांत येऊन फिरून दोनदां निवडणूक करण्यांत आली. शेवटच्या निवडणुकींत राजानें कर्नल लट्रेल याला मिडलसेक्सतर्फे विल्कस-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विरुद्ध उभें केलें होतें; परंतु त्याही वेळीं विल्कसला ११४३ मतें व लट्रेलला फक्त २९६ मतें पडलीं. तरीही पार्लमेंटनें राजाच्या सांगण्यावरून लट्रेल निवडून आल्याचें जाहीर केलें (१७६९). आपण निवडून दिलेला उमेदवार पार्लमेंटनें नाकारला असें कळतांच जनसमुद्र खवळून उठला व त्यानें विल्कसला पाठिंबा देण्याचें ठरविलें. सन १७७० मध्यें विल्कस कैदेंतून सुटला. लोकांनीं त्याला लगेच लंडन कॉर्पोरेशनचा अध्यक्ष म्हणून निवडून दिलें. त्याचे फोटो सर्वत्र वाटण्यांत येऊं लागले, लोकस्वातंत्र्याचा विल्कस कैवारी आहे असें समजण्यांत येऊन त्याच्या अभिनंदनार्थ सर्वत्र टोलेजंग सभा भरूं लागल्या, 'ज्यूनियस' या टोपण नांवाखालीं वर्तमानपत्रांत सरकारवर टीकेची झोड उडविण्यांत येऊं लागली व देशांत सर्वत्र असंतोषाचें वारें खेळूं लागलें. याच सुमारास विल्कसनें चिथावणी दिल्यावरून व्हीवल नामक एका वर्तमानपत्राच्या मुद्रकानें पार्लमेंटमधील कामकाज आपल्या पत्रांत छापलें. लगेच त्याच्यावर खटला भरण्यांत येऊन तो लंडनच्या मेयरपुढें—अर्थात् विल्कसपुढें चौकशीस निघाला. परंतु विल्कसनें त्याला निर्दोषी म्हणून सोडून दिलें. अशाच तऱ्हेचे आणखीही खटले भरण्यांत आले व प्रत्येक वेळीं आरोपी दोषमुक्त होऊन सुटे. यामुळें अखेर पार्लमेंटनें तो नाद सोडून दिल्यानें त्यावेळेपासून पार्लमेंटचें कामकाज सर्रास प्रसिद्ध होऊं लागलें. सन १७७४ मध्यें मिडलससेक्स परगण्यातर्फे विल्कस निवडून आला. पार्लमेंटनें त्याची निवडणूक मान्य केली. एवढेंच नव्हे तर पुढें सन १७६९ मध्यें, निवडणुकीस विल्कस अपात्र आहे अशा अर्थाचा पास झालेला कायदा रद्द करण्यांत आला (१७८२). विल्कस प्रकरणामुळें निनांवी वारंटें बेकायदेशीर ठरलीं; प्रतिनिधि निवडण्याचा मतदारांचा हक्क आहे व पार्लमेंटनें त्यांत ढवळाढवळ करूं नये हें तत्त्व व पार्लमेंटच्या सभासदास पकडतां येत नाहीं हेंही तत्त्व पुन्हां सिद्ध झालें; पार्लमेंटचें कामकाज प्रसिद्ध करणें गुन्हां ठरत असे तो ठरेनासा झाला; लोकांनीं भरविलेल्या सभांचें सरकारावर दडपण पडूं लागून त्या योग्य ठरूं लागल्या, व पार्लमेंटची सुधारणा करणें अत्यावश्यक असल्याचें लोकांच्या निदर्शनास आलें. मुद्रणाचें महत्त्व सिद्ध होऊन मुद्रणस्वातंत्र्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मान्यता मिळूं लागली. राजानें आपल्या हेकेखोर स्वभावाचें प्रदर्शन केल्यानेंच विल्कसचें प्रकरण चिघळलें. या सर्व प्रकारावरून राजा राज्य-कारभारांत प्रत्यक्षरीत्या किती हात घालीत असे हें चांगलें सिद्ध झालें. अखेरीस विल्कसचा जय झाल्यानें लोकांचे हक्क रक्षिले गेले यांत शंका नाहीं. याच सुमारास इंग्लंडमध्यें जहाल सुधारणावाद्यांचा एक पक्ष स्थापन होऊन लोकांच्या हक्कांचें रक्षण करणें हें त्यांचें मुख्य ध्येय ठरलें. विल्कसचें प्रकरण चालू असतांच इंग्लंडमध्यें दुसऱ्याच एका महत्त्वाच्या प्रश्नाबद्दल खडाजंगी चालू होती. तो प्रश्न म्हणजे अमेरिकन स्वातंत्र्याचा प्रश्न होय व हाही प्रश्न जॉर्जच्या हटवादीपणामुळें धसास लागून अखेर अमेरिका स्वतंत्र झाली.

अभ्यास

१. विल्कसचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्यानें कोणकोणत्या बाबतींत सरकारशीं तंटा केला? त्याचा परिणाम काय झाला?

२. विल्कस प्रकरण जॉर्ज राजामुळें रंगलें असें तुम्हांस वाटतें का? कां? तुम्ही विल्कसच्या जागीं असतां तर कसे वागलां असतां? कां?

३. विल्कसचें वागणें योग्य होतें कीं अयोग्य होतें या प्रश्नावर तुमच्या वादविवाद-सभेंत चर्चा करा व त्याचा गोषवारा लिहून काढा.

४. तिसऱ्या जॉर्जचा स्वभाव व धोरण सांगा. तें धोरण त्यानें यशस्वी केलें का? त्याकरितां त्यानें कोणते उपाय योजले?

५. राजानें निरनिराळीं प्रधानमंडळें कोणतीं नेमलीं? कशाकरितां? व्हिगांबद्दल त्याला प्रेम कां वाटत नव्हतें? पॅरिसचा तह त्यानें कां घडवून आणला?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२०. अमेरिका स्वतंत्र झाली

१. अमेरिकन वसाहतींचे तीन गट :—अमेरिकन वसाहतींची वाढ कसकशी होत गेली हें मागें सांगितलेंच आहे. त्यानंतर सन १७३२ मध्यें दुसऱ्या जॉर्जच्या नांवानें जॉर्जिया ही वसाहत स्थापण्यांत आली होती. अशा तऱ्हेनें अमेरिकेंत एकंदर तेरा वसाहती असल्या तरी प्रत्येक वसाहत दुसरी-पासून अगदीं स्वतंत्र व भिन्न होती. त्यांचे एकंदर तीन गट होते. उत्तरे-कडील गटांत न्यू हॅम्पशायर, मॅसाच्युसेट्स, ऱ्होड आयलंड व कनेक्टिकट



अमेरिकन
वसाहतींची वाढ.

(इ.स. १६०० ते इ.स. १७३२.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या वसाहती मोडत होत्या व त्यांना 'न्यू इंग्लंड वसाहती' असें म्हणत. या सर्व प्यूरिटन लोकांनीं स्थापन केल्या असल्यानें तेथें धर्मस्वातंत्र्य होतें. मात्र प्यूरिटन लोक परधर्मीयांस आपल्या पंथाचीं तत्त्वें जबरदस्तीनें स्वीकारावयास लावीत. गुलामगिरीला या वसाहतींत थारा नव्हता व सर्व लोक अंगमेहनत करून शेती करणें, जहाजें बांधणें, जंगलें तोडून लाकूड पैदा करणें, मच्छीमारी वगैरे धंदे करीत. याच गटांतील लोकांनीं अमेरिकन स्वातंत्र्य-युद्धांत महत्त्वाचा भाग व पुढाकार घेतला होता. मध्यवर्ती गटांत पेनसिल्व्हॅनिया, न्यूयॉर्क, डिलावेअर, न्यूजर्सी, व मेरीलँड या वसाहती होत्या. या मूळ डच वसाहती; परंतु इंग्लिशांनीं त्या जिंकून घेतल्या होत्या. त्यामुळें त्यांतील लोक इंग्लिश रक्ताचे होते असें म्हणतां येत नाहीं; कारण या वसाहतींमध्यें अनेक युरोपियनांचा भरणा होता. त्यामुळें येथें एकाच धर्मपंथाचे लोक नसल्यानें धार्मिक दृष्टीनें या वसाहती एक होत्या, असें म्हणतां येणार नाहीं. असें असलें तरी तेथील सर्व लोक दिलसफाईनें रहात असत व सर्व गोष्टी एकोप्यानें करीत. दक्षिण गटांत व्हर्जीनिया, दोन कॅरोलिना व जॉर्जिया या वसाहती मोडत होत्या. गुलामगिरीनें येथें इतकें मूळ धरलें होतें कीं युरोपियनानें आपण कामधंदा करणें अगर जमीन कसणें हें कमीपणाचें मानण्यांत येई. युरोपियन लोक जमिनीचे मालक व त्या कसणें हें गुलामांचें काम समजण्यांत येई. यामुळें सर्व मालक मोठे मिजासखोर बनले होते व राजाश्रयामुळें त्यांचें चांगलेंच फावलें होतें. मका, तंबाखू, बटाटे, साखर, तांदूळ, नीळ वगैरे पदार्थ या गटांतून इंग्लंडमध्यें जात. राजनिष्ठांचें आगर म्हणजे या गटांतील वसाहती होत.

२. इंग्लंड व अमेरिका–राजकीय संबंध:—राजकीयदृष्ट्या पाहतां सर्व वसाहती स्वतंत्र होत्या व तेराही वसाहतींमध्यें स्वतंत्र लोकसभा असून त्यांच्यातर्फे त्या त्या वसाहतींचा कारभार चाले. प्रत्येक वसाहतीवर इंग्लंडच्या राजानें नेमलेला गव्हर्नर असे; परंतु त्याचे अधिकार अत्यंत मर्यादित असत. त्यामुळें गव्हर्नर व लोकसभा यांच्यामध्यें नेहमीं खटके उडत. राजकीय बाबतींत कांहीं वसाहती इंग्लंडच्याही पुढें गेल्या होत्या. कारण सर्व वसाहती आपला अंतर्गत कारभार स्वतः चालवीत, आपल्या वसाहतीकरितां कायदे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करीत, कर बसवीत व फ्रेंच अगर स्पॅनिश वसाहतवाल्यांसही जें स्वातंत्र्य उपभोगतां येत नव्हतें तें स्वातंत्र्य या वसाहतींना पूर्णतया उपभोगतां येत असल्यानें सर्व लोक निर्भय वृत्तीचे होऊन त्यांच्यांत स्वातंत्र्याचें बीज कायमचें रुजलें गेलें होतें. आपल्या स्वातंत्र्यास बाध आला तर तें त्यांस कधींही खपत नसल्यानेंच स्वातंत्र्य युद्धास सुरुवात झाली. सर्व वसाहतींना एकत्र जोडणारी एकही सत्ता त्यावेळीं अमेरिकेंत नव्हती. प्रत्येक वसाहत खुद्द इंग्लंडशीं स्वतंत्ररीत्या निगडित झालेली असल्यानें इंग्लंडच्या धाकानें प्रत्येक वसाहतीचा कारभार चाले. आपापसांत हेवा-दावा, मत्सर, धुसफूस वगैरे अखंड चालत असल्यानें सर्व वसाहतींत एकोपा नव्हता व कधीं काळीं त्यांच्यांत भांडणतंटा झाल्यास तो इंग्लंडच्या वजनानें व दडपणानेंच मिटे. एका वसाहतीचा दुसऱ्या वसाहतीशीं व्यवहार व्हावयाचा असल्यास तोही इंग्लंडच्या मध्यस्थीनेंच होई. यामुळें सर्व वसाहती मांडीस मांडी लावून बसल्या असल्या तरी त्यांचीं तोंडें मात्र परस्परांविरुद्ध होतीं ! अशा या वसाहतींना एकत्र आणण्याचे एकदोनदां प्रयत्न झाले, पण ते फसले. या सर्व वसाहतींचें परकीय सत्तेपासून रक्षण करण्याची जबाबदारी इंग्लंडकडेच होती व त्याकरितां अमेरिकेवर फ्रेंचांचा अगर इतरांचा हल्ला झाल्यास इंग्लंडला अमेरिकेकडे ब्रिटिश फौज व आरमार पाठवावें लागे.

३. इंग्लंड व अमेरिका–आर्थिक संबंध :—व्यापाराकरितां सुरुवातीपासूनच अमेरिकेंत लोक येत. कांहीं लोकांस राजाश्रय असून त्यांना राजाकडून सनदाही मिळत. त्यामुळें अमेरिकेंत बऱ्याच व्यापारी कंपन्या अस्तित्वांत आल्या; परंतु कांहीं लोक स्वतंत्रपणेंही अमेरिकेंत व्यापार करीत असत. या सर्व लोकांनीं अमेरिकेंतील जंगलें तोडून तेथील प्रदेश लागवडीस आणला, दलदलींतून पाणी काढून लावून तो प्रदेश शेतीस उपयुक्त केला, लहान-मोठीं शहरें व बंदरें वसविलीं, अनेक प्रकारचे उद्योगधंदे सुरू केले व अशा रीतीनें कापूस, सागवानी लाकूड, तंबाखू, साखर, तांदूळ, लोखंड, कोळसा, सोनें, रुपें वगैरे अनेक प्रकारचा कच्चा-पक्का माल अमेरिकेंत निर्माण होऊं लागला. यामुळें अमेरिकेची दिवसानुदिवस एकसारखी भरभराट होऊं लागली. तेथील हवापाणीही वसाहतवाल्यांस मानवत असल्यानें व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लंडमध्यें रहात असल्याचाच त्यांस अनुभव येऊं लागल्यानें त्यांचें जीवन आनंदमय झालें होतें. त्यामुळेंच अमेरिकन वसाहतींकडे अनेक बेकार, धाडशी व साहसप्रिय लोकांचा एकसारखा ओघ लागला होता. खुद्द इंग्लिश सरकारला या सर्व गोष्टी माहीत होत्या व म्हणूनच 'वसाहती मातृभूमीच्या फायद्याकरितां आहेत' या सूत्राचे मणी ओढीत असतांच इंग्लंडनें वसाहतींच्या व्यापारावर निर्बंध घालण्यास सुरुवात केली. क्रॉम्वेलच्या कारकीर्दीत सन १६५२ व पुढें १६६० मध्यें नौकानिर्बंधाचे कायदे पास करण्यांत येऊन वसाहतवाल्यांनीं आपला माल इंग्लिश जहाजांतून अगर आपल्या स्वतःच्या जहाजांतूनच इंग्लंडला पाठविला पाहिजे असा निर्बंध घातला गेला. एवढेंच नव्हे, तर अमेरिकेनें महत्त्वाचे जिन्नस इंग्लंडमध्यें पाठविले पाहिजेत व युरोपांत अमेरिकन माल पाठविणें झाल्यास तो प्रथमतः इंग्लंडमध्यें आला पाहिजे व तेथें जकाती दिल्यानंतर तो युरोपमध्यें गेला पाहिजे, असे आणखी निर्बंध घालण्यांत आले. खरें पाहतां, यापेक्षांही कडक व जाचक निर्बंध स्पेन व फ्रान्स या देशांनीं आपल्या वसाहतींवर लादले होते; तरीही इंग्लंडनें वरील कायद्यांची अंमलबजावणी थोडी ढिली ठेवली होती. त्यामुळें 'इंग्लंड केवळ व्यापाराकडे दृष्टि ठेवीत असे, उत्पन्नाकडे नाहीं' अशी टीकाही करण्यांत येत होती. वॉलपोलनें व त्यानंतरच्या प्रधानांनींही व्यापाराच्या बाबतींत अमेरिकनांस अनेक प्रकारच्या सवलती दिल्या व अमेरिकन व्यापाऱ्यांनीं वरील निर्बंध उल्लंघून जो चोरटा व्यापार सुरू केला होता त्याकडे दुर्लक्ष केलें होतें. परंतु वॉलपोलच्या या दूरदर्शी धोरणांत पुढें सन १७५० च्या सुमारास थोडा फरक करण्यांत आला. त्या सालीं एक कायदा करण्यांत येऊन लोखंडी सामान, टोप्या, दगडी कोळसा वगैरे माल उत्पन्न करण्याची अमेरिकनांस बंदी करण्यांत आली व त्यांच्या देशांत उत्पन्न होणारे तंबाखू, कापूस, रंगीत कपडे, सागवानी लाकूड, मासे, साखर वगैरे जिन्नस त्यांनीं फक्त इंग्लंडमध्येंच पाठविले पाहिजेत असें ठरविण्यांत आलें. एवढेंच नव्हे, तर या वसाहतवाल्यांस त्यांच्या शेजारींच असलेल्या स्पॅनिश व फ्रेंच वसाहतींशीं इंग्लंडच्या परवानगीशिवाय व्यापार करतां येत नसे. होतां होतां हे निर्बंध मोडून अमेरिकन व्यापारी आपला व्यापार करीत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचा हा चोरटा व्यापार इंग्रजांस खपत नसे व त्यामुळें अमेरिकेच्या संबं-धींचें धोरण बदललें पाहिजे असें इंग्रज मुत्सद्यांस वाटूं लागलें.

४. वसाहतींसंबंधींचें धोरण बदललें :—पुढें सप्तवार्षिक युद्ध संपल्यावर अमेरिकेवरील व्यापारी निर्बंधांची अंमलबजावणी कडक रीतीनें करण्याचें ब्यूटनें ठरविलें. कानडा हस्तगत झाल्यानें त्या बाजूनें अमेरिकन वसाहतींवर होणारे फ्रेंच हल्ले बंद झाले होते व त्यामुळें वसाहतवाले एकप्रकारें निर्धास्त झाले होते. ही कामगिरी इंग्लंडनें बजावली; मात्र तसें करीत असतां इंग्लंडचें राष्ट्रीय कर्ज अतोनात वाढलें होतें. तेव्हां इंग्लंडच्या कामगिरीकरितां अमेरिकेनें राष्ट्रीय कर्जाच्या परतफेडीकरितां कांहीं पैसे द्यावे असें लॉर्ड ब्यूट म्हणत होता. राजानेंही त्याला उचलून धरलें. त्यानंतर ग्रेनव्हिल मुख्य प्रधान असतां त्यानें अमेरिकनांच्या चोरट्या व्यापारासंबंधीं

ग्रेनव्हिलचा अर्ल

अनेक तक्रारी वाचल्या व त्यामुळें त्यानें सन १७६४ सालीं नौकानिर्बंधाच्या कायद्यांची अंमलबजावणी अत्यंत कडक रीतीनें करण्याचें ठरवून तसे हुकूमही सोडले. त्यामुळें अमेरिकन चिडले; परंतु त्यांस कांहीं करतां येईना. त्यानंतर राष्ट्रीय कर्जाचा प्रश्न त्यानें अमेरिकनांपुढें काढला, तेव्हां वसाहतवाले म्हणूं लागले कीं, “आजपर्यंत अमेरिकन व्यापाराचा मक्ता इंग्लंडनें आपल्या एकट्याकडे घेऊन अपार संपत्ति मिळविली व अमेरिकन व्यापारावर निर्बंध ठेवले तेही आम्ही निमुटपणें सहन केले. तेव्हां इंग्लंडला आतां आमच्याकडे पैसे मागतांच येत नाहीं.” हें ऐकतांच ग्रेनव्हिल रागावला व अमेरिकेवर कर लादण्याचें त्यानें ठरविलें. त्याप्रमाणें सन १७६५ सालीं त्यानें स्टँप ॲक्ट पास करून बक्षिसपत्रें, खरेदीखतें, करारनामे वगैरे सर्व प्रकारच्या कायदेशीर होणाऱ्या दस्तऐवजांवर व वर्त-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानपत्रांवरही अमेरिकनांनीं स्टँप लावलाच पाहिजे असें ठरविलें. या मार्गानें दरसाल एक लक्ष पौंड मिळतील असा ग्रेनव्हिलचा अंदाज होता. इंग्लंडनें आपल्यावर नवा कर लादला हें कळतांच अमेरिकनांना कमालीचा राग आला व आमचे प्रतिनिधि ब्रिटिश पार्लमेंटमध्यें नाहींत; अर्थात् अमेरिकेवर कर लादण्याचा ब्रिटनला अधिकारच नाहीं असें ते म्हणूं लागले. 'प्रतिनिधि नाहींत तर कर मिळणार नाहींत' हें त्यांचें म्हणणें, खरें पाहतां, एका अर्थानें चुकीचेंच होतें; कारण त्यांनीं नौकानिर्बंधाचे कायदे मान्य केले होते. म्हणजे पर्यायानें त्यांनीं ब्रिटिश पार्लमेंटचा अधिकार मान्य केला होता. असें असूनही अमेरिकनांनीं स्टँप ॲक्टाविरुद्ध जोराचें काहूर माजविण्यास सुरुवात केली. निषेधसभा भरल्या, दंगे सुरू झाले, सरकारी कचेऱ्यांवर हल्ले होऊं लागले, स्टँपांचे कागद जाळण्यांत येऊं लागले व ब्रिटिश मालावर बहिष्कार पुकारण्यांत आला. या गोष्टींमुळें ब्रिटनच्या व्यापाऱ्यांचें नुकसान होऊं लागल्यानें शेवटीं रॉकिंगहॅम या मुख्य प्रधानानें स्टँप ॲक्ट सन १७६६ सालीं रद्द केला; तरी अमेरिकेवर कर लादण्याचा ब्रिटिश पार्लमेंटला पूर्ण अधिकार आहे असें एक कायदा करून त्यानें सर्वांस जाहीर केलें. स्टँप ॲक्ट रद्द झाल्यानें आपला विजय झाला असें अमेरिकनांस वाटलें असल्यास नवल नाहीं !

५. अमेरिकन प्रकरण चिघळत चाललें :—स्टँप ॲक्ट पास करूं नये, अमेरिकनांना निष्कारण डिवचूं नये व इंग्लंड व अमेरिका यांच्यामध्यें सलोखा नांदावा एवढ्याकरितां अमेरिकेनें आपल्यातर्फे बेंजामिन फ्रँकलिन याला इंग्लंड-मध्यें आपली तरफदारी करण्याकरितां पाठविलें होतें. परंतु त्याच्या वकिलीचा कांहींही उपयोग न होतां स्टँप ॲक्ट पास झाला होता. त्यामुळें तोही नाखुष झाला होता. पुढें सन १७६६ मध्यें लॉर्ड चॅटहॅमनें प्रधानमंडळ बनविलें. तो आजारी असल्यानें प्रधानमंडळाच्या सभांस गैरहजरच असे. त्याच्या प्रधानमंडळांत टाऊनशेंड नामक

चार्ल्स टाऊनशेंड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक फडणीस होता. त्यानें अमेरिकेसंबंधाचें ग्रेनव्हिलचें धोरण पुढें चालू करून सन १७६७ मध्यें चहा, कांच, शिसें, निरनिराळे रंग, कागद वगैरे अमेरिकेंत जाणाऱ्या मालावर कर बसविला. हा कर अप्रत्यक्ष कर असल्यानें अमेरिकन लोक त्याला विरोध करणार नाहींत असें चार्लस टाऊनशेंड याचें मत होतें व या मार्गानें इंग्लंडला सुमारें चाळीस हजार पौंड दरसाल मिळतील असा त्याचा अंदाज होता; पण पुढें तो फसला. परंतु त्याच्या या कृत्यानें अमेरिकेंत पुन्हां जोरानें चळवळ सुरू झाली, इंग्लंडच्या धोरणाचा निषेध होऊं लागला व इंग्लिश मालावर–विशेषतः वरील वस्तूंवर–बहिष्कार पुकारण्यांत आला. याच सुमारास टाऊनशेंड मृत्यु पावला व त्याची फडणिसाची जागा लॉर्ड नॉर्थनें घेतली. त्यावेळचा मुख्य प्रधान ग्रॅफ्टन याच्या सांगण्यावरून न्यूयॉर्क वसाहतीनें ब्रिटिश फौजांस बराकी देण्याचें नाकारल्यामुळें त्या वसाहतींचें कायदेमंडळ रद्द करण्यांत आलें, गव्हर्नरचा व कायदेमंडळाचा क्षुल्लक कारणाकरितां खटका उडाल्यामुळें मॅसाच्युसेट्स वसाहतीचें कायदेमंडळही रद्द करण्यांत आलें व बोस्टन बंदराचा ब्रिटिश फौजांनीं ताबा घेतला. या सर्व प्रकारांमुळें अमेरिकेच्या असंतोषानें तीव्र स्वरूप धारण केलें. पुढें जकाती वसूल करण्याचा ब्रिटिश अधिकारी जारीनें प्रयत्न करीत असतांच बोस्टनला दंगे झाले. त्यावेळीं गोळीबार करण्यांत आला व त्यांत तीन अमेरिकन मृत्युमुखीं पडले. त्यामुळें अमेरिकनांचें पित्त खवळून त्यांनीं त्या कृत्याला 'बोस्टनची कत्तल' असें नांव दिलें व इंग्लंडविरुद्ध सर्वत्र क्षोभ उत्पन्न करण्यास सुरुवात केली. याच वेळीं सन १७७० मध्यें लॉर्ड नॉर्थ मुख्य प्रधान झाला व त्यानें टाऊनशेंडनें बसविलेल्या सर्व जकाती रद्द केल्या; मात्र राजानें विशेष आग्रह धरल्यामुळें चहावरील जकात मात्र तशीच ठेवण्यांत आली. असें करण्यांत ब्रिटनला अमेरिकेवर कर लादण्याचा पूर्ण अधिकार आहे हेंच जॉर्जला दाखवावयाचें होतें. चहावरील जकात राहिली, त्यामुळेंही अमेरिकन चिडले व ब्रिटनला अमेरिकेवर कर लादण्याचा अधिकारच नाहीं हें पालुपद ते जोरानें गाऊं लागले व ब्रिटनच्या धोरणाविरुद्ध त्यांनीं जोरानें चळवळ चालू ठेवली.

६. बोस्टनचें चहाप्रकरण (१७७३):—नॉर्थनें चहावरील कर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवला; पण तोही केवळ नांवाचा. म्हणजे चहाच्या दर पौंडामागें फक्त तीन पेन्स. परंतु कर लादणें हा तत्त्वाचा प्रश्न असल्यानें अमेरिकनांनीं तोही कर देण्याचें नाकारलें. पुढें सन १७७३ मध्यें लॉर्ड नॉर्थनें ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थानांतून इंग्लंडमध्यें चहा न आणतां तो परस्पर अमेरिकेस नेला तरी चालेल असें ठरविलें. या कृत्यानें त्या कंपनीला इंग्लंडमध्यें जी जकात भरावी लागे ती आपोआपच माफ झाली. त्यामुळें अमेरिकनांचा फायदाच होणार होता. कारण अमेरिकेंत येणाऱ्या चहाची किंमत कमी होणार होती. परंतु खवळलेल्या अमेरिकनांस तें पटलें नाहीं. सन १७७३ च्या डिसेंबरच्या महिन्यांत चहानें भरलेलीं ई. इं. कंपनीचीं जहाजें बोस्टन बंदरांत आलीं असतां रेड इंडियन लोकांचा पोषाख केलेले अनेक अमेरिकन लोक त्या जहाजांवर चढले व त्यांनीं जहाजावरील चहाचीं पिपेंच्या पिपें समुद्रांत ओतून दिलीं. हें कृत्य अनेक अमेरिकन व इंग्लिश मुत्सद्यांस आवडलें नाहीं.



समुद्रांत त्यांनीं चहा ओतून दिला

राजाच्या संतापाचा पाराही एकदम चढला व नॉर्थ वगैरे प्रधानांच्या सामोपचाराच्या धोरणाऐवजीं दडपशाहीच्या धोरणाचा अवलंब करण्याचें त्यानें ठरविलें. त्याबरोबर सन १७७४ मध्यें पार्लमेंटनें एक कायदा पास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून व्यापाराकरितां बोस्टन बंदर बंद करून सर्व व्यापार सालेम बंदरांतून चालावा असें ठरविलें, मॅसाच्युसेट्स वसाहतीची सनद रद्द करून तिचें स्वातंत्र्य हरण केलें व तिचा कारभार राजाच्यातर्फे चालावा असें ठरविलें. चहाप्रकरणांतील सर्वांस पकडून त्यांची चौकशी करण्याकरितां त्यांस इंग्लंडला पाठवावें असा मॅसाच्युसेट्सच्या गव्हर्नरला हुकूमही सोडण्यांत आला. एवढेंच नव्हे तर वरील सर्व गोष्टींची अंमलबजावणी योग्य रीतीनें व्हावी म्हणून अमेरिकेला फौजही पाठविण्यांत येऊन सेनापति गेज याला मॅसाच्युसेट्स वसाहतीचा गव्हर्नर नेमण्यांत आलें. या सर्व कृत्यांनंतर तिसऱ्या जॉर्जला कृतकृत्यता वाटली व त्या भरांतच तो उद्गारला, "मी फांसा तर टाकला आहे; आतां अमेरिकनांचा विजय तरी होईल किंवा त्यांना शरण तरी यावें लागेल."

७. फिलाडेल्फियाची कॉंग्रेस (१७७४):—मॅसाच्युसेट्स वसाहतीच्या स्वातंत्र्यावर आज गदा आली, ती आपल्यावरही कधीं काळीं येऊन आदळेल अशी सर्व वसाहतींना भीति वाटूं लागली. त्यामुळें सर्व वसाहती एक झाल्या व मॅसाच्युसेट्सची तळी उचलून धरून इंग्लंडच्या दडपशाहीच्या धोरणास उत्तर देण्याचें त्यांनीं ठरविलें. या बाबतींत व्हर्जीनिया वसाहतीनें पुढाकार घेऊन सर्व वसाहतींना फिलाडेल्फियाच्या कॉंग्रेसकरितां प्रतिनिधि पाठविण्याची विनंति केली. खुद्द मॅसाच्युसेट्स वसा-

बेंजामिन फ्रँकलिन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हतींतील लोकांनीं आलेल्या परिस्थितीस धैर्यानें तोंड देण्याचें ठरविलें व इंग्लंडच्या नव्या कायद्यांस मान्यता न देतां आपलें कायदेमंडळ भरवून आपलें लष्कर जमा केलें व युद्धाची कडेकोट तयारी चालविली. शेवटीं ठरल्याप्रमाणें फिलाडेल्फिया येथें सर्व वसाहतींची कॉंग्रेस भरली व इंग्लंडला कर लादण्याचा अधिकार नाहीं व मॅसाच्युसेट्स वसाहतीसंबंधीं इंग्लंडनें स्वीकारलेलें धोरण निषेधार्ह आहे असें ठरविलें. यामुळें इंग्लंडमध्येंही भीतीचें वातावरण उत्पन्न झालें. लंडन व ब्रिस्टल येथील व्यापाऱ्यांनीं अमेरिकेशीं सलोखा करावा असें सुचविलें. लॉर्ड चॅटहॅमनेंही भावी संकट टाळावें व अमेरिकेशीं मिळतें घ्यावें असें सुचविलें. बेंजामिन फ्रॅंकलिन अजूनही इंग्लंडांत होताच. त्यानेंही इंग्लिश मुत्सद्यांस परोपरीनें विनवून सर्व कायदे रद्द करण्याबद्दल सुचविलें. बर्कनें कॉमन्ससभेंत व चॅटहॅमनें उमरावमंडळांत तशीं बिलेंही मांडलीं; परंतु या सर्व प्रयत्नांवर राजाच्या हेकेखोरपणानें विरजण पडून अमेरिकेशीं सलोखा करण्याच्या सर्व प्रयत्नांचा कायमचा शेवट झाला. याच सुमारास बेंजामिन फ्रॅंकलिनचा इंग्लंडमध्यें अपमान झाल्यानें तो अमेरिकेस परत गेला. यानंतर अमेरिकन वसाहतींनीं युद्धाची तयारी चालविली व जॉर्ज वॉशिंग्टन याला आपल्या सैन्याचा मुख्य सेनापति नेमलें.

८. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध (१७७५–१७८२):—वसाहतींनीं युद्धाची तयारी चालविली हें कळतांच बोस्टनच्या अधिकाऱ्यांनीं कंकॉर्ड येथील दारूगोळा हस्तगत करण्याकरितां तेथें सैन्य पाठविलें. त्याप्रमाणें त्या सैन्यानें कंकॉर्ड काबीज करून तें बोस्टनकडे परत येत होतें. तेव्हां त्याची व अमेरिकन सैन्याची लेक्सिंगटन येथें लढाई झाली. त्यांत अमेरिकन सैन्याचा पराभव झाला. इंग्रज सैन्याचें मात्र अतोनात नुकसान झालें. हें कळतांच अमेरिकनांनीं इंग्रज सैन्याचा पाठलाग केला व बोस्टन बंदराची नाकेबंदी करण्याच्या हेतूनें त्याच्या शेजारच्या बंकर टेकडीवर तळ दिला. तेथेंही मोठी हातघाईची लढाई होऊन अमेरिकनांचा पराभव झाला. यावेळीं अमेरिकन वसाहतींकडून इंग्लंडकडे तहाबद्दल एक विनंतिअर्ज करण्यांत आला; पण राजानें तो फेटाळला. तेव्हां सन १७७६ मध्यें फिलाडेल्फिया येथें पुन्हां कॉंग्रेस भरली व तिनें 'स्वातंत्र्याचा जाहीरनामा' पास करून आपला व्यापार सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जगास खुला केला. त्याच वेळीं इंग्रजांचा सेनापति हो मोठ्या सैन्यासह वॉशिंगटनवर चाल करून गेला. ब्रुकलिन येथें सन १७७६ मध्यें व सन १७७७ मध्यें ब्रँडीवाईन येथें लढाया होऊन अमेरिकन सेनापति वॉशिंग्टन याचा पराभव झाला व न्यूयॉर्क शहर इंग्रजांच्या हातीं गेलें. पण पुढें सन १७७७ मध्यें सॅराटोगाच्या प्रसिद्ध लढाईंत इंग्रज सेनापति बरगॉइन अमेरिकन सेनापति गेटस् याला शरण गेल्यानें युद्धाचें सर्व पारडें फिरलें. या जयानंतर फ्रान्स अमेरिकेस मिळाला (१७७८) व पुढील वर्षी स्पेनही अमेरिकेस मिळाला. अमेरिकेचें स्वातंत्र्य मान्य करूनच हीं दोन्हीं राष्ट्रें अमेरिकेस मिळालीं होतीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. शिवाय सप्तवार्षिक युद्धांत पराभव झाल्यानें त्याबद्दल फ्रान्सला इंग्लंडवर सूड उगवावयाचा होताच. त्याकरितां ही संधि आयतीच आली व तिचा फ्रान्सनें पुरेपूर फायदा घेतला. परंतु फ्रान्सचें हें कृत्य लॉर्ड चॅटहॅमला मुळींच आवडलें नाहीं. साम्राज्यांतून अमेरिका फुटून जाऊं नये म्हणून पार्लमेंटमध्यें तो मोठ्या कळकळीचें भाषण करीत असतांच मूर्च्छा येऊन पडला व लौकरच मृत्यु पावला (१७७८). सन १७८० हें वर्ष इंग्रजांना अत्यंत हलाखीचें गेलें. त्यावर्षी तटस्थ राष्ट्रांचीं जहाजें तपासण्याचा अधिकार बजावण्याची तत्परता इंग्लंडनें दाखविल्यानें रशिया, डेन्मार्क, स्वीडन, हॉलंड व प्रशिया या सर्व राष्ट्रांनीं इंग्लंडविरुद्ध सशस्त्र-तटस्थ-संघ स्थापन केला व आपण इंग्लंडविरुद्ध केव्हांही युद्ध पुकारूं असें जाहीर केलें. हिंदुस्थानांतही हैदर व मराठे यांनीं इंग्रजांविरुद्ध एकजूट करून, हैदर मद्रासवर व पेशवा मुंबईवर चाल करून गेला. अमेरिकेंतही इंग्रजांचा जोर कमीच होता. अशा वेळीं काय करावें तें इंग्लंडला कळेना. शेवटीं सन १७८१ मध्यें इंग्रज सेनापति लॉर्ड कॉर्नवॉलिस यॉर्कटाऊन येथें अमेरिकनांस शरण गेल्यानें युद्धास कंटाळून इंग्लंडनें १७८२ मध्यें अमेरिकेच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली. त्यानंतरही फ्रान्स व स्पेन यांच्याशीं इंग्लंडचा झगडा चालूच होता. दर्यासारंग रॉडने यानें त्यांचा ठिकठिकाणीं पराभव केला. सेनापति ईलियटनें जिब्रॉल्टरचें संरक्षण केलें. शेवटीं सन १७८३ मध्यें फ्रान्स, इंग्लंड व स्पेन यांच्यांत व्हर्साय येथें तह होऊन युद्ध संपलें. या तहानेंही इंग्लंडनें अमेरिकेच्या स्वातंत्र्यास पुन्हां मान्यता दिली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. **इंग्लंडच्या पराभवाचीं कारणें :**—वरील युद्धांत इंग्लंडचा पूर्णपणें पराभव होऊन अमेरिकेस जय मिळाला यांत आश्चर्य नाहीं. युद्धाचें क्षेत्र इंग्लंडपासून हजारों मैल दूर असल्यानें इंग्लंडला आपल्या सेनापतींना कोणत्याही प्रकारची मदत वेळेवर करतां आली नाहीं. तसेंच अमेरिकेचा भूप्रदेश इंग्रजांस अज्ञात असल्यानें इंग्रज सेनानींस आपल्या हालचाली योग्य तऱ्हेनें करतां आल्या नाहींत. अमेरिकेंत गेलेले सैनिक युरोपियन रणक्षेत्रांत युद्ध कसें चालवावें हें शिकलेले असल्यानें ते अमेरिकन रणक्षेत्रांत कुचकामाचे ठरून त्यांच्यावर नालायकीचा छाप बसला. त्यामुळेंही इंग्रजांस नामोहरम व्हावें लागलें. सुरुवातीस तरी सर्व वसाहतवाल्यांना इंग्लंडबद्दल सहानुभूति वाटत होती; परंतु त्याकडे इंग्रजांनीं लक्षच दिलें नाहीं व युद्ध चालू झाल्यावर अमेरिकनांच्या घरादारांची नासाडी करून त्यांनीं त्यांच्या मनांत इंग्लंडबद्दल चीड उत्पन्न केली. अमेरिकेंतील इंग्रज सैन्य परकी व भाड्यानें आणलेलें होतें. एकट्या इंग्लंडला फ्रान्स, स्पेन, हॉलंड, प्रशिया, रशिया, अमेरिका वगैरे राष्ट्रांशीं झगडावें लागलें; त्यामुळेंही इंग्लंडचा पराभव झाला. मात्र एकट्या इंग्लंडनें इतक्या राष्ट्रांशीं एकाच वेळीं लढाई दिली, हें लक्षांत धरण्यासारखें आहे. इंग्लंडच्या आरमारानें आयत्या वेळीं त्याला दगा दिला. यामुळेंही इंग्लंडची नाचक्की होण्यास मदत झाली. फ्रान्सनें अमेरिकेस आरमार, सैन्य, पैसा, वगैरे रूपानें पुष्कळ मदत केली, हीही गोष्ट विसरून चालणार नाहीं. अमेरिकनांचा सेनापति कसलेला नसतांही त्यानें अत्यंत धिमेपणानें, चिकाटीनें व हुशारीनें हें युद्ध चालविलें. त्याच्या नेतृत्वाखालीं अमेरिकनांस दरसाल जसजसा लष्करी अनुभव येऊं लागला तसतशी अमेरिकन सैन्याची कार्यक्षमता जास्त जास्त वाढूं लागली व त्यांच्या हातून युद्धाचें काम उत्तम रीतीनें झाल्यानेंच त्यांस यश लाभलें. खुद्द जॉर्जचा हेकेखोरपणाही इंग्रजांच्या नाशास कारणीभूत झाला. इंग्लंडांत राहूनही तो अमेरिकेंतील आपल्या सेनापतींस लष्करी हालचालींबद्दल हुकूम सोडी व त्यांच्या धोरणांत फरक करी ! शेवटीं शेवटीं इंग्रज लोक या युद्धास पूर्णपणें कंटाळून गेले व त्यामुळें त्यांचें लक्ष कमी झालें. या सर्व कारणांमुळेंच अमेरिकेस जय मिळून इंग्लंडचा पराभव झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. अमेरिकन युद्धाचे परिणाम :—अमेरिकन युद्धाचे परिणाम अत्यंत महत्त्वाचे व गंभीर स्वरूपाचे होते. या युद्धामुळें इंग्लंडची जगभर नाचक्की झाली व इंग्लंडचे दिवस भरले असें सर्व जगास वाटलें. खुद्द इंग्लंडलाही आपल्या वसाहतीसंबंधाच्या धोरणांत फरक करणें जरुरीचें वाटलें. त्यामुळें वसाहतींवर व्यापारी निर्बंध लादणें अगर त्यांना आपलें स्वामित्व मान्य करावयास लावणें धोक्याचें आहे असें इंग्लंडला वाटूं लागलें. वसाहती म्हणजे बालराष्ट्रें होत व त्यांचें संरक्षण व संवर्धन करून त्यांस मोठेपणा प्राप्त करून देण्याचें इंग्लंडचें कर्तव्य होय, या तत्त्वाची इंग्लंडला जाणीव झाली व त्याप्रमाणें इंग्लंड आपल्या वसाहतींना आपुलकीनें व प्रेमानें वागवूं लागलें. अमेरिकन युद्धांत जे फ्रेंच सैनिक लढले ते आपल्या देशांत परत गेल्यावर त्यांनीं फ्रान्स देशांत भयंकर जागृति निर्माण केली. त्यांच्या पराक्रमांचीं व इंग्रजांनीं अमेरिकनांवर केलेल्या जुलुमांचीं वर्णनें ऐकून आपल्यालाही आपलें स्वातंत्र्य मिळवितां येईल असें फ्रान्समधील सामान्य जनतेस वाटूं लागलें व त्यामुळेंच फ्रेंच राज्यक्रांति जवळ आली. अमेरिका स्वतंत्र झाल्यानें इंग्लिश व्यापारास घसरगुंडी लागली. अमेरिकेंत एक स्वतंत्र राष्ट्र स्थापन झाल्यानें लोकशाहीच्या तत्त्वांचा विजय झाला. ब्रिटिश साम्राज्याच्या वाढीसही आळा बसला. इंग्लंडसारख्या सुधारलेल्या राष्ट्राचा अमेरिकेसारख्या छोट्या राष्ट्राकडूनही पराभव होऊं शकतो ही गोष्ट सर्वांच्या निदर्शनास आली. आपल्या हेकेखोर स्वभावामुळेंच राजानें अमेरिका हातची घालविली असें जॉर्जबद्दल इंग्रजांचें मत झाल्यानें राजसत्तेस जोराचा धक्का बसला व त्यामुळें राजसत्तेबद्दल प्रेम वाटेनासें होऊन लोक प्रधानमंडळाकडे वळले. आजपर्यंत इंग्लंडमधील कैदी अमेरिकेंत पाठवीत; ते आतां ऑस्ट्रेलियाकडे पाठविण्यांत येऊं लागले व अशा तऱ्हेनें सन १७८८ मध्यें ऑस्ट्रेलियामध्यें कैद्यांची पहिली वसाहत स्थापन होऊन ऑस्ट्रेलियांतील वसाहतींचा व तेथील राज्याचा पाया घातला गेला.

११. जॉर्ज वॉशिंग्टन (१७३२–१७९९):—जॉर्ज वॉशिंग्टनचा जन्म सन १७३२ मध्यें व्हर्जीनिया वसाहतींत झाला. तो सामान्य कुळांत जन्मला होता. लहानपणापासूनच त्याला लष्करी शिक्षण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळालें होतें. तो गंभीर दिसे तरी त्याची संभाषणपद्धति अत्यंत मनोहर व दुसऱ्यावर छाप पाडणारी असे. तो कमी बोले; परंतु जें बोले तें अत्यंत मार्मिक व आत्मविश्वासानें प्रेरित होऊन बोले. त्याच्या मनाचा मोठेपणा लोकांच्या सहसा लक्षांत येत नसे; कारण त्याचा चेहरा सुंदर नव्हता व त्याच्या शरीराची ठेवण फारशी आकर्षक नव्हती. सप्तवार्षिक युद्धाच्या वेळीं त्यानें इंग्लंडला खूप मदत केली व त्या वेळीं त्याला जो लष्करी अनुभव मिळाला तो अमेरिकन स्वातंत्र्य-युद्धाच्या वेळीं त्याच्या



जॉर्ज वॉशिंग्टन

पुष्कळ उपयोगीं पडला. कानडांतून फ्रेंचांची हकालपट्टी करण्यांत त्यानें बहुमोल कामगिरी केली होती. यामुळेंच स्वातंत्र्य-युद्धांत वसाहतींनीं त्याला सेनापतिपद दिलें. मोठ्या कौशल्यानें लढून त्यानें अमेरिकेस जय मिळवून दिला. त्याचें धाडस, शौर्य, धिमेपणा व चिकाटी अप्रतिम होतीं. त्याच्यावर अमेरिकनांचा पूर्ण विश्वास होता व त्यांना त्याच्याबद्दल आदरही कमालीचा वाटे. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर अमेरिकेचा तोच पहिला लोकनियुक्त अध्यक्ष झाला. सर्व वसाहतींचें एकीकरण करून त्यानें अमेरिकेकरितां एक स्वतंत्र राज्यघटना तयार करण्यांत मोठा पुढाकार घेतला. अध्यक्ष झाल्यावरही तो अत्यंत साधेपणानें, निस्वार्थीपणानें व निस्पृहपणानें वागला व आपल्या देशाची एकनिष्ठपणें सेवा करून त्यानें अमेरिकेची उन्नति केली. सन १७९३ मध्यें मुदत संपल्यावर त्याची अध्यक्ष म्हणून पुन्हां निवडणूक झाली. तो सन १७९९ मध्यें मृत्यु पावला. सदाचरणी, सत्यप्रिय, उत्तम सेनानी, राष्ट्रसेवक, शांततेचा भोक्ता असा वॉशिंग्टन अमेरिकनांस अजूनही प्रिय आहे. मात्र जिवंतपणीं त्याची खरी योग्यता लोकांस कळली नव्हती. युद्ध-काळीं तो बिनीचा घोडेस्वार व शांततेच्या काळीं तो लोकांचा एकमेव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढारी असे व यामुळेंच लोकांनीं त्याला आपल्या हृदयसंपुटांत अक्षय्य स्थान दिलें.

अभ्यास

१. अमेरिकन वसाहतींची वाढ कसकशी होत गेली तें सांगा. ती वाढ दाखविणारा एखादा आलेख अगर कालादर्श तयार करा. नकाशा काढून त्यांत सर्व अमेरिकन वसाहती दाखवा.
२. व्यापारी बाबतींत इंग्लंडनें अमेरिकेवर कोणते निर्बंध घातले? त्याचा परिणाम काय झाला? अमेरिकेच्या बाबतींत इंग्लंडला कर बसविण्याचा अगर कायदे करण्याचा अधिकार होता का? कशावरून?
३. राजकीय बाबतींत अमेरिकन वसाहती स्वतंत्र होत्या का? इंग्लंडनें कोणत्या बाबतींत त्यांच्यावर दडपण घालण्याचा प्रयत्न केला? तो यशस्वी कां झाला नाहीं?
४. सन १७८० सालीं इंग्लंडवर कोणतीं संकटें आलीं? त्यांचा त्यानें निरास कसा केला? अमेरिकन युद्धांत इंग्लंडचा पराभव कां झाला?
५. अमेरिकेस यश येण्याचें कारण काय? इंग्लंडचा राजा अमेरिकन युद्धास कारणीभूत झाला का? कसा? नाहींतर हें युद्ध झालें असतें का? ह्या युद्धाचे परिणाम सांगा.
६. अमेरिकन युद्धाची कारणपरंपरा साद्यंत सांगा.
७. बर्क, पिट, वॉलपोल, ग्रेनव्हिल, ब्यूट, टाऊनशेंड, रॉकिंगहॅम वगैरेंचीं अमेरिकन वसाहतींसंबंधीं काय मतें होतीं?

उतारे

१. अमेरिकन प्रश्नाबद्दल वॉलपोलचें मत

आज अमेरिकन वसाहतींवर नवीन कर लादण्यापासून इंग्लंडचा फायदा होणें शक्य नाहीं. अमेरिकेंतील लोखंड, लाकूड, कापूस, तंबाखू, शिसें, नीळ वगैरे कच्चा माल आपल्याला आज अनायासें मिळत आहे व त्यामुळें आपला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यापार वाढीस लागेल. त्या जिनसांवर आपण आज कर लादले, तर ते जिन्नस आपल्याला परराष्ट्रांतून विकत घ्यावे लागतील. तेव्हां आज जो माल आपल्याला अमेरिकेंतून मिळतो तो अमेरिकेशीं सहानुभूतीचें धोरण स्वीकारलें नाहीं तर आपल्याला मिळणार नाहीं. तेव्हां अमेरिकेशीं सलोख्याचें धोरण ठेवल्यानेंच आपल्या देशाचें कल्याण होऊन, आपला देश संपन्न व सामर्थ्यवान् होईल.

—सर रॉबर्ट वॉलपोल–१७२१

२. तिसऱ्या जॉर्जचें पार्लमेंटपुढील भाषण—१७७५

अत्यंत खोडसाळपणाचें धोरण स्वीकारून अमेरिकेंतील माझ्या प्रजेला माझ्या-विरुद्ध चिथावणी देण्यांत कांहीं लोकांस अपरिमित आनंद होत आहे हें मला माहीत आहे. त्यांच्या या कृतीमुळेंच अमेरिकनांनीं सैन्य उभारलें आहे, ते आरमार जमवीत आहेत, सरकारी पैसा ते लुटीत आहेत व सर्व कारभार त्यांनीं आपल्या हातीं घेतला आहे. परंतु या बाबतींत ते अधिक तारतम्यानें वागतील असें मला वाटतें. पार्लमेंटनेंही आजपर्यंत अत्यंत सौम्य असे कायदे पास केले व अमेरिकनांच्या अत्याचारी वृत्तीकडे कानाडोळा केला. जुलमी कायदे केले असल्यास ते बंडखोरवृत्ति नष्ट करण्याकरितांच होत. आज अमेरिकनांनीं उघड उघड बंड उभारलें आहे. त्याचें योग्य तें प्रायश्चित्त त्यांस मिळेलच. परंतु आजचा प्रश्न असा आहे कीं ज्या वसाहतींची आम्ही जिवापाड मेहनत घेऊन स्थापना केली, ज्यांची काळजी घेऊन आम्ही त्यांचें अत्यंत प्रेमानें संगोपन व संवर्धन केलें, ज्यांना आम्ही अनेक व्यापारी सवलती दिल्या व पैशाकडे व जिवाकडेही न पाहातां ज्यांचें परकीय सत्तेपासून आम्हीं संरक्षण केलें त्यांना आम्ही आज साम्राज्यांतून फुटूं द्यावें कीं काय ? तें शक्य नाहीं.

प्रश्न : —१. तिसऱ्या जॉर्जनें अमेरिकेला विरोध कां केला ? अमेरिकेनें बंड उभारलें हें ऐकून त्याला काय वाटलें ?

३. अमेरिकेची फ्रान्सकडे धांव—१७७९

सन्माननीय महाराज,

आमच्या किनाऱ्याचें संरक्षण व्हावें, आमचा व्यापार सुरक्षित रहावा, आमच्या शत्रूचा पराभव व्हावा म्हणून आमच्या देशाच्या कॉंग्रेसच्या आज्ञे-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरून आम्ही आपल्याला असें विनवितों कीं, आपण आमच्या मदतीकरितां सैन्यानें भरलेलीं आठ जहाजें अमेरिकेस पाठवावीं. त्यांचा जो कांहीं खर्च होईल तो आम्ही देण्यास तयार आहों. युरोपांतील निरनिराळ्या राजांनीं आपलें सैन्य मदतीस देण्याचें अगर भाड्यानें देण्याचें इंग्लंडला कळविलें आहे. फ्रान्सकडून आम्हांला अशी मदत मिळावी अशी आमची अपेक्षा आहे. मात्र असें करीत असतां इंग्लंडला कुरापत काढण्यास फ्रान्स जागा देणार नाहीं असें वाटतें. तसें जर झालें तर मात्र फ्रान्स, स्पेन व स्वतंत्र अमेरिका यांच्या फौजा इंग्लंडच्या अमेरिकेंतील साम्राज्याचा तेव्हांच फन्ना उडवितील हें आम्ही आपल्याला कळवावयास का पाहिजे ? आज इंग्रज लोक समुद्राचे स्वामी आहेत व त्यामुळें त्यांना इकडे अपरंपार सैन्य पाठवितां येणें साहजिक आहे. आम्हांला मात्र फक्त जमिनीवरच हालचाली करतां येतील. तेव्हां आपल्या आरमारानें आम्हांस मदत केल्यास आम्हांस खात्रीनें जय मिळेल.

आपले,

बेंजामिन फ्रँकलिन, सिलास डीन, आर्थर ली.

प्रश्न :—१. अमेरिकेनें फ्रान्सकडे मदत कां मागितली ? कसली मदत मागितली ?

२. फ्रान्सला अमेरिकेनें कोणतीं आश्वासनें दिलीं ?

४. अमेरिकन प्रश्नावर बर्कचें भाषण—१७७५

अमेरिकेवर आज जरी तुम्ही कर लादले तरी त्यांपैकीं एक कपर्दिकही तुम्हांस मिळणार नाहीं. बंगालच्या बाबतींत काय झालें ? जो पैसा तुम्ही जबरीनें वसूल केला तो तुम्हांस परत द्यावा लागलाच कीं नाहीं ? तीच गोष्ट अमेरिकेच्या बाबतींतही झाल्याशिवाय राहणार नाहीं. ज्या जिनसांवर आज तुम्ही कर बसविणार ते जिन्नस अमेरिकेनें तुम्हांस पुरविले; एवढेंच नव्हे, तर योजिलेल्या करांमुळें तुम्हांस जें उत्पन्न होणार आहे त्यापेक्षांही जास्त किंमतीचा माल अमेरिकनांनीं तुम्हांला दिला आहे. मग अमेरिकेच्या अंतर्गत व्यवहारांत निष्कारण ढवळाढवळ कां करतां ? सामोपचारानें वागल्यास अमेरिका आपल्याला पैसे देणार नाहीं असें का तुम्हांस वाटतें ? अमेरिकनांबद्दल माझा जीव तिळतिळ तुटतो; कारण ते व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण एकाच हाडामांसाचे आहोंत, त्यांचीं व आपलीं नांवें एकच आहेत, आपल्याप्रमाणेंच त्यांनाही कांहीं अधिकार व हक्क आहेत व त्यांचा व आपला राजा एकच आहे. हीं सर्व बंधनें दिसायला हवेप्रमाणें विरळ दिसत असलीं तरी तीं लोखंडाच्या साखळींतील दुव्यांप्रमाणें अत्यंत मजबूत व कणखर आहेत हें विसरतां कामा नये. तेव्हां अमेरिकनांस थोडे विश्वासांत घ्या, त्यांचे व आपले हक्क समान आहेत हें त्यांना कळूं द्या म्हणजे माझी खात्री आहे कीं हें झाल्यास ते धांवत येऊन आपल्याला इतक्या प्रेमानें कवटाळतील कीं, त्या मगरमिठींतून प्रत्यक्ष ईश्वरही आपल्याला सोडवूं शकणार नाहीं ! मात्र इंग्लिश सरकार निराळें व अमेरिकनांचे हक्क निराळे असें जर तुम्ही त्यांना भासवाल तर आपल्यांतील प्रेमभाव नष्ट होईल, प्रेमरज्जू शिथिल होतील व एकीचा बोजवारा उडून सर्वत्र अंधार पसरेल. मग मात्र सर्व नाश झाल्याशिवाय राहणार नाहीं हें लक्षांत ठेवा.

प्रश्न :—१. अमेरिकेवर कर लादूं नयेत असें बर्क कां म्हणत होता ?

२. अमेरिकेशीं मिळतें घेण्याकरितां इंग्लंडनें काय करावें असें बर्कला वाटे ?

३. मग इंग्लंडनें तसें कां केलें नाहीं ? त्याचा परिणाम काय झाला ?

५. पार्लमेंटपुढील पिटचीं भाषणें—१७७५

मी अमेरिकन असतों व माझ्या देशांत शत्रूचें सैन्य उतरल्याची बातमी मला कळली असती तर मी माझ्या हातचें शस्त्र कधींही खालीं ठेवलें नसतें. खरें पाहतां अमेरिकेवर कर लादण्याचा इंग्लंडला अधिकारच नाहीं—अमेरिका हट्टी व आग्रही आहे. तिनें आज बंडाचें निशाण उभारलें आहे. इंग्लंडला अमेरिका विरोध करणार हें ऐकून मला किती आनंद झाला ! नाहींतर आज तीस लक्ष अमेरिकनांनीं आपल्या डोळ्यांदेखत आपल्या स्वातंत्र्याची होत असलेली मुस्कटदाबी निमूटपणें सहन करायची ! त्यापेक्षां प्रत्यक्ष गुलामगिरींत कुजत पडणेंच अधिक श्रेयस्कर नाहीं का ?

तुमच्या धोरणास अमेरिकेनें विरोध केला म्हणून तुम्हांस राग येतो. असा विरोध करणें हें मनुष्यस्वभावास धरून नाहीं का ? स्वातंत्र्याचें वारें नसानसांतून वाहूं लागलें म्हणजे असेंच व्हावयाचें. आणि सत्तीचीं कर्जें, नजराणे, नौकाकर,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देणग्या, मक्ते वगैरे अन्याय्य करांची चीड येऊनच ना आपण आपल्या राजाला एके काळीं विरोध केला? हक्कसंरक्षणाच्या कायद्याच्या वेळींही सर्व इंग्लंड जागृत झालें व 'आमचें स्वातंत्र्य, आमचे हक्क' म्हणूनचना सर्वांनीं टाहो फोडला! आमच्या संमतीशिवाय राजानें आमच्यावर कर लादतां कामा नये असें तुम्हीच ना आपल्या राजाला खडसावलें? मग त्याच स्वतंत्रवृत्तीनें आज अमेरिका 'आमचे प्रतिनिधि नसतील तर आम्ही कर देत नाहीं' असें तुम्हांस सांगत असतां तिला तुम्ही दोष कां लावतां? तीस लक्ष लोकांच्या हृदयांत आज स्वातंत्र्याचा दीप तेवत आहे व गुलामगिरींत राहून श्रीमंती उपभोगण्यापेक्षां दारिद्र्यांत राहून स्वातंत्र्य उपभोगण्यांतच ते धन्यता मानतील. एवढेंच काय पण त्या स्वातंत्र्याकरितां व आपल्या हक्कांकरितां स्वतःच्या प्राणांचेंही मोल देण्यास ते कचरणार नाहींत. अशा लोकांवर गुलामगिरी लादण्याचा अगर त्यांच्यावर जुलूम करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत मूर्खपणाचें व दांभिकपणाचें आहे. तें नाशास कारणीभूत झाल्याशिवाय कधींही राहाणार नाहीं. आज ना उद्यां आपल्याला मागें पाऊल घ्यावें लागणारच; मग तें आतांच घेतलेलें काय वाईट? तेव्हां अमेरिकेवर लादलेले सर्व जुलमी कायदे रद्द करा—ते रद्द झालेच पाहिजेत—माझी कीर्ति, माझा दर्जा व माझें सर्वस्व पणास लावून मी सांगतों कीं ते तुम्हांस रद्द करावे लागतीलच लागतील. तेव्हां वेळींच नमतें घेतल्यास मानहानी तरी टळेल, नाहींतर घोर आपत्ति ओढवून घ्यावी लागेल.

प्रश्न :—१. बर्क व पिट यांच्या म्हणण्यांतील साम्य कोणतें?

२. पिटनें कोणतीं नवीं कारणें पुढें केलीं? त्यांचा उपयोग झाला का? कां नाहीं?

३. पिट अमेरिकन असता तर त्यानें कोणत्या गोष्टी केल्या असत्या?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२१. राजाची सत्ता वाढत आहे व ती कमी झाली पाहिजे

१. लॉर्ड नॉर्थचें प्रधानमंडळ (१७७०–१७८२):—सन १७७० मध्यें ग्रॅफ्टननें राजीनामा दिल्यानंतर लॉर्ड नॉर्थ मुख्य प्रधान झाला, हें मागें सांगितलेंच आहे. तिसऱ्या जॉर्जच्या अमदानींतील पहिल्या दहा वर्षांतील नॉर्थ हा सातवा मुख्य प्रधान होय. त्याचें सर्व शिक्षण ईटन व ऑक्सफर्ड येथें झालें. वाङ्मयाची त्याला अभिरुचि होती व त्यानें प्रवासही पुष्कळ केला होता. महत्त्वाकांक्षा त्याला माहीत नव्हती व मुत्सद्देगिरीस तो पारखा होता. केवळ राजाच्या आत्यंतिक आग्रहावरूनच त्यानें मुख्य प्रधानाची जागा स्वीकारली होती. तो उत्कृष्ठ वक्ता होता व त्याचें विवेचन नेहमीं मुद्याला धरून असे. मात्र बर्क, पिट, फॉक्स वगैरेसारख्या तेजस्वी वक्त्यांपुढेंही तो टिकून राहिला, त्याला राजकृपा कारणीभूत होतीच; परंतु तो स्वतः कधींही चिडत नसे, हेंही एक लक्षांत धरण्यासारखें कारण आहे. तो टोरी-पक्षाचा होता व राजाच्या हुकमांचा ताबेदार असल्यानेंच विल्कसप्रकरण व अमेरिकन-युद्ध असल्या गोष्टींमुळें तो नालायक ठरला. ‘राजा सांगे व नॉर्थ ऐके’ ही म्हण नॉर्थच्या बाबतींत तंतोतंत खरी होती. विल्कसप्रकरण व अमेरिकन-युद्ध या बाबतींत त्यानें जी कामगिरी केली ती मागें आलीच आहे. सन १७७३ सालीं त्यानें हिंदुस्थानांतील कारभारास वळण लावण्या-करितां ‘रेग्युलेटिंग ॲक्ट’ पास केला. त्यामुळें ई. इं. कंपनीचा कारभार पार्लमेंटच्या कक्षेंत प्रथमतः येऊं लागला.

२. पार्लमेंटच्या सुधारणेचे प्रयत्न :—नार्थच्याच वेळीं पार्लमेंटची सुधारणा करण्याकरितां चळवळ सुरू झाली होती. त्याकाळीं अनेक खेड्यांस आपले प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार मिळालेला होता. अनेक खेडीं उध्वस्त झालीं, तरीही त्यांचा प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रद्द झालेला नव्हता. यामुळें राजाचें अगर त्या खेड्याच्या देशमुखाचें फावे व ते आपल्याला पाहिजे त्यासच निवडून आणीत. कधीं कधीं ती जागा लिलांवानेंही विकण्यांत येऊन जो जास्त पैसा देईल त्याला ती विकण्यांत येई व मग तो पार्लमेंटमध्यें त्या खेड्यातर्फे प्रतिनिधि म्हणून बसे. लांचलुचपतीचे प्रकारही पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं चालत. वरील सर्व गोष्टी लक्षांत घेऊन सन १७४५ मध्यें डॅशवुड नामक एका टोरी गृहस्थानें पार्लमेंटची सुधारणा करण्याकरितां एक बिल पार्लमेंटमध्यें मांडलें; पण तें नापास झालें. पुढें सन १७७० मध्यें थोरल्या पिटनेंही प्रत्येक परगण्याला आणखी एक—तिसरा प्रतिनिधि—पाठविण्याचा अधिकार द्यावा असें सुचवून त्या अर्थाचें बिल पार्लमेंटपुढें मांडलें; सन १७७६ त विल्कसनेंही पार्लमेंटची सुधारणा करण्याकरितां बिल आणलें. सन १७८० मध्यें रिचमांडच्या ड्यूकनेंही त्याकरितांच एक बिल उमरावमंडळांत मांडून पार्लमेंटची निवडणूक दरसाल व्हावी, वयांत आलेल्या प्रत्येकाला मतदानाचा अधिकार मिळावा व मतदारसंघ सारखे स्थापन करावे असें सुचविलें. परंतु हीं सर्व बिलें पार्लमेंटनें नापास केलीं. मात्र पार्लमेंटची सुधारणा करणें आवश्यक आहे असें सर्वांस कळून चुकलें.

३. काटकसरीच्या धोरणाची आवश्यकता :—अमेरिकन युद्धाच्या पायीं अतोनात खर्च होत असे व राष्ट्रीय कर्जाचा आंकडाही फुगत चालला होता. त्यामुळें सरकारी खर्चाला कात्री लावणें जरूरीचें आहे असें सर्वांस वाटूं लागलें. काटकसरीचे अनेक मार्ग सुचविण्यांत आले. रॉकिंगहॅम व एडमंड बर्क यांच्या मतें राजाच्या खाजगी खर्चाला कात्री लावली तर खर्च बराच कमी होणें शक्य होतें. याच वेळीं सन १७८० मध्यें यॉर्कशायरमधील मिरासदारांनीं सरकारकडे एक अर्ज करून सरकारी अधिकारी व मोठमोठे पगारदार यांचे पगार कमी करावेत व काम न करतांही ज्यांना पगार मिळतो तो बंद करावा असें सुचविलें. या अर्जाला अनेक परगण्यांतर्फे पाठिंबा मिळाला होता. या अर्जामुळें बर्कला उत्तेजन मिळून त्यानेंही सन १७८० मध्यें काटकसर करण्यासंबंधाचें एक बिल पार्लमेंटपुढें मांडलें. बर्कच्या बिलांतही वरील गोष्टींचा उल्लेख आलेला होता. परंतु तें बिल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नापास झालें. या सर्व प्रकरणानें अनेकांना वाईट वाटलें. राजाची सत्ता जोरदार असल्यामुळेंच अशा गोष्टी होतात व लोकांच्या मनाप्रमाणें राज्य-कारभार होत नाहीं असें लोकांस वाटूं लागलें. यामुळेंच चिडून जाऊन डनिंग यानें सन १७८० सालीं पार्लमेंटमध्यें 'राजाची सत्ता वाढली आहे, वाढत आहे व तिला आळा घातलाच पाहिजे' अशा अर्थाचा एक ठराव पार्लमेंटपुढें मांडला; पण तोही उधळून लावण्यांत आला. यावरून राजसत्ता खरोखरच वाढली होती व पार्लमेंटसभा राजाच्या पूर्णपणें अंकित होती हें सिद्ध झालें. तसेंच राजाच्या वाढत्या सत्तेस आळा घातला पाहिजे असें लोकमत झाल्याचेंही वरील गोष्ट दर्शविते.

४. गॉर्डनमुळें झालेले दंगे :—वरील गोष्टी चालू असतांच सन १७७८ मध्यें सर जॉर्ज सेव्हिल यानें पार्लमेंटमध्यें एक बिल मांडून सन १७०० सालीं कॅथॉलिकांविरुद्ध झालेले कायदे रद्द करावे असें सुचविलें व पार्लमें-टनेंही तसें करण्याचें ठरविलें व बिल पास केलें. त्यामुळें रोमन कॅथॉलिकांस जमिनी खरेदी करण्यास व इस्टेटी करण्यास परवानगी देण्यांत येऊन रोमन-कॅथॉलिक धर्मगुरूंस त्यांच्या धर्मपंथाच्या आज्ञेप्रमाणें उपासना चालविण्यास मोकळीक देण्यांत आली. परंतु कॅथॉलिकांस सवलती मिळाल्या हे अनेकांस रुचलें नाहीं. लॉर्ड जॉर्ज गॉर्डन याच्या नेतृत्वाखालीं सन १७८० मध्यें स्कॉट-लंडांत दंगे सुरू झाले. गॉर्डननें एक विनंतिअर्ज पार्लमेंटकडे पाठवून कॅथॉ-लिकांस दिलेल्या सवलती रद्द कराव्या असें सुचविलें. त्यानंतर खुद्द लंडन-मध्येंही दंगे सुरू झाले. दंगेखोरांनीं तुरुंगांवर हल्ला चढविला, मंदिरें लुटून उध्वस्त केलीं व अनेक घरेंदारें जमिनदोस्त केलीं. लंडनमधील सर्व रस्ते दंगे-खोरांनीं चारपांच दिवस व्यापून टाकल्यानें सर्व व्यवहार थांबला. तेव्हां खुद्द राजानें लष्कर बोलावून सैनिकांस दंगेखोरांवर गोळ्या झाडण्याचा हुकूम दिला. ताबडतोब सर्वत्र सामसूम झालें व दंगा संपुष्टांत आला. सुमारें पांचशें दंगेखोर मारले गेले; विसांना फाशीं देण्यांत आलें. मात्र गॉर्डनला माफी देण्यांत आली.

५. रॉकिंगहॅमचें दुसरें प्रधानमंडळ (१७८२):—लॉर्ड कॉर्नवॉ-लिस अमेरिकनांस शरण गेला, त्यानंतर थोड्याच दिवसांनीं नॉर्थनें आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जागेचा राजीनामा दिला. युद्धांत इंग्लंडचा ठिकठिकाणीं पराभव झाल्यानें लोकांचा त्याच्यावरील विश्वास नाहींसा झाला होता. तेव्हां त्याच्यानंतर राजानें रॉकिंगहॅमला मुख्य प्रधान नेमलें. या प्रधानमंडळांत चार्ल्स जेम्स फॉक्स, बर्क, शेरिडन, शेलबर्न वगैरे नामांकित लोक होते. हे सर्व व्हिगपक्षाचे होते हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या मंत्रिमंडळानें अमेरिकन युद्ध बंद करून तहाची पुष्कळ खटपट केली; परंतु त्याला त्यांत यश आलें नाहीं. बर्कनें सन १७८२ मध्यें राजाच्या खाजगी खर्चामध्यें फेरफार करणारें एक बिल पार्लमेंटपुढें मांडून तें पास करून घेतलें. या बिलानें राजाच्या खाजगी खर्चाचीं निरनिराळीं आठ खातीं पाडण्यांत येऊन त्या खर्चाला दरसाल ७२००० पौंडांचा काट मारण्यांत आला होता. त्याचप्रमाणें सरकारी कॉंट्रॅक्ट घेणारांस व सरकारी वसुली खात्यांतील नोकरांस पार्लमेंटचे सभासद होण्यास मनाई करण्यांत आली. या दोन्ही बिलांमुळें राजसत्ता थोडी मर्यादित होण्यास मदत झाली. याच वर्षी धाकट्या पिटनें पार्लमेंटची सुधारणा करण्याच्या हेतूनें पार्लमेंटमध्यें एक बिल मांडलें. फॉक्सनें त्याला पाठिंबा दिला; परंतु बर्कनें त्याला विरोध केल्यामुळें तें बिल नापास झालें. यानंतर सन १७८२ च्या जुलै महिन्यांत रॉकिंगहॅम वारल्यानें राजानें शेलबर्न याला मुख्य प्रधान नेमलें. शेलबर्नचें व बर्क व फॉक्स यांचें बरें नसल्यानें त्यांनीं शेलबर्नच्या प्रधानमंडळांत काम करण्याचें नाकारलें. या प्रधानमंडळानेंच सन १७८३चा व्हर्सायचा तह घडवून आणला, पण तो घडून येत असतांच शेलबर्नचा पार्लमेंटमध्यें पराभव झाला व त्यानें राजीनामा दिला (१७८३).

६. **दुसरें मिश्र प्रधानमंडळ–फॉक्स व नॉर्थ** (१७८३) :—या काळांत जॉर्ज अगदीं हतबुद्ध झाला होता. व्हिग व टोरी या पक्षांच्या विरोधांत आपलें कार्य साधून आपल्याला आपलें ध्येय साध्य करून घेतां येईल असें जॉर्जला वाटत होतें; परंतु त्याचा तो बेत फसला. केवळ राजपक्षाच्या आधारावरच सगळीं कामें तडीस लावतां येतील असें जें त्याला वाटत होतें तेंही खोटें ठरलें. पक्षाला प्राधान्य न देतां त्यांतील प्रमुख व्यक्तींना हाताशीं धरावें व त्यांच्याकडून आपल्याला पाहिजे तें काम करून घ्यावें असें त्याला वाटे; परंतु हें धोरणही त्याच्या अंगलट आलें. विल्कस प्रकरण व अमेरिकन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युद्ध या दोन्ही बाबतींत त्यानें कमालीचा हेकेखोरपणा दाखविला व त्या दोन्ही बाबतींत त्याला फजीत व्हावें लागलें. त्यांतच सर्व देशही त्याच्यावर उठला व राजसत्ता मर्यादित केली पाहिजे असे ठरावही पार्लमेंटमध्यें येऊं लागले. अशा स्थितींत जॉर्ज राजा असतां शेलबर्ननंतर मुख्य प्रधानाचीं वस्त्रें कोणाला द्यावीं असा त्याच्यापुढें पेंच पडला. लॉर्ड नॉर्थला त्यानें तीं दिलीं असतीं, पण लॉर्ड नॉर्थनें राजाला एकदां दगा दिला होता. सन १७७४ मध्यें राजानें फॉक्सला प्रधानमंडळांतून घालवून दिल्यानें तो राजाचा वैरी बनला होता. शिवाय फॉक्स व्हिग पक्षाचा होता व तो राजाला मुळींच आवडत नसे. परंतु नॉर्थ व फॉक्स यांचें पार्लमेंटमध्यें पुष्कळच वजन असल्यानें त्यांना वगळणेंही शक्य नव्हतें. शेवटीं पोर्टलंडनें नामधारी मुख्य प्रधान व्हावें व फॉक्स व नॉर्थ या दोघांनीं प्रधानमंडळ बनवावें असें राजानें ठरविलें. फॉक्स व्हिग पक्षाचा व नॉर्थ टोरी पक्षाचा. शिवाय ते एकमेकांचे कट्टे वैरी. या गोष्टी लक्षांत घेऊन व त्यांचें फार दिवस जमणार नाहीं असें हेरूनच जॉर्जनें त्यांच्यावर प्रधानमंडळ बनविण्याची कामगिरी सोंपविली. या प्रधानमंडळाला मिश्र प्रधानमंडळ असें म्हणतात. फॉक्स व नॉर्थ यांनीं आपापले हेतु साध्य करून घेण्याकरितांच तें बनविलें होतें. राजाप्रमाणेंच प्रजेलाही हें मंत्रिमंडळ आवडत नव्हतें. त्यामुळें तें केव्हां नष्ट होतें त्याचीच राजा वाट पहात होता. शेवटीं ती संधि त्याला मिळाली व त्यानें आपला हेतू साध्य केला.

७. फॉक्सचें हिंदुस्थानासंबंधाचें बिल (१७८३) :—सन १७७३ मध्यें नॉर्थनें रेग्युलेटिंग ॲक्ट पास केला होता; परंतु त्यांत अनेक दोष राहिले होते. ते सुधारणें जरुरीचें होतें. त्याचप्रमाणें बंगालचा गव्हर्नर वॉरन हेस्टिंग्ज याचा कारभार अत्यंत अरेरावी पद्धतीचा चालला होता अशी इंग्लंडमध्यें कुणकूण आली होती. तेव्हां त्या बाबतींत कांहीं सुधारणा करणें पार्लमेंटला जरुरीचें वाटल्यावरून फॉक्सनें एक बिल तयार करून तें पार्लमेंटमध्यें मांडलें. त्या बिलान्वयें ई. इं. कंपनीचा व्यापारविषयक कारभार कंपनीच्या डायरेक्टरांकडे रहावा व तिचा राज्यकारभार पार्लमेंटनें नेमलेल्या सात लोकांच्या मंडळानें चार वर्षें पहावा व नंतर तो राजानें पहावा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें ठरविण्यांत आलें. वस्तुतः पाहतां हें बिल चांगलें होतें. परंतु विरोधी पक्षानें त्याला कसून विरोध केला. तें बिल पास झाल्यास प्रधानमंडळाचें महत्त्व अतोनात वाढेल व हिंदुस्थानचा कारभार फॉक्स व त्याचे अनुयायी यांच्या हातीं आल्यानेंही त्या पक्षाचें वजन वाढेल अशी विरोधी पक्षास भीति वाटत होती. ई. इं. कंपनीलाही तें बिल नको होतें; कारण त्यामुळें तिच्या हातचा राज्यकारभार राजाच्या हातीं जाणार होता. आणि खुद्द राजाला तें बिल मुळींच पसंत नव्हतें. हें बिल पास झाल्यास त्याला नको असलेल्या प्रधानमंडळाचें वजन वाढून त्याला तें काढून टाकतां आलें नसतें. तेव्हां त्यानें उमराव-मंडळाला आपल्या हस्तकांतर्फे निरोप पाठवून सर्वांस कळविलें कीं 'या बिलाला जो मान्यता देईल त्याला राजाचा शत्रू समजण्यांत येईल.' झालें; त्याप्रमाणें उमरावमंडळानें तें बिल नापास केलें. घटनेचा अतिक्रम करून राजानें वरील निरोप पाठविणें योग्य नव्हतें. शेवटीं मिश्र प्रधानमंडळानें राजीनामा दिला व त्याच्यानंतर राजानें धाकट्या पिटला मुख्य प्रधान नेमलें. (१७८३). पिट मुख्य प्रधान झाला त्यावेळेपासून राजसत्तेची घटका भरली. राजाची मर्जी सांभाळून हांजी हांजी करणारा पिट नव्हता व त्यामुळें राजाच्या अनियंत्रित सत्तेस आळा बसला, राजाचा वचक कमी झाला, राज्यकारभारांतील त्याचा बोज नाहींसा झाला व त्याचा पक्ष निःसत्त्व ठरला. या सर्वांचें कारण पिट. कारण त्याच्या वेळेपासून सर्व राज्यकारभाराचा मुख्य सूत्रधार मुख्य प्रधान झाला. लॉर्ड नॉर्थ मुख्य प्रधान असतां तो मान राजाकडे होता !

अभ्यास

१. लॉर्ड नॉर्थबद्दल थोडक्यांत हकीकत सांगा. तो जॉर्जला कां आवडत होता ? अमेरिकन युद्ध व विल्कसप्रकरण या बाबतींत त्यानें कोणतें धोरण स्वीकारलें ?

२. रॉकिंगहॅमच्या कारकीर्दींत कोणकोणत्या गोष्टी घडल्या ? त्याचें अमेरिके-बद्दलचें धोरण सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. मिश्र प्रधानमंडळ म्हणजे काय? तें केव्हां स्थापन झालें होतें? तुम्हांस माहित असलेल्या मिश्र प्रधानमंडळासंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

४. गॉर्डन कोण? त्याच्यामुळें दंगे झाले असें म्हणतात तें खरें काय?

५. टिपणें करा :—फॉक्सचें बिल, गॉर्डनमुळें झालेले दंगे, राजपक्ष, यॉर्कशायरचे मिरासदार, पार्लमेंटची सुधारणा, सरकारी काटकसरीचें धोरण.

६. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
डॅशवुड, डनिंग, रिचमॉंडचा ड्यूक, फॉक्स, नॉर्थ, बर्क.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२२. शांततावादी अर्थमंत्रि—विल्यम पिट

१. धाकटा पिट—पूर्वचरित्र :—धाकटा पिट लॉर्ड चॅटहॅमचा दुसरा मुलगा. सन १७५९ मध्यें त्याचा जन्म झाला. त्याची अशक्त प्रकृति त्याला शाळेंत जाऊं देईना. त्यामुळें त्याचें सर्व शिक्षण घरींच खाजगी रीतीनें झालें. असें सांगतात कीं सात वर्षांचा असतांच तो राजकारणावर वादविवाद करीत असे. पुढें मोठा झाल्यावर त्याला केंब्रिजला शिक्षणाकरितां पाठविण्यांत आलें होतें. नियमित आहार-विहार, अखंड उद्योग व सतत वाचन यांमुळें त्याच्या बुद्धीला चांगलेंच तेज प्राप्त झालें. सन १७८० मध्यें तो बॅरिस्टरीची परीक्षा पास झाला व त्याच वर्षी तो पार्लमेंटच्या निवडणुकीस उभा राहिला व निवडून आला. त्यावेळीं त्याचें वय फक्त एकवीस वर्षांचें होतें. त्याचें पार्लमेंटमधील पहिलेंच भाषण इतकें उत्तम व परिणामकारक झालें कीं सर्वांनीं त्याची वाहवा केली. शेलबर्नच्या प्रधानमंडळांत तो फडणीस झाला. त्यावेळीं त्याचें वय अवघें तेवीस होतें; यावरून त्याची खरी लायकी कळण्यासारखी आहे. केंब्रिजला असतांच त्यानें उत्तम तऱ्हेनें अभ्यास केला होता. ग्रीक व लॅटिन हे तर त्याच्या आवडीचेच विषय; परंतु त्याशिवायही ॲडॅम



विल्यम पिट

स्मिथच्या 'राष्ट्राची संपत्ति' या उत्कृष्ट पुस्तकाचा त्यानें अगदीं मन लावून अभ्यास केला होता. बाळपणापासूनच त्याला मुत्सद्देगिरीचें शिक्षण घरीं-दारीं मिळालें. त्यानें व्हिग व्हावें म्हणून त्याला शिक्षण मिळालें, पण तो झाला टोरी ! तो मोठा उत्तम वक्ता नव्हता; परंतु परिणामकारण बोलून तो लोकांवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपली छाप पाडी. त्याची दांडगी कर्तृत्वशक्ति, त्याचा दृढनिश्चय, निस्वार्थ-बुद्धीनें काम करण्याची त्याची हौस, आत्मसंयमन, मनाचा मोठेपणा, वगैरे गोष्टींमुळेंच त्याला इंग्लंडांत त्या काळीं मानाचें स्थान मिळालें. तो भरपूर उंचीचा, सडपातळ, अशक्तपणामुळें हाडेंन्हाडें मोजून घ्यावींत अशा शरीराच्या ठेवणीचा, व धड सुंदरही नाहीं व धड कुरूपही नाहीं असा होता. परंतु त्याची विलक्षण बुद्धिमत्ता, करारी स्वभाव व निष्कपटी आचरण यांमुळें त्यानें लोकांच्या मनांत जी एकदां बैठक मारली ती कायमची. लांच-लुचपतीचा प्रकार त्याला आवडत नसे. चालढकल तो करी. सत्तेचाही त्याला अभिलाष होता. परंतु त्याचें शुद्ध चारित्र्य व त्यानें राष्ट्रोन्नतीकरितां दाखविलेली तळमळ अतुलनीय होती. विल्यम पिट आपल्या वयाच्या चोविसाव्या वर्षी मुख्य प्रधान झाला.

२. पिटला विरोध:—तिसऱ्या जॉर्जनें त्याला प्रधानकीचीं वस्त्रें देऊन घटनाभंगच नाहीं का केला? कारण धाकट्या पिटला पार्लमेंटमध्यें पाठबळ नव्हतें; आणि अशा स्थितींत मुख्य प्रधानाची जागा स्वीकारणें म्हणजे ती एक तारेवरची कसरतच होती. फॉक्स, बर्क, शेरिडन वगैरे वयस्क व मुरब्बी मुत्सद्दी म्हणूं लागले कीं 'राजानें एका पोराच्या हातीं इंग्लंडच्या राज्यकारभाराचें सुकाणूं दिलें आहे.' ते पिटची उघड उघड टर उडवीत, त्याची थट्टा करीत; प्रत्येक वेळीं पार्लमेंटमध्यें त्याचा पराभव करीत व प्रत्यहीं त्याच्या राजीनाम्याची वाट पहात. पण पिट कसला वस्ताद! त्यानें कोणालाही दाद दिली नाहीं. पराभव झाला तरी तो गप्पच! राजीनामा देईना व नवी निवडणूकही करीना. त्याचें हें करणेंही थोडें योग्य होतें. कारण त्यानें जर नवी निवडणूक केली असती तर होतें तितकें पाठबळही त्याला पार्लमेंट-मध्यें मिळालें नसतें. तेव्हां थोडा दम खाल्ला व कांहीं दिवसांनीं निवडणूक झाली तर आपलें मताधिक्य पार्लमेंटमध्यें निश्चित स्थापन होईल अशी त्याची खात्री होती. आणि पुढें झालेंही तसेंच. पिटची नेमणूक करण्यांत राजानेंही थोडी स्वार्थी दृष्टि ठेवली होती. तो टोरी होता हें खरें, परंतु तो टिकला तर उत्तमच झालें; न टिकला तर तो टिकेल तेवढ्या वेळेपर्यंत दुसरा एखादा माणूस शोधून काढण्यास आपल्याला वेळ मिळेल असें राजाला वाटत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. सन १७८४ त पार्लमेंटची निवडणूक झाली व पिटला पार्लमेंटमध्यें मताधिक्य प्राप्त झालें. त्यावेळेपासून राजानें त्याला अखंड पाठबळ पुरविलें. मात्र नॉर्थप्रमाणें स्वत्वाला पारखे होऊन राजाच्या ताटाखालचें मांजर होऊन राहणारा पिट नसल्यानें त्यानें अनेक कामें मोठ्या धडाडीनें करून आपल्या राष्ट्राचें प्रेम संपादन केलें.

३. विल्यम पिट, लॉर्ड चॅटहॅम व वॉलपोल :—त्यावेळीं व्हिग लोक अत्यंत अप्रिय होते. त्यांचा पक्ष आपापसांतील भांडणांमुळें खिळखिळा झालेला होता. त्यांना धोरण राहिलें नसल्यानें लोकांचा व राष्ट्राचाही त्यांच्यावरील विश्वास उडालेला होता. यामुळें टोरीपक्षानें व राजपक्षानेंही विल्यम पिटला अंतःकरणपूर्वक साहाय्य करण्याचें ठरवून त्याच्या धडाडीच्या कार्यक्रमास हातभार लावला. देशभक्ति, मनाचें औदार्य, लोकांच्याबद्दल वाटणारा आपलेपणा, सत्तेमुळें धुंद न होतां समतोलबुद्धीनें सर्वांस वागविण्याची त्याची हातोटी वगैरे गुण विल्यम पिटनें आपल्या बापापासून उचलले होते. चॅटहॅमच्या बुद्धीची चमक, त्याचें कल्पनाचातुर्य, त्याची प्रतिभा, न्याय्यान्याय्य विचार, तारतम्यानें अचूक गोष्ट हुडकून काढण्यास लागणारी कुशलता व त्याचें दूरदर्शित्व हे गुण त्याच्या मुलाच्या ठिकाणीं नव्हते; उलट उत्कट स्वाभिमान, साधेपणाची आवड व उत्तम अभिरुचि या बाबतींत पिटनें आपल्या बापालाही मागें टाकलें होतें. चॅटहॅमला भपका व उधळपट्टी आवडे; पिटला साधी व काटकसरीची राहणी मानवे. आपल्या बापाप्रमाणें तो उत्कृष्ट वक्ता नसला तरी त्याचीं भाषणें वस्तुस्थितीला धरून असल्यामुळें लोकांस आवडत. तो आपल्या बापाप्रमाणें जन्मजात युद्धमंत्रि नव्हता हें खरें असलें, तरी नेपोलियनसारख्या एका जगद्विख्यात योद्धयाशीं त्याला झगडावें लागलें ही गोष्ट लक्षांत घेतां, त्यावेळीं पिटनें धैर्य, चिकाटी, दृढनिश्चय वगैरे गुणांमुळें आपल्या राष्ट्रांत जी चेतना व जो आत्मविश्वास उत्पन्न केला तो अपूर्व होय. बापलेकांना लांचलुचपतीचे प्रकार आवडत नसत, पार्लमेंटची सुधारणा व्हावी असें त्यांस वाटे, व लोकांचा विश्वास संपादन करून राज्यकारभार करण्यांतच ते समाधान मानीत. दोघांचेंही चारित्र्य शुद्ध होतें व त्यांचें देशप्रेम अलोट होतें. शांततेची आवड, अखंड कर्तृत्वशक्ति, काम तडीस नेण्यास लागणारी उरकशक्ति,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वादविवादांतील कौशल्य, आर्थिक बाबींचें भरपूर ज्ञान वगैरे बाबतींत धाकट्या पिटनें वॉलपोलला गुरु केल्यासारखें वाटतें. कारण ह्या दोघांतही वरील गुण भरपूर प्रमाणांत होते. दोघांसही युद्धाच्या ऐवजीं शांतता प्रिय असली तरी जरूर तेव्हां युद्ध करण्यास दोघांनींही कमी केलें नाहीं. खुल्या व्यापाराचे दोघेही चहाते होते. मात्र पिटनें वॉलपोलला अनेक बाबतींत मागें टाकलें होतें. वॉलपोलला लांचलुचपत आवडे, स्वतःचा स्वार्थ साधावा, आपल्या हातीं सत्ता कायम टिकावी, आपल्याला विरोध करणारास दूर करून त्याला नेस्तनाबूद करावा असें त्याला नेहमीं वाटे. उलट लांच म्हटली कीं पिटच्या पोटांत तिडीक उठे; आपल्या बरोबरीच्यांनाच नव्हे तर आपल्यापेक्षां लहानासही मोठ्या प्रेमानें वागवून त्यांस मोठ्या योग्यतेस चढविण्यांतच पिटला आनंद होई. वॉलपोलप्रमाणें हेटाळणीनें नव्हे तर मोठ्या प्रेमानें आपल्या सहकाऱ्यांशीं वागून त्यानें सर्वांस खूष केलें. सुधारणा करावी असें वॉलपोलप्रमाणें नुसता बडबडणारा पिट नव्हता व त्यामुळेंच त्यानें अनेक बाबतींत प्रत्यक्ष सुधारणा घडवून आणल्या. अर्थमंत्रि म्हणून वॉलपोलप्रमाणें पिटही प्रसिद्धी पावला.

४. पिटच्या वेळची परिस्थितिः—पिट मुख्य प्रधान झाला त्यावेळीं सर्व इंग्लंडमध्यें उदासीनता पसरली होती. अमेरिकन युद्ध नुकतेंच संपून इंग्लंडच्या हातून अमेरिकन वसाहती गेल्या होत्या. त्या युद्धांत इंग्लंडचा पराभव झाल्यानें इंग्लंडची प्रतिष्ठा नष्ट होऊन युरोपांत इंग्लंडच्या शब्दाला किंमत उरलेली नव्हती. इंग्लंडचा व्यापार मंदावला, सरकारची पत कमी झाली व सरकारी कर्जरोख्यांचे भाव अतिशय उतरले. राष्ट्रीय कर्जाचा आंकडा फुगत जाऊन तो २५,००,००,००० पौंडांपर्यंत गेला होता. नवे कर बसविले तर ते देण्याची ऐपतही लोकांत उरलेली नसल्यानें राष्ट्रीय कर्जाची फेड कशी करावी असा मुत्सद्यांना प्रश्नच पडलेला होता. दरवर्षाचें अंदाजपत्रक करतांना फडणिसाची तारांबळ उडे. त्यांत तूट नेहमींचीच होती. ती भरून कशी काढावी हा प्रत्येकाला प्रश्न पडे. देशाची आर्थिक स्थिति अत्यंत हलाखीची होती. राजकीय बाबतींतही तीच स्थिति होती. ब्रिटिश साम्राज्याच्या वाढीला जोराचा धक्का बसून ती खुंटली. युरोपांत इंग्लंडला एकही मित्रराष्ट्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उरलेलें नव्हतें. खुद्द इंग्लंडमध्यें एकही पक्ष जोरदार नव्हता. व्हिग पक्षांत अनेक पक्षोपपक्ष निर्माण होऊन तो पक्ष अस्तित्वांत असूनही नसल्यासारखा झाला होता. टोरीपक्षाला महत्त्व नव्हतेंच. त्या पक्षाची संघटना करण्याची व त्याचें राजकीय महत्त्व वाढविण्याची जबाबदारी पिटवर येऊन पडली होती. राजा तिसरा जॉर्ज करून करून थकलेला ! त्याची महत्त्वाकांक्षा सफळ न झाल्यानें व प्रत्येक बाबतींत हेकेखोरपणानें वागल्यानें सर्व गोष्टी त्याच्या अंगाशीं आलेल्या ! अशा स्थितींतच कोणाला तरी मुख्य प्रधान नेमावयाचें म्हणून त्यानें पिटसारख्या कोंवळ्या मुत्सद्याला त्या स्थानावर अधिष्ठित केलें व सर्व गोष्टी निस्तरण्याची त्याला आज्ञा केली. त्याला पिटही योग्य माणूस भेटला हा केवळ दैवयोगच नव्हे का ?

५. पिटची सुरवातीची कामगिरी:—मुख्य प्रधानाच्या जागेचा स्वीकार केल्यावर सर्व परिस्थितीचें आकलन करून पिट आपल्या उद्योगाला लागला. प्रथमतः त्यानें सन १७८४ मध्यें हिंदुस्थानविषयक कायदा पास करून घेतला. त्याला ‘ पिटचा कायदा ’ असें म्हणतात. या कायद्यानें कंपनीच्या राजकीय कारभारावर नियंत्रण ठेवण्याकतां सहा सभासदांचें एक नियामकमंडळ नेमण्यांत आलें व त्यानें लंडनला राहून कारभार करावा असें ठरलें. मात्र ई. इं. कंपनीच्या व्यापारविषयक कारभारावर त्यानें कोणत्याही प्रकारचें नियंत्रण ठेवलें नाहीं. पुढच्या वर्षीं त्यानें पार्लमेंटची सुधारणा सुचविणारें एक बिल पार्लमेंटपुढें मांडलें. या बिलान्वयें छत्तीस नामधारी गांवांचा पार्लमेंटमध्यें दोन दोन प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार काढून घेण्यांत येऊन तो नव्या शहरांना द्यावा असें त्यानें सुचविलें होतें. तसेंच जमीनदारांचें नुकसान होऊं नये म्हणून सरकारी तिजोरींतून त्यांना सुमारें दहा लक्ष पौंड भरपाईदाखल द्यावे असेंही त्यानें सुचविलें. परंतु त्यावेळीं व्हिग जमीनदारांनीं त्याला विरोध केल्यानें तें बिल नापास झालें. या प्रसंगानंतर त्यानें राज्यक्रांतीला भिऊन पार्लमेंटची सुधारणा करण्याचें अजीबात टाकलें. सन १७८६ मध्यें बंगालचा गव्हर्नर वॉरन हेस्टिंग्ज याच्यावर पार्लमेंटपुढें खटला भरण्यास आपल्या मनाविरुद्ध त्यानें परवानगी दिली. हा खटला पुढें सन १७९५ पर्यंत चालला व शेवटीं हेस्टिंग्जला सोडून देण्यांत आलें. सन १७८९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें गुलामगिरी रद्द करण्यासंबंधाच्या पार्लमेंटमध्यें येणाऱ्या ठरावास त्यानें संमति दिली. पिट, बर्क, फॉक्स, विल्बरफोर्स वगैरे मुत्सद्यांचीं त्यावर भाषणेंही झालीं. मात्र त्या बाबतींत कोणताही निर्णायक कायदा त्यानें पार्लमेंटमध्यें पास करून घेतला नाहीं. पिट व गुलामगिरी रद्द करावी म्हणून सांगणारा विल्बरफोर्स मित्र होते व त्याच्या कार्यास पिटनें वरील ठरावानें सक्रिय पाठिंबा व प्रोत्साहन दिलें. सन १७८८ पासून त्यानें ऑस्ट्रेलियामध्यें कैदी पाठविण्याचें धोरण स्वीकारलें.

६. पिटची आर्थिक कामगिरी :—अर्थमंत्रि या नात्यानें पिटची कामगिरी अमोल ठरली. देशाची आर्थिक परिस्थिति अत्यंत हलाखीची आहे व नवे कर देण्याचें सामर्थ्य लोकांत नाहीं हें त्याला माहीत होतें. ॲडॅम स्मिथच्या 'राष्ट्राची संपत्ति' या पुस्तकाचा त्यानें उत्तम अभ्यास केला असल्यानें त्यांतील तत्त्वें प्रचारांत आणण्याचें त्यानें ठरविलें होतें. ॲडॅम स्मिथनें खुल्या व्यापाराचें धोरण पुरस्कारलें होतें व तें त्याला मान्य होतें. त्यावेळीं इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रांतीच्या युगास सुरुवात झाली होती व धंद्यांना उत्तेजन व प्रोत्साहन दिलें तर देशाची सांपत्तिक भरभराट खात्रीनें होईल हें पिटनें ओळखलें होतें. तेव्हां शांततेचा आत्यंतिक फायदा देशाला मिळवून द्यावयाचा असेल तर देशादेशांतील व्यापार खुलेपणानें चालला पाहिजे व त्याकरितां व्यापारावरील बंधनें तोडून टाकून त्याला अनिर्बंध संचार करण्यास वाव दिला पाहिजे असें त्यानें ठरविलें. यामुळेंच देश संपन्न होईल, लोकांवरील करांचें दडपण कमी होईल व राष्ट्राची सामाजिक व राजकीय स्थिति सुधारेल हें त्यास माहीत होतें. या सगळ्या गोष्टी पटल्यावर त्यानें त्या कृतींत उतरविल्या हें विशेष होय. यामुळेंच वॉलपोलपेक्षांही तो अर्थमंत्रि या नात्यानें कांकणभर सरस ठरतो.

ॲडॅम स्मिथ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रधानपद स्वीकारल्यावर पिटनें प्रथमतःच सन १७८४ मध्यें एक कायदा पास करून नोकर-चाकर, घरेंदारें, खिडक्या, शर्यतीचे घोडे वगैरेंवर कर बसविला. हा कर श्रीमंत लोकांवर होता हें उघड आहे. खिडक्यांवर कर बसविणें आज कदाचित् गुन्हा ठरेल; परंतु त्यावेळीं घराला पुष्कळ खिडक्या असणें हें श्रीमंतीचें लक्षण समजत. घराला सहापेक्षां जास्त खिडक्या असल्या तरच तो कर वसूल केला जाई. त्यानंतर खुल्या व्यापाराच्या तत्त्वाला अनुसरून त्यानें जीवनास आवश्यक अशा चहा, साखर, स्पिरिट वगैरे वस्तूंवरील जकाती उतरविल्या (१७८४). यामुळें त्या वस्तूंच्या किंमती उतरल्या. त्याबरोबर व्यापार वाढला, सरकारी उत्पन्न वाढलें व त्यामुळें पिटला इतर वस्तूंवरील जकातीही कमी करतां आल्या. चोरट्या व्यापाराला आळा घालण्याकरितां त्यानें एक कायदा करून कस्टम कचेरीची मर्यादा समुद्रकिनाऱ्यापासून पंधरा मैल वाढविली. यामुळेंही जकातीचें उत्पन्न वाढलें. वॉलपोलची किनाऱ्यावर वखारी स्थापण्याची कल्पना पसंत पडून ती त्यानें सुरू केली. दारू, तंबाखू वगैरे पदार्थांवरही त्यानें जकाती बसविल्या. सरकारी खर्चाला काट कोठें व कसा लावतां येईल हें समजून घेण्याकरितां त्यानें निरनिराळीं कमिशनें नेमलीं व त्यांच्या शिफारशींप्रमाणें त्यानें काम न करतां पगार खाणाऱ्या जागा बंद केल्या. सरकारी कर्जें फक्त वशिल्याच्या माणसांकडूनच घेतलीं जात, ती पद्धति बंद करून त्याकरितां तो टेंडरें मागवूं लागला. यामुळें त्याला कमी दरानें कर्जें मिळूं लागल्यानें सरकारचा फायदाच होऊं लागला. सरकारी जमाखर्च तपासण्याची पद्धति सुरू करून त्यानें सरकारी खर्चावर एकप्रकारें नियंत्रणच घातलें. राष्ट्रीय कर्जाची फेड योग्य रीतीनें करतां यावी म्हणून त्यानें गंगाजळीची स्थापना केली (१७८६). या योजनेमुळें दरसाल दहा लाख पौंड वेगळे काढून ते व्याजीं लावावयाचे व येणाऱ्या व्याजांतून राष्ट्रीय कर्जाची फेड करावयाची असा त्याचा बेत होता. तो यशस्वी झाला असता तर अठ्ठावीस वर्षांत राष्ट्रीय कर्जाची फेड झाली असती असा त्याचा अंदाज होता. परंतु मध्यंतरीं फ्रेंच राज्यक्रांतीमुळें युद्धें सुरू झाल्यानें त्याची ही योजना यशस्वी झाली नाहीं, हा भाग निराळा. परंतु त्याच्या या योजनेमुळें सरकारवरील लोकांचा विश्वास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाढला व त्यामुळें सरकारला नवीन कर्जें मिळण्याची सोय झाली. पिटच्या आर्थिक सुधारणांमुळें व्यापार वाढला, इंग्लंडची सांपत्तिक भरभराट झाली, उद्योगधंदे सरसावले, राष्ट्राची पत वाढली, चोरटा व्यापार बंद झाला व सरकारी तिजोरींत दरसाल दहा लक्ष पौंडांची भर पडूं लागली. आणि हा सगळा खुल्या व्यापाराचा परिणाम.

७. व्यापारी तह–आयर्लंड व फ्रान्स :—पिटच्या आर्थिक सुधारणा चालू असतांच त्यानें सन १७८५ मध्यें खुल्या व्यापाराच्या तत्त्वास अनुसरून आयर्लंडशीं तह घडवून आणला. सन १७८२ मध्यें आयर्लंडची पार्लमेंट स्वतंत्र झाली होती व त्यामुळें त्या देशाशीं व्यापारी तह केल्यास तो परस्परांस फायद्याचा होईल असा त्याचा अंदाज होता. परंतु हा तह थोड्या फरकानें इंग्लिश पार्लमेंटनें पास केला तरी तो आयरिश पार्लमेंटनें नापास केला. पुढें सन १७८६ मध्यें त्यानें त्याच तत्त्वास अनुसरून फ्रान्सशीं व्यापारी तह केला. या तहानें चाकू, सुऱ्या, कात्र्या, कापसाचें कापड, लोखंडी सामान वगैरे इंग्लिश माल फ्रान्समध्यें सवलतीच्या जकातीनें जावा व फ्रान्समधून दारू, ब्रँडी, ऑलिव्ह तेल वगैरे माल इंग्लंडमध्यें सवलतीच्याच दरानें यावा असें ठरलें. या तहाच्या वेळीं फॉक्सनें त्याला कसून विरोध केला व 'आपल्या बापाच्या वेळेपासूनचें फ्रान्सशीं चालू असलेलें वैर विल्यम पिट विसरला' असा टोमणा मारण्यासही त्यानें कमी केलें नाहीं. तेव्हां 'दोन देशांत अखंड वैर नांदलें पाहिजे असें मानणें कोत्या बुद्धीचें लक्षण असून तो शुद्ध पोरकटपणा आहे,' असें म्हणून पिटनें फॉक्सला गप्प बसविलें. त्याच वेळीं त्या तहानें फ्रान्स व इंग्लंड या दोन्ही देशांतील लोकांस परवानगी न घेतां परस्परांच्या देशांत जाऊन राहण्याची व प्रवासाची मोकळीक मिळाली व इंग्लंड व फ्रान्स यांचे संबंध सलोख्याचे झाले. ते सन १७९३ पर्यंत कायम टिकले. पुढें १७८८ मध्यें त्यानें इंग्लंड हें एकाकी राहूं नये म्हणून ब्रिटन, प्रशिया व हॉलंड यांचा एक संघ निर्माण केला. या संघाला 'त्रिराष्ट्रांचा संघ' असें म्हणतात. हा संघ स्थापन झाल्यानें इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणांत बदल झाला. तिसऱ्या जॉर्जनेंही पिटच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बदलत्या धोरणास मान्यता दिली—आजपर्यंत त्यानें कधींही दिली नव्हती—हें लक्षांत धरण्यासारखें आहे.

८. रीजन्सी बिल (१७८९) :—सन १७८८ मध्यें राजा आजारी पडला व तो वेडा होणार अशीं प्रथमच चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां त्याच्या पश्चात् कोणीतरी राजपालक नेमणें जरूर होतें. राजाचा वडील मुलगा जॉर्ज याला राजपालक नेमणें योग्य व कायदेशीर होतें. पिटचा प्रतिस्पर्धी फॉक्स यानें तेंच मत प्रतिपादन केलें. फॉक्स व राजपुत्र जॉर्ज यांचें चांगलेंच सूत होतें व तो राजपालक झाला तर पिटला हुसकून लावून आपल्याला तो मुख्य प्रधान नेमील असें त्याला वाटत होतें. हा राजपुत्र अत्यंत अप्रिय होता. सन १७७२ सालीं झालेल्या राजकुटुंबीयांच्या लग्नसंबंधाच्या कायद्यानें राजकुटुंबीयांस राजाची परवानगी घेऊन लग्न करावें लागे. राजपुत्रानें ती घेतली होती; परंतु हक्कसंरक्षणाच्या कायद्याचें उल्लंघन करून एका रोमन कॅथॉलिक स्त्रीशीं त्यानें विवाह केला होता. शिवाय तो उधळ्या होता व जुगाराच्या नादींही लागलेला होता. या सर्व गोष्टींमुळें तो लोकांस आवडत नव्हता. कसेंही असलें तरी राजपालक नेमण्याचा प्रश्न सोपा नव्हता. परंतु पिटनें युक्तीनें तो सोडविला. राजपालक नेमावयाचा झाल्यास त्याला राजा, कॉमन्ससभा व उमरावमंडळ या सर्वांची संमति पाहिजे असें त्याचें म्हणणें पडलें. तेव्हां पार्लमेंटनें ज़री कायदा पास केला व राजपुत्राला राजपालक नेमलें तरी त्या कृत्याला राजाची संमति असणें जरुरीचें आहे; पण तो तर आजारी होता व संमति देण्याच्या स्थितींत नव्हता. अशा स्थितींत राजपुत्रास राजपालक नेमावयाचें असलें तर पार्लमेंटच्या अटी त्यानें मान्य कराव्या, असें पिट म्हणूं लागला. त्याला राजपुत्र कबूल झाला. इतक्यांत राजा बरा झाला व सर्वच वाद मिटला. एका टोरी प्रधानानें पार्लमेंटच्या हक्कांची तरफदारी करावी हें लक्षांत धरण्यासारखें आहे.

९. पिटच्या कामगिरीची फलश्रुति :—एकंदरींत पाहतां शांततावादी अर्थमंत्रि म्हणून धाकट्या पिटची कामगिरी महनीय झाली यांत शंका नाहीं. सन १७८९ मध्यें फ्रान्समध्यें राज्यक्रांति झाल्यानें त्याच्या कामाला लगाम बसला व त्या क्रांतीचा इंग्लंडमध्यें फैलाव होऊं नये म्हणून त्याला अनेक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जुलमी कायदे पास करावे लागले. हें खरें असलें, तरी त्यामुळें त्याच्या कामगिरीचें महत्त्व कमी होत नाहीं. फ्रान्सशीं युद्ध सुरू झालें तरीही त्याची भरीव कामगिरी चालूच होती. सन १८०० मध्यें त्यानें आयर्लंड व इंग्लंड यांच्या एकीकरणाचा कायदा पास करून घेतला व त्या बाबतींत त्यानें दिलेलीं अभिवचनें राजामुळें त्याला पाळतां न आल्यानें त्यानें राजीनामा दिला. तरीही त्याचीं इतर कृत्यें लक्षांत धरण्यासारखीं आहेत. सन १७९१ मध्यें त्यानें कानडा प्रांताबद्दल एक कायदा पास केला. त्यान्वयें कानडाचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग पाडण्यांत येऊन फ्रेंच व इंग्रज नागरिकांना वेगवगळ्या सवलती त्यानें दिल्या. त्याच वर्षीं कॅथॉलिकांवरील कांहीं निर्बंध काढून टाकणारा कायदा त्यानें पास केला. सन १७९३ मध्यें व्यापारी कुचंबणा थांबविण्याकरितां त्यानें सरकारी हुंड्या काढण्याची पद्धति सुरू केली. त्यामुळें फ्रेंच लढायांमुळें मंदावलेल्या व्यापारास पुष्कळच मदत झाली. पिटच्या शांततामय कामगिरीमुळें देशाची भरभराट झाली यांत शंका नाहीं. टोरीपक्षाची त्यानें नव्या तत्त्वांवर संघटना व पुनर्घटना केली व इतके दिवस मरणोन्मुख स्थितींत असलेल्या त्या पक्षास त्यानें पुन्हां जिवंत केलें. पार्लमेंटची सुधारणा, गुलामगिरी रद्द करणें, कॅथॉलिकांवरील निर्बंध दूर करून त्यांस धार्मिक स्वातंत्र्य देणें, खुल्या व्यापाराचा प्रसार, आयर्लंडशीं समेट वगैरे बाबतींत तो राष्ट्राच्याही पुढें होता. राष्ट्रावरील आपत्तीमुळें त्या बाबतींत त्याला कांहीं करतां आलें नाहीं हें जरी खरें असलें तरी त्या बाबतींत त्यानें केलेले प्रयत्न चिंतनीय ठरतात. यापुढें युद्धमंत्रि या नात्यानें त्याची कामगिरी पुढील एका प्रकरणांत आपल्याला पहावयाची आहे.

१०. इंग्लंड व आयर्लंड यांचे संबंधः—तिसऱ्या विल्यमच्या कारकीर्दींत आयर्लंडांतील बंडाळी मोडल्यानंतर तेथील परिस्थिति अत्यंत वाईट झाली होती. सर्व आयर्लंड इंग्लंडच्या ताब्यांत आला होता व त्या देशावर प्रॉटेस्टंट लोकांचें प्रभुत्व स्थापन झालें. त्यावेळीं आयर्लंडमध्यें बहुजनसमाज कॅथॉलिकपंथीय होता व प्रॉटेस्टंट लोक अल्पसंख्यांक होते. परंतु खरी सत्ता प्रॉटेस्टंटांच्या हातीं राहिल्यानें बहुसंख्यांकांवर अनेक धार्मिक निर्बंध लादण्यांत आले होते. ते थोडक्यांत अशा रीतीनें सांगतां येतील,—(१) कॅथॉलिकांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जमीन विकत घेतां येत नसे अगर लांब करारानेंही ती वहिवाटतां येत नसे. प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक यांच्यांत बेटीव्यवहार बंद होता. कॅथॉलिकाचें एखाद्या प्रॉटेस्टंट कन्येशीं विवाह लावणाऱ्या उपाध्यायास फाशींची शिक्षा दिली जाई. एखादा कॅथॉलिक प्रॉटेस्टंट झाला तर त्याला आपली सर्व वडिलार्जित इस्टेट मिळे व त्याच्या इतर कॅथॉलिक भावांस तीवर कोणताही हक्क सांगतां येत नसे. कॅथॉलिक मुलांना आयर्लंडबाहेर शिक्षण घेण्याची मनाई होती; अर्थात् त्यांना प्रॉटेस्टंटांच्या शाळांतूनच शिक्षण घ्यावें लागे. त्यांना प्रॉटेस्टंटांच्या धर्मव्यवस्थेकरितां 'टाइथ' नामक कर (उत्पन्नाचा एक दशांश हिस्सा) द्यावा लागत असे. बॅरिस्टर होण्याची अगर आयरिश लष्करांत हुद्याची जागा मिळण्याची अगर आयरिश पार्लमेंटमध्यें प्रतिनिधि म्हणून बसण्याची कॅथॉलिकांस मनाई होती. पार्लमेंटच्या निवडणुकीच्या वेळीं मत देण्याचा साधा अधिकारही त्यांस नव्हता. जवळ तरवार बाळगणें, पांच पौंड किंमतीपेक्षां जास्त किंमतीचा घोडा विकत घेणें, वगैरे गोष्टींची कॅथॉलिकांस पूर्ण मनाई होती. या सर्व गोष्टींवरून धार्मिक बाबतींत आयरिश कॅथॉलिकांची कशी गांजणूक व छळणूक चालली होती हें दिसून येईल. (२) राजकीय बाबतींत मात्र प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक सहभागी होते. आयरिश पार्लमेंट स्वतंत्र नव्हती. सन १४९४ त पॉयनिंग्जच्या कायद्यानें आयरिश पार्लमेंटला ब्रिटिश राजाच्या संमतीशिवाय एकही कायदा पास करतां येत नव्हता. सन १७१९ च्या कायद्यानें ब्रिटिश पार्लमेंटनें आयर्लंडकरितां कायदे पास करण्याचा अधिकार आपल्याकडे घेतला. खुद्द आयरिश पार्लमेंटमध्यें लांचलुचपतीचे प्रकार चालत, धनिक जमीनदारांची ती बटीक बनली होती व तिची नवी निवडणूक कधीं व्हावी तें नक्की ठरलेलें नव्हतें. आयर्लंडचा कारभार एका ब्रिटिश अधिकाऱ्याकडे होता व तो इंग्लंडमध्यें राहून आयर्लंडचा कारभार हांकी ! त्याला लॉर्ड लेफ्टेनंट म्हणत. त्याच्यातर्फे न्यायाधिकारी आयर्लंडांत राहून कारभार करीत. सरकारी नोकऱ्या वशिल्यानें दिल्या जात व त्याही इंग्लिशांना मिळत. त्यामुळें इंग्रजांचा आयरिश लोक द्वेष करीत. (३) आर्थिक बाबतींत आयर्लंडवर अनेक निर्बंध लादण्यांत आले होते. आयर्लंड शेतीप्रधान देश होता व तेथें दूधदुभतें उत्तम होई. मेंढपाळांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धंदाही चांगला चाले. परंतु इंग्लिश शेतकऱ्यांचें नुकसान होऊं नये म्हणून इंग्लंडमध्यें दूध, लोणी वगैरे जिन्नस आणून विकण्याची आयरिशांना मनाई होती. त्याचप्रमाणें आयरिश लोकरही इंग्लंडांत आणूं देत नसत. फक्त तागाची आयात इंग्लंडनें सन १७०७ पर्यंत मान्य करून पुढें त्याच्यावरही निर्बंध लादले. अमेरिकेशीं व्यापार करण्याचीही आयर्लंडला बंदी करण्यांत आली होती. नौकानिर्बंधाचे कायदेही आयर्लंडला लागू करण्यांत आलेले होते. या सर्वांच्या बुडाशीं इंग्लिश व्यापाऱ्यांचें हित होतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यापायीं आयरिश व्यापार बुडाला अगर आयरिश शेतकरी नष्ट झाला तरी त्याची क्षिती बाळगण्यांत येत नसे. त्यामुळें आयरिश लोक जळफळत.

११. **स्वातंत्र्याकरितां आयरिशांचे प्रयत्न**:—अशा स्थितींत अमेरिकन स्वातंत्र्य-युद्ध सुरू झाल्यामुळें त्या वेळेपासून आयर्लंडमध्यें खरी चळवळ सुरू झाली. त्यावेळीं कदाचित् फ्रेंचांचा हल्ला आपल्यावर येईल या भीतीनें आयरिश लोकांनीं स्वसंरक्षणार्थ स्वयंसेवक दल स्थापन करण्यास सुरुवात केली. लगेच आयर्लंडमध्यें अनेक सशस्त्र सैनिकांचीं पथकें निर्माण झालीं. हेन्री ग्रॅटन हा आयरिश लोकांचा पुढारी बनला व त्याच्या स्फूर्तीनेंच इंग्लंडवरील संकटाचा फायदा करून घेण्याचें आयरिशांनीं ठरविलें. ताबडतोब ब्रिटननें लादलेले व्यापारी निर्बंध न पाळतां सर्व देशांशीं व्यापार करण्याचें आयरिशांनीं ठरविलें. त्या चळवळीमुळें आयर्लंडशीं सलोख्याचें धोरण इंग्लंडनें स्वीकारलें. सन १७७८ मध्यें आयर्लंडच्या व्यापारावरील निर्बंध दूर करण्यांत आले व सन १७८२ मध्यें पॉयनिंग्जचा कायदा व सन १७१९ चा कायदा हे दोन्ही कायदे रद्द करून आयरिश पार्लमेंट स्वतंत्र करण्यांत आली. या कृत्यानें प्रॉटेस्टंटांचें समाधान झालें, तरी रोमन कॅथॉलिकांचें समाधान झालें नाहीं. त्यामुळें त्यांनीं जोरानें चळवळ सुरू केली. सन १७९३ मध्यें त्यांना निवडणुकीच्या वेळीं मत देण्याचा अधिकार देण्यांत आला, तरी पार्लमेंटमध्यें प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार त्यांस मिळाला नाहीं. पुढें फ्रान्समधील राज्यक्रांतीची चळवळ जसजशी जोरांत होऊं लागली तसतसें आयरिश लोकांनाही उत्तेजन मिळूं लागलें. सन १७९१ मध्यें वुल्फ टोनच्या नेतृत्वाखालीं 'युनायटेड आयरिशमेन' नांवाचा एक संघ निर्माण झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्या सुधारणा व कॅथॉलिकांवरील धार्मिक निर्बंध दूर करणें, हा या संघाचा मुख्य उद्देश होता. पुढें हा संघ लोकप्रिय होत जाऊन त्याच्या सभासदांची संख्या हजारांनीं वाढत गेली. अंदाजाप्रमाणें सन १७९६ मध्यें फ्रेंच लोकांचा आयर्लंडवर हल्ला आला, पण तो फसला. सन १७९८ मध्यें 'युनायटेड आयरिशमेन'च्या अनेक गुप्त अराजकांनीं आयर्लंडमध्यें बंड सुरू केलें. तें बंड लौकरच मोडण्यांत आलें. वुल्फ टोननें शिक्षा चुकविण्याकरितां आत्महत्या केली. या सर्व गोष्टींनंतर आयर्लंडमध्यें कायमची शांतता टिकविण्याकरितां व इंग्लंड व आयर्लंड यांच्यामध्यें सलोखा नांदावा म्हणून आयरिश व ब्रिटिश पार्लमेंटचें एकीकरण करण्याचें पिटनें ठरविलें. आयरिश प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक एकीकरणाच्या विरुद्ध होते. परंतु प्रॉटेस्टंटांपैकीं कांहींना सरदारक्या देण्याचें व कॅथॉलिकांवरील धार्मिक निर्बंध दूर करण्याचें पिटनें अभिवचन दिल्यानें सन १८०० मध्यें एकीकरणाचा कायदा पास करण्यांत आला.

१२. एकीकरण व त्याचे परिणाम:—त्या कायद्यानें खालील गोष्टी ठरल्या. ग्रेट ब्रिटन व आयर्लंड हे देश एक समजण्यांत यावे, त्यांचें पार्लमेंट, त्यांचें लष्कर व राष्ट्रीय निशाण एकच असावें; चार धर्मगुरू व अठ्ठावीस आयरिश उमराव उमरावमंडळांत असावे; त्यांची आयरिश उमरावांकडून तहाहयात निवडणूक व्हावी; कॉमन्स सभेंत आयर्लंडतर्फे शंभर प्रतिनिधि असावे; दोन्ही देशांत खुला व्यापार चालू व्हावा व आयरिश उमरावांना ब्रिटिश मतदारसंघातर्फे कॉमन्स सभेच्या निवडणुकीकरितां उभें राहण्यास परवानगी असावी. अशा तऱ्हेनें एकीकरणाचा कायदा पास झाला. तरी पिटनें वचन दिल्याप्रमाणें कॅथॉलिकांवरील धार्मिक निर्बंध दूर करणें राहिलें होतें. तेव्हां त्यानें त्याकरितां एक कायदा करण्याचें ठरविलें; परंतु तिसऱ्या जॉर्जनें त्या कृत्याला विरोध केल्यानें पिटनें आपल्या जागेचा राजीनामा दिला (१८०१). त्यामुळें कॅथॉलिकांवरील धार्मिक निर्बंध कायमच राहिले व त्यांचा असंतोषही कायम राहिला. खुल्या व्यापारामुळें आयर्लंडचा फायदा झाला. तरीही इंग्लंडनें आपला विश्वासघात केला म्हणून आयरिश लोक जळफळतच राहिले व एकीकरणाचा कायदा रद्द करण्याबद्दल त्यांनीं पुढें जोरानें चळवळ चालविली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. पिटचें पूर्वचरित्र थोडक्यांत सांगा. अर्थमंत्रि या नात्यानें वॉलपोल व धाकटा पिट यांची तुलना करा.

२. थोरला पिट व धाकटा पिट यांची तुलना करा. धाकटा पिट मुख्य प्रधान झाला त्यावेळीं इंग्लंडची स्थिति कशी होती ?

३. इंग्लंडची आर्थिक सुधारणा करण्याकरितां पिटनें कोणते उपाय योजले ? त्यांचा परिणाम काय झाला ?

४. पिटनें केलेल्या सुधारणा सांगून शांततावादी अर्थमंत्रि या नात्यानें त्याची योग्यता वर्णा.

५. इंग्लंड व आयर्लंड यांचे संबंध सांगा. त्या दोन्ही देशांचें एकीकरण केव्हां झालें ? त्यांत कोणत्या गोष्टी ठरल्या ? त्याचा परिणाम काय झाला ?

६. टिपणें करा :—पिटचें बिल, रीजन्सी बिल, खुल्या व्यापाराचें धोरण, पार्लमेंटची सुधारणा.

७. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—
ॲडॅम स्मिथ, वूल्फ टोन, ग्रॅटन, विल्बरफोर्स, हेस्टिंग्ज, युनायटेड आयरिश-मेन, कॅथॉलिकांवरील धार्मिक निर्बंध, गुलामगिरी.

उतारा

१. इंग्लंड व आयर्लंड यांचें एकीकरण—१८००

इंग्लंड व आयर्लंड या देशांचें एकीकरण होऊन त्यांचे संबंध अधिक दृढ व्हावेत अशी इंग्लंडच्या राजेसाहेबांनीं ज्या अर्थी इच्छा प्रदर्शित केली आहे त्या अर्थी इंग्लंडच्या दोन्ही पार्लमेंटसभा व आयर्लंडच्या दोन्ही सभा यांनीं आपापल्या निरनिराळ्या सभेंत, आयर्लंड व ग्रेट ब्रिटन यांचे हितसंबंध सुरक्षित रहावेत व ब्रिटिश साम्राज्याची शक्ति, त्याचें सामर्थ्य व त्याची साधनसामुग्री यांची वाढ व्हावी या हेतूनें, असें ठरविलें आहे कीं त्या दोन्ही देशांचें एकीकरण व्हावें. दोन्ही देशांच्या पार्लमेंटच्या एकीकरणाच्या खालीलप्रमाणें अटी असाव्या. (१) सन १८०१ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेपासून ग्रेट ब्रिटन व आयर्लंड हे देश कायमचे एक व्हावेत व त्या संयुक्त देशाला ‘ ग्रेट ब्रिटन व आयर्लंड यांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संयुक्त राज्य ' असें म्हणावें. (२) या संयुक्त राज्यांतील लोकांचे प्रतिनिधि एकाच पार्लमेंटमध्यें बसावे व त्या पार्लमेंटला ' ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त देशाचें पार्लमेंट ' असें संबोधावें. (३) या पार्लमेंटमध्यें आयर्लंडतर्फे आयरिश उमरावांनीं निवडलेले २८ उमराव असावेत व त्यांची निवडणूक तहाहयात असावी. धर्मगुरूंच्यातर्फे चार प्रतिनिधि असावेत व त्यांची आळीपाळीनें निवडणूक व्हावी. कॉमन्ससभेमध्यें आयर्लंडचे शंभर प्रतिनिधि असावेत. (४) इंग्लिश व आयरिश यांचीं धर्मपीठेंही एक व्हावीं व त्यास ' आयर्लंड व इंग्लंड यांचें संयुक्त धर्मपीठ असें संबोधावें. ' (५) ब्रिटिश प्रजाजनांस जे अधिकार व हक्क मिळतील तेच हक्क व अधिकार आयरिश प्रजाजनांसही मिळावे व व्यापार, लष्कर, आरमार, परराष्ट्रीय व्यवहार वगैरे बाबतींत ब्रिटिश प्रजाजनांस जे हक्क, जे अधिकार, जें उत्तेजन अगर जी मदत मिळेल तशी ती आयरिश लोकांसही मिळावी. अर्थात् ब्रिटिश व आयरिश प्रत्येक बाबतींत एकाच समान भूमिकेवर आहेत असें समजण्यांत यावें.

प्रश्न :—१. हा कायदा पास होण्याचें कारण काय ? त्याकरितां पिटनें कोणतीं वचनें दिलीं.

२. ह्या कायद्यांत कोणत्या ठळक गोष्टी सांगितल्या आहेत ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालादर्श—इ. स. १७६०-१७९३

प्रसिद्ध व्यक्ति	इंग्लंड—महत्त्वाच्या गोष्टी	वर्ष	हिंदुस्थान—महत्त्वाच्या गोष्टी	यूरोप—महत्त्वाच्या गोष्टी
ब्यूट, पिट	तिसरा जॉर्ज १७६०-१८१५	१७६०	उदगीरची लढाई	
पहिला माधवराव		१७६१	पानिपतची तिसरी ल.	फ्रान्स-स्पेन. कौटुंबिक संघ ३ रा
राघोबा टाऊनशेंड	विल्कस प्रकरण, पॅरिसचा तह,	१७६३	राक्षसभुवनची लढाई	
ग्रेनव्हिल मल्हारराव	स्टँप ॲक्ट	१७६५	मल्हारराव होळकर मृ.	
महादजी नाना फडणवीस	टाऊन. जकात बसवितो	१७६७	हैदर-इंग्रज युद्ध	
फ्रँकलिन फॉक्स नॉर्थ	नॉर्थ मुख्य प्रधान	१७७०		पोलंडची वांटणी १७७२
वॉशिंग्टन	बोस्टन चहाप्रकरण	१७७३	रेग्युलेटिंग ॲक्ट. नारायणराव-खून	
रामशास्त्री सखारामबापू	अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा	१७७६	पुरंदरचा तह	
हैदर, टिपू	सशस्त्र-तटस्थ संघ	१७८०		हॉलंड व इं. युद्ध
बर्क, शेरिडन	अमेरिका स्वतंत्र	१७८२	हैदर मृ. सालपें तह	
	पिट मुख्य प्रधान १७८३-१८०१	१७८४	पिटचें बिल	
	वॉरन हेस्टिंग्जची चौकशी	१७८६		
	रीजन्सी बिल	१७८९	टिपू-इंग्रज युद्ध	फ्रेंच राज्यक्रांति
	इंग्लंड-फ्रान्स युद्ध	१७९३	कायमधारा पद्धति	फ्रान्सशीं युद्ध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२३. औद्योगिक क्रांति (१७६०–१८२०)

१. औद्योगिक क्रांतीचीं कारणें :—अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रांति झाली असें मानण्यांत येतें. त्या काळीं इंग्लंड-मधील उद्योगधंद्यांच्या बाबतींत इतके विलक्षण फरक झाले व त्यांच्या मांड-णींत, व्यवस्थेंत व रचनेंत इतका पालट झाला कीं इंग्लंडची औद्योगिक, सामाजिक व आर्थिक स्थिति एकदम बदलून गेली. उद्योगधंद्यांच्या साधनांत फरक झाले, त्यांची पद्धति बदलली गेली व त्यांचें स्वरूप पालटून गेलें. इतके दिवस बहुतेक धंदे खेड्यांतून चालत ते आतां शहरांतून चालूं लागले. लोक आपापल्या घरांत बसूनच सर्व उद्योगधंदे करीत, ते आतां कारखान्यांत होऊं लागले. लोकांच्या हातांऐवजीं आतां यंत्रांचा उपयोग होऊं लागला आणि हा सगळा बदल हळूहळू व लोकांच्या न कळत होत गेला. या सर्व प्रकाराला औद्योगिक क्रांति असें म्हणतात. या क्रांतीला कार-णेंही तशींच घडून आलीं. या सुमारास इंग्लंडचें साम्राज्य बरेंच वाढलें होतें व अनेक देशांच्या बाजारपेठा इंग्रजांनीं आपल्याशा केल्या होत्या. त्यामुळें इंग्लिश मालाला बाहेरून पुष्कळ मागणी येऊं लागली होती. ती मागणी पुरी करण्याची जबाबदारी इंग्रजांवर पडल्यानें पूर्वींचीं साधनें अपुरीं पडूं लागलीं; अर्थात् नवीं साधनें शोधण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली. याच काळांत इंग्लं-डची लोकसंख्याही वाढली होती. त्यांना इंग्लंडांत उत्पन्न होणारें अन्न अपुरें पडूं लागलें व त्यांच्यांत बेकारीही थोडी डोकावूं लागली होती. अनेक कल्पक इंग्रज लोक बाहेरच्या देशांतून प्रवास करून इंग्लंडांत येऊन राहिले होते. त्यांनीं अनेक नवे विचार आपल्याबरोबर इंग्लंडांत आणले व त्यांच्या जोरा-वर त्यांनीं अनेक प्रयोग करून इंग्लंडमधील उद्योगधंद्यांमध्यें क्रांति घडवून आणण्याचें श्रेय पटकावलें आणि याचमुळें प्राचीन काळापासून शेतीप्रधान म्हणून प्रसिद्धी पावलेला इंग्लंड आतां औद्योगिक कारखान्यांनीं भरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाऊं लागला व थोड्याच दिवसांत तो जगाचा कारखाना बनला. ही सर्व घडामोड सन १७६० पासून सन १८२० पर्यंत झाली.

२. **विणकलेच्या धंद्यांतील क्रांति**:—इंग्लंड शेतीप्रधान देश असल्यानें बहुतेक इंग्रज खेड्यांतूनच राहत. अशा तऱ्हेनें जवळ जवळ तीन चतुर्थांश लोक खेड्यांतून रहात असल्यानें त्या काळीं शेतकी हा एकच उद्योग चाले. परंतु तो धंदा बारमास चालणारा नसल्यानें शेतकरी लोक आपल्या घरीं बसून फावल्या वेळांत अनेक धंदे करीत. त्यांत सूत कातून त्याचें कापड बनविणें हा मुख्य धंदा होता. या धंद्यांत प्रत्येक घरांतील बायका-मुलें-पुरुष गुंतलेलीं असत. मुलें कापूस पिंजीत, स्त्रिया सूत कातीत व पुरुष मागावर बसून कापड विणीत. शहरांतील छोटे–मोठे व्यापारी हें कापड विकत घेऊन इंग्लंडांत अगर इंग्लंडबाहेर विकीत. परंतु इंग्लिश कापडाला जसजशी मागणी येऊं लागली तसतशी आपल्या घरांत अगर खोपटांत बसून कापड विणणाऱ्या कोष्ट्यांच्या मागें जास्त कापड, व तेंही लवकर मिळण्याबद्दल व्यापारी निकड लावूं लागले. कापूस पिंजण्यापासून विणण्यापर्यंत सर्व काम हातांनीं करावयाचें असल्यानें सर्व मागणी पुरी तरी कशी पाडतां येणार ? त्यामुळें जुनीं साधनें व जुनी पद्धति सुधारून त्यांत फरक करणें कोष्ट्यांस आवश्यक वाटलें. तेव्हां या बाबतींत अनेक शोध हळूहळू लागले. सन १७३३ मध्यें जॉन के यानें धांवत्या धोट्यांचा शोध लावला. यामुळें श्रम व वेळ वांचूं लागला. त्याचप्रमाणें लांब कापड


चरका ऊर्फ सूत काढण्याचें यंत्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढावयाचें झाल्यास ताण्याच्या दोन टोंकास दोन माणसें व विणणारा एक अशीं तीन माणसें लागत. केच्या शोधामुळें एकच मनुष्य पुरा पडूं लागला. अर्थात् काम झपाट्यानें होऊं लागलें. परंतु भरपूर सूत न मिळाल्यानें विण-



हारग्रीव्हजचें 'स्पिनिंग जेनी'

ण्याच्या कामांत खोळंबा होऊं लागला. ही गोष्ट लक्षांत घेऊन सन १७६४ मध्यें जेम्स हारग्रीव्हजनें 'स्पिनिंग जेनी' नांवाचें एक नवीन यंत्र शोधून काढलें. त्यापूर्वी एकाच चातीवर सूत निघे. परंतु हारग्रीव्हजच्या यंत्रामुळें एकाच वेळीं आठ चात्यांवर सूत निघूं लागलें. या यंत्रावर सूत तलम निघे; परंतु तें भक्कम नसे. तें यंत्र कापसाचें सूत काढण्याकरितांच उपयोजितां येई. शिवाय तें यंत्र हातानें फिरवावें लागल्यानें वेळही पुष्कळ लागे. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन सन १७६९ मध्यें रिचर्ड आर्कराइटनें पाणचक्कीच्या साहाय्यानें सूत काढण्याचें यंत्र शोधून काढलें. हा गृहस्थ स्त्रीपुरुषांचे केंस विकत घेऊन त्यांचीं गंगावनें अगर टोप करीत असे; पण तो धंदा मागें पडल्यानें विणकलेकडे त्याचें लक्ष लागलें. त्याचें यंत्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



क्रॉम्पटन

आर्कराइट

हातानें चालत नसे. पाण्याच्या साहाय्यानें चाले. तें इतकें मोठें होतें कीं त्याकरितां जुनीं घरें व खोपटें पुरेनाशीं झाल्यानें त्याच्याकरितां नव्या इमारती बांधण्यांत येऊं लागल्या. त्या यंत्रामुळें निघालेलें सूत ओबडधोबड असलें तरी मजबूत असे व त्यामुळें इतके दिवस इंग्लंडांत जें कापसाचें कापड होत नसे तें आतां होऊं लागलें. सन १७७९ मध्यें सॅम्युअल क्रॉम्पटननें वरील दोन्ही यंत्रांचा मिलाफ करून एक नवीनच यंत्र शोधून काढलें व त्याला 'म्यूल' असें नांव दिलें. हें यंत्र लहान असून तें एखाद्या खोपट्यांतही मावे. त्याच्या साहाय्यानें निघणारें सूत चांगलें मजबूत व तलमही असे. त्यामुळें इंग्लंडांत मलमलीचें कापड निघूं लागलें. इतके दिवस त्याकरितां इंग्लंडला हिंदुस्थानाकडे पहावें लागत होतें. क्रॉम्पटनला त्याच्या यंत्राकरितां एकानें फक्त ६० पौंड दिले, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या सर्व शोधांमुळें सूत काढणें सोपें होऊन तें भराभर निघूं लागलें. सन १७८५ मध्यें कार्टराइटनें वाष्पशक्तीच्या साहाय्यानें चालणारा माग शोधून काढला व त्यामुळें विणकलेंत भयंकर क्रांति होऊन कापडाची पैदास शेंकडों पटीनें वाढली. इतके दिवस सर्व कापड उन्हांत वाळवून त्याला रंग देत. परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या पद्धतीनें रंग द्यावयाचा झाल्यास त्याला सहा सात महिने लागत. ही अडचण पाहून 'टेनन्ट' नांवाच्या गृहस्थानें रासायनिक द्रव्यांच्या साहाय्यानें रंग देण्यास सुरुवात केली. त्यामुळें रंग लवकर देतां येई. सन १७८५ च्या सुमारास यांत्रिक साहाय्यानें कापडाला रंग देण्यास सुरुवात झाली. यामुळें वेळेची बचत होऊन रंगीत कापड लवकर होऊं लागलें व ठशांच्या साहाय्यानें रंग देण्याची पद्धति बंद पडली.



कार्टराइट

३. शोधांचा परिणाम :—या शोधांमुळें विणकला उर्जितावस्थेस



क्रॉम्पटनचें म्यूल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आली कापडही भरपूर निघूं लागलें व मागणीप्रमाणें पुरवठा होऊं लागला. त्यामुळें खेड्यांतील कोष्ट्यांचे धंदे पार बसून जाऊन ते बेकार बनले. त्यांना हे नवे नवे शोध अप्रियच होते व त्यामुळें चिडून जाऊन हे लोक गिरण्यांवर हल्ले करूं लागले. अनेक कारखान्यांत शिरून त्यांनीं तेथील यंत्रांची नासधूस सुरू केली व दंगेधोपे केले. परंतु हे दंगे थांबविण्यांत आले. या शोधांचा आणखी एक परिणाम म्हणजे पूर्वींचीं हत्यारें मागें पडलीं. आजपर्यंत लांकडाचींच साधनें उपयोगांत येत; चात्या, टकल्या, हातमाग व त्याचे निरनिराळे भाग हे सर्व प्रकार लांकडाचेच असत व ते हातांनीं तयार केले जात. आतां वरील सर्व जिन्नस लोखंडाचे बनूं लागले. प्रथमतः लोखंडाचीं हत्यारेंही हातांनींच बनविलेलीं असत. अर्थात् जसजशा नव्या नव्या गिरण्या सुरू झाल्या व त्यांतून लोखंडाचीं यंत्रें लागूं लागलीं तसतशी लोखंडालाही जास्त जास्त मागणी येऊं लागली व मग त्याच्या उत्पादनाकडे लोकांचें लक्ष जास्त प्रमाणांत वेधूं लागलें. कापसाचा धंदा लँकेशायरमध्यें जोरानें फोंफावला व त्यामुळें बेकार शेतकऱ्यांचा लोंढा त्या भागाकडे नोकरीकरितां वळूं लागल्यानें खेड्यांना उतरती कळा लागून तीं ओस पडूं लागलीं. लोकरीचें कापड चांगलें निघत नसे, हें मात्र विसरून चालणार नाहीं.

४. लोखंडाच्या धंद्यांत क्रांति :—विणण्याकरितां जसजशा गिरण्या स्थापन होऊं लागल्या तसतशी लोखंडी यंत्रांना जास्त मागणी येऊं लागली. इंग्लंडांत लोखंडाच्या खाणी पुष्कळ होत्या; परंतु त्यांतून लोखंड वर काढून तें वितळविण्याकरितां साध्या कोळशांचा उपयोग करण्यांत येत असे. त्यामुळें त्या कोळशाकरितां लागणारें लांकूड जंगलांतून कापून आणीत व मग तें जाळून त्याचे कोळसे करण्यांत येत. हा धंदा जोरांत चालल्यानें जंगलें खलास होऊं लागून कोळसा मिळेनासा झाला व त्यामुळें लोखंड वितळविणें अशक्य झालें. तेव्हां लोक दगडी कोळशाकडे वळले व लोखंडाचा रस करण्याकरितां दगडी कोळशाचा उपयोग होऊं लागला. परंतु त्याचा फारसा उपयोग होईना. तेव्हां दगडी कोळसा जाळून त्याचा अवशिष्ट राहणारा व न जळणारा भाग—म्हणजेच कोक—उपयोगांत आणण्यास सुरुवात झाली. हा शोध अॅब्राहाम डार्बी यानें सन १७३५ त लावल्यामुळें लोखंडाचा रस कर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्याच्या कामीं कोकचा उपयोग होऊं लागला. ज्या ठिकाणीं लोखंड व दगडी कोळसा जवळ जवळ व विपुल सांपडत होता त्या त्या ठिकाणीं लोखंडाचे कारखाने निघूं लागले. इंग्लंडच्या मध्य विभागांत हे कारखानें फार निघाले व दक्षिणेंतील, ससेक्स परगण्यांतील, दगडी कोळशाच्या अभावीं बंद पडले. बर्मिंगहॅम व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश लोखंडाच्या कारखान्यांकरितां प्रसिद्ध झाला. या कारखान्यांतूनच लोखंडाचा रस करणें, पोलाद करणें व त्याचीं निरनिराळीं यंत्रें करणें वगैरे कामें होऊं लागलीं. लोखंडाचा रस करण्याच्या कामीं पूर्वी साधे व हातानें चालणारे भाते वापरण्यांत येत. शिवाय कोक वापरल्यानें भट्टयाही रसरसीत ठेवणें अवघड होऊं लागलें. तेव्हां त्या कामीं शोध करून जेम्स वॅटनें सन १७६९ मध्यें बाष्पशक्तीनें चालणारें एंजिन शोधून काढलें. अशाच तऱ्हेचें एक एंजिन ॲन राणीच्या कारकीर्दींत न्यूकामेननें शोधून काढलें होतें; परंतु



जेम्स वॅट

वरील कामास तें निरुपयोगी होतें. वॅटच्या एंजिनानें कमी खर्चांत भट्टया रसरशीत ठेवतां येत. त्यामुळें त्या एंजिनाचा सन १७८२ पासून लोखंडी कारखान्यांतून फार उपयोग होऊं लागला. वॅटच्या एंजिनमधील दोष नाहींसे करून तें जास्त उपयुक्त करण्याचें काम जॉन विल्किन्सन यानें केलें. यानें लोखंडाच्या धंद्यांत बरीच क्रांति घडवून आणली होती. सन १७८७ मध्यें पोलादी पत्र्यांची त्यानें 'कॉमेट' नांवाची पहिली आगबोट बनविली. यामुळें आरमारांतही पोलादी जहाजें बांधण्यास सुरुवात झाली. विल्किन्सननें लोखंडाच्या तोफाही ओतल्या होत्या. बेंजामिन हॅटस्मननें घड्याळासारख्या नाजुक जिनसांकरितां वापरण्यांत येणारें शुद्ध व चिवट पोलाद तयार केलें. लोखंडाकरितां दगडी कोळशाचा उपयोग होतो असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



वॅटचें वाफेनें चालणारें एंजिन



सर हंफ्री डेव्ही

समजतांच खाणींतून तो वर काढण्याचा धंदाही जोरांत सुरू झाला. या खाणींतून दगडी कोळसा वर काढणें फार धोक्याचें असे. कारण खाणींत अनेक प्रकारचे विषारी वायू राहिल्यानें स्फोट होण्याचा संभव फार. तेव्हां तेथें साधा दिवा नेणें शक्यच नव्हतें. ही गोष्ट जाणून सन १८१५ मध्यें हंफ्री डेव्ही या गृहस्थानें 'सेफ्टी लँप' नांवाचे दिवे शोधून काढले. त्यामुळें इतके दिवस साध्या दिव्यामुळें खाणींतील वायू पेटून स्फोट होत ते होईनासे झाले. अर्थात् खाणींतील मजुरांवर त्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनंत उपकार झाले. लोखंडाच्या कारखान्यांची उन्नति होत असतांच त्यावेळीं आणखी एक धंदा उदयास येऊं लागत होता. तो म्हणजे चिनी मातीचीं भांडीं तयार करण्याचा. पूर्वीं सर्व भांडीं लाकडाचीं असत. मात्र श्रीमंत लोक चिनी मातीचीं भांडीं वापरीत. जोशिया वेजवुड या कुंभारानें चिनी मातीचीं भांडीं तयार करण्याचा कारखाना काढला. त्यांचा खपही वाढून त्याचा धंदा जोरांत चालूं लागला.

५. शेतीच्या धंद्याची स्थिति:—इंग्लंड हा शेतीप्रधान देश असल्यानें प्रथमपासूनच तेथें शेतीचा धंदा मुख्य समजण्यांत येत असे. परंतु अठराव्या शतकापर्यंत त्यांत फारसा फरक झालेला नव्हता. शेतांस कुंपणें न घालतां तीं खुलीं व सलंग ठेवण्यांत येत. मात्र खेड्यांत राहणाऱ्यांना निरनिराळे पट्टे वांटून दिलेले होते व ते ओळखतां यावे म्हणून ठिकठिकाणीं बांध घालण्यांत येत. या पद्धतीमुळें अनेक तोटे होत. बांधामुळें शेत फुकट जाई, एक सबंधच्या सबंध शेत दरसाल रिकामें ठेवल्यामुळें पीक पुरेसें होत नसे, ठरल्याप्रमाणेंच शेतें करावीं लागल्यामुळें नवीन नवीन प्रयोग करतां येत नसत व बांधांवर उगवलेलें गवत शेतांत फैलावून तें शेतीचा नाश करी. अशा तऱ्हेनें जमीन असूनही त्यांत पीक काढलें जात नसे व जें काढीत तें वाढत्या लोकसंख्येला अपुरें पडे. धान्य तर जास्त पाहिजे होतें; पण तें पिकेना व त्यामुळें असलेल्या धान्याच्या किंमती भरमसाट वाढूं लागल्या. कारखाने वाढल्यामुळें खेड्यांतील शेतमजूर तिकडे जाऊं लागले व त्यामुळें शेतें करायला माणसें मिळेनाशीं झालीं. या सर्व गोष्टींमुळें शेतींत नव्या सुधारणा करणें इष्ट होतें. निरनिराळे पट्टे एकत्र करून त्यांचें एकच सलंग शेत पाडण्यास व नंतर त्यांस कुंपणें घालण्यास सुरुवात झाली. पार्लमेंटनेंही त्या बाबतींत कायदे करून कुंपणें घालण्याच्या पद्धतीस उत्तेजन दिलें. कुंपणें घालण्याच्या पद्धतीमुळें गरीब शेतकऱ्यांचें नुकसान झालें व त्यांची जमीन जाऊन त्यांना कारखान्यांत मजुराची नोकरी करावी लागली. शेतांत नवे नवे प्रयोग होण्यास यानंतर सुरुवात होऊन शेतींत क्रांति घडून आली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. **शेतींतील नव्या सुधारणा** :—प्रथमतः दलदलींतून पाणी काढून लावून अनेक जमिनी शेतीस उपयुक्त करण्यांत आल्या; त्यानंतर पिकें पेरण्यांत येऊं लागलीं, तींही नव्या पद्धतीनें. पेरणीकरितां जेथ्रो टल नांवाच्या गृहस्थानें एक नवीन यंत्र शोधून काढलें. त्यामुळें बीं पेरण्यांत पद्धतशीरपणा आला; नाहींतर पूर्वी बीं हाताला येईल तसें पेरलें जाई. जेथ्रो टलच्या नव्या यंत्रानें बीं एका ओळींत पेरलें जाई व त्यामुळें कापणीही सोपी जाई. शिवाय शेतांत खुरपणी करून नको असलेलें गवत कापण्यास सोपें जाऊं लागलें. वरील प्रमाणेंच जेथ्रो टलनें मुळे, गाजरें, टर्निप वगैरे कंदमुळें लावण्यास सुरुवात केली. अर्थात् हिंवाळ्यांतही गुरांना टर्निप खावयास मिळूं लागल्यानें त्यांना हिवाळ्यांत मारून त्यांचें मांस उन्हाळ्याकरितां खारवून ठेवण्याची पद्धति कमी झाली. शिवाय माळरानांतही हीं कंदमुळें होत, त्यामुळें नापीक जमिनीही उपयोगांत येऊं लागल्या. जेथ्रो टलच्या या शोधाचा वॉलपोलचा मेहुणा टाऊनशेंड (१६७४–१७३८) यानें फार फैलाव केला. टर्निपचें पीक त्यानें मोठ्या प्रमाणावर प्रथम आपल्या शेतांत लावलें व त्यामुळें त्याला ' टर्निप टाऊनशेंड ' असें म्हणतात. त्यानेंच असेंही सिद्ध केलें कीं पिकांची आलटापालट करून पिकें त्याच जमिनींत पेरलीं तर जमिनीचा कस जात नाहीं व ती पाडून ठेवण्याचीही जरूर रहात नाहीं. टाऊनशेंडच्या प्रयोगांमुळें गहूं, टर्निप, गाजरें, बार्ली, घासगवत, वगैरे शेतांत पिकूं लागून जमिनीचा कस वाढला व ती जास्त सुपीकही होऊं लागली. शेतांना उत्तम खत घालण्यासही त्यानें सुरुवात केली होती. तिसरा जॉर्ज शेतकऱ्यांचा राजा म्हणून प्रसिद्ध होता. त्यानें शेतकऱ्यांस अनेक प्रकारें उत्तेजन दिलें व विंडसर राजवाड्याजवळ एक 'आदर्श शेत' राखलें. त्यानें त्यांत अनेक यशस्वी प्रयोग करून त्यांची माहिती लोकांस व्हावी म्हणून एक प्रसिद्धी अधिकारी नेमला. तो शेतकी मंडळाचा अध्यक्ष आर्थर यंग हा होय. त्यानेंही ठिकठिकाणीं प्रवास करून इंग्लिश शेतकऱ्यांस अनेक प्रयोग समजावून दिले व त्यांचीं प्रात्यक्षिकेंही दाखविलीं. टॉमस कोक (१७५२–१८४२) यानें शेतीस उत्तम खतपाणी घातलें तर माळरानांतही उत्तम पीक काढतां येतें असें स्वतः जमीन कसून सर्वांस पटवून दिलें. त्यानें नॉरफोक परगण्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होकहॅम येथें आदर्श जमीन कशी करावयाची तें ' एका ओसाड माळरानाचें सुंदर शेत तयार करून प्रत्यक्ष दाखविलें ' व त्यांत गहूं, राय वगैरे पिकें नव्या पद्धतीनें पिकवून सर्वांस थक्क केलें! युरोपांतील लोकही त्याची सुंदर शेती व त्याचे प्रयोग पाहण्यास येत. अशा तऱ्हेनें सुधारणा होत असतांच गुरांची चांगली व शास्त्रशुद्ध पैदास करण्याकडे कांहीं लोकांचें लक्ष वेधलें गेलें. टर्निप खाण्यास मिळाल्यामुळें हिंवाळ्यांत गुरें मारण्याचीही जरुरी नव्हती. त्यामुळें गुरांची निगा राखली तर तीं चांगलीं धष्टपुष्ट करतां येतील असें रॉबर्ट बेकवेल (१७२५–९५) यानें दाखवून दिलें. त्यामुळें इंग्लिश बैल पूर्वी हाडाचे सांपळे दिसत, ते दिसेनासे होऊन त्यांचें वजनही वाढूं लागलें. सन १७१० सालीं तें ३७९ पौंड होतें, सन १७९५ मध्यें तें ८०० पौंड झालें व सन १९२६ मध्यें तें सव्वीस हंड्रेडवेट पर्यंत वाढलें. मेंढ्याही चांगल्या धष्टपुष्ट होऊं लागल्या. या पैदाशीमुळें लोकांस नेहमीं ताजें मांस खाण्यास मिळूं लागलें हाही कांहीं कमी फायदा नव्हता!

७. दळणवळणांच्या साधनांत फरक :—उद्योगधंदे जसजसे फोंफावत गेले तसतसा व्यापार अधिक वाढला व त्यामुळें दळणवळणाच्या साधनांतही फरक करणें अत्यावश्यक होऊन बसलें. यापूर्वी रस्ते म्हणजे चिखल व माती यांनीं बरबटलेले असत. त्याकाळीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं माल न्यावयाचा झाला तर तो घोड्यांच्या पाठीवरून नेला जाई; त्यामुळें रस्ते फारसे खराब होत नसत. परंतु गाड्या उपयोजिल्या जाऊं लागल्यानें रस्ते इतके खराब होत कीं त्यांवरून गाड्या चालल्या तर त्या कोलमडून पडत, उलट्या होत अगर कंबरेइतक्या चिखलांत रुतून बसत! कांहीं रस्ते श्रीमंत लोक स्वतः तयार करीत, ते मात्र चांगले असत. त्या रस्त्यांवरून जाणाऱ्या-येणाऱ्याकडून टोल घेण्यांत येई. तरी पण व्यापारी दळणवळणाकरितां त्यावेळच्या सडका निरुपयोगी होत्या. त्यांतल्या त्यांत औद्योगिक क्रांतीमुळें जड व अवजड सामान व यंत्रें इकडून तिकडे नेणें–व तींही असल्या रस्त्यांवरून–अत्यंत कष्टाचें व त्रासदायक होऊं लागलें. यामुळें अनेकांचें लक्ष सडकांच्या दुरुस्तीकडे लागलें. जॉन मॅकॲडॅम (१७५८–१८३६) या स्कॉच गृहस्थानें पक्के रस्ते कसे करावयाचे तें लोकांस दाखविलें. मोठ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठे दगड खालीं घालून वर खडी टाकल्यानें रस्ता पक्का होतो हें पाहतांच लोकांस आश्चर्य वाटलें! पुढें त्याची पद्धति सर्वत्र उपयोजिली जाऊं लागली.



केचें तार करण्याचें यंत्र

मेटकाफ या नांवाच्या एका अंध गृहस्थानें नवे नवे रस्ते कसे आखतां येतील तें दाखवून त्याप्रमाणें अनेक रस्ते त्यानें करवून घेतले. त्यामुळें सन १७६० ते १७८० पर्यंत अनेक नव्या सडका तयार झाल्या. नव्या सडका तयार होऊं लागल्यानें नद्या-ओढ्यांच्या जागीं पूल बांधणें आवश्यक झालें. तें काम टेलफर्ड (१७५७–१८३४) यानें केलें. त्यानें आपल्या काळांत सुमारें १२०० पूल बांधले. या सडकांप्रमाणेंच त्यावेळीं कालवे तयार करून त्यांतूनही वाहतूक होऊं लागली. जेम्स ब्रिंडले (१७१६–१७७२) या गृहस्थानें इंग्लंडांत एकंदर सुमारें ३६५ मैल लांबीचे निरनिराळे कालवे तयार केले. ब्रिजवॉटरच्या ड्यूकनें त्याला आर्थिक मदत केली व पहिला कालवा वूर्स्लेपासून मँचेस्टरपर्यंत खोदण्यांत आला. पुढें जॉन स्टीमन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१७२४–१७९२) यानेंही कालवे व पूल बांधून दळणवळण सोपें केलें. सर्व कालव्यांतून व्यापारही चालूं लागला. रस्त्यांवरून व्यापार करण्यापेक्षां तो कालव्यांतून सहज व लवकर होत असे. त्यामुळें त्यांतून अनेक प्रकारच्या बोटीही उपयोजिण्यांत येऊं लागल्या. सन १८१३ सालीं हेन्री बेल या गृहस्थानें तयार केलेली व बाष्पशक्तीनें चालणारी पहिली आगबोट क्लाइड नदींत फिरूं लागली.

८. औद्योगिक क्रांतीचा परिणाम :—औद्योगिक क्रांतीमुळें इंग्लिश उद्योगधंद्यांचें स्वरूप पार पालटून गेलें. शेतीच्या धंद्यांत सुधारणा झाल्यानें लोकांच्या राहणींतही सुधारणा झाली. खेड्यांतून राहणारे लोक शहरांत येऊन राहूं लागले. कारण तेथें नवे नवे कारखाने व गिरण्या निघूं लागल्यानें त्यांना तेथें पोटाचा धंदा मिळे. त्यामुळें खेडीं उध्वस्त होऊं लागलीं, अनेक मोठीं शहरें उदयास आलीं व तींही इंग्लंडच्या मध्य भागांत व उत्तर भागांत (म्हणजे ज्या ठिकाणीं लोखंडाचे कारखाने, दगडी कोळशाच्या खाणी व कापडाच्या गिरण्या होत्या तेथें,) जास्त झालीं. अर्थात् केंट व ससेक्स परगण्यांचें महत्त्व कमी होऊन तेथील लोकही उत्तर भागांत जाऊन राहूं लागले. त्यामुळें इतके दिवस पार्लमेंटची सुधारणा करण्याची चळवळ दक्षिणेंत चाले ती आतां, औद्योगिक क्षेत्र बदलल्याबरोबर, उत्तरेंत गेली. इंग्लंडचा व्यापार वाढला व देशांतील उद्योगधंदे जोरांत चालू लागल्यानें इंग्लंडकडे संपत्ति येऊं लागली. त्यामुळें श्रीमंत कारखानदारांचा एक नवा वर्ग इंग्लंडमध्यें स्थापन होऊं लागला; त्याचप्रमाणें त्यांच्याशीं खेळीमेळीनें न वागणारा असा मजुरांचाही वर्ग स्थापन होऊन इंग्लंडांत भांडवलशाहीचा जन्म झाला. कारखान्यांतून सर्व प्रकारचा माल मोठ्या प्रमाणावर निघूं लागल्यानें पूर्वींचे बैठे व घरगुती धंदे बसले. अर्थात् अनेक लोक बेकार झाले. त्यामुळें देशांत दंगेधोपे होऊं लागले. यांत्रिक साहाय्यानें सर्व जिन्नस होत, त्यामुळें ते स्वस्त झाले. इंग्लंडची लोकसंख्या वाढली. सन १७०० मध्यें ती पन्नास लक्ष होती, सन १८०० मध्यें ती नव्वद लक्षांपर्यंत गेली. जुनीं खेडीं उजाड होऊन नवीं शहरें अस्तित्वांत आल्यानें, जुन्या खेड्यांचा प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार काढून घेऊन तो नव्या शहरांना द्यावा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशी चळवळ सुरू झाली. खुल्या व्यापाराचें धोरण बंद करण्यांत यावें अशीही चळवळ सुरू झाली. व्यापार वाढल्यामुळें जास्त फायद्याच्या आशेनें कारखानदार सातआठ वर्षांच्या मुलांनाही मजूर म्हणून नेमूं लागले; अर्थात् त्या मुलांना निर्दयपणानें वागविण्यांत येऊं लागल्यानें सरकारला पुढें कारखान्यांसंबंधीं कायदे पास करणें भाग पडलें. एकंदरींत पाहतां सांपत्तिकदृष्ट्या इंग्लंडचा इतका फायदा झाला कीं फ्रान्सशीं पुढें होणाऱ्या युद्धास तोंड देण्याचें सामर्थ्य इंग्लंडमध्यें उत्पन्न झालें.

अभ्यास

१. औद्योगिक क्रांतीचीं कारणें सांगा. तिचा इंग्लंडवर कोणता परिणाम झाला ? तिचें स्वरूप वर्णा.

२. विणकलेंत कोणीं व कोणते शोध लावले ? त्यापूर्वी त्या धंद्याची काय स्थिति होती ?

३. औद्योगिक क्रांतीमुळें दळणवळणाच्या साधनांत कोणते फरक झाले ? तसें होण्याचें कारण काय ?

४. यांत्रिक साधनांत कसकसा फरक होत गेला ? त्याचा निरनिराळ्या उद्योगधंद्यांवर काय फरक झाला ?

५. टिपणें करा :—क्रॉम्पटनचें म्यूल, स्पिनिंग जेनी, सेफ्टी लँप, जेथ्रो टल, टर्निप टाऊनशेंड, आर्थर यंग, जेम्स वॅट, विल्किन्सन, टॉमस कोक, बेकवेल, न्यूकामेन.

६. शेतींत सुधारणा कां झाली ? पूर्वीची पद्धति कोणती होती ? नव्या पद्धतीचे गुणदोष सांगा.

उतारा

१. जेम्स वॅटचा शोध :—१७८५

वाफेनें चालणाऱ्या एंजिनांत वॅटनें सुधारणा केली असें म्हणतात; परंतु तसें म्हणणें चुकीचें होईल. सुधारलें म्हणण्यापेक्षां त्यानें तें शोधून काढलें असें म्हणणेंच अधिक रास्त ठरेल. वॅटच्या शोधामुळें त्या एंजिनच्या गतींत नियमितपणा आला व तें आज वाटेल त्या नाजुक कामालाही वापरतां येणें शक्य झालें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. त्याची शक्तीही कल्पनातीत अचाट झाली आहे. या प्रचंड शक्तीचा तें यंत्र सहज, लीलेनें पण अचूकपणें उपयोग करूं शकतें. त्या यंत्राचा वाटेल तेव्हां, वाटेल तेथें व वाटेल तसा उपयोग करतां येतो. त्यामुळें आज आपल्याला नक्सकाम करतां येतें, कठीण अशा धातूचा चक्काचूर करतां येतो, कोळ्याच्या जाळ्याच्या तंतूप्रमाणें कापसाचे नाजुक धागे काढतां येतात, मोठमोठीं जहाजें पेलूं व उचलूं येतात, पोलादाच्या तारा करतां येतात, व तुफान वादळी हवेंत जहाजेंही चालवितां येतात. वॅटच्या एंजिनामुळें या देशावर अनंत उपकार झाले आहेत. धंद्यांचें कार्यक्षेत्र वाढलें, त्यांची भरभराट झाली, कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या मालाची निष्पत्ति सहस्रपटीनें वाढली व देशांत संपत्ति खेळूं लागली. आम्ही युरोपांत लढाया जिंकल्या, चालू युद्ध मोठ्या नेटानें, उत्साहानें व हिंमतीनें चालविलें व आज या देशाचें आंतरराष्ट्रीय स्थान अढळ ठेवून देशाचें माहात्म्य वाढवूं शकलों. अशा तऱ्हेचे विचार हीन व कोत्या मनाचे द्योतक म्हणून समजले जातील; परंतु त्यांत पुरेपूर सत्य भरलेलें आहे हें विसरतां कामा नये. वॅटच्या एंजिनानें मानवी जीवन आनंदमय व सुखमय केलें आहे; कारण अनेक सुंदर सुंदर व मौल्यवान् वस्तु कमालीच्या स्वस्त झाल्या आहेत. एके काळचा सामर्थ्यहीन मनुष्य आज इतका सामर्थ्यवान् झाला आहे कीं त्याच्या जोरावर यांत्रिक रचनेंत अतर्क्य व आश्चर्यकारक शोध लावून तो आपल्या भावी पिढीचे धन्यवाद मिळवीलच मिळवील ! मग ज्यानें तें एंजिन शोधून काढलें त्या वॅटला आपण धन्यवाद कां देऊं नये ?

—म्यूरहेडच्या वॅटच्या चरित्रावरून

प्रश्न :—१. वॅटच्या एंजिनानें इंग्लंडच्या उद्योगधंद्यांवर कोणकोणते उपकार केले ?

२. त्यामुळें देशाचा फायदा कोणता झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२४. स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व !

१. फ्रेंच राज्यक्रांति-कारणें :—धाकटा पिट मुख्य प्रधान असतांच सर्व युरोपला व पर्यायानें सर्व जगाला हादरून सोडणारी गोष्ट फ्रान्समध्यें घडून आली. ती म्हणजे फ्रेंच राज्यक्रांति होय. अनियंत्रित राजसत्तेला अमेरिकेनें कलाटणी देऊन लोकशाहीची तुतारी वाजविली. तिच्याही पुढें जाऊन फ्रान्समधीलच नव्हे तर सर्व जगांतील अनियंत्रित राजसत्ता अजीबात नामशेष करण्याचा फ्रेंच लोकांनीं विडा उचलला होता. फ्रेंच राज्यक्रांति टाळूं म्हटल्यानें, टळणारी नव्हती. आजची उद्यां झाली असती इतकेंच. या राज्यक्रांतीला फ्रान्समधील विषम समाजरचनाच विशेष कारणीभूत झाली. त्यावेळच्या फ्रेंच समाजांत उमराव, धर्मगुरू, मध्यम व कनिष्ठ असे चार मुख्य वर्ग होते. (१) वरिष्ठवर्ग—वरिष्ठ वर्गांत उमराव मोडत असत. सरंजामी पद्धति अजूनही फ्रान्समध्यें चालू असल्यानें अमीर-उमरावांचें चांगलेंच फावलें होतें. संख्येनें ते इतर राष्ट्रांतील उमरावांपेक्षां फ्रान्समध्यें पुष्कळ होते व त्यांना अनेक प्रकारच्या सवलती व पिढीजाद हक्क असल्यानें ते एकप्रकारें उन्मत्त व बेताल बनलेले होते. त्यांचें मुख्य काम म्हणजे राजाला राज्यकारभारांत मदत करणें होय; परंतु तें काम त्यांच्याकडून होत नसे. मात्र अनेक प्रकारच्या करांची त्यांस माफी होती. त्यांनाच सरकारी नोकऱ्या, बहुमान, पदव्या व बक्षिसें मिळत. लष्करी नोकरीपासून ते मुक्त होते. वेठीला धरून त्यांच्याकडून काम करून घेणें म्हणजे घोर अन्याय होता. कोठेंही कोणाच्याही शेतांत अगर अरण्यांत शिकार करण्याची व कोठेंही मासे पकडण्याची त्यांसच परवानगी होती. बहुतेक सर्व जमीन त्यांच्याच मालकीची असल्यानें त्यावर काम करणाऱ्या मजुरांस ते हक्कानें वाटेल तें काम सांगत व त्यांनीं तें नाकारल्यास अत्यंत क्रूरपणानें ते त्यांच्यावर सूड उगवीत. त्यांच्यावर ते टोल कर लादीत, आपल्या घरचें दळण-कांडण-झाड-लोट वगैरे सर्व प्रकारचें काम मोफत करून घेत. मजुरांना व कनिष्ठवर्गीयांना उमरावांच्या गिरणींतच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपलें पीठ दळून घ्यावें लागे व त्यांच्या भट्टींतच दारू गाळून घ्यावी लागे. हे उमराव कमालीचे जुलमी व क्रूर होते. स्वतः मजा करावी, नाचरंगांत दंग असावें व आपल्या घरीं-दारीं, शेतावर मरेमरेतों काम करणाऱ्या लोकांस अन्नासही मोताद करून सोडावें हाच त्यांचा मुख्य धंदा ! (२) धर्मगुरू—धर्मगुरूही त्यांचेंच अनुकरण करीत. त्यांसही कांहीं पिढीजाद हक्क होतेच. धर्माच्या नांवाखालीं हेही लोक कनिष्ठवर्गीयांवरच कर लादीत व त्यांचा छळ करीत. धर्मशिक्षणाचें काम करीत नसतां हे लोक विलासांत व चैनींत रहात. त्यांनाही अनेक सवलती असून करांची माफी असे. (३) मध्यमवर्ग—मध्यमवर्गीय लोक मात्र बरेच सधन होते, व्यापार त्यांच्या ताब्यांत असल्यानें त्यांना जरा नीट राहतां येई, परंतु त्यांच्यावरही कांहीं निर्बंध होतेच. त्यांना जमीन विकत घेण्याचा अधिकार नव्हता. यामुळें समाजांत त्यांस मान मिळत नसे; कारण जमीन धारण करणारांसच त्यावेळच्या फ्रेंच समाजांत मान मिळे. त्यामुळें पैसा गांठीं असूनही अवमानित स्थितींत त्यांस रहावें लागे. त्यांस सरकारला निरनिराळे कर द्यावे लागत; परंतु त्यांच्यावर फारसा जुलूम होत नसे. त्याचा मक्ता कनिष्ठवर्गीयांनींच जणूं उचललेला ! (४) कनिष्ठवर्ग—कनिष्ठ वर्गांत शेतमजूर, नोकर, चाकर, गुलाम वगैरे मोडत. हे लोक पूर्णपणें गुलामगिरींत होते. त्यांना कसलेही हक्क नसत, सवलतीही नव्हत्या. उच्चवर्गीयांची इमानें-इतबारें चाकरी करावी व मिळेल त्या चतकोरावर समाधान मानून दिवस कसा तरी कंठावा यांतच ते भूषण मानीत ! धान्य दळणें, शेत राखणें, शेती करणें, दारू गाळणें, मेंढ्या राखणें वगैरे अनेक कामें त्यांनीं मोफत करावीं व तीं करूनही मालक रागावलाच तर दंड, शिक्षा, कारावास वगैरे प्रकारांस निमूटपणें तोंड द्यावें. अनेक प्रकारचे करही हेच लोक देत. नव्हे त्यांच्याकडून उकळले जात. त्यांची प्राप्ति ती किती व ते कराच्यारूपानें पैसा देणार तो काय ? प्राप्तीच्या जेमतेम एकपंचमांश भाग त्यांच्या प्रपंचाला कसाबसा उरे ! अशा लोकांना राजकीय अधिकार कोण देणार ? त्यांना राजानें छळावें, अधिकाऱ्यांनीं छळावें, उमरावांनीं छळावें, धर्मगुरूंनीं छळावें व त्या सर्वांच्या चाकरानोकरांनींही छळावें ! त्यांची गांजणूक व पिळणूक सर्वत्र चालली होती. यामुळेंच तीव्र असंतोषानें कोठें मूळ धरलें असेल तर तें या वर्गांतील लोकांच्या मनामध्यें. सामाजिक विषमतेमुळें कराच्या ओझ्याखालीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिरडलें जावें त्यांनीं, सरदारांच्या गांजणुकी सहन कराव्या त्यांनीं, हाल-अपेष्टांत खडतर दिवस काढावे त्यांनीं, मात्र त्या सर्वांचा फायदा उपटावा उमरावांनीं व धर्मगुरूंनीं! यामुळें या वर्गांतील लोक उमराव व धर्मगुरू यांच्यावर मनांतल्या मनांत जळफळत होते व त्यांच्यावर सूड उगविण्याच्या संधीची ते वाट पहात होते.

२. राजसत्ता व राजदरबार :—त्या वेळीं फ्रान्सवर सोळावा लुई राज्य करीत होता. त्याचें वय फक्त पस्तीस वर्षांचें होतें. तो स्वभावानें चांगला असला तरी राज्यकर्त्यांच्या अंगीं लागणारे गुण त्याच्या अंगीं नव्हते. मेरी अँटोनिटो नांवाच्या एका ऑस्ट्रियन राजकन्येशीं त्याचा विवाह झाला होता. ती दिसण्यास सुंदर होती; उत्साहाची जणूं मूर्तिमंत पुतळी! चैन, रंगेलपणा व मजा अखंड लुटावी असें तिला नेहमीं वाटे आणि अशा स्त्रीच्या नादीं लागल्यानें राजाचें चित्त राज्यकारभाराकडे लागणार कसें? तोही स्वकर्तव्यच्युत होऊन तिच्याप्रमाणेंच चैनींत व विलासांत निमग्न राहूं लागला. राज्यकारभार प्रधानांच्या अगर खुषमस्कऱ्यांच्या हातीं असे. राणीचा मात्र लोक द्वेष करीत. तिच्यामुळें राजा बिघडला अशी त्यांची समजूत होती. ती ऑस्ट्रियन होती हेंही आणखी एक कारण होतेंच. राजदरबारांत अनेक खुषमस्करे असत व ते मिजाशीनें राहात. राजाराणीला खुष करून वाटेल त्या सवलती ते मिळवीत. राजाचा शिक्काही कांहींच्या हातीं होता व त्याचा ते वाटेल तसा उपयोग करीत असें म्हणतात. त्यामुळेंच वाटेल त्याच्या विरुद्ध हे लोक संशयावरून निनांवी वारंटें काढून त्यास वर्षानुवर्षें, विनाचौकशी तुरुंगांत खितपत ठेवीत!

३. क्रांतिकारक वाङ्मयाची उत्पत्ति :—समाजाच्या व देशाच्या अशा स्थितींतच अनेक नामांकित लेखक फ्रान्समध्यें निर्माण झाले. या सर्वांनीं लोकांत जागृति करण्यासाठीं अहमहमिकेनें पुढें येऊन तेजस्वी वाङ्मय निर्माण केलें व लोकांचे हक्क, त्यांचे अधिकार, त्यांचें स्वातंत्र्य वगैरेसंबंधीं उद्बोधक लिखाण लिहून त्यांच्यांत जागृति उत्पन्न केली. अशा लेखकांत मॉंटेस्क, व्हाल्टेर, रूसो, डीडेराट वगैरे लोक होते. मॉंटेस्क (१६८९–१७५५) यानें इंग्लिश राज्यघटना अधिक चांगली आहे व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लिशांप्रमाणें स्वातंत्र्य मिळालें तरच फ्रेंचांचें कल्याण होईल असें प्रतिपादलें. व्हॉल्टेर (१६९४–१७७८) यानें उमरावांच्या हक्कांवर कोरडे ओढून धर्मगुरूंच्या विलासी व धर्मविहीन वागणुकीवर सणसणीत टीका केली. प्रत्येकानें बुद्धिप्रामाण्यावरच जोर दिला पाहिजे, असें तो सर्वांस सांगे. लोकांच्या वेडगळ व मूर्ख आचाराविचारांवर व समजुतींवरही त्यानें ताशेरा झाडला व त्यांच्या डोळ्यांत चांगलें अंजन घातलें. रूसो (१७१२–१७७८) या तत्त्ववेत्यानें लोकांच्या काळजालाच हात घातला. 'निसर्गाकडे परत फिरा' असा त्याचा सर्वांस उपदेश होता. 'सामाजिक करार' या नांवाचा एक उत्कृष्ट ग्रंथ त्यानें प्रसिद्ध केला होता. 'मनुष्य हा जन्मतःच स्वतंत्र आहे. तरीही त्याच्या हातापायांत शृंखला सर्वत्र दिसतात ही स्थिति निसर्गाला धरून नाहीं. तेव्हां आपल्यावरील जुलूम नाहींसा करून घेऊन आपलें निसर्गदत्त स्वातंत्र्य मिळवून घेणें हा प्रत्येकाचा हक्कच आहे,' वगैरे तत्त्वांचा त्यानें त्या पुस्तकांत पुकारा केला. त्यामुळें आधींच भडकलेलीं लोकांचीं मनें अधिकच भडकून गेलीं. डीडेरॉट (१७१३–१७८४) हाही असाच क्रांतिकारक तत्त्ववेत्ता होता. त्यानेंहि लोकांच्या धर्मभोळ्या कल्पनांवर जोराचा हल्ला करून लोकजागृति केली. तशांतच अमेरिकेनें नुकतेंच स्वातंत्र्य मिळविल्याचें ताजें उदाहरण सर्वांपुढें होतें. त्यांत प्रत्यक्ष भाग घेतलेल्या अनेक सैनिकांनीं भडकलेल्या ज्वालांत तेल ओतण्यास कमी केलें नाहीं. छोट्या अमेरिकेनें इंग्लंडला नमवून स्वातंत्र्य मिळविलें ! आणि फ्रान्स ?

व्हॉल्टेर

४. फ्रान्सचा राज्यकारभार :—अशा स्थितींत राज्यकारभार कसा होता हें वर्णन करण्याची आवश्यकताच नाहीं. राष्ट्रीय कर्जाचा डोंगर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाढलेला, आर्थिक स्थिति खालावलेली, व्यापार खालीं खालीं चाललेला, व सरकारचा खर्च बारेमाप चाललेला. डोईजड कर लादूनही जमाखर्चाची तोंडमिळवणी होत नसे. सन १६१४ सालीं जी एकदां पार्लमेंट बोलावून रद्द केली होती त्यानंतर पार्लमेंट कधींही बोलावली गेली नव्हती. ती असती तर बिचाऱ्या लोकांच्या जुलमाला व गांजणुकीला थोडी तरी वाचा फुटून त्यांचा छळ थोडा तरी थांबता. राष्ट्राच्या विपत्तींतून त्याला सोडविण्यास एकही मुरब्बी मुत्सद्दी त्यावेळीं नव्हता. नालायक अधिकारी व लांचलुचपतीनें कारभार करणारे नोकर यांच्यामुळें फ्रेंच सरकार इतकें डबघाईस आलेलें होतें कीं क्रांतिकारक विचार दडपून टाकणेंही त्याला शक्य नव्हतें. इतका कमकुवतपणा सर्वत्र पसरला होता. थोडक्यांत म्हणजे आर्थिक व राजकीय दृष्टीनें फ्रान्सचें दिवाळें वाजण्याचाच प्रसंग होता तो! राजालाही काय करावें तें सुचेना. शेवटीं आपला प्रधान नेकर याच्या सांगण्यावरून त्यानें राष्ट्रीय सभेची बैठक सन १७८९सालीं 'मे' मध्यें व्हर्सायच्या राजवाड्यांत बोलाविली. सर्व दर्जाचे लोक बोलावण्यांत आले. त्यावेळीं सर्वांनीं एकत्र व एकाच ठिकाणीं बसावें कीं सामाजिक दर्जाप्रमाणें निरनिराळ्या सभा भरवाव्या याच्याबद्दल वादविवाद झाले. अखेर सर्वांनीं एकत्र बसण्याचें ठरलें व राष्ट्रावरील आर्थिक आपत्ति दूर कशी करतां येईल याचा विचार करण्याकरितां बोलावलेल्या या सभेनें लोकांना स्वतंत्र कसें करतां येईल याचा विचार करण्यास सुरुवात केली!

५. क्षोभाच्या ज्वाला पेटल्या :—राजानें राष्ट्रीयसभा बोलाविली हें कळतांच पॅरिसमधील लोकांचे थवेच्या थवे शहरांतून सैरावैरा भटकूं लागले. अनेक असंतुष्ट व खवळलेले लोक व्हर्सायला जाऊन तेथील राष्ट्रीयसभेच्या जागीं गेले. सन १७८८ मध्यें फ्रान्समध्यें मोठा दुष्काळ पडलेला होता. तेव्हां फ्रान्सच्या कोनाकोपऱ्यांतील दुष्काळपीडित असंख्य लोक पॅरिसमध्यें जमूं लागले. पॅरिसचे रस्ते माणसांनीं नुसते फुलून गेले! सर्वांचें लक्ष राष्ट्रीय सभेच्या कामाकडे लागलें होतें. आपल्या हक्कांचें काय होतें तें कळण्याकरितां सर्वांनाच उत्कंठा लागलेली. कॉफीगृहांतून तो विषय चर्चिला जाऊं लागला. पॅरिस शहराच्या कोपऱ्याकोपऱ्यांतून सुशिक्षित समजले जाणारे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोक तोच विषय बोलूं लागले. वर्तमानपत्रांतूनही तोच विषय वर्णिला जात होता. लोकांच्या हक्कांचें मंडन करून सरकार व सरदार यांचीं जुलमी कृत्यें लोकांच्या गळीं उतरविण्याकरितां लाखों पत्रकांचा लोकांवर नुसता पाऊस पडत होता. या सर्व गोष्टींमुळें लोकांच्या भावना एकसारख्या उद्दीपित केल्या जात होत्या. होतां होतां त्या इतक्या भडकल्या कीं ता. १४ जून १७८९ रोजीं असंतुष्ट व क्षोभलेल्या एका जमावानें मनाच्या आत्यंतिक स्थितींत, लोकांच्या रोषास पात्र झालेल्या, पॅरिसच्या बॅस्टील तुरुंगावर मोठ्या उद्रेकानें हल्ला चढविला. खवळलेल्या जनसमुद्राला थोपवितां न आल्यानें द्वाररक्षकांनीं बॅस्टील तुरुंगाचे दरवाजे सताड उघडे टाकले व ते जीव घेऊन पळूं लागले. लोकांनीं धरून त्यांना कंठस्नान घातलें ! अनियंत्रित राजसत्तेचें प्रतीक असलेला बॅस्टील तुरुंग मोडून-फोडून सर्व लोक आंत शिरले. त्यांत अनेक कैदी आहेत असें वाटलें होतें. पण त्यांत त्यांना फक्त बाराच कैदी मिळाले ! मात्र त्या तुरुंगाच्या किल्ल्या

बॅस्टीलवर त्यांनीं हल्ला चढविला

अमेरिकेचा अध्यक्ष व स्वातंत्र्याचा कैवारी म्हणून जॉर्ज वॉशिंग्टन याच्याकडे पाठवून देण्यांत आल्या. थोड्याच दिवसांनीं पॅरिसमधील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्त्रियांनींही व्हर्सायपर्यंत एक मिरवणूक काढली, राजवाड्यांत शिरकाव केला, राजा व राणी यांना पकडलें व संगिनी व भाले यांच्या समवेत त्यांची व्हर्सायपासून पॅरिसपर्यंत मोठी मिरवणूक काढली. वाटेंत अनेकांनीं राजाराणीचा ठिकठिकाणीं अपमान करून त्यांना डिवचलें व शेवटीं त्यांना राजवाड्यांत पोंचविलें ! राजाराणी आपला जीव मुठींत धरून सर्व प्रकार निमुटपणें सोशीत होते !

६. **राष्ट्रीयसभेची कामगिरी**:—क्षुब्ध झालेल्या लोकांनीं सर्व शहरभर हलकल्लोळ उडवून दिला. सरदारांचीं घरेंदारें उध्वस्त होऊं लागलीं, त्यांना आगीही लावण्यांत आल्या, भर चव्हाट्यावर त्यांचे धिंडवडे उडूं लागले व त्यांना सर्वजण कस्पटासमान लेखूं लागले ! इतकें चाललें होतें तरी राष्ट्रीयसभेची बैठक चाललीच होती. लोकांच्या कृत्यांचा त्या सभेंतील लोकांच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय कसा राहणार ? राजाराणी पॅरिसला गेल्याबरोबर ती सभाही पॅरिसला भरूं लागली व तिनें फ्रान्सची राज्यघटना बदलून टाकण्यास सुरुवात केली. प्रथमतः या सभेनें सरंजामी पद्धति नष्ट केली, नंतर उमरावांचे हक्क रद्द केले, सर्वांनीं समप्रमाणांत कर दिले पाहिजेत असें ठरविलें व फ्रान्सचे निरनिराळे प्रांत रद्द करण्यांत येऊन नवे राजकीय विभाग पाडण्यांत आले. नंतर या सभेनें धर्मपीठाच्या इस्टेटी काढून घेतल्या. ज्यांनीं नव्या सरकारसंबंधीं राजनिष्ठेची शपथ घेण्याचें नाकारलें त्यांची उचलबांगडी करण्यांत आली. चलनी नोटा छापून व्यापारास उत्तेजन देण्याचा घाट घालण्यांत आला. राष्ट्रीयसभेच्या या कृत्यांनीं लोकांस स्वातंत्र्य मिळालें, समता सिद्ध झाली. यामुळें सर्वत्र विश्वबंधुत्व नांदूं लागेल असा तिच्या सर्व सभासदांचा विश्वास होता. या सर्व घडामोडी चालू असतांच सन १७९१ मध्यें राणीसह राजा ऑस्ट्रियांत पळून जात असतां त्याला व राणीला फ्रान्सच्या सरहद्दीवर पकडण्यांत येऊन त्यांना कैदेंत ठेवण्यांत आलें. यानंतर राष्ट्रीयसभा क्रांतिकारकांच्या ताब्यांत गेली. ताबडतोब राष्ट्रीयसभेनें राजाला पदच्युत केलें व फ्रान्समध्यें लोकशाही स्थापन झाल्याचें जाहीर केलें (१७९२). त्यावेळीं मार्सेल्सहून पॅरिसकडे येणाऱ्या एका लष्करी तुकडीनें एक गाणें गात गात पॅरिसपर्यंतचा आपला मार्ग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आक्रमिला. तेंच ' मार्सेल ' या नांवाचें गाणें फ्रान्सचें राष्ट्रगीत म्हणून त्यावेळीं मानण्यांत आलें व अजूनही तेंच मानलें जातें.

७. पॅरिसमध्यें झोटिंगशाही (१७९३–९४) :—पॅरिसमध्यें अनागोंदी कारभार चाललेला असतांच आपला जीव मुठींत धरून, अनेक सरदार फ्रान्सची सरहद्द ओलांडून गेले होते. त्यांनीं ऑस्ट्रिया व प्रशिया या देशांच्या राजांच्या कानावर सर्व हकीकती घातल्या व फ्रान्सच्या रक्षणार्थ मदत मागितली. राणी अँटोनिटो हिनेंही ऑस्ट्रियाकडे तशीच मागणी केली होती. तेव्हां ऑस्ट्रिया व प्रशिया यांच्या राजांनीं लष्कराची जमवाजमव सुरू केली व ' राजाराणीच्या केसाला धक्का लागला तर आम्ही युद्ध पुकारूं ' असा क्रांतिकारकांस निरोप पाठविला. यामुळें त्यांचें चित्त भडकलें व त्यांतच त्यांनीं राजाराणी रहात असलेल्या ' टुलरिज ' राजवाड्यावर हल्ला करून राजाराणीस सन १७९३ मध्यें फाशीं दिलें! त्याबरोबर ' लोकशाहीचा जयजयकार असो ' असा एकच जयघोष करण्यांत आला व ' प्रशिया व ऑस्ट्रिया यांच्या राजांनीं आम्हांस लढाईचें आव्हान दिलें; त्यांच्याकडे आम्ही उत्तरादाखल आमच्या राजाचें शीर फेंकून देतों ' असें तुफान क्रांतिकारक बोलूं लागले. सरदार-दरकदार-मानकरी यांची पांचावर धारण बसली. हळूहळू नुसत्या संशयावरून कोणासही पकडण्यांत येऊं लागलें, चौकशीचा खोटा देखावा होऊं लागला व त्यानंतर सर्वांची ' गिलोटिन ' नामक फाशींच्या यंत्राकडे रवानगी होऊं लागली. एका वर्षांत सुमारें वीस हजार लोकांचीं डोकीं गिलोटीननें उडविलीं! रक्तपात, खून, मारामाऱ्या यांना नुसता ऊत आला! मॅरट, डॅन्टन, रॉबसपियर वगैरे एकामागून एक आलले क्रांतिकारकांचे पुढारीही पुढें गिलोटीनवर चढविले गेले. शेवटीं क्रांतिकारकांनीं कॅथॉलिक धर्म रद्द केला व प्रत्येकानें आपल्या बुद्धीला पटेल त्याप्रमाणें वागावें असें जाहीर केलें. सन १७९२ मध्यें नव्या फ्रेंच सरकारनें एक फर्मान काढलें व जाहीर केलें कीं ' जे कोणी आपल्या राजसत्तेविरुद्ध बंड पुकारतील त्यांना आम्ही मदत करण्यास सिद्ध आहोंत. ' लगेच त्यांनीं प्रशिया व ऑस्ट्रिया यांच्याविरुद्ध सन १७९२ मध्यें स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व यांचा फैलाव करण्याकरितां युद्ध पुकारलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. फ्रेंच राज्यक्रांतीचा इंग्लंडवर परिणाम:—स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व यांच्या स्थापनेकरितां फ्रान्समध्यें जी राज्यक्रांति झाली तिच्याकडे इंग्लिश लोक मोठ्या कौतुकानें पण साशंकपणानें पहात होते. त्यांनीं तिचे हार्दिकपणें कधींच स्वागत केलें नाहीं. प्रथम प्रथम झाली ही गोष्ट फार उत्तम आहे असें इंग्लंडमध्यें मत प्रदर्शित झालें. व्हिग लोकांचा एक पुढारी व पार्लमेंटमधील प्रभावी वक्ता फॉक्स याला फ्रान्समधील अनियंत्रित राजसत्तेची उचलबांगडी होऊन, तेथें स्वातंत्र्य व समता यांचें राज्य नांदू लागलें हें ऐकून हर्ष झाला; व 'जगांतील अत्यंत उत्तम अशी गोष्ट घडून आली' असें तो म्हणाला. फ्रान्स व इंग्लंड यांना फ्रान्सच्या बुरबोन राजांच्या साम्राज्यतृष्णेमुळें



एडमंड बर्क

एकमेकांशीं लढावें लागे; परंतु आतां त्या बुरबोन राजघराण्याचें फ्रान्समधून उच्चाटन झाल्यामुळें, फ्रान्स व इंग्लंड या देशांमध्यें यापुढें सलोखा नांदू शकेल असें अनेक व्हिग लोकांचें मत होतें. परंतु फ्रान्समध्यें पुढें अत्याचार, खून व अनन्वित प्रकार झालेले ऐकून सर्वांना धक्काच बसला. व्हिगपक्षाचा दुसरा एक पुढारी एडमंड बर्क हा फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल प्रथमपासून साशंक होता. अनेक लोकांचीं गिलोटिनखालीं डोकीं उडविण्यांत येताहेत हें वृत्त व राजाराणीचा वध झाला हें कळतांच त्याला परमावधीचें दुःख झालें. 'फ्रेंच राज्यक्रांतीसंबंधीं विचार' या नांवाचें एक उद्‌बोधक पुस्तक लिहून त्यानें आपले सर्व विचार प्रगट केले. त्यांत त्यानें लिहिलें, 'स्वातंत्र्य व समता यांच्या नांवाखालीं फ्रेंच लोक नुसता धुमाकूळ घालीत आहेत. खरें पाहतां फ्रेंच लोकांनीं आपल्या रक्ताचा एक थेंबही स्वातंत्र्य व समता यांच्याकरितां सांडलेला नाहीं. बुटाचीं बकलें गेल्यानें कां कोठें मनुष्याचा स्वार्थत्याग ठरतो? तोच प्रकार फ्रेंचांचा. आपल्या राजाला कैदेंत ठेवणें, आपल्या देशबांधवांचा खून करणें व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

अनेक आपद्ग्रस्तांस, दारिद्र्यानें गांजलेल्यांस, अश्रूंचे पूर वाहवण्यास लावण्यांत या क्रांतिकारकांना पुरुषार्थ गाजवला असें वाटतें !' त्याच्या पुस्तकानें इंग्लंडमध्यें मोठी क्रांति घडून आली. त्या पुस्तकाच्या हजारों प्रति उडाल्या. 'फ्रान्समध्यें स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व स्थापन होण्याऐवजीं तेथें लष्करी सोटेशाही निर्माण होईल' असें बर्कनें केलेलें भविष्य अगदीं खरें ठरलें. मुख्य प्रधान पिट फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल साशंकच होता व 'क्रांतीची लाट चटकन परतून त्या देशांत पंधरा वर्षें तरी शांतता नांदेल' असें त्यानें आपल्या आईला लिहिलें. टॉमस पेन यानें 'मानवी अधिकार' नांवाचें पुस्तक लिहून व जेम्स मॅकिंटॉश यानेंही एक पुस्तक लिहून फ्रेंच राज्यक्रां-तीला इंग्लंडांत अनुकूल वातावरण उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. प्रसिद्ध कवि वर्डस्वर्थ व कोलरिज, 'जगांत नव्या स्वातंत्र्ययुगाला सुरुवात झाली' असें म्हणूं लागले. तरीही बर्कच्या मतांचाच पगडा देशांतील बहुजनसमाजावर पडला होता हें निश्चित. त्यामुळें त्याच्या अनुयायांनीं फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारण्यांत यावें असें मत प्रदर्शित केलें. देशांतील सुधारणा थांबवाव्या व क्रांतिकारक विचारांच्या फैलावास विरोध करणारे कायदे पास करावे असें ते प्रतिपादूं लागले.

९. पिटनें स्वीकारलेलें धोरण :—प्रथम प्रथम पिटनें फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल आपलें मत स्पष्ट दिलें नाहीं; परंतु तिचें उग्र रूप पाहून राज्यक्रांतीच्या ज्वाळा इंग्लंडमध्येंही भडकतील असें त्याला वाटूं लागलें. तेव्हां तोही दडपशाही करण्यास उद्युक्त झाला. इंग्लंडमधील कांहीं लोकांस क्रांति पाहिजे होती. त्यांच्याही कांहीं तक्रारी होत्याच. पार्लमेंटमध्यें जमीनदारांचेंच मताधिक्य होतें व नव्या शहरास अजूनही प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क मिळालेला नव्हता. परंतु त्यांचें कांहीं चाललें नाहीं. सन १७९१ मध्यें बर्मिंगहॅम येथें मोठा दंगा झाला व दंगेखोरांनीं डॉ. प्रीस्टले या प्रसिद्ध शास्त्रज्ञाच्या घरावर हल्ला करून तें जमीनदोस्त केलें. कारण काय तर फ्रेंच क्रांतिकारकांनीं बॅस्टील तुरुंग फोडला, म्हणून त्याच्या आनंदाप्रीत्यर्थ त्यानें आपल्या मित्रांस मेजवानी दिली. पुढच्याच वर्षी टॉमस पेन याला सरकारनें पकडलें व तुरुंगांत ठेवलें. पुढें सन १७९३ मध्यें पिटनें परकीयांवर देखरेख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवण्याचा व वेळेनुसार त्यांना इंग्लंडच्या बाहेर हांकलून देण्याचा सरकारला अधिकार देणारा 'परकीयांविरुद्ध कायदा' पास केला. फ्रेंच राज्यक्रांति सुरू झाल्यानंतर तिला सहानुभूति दाखविणारे अनेक क्लब व मंडळें इंग्लंडमध्यें स्थापन झालीं होतीं तीं त्यानें रद्द केलीं व राजद्रोही मतप्रचाराविरुद्ध त्यानें कायदा केला. तसेंच त्यानें फ्रेंच लोकांबरोबर राजद्रोही पत्रव्यवहार करणें कायद्यानें बंद केलें. सन १७९४ मध्यें त्यानें 'व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा' तात्पुरता रद्द करून संशयित माणसांस वाटेल तेव्हां पकडून, तुरुंगांत डांबून ठेवण्याची सरकारी अधिकाऱ्यांस मोकळीक दिली. सन १७९९ मध्यें शेतकरी व मजूर यांच्याविरुद्ध कायदा करण्यांत येऊन त्यांना 'मजूरसंघ' स्थापण्याची बंदी करण्यांत आली. सन १७९५ मध्यें सभाबंदीचा कायदा पास करण्यांत येऊन राजद्रोही व क्रांतीला अनुकूल होणाऱ्या सभांवर नियंत्रण घातलें गेलें. या सर्व उपायांनीं फ्रेंच राज्यक्रांतीमुळें उत्पन्न झालेल्या तत्त्वांचा म्हणजे समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुत्व यांचा इंग्लंडांत फैलाव होणार नाहीं असें पिटला वाटत होतें. सर्व प्रकारच्या सुधारणा करण्याचें त्यानें रद्द केलें व फ्रेंच राज्यक्रांतीचा ओघ इंग्लंडच्या किनाऱ्यावरही येणार नाहीं अशी त्यानें व्यवस्था केली.

१०. युद्धाला सुरुवात (१७९३):—प्रशिया व ऑस्ट्रिया या देशांनीं फ्रेंच राजाची व पर्यायानें फ्रान्समधील व जगांतील राजसत्तेची बाजू घेऊन फ्रान्सविरुद्ध सन १७९२ मध्यें युद्ध पुकारलें. उलट फ्रेंच क्रांतिकारकांनीं स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या तत्त्वांचा फैलाव करण्याकरितां हातीं कंकण बांधून रणांगणांत पाऊल टाकलें. एवढेंच नव्हे, तर 'जें राष्ट्र आपल्या देशांतील अनियंत्रित राजसत्तेविरुद्ध उठून स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व यांचा फैलाव करण्यास मदत करील, त्यास फ्रान्स उचलून धरील,' असेंही जाहीर केलें. सन १७९२ मध्यें फ्रान्सनेंही ऑस्ट्रिया व प्रशिया यांजविरुद्ध युद्ध पुकारलें व त्यानें ऑस्ट्रियाच्या ताब्यांतील नेदर्लंडवर स्वारी केली. हें कृत्य आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरुद्ध होतें. तसेंच युट्रेक्टच्या तहानें परकीय हल्ल्यापासून बेलजमचें संरक्षण करण्याची हमी इंग्लंडनें दिली होती. राजाराणीचा वध झाल्यापासून इंग्लिश लोकांस फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारावें असें एकसारखें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाटत होतें. तशांतच वरील गोष्टी फ्रान्सनें केल्या; एवढेंच नव्हे तर शेल्ट नदी, पूर्वीचे तह मोडून, आंतरराष्ट्रीय व्यापारास खुली केली. या सर्व कृत्यानें राग येऊन पिटनें सन १७९३ मध्यें फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारलें व आपला पहिला मित्रसंघ स्थापन केला. त्या संघांत इंग्लंड, स्पेन, हॉलंड, ऑस्ट्रिया, प्रशिया, पोर्तुगाल, सार्डीनिया वगैरे राष्ट्रें फ्रान्सविरुद्ध सामील झालीं होतीं. यॉर्कचा ड्यूक मोठ्या सैन्यानिशीं युरोपियन रणांगणावर उतरला व पिटनें आपल्या बापाचें धोरण स्वीकारून संयुक्तांकडे मोठमोठ्या रकमाही पाठविण्यास सुरुवात केली. परंतु फ्रेंचांचा सर्वत्र विजय होऊन हॉलंड, स्पेन, प्रशिया वगैरे राष्ट्रांनीं संघांतून आपलें अंग काढून घेतलें. लॉर्ड हौ यानें सन १७९४ मध्यें इंग्लिश खाडींत फ्रेंच आरमाराचा पराभव केला. त्याच वेळीं हॉलंडनें फ्रान्सशीं तह करून इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारलें. स्पेननेंही तेंच धोरण स्वीकारलें. तेव्हां इंग्लंडनें डच लोकांपासून सीलोन, गुडहोप, मलाक्का हीं ठिकाणें जिंकून घेतलीं. इंग्लंडच्या आरमारानें पराक्रम करून शत्रूवर जय मिळविला, तरी जमिनीवर फ्रान्सचा सर्वत्र जय होत होता. त्या जयांत भर घालण्याचें उत्कृष्ट काम फ्रान्सचा प्रसिद्ध योद्धा नेपोलियन बोनापार्ट यानें करून पिटचा पहिला मित्रसंघ धुळीस मिळविला (१७९७). तो प्रकार पुढील प्रकरणीं दिला आहे.

११. डायरेक्टर मंडळाची स्थापना:—युद्ध चालू असतांच खुद्द फ्रान्समध्यें अनेक घडामोडी सुरू होत्या. अत्याचार थांबून सर्वत्र स्थीरस्थावरता झाली होती व फ्रान्समध्यें शांतता निर्माण होऊं लागली होती. त्यामुळें सन १७९५ मध्यें तेथें पांच लोकांचें एक मंडळ स्थापन करण्यांत आलें व त्याच्याकडे फ्रान्सचा सर्व कारभार व युद्धविषयक धोरण सोंपविण्यांत आलें. अनेक क्रांतिकारकांना ही गोष्ट आवडली नाहीं व त्यांनीं त्यावर हल्ले करण्यासही कमी केलें नाहीं. तें मंडळ पुढें सन १७९९ पर्यंत टिकलें. या मंडळालाच नेपोलियननें खूष ठेवून इटालीवरील मोहिमेचें सेनापतीपद मिळविलें व तो त्या मोहिमेवर गेला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. फ्रेंच राज्यक्रांतीचीं कारणें थोडक्यांत सांगा. फ्रान्समधील विषम समाजरचनाच तिला कारणीभूत झाली असें तुम्हांस वाटतें का ? कशावरून ?

२. फ्रेंच राज्यक्रांतीचा इंग्लंडवर व ब्रिटिश मुत्सद्यांवर काय परिणाम झाला ?

३. पिटनें इंग्लंडांत दडपशाहीचें धोरण कां स्वीकारलें ? क्रांति थांबविण्याकरितां त्यानें कोणते उपाय योजले ? लोकांनीं त्याच्या धोरणास पाठिंबा दिला का ? कां म्हणून ?

४. युरोपियन राष्ट्रांनीं फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारण्याचें कारण काय ? त्याचा परिणाम काय झाला ?

५. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा :—

मेरी अँटोनिटो, माँटेस्क्यू, रॉबसपियर, बर्क, फॉक्स, रूसो, व्हॉल्टेर, पेन, प्रीस्टले, फ्रान्सची राष्ट्रीय सभा, डीडेरॉट, बॅस्टील, वॉशिंग्टन, मार्सेल, गिलोटीन, डायरेक्टर मंडळ.

६. 'फ्रेंच राज्यक्रांति' या विषयावर तुमच्या वादविवाद सभेंत चर्चा करा.

उतारा

[फ्रान्समध्यें राज्यक्रांति झाली त्यावेळीं इंग्लंडमध्यें तिला सहानुभूति दर्शविण्याकरितां अनेक मंडळें व क्लब स्थापन होऊं लागले होते; साधल्यास त्याच स्वरूपाची राज्यक्रांति इंग्लंडमध्येंही घडवून आणावी असा त्या मंडळांतील सभासदांचा विचार होता. अशाच एका मंडळाचें फ्रेंच क्रांतिकारकांस अभिनंदनपर लिहिलेलें पत्र खालीं दिलें आहे.–१७८९]

१. इंग्लंडमध्यें राज्यक्रांति घडवून आणावी म्हणून ही सोसायटी स्थापन झाली आहे. पक्षपातीपणाचा आम्हांस अत्यंत तिटकारा आहे. ज्यावेळीं स्वातंत्र्याचा जय होतो व जुलमी राजसत्तेचा नाश होऊन न्यायाचें राज्य सुरू होतें, त्यावेळीं आम्हांस अत्यानंद होतो. यामुळेंच फ्रान्समध्यें राज्यक्रांति घडवून आणल्याबद्दल फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेचें आम्ही आनंदानें अभिनंदन करतों. राजकीय स्वातंत्र्याबरोबर आपल्या देशांतील लोकांस खाजगी व धार्मिक स्वातंत्र्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लाभेल तर दुधांत साखर पडेल. फ्रेंच राज्यक्रांतीसारख्या महत्त्वाच्या गोष्टीची परिणति योग्य रीतीनें होऊन फ्रान्समध्यें योग्य व्यवस्था स्थापिली जाईल अशी आम्हांस दृढ आशा आहे. फ्रान्समधील लोकांनीं आपले जन्मसिद्ध हक्क मिळवून घेण्याकरितां सतत खटपट केली. फ्रान्सनें जें उत्तम उदाहरण घालून दिलें आहे त्यामुळें युरोपांतील सर्व राष्ट्रांचा अनियंत्रित कारभार नष्ट होईल, जगांतील सर्व लोक सुखी व स्वतंत्र होतील व युरोपांतील निरनिराळ्या लोकांस आपले जन्मसिद्ध हक्क मिळवून घेण्यास स्फूर्ति मिळेल अशी आम्हांस आशा आहे.

—लॉर्ड स्टॅनहोप

अध्यक्ष, इंग्लिश क्रांतिकारक सोसायटी

प्रश्न :—१. हें पत्र कोणीं लिहिलें ? कशाकरितां ?

२. फ्रान्सच्या उदाहरणानें जगाचा कोणता फायदा होणार होता ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२५. नेपोलियन बोनापार्ट (१७६९–१८२१)

१. नेपोलियन बोनापार्ट–पूर्वचरित्र :—फ्रेंच राज्यक्रांति फ्रान्समध्यें सन १७८९ सालीं सुरू झाली. तिच्या स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या तत्त्वांचा फैलाव करण्याचें काम फार अवघड होतें; परंतु प्रथमतः त्यांवर थोडा विश्वास दाखवून व आपल्या बुद्धीनें त्यांत सुधारणा करून त्यांचा युरोपभर प्रसार करण्याचें काम अत्यंत तडफदारपणें करणारांत फ्रान्सचा दिग्विजयी सेनापति व जगप्रसिद्ध योद्धा नेपोलियन बोनापार्ट हा प्रमुख होय. ता. १५ ऑगस्ट, १७६९ मध्यें त्याचा जन्म कॉर्सिका बेटांतील अजॅकियो गांवीं, एका मोडक्या जहागिरदाराच्या घराण्यांत झाला. लहानपणीं तो अत्यंत व्रात्य व खोडकर होता. लष्करी शिक्षणाची त्याला अत्यंत गोडी असल्यानें त्याच्या बापानें खटपट करून त्याला फ्रान्समधील ब्रीनच्या लष्करी शाळेंत दाखल केलें व तेथील अभ्यासक्रम पुरा झाल्यावर त्याला पॅरिसच्या लष्करी शाळेंत घातलें. शाळेंत असतांना तो आपल्या संवगड्यांत फारसा लोकप्रिय नव्हता. तो एकलकोंड्या स्वभावाचा असल्यानें आपल्या विचारांतच नेहमीं निमग्न असे. अर्थात् इतरांशीं न मिसळतां 'आपलें काम बरें कीं आपण बरे' या विचारानें तो नेहमीं वागत असे. त्यामुळें मुलें त्याची थट्टा करीत, त्याला चिडवीत व त्याला त्रास देत. तसेंच फ्रान्सनें जिंकलेल्या कॉर्सिका बेटांत तो जन्मास आल्यानें तो 'जित' म्हणूनही त्याची थट्टा होई. या गोष्टीनें मात्र त्याला फार चीड येई. तरीही तसें न दाखवितां तो आपल्या कामांत चूर होई. त्याला गणित, इतिहास व भूगोल हे विषय भारी आवडत. त्याचें हस्ताक्षर फार वाईट असे. हुषार विद्यार्थी म्हणून त्याच्यावर त्याच्या शिक्षकांचा जीव असे. सन १७८५ मध्यें त्याचें शिक्षण पूर्ण होऊन तो फ्रेंच लष्करांत शिरला. त्यावेळीं फ्रान्समध्यें राज्यक्रांतीचा धुमाकूळ माजला होता, व सन १७९३ पासून फ्रान्सनें युरोपियन राष्ट्रांशीं युद्ध सुरू केलें होतें. लष्करांत शिरला त्यावेळीं त्याचें वय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अवघें वीस वर्षांचें होतें. सन १७९३ मध्यें टुलोनच्या तोफखान्यावरील एक अधिकारी म्हणून त्याची नेमणूक झाली. टुलोन गांवीं अनेक फ्रेंच राजनिष्ठ गोळा झाले होते व त्यांनीं टुलोन गांवीं बंड उभारून ब्रिटिशांची मदत मागितली होती. नेपोलियननें मोठ्या शौर्यानें लढून तें गांव हस्तगत केलें व आपल्या पराक्रमानें सर्वांना चकित करून सोडलें. या वेळेपासूनच त्याची कीर्ति एकसारखी वाढत गेली व फ्रेंच लष्करांत तो एकसारखा वर चढत गेला. सन १७९५ मध्यें 'डायरेक्टर मंडळावर' क्रांतिकारकांनीं हल्ला केला असतां



नेपोलियन बोनापार्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व ते टुलरिज राजवाड्यावर चाल करून येत असतां, न भितां नेपोलियननें त्यांच्यावर तोफा डागून त्यांना पळवून लावलें. त्यामुळें 'डायरेक्टरमंडळ' त्याच्यावर खूष होऊन त्यांनीं त्याला इटलीच्या मोहिमेवर मुख्य सेनापति म्हणून पाठविलें (१७९६). यानंतर नेपोलियन एकसारखा चढतच गेला व सरतेशेवटीं हा कॉर्सिकन गृहस्थ आपल्या पराक्रमानें फ्रान्सचा बादशाह झाला.

२. त्याचा स्वभाव :—नेपोलियन पांच फूट पांच इंच उंच होता. त्याचें शरीर अत्यंत बांधेसूद होतें. त्याचें भव्य कपाळ, पाणीदार डोळे, अणकुचीदार व तरल नाक व पिळदार दंड यामुळें त्याच्या शरीरांत एक प्रकारची आकर्षकता उत्पन्न झाली होती व त्यामुळेंच तो सुंदर दिसे. त्याची मुद्रा उग्र असली, तरी त्याची दुसऱ्यावर एकदम छाप पडे व तो त्याला नुसता भारून टाकी. त्याचा करारी व स्वाभिमानी स्वभाव त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसे. आत्मविश्वास, जबर महत्त्वाकांक्षा, अखंड देशभक्ति, सतत उद्योग व दीर्घ परिश्रम करून पूर्ण विचारांतीं ठरविलेला कार्यक्रम यशस्वी करून दाखविण्याची धमक, शौर्य, धैर्य, साहस, इत्यादि गुणांत तो कोणाला हार जाणारा नव्हता. विकारांपेक्षां विचारांचेंच प्राबल्य त्याच्या मनावर असल्यानें प्रत्येक लहानसहान गोष्टीचा पूर्ण विचार करूनच तो आपलें धोरण ठरवी व तें तडीस नेई. अपमान त्याला बिलकूल सहन होत नसे. मनुष्याची त्याला उत्तम पारख होती व पारखून व कसोटीस लावून जवळ केलेल्या मनुष्यास तो कधींही अंतर देत नसे. शूर, धाडसी, स्वाभिमानी व तडफेनें व इमानानें काम करणाऱ्याला हुडकून काढून अत्यंत जबाबदारीच्या कामावर त्याची नेमणूक करण्यांत त्याचा हातखंडा असे. त्याला फारसे मित्र नव्हते, पण होते ते मात्र जिवास जीव देणारे. तो बोले थोडें, पण बोले तें इतकें परिणामकारक कीं तें ऐकणाराला त्याचे शब्द झेलावेसें वाटत. आपल्या सैनिकांवर त्याचें प्रेम अमर्याद असे. लढाईनंतर तो समरांगणीं जाऊन जखमी सैनिकांची विचारपूस करी, त्यांच्या शुश्रूषेची नीट व्यवस्था लावी, त्यांचा गौरव करून पारितोषिकें देई व त्यांच्याशीं मोकळ्या मनानें बोलून त्यांस शौर्याच्या कामास उद्युक्त करी. यामुळें तो आपल्या सैनिकांचा लाल बनला होता. आपले हुकूम पाळले जातात किंवा नाहीं हें तो कसोशीनें पाही व वेळेनुसार अत्यंत कडक धोरण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वीकारूनही त्यांचें तो पालन करून घेई. तो स्वतः शूर, धाडसी, काटक व कोणत्याही संकटास न जुमानणारा होता. अत्यंत कुशल सेनानायकाला लागणारे गुण त्याच्या अंगीं उत्कटत्वानें वसत होते. त्याची उत्कृष्ट सैन्य-रचना, त्याचा धडाडीचा कार्यक्रम, अचूक जागीं अति जलद जाऊन मोठा जबरदस्त आघात करण्याचें त्याचें कौशल्य, लष्कराची उत्तम व्यवस्था ठेवून व शिस्त राखून त्याच्याकडून तडफेनें व उत्साहानें काम करून घेण्याचें त्याचें कसब हीं सर्व त्याच्या जन्मजात युद्धविशारदपणाची साक्ष पटवितात. त्याची बुद्धि सर्वगामी होती व तिच्या जोरावरच त्यानें सर्व जगास थक्क करून सोडलें. त्याचें चारित्र्य तितकेंसें निर्मळ नव्हतें. अनेक वेळीं क्रौर्याचें प्रदर्शन करून आपल्या शत्रूंकडून त्यानें जुलमी म्हणवून घेतलें. तरीही त्याचें इतिहासांतील स्थान अढळ आहे.

३. इटालीवरील मोहीम :—सन १७९६ मध्यें डायरेक्टर-मंडळानें नेपोलियनची इटालीच्या मोहिमेवर नेमणूक केली. इटालीमध्यें त्यावेळीं ऑस्ट्रियाचें वर्चस्व होतें व तें नष्ट करण्याकरितांच नेपोलियनला तिकडे पाठविण्यांत आलें. मोठ्या हिमतीनें व धडाडीनें त्यानें आल्प्स पर्वत ओलांडला व तो इटालींत घुसला. आल्प्स पर्वत ओलांडून जाणें हें त्यावेळीं अत्यंत धाडसाचें काम समजलें जाई; कारण तो पर्वत बर्फमय असल्यानें तो उल्लंघणें अवघड होतें. इटलीमध्यें सुमारें

दर्यासारंग डंकन

एक वर्षभर लढून व ऑस्ट्रियन सैन्याचा निरनिराळ्या सोळा लढायांत पराभव करून ऑस्ट्रियाला त्यानें जेरीस आणलें. शेवटीं व्हिएन्नावर चाल करून तो निघाला. तेव्हां ऑस्ट्रियाच्या राजानें तहास आपली संमति दर्शवून सन १७९७ सालीं त्याच्याशीं कँपाफोर्मियो येथें एक अपमानकारक तह केला. त्याच सालीं सेंट व्हिन्सेंट येथें आरमारी लढाई होऊन नेल्सनच्या पराक्रमामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्पॅनिश आरमाराचा इंग्लंडनें मोड केला. दर्यासारंग डंकन यानेंही कँपरडाऊननजीक डच आरमाराचा पराभव करून जय मिळविला. कँपाफोर्मियोच्या तहानें पिटचा पहिला मित्रसंघ धुळीस मिळाला व इंग्लंड एकाकी राहिलें.

४. इजिप्तवरील मोहीम :—कँपाफोर्मियोच्या तहानंतर नेपोलियनची कीर्ति सर्वतोमुखीं झाली. पुढें सन १७९८ मध्यें त्याची इजिप्तच्या मोहिमेवर योजना करण्यांत आली. हिंदुस्थानावर स्वारी करून पूर्वेकडील देशांत मोठें साम्राज्य स्थापन करण्याचा त्याचा बेत होता. टिपू सुलतानाशीं संधान जोडून हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य नाहींसें करावयाचें व तेथें फ्रेंच राज्य स्थापावयाचें असाही त्याचा एक उद्देश होता. तेव्हां मोठें सैन्य व आरमार घेऊन तो भूमध्यसमुद्रांतून निघाला. लगेच त्यानें माल्टा बेट जिंकून घेतलें व इजिप्तमध्यें तो उतरला. नेपोलियन भूमध्यसमुद्रांतून पूर्वेकडे जात आहे ही बातमी इंग्लंडचा दर्यासारंग नेल्सन याला कळली. तेव्हां तो त्याच्या मागावर लागला. त्याला नेपोलियनचा खरा उद्देश न कळल्यानें तो त्याच्या शोधार्थ बराच भटकला; शेवटीं अलेक्झांड्रियाजवळ नांगरून पडलेलीं फ्रेंच जहाजें त्याला आढळलीं. इकडे नेपोलियननें इजिप्तवर स्वारी करून तुर्कांचा मोठा पराभव केला; त्यामुळें सबंध इजिप्त त्याच्या ताब्यांत आला. परंतु पुढें एकरच्या लढाईत सर सिडने स्मिथ यानें त्याचा पराभव केला. नेल्सननें नाईल नदीच्या मुखाजवळ फ्रेंच आरमाराशीं मोठी लढाई देऊन फ्रेंचांचा पराभव केला होता (१७९८). याच लढाईला 'नाईलची लढाई' असें म्हणतात. त्यामुळें नेपोलियनचे पुढील बेत फसले व आपल्या सैन्यास इजिप्तमध्यें तसेंच सोडून तो एका बोटींत बसला व अत्यंत गुप्तपणें फ्रान्सला आला. तेथें आल्यावरच तो पहिला कॉन्सल झाला व सर्व सत्ता त्याच्या हातीं आली.

५. दुसरा मित्रसंघ (१७९७) :—कँपाफोर्मियोच्या तहानंतर इंग्लंड एकाकी राहिलें हें मागें सांगितलेंच आहे. त्यांतच आयर्लंडमध्यें बंड उत्पन्न झालेलें. तरीही न डगमगतां पिटनें सन १७९८ मध्यें दुसरा मित्रसंघ स्थापन केला. या संघांत ऑस्ट्रिया, इंग्लंड व रशिया हे देश सामील झाले. त्यावेळीं नेपोलियन फ्रान्समध्यें नसल्यानें संयुक्त राष्ट्रांना प्रथमतः जय मिळत गेले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परंतु तो सन १७९९ मध्यें फ्रान्समध्यें अचानकपणें परतला व त्यानें ऑस्ट्रियावर पुन्हां हल्ला चढविला. इटलीच्या बाजूनें त्यानें हल्ला केला व सेनापति मारो यानें स्वित्झर्लंडच्या बाजूनें हल्ला केला. नेपोलियननें मोरेंगोच्या लढाईंत व मारोनें होहेनलिंडनच्या लढाईंत ऑस्ट्रियन सैन्याचा पराभव केला (१८००). त्यामुळें ऑस्ट्रिया मित्रसंघांतून फुटून निघाला. रशियानेंही काढता पाय घेतला. याचवेळीं रशियाच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडविरुद्ध सशस्त्र–तटस्थ–संघ स्थापन करण्यांत आला. तटस्थ राष्ट्रांच्या जहाजांची झडती घेण्याचा इंग्लंडनें हक्क सांगितल्यानेंच वरील संघ स्थापन झाला होता. या संघांत रशिया, प्रशिया, स्वीडन व डेन्मार्क ह्या राष्ट्रांनीं भाग घेतला होता. डेन्मार्कचें आरमार चांगलें असल्यानें त्याच्याकडून इंग्लंडवर हल्ला येण्यासारखा होता. तेव्हां सन १८०१ मध्यें ब्रिटिश आरमारानें कोपनहेगनवर हल्ला केला. नेल्सनच्या कौशल्यामुळें डॅनिश जहाजांचा फन्ना उडून ब्रिटिशांचा जय झाला. तेव्हां वरील संघांतून डेन्मार्क फुटला. रशियाचा झार पॉल याच वेळीं मेला. नवा झार अलेक्झांडर यानें रशियाचें युद्धविषयक धोरण बदलून संघांतून अंग काढून घेतलें. फ्रान्सचा जमिनीवर पराभव झाला नाहीं. इंग्लंडच्या आरमारानें समुद्रावर पराक्रम गाजविला. तरी त्याला मित्रराष्ट्र उरलें नाहीं. शेवटीं सर्व राष्ट्रें युद्धाला कंटाळल्यामुळें सन १८०२ मध्यें अमीन्स येथें तह झाला. धाकट्या पिटनें आयरिश प्रश्नाकरितां सन १८०१ मध्यें राजीनामा दिला होता; त्यामुळें अमीन्सचा तह त्यावेळचा मुख्य प्रधान ॲडिंगटन यानें केला होता. या तहानें इंग्लंडनें फ्रान्सच्या लोकसत्ताक राज्याला मान्यता दिली. सिलोन व ट्रिनिदाद यांच्याशिवाय सर्व ठिकाणें ज्याचीं त्याला परत देण्याचें इंग्लंडनें व नेपल्स व इजिप्त ज्याचें त्यास देण्याचें फ्रान्सनें मान्य केलें. तसेंच फ्रान्सचा राजा हें उपपद आपल्या बिरुदावळींत न घालण्याचें इंग्लंडच्या राजानें मान्य केलें. माल्टा बेट इंग्लंडच्या संरक्षणाखालीं कांहीं दिवस रहावें असें ठरलें.

६. नेपोलियन-फ्रान्सचा बादशाह (१८०४) :—इजिप्तच्या मोहिमेवरून नेपोलियन फ्रान्समध्यें आला त्यावेळीं डायरेक्टर-मंडळांत अनेक वादविवाद होऊन तें मोडण्यापर्यंत पाळी आली होती. त्यावेळीं अत्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सावधगिरीनें वागून त्यानें डायरेक्टरमंडळ रद्द केलें व त्याच्या जागीं एक 'कौन्सेलेट' नेमलें. या मंडळांत नेपोलियनसह फक्त तीनच सभासद होते व त्यांनीं नेपोलियनासच मुख्य कौन्सल नेमलें (१७९९). त्यानंतर त्यानें आपल्या शत्रूंचा पुन्हां पराभव करून सन १८०२ मध्यें अमीन्सचा तह घडवून आणला. सन १८०४ मध्यें नेपोलियननें आपल्याला फ्रान्सचा बादशाह म्हणून राज्याभिषेक करून घेतला. त्यावेळीं तो आपल्या वैभवाच्या शिखरावर होता. राज्याभिषेकाच्या वेळची अशी गोष्ट सांगतात कीं खुद्द पोप त्याच्या डोक्यावर राजमुकुट ठेवण्यास येत असतां, नेपोलियननें त्याच्या हातांतील मुकुट हिसकावून घेऊन आपल्या मस्तकीं धारण केला! इतका तो त्याकरितां उतावळा झाला होता. तो बादशाह झाल्यानें फ्रान्समधील लोकशाही नष्ट झाली व पुन्हां अनियंत्रित राजसत्ता स्थापन झाली. फ्रान्स-मध्यें शांतता व व्यवस्था स्थापण्याकरितां त्यानें कडक उपाय योजले व फ्रान्सचे निरनिराळे प्रांत पाडून त्यावर त्यानें दक्ष अधिकारी नेमले. पॅरिस शहर सौंदर्यपूर्ण करण्याकडे त्यानें लक्ष पुरविलें व त्याकरितां लाखों पौंड खर्चिले. कायद्याचें त्यानें एक कोड तयार केलें. त्याला 'नेपोलियनचें कोड' असें म्हणतात. तें अजूनही अनेक राष्ट्रांत वापरलें जातें. पॅरिसला एक नवें विश्वविद्यालय स्थापून त्याच्याकडे त्यानें फ्रान्सच्या शिक्षणखात्यावर देखरेख ठेवण्याचें काम सोंपविलें. दुय्यम शिक्षणांतही नाना सुधारणा त्यानें केल्या. रोमन कॅथॉलिक पंथ फ्रान्समध्यें सुरू करून धर्मपीठावर सरकारची हुकमत चालू केली. अशा रीतीनें त्यानें अनेक सुधारणा करून आपलें नांव सर्वतोमुखीं केलें. इतकें सर्व करीत असतांही त्यानें आपलें ध्येय मागें सारलें नव्हतें, हें पुढील गोष्टीवरून कळेलच.

७. तिसरा मित्रसंघ (१८०५):—अमीन्सचा तह तात्पुरताच ठरला. जें तें राष्ट्र लढाईची तयारी करण्यांत गुंतलें होतें. माल्टा सोडून देण्याचें कबूल करूनही इंग्लंडनें त्या बाबतींत दिरंगाई चालविली होती. नेपोलियनचा त्या बेटावर डोळा होता व तो तें केव्हां काबीज करील तें सांगतां येणें शक्य नव्हतें. नेपोलियननें हॉलंडमध्यें फ्रेंच सैन्य ठेवून दिलें. त्यामुळें ब्रिटिश व्यापाराला धोका पोंचेल असें इंग्लंडला वाटत होतें. इंग्लंडशीं व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तह करण्याचेंही नेपोलियननें नाकारलें. त्यावरून त्याला इंग्लंडशीं मैत्री नको असल्याचें सिद्ध होत होतें. इंग्लंडवर हल्ला करण्याची त्यानें एक योजना आंखली होती व बोलोन बंदरीं त्यानें आरमार सज्ज ठेवून तेथें एक लक्ष सैनिक ठेवून दिले. खुद्द इंग्लंडमध्यें नेपोलियनविरुद्ध जोराचा प्रचार चाललेला होता व तो थांबवावा असें त्यानें इंग्लंडला कळविलें असतांही तसें करण्यांत आलें नाहीं. शेवटीं आपली तयारी पूर्ण झाली, असें पाहतांच नेपोलियननें सन १८०३ मध्यें इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारलें. इंग्लंडनेंही तेंच केलें. नेपोलियननें युद्ध पुकारतांच पिटनें पुन्हां मुख्य प्रधान व्हावें अशी लोकांनीं आपली इच्छा दर्शविली. त्याची प्रकृति आधींच खराब होती व दिवसानुदिवस तो मृत्यूच्या जवळजवळ जात होता. परंतु तिकडे लक्ष न देतां त्यानें लोकांच्या मताला व विश्वासाला मान देण्याचें ठरवून ती जागा स्वीकारली (१८०४). त्यामुळें ॲडिंगटननें राजीनामा दिला. मुख्य प्रधान झाल्याबरोबर पिटनें आपला तिसरा मित्रसंघ स्थापन केला (१८०५). त्यांत रशिया, ऑस्ट्रिया, स्वीडन व इंग्लंड हीं राष्ट्रें सामील झालीं. परंतु त्यांच्याकडून नेपोलियनसारख्या जन्मजात सेनानीचा पराभव होणें अशक्य होतें. इंग्लंडचा तो द्वेष करी. इंग्लंडमुळें आपल्याला समुद्रावर सत्ता स्थापतां येत नाहीं अशी त्याची खात्री होती. तेव्हां इंग्लंडच्या आरमाराचा नाश करण्याची त्यानें जोरांत तयारी चालविली. इंग्रजांचा दर्यासारंग नेल्सन याला फसविण्याचा त्यानें एक घाट घातला. फ्रेंच दर्यासारंग व्हिलेन्यू यानें फ्रेंच व स्पॅनिश जहाजें एकत्र करून वेस्ट इंडीज बेटांवर हल्ला करण्याचा बहाणा करावा; अर्थात् नेल्सन त्याच्या पाळतीवर राहून त्याच्या मागें जाईल. मग व्हिलेन्यूनें त्याचा डोळा चुकवून अर्ध्या वाटेंतूनच परत यावें व इंग्लिश खाडींत उतरून इंग्लंडवर स्वारी करावी. हा बेत यशस्वी होता तर इंग्लंडची काय अवस्था झाली असती तें सांगतां येणें शक्य नाहीं. ठरल्याप्रमाणें व्हिलेन्यू निघाला, नेल्सनही त्याच्यामागें लागला व नंतर व्हिलेन्यू अर्ध्या वाटेंतून परत फिरला. परंतु तें नेल्सनला कळलें. लगेच त्यानें फ्रेंच जहाजांचा पाठलाग करून ट्रफाल्गरजवळ फ्रेंच आरमाराला गांठलें. तेथें अभूतपूर्व लढाई होऊन फ्रेंच आरमाराचा संपूर्ण पराभव झाला (१८०५). मात्र त्या लढाईंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लंडचा प्रख्यात दर्यासारंग नेल्सन गोळी लागून मृत्युमुखीं पडला. 'मी माझें काम बजावल्यानें मी समाधानानें मरतों,' असें तो म्हणाला. फ्रेंच आरमाराचा संपूर्ण नाश होऊन नेपोलियनच्या बेतांना कायमची मूठमाती मिळाली. इंग्रजी आरमार दिग्विजयी ठरलें व त्यामुळें त्याचा व्यापार मारण्याचा व वसाहती काबीज करण्याचा फ्रेंचांचा बेत निष्फळ ठरला.

८. ऑस्टरलिट्झची लढाई व पिटचा मृत्यु (१८०५) :—आरमारी पराभव झाला तरी त्यामुळें हताश होणारा नेपोलियन नव्हता. त्यानें ऑस्ट्रिया व रशिया यांच्या जोडसैन्यावर एकदम हल्ला केला. ऑस्टरलिट्झ येथें घनघोर लढाई होऊन नेपोलियनला जय मिळाला (१८०५). या लढाईंत संयुक्त सैन्याचे सुमारें पन्नास हजार लोक कामास आले. या विजयानें पिटचा तिसरा मित्रसंघ नामशेष झाला. ऑस्ट्रियाच्या राजानें आणखी एक अपमानकारक तह केला व नेपोलियनच्या सांगण्यावरून 'जर्मन बादशाह' हा सुमारें एक हजार वर्षें चालत आलेला किताब त्यानें सोडून देऊन 'ऑस्ट्रियाचा बादशाह' हा साधा किताब स्वीकारला. या अलौकिक विजयानें नेपोलियनचें नांव चिरंजीव झालें. ऑस्टरलिट्झच्या विजयाची बातमी कळतांच पिटची कंबरच खचली व त्या धक्क्यानें तो पुढें थोड्याच दिवसांत मृत्यु पावला (१८०६). ऑस्टरलिट्झच्या लढाईची बातमी कळतांच तो मोठ्या त्वेषानें पण निरुत्साहानें म्हणाला, 'गुंडाळा तो युरोपचा नकाशा. यापुढें निदान दहा वर्षें तरी त्याची गरज भासणार नाहीं.' त्याच्या या भविष्यवाणीची सत्यता लवकरच पटली. 'मोठ्या धैर्यानें इंग्लंडनें आजपर्यंत स्वसंरक्षण केलें. युरोपालाही इंग्लंडच वांचवील,' असें तो मृत्युसमयीं म्हणाला. मृत्युसमयीं त्याचें वय अवघें सत्तेचाळीस वर्षांचें होतें. नेल्सनच्या मृत्यूनंतर इतक्या लवकर या प्रसिद्ध मुत्सद्याचाही मृत्यु ओढवेल ही कल्पना कोणासही शिवली नव्हती.

९. युद्धमंत्रि या नात्यानें पिटची योग्यता :—युद्धमंत्रि या नात्यानें पिटची कामगिरी कमी प्रतीची ठरते. त्याचा बाप उत्तम व कुशल युद्धमंत्रि होता, याच आधारावर तोही उत्तम व जन्मजात युद्धमंत्रि असेल अशी कल्पना करणें बरोबर होणार नाहीं. युद्धमंत्रि या नात्यानें धाकटा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पिट गाजला नाहीं, शांततावादी अर्थमंत्रि म्हणूनच तो विशेष गाजला. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर सुरू झालेलीं युद्धें अल्पकालीन होतील असें त्याला वाटत होतें. कारण फ्रान्स देश आर्थिकदृष्ट्या दिवाळखोर बनलेला असल्यानें युद्ध लांबलेंच तर तें एखाद-दुसरें वर्ष लांबेल असा त्याचा अंदाज होता. फ्रान्सची स्थिति लक्षांत घेऊन तसा अंदाज कोणीही केला असता. त्याबद्दल पिटला दोष देणें सर्वस्वी योग्य होणार नाहीं. अर्थात् त्याच्या अंदाजाप्रमाणें त्यानें इंग्लंडच्या अर्थोत्पत्तीची प्रथमतः व्यवस्था ठेवली होती. परंतु युद्ध लांबलें. त्या वेळीं त्यानें जकाती वाढविल्या व सन १७९८ मध्यें प्राप्तीवरील कर सुरू केला. हा कर एका पौंडास दोन शिलिंगापर्यंत होता व युद्ध संपल्यानंतर तो रद्द करण्याचें त्यानें आश्वासन दिलें होतें. युद्धाच्या सुरवातीस त्यानें हा कर लादला असता तर ठीक झालें असतें, असें लोक म्हणतात; परंतु लोकांवर जबर कर लादून पैसा उभा करावा असा त्याचा सुरवातीस विचारच नव्हता. त्यानें कर्ज काढलें तेंही भारी व्याजानें. यामुळेंही पुष्कळ गैरसमज झाला. शिवाय उत्पन्न झालेला पैसा त्यानें युरोपियन राजांच्या घशांत निष्कारण ओतला. ज्या कारणाकरितां त्या राजांनीं हा पैसा पिटकडून घेतला त्या कामाकरितां त्यांनीं तो उपयोजिला नाहीं; स्वतःच्या स्वार्थी धोरणाकरितां वापरला. अर्थात् या बाबतींत पिटचें धोरण अयोग्य ठरलें. आपल्या बापाचेंच धोरण त्यानें त्या बाबतींत स्वीकारलें, तरी त्या बाबतींत थोरल्या पिटनें जी कार्यक्षमता दाखविली ती त्याला दाखवितां आली नाहीं. आपल्या आरमारी शक्तीचाही त्याला योग्य तो उपयोग करून घेतां आला नाहीं; कारण त्याला फ्रेंच व्यापारी बंदरांचा कोंडमारा करतां आला नाहीं. उलट फ्रेंचांनीं इंग्रजांचीं सुमारें तीन हजार व्यापारी जहाजें पकडून नेलीं. तरीही इंग्लंडचा व्यापार चांगला चालला होता, साम्राज्यांतील वसाहतींचें त्यानें उत्तम संरक्षण केलें व यामुळेंच इंग्लंडला तग धरतां आली. त्याला मनुष्याची उत्तम पारख करतां येत नव्हती म्हणून त्याच्या लष्करी नेमणुका कुचकामाच्या ठरल्या, लष्कराचीही आबाळ झाली; लष्कराला सामानही वेळेवर पोंचत नसे. लष्करी अधिकारी नालायक व कुचकामाचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्यानें लष्करी योजना फसल्या व त्यांना अनेक पराभव स्वीकारावे लागले. त्यामुळें पैसा व मनुष्यसंपत्ति किती खर्च झाली, त्याला गणतीच नाहीं. पिटनें युद्धविषयक एकच धोरण न स्वीकारल्यानें त्याला अपयश आलें. कसेंही असलें तरी पिटनें आपलें राष्ट्र मरूं दिलें नाहीं व राष्ट्रांत धैर्य, चिकाटी, दृढनिश्चय वगैरे आपल्या गुणांनीं त्यानें जी चेतना, जो आत्मविश्वास व स्वकर्तव्याबद्दल जी आवड उत्पन्न केली ती मात्र अपूर्व होती. आणि इतकें करणारा इंग्लंडमध्यें त्यावेळीं दुसरा कोणता लायक मुत्सद्दी होता ? अत्यंत आणीबाणीच्या वेळीं त्यानें स्वतःच्या जिवाकडेही न पहातां राष्ट्राला दुर्दैवाच्या फेऱ्यांतून मोठ्या कौशल्यानें वांचविलें ही काय कमी महत्त्वाची कामगिरी? आणि शिवाय जगांत तोड नाहीं अशा परिस्थितीशीं त्याला झगडावें लागलें व तेंही नेपोलियनसारख्या एका जगद्विख्यात् युद्धविशारदाशीं ! ही गोष्ट लक्षांत घेतां, जन्मजात युद्धमंत्र्याचे गुण अंगीं नसूनही, त्यानें धडाडी दाखविली व राष्ट्र जगविलें असेंच नव्हे, तर तें भावी झगड्यास अधिक बळकट केलें. याबद्दल त्याला शाबासकी कां देऊं नये ?

१०. दर्यासारंग लॉर्ड नेल्सन (१७५८-१८०५):—इंग्लंडचा सर्वोत्तम दर्यासारंग व इंग्लंडचा पराभव करण्याच्या नेपोलियनच्या महत्त्वाकांक्षेस धुळीस मिळविणारा लॉर्ड होरेशियो नेल्सन सन १७५८ मध्यें बर्नहॅम थोर्प या गांवीं जन्मास आला. त्याची पणजी सर रॉबर्ट वॉलपोलची बहीण होती. नेल्सनला अकरा भावंडें होतीं व त्यांपैकीं फक्त आठच जिवंत होतीं. जन्मापासूनच नेल्सनची प्रकृति अगदीं अशक्त होती. अर्थात् त्याच्याकडून अभ्यास रेटणें अगदींच अशक्य झालें. बारा वर्षांचा असतांनाच त्यानें नावाडी होण्याची इच्छा दर्शविली. त्याच्या बापाचें उत्पन्न कमी व घरांत खाणारीं

लॉर्ड नेल्सन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माणसें पुष्कळ; यामुळें होरॅशियो नेल्सनच्या विनंतीस मान्यता देण्यांत आली. त्याचा चुलता एका जहाजाचा कॅप्टन होता. तेव्हां त्यांतूनच होरॅशियोनें लंडनपर्यंतचा आपला पहिला जलप्रवास केला. प्रवासाचा अनुभव त्याला अत्यंत विचित्र असा आला. कारण तो ज्यावेळीं लंडनला उतरला त्यावेळीं त्याला खायला अन्न मिळेना कीं रहायला घर मिळेना ! शेवटीं एकानें कसेंबसें त्याला त्याच्या चुलत्याकडे पोंचतें केलें. त्यानंतर नेल्सननें वेस्ट इंडीज बेटांपर्यंत एका व्यापारी जहाजांतून प्रवास केला. त्यामुळें नावाड्याच्या आयुष्यास तो इतका विटला कीं त्यापेक्षां दुसरा एखादा पेशा पत्करावा असें त्याला वाटलें. परंतु मन घट्ट करून त्यानें पुन्हां प्रयत्न करून पाहण्याचें ठरविलें व सन १७७३ मध्यें एका आरमारी काफिल्याबरोबर तो उत्तर आर्टिक समुद्रांत गेला. तेथील अनुभवानंतर त्यानें सर एडवर्ड ह्यूजेस याच्या हाताखालीं दीड वर्ष नाविक शिक्षण घेऊन ईस्ट इंडीज बेटांकडे प्रयाण केलें. तेथील हवा त्याला मानवली नाहीं व तो इंग्लंडला अगदीं अशक्त स्थितींत परतला. पुढें त्यानें आरमारी शिक्षणास सुरुवात करून व हळू हळू त्यांत प्रगति करून तो अखेरीस लेफ्टेनंट झाला. आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत तो विद्यार्थीच होता. तो निधड्या छातीचा खंदा वीर होता. आमरण


ट्रफालगरच्या लढाईनंतर नेल्सनच्या विजयार्थ उभारलेला विजयस्तंभ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यासू वृत्ति त्यानें धारण केल्यानें त्याच्यावर त्याच्या अधिकाऱ्यांची मर्जी सुप्रसन्न असे. त्याच्या वृत्तींतील व आचरणांतील साधेपणा सर्वांस आवडे व त्यामुळेंच त्याची कोणावरही छाप पडे. अचूक संधीची तो वाट पहात बसे व आलेली संधि व्यर्थ न दवडतां तिचा तो पुरेपूर फायदा घेत असे. यांतच त्याचा श्रेष्ठपणा व्यतीत होतो; त्याची सर्वश्रेष्ठ बुद्धिमत्ता अलौकिक होती. त्याचें आचरण तितकेंसें शुद्ध नव्हतें. त्यामुळें तो आपल्या बायकोस नीट वागवीत नसे. लेडी हॅमिल्टन या स्त्रीवर मात्र त्याचें नितांत प्रेम होतें. ही एकच गोष्ट सोडल्यास तो निस्वार्थी, आपल्या कर्तव्याबद्दल नेहमीं जागरूक राहणारा व धीर न सोडतां अत्यंत धडाडीनें काम करणारा होता असें म्हणतां येईल. सन १७९४ मध्यें कॉर्सिकामध्यें लढत असतां त्याचा उजवा डोळा व उजवा हात गेला होता. अशाही स्थितींत त्याचा उत्साह कधींही कमी झाला नव्हता. सेंट व्हिन्सेंटची लढाई इंग्रजांनीं त्याच्यामुळेंच जिंकली. नाईलची लढाई त्यानें जिंकून उत्तम कामगिरी बजावली व ट्रफाल्गरच्या लढाईनें त्याच्या कामगिरीस चिरस्थाई स्वरूप प्राप्त झालें. ट्रफाल्गरची लढाई त्यानें जिंकली नसती तर युरोपच्या इतिहासास निराळेंच वळण लागतें. त्याच्या विजयानें इंग्लंड वांचलें. एवढेंच नव्हे, तर युरोपखंडास वांचविल्याचें श्रेयही त्याला लाभलें. यामुळेंच इंग्लंडनें जगांतील या उत्तमांत उत्तम दर्यासारंगाचा अभूतपूर्व असा सन्मान केला व त्याचें टोलेजंग स्मारक केलें. ट्रफाल्गरच्या लढाईतच त्याचा सन १८०५ मध्यें अंत झाला.

चार्ल्स जेम्स फॉक्स

११. तिसरें मिश्र प्रधानमंडळ (१८०६) :— पिटच्या मृत्यूनंतर इंग्लंडमध्यें ग्रेनव्हिल व फॉक्स यांच्या नेतृत्वाखालीं तिसरें मिश्र प्रधानमंडळ स्थापन झालें. देशावर संकट आलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें व तें निवारण कसें करावें हा देशापुढें मुख्य प्रश्न होता. त्यामुळें सर्व पक्षांतील बुद्धिमान् लोकांस त्या प्रधान मंडळांत घेण्यांत आलें. त्यामुळें त्याला 'बुद्धिवंतांचें प्रधानमंडळ' असेंही म्हणतात. नेपोलियनशीं तह करावा व तो झाल्यानंतर इंग्लंडमध्यें निरनिराळ्या सुधारणा घडवून आणाव्या असा या प्रधानमंडळाचा मुख्य उद्देश होता. इंग्लंडनें फ्रान्सशीं युद्ध सुरू केलें ही गोष्ट फॉक्सला पसंत नव्हती. तेव्हां त्यानें नेपोलियनशीं तहाकरितां पत्रव्यवहार सुरू केला. परंतु त्याच्या प्रयत्नास वाटाण्याच्या अक्षताच लावण्यांत आल्या. तो सन १८०६ मध्यें मृत्यु पावला. परंतु मृत्यूपूर्वी त्यानें एक चांगली गोष्ट केली. ती म्हणजे गुलामांचा व्यापार थांबविण्या-करितां चळवळ चालवून त्याकरितां एक कायदा पास करण्याचें त्यानें ठरविलें. विल्बरफोर्स व त्याचे स्नेही त्याकरितां जिवापाड मेहनत करीत होतेच. शेवटीं सन १८०७ मध्यें पार्लमेंटनें गुलामांचा व्यापार रद्द करण्याबद्दल कायदा पास केला. कॅथॉलिकांवरील धार्मिक निर्बंध रद्द करण्याचाही प्रधान-मंडळानें प्रयत्न केला; पण त्यांत राजाच्या हट्टामुळें त्याला यश न येतां राजीनामा द्यावा लागला. मात्र त्यापूर्वी त्यानें एक चांगली गोष्ट केली होती. ती म्हणजे कौन्सिलांतील फर्मानें पास करणें ही होय. तो प्रकार असा.

१२. बर्लिनचें फर्मान (१८०६)–इंग्लंडचा व्यापारी कोंडमारा:— ऑस्टरलिट्झच्या लढाईनंतर नेपोलियन प्रशियावर चाल करून गेला. हॅनोव्हर प्रांत इंग्लंडला परत मिळावा असें फॉक्सनें नेपोलियनला सुचविलें होतें. तो प्रांत प्रशियाकडे होता; परंतु नेपोलियननें तो प्रांत फॉक्सच्या इच्छे-प्रमाणें इंग्लंडला देऊं केला. ही गोष्ट प्रशियाच्या राजाला आवडली नाहीं व त्यानें जर्मनींतून फ्रेंच सैन्यानें निघून जावें असें फर्माविलें. या गोष्टीचा राग येऊनच नेपोलियन प्रशियांत घुसला होता. येना या ठिकाणीं मोठी घनघोर लढाई होऊन प्रशियनांचा पराभव झाला (१८०६). त्यानंतर नेपोलियन बर्लिन शहरीं गेला. तेव्हां प्रशियाचा बादशाह रशियाच्या झारच्या आश्रयास गेला. बर्लिनला असतांच नेपोलियननें आपलें प्रसिद्ध 'बर्लिनचें फर्मान' जाहीर केलें. इंग्लंडचा समुद्रावर पराभव करणें अशक्य आहे अशी त्याची खात्री झाली होती व म्हणूनच तो फार हळहळे. 'इंग्लिश

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खाडी केवळ सहा तास माझ्या हातीं येईल, तर मी जगाचा राजा होईन' असें तो नेहमीं म्हणे. यावरून इंग्लंडच्या नाशास तो किती उत्सुक होता हें दिसून येईल. तेव्हां इंग्लंडचा व्यापारी दृष्टीनें कोंडमारा केला तर तें राष्ट्र आपल्याला खात्रीनें शरण येईल असें त्याला वाटलें. सर्व समुद्रावर इंग्लंडची सत्ता असली तरी युरोपांतील सर्व देशांवर–अर्थात् सर्व जमिनीवर–त्याचीच सत्ता होती; त्याच्या जोरावर त्यानें इंग्लंडला नमविण्याचा बेत केला. त्या हेतूनेंच त्यानें सन १८०६ मध्यें बर्लिनचें फर्मान काढून असें जाहीर केलें कीं, (१) फ्रान्स व त्याचीं दोस्त राष्ट्रें यांनीं आपापलीं बंदरें इंग्लंडकरितां बंद करावीं व इंग्लंडचीं जहाजें आपल्या बंदरांत येऊं देऊं नये. (२) इंग्लंडचा माल जेथें सांपडेल तेथें तो जप्त करण्यांत यावा. (३) इंग्लिश लोक सांपडतील तेथें कैद करण्यांत यावे. (४) याविरुद्ध वर्तन करील त्याला फ्रान्सचे शत्रू समजण्यांत यावें. (५) इंग्लंडच्या बंदरीं गेलेल्या इतर राष्ट्रांच्या जहाजांस कोणीही आपल्या बंदरांत घेऊं नये. आपल्या आरमाराची कुवत लक्षांत न घेतांच नेपोलियननें हें फर्मान काढल्यानें त्याला कस्पटाइतकीच किंमत मिळाली. प्रथमतः त्याला यश येईल असें वाटलें; परंतु त्याचें हें नवें तत्त्व त्याच्या अंगाशीं आलें. इतर राष्ट्रांनीं इंग्लंडशीं उघड उघड व्यापार न करितां, चोरटा व्यापार सुरू केला. एवढेंच कशाला, खुद्द नेपोलियनलाही आपल्या सैनिकांकरितां इंग्लंडमधील लीडस् या गांवीं तयार झालेले ओव्हरकोट व नॉरदॅम्पटनचे बूट घ्यावे लागले !

१३. कौन्सिलांतील फर्मानें (१८०७):—नेपोलियनच्या फर्मानास उत्तर म्हणून प्रधानमंडळानें कौन्सिलांतील फर्मानें काढलीं व असें जाहीर केलें कीं "सर्व तटस्थ राष्ट्रांना इंग्लंड व त्याच्या वसाहती यांच्याशीं व्यापार करण्याची–युद्धनीतीच्या कायद्यांविरुद्ध–फ्रेंच सरकारनें बंदी केली आहे. तसेंच इतर राष्ट्रांनाही इंग्लंडशीं व त्याच्या साम्राज्यांतर्गत देशांशीं व्यापार करण्याची त्या सरकारनें ज्या अर्थीं बंदी केली आहे, व फ्रान्सचीं व त्याच्याशीं मैत्री करणाऱ्या इतर देशांचीं सर्व जहाजें आपापल्या बंदरीं स्वस्थ नांगरून पडलीं असतांही त्या सरकारनें ज्या अर्थीं इंग्लंड व त्याचें साम्राज्य यांचा व्यापारी कोंडमारा करण्याचें ठरविलें आहे त्या अर्थीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या प्रधानमंडळाच्या संमतीनें राजेसाहेब असें फर्मावितात कीं, फ्रान्स अगर त्याचीं दोस्त राष्ट्रें यांच्या ताब्यांतील कोणत्याही बंदरांत जाण्यास कोणत्याही जहाजास बंदी आहे; तसेंच इंग्लंडच्या जहाजांच्या सर्व कप्तानांस अशी विनंति आहे कीं, त्यांनीं तटस्थ राष्ट्रांच्या अगर इतरांच्या जहाजांस तशी सक्त ताकीद देऊन ठेवावी; अशी ताकीद दिल्यानंतरही एखादें जहाज जर याविरुद्ध वर्तन करील तर तें जहाजच काय, पण त्यावरील मालही जप्त करण्यांत येईल." यापेक्षांही जास्त कडक धोरण इंग्लंडनें स्वीकारणें योग्य होतें, असें त्यावेळच्या इंग्रज व्यापाऱ्यांचें मत होतें, परंतु मुख्य प्रधान ग्रेनव्हिल यानें तें मान्य केलें नाहीं. व्यापारी कोंडमाऱ्यानें इंग्लंडचें थोडेंबहुत नुकसान झालें, तरीही इंग्लंडचीं जहाजें राजरोसपणें तटस्थ राष्ट्रांच्या बंदरांत जात व तेथें आपला माल उतरवीत. तेथून तो युरोपच्या कोनाकोपऱ्यांत नेला जाई! आणि याचें कारण फ्रेंच आरमार निःसत्त्व असून सर्व समुद्राची मालकी इंग्लंडची होती.

१४. व्यापारी कोंडमाऱ्याच्या धोरणाचा फैलाव:—इंग्लंडच्या फर्मानामुळें नेपोलियन मुळींच बिचकला नाहीं. उलट इंग्लंडच्या व्यापारी कोंडमाऱ्याच्या धोरणाचा फैलाव करण्याचें त्यानें ठरविलें. पुढें सन १८०७ सालीं त्यानें मिलान येथूनही बर्लिनच्या फर्मानाचा पुनरुच्चार केला. एवढेंच नव्हे तर त्यांत अधिक भरही घातली. त्याच्या नंतर इंग्लंडवर आरमारी हल्ला करण्याचें नेपोलियननें ठरविलें. त्याकरितां तो डेन्मार्कच्या आरमाराचा उपयोग करणार होता. या कृत्यानें इंग्लंडची नाकेबंदी होऊन आपलें धोरण यशस्वी करतां येईल असा त्याचा उद्देश होता. डेन्मार्कचें आरमारही चांगलें असल्यानें यशाची त्यास खात्री होती. परंतु त्याचा हा बेत ओळखून इंग्लंडनें डेन्मार्कच्या आरमारावर कोपनहेगन येथें हल्ला केला व बरींच जहाजें जप्त करून नेलीं. यामुळें नेपोलियनचा बेत फसला. परंतु त्यामुळें तो हताश झाला नाहीं. त्यानंतर तो रशियाकडे वळला. फ्रीडलंड येथें फ्रेंचांची व रशियनांची लढाई होऊन रशियनांचा पराभव झाला. तेव्हां रशियाचा झार अलेक्झांडर यानें नेपोलियनशीं टिलसिट येथें सन १८०७ सालीं तह करून इंग्लंडचा व्यापारी कोंडमारा करण्याच्या नेपोलियनच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धोरणास त्यानें मान्यता दिली. तसेंच त्या तहानें प्रशियाच्या राज्याचे दोन विभाग करण्यांत येऊन ते फ्रान्स व रशिया यांच्यांत वांटले गेले. त्यामुळें नेपोलियन पश्चिम युरोपचा मालक बनला.

१५. व्यापारी कोंडमाऱ्याचा परिणाम :—इंग्लंडचा व्यापारी कोंडमारा करण्याची योजना नेपोलियनच्या अंगाशीं आली व त्याच्या यशास उतरती कळा लागली. इंग्लंडचा व्यापार मारून त्या राष्ट्राला शरण येण्यास लावण्याची त्याची कल्पना अभिनव खरी, परंतु त्याची आरमारी शक्ति कमकुवत असल्यामुळें त्याचाच कोंडमारा होण्याची वेळ आली. बर्लिनच्या फर्मानाची सर्व युरोपियन राष्ट्रांनीं योग्य अंमलबजावणी केली पाहिजे असें त्यानें प्रत्येक राष्ट्रास कळविलें होतें. परंतु त्याची अंमलबजावणी होणेंच दुर्घट काम होतें. आरमार नसल्यानें फ्रान्सला युरोपांतील बंदरांची नाकेबंदी करतां आली नाहीं. उलट इंग्लंडनें मात्र ठिकठिकाणची नाकेबंदी करून युरोपियन राष्ट्रांचा व्यापार जवळ जवळ मारून टाकला. त्यामुळें त्यांचा परस्परांशीं चाललेला व्यापार थांबला. कोणासही माल मिळेनासा झाला. इंग्लंड व त्याच्या साम्राजांतून येणारा पुष्कळ माल जीवनास अत्यंत उपयुक्त होता. तो येईनासा झाल्यानें युरोपांत सर्वत्र दुष्काळाची छाया पडूं लागली. इंग्लिश मालाला मागणी अतीशय होती. त्यामुळें निरनिराळ्या देशांत चोरटा व्यापार सुरू झाला. हॉलंड, सिसिली वगैरे प्रांतांत ब्रिटनचा माल उघड उघड येऊं लागला. खुद्द नेपोलियनलाही अनेकांस ब्रिटिश माल आणण्यास परवाने, व तेही मनाविरुद्ध, द्यावे लागले. त्यानें आपल्या लष्करासही इंग्लिश माल पुरविला! एकंदरींत सर्व युरोपियन राष्ट्रें संतापलीं व त्यांना नेपोलियनचा तिटकारा आला. एवढेंच नव्हे तर त्याचीं फर्मानें मानावयाचीं नाहींत असें कांहीं राष्ट्रांनीं ठरवून आपल्या देशांत इंग्लिश माल उघडपणें आणण्याची त्यांनीं आपल्या व्यापाऱ्यांस पूर्णपणें परवानगी दिली. अशा राष्ट्रांत पोर्तुगालनें अग्रेसरत्वाचा मान मिळविला.

१६. द्वीपकल्पांतील युद्ध (१८०७–१४):—लहानशा पोर्तुगालनें आपल्या व्यापारी कोंडमाऱ्याच्या धोरणास विरोध करून इंग्लंडशीं व्यापार करण्याचें ठरविलें हें ऐकून नेपोलियनला संताप आला. लगेच त्यानें आपलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सैन्य पोर्तुगालविरुद्ध लढण्याकरितां पाठविलें. त्या सैन्यानें चिमुकल्या पोर्तुगालचा पराभव करून तेथील राजाला ब्राझीलमध्यें पळवून लावलें. त्यानें इंग्लंडची मदत मागितली व इंग्लडनें आर्थर वेल्स्ली याच्या नेतृत्वाखालीं पोर्तुगालला मदत करण्याकरितां लष्कर पाठविलें. त्याचवेळीं स्पेनचा राजा चौथा चार्ल्स व राजपुत्र यांच्यामध्यें स्पेनच्या गादीबद्दल तंटा उत्पन्न झाला. तेव्हां तो मिटविण्याचें काम त्यांनीं नेपोलियनकडे सोपविलें. त्यानें दोघांसही दूर करून स्पेनच्या गादीवर आपला भाऊ जोसेफ याला बसविलें. यामुळें सर्व स्पॅनिश लोक खवळले व त्यांनीं फ्रेंचांशीं युद्ध आरंभिलें. भीतीनें जोसेफ फ्रान्समध्यें पळून आला (१८०८). देशभक्तीनें प्रेरित होऊन लोक लढूं लागले म्हणजे ते कसलेल्या लष्करालाही भारी असतात याचा नेपोलियनला या युद्धांत पुरेपूर प्रत्यय आला. यालाच उद्देशून प्रसिद्ध ब्रिटिश मुत्सद्दी शेरिडन म्हणाला, 'युरोपांतील निष्प्रभ राजांशीं, निरुत्साही लष्कराशीं, व देशभक्तीहीन लोकांशीं आजपर्यंत नेपोलियन लढत होता. देशभक्तीनें प्रेरित होऊन एक झालेल्या लोकांशीं लढून जय कसे मिळवावयाचे हें त्याला अजून शिकायचें आहे.' सर आर्थर वेल्स्ली व सर जॉन मूर यांच्या नेतृत्वाखालीं ब्रिटिश फौजा पोर्तुगालमध्यें गेल्याच होत्या. त्यांच्याकडेच स्पॅनिश लोकांना मदत करण्याचें काम सोंपविण्यांत आलें. वेल्स्लीनें व्हिमेरिया या ठिकाणीं फ्रेंचांचा पराभव केला. त्यानंतरच्या लढायांतही वेल्स्लीनें फ्रेंच लष्कराचे एकसारखे पराभव केले. तेव्हां एक तात्पुरता तह होऊन फ्रेंच सैन्यानें पोर्तुगाल सोडून फ्रान्सला जावें असें ठरलें. परंतु ही गोष्ट नेपोलियनला आवडली नाहीं. तेव्हां युद्धास पुन्हां सुरुवात झाली. सन १८०९ मध्यें तो स्वतः स्पेनमध्यें उतरला व त्यानें आपल्या भावाला पुन्हां राज्यावर बसविलें. कोरून्ना येथें इंग्रज व फ्रेंच यांची लढाई होऊन फ्रेंचांचा पराभव झाला! मात्र इंग्रजांचा सेनापति सर जॉन मूर मृत्युमुखीं पडला. त्यानंतर नेपोलियन फ्रान्समध्यें गेला व पुढील काम आपल्या लष्कराकडे त्यानें सोपविलें. परंतु वेल्स्लीनें फ्रेंचांचा टॅलाव्हेरा या ठिकाणीं पराभव केला (१८०९). या जयामुळें वेल्स्लीला 'वेलिंग्टनचा ड्यूक' ही बहुमानाची पदवी अर्पण करण्यांत आली. त्यानंतर तीन वर्षें युद्ध चालूच होतें. सन १८१२ मध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सॅलामॉन्का येथें त्यानें फ्रेंचांचा पुन्हां पराभव केला, मॅड्रिड शहर काबीज केलें व जोसेफ नेपोलियन याला राज्यत्याग करण्यास लावलें. तेव्हां जोसेफ



फ्रान्समध्यें पळून गेला. त्याचा पाठलाग करीत असतांच सन १८१३ मध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्हिटोरिया येथें इंग्रजांनीं फ्रेंचांचा पुरा मोड केला. तेव्हां टुलौज येथें फ्रेंच सरहद्दीवर सर्व फ्रेंच सैन्य जमा झालें. तेथेंही वेल्स्लीनें सन १८१४ मध्यें त्यांचा पराभव करून स्पेनमधून फ्रेंचांना त्यानें फ्रान्समध्यें पळवून लावलें. अत्यंत चिकाटीनें हें युद्ध वेलिंग्टननें चालविलें व सर्व स्पेनमधून त्यानें फ्रेंचांना हुसकून लावलें व तो पॅरिसच्या मार्गाला लागला.

१७. रशियावर मोहीम व माघार (१८१२):—स्पॅनिश युद्धांत फ्रेंचांचा ठिकठिकाणीं पराभव होत आहे हें पाहून ऑस्ट्रियन लोकांस मोठा उत्साह आला व आतां आपल्याला नेपोलियनशीं दोन हात करून त्याचा पराभव करतां येईल असें त्यांस वाटलें. ताबडतोब त्यांनीं आपल्या सैन्याची उभारणी करून फ्रेंचांच्या त्रासांतून आपल्याला मुक्त करण्याचें ठरविलें. ही बातमी कळतांच नेपोलियन त्यांच्यावर चाल करून गेला व वॅग्राम येथें त्यांचा पराभव करून त्यांना पुन्हां अपमानकारक तह करावयास लावलें (१८०९). त्याच वेळीं रशियाचा झार अलेक्झांडर मोठ्या पेंचांत पडला होता. टिलसिटच्या तहानें व्यापारी कोंडमाऱ्याचें धोरण त्यानें स्वीकारलें होतें; परंतु हळूहळू त्याचें वैयर्थ्य त्याला पटूं लागलें. त्याचा स्वतःचाच कोंडमारा होऊं लागल्यानें अखेरीस त्यानें ब्रिटनशीं व्यापार करण्याचें ठरवून कोंडमाऱ्यांतून त्यानें आपली सोडवणूक करून घेतली. ही बातमी कळतांच नेपोलियनास राग आला व त्यानें रशियाला शिक्षा करण्याकरितां त्याच्यावर चाल करण्याचें ठरविलें. सहा लक्ष सैनिक बरोबर घेऊन नेपोलियन रशियाच्या मोहिमेवर निघाला (१८१२). बोरोडिनो व मास्को येथील लढायांत रशियन सैन्याचा त्यानें पराभव केला. नेपोलियन मास्कोंत राहणार असें कळतांच रशियनांनीं शहर सोडण्यापूर्वीच त्या शहराला आग लावून दिली. त्या शहरांत नेपोलियन येऊन पाहतो तों तें शहर आगीच्या सपाट्यांत सांपडून बेचिराख झालेलें! त्यामुळें त्याच्या सैन्यास अन्न व आश्रयाचें स्थानही मिळेना! कडक थंडी पडूं लागली. अशा स्थितींत रशियाशीं तह करावा व मग परतावें असें नेपोलियननें ठरविलें; परंतु रशियन लोक तहास कबूल होईनात. तेव्हां सर्व फ्रेंच लोक परतले. अन्नाची टंचाई, उपासमार व त्यानंतर उद्भवलेली रोगराई यामुळें अगोदरच सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सैनिक त्रासलेले. त्यांतच भर हिंवाळ्यांतील कडक थंडीपासून निवारण करण्याकरितां त्यांस कपडेही मिळेनात. अशा स्थितींत नेपोलियन मोठ्या पेंचांत सांपडला होता. माणसें व घोडेही पटापट मरूं लागले व तो कसाबसा मास्कोंतून परत फिरला. त्याची मोठी फजिती झाली. सहा लक्षांपैकीं तीन लक्ष लोक मास्कोच्या हल्ल्यांत मेले असें म्हणतात! फ्रेंच मागें हटले हें कळ-तांच रशियनांना जोर चढला व त्यांनीं फ्रेंचांवर भुरटे हल्ले करून त्यांना जास्तच सतावून सोडलें. त्यामुळें व इतर कारणांनींही नेपोलियनच्या सैन्यां-तील अनेक लोक प्राणास मुकले व केवळ साठ-सत्तर हजार लोक त्याच्या-जवळ शिल्लक राहिले. आपल्या सैनिकांचे झालेले हाल पाहून नेपोलियनचा जीव मात्र तिळतिळ तुटे; पण त्याचा इलाजच नव्हता!

१८. नेपोलियनचा राज्यत्याग (१८१४):—नेपोलियनच्या अशा आपद्ग्रस्त स्थितीचा फायदा घेण्याचें त्याच्या शत्रूंनीं ठरविलें. त्याचा सूड उगवावा व त्याची कायमची हकालपट्टी करावी म्हणून सन १८१३ मध्यें इंग्लंड, ऑस्ट्रिया, प्रशिया व रशिया यांनीं चौथा मित्रसंघ स्थापन केला. त्यामुळें नेपोलियनला त्यांच्यावर हल्ला करणें भागच होतें. युद्धाला सुरुवात झाली. नेपोलियननें फ्रान्समध्यें सक्तीनें लष्करभरती सुरू केली. त्याचे उत्त-मोत्तम सैनिक रशियाच्या मोहिमेंत कामास आल्यामुळें त्याच्या या वेळच्या लष्करांत अननुभवी व तरण्याबांड लोकांचाच भरणा फार झाला. परंतु त्यानें धीर सोडला नाहीं. त्या तशा लष्करासह त्यानें प्रशियावर हल्ला करून प्रशिया व ऑस्ट्रिया यांच्या जोड सैन्याचा लटझेन, बटझेन व ड्रेसडेन येथील लढायांत पराभव केला. मात्र पुढें सन १८१३ मध्यें लेपझिगच्या लढाईत नेपोलियनचा पराभव होऊन त्याला पळ काढावा लागला. विजयी सैन्य त्याच्या मागें लागलें व त्याचा पाठलाग करीत तें फ्रान्सच्या सरहद्दीपर्यंत गेलें. तिकडे वेलिंग्टनच्या नेतृत्वाखालीं स्पेनमधून फ्रेंच सरहद्दीपर्यंत ब्रिटिश सैन्य येऊन ठेपलेलें होतेंच. शेवटीं सर्व परिस्थितीचा विचार करून नेपोलियननें राज्यत्याग करण्याचें ठरविलें. त्याचे सर्व बेत फसले, चाल करून येणाऱ्या शत्रूसैन्यास तोंड देण्याचें सामर्थ्य त्याच्या लष्करांत उरलेलें नव्हतें व पाठलाग करणारें सैन्य पॅरिसजवळ येऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेपलेलें! अशा स्थितींत राज्यत्याग करण्याशिवाय दुसरा इलाजच त्याला सुचला नाहीं. तेव्हां ता. १ एप्रिल १८१४ रोजीं त्यानें राज्यत्याग केला व पॅरिस येथें संयुक्तांशीं तह करून फ्रान्स व इटली येथील राज्यावरील त्यानें सर्व हक्क सोडण्याचें व एल्बाचें राज्य व दरसाल एकशें ऐंशीं पौंड घेण्याचें कबूल केलें. त्याच्या राणीला मात्र इटलींतील पार्माची जहागीर देण्यांत आली. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर असें सोळाव्या लुईच्या मुलाला 'सतरावा लुई' त्याचे सरदार संबोधीत; पण त्याला फ्रान्सची गादी न मिळतांच मृत्यु आला. त्यामुळें सोळाव्या लुईच्या भावास अठरावा लुई असें संबोधण्यांत येऊन त्याला नेपोलियननंतर फ्रान्सच्या गादीवर बसविण्यांत आलें. त्याच्याशींच सन १८१४ सालीं पॅरिसचा पहिला तह झाला. त्या तहानें अनेक गोष्टी ठरविल्या. व युरोपची पुनर्व्यवस्था करण्याकरितां व्हिएन्ना येथें सर्व राष्ट्रांची एक परिषद भरली.

१९. एल्बाहून पॅरिसला आगमन (१८१५):—ठरल्याप्रमाणें नेपोलियन ता. १४ एप्रिल, १८१४ रोजीं एल्बास निघाला. तेथें त्याचें उत्तमप्रकारें स्वागत झालें. नेपोलियन या बेटावर फक्त दहाच महिने राहिला. तेवढ्या वेळांत त्या बेटाचें त्यानें सर्व स्वरूप पालटून टाकलें; परंतु त्याचें मन सर्व प्रकारच्या रमणीय गोष्टींनीं रमविण्याचा प्रयत्न करूनही रमत नसे. त्याचें सर्व लक्ष फ्रान्सकडे व युरोपांतील घडामोडींकडे! शेवटीं युक्तिप्रयुक्तीनें एल्बाहून स्वतःची सुटका करून घेण्याचे विचार त्याच्या मनांत एकसारखे येऊं लागले. त्याच वेळीं युरोपांत निरनिराळ्या मुत्सद्यांची व्हिएन्नास कॉंग्रेस चालू होती. त्यांच्यांत बरीच धुसफूस चालू होती. तेव्हां या संधीचा फायदा घेऊन, 'आपलें नशीब पुन्हां उदयास येतें कीं नाहीं तें पहावें; कैदी होऊन मरून जाण्यापेक्षां, आपल्या आवडत्या लोकांत व देशांत जाऊन मरणेंच श्रेयस्कर,' असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें. त्या बेटांत जहाजेंही फार कमी होतीं. परंतु त्यांचाच उपयोग करून ता. २५ फेब्रुवारी १८१५ रोजीं त्यानें एल्बा बेट सोडलें व १ मार्चला तो फ्रेंच किनाऱ्यास केवळ ६७३ लोकांसह पोंचला; तेथून तो पॅरिसकडे चालू लागला. नेपोलियन फ्रान्समध्यें आला ही बातमी ता. ५ ला पॅरिसला पोंचली. ताबडतोब त्याच्यावर सैन्याची रवा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नगी करण्यांत आली. त्यावेळीं ' नेपोलियन बादशाह तुमच्याकडे येतो आहे. झाडा त्याच्यावर गोळ्या व जाब देण्यास तयार असा ' असें नेपोलियनचे लोक या पॅरिसहून आलेल्या सैन्यास म्हणत. त्यामुळें ' झाडा गोळ्या ' असा आपल्या सेनापतीचा हुकूम ऐकूनही लष्करांतील लोकांच्या हातून तसें होत नसे. खुद्द नेपोलियनही ' शिपाई लोकहो, मला ओळखा,' असें सर्वांस म्हणे. ताबडतोब नेपोलियनच्या नांवाचा जयघोष होई व सर्व सैन्य त्याला मिळे. जे जे सरदार त्याला कैद करण्याचा अगर त्याचें डोकें मारण्याचा विडा उचलून त्याच्यावर चाल करून येत, त्यांचें सैन्य नेपोलियनला मिळे व त्यामुळें ते फजीत होत! अशा तऱ्हेनें एकही गोळी न झाडतां बावीस दिवसांनीं नेपोलियन पॅरिसला पोंचला आणि त्यामुळें युरोपियन मुत्सद्यांचें कारस्थान फिसकटलें.

२०. वॉटर्लूची लढाई (१८१५):—नेपोलियन एल्बाहून आला हें कळतांच अठराव्या लुईनें राज्यत्याग केला व तो पळून गेला. व्हिएन्नालाही ती बातमी कळली; तेव्हां ज्यानें त्यानें आपलीं सैन्यें सज्ज केलीं. वेलिंग्टनकडे सर्व संयुक्त सैन्याचें आधिपत्य देण्यांत आलें व सर्वांनीं नेपोलियनला चिरडून टाकण्याचा बेत केला. प्रशियाचा सेनापति ब्लूशर हाही वेलिंग्टनच्या मदतीस येण्यास निघाला. आपल्यावर संयुक्तांचा हल्ला होणार हें नेपोलियन ओळखून होता. तेव्हां प्रथमतः संयुक्तांच्या सैन्यास वेगवेगळें गांठून त्यांचा पराभव करण्याचें त्यानें ठरविलें. बेल्जमच्या बाजूस वेलिंग्टन होता.त्याच्याकडेच त्यानें प्रथम रोख वळविला. वेलिंग्टनजवळ सुमारें सत्तर हजार फौज होती व नेपोलियनजवळ सुमारें पाऊण लक्ष लोक होते. दोन्ही सैन्यांची गांठ वॉटर्लूजवळ पडली. त्या दिवशीं ब्लूशरचें सैन्य संध्याकाळीं चारपर्यंत वेलिंग्टनला येऊन

वेलिंग्टनचा ड्यूक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळणार होतें; व त्याच्या आंत नेपोलियनला सर्व काम उरकून घ्यावयाचें होतें. त्यांच्या जवळचे सैनिक सर्व जगांत कसलेले व आपल्या सेनापतीवर पूर्ण विश्वास टाकलेले होते. यामुळें त्याला जयाची आशा होती. सकाळींच युद्धाला सुरुवात झाली. मोठें घनघोर युद्ध झालें. जय कोणास मिळणार तें अखेरपर्यंत सांगणें अनिश्चित होतें. वेलिंग्टननें व नेपोलियननें लढण्याची शिकस्त केली, तरी सरशी कोणाचीच होईना. वेलिंग्टनचें सारें लक्ष ब्लूशर केव्हां येतो, त्याकडे लागलेलें होतें. अखेर संध्याकाळीं ब्लूशर आला. त्यामुळें



वॉटर्लूची लढाई.

वेलिंग्टनचा जीव खालीं पडला. एका बाजूनें ब्रिटिश सैन्य व दुसऱ्या बाजूनें जर्मन सैन्य त्याच्यावर चालून गेलें. शेवटीं त्यांच्यांमध्यें नेपोलियन सांपडल्यानें त्याचा पुरा मोड झाला (१८१५) व तो पॅरिसकडे पळून गेला ! तेव्हां त्याचा पाठलाग करीत वेलिंग्टन व ब्लूशर हे पॅरिसकडे गेले. पॅरिसला पोंहोंचतांच नेपोलियननें पुन्हां राज्यत्याग केला. तावडतोब एखादें जहाज पकडून अमेरिकेस पळून जाण्याचा त्यानें निश्चय केला व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रॉशफर्ट या बंदरीं तो आला. तेथील बंदरांत सर्वत्र इंग्लिश जहाजें नांगरून पडलेलीं होतीं. तें पाहून त्यांना शरण जाण्याशिवाय मार्ग नाहीं असें नेपोलियनला वाटलें व त्याप्रमाणें तो 'बेलारोफोन' नामक एका इंग्लिश जहाजाच्या मेटलंड नांवाच्या कप्तानाला शरण गेला. ज्या राष्ट्राला त्यानें 'वाणगटांचें राष्ट्र' म्हणून हिणविलें, त्याच राष्ट्राच्या एका प्रतिनिधीला शरण जाऊन, 'तुमचा राजा व तुमच्या देशाचे कायदे यांचा आश्रय घेण्याकरितां मी आलों आहें' असें दीनवाणें म्हणावें लागलें!

२१. सेंट हेलिनास रवानगी व मृत्यु:—अखेर तें जहाज इंग्लंडच्या किनाऱ्यावर आणण्यांत आलें, परंतु नेपोलियनला इंग्लंडच्या जमिनीवर पाऊल टाकण्यासही मनाई करण्यांत आली! त्यानंतर त्याला आफ्रिकेच्या पश्चिमेस असलेल्या सेंट हेलिना या ओसाड बेटांत ठेवण्याचा हुकूम होऊन त्याची तेथें ब्रिटिश पहाऱ्यांत रवानगी करण्यांत आली. तेथूनही पळून येऊन त्यानें युरोपच्या शांततेचा पुन्हां भंग करूं नये असें सर्वांस वाटत असल्यानें नेपोलियनला इतक्या लांब ठेवण्यांत आलें. तेथेंच तो हद्दपारीचे दिवस कंठीत अत्यंत अभिमानानें रहात होता. तो सन १८२१ मध्यें मरण पावला. त्यावेळीं त्याचें शव फ्रान्समध्यें न्यावें असा पुष्कळांनीं आग्रह धरला; परंतु तसें घडलें नाहीं. अखेर एकोणीस वर्षांनीं सन १८४० मध्यें सेंट हेलिनाच्या थडग्यांतून त्याचें प्रेत इंग्लंडच्या संमतीनें उकरण्यांत येऊन एका फ्रेंच बोटींतून तें पॅरिसला आणण्यांत आलें व मोठ्या समारंभानें तें पॅरिसला एका भव्य छत्रीमध्यें पुरण्यांत आलें. मृत्यूसमयीं नेपोलियनचें वय एकावन्न वर्षांचें होतें.

२२. व्हिएन्नाची दुसरी कॉंग्रेस-पॅरिसचा तह:—वॉटर्लूच्या लढाईनंतर व्हिएन्ना येथें सर्व युरोपियन राष्ट्रांची सभा भरली व पॅरिस येथें सन १८१५ मध्यें तह झाला. या वेळींही युरोपांतील निरनिराळे प्रांत मिळविण्याकरितां प्रशिया, रशिया, व ऑस्ट्रिया यांच्यांत लाथाळी लागली होती. या सभेंत फ्रान्सचा प्रतिनिधि टॅलेरा यानें फ्रान्सची बाजू उत्तम रीतीनें सर्वांपुढें मांडून सर्वांमध्यें दिलजमाई घडवून आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्या तहानें खालील गोष्टी ठरविल्या. (१) फ्रान्सच्या गादीवर अठराव्या लुईस बसविण्यांत यावें व त्याच्या राज्यांत आलसेस व लोरेन हे प्रांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सामील करण्यांत यावेत. (२) इंग्लंडकडे सीलोन, गुडहोप, सिंगापूर, ग्वायना, मॉरिशस, माल्टा, त्रिनिदाद, हेलिगोलंड ' टोबॅगो वगैरे ठिकाणें रहावीं. (३) लोंबार्डी व व्हेनिस ऑस्ट्रियाकडे असावीं. (४) इटलीमध्यें निरनिराळीं लहान संस्थानें असावीं. पोपचें स्वतंत्र संस्थान असावें. (५) हॉलंड व बेल्जम हीं राज्यें एकाच राजाकडे असावीं. (६) स्वित्झर्लंडला स्वातंत्र्य देण्यांत यावें व तें एक स्वतंत्र राष्ट्र समजण्यांत यावें. (७) रशियाकडे वॉर्साचा प्रांत व फिनलंड रहावें. (८) प्रशियाला वॉर्सा प्रांतापर्यंतचा पोलंडचा मुलुख, वेस्टफॅलिया, उत्तर सॅक्सनी वगैरे भाग मिळावे. (९) सर्व जर्मनींतील अडतीस संस्थानांमध्यें संयुक्त सरकार स्थापन करण्यांत येऊन (यांत प्रशिया नसावा) त्यांवर ऑस्ट्रियाचें वर्चस्व रहावें. (१०) गुलामगिरी रद्द करण्यांत यावी. इंग्लंडनें नेपोलियनचा पाडाव करण्यांत अतोनात पैसा खर्च केला व अती श्रम घेतले, तरीही या तहानें त्याचा व्हावा तितका फायदा झाला नाहीं. त्यामुळें कॉंग्रेसच्या पुढील कामांत इंग्लंडनें लक्ष घालण्याचें नाकारलें. अर्थात त्यामुळें युरोपियन राजकारणांतील इंग्लंडचें वजन हळूहळू कमी कमी होऊं लागलें. या तहानें राष्ट्रीयत्वाच्या तत्त्वांचा कोंडमारा करण्याचा प्रयत्न करूनही तसें झालें नाहीं व पुढील शतकांत राष्ट्रीयत्वाच्या भावनेनें युरोप पछाडलें गेल्यानें अनेक युरोपियन राष्ट्रांत लोकशाही निर्माण झाली.

२३. फ्रेंच राज्यक्रांतीचे युरोपवर परिणाम :—पॅरिसचा तह करणारे लोक राष्ट्रीयत्वाची लाट थोपवून धरणारे होते व प्रतिगामी धोरणाचा अवलंब करून युरोपांत अनियंत्रित सत्ताच त्यांस रूढ करावयाची होती. स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व या फ्रेंच राज्यक्रांतीमुळें उत्पन्न झालेल्या कल्पना दडपून टाकून त्यांचा फैलाव होऊं द्यावयाचा नाहीं असें त्यांचें धोरण होतें. मात्र तें यशस्वी झालें नाहीं हा भाग निराळा ! कारण एकोणिसाव्या शतकांत अनेक देशांत लोकशाही स्थापन होऊं लागली व अनियंत्रित राजसत्तेस आळा बसूं लागला. खुद्द इंग्लंडमध्येंही पार्लमेंटची सुधारणा करण्याकरितां—अर्थात लोकशाहीच्या फैलावाकरितां—निरनिराळ्या वेळीं कायदे पास करण्यांत आले. त्याचप्रमाणें एकराष्ट्रीयत्वाच्या जाणीवेनेंही राष्ट्रें जागृत होऊं लागलीं. एक-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेच्या बुडाशीं, एक भाषा, एक देश, एक धर्म, एक संस्कृति वगैरे गोष्टी येतात व त्यांच्या अभिमानानें राष्ट्रांराष्ट्रांतील लोक एकत्र येऊन परकीय सत्ता अगर राजसत्ता झुगारून देऊं लागतात. जर्मनी, इटली, ग्रीस वगैरे देशांतील लोकांचे, या दृष्टीनें झालेले प्रयत्न यशस्वी ठरले. तसेंच समतेच्या तत्त्वानेंही आपला प्रभाव गाजविला. इतके दिवस उच्च-नीच भाव निरनिराळ्या समाजांत असे. गुलामगिरी चालूच होती. हा सरदार, तो दरकदार, हा शेतकरी तो शेतमजूर, हा कारखानदार तो मजूर, असे सामाजिक विषमता दाखविणारे अनेक प्रकार त्यावेळीं युरोपांतील सर्व देशांत रूढ होते. हळूहळू ही विषमता नष्ट होऊं लागली, गुलामगिरींतूनही गुलाम सुटूं लागून ते स्वातंत्र्य उपभोगूं लागले व देशांत आपलेपणा–व तोही समतेच्या तत्त्वावर–रूढ झाल्यानें देशांची भरभराट होऊं लागली. अशा तऱ्हेनें फ्रेंच राज्यक्रांतीचा युरोपला एकंदरीनें फायदाच मिळाला असें म्हणणें रास्त होईल. एरवीं लोकशाहीचा फैलाव झाला नसता, राष्ट्रभक्तीनें प्रेरित होऊन लोकांनीं आपल्याला परकीयांच्या सत्तेंतून मोकळें करून घेतलें नसतें व समाजांतील विषमता नष्ट होऊन समाज समान भूमिकेवर आला नसता.

२४. पवित्रसंघाची स्थापना (१८१५):—व्हिएन्नाच्या कॉंग्रेसमध्यें अनियंत्रित राजसत्तेचा पुरस्कर्ता व ऑस्ट्रियाचा मुख्य प्रधान मेटर्निक हा अग्रेसर होता. जर्मनीतर्फे हंबोल्ट व इंग्लंडतर्फे लॉर्ड कॅसलरे व वेलिंग्टनचा ड्यूक हे प्रतिनिधि होते. त्याशिवाय ऑस्ट्रिया, प्रशिया व रशिया यांचे बादशाह होतेच. या सर्वांस युद्धाचा वीट आलेला होता; व यापुढें युरोपांत कायमची शांतता टिकली पाहिजे असें त्यांस वाटत होतें. ही शांतता रहावयाची असेल तर क्रांतीचा दरवाजा सर्वत्र अजीबात बंद केला पाहिजे, व इतकें करूनही ती झालीच तर तिचा तावडतोब वीमोड करणें जरूर आहे असें मेटर्निक वगैरेंचें म्हणणें पडलें. परंतु ' या सर्वांचें मूळ अधार्मिकपणांत असल्यानें तेंच काढून टाकण्याकरितां सर्वांनीं एकत्र यावें व ख्रिस्ती धर्मतत्त्वांप्रमाणें वागून युरोपांत शांतता राखण्याचा प्रयत्न करावा ' असें रशियाचा झार अलेक्झांडर यानें सुचविलें. तें सर्व बादशहांस पसंत पडलें व प्रशिया, ऑस्ट्रिया व रशिया यांनीं एक संघ स्थापन केला. धर्मतत्त्वांवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याची उभारणी झाल्यानें त्याला ' पवित्रसंघ ' असें म्हणतात. खरें पाहतां हा संघ राजसत्ता प्रबळ करून लोकशाहीची व राष्ट्रीयत्वाची गळचेपी करण्याकरितांच स्थापन झाला होता; व संघांतील लोकांनीं त्या बाबतींत एकमेकांस साहाय्य करण्याचेंही कबूल केलें. राज्यक्रांति दडपून टाकून अनियंत्रित राजसत्तेची वाढ करण्याकरितां झटणें हें ख्रिस्ती धर्मतत्त्वांस धरून आहे असें मेटर्निकनें त्यावेळीं सांगितलेंही. पुढें फ्रान्स व स्पेन या संघांत सामील झाले; मात्र इंग्लंडतर्फे लॉर्ड कॅसलरेनें त्या बाबतींत स्वच्छ नकार दिला. त्यामुळें इंग्लंड एकाकी राहिला.

अभ्यास

१. नेपोलियनचें चरित्र थोडक्यांत सांगा. त्याचा पराभव कां झाला ?

२. द्वीपकल्पांतील युद्धाचीं कारणें व परिणाम सांगा.

३. ' इंग्लंडचा व्यापारी-कोंडमारा करण्याचें नेपोलियनचें धोरण त्याच्या नाशास कारणीभूत झालें. ' या म्हणण्याचें खंडन अथवा मंडन कारणांसह करा.

४. नेपोलियनच्या खालील मोहिमा अयशस्वी कां झाल्या ? (१) रशियावरील मोहीम (२) स्पेनशीं युद्ध.

५. युद्धमंत्रि या नात्यानें धाकट्या पिटची कामगिरी वर्णा. युद्धमंत्रि या नात्यानें त्याची योग्यता सांगा.

६. खालील लढायांचें महत्त्व सांगा :—

(१) होहेनलिंडन, (२) ऑस्टरलिट्झ, (३) ट्रफाल्गर (४) वॉटर्लू.

७. टिपणें करा :—टिलसिटचा तह, अमीन्सचा तह, पॅरिसचा तह, बर्लिनचें फर्मान, कौन्सिलांतील फर्मानें, नाईलची लढाई, पवित्रसंघ.

८. फ्रेंच राज्यक्रांतीमुळें कोणतीं तत्त्वें निर्माण झालीं ? नेपोलियननें त्यांचा फैलाव केला कां ? फ्रेंच राज्यक्रांतीचा युरोपवर काय परिणाम झाला ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उतारे

१. ट्रफाल्गरची लढाई–१८०५

ता. १९ ऑक्टोबर, १८०५ रोजीं उपदर्यासारंग लॉर्ड नेल्सन यांस कळविण्यांत आलें कीं फ्रान्स व स्पेन यांचीं संयुक्त जहाजें केडीझच्या रोखानें जात आहेत. ताबडतोब त्यांनीं आमच्या तेवीस जहाजांची मांडणी करण्यास सुरवात केली. सोमवार, ता. २१ रोजीं ट्रफाल्गारजवळ आम्हांस शत्रूंचीं कांहीं जहाजें दिसलीं. तेव्हां लॉर्ड नेल्सन यांनीं आपल्या जहाजांच्या दोन रांगा केल्या. शत्रूंच्या जहाजांची संख्या तेहतीस असून (स्पेनचीं १५ व फ्रान्सचीं १८) दर्यासारंग व्हिलेन्यू त्यांचा मुख्य होता. स्पॅनिश जहाजांचा दर्यासारंग ग्रॅव्हीना होता. आमच्या हालचालींची बातमी कळतांच आमच्या शत्रूंनीं आपल्या जहाजांची अकल्पित व अतर्कित मांडणी केली. बरोबर बारा वाजतां युद्धास सुरवात झाली व आमच्या बिनीच्या जहाजांनीं शत्रूच्या जहाजांवर जोराचा हल्ला केला व त्यांची फळी फोडून तीं आंत घुसलीं. शत्रूंनेंही आमच्या हल्ल्याला नेटानें विरोध केला. त्यांचा हल्ला अत्यंत निकराचा होता तरी अखेरीस परमेश्वरकृपेनें आम्हांस अपूर्व यश मिळालें. तीन वाजण्याच्या सुमारास शत्रूच्या आरमाराचा पूर्णपणें विध्वंस होऊन दर्यासारंग ग्रॅव्हीना केडीझकडे पळून गेला. मात्र शत्रूचीं एकोणीस जहाजें व फ्रेंच दर्यासारंग व्हिलेन्यू व इतर दोन आरमारी अधिकारी आमच्या हातीं सांपडले. (याच लढाईंत दर्यासारंग लॉर्ड नेल्सन शत्रूची गोळी लागून मरण पावला.)

प्रश्न :— १. इंग्लिश व फ्रेंच यांच्या दर्यासारंगांचीं नांवें सांगा. परस्परांचीं जहाजें किती होतीं ?

२. या लढाईंत फ्रेंचांचा तोटा काय झाला ? इंग्रजांचें नुकसान काय झालें ?

२. नेपोलियनबद्दल इंग्लंडमधील लोकमत–१८१५

ज्या नराधमानें आजवर सर्व युरोप खंडाला सतावून-भंडावून सोडलें व त्यांतील लोकांवर नाना प्रकारचे जुलूम केले त्या दुरात्म्याला कैद करण्यांत आलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही बातमी वाचून आमच्या अनेक शंकेखोर वाचकांचें समाधान होईल अशी आम्हांस खात्री वाटते. आपल्या आंगच्या स्वाभाविक आसुरीपणाची व क्रौर्याची कमालीच्या लुच्चेगिरीशीं सांगड घालण्यांत साधारण अडाणी व अशिक्षितही अत्यंत कुशल असतात. या पुरुषाच्या निर्दयपणाचीं कृत्यें युरोपांतील सर्व देशांत रक्ताच्या लालभडक अक्षरांनीं लिहिलीं जातील; एवढेंच नव्हे तर आफ्रिका व आशिया या खंडांतील ज्या ज्या देशांच्या जमिनीवर त्यानें पाऊल ठेवलें तेथेंही तसेंच होईल यांत शंका नाहीं. त्या नीचाला पकडल्याची हकीकत फ्रान्स व इंग्लंड या देशांत सरकारीरीत्या प्रसिद्ध झाली असतांही अत्यंत हीन उपायांचा अवलंब करून (एल्बाहून) पळून जाण्यास त्याचें मन यत्किंचितही कचरलें नाहीं. त्यावरून त्याला सध्यां जी शिक्षा झाली ती त्याच्या हीन व दुष्ट कृत्यांस योग्य व साजेशीच आहे असें सर्वांस वाटल्याशिवाय कसें राहील ?'

—लंडन टाइम्सवरून

प्रश्न :—१. नेपोलियनबद्दल इंग्लिशांचें मत काय होतें ?
२. तें तसें होण्याचें कारण काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२६. तिसऱ्या जॉर्जची अखेरी

१. दोन प्रधानमंडळें :—ग्रेनव्हिल व फॉक्स यांनीं सन १८०७ मध्यें राजीनामा दिल्यानंतर लॉर्ड पोर्टलंड हा मुख्य प्रधान झाला. त्याच्या प्रधानमंडळांत जॉर्ज कॅनिंग, लॉर्ड कॅसलरे वगैरे मुत्सद्दी होते. या प्रधानमंडळानें युद्ध जोरानें चालविलें व त्यांच्या प्रयत्नांस यश मिळून द्वीपकल्पांतील युद्धांत इंग्लंडला चांगलेंच यश मिळूं लागलें. परंतु त्या प्रधानमंडळांतील लोकांत पुढें तंटे होऊं लागले. पुढें सन १८०९ मध्यें ऑस्ट्रियाला मदत करण्याकरितां फ्रेंचांचें लक्ष हॉलंडमध्यें गुंतवून ठेवावें या हेतूनें शेल्ट नदीच्या मुखाशीं असलेल्या वॉलचेरन नामक बेटावर लष्कर पाठविण्यांत आलें. त्याची योग्य ती काळजी घेतली गेली नाहीं व तेथील हवेमुळें व तापाच्या सांथीमुळें लष्करांतील अनेक लोक मृत्युमुखीं पडले. त्यामुळें व इतर कारणांमुळें प्रधानमंडळांतील तंटे विकोपास गेले व मंत्रिमंडळांत फेरबदल झाला. लॉर्ड पोर्टलंडनें सन १८०९ मध्यें राजीनामा दिल्यानें पर्सिव्हल मुख्य प्रधान झाला. त्याच्या प्रधानमंडळांत लॉर्ड वेल्स्ली, लॉर्ड लिव्हरपूल, सर रॉबर्ट पील, लॉर्ड पामर्स्टन वगैरे मुत्सद्दी होते. सन १८१० मध्यें तिसरा जॉर्ज पुरता व कायमचा वेडा झाला. यापूर्वी त्याला वेडाचे झटके येत; परंतु त्यांतून तो बरा होई. या वेळीं तसें झालें नाहीं. त्यामुळें राजपालक नेमून त्याच्याकडे राज्यकारभार सोंपविणें जरूर झालें. शेवटीं प्रधानमंडळानें पार्लमेंटकडून 'रीजन्सी बिल' पास करून घेऊन राजपुत्र जॉर्ज याला राजपालक नेमलें. अत्यंत खर्चिक व वाईट चारित्र्य यामुळें तो लोकांस आवडत नसे.

२. लडाइटांचे दंगे (१८११):—युरोपांतील सर्व देश नेपोलियनशीं लढण्यांत गुंतलेले असल्यामुळें त्यांच्यामधील सर्व उद्योगधंदे जवळ जवळ बंदच पडले होते. तशांतच व्यापारी-कोंडमाऱ्याचें धोरण अमलांत असल्यानें त्यांचा व्यापारही चांगला चालत नव्हता. अर्थात् या परिस्थितीचा इंग्लं-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डला चांगलाच फायदा झाला. इंग्लंडांत औद्योगिक क्रांति होऊन कारखान्यांचें युग सुरू झालें होतें व आरमारी वर्चस्वामुळें इंग्लंडचा व्यापारही चांगला चालणें शक्य होतें. अर्थात् इंग्लंडच्या कारखान्यांना भरपूर काम मिळूं लागलें. या कारखान्यांना मजूर लागत, परंतु ते थोडे. त्यामुळें इतके दिवस घरगुती धंद्यांत असलेले लोक एकदम बेकार बनले. कारखान्यांमुळें त्यांचे धंदे बसले, जिन्नसा महाग झाल्या व त्यांना कामही मिळेना. यामुळें सर्वांच्या डोळ्यांत कारखाने खुपत! तेव्हां कारखाने नाहींसे केले तर आपल्याला आपले पूर्वीचे धंदे करून पोट भरतां येईल अशी त्यांना कल्पना सुचली व त्याप्रमाणें सन १८११ मध्यें नॉटिंगहॅम परगण्यांतील लोकांनीं प्रथम कारखान्यांवर हल्ला करण्यास सुरुवात केली. हळूहळू दंग्याची ही सांथ डार्बी, लेस्टर, लँकेस्टर, यॉर्क वगैरे परगण्यांत पसरली व दंगेखोरांनीं कारखान्यांवर हल्ले करून यांत्रिक साधनांची मोड-तोड व नासधूस चालविली. सुरुवातीस 'नेडलड' या नांवाच्या एका मूर्ख माथेफिरूनें यंत्रावर प्रथम हल्ला केला व त्यामुळें यंत्रनाश करणाऱ्या त्याच्या अनुयायी दंगेखोरांस 'लडाइट' असें नांव मिळालें. पुढें सन १८१२ मध्यें पार्लमेंटनें कायदा करून यंत्राचा नाश करणें गुन्हा समजण्यांत येईल असें जाहीर केलें. त्यामुळें पुढें ही चळवळ हळूहळू बंद पडली.

३. अमेरिकेशीं युद्ध (१८१२–१८१४) :— सन १८०७ मध्यें पार्लमेंटनें कौन्सिलांतील फर्मानें सोडून नेपोलियनच्या बर्लिनच्या फर्मानास चोख उत्तर दिलें. परंतु त्या दोन्ही फर्मानांमुळें अमेरिकेची व्यापारीदृष्टीनें बरीच कुचंबणा होऊं लागली, व त्यामुळें ते लोक चिडले. तेव्हां अमेरिकेचें कोणतेंही जहाज इतर देशांत जातां कामा नये असा अमेरिकेनें कायदा केला व थोड्याच दिवसांत त्यांत दुरुस्ती करून फक्त इंग्लंड व फ्रान्स या देशांच्या बंदरांतच अमेरिकन जहाजें जातां कामा नयेत असें ठरविलें. यामुळें इंग्लंडलाही राग आला. या धुसफुशी चालू असतांच जॉर्ज कॅनिंग यानें द्वेषमूलक भाषणें करून अमेरिकनांस चीड आणली. या सर्व गोष्टींमुळें युद्धास सुरुवात होऊन अमेरिकेनें कानडा प्रांतावर हल्ला केला. त्यांत इंग्रजांचा पराभव झाला. तरी दुसऱ्या एका लष्करी विभागानें अमेरिकेच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजधानीवर—वॉशिंग्टन शहरावर—हल्ला करून तें शहर काबीज केलें. मात्र न्यू ऑर्लिन्स हें शहर इंग्रजांस घेतां आलें नाहीं. हळूहळू हें युद्ध सुमारें दोन वर्षें चिघळत राहून सन १८१४ मध्यें झालेल्या घेंट येथील तहानें तें समाप्त झालें. परंतु तह झाला तरी ज्या कारणांकरितां हें युद्ध सुरू झालें त्याचें निराकरण मुळींच झालें नाहीं. खरें पाहतां या युद्धाकडे इंग्लंडचें लक्षच नव्हतें. नेपोलियनकडे त्याचें सर्व लक्ष असल्यानें त्यानें अमेरिकन युद्धाकडे दुर्लक्ष केलें. त्यामुळें इंग्लंडला या युद्धाची बरीच झळ लागली. अमेरिकन युद्ध सुरू झालें त्याच सुमारास वेलिंगहॅम नामक एका माथेफिरूनें पर्सिव्हलचा खून केला. त्यामुळें लॉर्ड लिव्हरपूल मुख्य प्रधान झाला (१८१२). तो टोरी पक्षाचा होता. त्याच्या प्रधानमंडळांत लॉर्ड कॅसलरे हा परराष्ट्रीय प्रधान असून लॉर्ड पामर्स्टन युद्धमंत्रि व सिडमथ गृहमंत्रि होता. याच प्रधानमंडळानें वॉटर्लूच्या लढाईनंतर स्थापन झालेल्या पवित्र संघांत सामील होण्याचें नाकारलें. लॉर्ड कॅसलरे हा या प्रधानमंडळांत प्रबल होता. या प्रधानमंडळानेंच फ्रान्सशीं चाललेलें युद्ध संपवून पॅरिसचा तह घडवून आणला (१८१५); व त्यानंतर देशांत जें अशांततेचें वातावरण उत्पन्न झालें त्याकडे त्याला लक्ष द्यावें लागलें.

४. देशांतील असंतोष-कारणें :—(१) राष्ट्रीय कर्ज :—फ्रान्सशीं चाललेलें युद्ध अदमासाबाहेर लांबलें. अर्थात् त्यामुळें इंग्लंडचें राष्ट्रीय कर्ज एकसारखें फुगतच गेलें; व तें १३,१०,००,००० पौंड झालें. युद्धकाळीं राष्ट्रानें कर्ज काढल्यानें राष्ट्रीय कर्जावरील व्याजाचा दरही भरमसाट होता. तेव्हां राष्ट्राचें उत्पन्न वाढवून कर्जाची फेड करणें अत्यंत आवश्यक असतांही त्यावेळचा फडणीस व्हॅन्सिटार्ट यानें उत्पन्नावरील कर रद्द केला. हा कर प्रथमतः धाकट्या पिटनें सन १७९८ मध्यें तात्पुरता कर म्हणून लादला होता व युद्ध संपल्यावर तो रद्द करण्याचें आश्वासन दिलें होतें. अर्थात् युद्ध संपल्यानंतर तो कर रद्द करणें जरूरीचें आहे असें वाटल्यावरूनच व्हॅन्सिटार्टनें तो रद्द केला (१८१६). तरी वाढत्या खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां त्याला अनेक वस्तूंवर अप्रत्यक्ष कर बसवावे लागले; आणि हे सर्व कर गरीब लोकांच्या खिशांतून जाऊं लागल्यानें त्यांना ते जाणवूं लागले. कारण, कर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाढल्याबरोबर त्या त्या वस्तूंच्या किंमतीही वाढल्या व त्यामुळें असलेल्या असंतोषांत अधिकच भर पडली (२) **व्यापाराची मंदी**:—अशांतच

स्टुअर्ट काळा पासून चालू काळा पर्यंत इंग्लंडच्या लोकसंख्येची वाढ.



देशाचा व्यापारही मंदावूं लागला होता. युद्ध संपल्याबरोबर युरोपांतील देशांतील कारखाने व उद्योगधंदे चालू झाले व त्यामुळें त्या देशांतून इंग्लिश मालाला फारशी मागणी येईनाशी झाली. अर्थात् युद्धकाळांत इंग्लंडमधील उद्योगधंदे जितक्या जोमानें चालत तितक्या जोमानें तहानंतर ते चालेनात. त्यामुळें अनेक कामगार बेकार झाले. (३) **चलनी नोटांचा सुकाळ**:—तशांतच इंग्लंडच्या बँकेनें रोखीचा व्यवहार बंद केल्यानें व्यापारावर फार परिणाम होऊं लागला. कारण सन १७९७ पासूनच इंग्लंडच्या बँकेनें रोखीचा व्यवहार बंद करून पिटच्या सांगण्याप्रमाणें चलनी नोटा काढल्या व रोखीच्या ऐवजीं त्या देण्यास सुरुवात केली होती. परंतु त्यावेळीं त्यांची किंमत फारशी घटलेली नव्हती. पुढें दरवर्षी एकसारख्या चलनी नोटा निघूं लागल्यानें व देशांत त्यांचा सुकाळ होऊं लागल्यानें त्यांची दर्शनी किंमत उतरूं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागली. युद्ध थांबलें तरीही बँकेनें, वचन दिल्याप्रमाणें, रोखीचा व्यवहार सुरू केला नाहीं. अर्थात् पांच पौंडांच्या नोटीची किंमत घसरत घसरत सुमारें साडेतीन पौंडांपर्यंत गेली व ती पुढें थोडी वाढून पुन्हां घसरूं लागली. त्यामुळें व्यापारावरही अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. जिन्नसांच्या किंमती वाढूं लागल्या व गरीबांचे हाल होऊं लागले. शेवटीं सन १८१९ मध्यें सर रॉबर्ट पीलच्या सूचनेनुसार बँकेनें रोखीचा व्यवहार पुन्हां सुरू केला व त्यामुळें व्यापारास थोडी स्थिरता प्राप्त झाली. (४) **धान्याचा कायदा:—** वरीलप्रमाणेंच शेतीच्या बाबतींतही स्थिति होती. युद्ध चालू होतें त्या वेळीं इंग्लंड-मधील शेतीची स्थिति चांगली होती. परदेशांतून त्या वेळीं धान्य येत नसल्यानें देशांतल्या देशांतच धान्य पिकविलें जाई. त्यामुळें पडिक व माळरान जमिनीही लागवडीस उपयोगांत येऊं लागल्या. धान्याला भावही त्या वेळीं चांगला येई. परंतु युद्ध थांबल्याबरोबर बाहेरचें धान्य देशांत येऊं लागलें व त्यामुळें देशांतील धान्याचा भाव एका क्वार्टरला शंभर शिलिंगांऐवजीं साठपर्यंत घटल्यानें शेतकऱ्यांचें नुकसान होऊं लागलें. एवढेंच नव्हे तर धान्याची मागणी कमी झाल्यानें शेतमजूरांनाही ते कामावरून दूर करूं लागले. अर्थात् त्यांच्यांतही बेकारी माजूं लागली. ही स्थिति सुधारण्याच्या हेतूनें पार्लमेंटनें सन १८१५ सालीं 'धान्याचा कायदा' पास केला, व धान्याचा भाव एका क्वार्टरला ऐंशी शिलिंग होईतों परकीय धान्य इंग्लंडांत येतां कामा नये असें ठरविलें. यामुळें धान्याचा भाव कायम राहून शेतकऱ्यांचें नुकसान होणार नाहीं असें वाटलें होतें. दुष्काळाच्या वेळीं धान्याच्या किंमती चढल्या तर परकीय धान्य इंग्लंडांत येईल व सुबत्तेमुळें तो भाव उतरला तर परकीय धान्य इंग्लंडांत येण्याचें आपोआप टळून शेतकऱ्यांचें नुकसान होणार नाहीं असें सरकारला वाटत होतें. यामुळें इंग्लिश गव्हाचा भाव दर क्वार्टरला पंच्याहत्तर ते पंच्याऐशी शिलिंगांपर्यंत केव्हांही राहूं शकेल अशी अपेक्षा होती. ही अपेक्षा कधींच खरी ठरली नाही. कारण हा कायदा पास झाल्यानें शेतकऱ्यांचें अतोनात नुकसान झालें; अनेकांनीं शेतीचा धंदाही सोडून दिला. यामुळें धान्याचा भाव तेजींतच राहून गरिबांचे, भाकरीपायीं, हाल होऊं लागले. वाढती लोकसंख्या व बेकारी लक्षांत न घेतांच हा कायदा पास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्यानें शेतकऱ्यांचें नुकसान व गरिबांचे हाल झाले. कारण अपेक्षेप्रमाणें धान्याचा दर राहिला नाहीं. सन १८१७ मध्यें तो ११८ शिलिंग झाला व १८२२ मध्यें तो ४५ शिलिंगांपर्यंत उतरला आणि यामुळेंच धान्याच्या कायद्यास जो तो नाक मुरडूं लागला. (५) तद्नंतर अनेक कारखान्यांतील मजूर बेकार झाले होते हें मागें सांगितलेंच आहे परंतु जे मजूर कारखान्यांतून काम करीत त्यांची स्थितीही अत्यंत वाईट होती. जेमतेम संसार भागेल एवढीच त्यांस मजुरी मिळे. अत्यंत गलिच्छ व कोंदट कारखान्यांतून त्यांस काम करावें लागे. यंत्रामुळें एखादा अपघात झाल्यास त्याबद्दल त्यांस कोणत्याही प्रकारचें संरक्षण मिळत नसे व त्यामुळें कारखान्यांतील मजूरही असंतुष्टच असत. (६) युद्ध थांबल्याबरोबर सैन्यांतील व आरमारांतील अनेक लोकांना कायमची रजा देण्यांत आली. सुमारें चार वर्षांत एक लक्षावर सैनिक बेकार झाले. जे लष्करी अधिकारी होते त्यांना कोठेंना कोठें जागा मिळे; परंतु सैनिकांस कोणीच विचारीना. पार्लमेंटही शांततेच्या वेळीं खडी फौज ठेवूं देईना. यामुळें जवळ जवळ सर्व सैनिक व नावाडी बेकार बनले. (७) **मजुरांची हलाखी** :—खेड्यांमध्येंही हलाखीची स्थिति होती. कारखान्यांतून काम मिळेना म्हणून अनेक लोक शेतावर काम मिळेल म्हणून खेड्यांत येऊं लागले. परंतु तेथेंही त्यांस काम मिळेना. शेतीही तेजींत नव्हतीच. त्या वेळीं मजुरीचे दरही अत्यंत कमी झाले होते. इतके कीं मिळणाऱ्या मजुरींत मजुराला पोटाला चिमटा घेऊनही आपल्या पोराबाळांची गुजराण करतां येईना. यामुळें त्यांच्यांतही असंतोष होता. ही स्थिति सुधारण्याकरितां सन १७९५ मध्यें स्पीनहॅमलंड गांवीं एक नवीन पद्धति सुरू करण्यांत आली होती. त्यामुळें ज्यांना अत्यंत कमी मजुरी मिळत असे अशा मजुरांना त्यांच्या कुटुंबाच्या विस्ताराच्या प्रमाणांत धर्मादाय फंडांतून देणग्या देण्यांत येऊं लागल्या. ही पद्धति इतरांनींही अनुसरण्यास सुरुवात केली होती. त्याकरितां शेतकऱ्यांकडून त्यांच्या उत्पन्नापैकीं कांहीं भाग घेण्यांत येई. परंतु यामुळें त्यांचें उत्पन्न घटे व तेही असंतुष्ट होत. (९) **सुधारणांची इष्टता** :—देशांतील हें असंतुष्ट वातावरण दूर करण्याकरितां पार्लमेंटची सुधारणा करणें अत्यंत आवश्यक आहे असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेकांस वाटूं लागलें. पार्लमेंटमध्यें राष्ट्रांतील सर्व लोकांचे प्रतिनिधि नसल्यानें व मतदानाचा अधिकारही सर्वांस, लोकसंख्येच्या प्रमाणांत, न मिळाल्यानेंच असंतोष माजतो असें त्यांस वाटे. लॉर्ड जॉन रसेल, सर फ्रॅन्सिस बर्डेट, विल्यम कॉबेट वगैरे लोकांनीं या बाबतींत पुढाकार घेतला होता. बर्डेट यानें पार्लमेंटची सुधारणा करण्याकरितां सन १८१७ मध्यें पार्लमेंटमध्यें एक बिल मांडलें होतें, परंतु तें नापास झालें. कॉबेटनें आपल्या 'पोलिटिकल रजिस्टर' नांवाच्या मासिकांतून त्या प्रश्नाला जोरानें चालना दिली व दरसाल पार्लमेंटची निवडणूक व्हावी व वयांत आलेल्या सर्वांस मताधिकार मिळावा असें मत प्रदर्शिलें. सन १८१९ मध्यें लॉर्ड जॉन रसेलनें पार्लमेंट सुधारण्याबाबत आणखी एक बिल पार्लमेंटपुढें मांडलें, परंतु तेंही नापास झालें. हे सर्व प्रयत्न फसून पार्लमेंटची सुधारणा मागें पडल्यानें असंतोषांत भरच पडली.

५. असंतोषाला वाचा फुटली :—आशातऱ्हेनें सर्वत्र असंतोष माजत असतां प्रधानमंडळानें दडपशाहीचेंच धोरण स्वीकारलें. त्यांना पार्लमेंटची सुधारणा नको होती. देशाच्या अशा असंतुष्ट स्थितींत ती घडवून आणल्यास इंग्लंडांत राज्यक्रांति झाल्याशिवाय राहणार नाहीं असें प्रधानमंडळास वाटत होतें. अखेरीस बेकारांच्या व इतरांच्या असंतोषाला वाचा फुटून देशांत सर्वत्र दंगेधोपे व अत्याचार होऊं लागले. सन १८१६ मध्यें 'स्पा फील्ड' मधील लोकांनीं दंगे करून दुकानें लुटलीं. पुढच्याच वर्षी पार्लमेंट उघडण्यास जात असतां राजपालकावर दंगेखोरांनीं उघडपणें हल्ला केला. त्याच वर्षी मँचेस्टरमधील कामकऱ्यांनीं आपल्या तक्रारी राजपालकाच्या कानीं घालून दाद मागण्याकरितां एक मोठी मिरवणूक काढली. या मिरवणुकींतील लोकांनीं थंडीपासून आपलें निवारण व्हावें म्हणून आपल्या अंगावर ब्लँकेटें घेतलीं होतीं. त्यामुळें त्यांच्या मिरणुकीस 'ब्लँकेटवाल्यांची मिरवणूक' असें नांव मिळालें. या लोकांनीं दंगा केला नाहीं. त्यांची मिरवणूक शांततेनें चालली असतांच थांबवण्यांत आली. त्याच सुमारास डार्बीशायरमधील लोकांनीं एक बंड केलें. हें बंड सरकारी पित्यांनीं निर्माण केलें असें कांहीं म्हणतात तर कांहीं म्हणतात कीं, तें कांहीं लोकांच्या फुसलावणीमुळें उत्पन्न झालें. कसेंही असलें तरी लष्कराच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मदतीनें या बंडाचा ताबडतोब बींमोड करण्यांत आला. या सर्व गोष्टींमुळें सरकारनें दडपशाही करण्यास सुरुवात केली व सभा भरवून लोकमताचें प्रदर्शन करण्यास कायद्यानें बंदी केली. परंतु त्यास न जुमानतां सन १८१९ मध्यें मँचेस्टरमधील सेंटपीटर्स मैदानावर एक टोलेजंग सभा भरविण्यांत आली. पार्लमेंटची सुधारणा करणें अत्यावश्यक आहे अशा अर्थाचा सरकारला अर्ज करावयाचा होता व म्हणून लोकमत अजमावण्याकरितां ही सभा भरविण्यांत आली होती. या सभेस सुमारें ऐंशी हजार लोक आले होते व त्यांच्या हातांत काठ्याही होत्या. सर्व लोकांनीं आपल्या बायकामुलांसह मोठमोठ्या मिरवणुकी काढून जमावयाचें असेंही ठरलें होतें व त्याप्रमाणें बायकामुलांसह हजारों लोक आपल्या हातांतील निशाणें मिरवीत त्या सभेस आले. हें लक्षण ठीक नाहीं असें समजून तेथील मॅजिस्ट्रेटनें घोडदळाची व पायदळाची एकेक लष्करी तुकडी सभेच्या जागीं नेली व सभेवर हल्ला करण्याचा हुकूम दिला. सभेंतील मुख्य वक्ता हंट याला पकडण्यांत आलें. हल्ल्यांत चार-पांच लोक मेले, अनेक जखमी झाले व सभा उधळली गेल्यानें जी पळापळ झाली त्यांत अनेक लोक, बायका व मुलें चेंगरलीं गेलीं! यामुळें या प्रकारास 'मँचेस्टरची कत्तल' असें नांव मिळालें! कांहीं लोकांनीं चेष्टेनें तिला 'पीटर्लूची कत्तल' (वॉटर्लूची लढाई नुकतीच झालेली होती, त्या नांवावरून) असें नांव दिलें. मात्र सरकारनें 'मॅजिस्ट्रेटनें केलें तें ठीक केलें' असें सांगून हंट व त्याचे साथीदार यांना शिक्षा ठोठावल्या.

६. दडपशाहीचें धोरण:—देशांतील असंतोषाचें वारें दडपशाहीनेंच दूर वाहवून नेलें पाहिजे असें सरकारचें धोरण असल्यानें सरकारनें दडपशाहीस जोरानें सुरुवात केली. स्पा फील्डच्या प्रकरणानंतर व विशेषतः राजपालकावरील हल्ल्यानंतर सरकारनें 'व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा' सन १८१७ सालीं तात्पुरता रद्द केला. तसेंच गृहमंत्रि लॉर्ड सिड्मथ (पूर्वीचा मुख्य प्रधान ॲडिंग्टन) यानें एक गुप्त हुकूम काढून सरकारवर प्रसिद्धपणें द्वेषमूलक व अब्रुनुकसानकारक टीका करणारांस पकडण्याची सर्व परगण्यांच्या अधिकाऱ्यांस आज्ञा केली. तसेंच पीटर्लूच्या कत्तलीनंतर सरकारनें दडपशाहीचे सहा कायदे पास केले. या कायद्यांमुळें खालील गोष्टी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठरल्या. (१) दंगेखोरांवरील खटल्यांची चौकशी झटपट व्हावी. (२) अन्नुकसानकारक व खोडसाळ टीका करणारीं पत्रकें जप्त करून तीं प्रकाशित करणारांस कैदेची अगर हद्दपारीची शिक्षा करावी. (३) खाजगी रीतीनें कवाईत शिकविणें अगर लष्करी शिक्षण देणें बेकायदेशीर समजावें. (४) विशिष्ट परगण्यांतील लोकांच्या जवळील शस्त्रास्त्रांची जप्ती करावी. (५) राजद्रोही लेख अगर चोपडीं छापणें बेकायदा ठरवावें. (६) राजद्रोही सभा भरविणें बेकायदा ठरवावें. हे सर्व कायदे सरकारच्या



लॉर्ड कॅसलरे

दडपशाहीचे द्योतक म्हणून मानले जातात. विशेषतः सहावा कायदा पास करून सरकारनें सभा बंद पाडण्याचें धोरण स्वीकारल्यानें लोकांच्या स्वातंत्र्यास धक्का पोंचतो असें त्यावेळीं लोकमत होतें. कसेंही असलें तरी त्याकाळीं हे सर्व कायदे व त्यांची अंमलबजावणी यशस्वी रीतीनें झाली यांत शंका नाहीं. लॉर्ड कॅसलरे व लॉर्ड सिड्मथ हे या कायद्यास जबाबदार होते व त्यामुळें त्यांच्याबद्दल लोकांच्या मनांत इतका द्वेष बाणला होता कीं सन १८२२ मध्यें लॉर्ड कॅसलरे मेल्यानंतर त्याच्या प्रेतयात्रेच्या वेळीं लोकांनीं आनंदोत्सव केले! मात्र सरकारनें या कायद्यांची अंमलबजावणी केली नाहीं हें लक्षांत धरलें पाहिजे.

७. कारखान्यांसंबंधीं कायदे :—औद्योगिक क्रांतीमुळें देशांत कारखाने फार झाले होते व या कारखान्यांत अनेक उमेदवारांना ठेवण्यांत येई व कामकरी म्हणून त्यांच्याकडून काम करून घेतलें जाई. परंतु त्यांच्याकडे कारखानदार दुर्लक्ष करून त्यांच्याकडून दिवसा व रात्रींही चोपून काम करून घेत. त्यांना राहण्याकरितां घरेंही अगदीं गलिच्छ असत. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन सन १८०२ मध्यें सर रॉबर्ट पील (प्रसिद्ध मुत्सद्दी पील याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाप) यानें एक कायदा पास करून कामकऱ्यांना दिवसांतून फक्त बारा तासच काम द्यावें व तेंही रात्रीं देऊं नये, त्यांना लेखन, वाचन व हिशेब इत्यादींचें शिक्षण द्यावें व त्यांना राहण्यास हवाशीर व स्वच्छ खोल्या देण्यांत याव्यात, असें ठरवून दिलें. परंतु युद्ध चालू असल्यानें या कायद्यांची अंमलबजावणी कसोशीनें झाली नाहीं. उलट युद्धाच्या वेळीं कामकऱ्यांकरितां ज्या झोपड्या उभारण्यांत आल्या होत्या त्याच युद्धानंतरही कायम करण्यांत आल्या. एकेका खोलींत अनेक कामकरी रहात, त्यामुळें त्यांचें आरोग्य बिघडे, संसर्गजन्य रोग फैलावत व मृत्युसंख्याही वाढे. त्यांतच लहान लहान मुलांनाही कारखान्यांत कारखानदार नेमूं लागले; त्यामुळें मुलांचें आरोग्य बिघडून त्यांची मृत्युसंख्याही झपाट्यानें वाढूं लागली. ही स्थिति कांहींशी सुधारण्याचा प्रयत्न सन १८१९ मध्यें एका कायद्यानें केला. त्या कायद्यानें नऊ वर्षांखालील मुलांस कारखान्यांत नेमण्याची सक्त मनाई करण्यांत आली. एका दृष्टीनें हा कायदा चांगला झाला असला तरी मजुरांचे हाल कमी झाले नाहींत.

८. **तिसऱ्या जॉर्जचा मृत्यु** (१८२०):—देशाच्या या असंतुष्ट स्थितींतच तिसरा जॉर्ज सन १८२० मध्यें मृत्यु पावला. त्यानें साठ वर्षें राज्य केलें. राज्यकर्ता या नात्यानें त्याची योग्यता फारशी मोठी ठरत नाहीं. अनियंत्रित राजसत्ता स्थापण्याचा त्यानें आटोकाट प्रयत्न केला व त्याकरितां त्यानें व्हिग पक्षाचा पाडाव केला, आपला एक राजपक्ष निर्माण केला व अनियंत्रित सत्तेला विरोध होईल अशी प्रत्येक चळवळ हाणून पाडून लोकशाहीची प्रगति त्यानें थांबविली. तरीही राजसत्ता जोरदार करण्याचे त्याचे सर्व प्रयत्न फसले. त्याच्या या निष्फळ प्रयत्नांतच पुढील शतकांतील लोकशाहीच्या प्रसाराचें मर्म ग्रथित झालेलें आहे. व्यक्ति या नात्यानें तो कितीही चांगला असला तरी राजा या नात्यानें त्यानें आपल्या हेकेखोर वर्तनानें अक्षम्य चुका केल्या व अमेरिका हातची घालविली, कॅथॉलिकांवरील निर्बंध उठविण्याचे प्रयत्न हाणून पाडून त्यांस असंतुष्ट केलें, पार्लमेंटच्या अधिकारांवर मर्यादा घालण्याचा अनेक वेळां प्रयत्न केला; परंतु शेवटीं लोकसत्तेपुढें नमतें घेऊन पार्लमेंटचे अधिकार त्याला मान्य करावे लागले. यामुळें त्याची कारकीर्द जितकी उठावदार व्हावयास पाहिजे होती तितकी झाली नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. नेपोलियनशीं झालेल्या युद्धाचे इंग्लंडवर कोणते परिणाम झाले ?

२. सन १८१५ नंतर इंग्लिश सरकारनें दडपशाहीचें धोरण कां स्वीकारलें ? त्यावेळच्या दडपशाहीचें स्वरूप वर्णा. त्याचा परिणाम काय झाला ?

३. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा :—
डार्बीशायरमधील बंड, ब्लँकेटवाल्यांची मिरवणूक, पीटर्लूची कत्तल, लडाइटांचे दंगे.

४. सन १८१५ मधील धान्याचा कायदा पास करण्याचें कारण काय ? त्याचा परिणाम सांगा.

५. देशांतील असंतोष कोणाकोणामध्यें दिसत होता ? त्याचें कारण काय ? तो नष्ट करण्याकरितां कोणता उपाय सुचविण्यांत आला ? त्याचें काय झालें ?

६. कारखान्यांच्या स्थापनेमुळें देशावर कोणती आपत्ति ओढवली ? ती दूर करण्याकरितां सरकारनें काय केलें ? लोकांनीं काय केलें ? त्याचा परिणाम काय झाला ?

७. लॉर्ड कॅसलरे व लॉर्ड सिड्मथ यांच्या कामगिरीचें थोडक्यांत वर्णन करा.

उतारे

१. पीटर्लूची कत्तल—१८१९

ता. १६ ऑगस्ट, १८१९ रोजीं सेंट पीटरच्या मैदानावर लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. ‘धान्याचे कायदे रद्द करा,’ ‘पार्लमेंट दरसाल भरवा,’ ‘गुप्त मतदान सुरू करा’ वगैरे पाट्या त्यांच्या हातांत फडकत होत्या. मैदानांत आल्यावर त्या त्यांनीं गाडींत ठेवून दिल्या. मँचेस्टरच्या आजूबाजूच्या अनेक खेड्यांतील सुधारणावादी लोक त्या सभेस आले होते. लष्करी तुकडीही तेथें सज्ज होती ! एकंदर जमाव सुमारें ८०,००० असावा. सर्वांचें लक्ष मुख्य पुढारी हंट याच्या आगमनाकडे होतें. तो येतांच लोकांनीं त्याचें सोत्साहानें स्वागत केलें; व त्यानें अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना झाली. तो अध्यक्षस्थान स्वीकारणार इतक्यांत घोडेस्वारांची एक तुकडी सभेच्या जागीं येऊन ठेपल्यानें लोकांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोंधळ उडाला. घोडेस्वारांच्या मुख्यानें ताबडतोब हंटजवळ जाऊन त्याला कैद केल्याचें सांगितलें. तेव्हां 'वारंट दाखविल्यास मी तुमच्या स्वाधीन होईन' असें त्यानें सांगितलें. तिकडे लक्ष न देतांच हंट व त्याचे इतर साथीदार यांना कैद करण्यांत आलें. तेव्हां ज्यांच्याविरुद्ध वारंटें होतीं ते लोक गर्दींत मिसळून दिसेनासे झाले. त्यांना पकडण्याकरितां लष्करांतील कांहीं लोक लोकांच्या जमावांत घुसूं लागले. तेव्हां सर्व लोक घाबरले. सर्वत्र पांगापांग होऊं लागून लोक सैरावैरा धावूं लागले. धरबंद न ठेवतां लष्करानेंही लोकांचा जमाव उधळून लावण्यास सुरुवात केली. त्या गर्दींत घोड्यांच्या टापांखालीं व माणसांच्या पायांखालीं अनेक लोक तुडविले गेले. सुमारें तीन चारशें लोक जखमी झाले व एक स्त्री व कांहीं पुरुष मृत्युमुखीं पडले. पळत असतांच लोकांनींही उलटून लष्करावर दगडधोंड्यांचा वर्षाव केला. तरीही त्यास न जुमानतां लष्करानें सभा उधळून लावून दहा मिनिटांत सर्व मैदान निर्मनुष्य केलें.

प्रश्न :— १. सेंट पीटरच्या मैदानावर सभा कां भरली? तेथें किती लोक जमले होते?
२. लष्कर व घोडेस्वार यांनीं तेथें काय केलें? कशाकरितां?
३. लोकांचें वर्तन कसें होतें? त्यांनीं लष्करावर दगड कां फेकले?

२. पार्लमेंटमधील जागेची विक्री—१८०७

—आणि अलीकडे पार्लमेंटच्या जागांची किंमतही पूर्वींपेक्षां फारच वाढली आहे. माझ्या एका मित्रानें मला सांगितलें कीं त्यानें दोन जागांकरितां दहा हजार पौंड देऊं केले, तरीही त्याला नकार मिळाला. एकाकडून सहा हजार पौंड व दुसऱ्याकडून साडेपांच हजार पौंड उकळण्यांत आले. मात्र राजाच्या गैरमर्जीमुळें अगर प्रधानमंडळाच्या राजिनाम्यामुळें त्या जागा जाऊन पार्लमेंटची निवडणूक पुन्हां केव्हां होईल हें सांगण्यांत आलें नाहीं. वाटेल तितकी किंमत देऊन प्रधानमंडळानें पार्लमेंटमध्यें आपलें मताधिक्य करून घेतलें आहे. प्रत्यक्ष राजानेंही आपल्या खानगींतून शेकडों पौंड खर्च करून आपले बगलबच्चे निवडून येतील अशी व्यवस्था केली आहे, हें खरोखरच निंद्य होय. परंतु आज माझ्यासारख्या माणसाला पार्लमेंटमध्यें निवडून येण्यास तो एकच मार्ग मोकळा आहे. प्रामाणिकपणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडणूक लढवून पार्लमेंटमध्यें निवडून येणें या मितीला शक्य नाहीं. एखाद्या श्रीमान् माणसाच्या वजनानें पार्लमेंटमध्यें निवडून येऊन त्याच्या अंगुलीनिर्देशाप्रमाणें पार्लमेंटमध्यें मतदान करणें म्हणजे शुद्ध गुलामगिरीच नव्हे काय? पार्लमेंटमध्यें जागा मिळणें बलवत्तर दैवयोगाचेंच लक्षण होय. पार्लमेंटमध्यें निवडून येणें म्हणजे एक प्रकारचा बाजारच होय. कारण पार्लमेंटमध्यें जे निवडून येतात ते आपलीं मतें विकतात. स्वतःच्या पैशाचा अशा तऱ्हेनें विनियोग करणें मला मुळींच पसंत नाहीं व परवडणारही नाहीं.

प्रश्न :— १. पार्लमेंटमधील जागा लोकांस कशा मिळत? त्या तशा मिळणें योग्य आहे का?

२. कोण लोक पार्लमेंटमध्यें निवडून येत? कशावरून?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसिद्ध व्यक्ति	इंग्लंड-महत्त्वाच्या गोष्टी	वर्ष	हिंदुस्थान-महत्त्वाच्या गोष्टी	युरोप-महत्त्वाच्या गोष्टी
	पहिला मित्रसंघ	१७९३		फ्रें. राजाराणीचा वध
बर्क			खर्ड्याची लढाई १७९५	
पिट, नेल्सन		१७९६		नेपो. इटलीवर मोहीम
डंकन	कँपरडाऊन व सेंट व्हिन्सेंट लढाई	१७९७		कँपाफोर्मियोचा तह
फॉक्स		१७९८	तैनाती फौजेची पद्धति	नाईलची लढाई.
नेपोलियन	दुसरा मित्रसंघ	१७९९	टिपू-इंग्रज युद्ध. टिपूचा मृत्यु	नेपोलियन-पहिला कॉन्सल.
	आयरिश व इंग्लिश. पार्ल. एकीकरण	१८००	नाना फडणिसाचा मृत्यु	मोरेंगोची ल. होएनलिडन.
दुसरा बाजीराव		१८०१		
त्रिंबकजी डेंगळे	पिटचा राजीनामा अमीन्सचा तह	१८०२	वसईचा तह	कोपनहेगनची ल.
	ट्फाल्गरची लढाई	१८०५	भरतपूरचा वेढा	ऑस्टरलिट्. ल. बर्लिनचें फर्मान
	पिटचा मृत्यु	१८०६	वेलोरचें बंड. शहाआलम-मृत्यु	
	कौन्सिलांतील फ. गुलाम व्या. बंद	१८०७		टिलसिटचा तह.
सर जॉन मूर		१८०८		द्वीपकल्पांतील युद्ध
वेलिंग्टन	अमेरिकेशीं युद्ध	१८१२		रशियावर नेपो. मोहीम.
लिव्हरपूल		१८१४	नेपाळशीं युद्ध	नेपो. राज्यत्याग
सिड्मथ	व्हिएन्नाची रा. स. धान्याचा कायदा	१८१५		वॉटर्लूची लढाई पॅरिसचा तह
कॅसलरे				पवित्र संघ
बर्डेट, रसेल		१८१८	खडकीची लढाई. पेशवाईचा शेवट.	
मेटर्निक	पीटर्लूची कत्तल.	१८१९		
बापू गोखले				
	तिसऱ्या जॉर्जचा मृत्यु.	१८२०		

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अठराव्या शतकांतील हॅनोव्हर अमदानीचे ठळक विशेष

१. अनियंत्रित राजसत्तेचा शेवट :—सन १६८९ च्या राज्यक्रांतीनें इंग्लंडमध्यें अनियंत्रित राजसत्तेचा शेवट झाला व नियंत्रित राजसत्ता रूढ झाली. अर्थात् इंग्लंडमध्यें लोकमताला मान मिळूं लागल्यानें राष्ट्राचा कारभार लोकमतानुवर्ति होऊं लागला. या बाबतींत पहिल्या दोन्ही हॅनोव्हेरियन राजांनीं उत्साहजनक वातावरण निर्माण केलें. आपल्या प्रधानांवर विश्वास टाकून त्यांनीं त्यांच्याकडूनच सर्व राज्यकारभार उरकून घेतला. यामुळें राजा टिकला; तरी खरी राजसत्ता त्याच्या हातीं न राहतां, ती पार्लमेंटच्या हातीं गेली. व्हिगपक्षानें या बाबतींत राष्ट्राला फारच उपकृत करून ठेवलें. हातीं सत्ता आल्यावर त्या पक्षांतील लोकांनीं राष्ट्रहितास पोषक होईल असेंच धोरण स्वीकारलें व आपल्या प्रगतिप्रिय धोरणानें राजसत्ता तर टिकविलीच; परंतु राष्ट्राची सर्वांगीण प्रगति करून पार्लमेंटचा कारभार अत्यंत दक्षतेनें व कार्यक्षमतेनें हांकला. यामुळें राजाची सत्ता मर्यादित झाली तरी राजपदाबद्दल त्यांनीं लोकांच्या मनामध्यें आपलेपणाच निर्माण केला व खऱ्या लोकशाहीचीं तत्त्वें दृढमूल केलीं. तिसऱ्या जॉर्जनें या बाबतींत अत्यंत हेकेखोर वर्तन करून राजसत्तेचें गेलेलें सामर्थ्य व पूर्व वैभव खेंचून आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्या बाबतींत त्याला थोडें यश लाभलेंही; परंतु अंतीं त्याला आपलें उद्दिष्ट साध्य करतां आलें नाहीं. यावरून लोकांस राजा पाहिजे होता; परंतु त्याच्या हातीं राजसत्ता नसावी असेंच त्यांस वाटत होतें हें सिद्ध झालें. अर्थात् राजाचें खरें सामर्थ्य नष्ट होऊन त्याच्या ऐवजीं पार्लमेंटची सत्ता रूढ झाली, हा या काळचा विशेष होय.

२. पार्लमेंटच्या हातीं राजसत्ता :—अनियंत्रित राजसत्तेचा शेवट झाल्यानें पार्लमेंटची सत्ता इंग्लंडांत स्थापन झाली. परंतु त्या वेळच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पार्लमेंटमध्यें उच्चवर्गीयांचें प्राबल्य विशेष होतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सुखवस्तु, उमराव, देशमुख, जमीनदार वगैरेंच्या हातीं सत्ता होती, व ती नष्ट व्हावी असें कोणासही वाटत नव्हतें. औद्योगिक क्रांति झाल्यानें पार्लमेंटची सुधारणा करण्याबद्दल सर्व देशांत जोराची चळवळ सुरू झाली; परंतु ती हाणून पाडण्याचें काम वरील लोकांनीं केलें हें लक्षांत धरण्यासारखें आहे. मध्यम वर्ग श्रीमंत होता, तरी त्याच्या हातांतही फारशी सत्ता नव्हती. हिंदुस्थानांतून अफाट संपत्ति मिळवून व इंग्लंडांत परत येऊन स्थायिक झालेले 'हिंदी नबाबही' वरील लोकांत सामील झाले होते. नाना प्रकारच्या भानगडी करून, लांच देऊन, अन्याय्य मार्गांचा अवलंब करून व अनेक मार्गांनीं लोकांस वश करून, हे लोक पार्लमेंटमध्यें जागा पटकावीत व स्वार्थ साधण्यास पण त्याबरोबर साधल्यास राष्ट्रहित करण्यास सदैव तयार असत. एकंदरींत पाहतां राजसत्ता नष्ट झाली तरी ती बड्या लोकांच्या हातीं स्थिर झाली. अर्थात् त्यांच्यांत वॉलपोल, चॅटहॅम, फॉक्स, बर्क, धाकटा पिट वगैरे अनेक उत्तम मुत्सद्दी निघाले व त्यानीं राष्ट्रहित साधून इंग्लंडचें वैभव वाढविलें. त्यांच्या उज्ज्वल कामगिरीमुळेंच पार्लमेंटला महत्त्व आलें व खरी राजसत्ता हातीं आल्यावर तीच इंग्लंडमध्यें सर्वश्रेष्ठ ठरली.

३. प्रधानमंडळात्मक राज्यपद्धति :—पार्लमेंटच्या हातीं राजसत्ता आली तरी तिचा खरा उपभोग प्रधानमंडळानेंच घेतला. प्रधानमंडळात्मक राज्यपद्धति स्टुअर्ट काळांत उपजली तरी तिचें संगोपन व संवर्धन पहिल्या दोन जॉर्ज राजांच्या कारकीर्दींतच झालें. पक्षनिष्ठ राजकारणाचा उगमही स्टुअर्ट अमदानींत झाला व त्याचा परिपोष अठराव्या शतकांतच चांगला झाला. कारण पहिल्या जॉर्जच्या कारकीर्दीपासूनच राज्यकारभार एका पक्षाच्या हातीं जाऊं लागला व ती प्रथा एकदां पडली ती कायमची. त्यामुळें प्रधानांच्या हातीं सर्व सत्ता राहूं लागली. नामधारी राजा व सत्ताधारी प्रधान असा मामला सुरू झाल्यानें अनियंत्रित राजसत्तेनंतर प्रधानमंडळालाच जास्त महत्त्व चढलें; आणि हें प्रधानमंडळ पार्लमेंटला जबाबदार असे. पार्लमेंटच्या हातीं राजसत्ता आल्यानें तिच्या वतीनें प्रधानमंडळानेंच राजसत्तेचा खरा उपभोग घेतला. अर्थात् त्यामुळें इंग्लंडमध्यें एकमुखी राज्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यवस्था, व तीही एका विशिष्ट राजकीय पक्षाच्या पाठिंब्यावर आधारलेली, निर्माण झाली. त्या राज्यपद्धतीला कायद्याचा आधार नव्हता. रूढीचा आधार हळू हळू मिळूं लागला. त्यामुळें इंग्लंडची राज्यघटना रूढीवर आधारलेली होऊं लागली. पहिल्या दोन्ही जॉर्ज राजांनीं प्रधानमंडळात्मक राज्यपद्धतीला विरोध न करतां तिला उत्तेजनच दिलें व त्यामुळेंच तिनें मूळ धरलें. तें इतकें कीं तिसऱ्या जॉर्जनें जंगजंग पछाडले तरी उपटून न निघतां उलट तें जास्तच घट्ट झालें. मात्र या बाबतींत वॉलपोल, पिट वगैरे मुत्सद्यांनीं महनीय कामगिरी बजावून प्रधानमंडळात्मक राज्यपद्धति चांगल्या भक्कम पायावर उभारली हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

४. संस्थेपेक्षां व्यक्ती श्रेष्ठ :—अठराव्या शतकांतील ब्रिटिश मुत्सद्यांनीं अनियंत्रित राजसत्ता नष्ट केली व प्रधानमंडळात्मक राज्यपद्धतीचा पुरस्कार करून ती दृढमूल केली. तरी त्यांनीं राष्ट्रहिताकडे, व्यापारवृद्धीकडे व साम्राज्यवृद्धीकडे दुर्लक्ष केलें नाहीं. त्या वेळीं व्यक्तीला महत्त्व फार होतें, संस्थांना नव्हतें. त्यामुळेंच त्या काळांत वॉलपोल, चॅटहॅम, धाकटा पिट, न्यू-कासल, नॉर्थ, फॉक्स, डॉ. जॉन्सन, बर्क, वॅट, नेल्सन, वेलिंग्टन वगैरे लोकांच्या सर्वश्रेष्ठ कामगिरीस महत्त्व फार असे. त्या सर्व लोकांनीं आपापल्या परीनें राष्ट्राची नुसती सेवाच केली नाहीं तर त्यांच्या व्यक्तिविकासाबरोबरच राष्ट्राचाही हळूहळू विकास होत गेला. त्याकाळीं संस्था नव्हत्या असें नाहीं; परंतु त्यांचें युग अजून यावयाचें होतें. ज्या होत्या त्या जुन्या परंपरेस चिकटून व बिलगून असत. त्यांच्या हातून भरीव कामगिरीही फारशी होत नसे. ई. इं. कंपनीसारख्या संस्था त्यावेळीं थोड्याच होत्या. तरी ती संस्थाही लॉर्ड क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड वेल्स्ली वगैरेसारख्यांनींच पुढें आणली. त्यांची काम-गिरी झाली तितकी भरीव झाली नसती तर ई. इं. कंपनीही इतकी नांवा-रूपास चढली नसती. अर्थात् व्यक्तिमाहात्म्य फार होतें व तें जास्त असलें तरी सर्व व्यक्तींनीं राष्ट्रहित साधल्यानेंच इंग्लंड वैभवसंपन्न झालें. या सर्व व्यक्तींनीं शास्त्रें, नाविक श्रेष्ठत्व, लष्करी श्रेष्ठत्व, व्यापारी श्रेष्ठत्व, वाङ्मय वगैरे सर्व बाबतींत इंग्लंडचें नांव पुढें आणलें.

५. फ्रान्स व इंग्लंड यांच्यांतील चुरस :—अठराव्या शतकांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अत्यंत ठळक असा विशेष म्हणजे फ्रान्स व इंग्लंड यांच्यामधील साम्राज्य-विस्तार, व्यापारवृद्धि व समुद्रावरील सत्ता यांच्याकरितां लागलेली अखंड चुरस होय. सुमारें एक शतकभर हा झगडा त्या दोन्ही राष्ट्रांत सुरू होता. तिसऱ्या विल्यमच्या वेळेपासून या स्पर्धेला सुरुवात झाली, ती तिसऱ्या जॉर्जच्या अखेरीपर्यंत चालू होती. कांहीं कांहीं वेळेला त्या स्पर्धेचें स्वरूप तीव्र असे. या सर्व काळांत इंग्लंड व फ्रान्स यांच्यांत अनेक युद्धें झालीं. त्यांचा येथें फक्त नामनिर्देश करूं. स्पॅनिश वारशाचें युद्ध (१७०२–१७१३), ऑस्ट्रियन वारशाचें युद्ध (१७४०–४८), सप्तवार्षिक युद्ध (१७५६–१७६३), अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध (१७७८–१७८३), फ्रेंच राज्यक्रांतीमुळें झालेलें युद्ध (१७९३–१८०२) व नेपोलियनबरोबर झालेलें युद्ध (१८०४–१८१५). या सर्व युद्धांच्या बुडाशीं साम्राज्यतृष्णा जबर होती. कारण त्यामुळें साम्राज्य वाढून व्यापार वाढणार होता. व्यापारवृद्धीबरोबरच आरमारी श्रेष्ठत्व स्थापलें जाऊन देश वैभवसंपन्न होणार होता. या सर्व गोष्टी एका युद्धानें होणाऱ्या नव्हत्या. एकदां युद्ध सुरू झालें कीं तें इंग्लंडच्या साम्राज्यांत—हिंदुस्थान, अमेरिका, आफ्रिका वगैरे साम्राज्यांतर्गत भागांत—उत्पन्न होई. कोठें तें तीव्रतेनें भडके, कोठें तें धुमसत राही, एवढाच फरक. अखेर इंग्लंडचें आरमार चांगलें असल्यानेंच इंग्लंडला विजय मिळाला. शिवाय इंग्लंडमधील राज्यव्यवस्थाही फ्रान्सच्या राज्यव्यवस्थेपेक्षां चांगली कार्यक्षम असल्यामुळें इंग्लंडचा अंतिम हेतु साध्य झाला व फ्रान्सचा फसला. मात्र सन १८१५ नंतर त्या दोन्ही देशांतील ही चुरस व स्पर्धा नष्ट होऊं लागून त्या दोन्ही देशांत अखंड मैत्री नांदूं लागली. ती अजूनही टिकून आहे.

६. **इंग्लंडचा साम्राज्यविस्तार**:—इंग्लंडच्या साम्राज्याच्या कल्पनेस प्रथमतः ट्यूडर अमदानींत मूर्तस्वरूप आलें व स्टुअर्ट अमदानींत जगांतील निरनिराळ्या भागांत साम्राज्याच्या स्थापनेस सुरुवात झाली. रॅले, पिल्ग्रिम फादर्स, पेन वगैरेनीं अमेरिकेंत वसाहती स्थापून, अमेरिकेंत ब्रिटिश साम्राज्याची वाढ करण्यास सुरुवात केली. उत्तर अमेरिकेंत साम्राज्याची वाढ कसकशी झाली व इंग्रजांस कानडा प्रांत कसा मिळाला त्याची हकीकत मागें आलीच आहे. त्याचप्रमाणें ब्रिटिश लोक वेस्ट इंडीज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बेटें व दक्षिण अमेरिका यांतही हातपाय पसरूं लागले होते. सन १६२५ मध्यें कोर्टीन यानें वेस्ट इंडीजपैकीं बार्बाडॉझ बेटांत वसाहत स्थापन केली. सन १६५० मध्यें दक्षिण अमेरिकेंत ग्वायना वसाहत स्थापन केली. ती मध्यंतरीं डचांनीं जिंकून घेतली होती; परंतु पुढें नेपोलियनशीं युद्ध चालू असतां ब्रिटिशांनीं ती पुन्हां जिंकून घेतली. वेस्ट इंडीज बेटांपैकीं ल्यूशिया, त्रिनिदाद, टोबॅगो, बहामा वगैरे बेटें ब्रिटिशांच्या ताब्यांत अठराव्या शतकांत आलीं. आशिया खंडांत ई. इं. कंपनीनें बहुतेक सर्व हिंदुस्थान आपल्या वर्चस्वाखालीं आणला होता; व सन १८१८ मध्यें मराठ्यांचा पराभव झाल्यानें, पंजाबशिवाय सर्व हिंदुस्थान ब्रिटिश-सत्तेखालीं आला. त्याच्याशिवाय मलाया द्वीपकल्पांतील त्यांच्या वसाहतीही तो भाग हस्तगत करीत होत्या. आफ्रिकेंत गुडहोपच्या आजूबाजूचा प्रदेश इंग्लंडच्या ताब्यांत सन १८१५ त आला व त्यानंतर तेथें अनेक ब्रिटिश वसाहती स्थापन झाल्या. ऑस्ट्रेलियाचा शोध सन १७६८ मध्यें कॅप्टन कुकनें



कॅप्टन कुक



कॅप्टन कुकचें जहाज ‘एन्डेव्हर’

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रथम लावला. त्याप्रमाणें उत्तर न्यूझीलंड व दक्षिण न्यूझीलंड हीं दोन बेटें आहेत असें प्रथम त्याच्याच निदर्शनास आलें. आपल्या 'एन्डेव्हर' नामक जहाजांत बसून दक्षिण गोलार्धाचा शोध लावण्याकरितां तो प्रथम निघाला. तेव्हां त्याला ऑस्ट्रेलियाचा शोध लागला. त्यानें ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्याचें बारकाईनें निरीक्षण केलें व 'पोर्ट जॅक्सन' या शहराची स्थापना करून तो सन १७७१ मध्यें इंग्लंडला परत आला. आलास्काचाही त्यानेंच शोध लावला. ऑस्ट्रेलियाचा शोध लागल्यानें अमेरिकेनंतर सन १७८३ च्या पुढें वसाहती स्थापन करूं इच्छिणारे लोक ऑस्ट्रेलियाकडे जाऊं लागले. मात्र तेथें पहिली वसाहत सन १८३५ मध्यें स्थापन झाली. येथें गुन्हेगार पाठविण्यास १७८८ पासून सुरुवात झाली होती. त्यामुळें ऑस्ट्रेलिया म्हणजे गुन्हेगारांच्या वसाहतीचें ठिकाण असें त्या वेळीं जें मत होतें तें अजूनही थोडेंबहुत कायम आहे. अशा तऱ्हेनें अठराव्या शतकांत जगाच्या सर्व भागांत इंग्लंडच्या साम्राज्याची स्थापना व वृद्धि झाल्यानें इंग्लंडचा व्यापारही बेसुमार वाढला व त्यामुळेंच इंग्लंडांत औद्योगिक क्रांति झाली. अर्थात् जगांतील संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे वळून तो देश संपन्न झाला; व जगांतील कच्च्या मालाचें पक्क्या मालांत रूपांतर करणारा इंग्लंड हा एक मोठा कारखानाच बनला. इंग्लंडच्या साम्राज्यवृद्धीला अमेरिका स्वतंत्र झाल्यानें थोडा आळा बसला हें खरें; तरी सन १७०७ मध्यें इंग्लंड व स्कॉटलंड यांचें व सन १८०० मध्यें आयर्लंड व इंग्लंड यांचें एकीकरण झाल्यानें साम्राज्यवाढीस एकीचें चांगलेंच अधिष्ठान लाभलें.

७. आरमारी श्रेष्ठत्व:—इंग्लंडच्या साम्राज्यवाढीस आरमारी श्रेष्ठत्व उपयोगी पडलें हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. एलिझाबेथनंतर इंग्लंडचें आरमार श्रेष्ठ दर्जाचें ठरलें व क्रॉम्वेलच्या वेळेपासून तें एकसारखें वाढतच गेल्यानें तें बिनतोड झालें. इंग्लंडच्या आरमाराला युरोपांत अठराव्या शतकांत तोडच नव्हती. नेपोलियनच्या वेळीं स्पेन, हॉलंड, फ्रान्स वगैरे देशांचीं आरमारें इंग्लंडविरुद्ध एकाच वेळीं उभीं ठाकलीं असतांही, इंग्लिश आरमारानें त्यांचे नाईल, कोपनहेगन, कॅंपरडाऊन, सेंट व्हिन्सेंट, ट्रफाल्गर वगैरे ठिकाणीं महत्त्वाचे पराभव केले. यावरून इंग्लंडचें आरमार सर्वोत्कृष्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें हें सिद्ध झालें; आणि यामुळेंच इंग्लंडची समुद्रावर सत्ता श्रेष्ठ ठरली व इंग्लंडचा व्यापारही दिवसेंदिवस वाढूं लागला. आरमाराच्या बाबतींत अनेक नवीन शोधही याच शतकांत लागले. भर समुद्रांत असतांना रेखांश शोधून काढण्याचें यंत्र सन १७६३ मध्यें जॉन हॅरिसननें काढलें. वाफेनें चालणाऱ्या बोटी सुरू झाल्यानें व्यापार लौकर होऊं लागला. अनेक दीपगृहें निर्माण होऊं लागल्यानें जहाजांच्या पर्यटनास सुरक्षितपणा प्राप्त झाला. धोक्याच्या जागीं हीं दीपगृहें असत. त्याचप्रमाणें जीवनौकांची सोयही तेथें असे. कॅप्टन कुक-सारख्या शोधकांनीं पॅसिफिक महासागराच्या खोलीचा शोध लावला व त्यामुळें त्या समुद्रांतही नौकातरण सहज होऊं लागलें. अशा अनेक शोधांमुळें नौकानयनाचा उत्कर्ष होऊं लागला, आरमाराची वाढ होऊं शकली व इंग्लंडचा व्यापारही वाढला. इंग्लंडचें आरमारी श्रेष्ठत्व व त्याची समुद्रा-वरील सत्ता यामुळेंच नेपोलियनचा पराभव झाला व इंग्लंडला यश लाभलें.

८. व्यापाराची वाढ :—साम्राज्याची वाढ झाल्यानें इंग्लंडला जगांतील व्यापारी पेठा हस्तगत करतां आल्या. त्यामुळें तेथें माल पाठविणें व तेथून इंग्लंडला माल आणणें जरूरीचें झालें; आणि त्याकरितांच जहाजांची निर्वेध वाहतुक असणें जरूर होतें. तें काम ब्रिटिश आरमारानें केलें. त्यामुळें इंग्लंडचा व्यापार वाढला. या शतकांत अमेरिकेहून धान्य, सागवान, तंबाखू, तांदूळ, नीळ, कापूस वगैरे कच्चा माल इंग्लंडांत येई व यंत्रसामुग्री, कपडे वगैरे पक्का माल अमेरिकेस जाई. हिंदुस्थानांतून मलमल, मसाल्याचे पदार्थ, सोनें, हिरे, तांदूळ, रेशीम, चहा, कापूस, साखर वगैरे पदार्थ इंग्लंडला जात. वेस्ट इंडीजमधून साखर, दारू, तांदूळ वगैरे पदार्थ जात. आफ्रिकेंतील गुलामांचा व्यापार सुरूच होता. त्या काळीं खुल्या व्यापाराचा पुरस्कार सरकारतर्फे झाला होता व त्यामुळें जगांतील सर्व भागांशीं त्या तत्त्वावरच इंग्लंडचा व्यापार चाले. परंतु युरोपांत तें तत्त्व रूढ झालें नव्हतें. फ्रान्स व इंग्लंड एकमेकांचे शत्रू असल्यानें एकमेकांचा व्यापार मारण्याकरितां त्यांनीं परस्परांच्या व्यापारावर जाचक जकाती लादल्या होत्या. नेपोलियननें इंग्लं-डचा व्यापारी कोंडमारा करण्याचेंच ठरविलें होतें. त्याचें हें धोरण फसलें व इंग्लंडचा व्यापार अव्याहत एकसारखा वाढतच गेला. अठराव्या शतकांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लंडचीं जवळ जवळ चाळीस पन्नास वर्षें युद्धांतच गेलीं. इंग्लंडांत उद्योगधंद्यांत क्रांति होऊन इंग्लंडचा व्यापार अनेक पटीनें वाढला, देशांत संपत्ति खेळूं लागली व देशाची सर्वतोपरी उन्नति झाली. खुद्द इंग्लंडमधून तागाचें व लोकरीचें कापड, मोजे, टोप्या, बूट, यंत्रें, जवाहीर, काचेचें सामान, कथील, तांबें वगैरे जिन्नसा बाहेर देशीं रवाना होत असत.

९. कांहीं नवीन शोध:—अठराव्या शतकामध्यें उद्योगधंद्यांत जे अनेक शोध लागले त्याचें वर्णन मागें आलेंच आहे. सर्व मनुष्यजातीवर ज्यामुळें अत्यंत उपकार झाले असा एक नवीन शोध याच शतकांत लागला. एडवर्ड जेनर (१७४९–१८२३) या एका इंग्रज डॉक्टरानें देवीच्या आजारासंबंधीं शोध लावला. देवीच्या सांथीला बळी पडून असंख्य लोक मरत असत, परंतु गोशाळेंत गाईच्या धारा काढणाऱ्या स्त्रियांस तो होत नसे, हें जेनरच्या लक्षांत आलें. तेव्हां त्यासंबंधीं त्यानें संशोधन करून गोस्तनांतील लस काढून ती तो लोकांस टोंचूं लागला. देवीच्या रोगानें पछाडलेलीं माणसें उठत नसत, परंतु सांथीपूर्वी ती लस टोंचून घेतल्यानें लोकांस देवीचा रोग होईनासा झाला. त्याच्या शोधाचा इतर औषधांवरही परिणाम होऊन संसर्गजन्य रोगांवर उत्तम इलाज होऊं लागले. जेनरचा हा शोध सन १७९६ मध्यें प्रसिद्ध झाला. जेनरप्रमाणेंच दुसरा एक शोधक म्हणजे डॉ. जोसेफ प्रीस्टले (१७३३–१८०४) होय. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं याचेंच घर जमीनदोस्त करण्यांत आलें होतें. त्यानें विजेसंबंधीं कांहीं शोध लावले. हायड्रोक्लोरिक ॲसिड, नैट्रेट ॲसिड वगैरेंचे शोध त्यानेंच लावले. ऑक्सिजनचाही त्यानेंच शोध लावला व तो निराळा करतां येतो हें सिद्ध करून दाखविलें. तो पुढें अमे-


डॉ. जोसेफ प्रीस्टले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रिकेंत जाऊन राहिला. सर विल्यम हर्शल (१७३८–१८२२) यानें खगोलशास्त्रांत अनेक शोध लावले. तो जर्मन होता व इंग्लंडांत येऊन राहिला होता. यानेंच युरेनस नांवाचा सूर्यमालिकेंतील ग्रह सन १७८१ मध्यें शोधून काढला. शनीबद्दलही त्यानें कांहीं शोध लावले होते.

१०. तुरुंगांची सुधारणा :— अठराव्या शतकांत इंग्लंडमधील तुरुंग अत्यंत गलिच्छ, घाणेरडे व अस्वच्छ असत. त्या बाबतींत जॉन हॉवर्ड (१७२७–१७९०) यानें सन १७७४ ते १७८४ पर्यंत इंग्लंडमधील निरनिराळ्या तुरुंगांस प्रत्यक्ष भेटी दिल्या. कांहीं ठिकाणीं त्यानें प्रत्यक्ष अनुभवही घेतले. त्यांत त्याच्या अनुभवास अनेक गोष्टी आल्या. कैद्यांस कोंडून ठेवीत, त्यांना काम देण्यांत येत नसल्यानें ते शरीरानें व मनानेंही कुचंबत पडत, रात्रीं त्यांना सांखळीनें बांधून ठेवण्यांत येई व तेंही एखाद्या अंधाऱ्या कोठडींत. त्या वेळच्या शिक्षाही जबर असत. ऋणकऱ्यांस वर्षानुवर्ष तुरुंगांत पडावें लागे. अनेकांस साध्या गुन्ह्याकरितांही फाशींची शिक्षा होई. हॉवर्डनें त्या बाबतींत देशांत भयंकर जागृति केली व तुरुंगांची सुधारणा करण्याची आवश्यकता त्यानें पटवून दिली. अर्थात् त्याच्या हयातींत त्याला त्या सुधारणा पाहतां आल्या नाहींत. त्याच्या मागून त्याची शिष्या एलिझाबेथ फ्राय (१७८०–१८४५) हिनें त्याचें काम मोठ्या उत्साहानें हातीं घेऊन त्यांत बरेंच यश मिळविलें.



डॉक्टर जॉनसन

११. वाङ्मयविकास :— अठराव्या शतकांत वाङ्मयाचीही उन्नति झाल्याशिवाय राहिली नाही. या युगांतील प्रख्यात ग्रंथकर्ता व जाडा विद्वान् डॉ. जॉनसन (१७०९–१७८४) होय. लिचफील्ड येथें त्याचा जन्म झाला. तरी त्याला लंडनमध्यें राहणेंच आवडे. तो जन्मदरिद्री होता. दारिद्र्यांत वाढला व दारिद्र्यांतच तो मेला. त्यामुळेंच ऑक्सफर्ड येथील विद्याभ्यासास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला रामराम ठोकावा लागला. हजरजबाबी व विनोदी विद्वान् म्हणूनही तो प्रसिद्ध आहे. त्यानें इंग्रजी भाषेचा शब्दकोश अगदीं प्रथमच लिहून प्रसिद्ध केला. जेम्स बॉसवेल (१७४०–१७९५) हा त्याचा चरित्र-कार. चरित्रग्रंथ असावा तर बॉसवेलच्या जॉनसनच्या चरित्रासारखा, असें अजूनही लोक म्हणतात. डॉ. ऑलिव्हर गोल्डस्मिथ (१७२८–१७७४) हाही त्या वेळीं एक मोठा कवि व लेखक होऊन गेला. 'ट्रॅव्हलर,' 'डेझर्टेड व्हिलेज' वगैरे काव्यें व 'सिटिझन ऑफ दी वर्ल्ड', 'विकार ऑफ वेकफील्ड' वगैरे ग्रंथ त्यानें लिहिले. प्रसिद्ध आयरिश मुत्सद्दी रिचर्ड शेरिडन (१७५१–१८१६) हाही एक उत्तम नाटककार होता. त्यानें 'स्कूल फॉर स्कँडल,' 'रायव्हल्स' वगैरे नाटकें लिहिलीं. तोही जॉनसनचा चाहता व मित्र होता. जोनॅथन स्विफ्ट (१६६७–१७४५) यानें 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' हें सुंदर पुस्तक लिहिलें. ड्रेपियर या नांवाखालीं त्यानेंच पत्रें लिहिलीं असा लोकांचा समज आहे. रॉबिन्सन क्रूसो या जगप्रसिद्ध पुस्तकाचा लेखक डॅनियल डीफो (१६५९–१७३१) याच शतकांत होऊन गेला. टॉमस ग्रे (१७१६–१७७१), रॉबर्ट बर्न्स (१७५९–१७९६), शेले (१७९६–१८२२), जॉन कीटस् (१७९५–१८२१), विल्यम कूपर (१७३१–१८००), लॉर्ड बायरन (१७८८–१८२४) वगैरे कवि व लेखक याच शतकांत झळकले. प्रख्यात कादंबरीकार सर वॉल्टर स्कॉट (१७७१–१८३२) हा पुढें कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध झाला, तरी कवि म्हणून याच शतकांत प्रसिद्धी पावला. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ ॲडॅम स्मिथ (१७२३–१७९०) यानें आपला 'राष्ट्राची संपत्ति' हा ग्रंथ याच वेळीं प्रसिद्ध केला. एडमंड बर्क (१७२९–१७९७) या आयरिश मुत्सद्यानें 'फ्रेंच राज्यक्रांतीसंबंधीं विचार' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. तो मोठा तत्त्ववेत्ता मुत्सद्दी व उत्तम वक्ता म्हणून प्रसिद्ध होता. अलेक्झांडर पोप (१६८८–१७४४) हाही एक उत्तम कवि पहिल्या दोन जॉर्ज राजांच्या कारकीर्दींत होऊन गेला. सर्वांत ज्याची अतीशय कीर्ति झाली असा डॉ. जॉनसन होय. परंतु त्याच्या तोडीचा दुसरा एक जगमान्य लेखक म्हणजे एडवर्ड गिबन (१७३८–१७९४) हा होय. त्यानें 'रोमन साम्राज्याचा ऱ्हास' हा जगप्रसिद्ध ग्रंथ लिहिला. या सर्व लेखकांच्या व कवींच्या ग्रंथ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्तृत्वानें इंग्रजी वाङ्मय अत्यंत समृद्ध झालें. त्यांचे ग्रंथ अजूनही अत्यंत नांवाजले जातात.

१२. कला-विकास :—अठराव्या शतकांतील वाङ्मयसेवकांप्रमाणेंच अत्यंत नामांकित असे कलावंत व कुशल चित्रकारही याच शतकांत निर्माण झाले. टॉमस गेन्सबरो (१७२७–१७८८), सर जोशिया रेनॉल्डस् (१७२३–१७९२), जॉर्ज रोमने (१७३४–१८०२) वगैरे कुशल चित्रकार डॉ. जॉनसनचे स्नेही व जिव्हाळ्याचे मित्र होते. सन १७६८ मध्यें 'रॉयल ॲकॅडेमी ऑफ आर्ट' ही संस्था स्थापन होऊन टॉमस गेन्सबरो हा त्याचा पहिला अध्यक्ष झाला. त्या सर्वांची कुशल चित्रकार म्हणून अजूनही ख्याति आहे. डेव्हिड गॅरिक (१७१७–१७७९) हा उत्तम नट म्हणून त्यावेळीं अत्यंत प्रसिद्ध असून, तोही जॉनसनचा मित्र होता. शेक्सपियरच्या नाटकांतील उत्तम भूमिका तो अत्यंत कौशल्यानें वठवीत असे. त्या बाबतींत त्याचा हात धरणारा अजूनही झाला नाहीं असें म्हणतात. गोल्डस्मिथचाही तो मित्र होता व त्याचीं नाटकेंही त्यानें बसवून गोल्डस्मिथला पैसा व कीर्ति यांची जोड मिळवून दिली. सॅरा सिडॉन्स ही नटीही शेक्सपियरच्या नाटकांतील स्त्रियांच्या भूमिका उत्तम करीत असे. संगीताच्या बाबतींतही त्यावेळीं अनेक संगीतज्ञ उदयास आले होते. जॉन सेबॅस्टियन बॅश (१६८५–१७५०) या जर्मन संगीतशास्त्रज्ञानें उत्तम गाणीं रचलीं. प्रख्यात जर्मन संगीतशास्त्रज्ञ लडविक बीटहोवन (१७७०–१८२७) हाही एक स्वररचना शास्त्रांत नांवाजलेला होता. त्याची स्वररचना मनोवेधक व सुंदर असे. जोसेफ हेडन (१७३२–१८०९) व मोझार्ट (१७५६–१७९१) यांनींही स्वररचना उत्तम केली असली तरी ती बीट होवनच्या खालोखालच होती.



डेव्हिड गॅरिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. अठराव्या शतकांतील कांहीं ठळक विशेष सांगा.

२. अठराव्या शतकांत इंग्लंड व फ्रान्स यांच्यामधील चुरस कोणत्या प्रकारची होती ? त्याचा परिणाम काय झाला ? त्या देशांमध्यें झालेल्या युद्धांचीं परिणामांसह कारणें द्या.

३. अनियंत्रित राजसत्ता नष्ट होऊन पार्लमेंटची सत्ता इंग्लंडमध्यें अठराव्या शतकांत सुरू झाली हें म्हणणें कितपत खरें आहे ? कारणांसह स्पष्ट करा.

४. प्रधानमंडळात्मक राज्यपद्धति म्हणजे काय ? ती इंग्लंडमध्यें कशी रूढ झाली ? पहिले दोन जॉर्ज त्या गोष्टीला कितपत कारणीभूत झाले ?

५. खालीलसंबंधीं एका वाक्यांत महत्त्वपूर्ण उल्लेख करा.

डॉ. जॉनसन, गॅरिक, लॉर्ड नेल्सन, चॅटहॅम, वॉलपोल, बीट होवन, गेन्सबरो, गिबन, हॉवर्ड, जेनर, हर्शेल, कुक, जॉन हॅरिसन.

६. 'आरमारी श्रेष्ठत्वामुळेंच अठराव्या शतकांत इंग्लंडचा व्यापार वाढला, नेपोलियनचा पराभव झाला व इंग्लंडच्या साम्राज्याची वाढ झाली.' हें विधान सप्रमाण सिद्ध करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अठराव्या शतकांतील लोकांची राहणी

१. सामाजिक स्थिति :—औद्योगिक क्रांतीमुळें इंग्लंडच्या सामाजिक स्थितींत महत्त्वाचे फरक झालेले होते. क्रांतीच्या पूर्वी मात्र समाजांत फारसा फरक पडलेला नव्हता. त्या वेळीं अनेक पिढीजाद सरदार नष्ट झाले होते व नवे सरदार उदयास आले. त्यामुळें जुन्या श्रीमंतांचें तें राजशाही थाटांत राहणें, त्यांचे राजतुल्य प्रासाद, त्यांचा भपका, त्यांचा डामडौल, त्यांची श्रीमंती ऐट हीं सर्व नष्ट झालीं होतीं. नव्या पिढींतील उमराव गरिबींतून वर आलेले असल्यानें त्यांचा नोकझोक पूर्वींच्या सरदारांच्या नोकझोकास साजेसा नव्हता. परंतु त्यांच्या श्रीमंतीसही औद्योगिक क्रांतीनंतर उतरती कळा लागली व त्यांना पूर्वींप्रमाणें समाजांत फारसा मान मिळेनासा झाला. बडे व्यापारी, धंदेवाले, कारखानदार, जमीनदार वगैरे अनेक लोक त्या वेळीं श्रीमंत झाले होते व ते लोक जुन्या श्रीमंतांवर व उमरावांवरही वरताण करूं लागले होते. औद्योगिक क्रांतीच्या वेळीं त्यांनीं अपार संपत्ति मिळविली व वतनें, वाड्या व जमिनी विकत घेण्याचा सपाटा चालविला. त्यामुळें त्यांचा सामाजिक दर्जा वाढून समाजांत त्यांना उमरावांच्या बरोबरीनें मान मिळूं लागला. यामुळें जुन्या सरदार उमरावांचें समाजांतील वजन कमी होऊन त्यांच्या हातां तील राजकीय सत्ताही हळूहळू नष्ट होऊं लागली. नवे श्रीमान् लोक आपल्या ऐटींत व श्रीमंतींत असत, त्यामुळें पूर्वींच्या सरदारांमध्यें व कनिष्ठ वर्गीयांमध्यें जो एकप्रकारचा प्रेमभाव व सलोखा वसत असे तो नष्ट होऊन त्याची जागा वर्गद्वेष व वर्गकलह यांनीं घेतली. त्यामुळें हिंदुस्थानांत जातिसंस्था असल्यामुळें जे प्रकार होतात ते इंग्लंडमध्यें होऊं लागले. तसेंच भांडवलवाल्यांचा वर्ग प्रबळ झाल्यानें मजूरही त्यांचा द्वेष करूं लागले. एका दृष्टीनें राष्ट्रावर ही आपत्ति असली तरी दुसऱ्या दृष्टीनें ती इष्टापत्तिच ठरली. या वर्गाच्या खालोखाल सुखवस्तु गृहस्थांचा मध्यम वर्ग होता. ह्या लोकांत मिरासदार, देशमूख, पट्टेदार, छोटे जमीनदार वगैरे लोक मोडत. हे लोक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फारसे श्रीमंत नव्हते, परंतु काटकसरीची राहणी, कामसूवृत्ति, बदलत्या काळाचा ओघ लक्षांत घेऊन त्याप्रमाणें वागण्याची त्यांची तयारी वगैरे गोष्टीं-मुळें या वर्गांतील लोकांनाही एकप्रकारें समाजांत महत्त्व प्राप्त झालें होतें. हे लोक आपल्या शेती–वाडींत रहात, सामाजिक, राजकीय वगैरे बाबतींत पुढा-कार घेत व पार्लमेंटमध्यें निवडून येत. औद्योगिक क्रांतीनंतर त्यांच्या स्थितीं-तही फरक पडला. शेतास कुंपणें घालण्याची पद्धति सुरू झाल्यानें ब्ऱ्याच लोकांचें नुकसान झालें व या वर्गापैकीं जे बरेच सधन होते त्यांनीं जमिनीचे लहान लहान पट्टे विकत घेतल्यानें अनेक लोक गरीब झाले. या वर्गानंतर कामकरी, शेतकरी, मजूर, शेतमजूर वगैरे लोकांचा वर्ग त्यावेळीं इंग्लंडांत होता. त्यांना शेतावर, कारखान्यांत, खाणींत वगैरे ठिकाणीं काम करावें लागे. दिवसभर काम करावें व पोटापुरती मजुरी मिळवून आपल्या कुटुंबाचें कसें तरी पोषण करावें हेंच या वर्गांतील लोकांचें काम ! त्यांचें पोट खरेंखुरें हातावर असे. घरांतही अठरा विश्वे दारिद्र्य! सकाळीं सहापासून संध्याकाळीं सहापर्यंत त्यांना काम करावें लागे. कारखान्यांतून कांहीं कांहीं ठिकाणीं ते रात्रीं आठआठ नऊनऊपर्यंतही काम करीत. औद्योगिक क्रांतीपूर्वीं त्यांना घरीं राहून कांहीं घरगुती धंदा करतां येऊन आपल्या उत्पन्नांत अल्पशी भर घालतां येई. परंतु तीही आतां त्यांना घालतां येईनाशी झाली. यामुळें या वर्गांतील लोक अत्यंत असंतुष्ट झाले होते. नेपोलियनशीं चाललेल्या युद्धानंतर त्यांची स्थिति अत्यंतच वाईट झाली. कांहीं कारखाने बंद झाले, कांहींना काम भर-पूर मिळेना. त्यामुळें अनेक लोक बेकार बनले. फ्रेंच राज्यक्रांतीचें उदाहरण त्यांच्या डोळ्यांसमोर असल्यानें त्यांच्या मनांतही स्वातंत्र्याच्या कल्पनांनीं घर केलें व 'ईश्वरानें सर्व मनुष्यांचा दर्जा एकच ठेवला असल्यानें सर्व लोक सारखे आहेत, त्यांच्यांत भेदाभेद नाहींत व ते नसले पाहिजेत, त्यांचे हक्क व अधिकार सारखे असले पाहिजेत' असे विचार त्यांच्या मनांत येऊं लागले. अर्थात यामुळें उच्चवर्गीयाबद्दल त्यांच्यांत द्वेष, मत्सर व तिरस्कार उत्पन्न होऊं लागला. त्याचें पर्यवसान दंग्यांतही झालें, हें आपण मागें पाहि-लेंच आहे. 'मजूरसंघ' ऊर्फ ट्रेड यूनियन्सही स्थापन होऊं लागले होते. हिंदुस्थानांतील जातिसंस्था जितक्या अढळ, तितके इंग्लंडमधील वर्गभेद

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिथिल. त्यामुळें कोणासही निराश होण्याची पाळी येत नसे. अंगीं गुण असले म्हणजे वैयक्तिक कर्तबगारीच्या जोरावर कोणालाही समाजांतील श्रेष्ठ स्थान पटकावतां येई हा इंग्लिश समाजाचा विशेष होय.

२. धार्मिक स्थितिः—अठराव्या शतकांत इंग्लंडमधील धार्मिक जीव-



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नांतही फरक झालेला होता. धर्मस्वातंत्र्याचा कायदा पास झाल्यापासून निरनिराळ्या धर्मपंथांतील लोकांना आपापल्या भावनेप्रमाणें व कल्पनांप्रमाणें धार्मिक प्रार्थना करतां येत. यामुळें इंग्लंडमध्यें प्रस्थापित धर्माला जरी राजाश्रय होता तरी अनेक पंथोपपंथांचें फावलें. धर्मस्वातंत्र्याचा कायदा पास झाला असला तरी कॉर्पोरेशन कायदा व धर्मकसोटीचा कायदा हे रद्द झालेले नव्हते. अर्थात प्रॉटेस्टंटांशिवाय इतरांस सरकारी नोकऱ्या मिळत नसत व त्यामुळें अशा लोकांचा आपल्या धर्मावरील विश्वास हळूहळू कमी होऊं लागला होता. धर्मगुरूंचें आचरण चांगलें नव्हतें व त्यांची बढती होई ती त्यांच्या गुणांमुळें किंवा धार्मिक बाबतींत त्यांचा अधिकार श्रेष्ठ होता म्हणून नव्हे, तर त्यांची मोठमोठ्यांशीं ओळख होती म्हणून! यामुळें धर्मगुरूंबद्दल प्रत्यक्ष-पणें व धर्माबद्दल अप्रत्यक्षपणें लोकांना तिरस्कारच वाटूं लागला होता. त्यांतच धर्मासंबंधीं बायबलांत सांगितलेल्या गोष्टी सत्यास धरून नाहींत असें टॉमस पेन, बेंजामिन फ्रँकलिन वगैरे लोक सांगत. भौतिकशास्त्र, रसायन-शास्त्र, भूस्तरशास्त्र वगैरे शास्त्रांत नवे नवे शोध लागूं लागल्यानें बायबल-मधील जगदुत्पत्तीबद्दलचें वर्णन सर्वथैव खोटें आहे असें वरील लोकांचें सांगणें होतें. त्यांच्या विचारांचा पगडा लोकांच्या मनावर बसल्यानें लोकांचा धर्मावरील विश्वास उडूं लागला. धर्मगुरू धार्मिक कृत्यांत गुरफटून राहण्या-पेक्षां चैन, मिजास, शिकार, वगैरेंत दंग असत. या सर्व गोष्टींमुळें लोकही धार्मिक कृत्यें विसरूं लागले व धर्माबद्दल त्यांना तिटकाराच वाटूं लागला. चर्चमध्यें गेलें नाहीं तर प्रत्येकास दंड द्यावा लागे, तरीही लोक प्रार्थनेस जाईनासे झाले. खेडेगांवांत अजून भोळे व धर्मावर अखंड विश्वास ठेवून धर्मगुरूंना प्रतिदेव मानणारे लोक होते; परंतु तेथील देवळेंही पूर्वी प्रमाणें आठवडाभर उघडीं न राहतां, रविवारखेरीज दररोज बंद ठेवण्यांत येत. पूर्वी धर्मच्छळ होई, तोही आतां होईनासा झाल्यानें प्रत्येकाला स्वेच्छेनें वाटेल तसें वागतां येई. ही सर्व स्थिति लक्षांत घेऊनच लोकांच्या धार्मिक जीवनांत फरक पाडण्याकरितां जॉन वेस्ले यानें ‘ कर्मनिष्ठाचा पंथ ’ काढला. लोकांच्या छळास न जुमानतां त्यानें अखंड धर्मोपदेश केला. त्यानें लोकांच्या वृत्तींत थोडा फरक पडला, चैन थोडी कमी झाली, लोकांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीवनांत गांभीर्य येऊं लागलें, दुसऱ्यांबद्दल त्यांना प्रेम वाटूं लागलें, व त्यांच्या धार्मिक जीवनाला खतपाणी मिळाल्यानें तें टवटवीत झालें.

३. शहरांतील जीवन :— अठराव्या शतकांत मोठमोठीं शहरें उदयास येऊं लागलीं. ब्रिस्टल, मँचेस्टर, शेफील्ड, बर्मिंगहॅम, नॉर्विच, यॉर्क, न्यूकासल वगैरे अनेक शहरें तेथील उद्योगधंदे व कारखाने यांमुळें प्रसिद्धीस आलीं. त्यामुळें जो उठला तो शहरांत येऊन राहूं लागला; अर्थात खेडीं उजाड होऊं लागलीं. खेड्यांत राहण्यापेक्षां शहरांत येऊन राहिल्यानें थोडासा पोटापाण्यापुरता धंदा मिळेल अशी प्रत्येकास आशा होती. कारखाने, पेढ्या, मोठमोठ्या कंपन्या व उद्योगधंद्यांचीं केंद्रें लहानमोठ्या शहरांतूनच असत. त्यामुळें शहरांतून नानाप्रकारच्या उलाढाली चालत. व्यापार वाढल्यानें लंडनच्या बंदरांत व्यापारी जहाजांचा तांडाच्या तांडा असे. जिकडे तिकडे श्रीमंती दिसून येऊं लागली होती. जुनीं घरें पाडून टाकून नवीं बांधण्यांत येत. अर्थात जेथें असे प्रकार होत तेथील रस्तेही चांगले रुंद होऊं लागले. गिरण्या, कारखाने वगैरे ठिकठिकाणीं दिसत व त्यांतून काम करणारे असंख्य लोक शहरांतून कष्टानें अगर मजेनें चाललेले पाहतांना तिऱ्हाइताच्या मनांत संमिश्र भावना उमटत. कारण उत्पन्नावरील कर, धान्याच्या चढलेल्या किंमती, खेडीं सोडून शहरांत राहण्याकरितां आलेल्या लोकांची एकसारखी होणारी वाढ, मजुरांच्या पगारांत होणारी काट वगैरे गोष्टीमुळें शहरांतील लोकही दारिद्र्यानें पीडलेले होते असें म्हणतां येईल. श्रीमंतांची स्थिति चांगली होती; कारण त्यांच्याजवळ पैसा खेळत होता; परंतु गरिबांचे हाल मात्र फार होत. शहरांच्या लोकसंख्येंत वाढ झाली, तरी त्याबरोबर दारिद्र्यानेंही वाढत्या लोकसंख्येला भेडसावण्यास कमी केलें नाहीं. शहरांतील रस्ते मात्र नेहमीं गजबजलेले असत. पूर्वीप्रमाणें ते अजूनही अरुंद व अस्वच्छ असत. तरीही त्यांतून भपकेदार पोषाख करून नटूनथटून जाणारे लोक होते. रस्त्यांतून मजुरवर्गांतील लोक गाणीं म्हणत जात, फेरीवाले मोठमोठ्यानें ओरडून आपला माल खपविण्याचा प्रयत्न करीत, पोवाडेवाले ठिकठिकाणीं उभे राहून पोवाडे म्हणत, माल विकणारे रस्त्यारस्त्यावरील मोक्याच्या ठिकाणीं बसून व तेथेंच छोटेसें दुकान चालवून किरकोळ देवघेव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करीत, गाड्यांघोड्यांची रीघ लागे व पदस्थांचा स्वैरसंचार चाले. या सर्व गोष्टींमुळें रस्त्यांतून होणारा गोंधळ मात्र अपूर्व असे ! पोलिसांची व्यवस्था त्यावेळींही नव्हती. त्यामुळें त्या गोंधळांत कोणत्याही प्रकारची शिस्त फारशी आढळून येत नसे. भांडणावरून दिवसाढवळ्या भररस्त्यावर मारामाऱ्या नेहमींच चालत व त्यांचा शेवट द्वंद्वयुद्धांतच होत असे. रस्त्याच्या लगतच मोठमोठीं दुकानें असत व त्यांना छोट्याछोट्या तावदानाच्या खिडक्या असत. दुकान कसलें तें ओळखण्याकरितां पूर्वीं खुणा लटकत ठेवीत असत; त्या आतां दुकानाच्या पुढें खिळ्यांनीं ठोकून बसविण्यांत येऊं लागल्या. घरांच्या बांधणींत फारसा फरक झालेला नव्हता. लंडनसारख्या शहरांतून मोठमोठ्या नव्या इमारती उठूं लागल्या असल्या, तरी इतर शहरांतून एकमेकांना खेटून बांधलेलीं घरें अजूनही कायम होतीं. रात्रींच्या वेळीं दिवे लावण्यांत येत नसत. त्यामुळें चोरांचिलटांचें चांगलेंच फावे ! लहानसहान गुन्ह्यांकरितां फाशींची शिक्षा असतांही रस्त्यांतून भटकणाऱ्या लोकांच्या जमावांत घुसून अनेक लफंगे, चोर, गुंड व लुच्चे आपलें काम साधीत. गरिबीनें गांजलेले, बेकार, बेफाम झालेले व गुंडगिरी करण्यांत तरबेज असलेले लोक अशीं कामें हमखास करीत. उलट ते धरले गेल्यावर त्यांच्या फाशींची अगर इतर शिक्षांची गंमत पहाण्याकरितां लोकांचे थवेच्या थवे लोटत व फाशीं जाणाऱ्या अगर शिक्षा भोगणाऱ्या लोकांनीं शिक्षा भोगतेवेळीं दाखविलेल्या धैर्याचें साश्चर्य कौतुकही करीत ! मोठमोठ्या शहरांतून पूर्वींप्रमाणें निरनिराळे अधिकारी असत, व स्थानिक कारभारही लोकांच्या हातीं होता. लंडनच्या मेयरला अधिकारही बरेच होते. मॅजिस्ट्रेट म्हणूनही तो काम करीत असे.

४. खेडेगांवांतील जीवन :—शहरांच्या मानानें खेड्यांतील लोक औद्योगिक क्रांति होण्यापूर्वीं होते तसेच गांवढळ व मागासलेले होते. 'बाबा वाक्यं प्रमाणम्' या तत्त्वाला लोंबकळत राहिल्यानें त्यांच्यांत फारशी सुधारणा झालेली नव्हती. जुने रीतिरिवाज, जुन्या चाली, शेतीची जुनी पद्धति वगैरे सर्व जसेंच्या तसेंच होतें. त्यांची ती तीन शेतांची पद्धति व एका वर्षाआड एकेक शेत तसेंच राखून बाकीचीं दोन शेतें लागवडीस आणणें अजूनही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



अठराव्या शतकांतील वाहतूक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खेड्यांत कायम होतें. इंग्लंडच्या इतर भागांत शेतीच्या बाबतींत अनेक प्रकारच्या सुधारणा होत असतांही खेडेगांवचे शेतकरी त्या अमलांत आणीत नसत. त्यामुळें शेतांतून थोडें पीक निघे, गुरेढोरें खावयास न मिळाल्यानें अशक्त असत व त्यांची वाढही पूर्ण झालेली नसे. नाना प्रकारचे रोग उद्भवूनही गुरें मरत. शेतांतून कुरपणी व कुळवणी न झाल्यानें गवत उगवे व शेतांची नासधूस होई. ओसाड व नापीक म्हणून बरीच जमीन शिल्लक राही. परंतु ही स्थिति औद्योगिक क्रांतीनंतर बरीच सुधारली. श्रीमंत लोक व जमीनदार खेड्यांतील शेती विकत घेऊं लागले व शेतांस कुंपणें घालण्याची पद्धति मोठ्या प्रमाणावर त्यांनीं सुरू केली. त्यामुळें पीक पुष्कळ निघूं लागलें, गुरांची निगा चांगली राहूं लागल्यानें तीं धष्टपुष्ट होऊं लागलीं, ओसाड जमीनही लागवडीस येऊं लागली व एकंदरींत शेती सुधारली. परंतु या पद्धतीमुळें अनेक गरीब शेतकरी बेकार झाले, लहान पट्टे जाऊन मोठमोठीं शेतें होऊं लागल्यानें त्यांच्या झोपड्याही नष्ट होऊं लागल्या, गरिबांच्या जमिनी विकल्या जाऊं लागल्या व त्यामुळें लहान लहान जमीनदार, पट्टेदार व छोटे मिरासदार वगैरे सर्व लहान लहान वर्ग नामशेष होऊं लागले. शेती गेली व काम मिळण्याकरितां खेड्यांतील लोकांना शहरांकडे वळावें लागलें. तों तेथेंही बेकारी त्यांच्यापुढें हजरच ! खेड्यांत राहिलेल्या लोकांचे मात्र अत्यंत हाल होत. मोलमजुरी करूनही त्यांस पोटापुरतें मिळत नसे. त्यांचीं शेतें गेलीं, कारखान्यांनीं त्यांचे घरगुती धंदे बुडविले, घरें नष्ट झालीं व गुरेंही नाहींशीं झालीं. तशाही स्थितींत त्यांस कर द्यावे लागत. या सर्व कारणांमुळें खेड्यांत दंगेही होत असत. जणूं हात धुऊनच दारिद्र्य त्यांच्या मागें लागलें होतें ! गरिबांचा हा वर्ग सोडला तर त्या वेळचे खेड्यांतील शेतकरी चांगले सधन होते. शेतीचें पीक चांगलें येई. त्याला भावही चांगला होता. त्यामुळें तो चार पैसे बाळगून असे. तो घरेंही चांगलीं बांधी व त्यांत चांगल्या तऱ्हेनें राही. तरीही त्यांच्यांतील अडाणीपणा गेलेला नव्हता. ते अत्यंत भोळसर व खुळे होते. धर्माची त्यांच्या मनावर पक्कड चांगलीच होती. उत्सव, महोत्सव, यात्रा, जत्रा वगैरेमध्यें ते नेहमीं गुंगून जात.

५. **दळणवळण–सडका :**—औद्योगिकक्रांतीमुळें दळणवळणास योग्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे रस्ते व सडका होऊं लागल्या होत्या. टोलनाकीं असलेल्या सडकाही चांगल्या स्थितींत होत्या. त्यांवरून दळणवळण चांगल्या प्रकारें चाले. परंतु या सडकांव्यतिरिक्त इतर सडका पूर्वीप्रमाणेंच हीन स्थितींत होत्या. या रस्त्यांवरून आठ घोड्यांच्या गाड्या खचून माल भरून घेऊन ढकलगाडी-प्रमाणें हळू हळू जात! घोड्यांच्या पाठीवरूनही माल नेला जाई. 'स्टेजकोच' नांवाच्या भाड्याच्या गाड्यांमधून प्रवास करण्याची त्या वेळीं सर्रास पद्धति होती. या गाड्यांच्या आंत व बाहेरही लोक बसत. गाडीच्या वर बसणें धोक्याचें असूनही तेथें बसण्यास लोक कमी करीत नसत. ही गाडी भरधांव नेत. गाडीच्या वर व आंत बसणारांचे त्यामुळें फारच हाल होत. रस्ते वाईट व खाचखळग्यांचे असले म्हणजे गाडी मोडे व क्वचित प्रसंगीं ती उलटे! ज्या ठिकाणीं रस्ते नसत त्या ठिकाणीं लहान ओढ्यावरून उड्या मारून व मोठ्या ओढ्यावरून उंच कळकांच्या साहाय्यानें उड्या मारून लोक जात. लहान लहान होड्यांतूनही प्रवास होई. त्यावेळीं मुलें, माणसें, स्त्रिया, मालाचीं पोतीं, घोडीं, कुत्रीं, डुकरें वगैरे एकाच होडींत बसून हा लहानसा प्रवास संतोषानें उरकीत! परंतु प्रवासांत चोरांची व दरोडेखोरांची भीति फार असे. त्यामुळें प्रवासांत असतां लोकांच्या मनांत नेहमीं धास्ती असे. औद्योगिक क्रांतीनंतर सडका सुधारूं लागल्या, गाड्याही चांगल्या मिळूं लागून त्यांच्या बांधणींत व गतींतही फार फरक होऊं लागला. अर्थात प्रवास थोडा सुखाचा होऊं लागला. प्रवाशांच्या सोयीकरितां ठिकठिकाणीं खाणावळी होत्या. 'स्टेजकोचेस' अगर टपालगाड्या त्या ठिकाणीं थांबत. त्या वेळीं त्या गांवांतील अनेक लोक हातांतील कामधंदा सोडून अड्डयावर येत. मुलें मजा पाहात व भोळीं माणसें टपालगाड्यांच्या येण्याजाण्यावरून आपलीं घड्याळें लावीत! एकंदरींत पाहतां सतराव्या शतकांतील प्रवासापेक्षां अठराव्या शतकांतील प्रवास थोडाफार सोयीचा व सुखाचा झाला होता. पोस्टाच्या गाड्यांतील प्रवास सुखकर, सोयीचा व सुरक्षित समजला जाई! त्यामुळें श्रीमंत लोक मैलास एक शिलिंग याप्रमाणें भाडें देऊनही टपालगाड्यांतून प्रवास करीत असत. या गाड्यांतून पत्रेंही ठराविक दरांत पाठविण्याची सोय होती. टपालहंशील एक पेनीपासून सहा पेन्सपर्यंत होतें. सरकारी व खाजगी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पत्रेंही अशींच जात. क्वचित ठिकाणीं घोड्यावरूनही पत्रें व टपाल पोचविण्याची सोय, पूर्वीप्रमाणेंच, चालू ठेवण्यांत आली होती.



सरकारी टपालगाडी १८२०

६. घरें-इमारती :—अठराव्या शतकांतील घरें बांधण्याच्या पद्धतींतही पुष्कळ क्रांति झाली होती. पुष्कळ लोक त्या काळीं इटालीमधून प्रवास करून इंग्लंडला परत आले होते व त्यांना पूर्वींचीं घरें आवडेनाशीं झालीं. तेव्हां त्यांनीं इटालियन पद्धतीप्रमाणें घरें बांधण्यास सुरुवात केली. त्यामुळें अनेक चांगलीं घरें त्या काळीं बांधलीं जात. हीं घरें तांबड्या विटांचीं, चुन्यांत बांधलेलीं असत. खिडक्या तावदानाच्या असत व त्या प्रमाणबद्ध असत. खिडक्यांमुळें घराला अपूर्व शोभा येई व शिवाय हवा व उजेड मुबलक मिळे. घरास जितक्या जास्त खिडक्या तितका घरमालक श्रीमंत, अशी त्या वेळीं कल्पना असल्यामुळेंच पिटनें खिडक्यांवर कर बसविला होता. मोठमोठ्या घरांतून लोखंडी व वर्तुळाकार जिने वापरण्यास सुरुवात झाली होती. घरांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिंतीही रेखीव असत व त्यांवर फळ्या ठोकण्यांत येत. दारें व कठडे लोखंडी असत. छपरांवर कौलें घालण्याची पद्धति होती. स्वयंपाकघर, भोजनगृह, बसण्याची खोली, निजण्याची खोली, अभ्यासाची खोली, अतिथिगृह वगैरे अनेक खोल्या त्या वेळीं बांधण्यांत येऊं लागल्या होत्या. घराजवळ बाग असे व मालक तिची फार काळजी घेई. घरांतील फर्निचर ओक वृक्षाच्या लाकडाचें न करतां, तें बीच किंवा वॉलनट या झाडांच्या लांकडाचें करण्यांत येई. त्यामुळें तें सुंदर व हलकें होई. मोहागनी लाकडाचें फर्निचर अत्यंत महाग पडे. निजावयाचे पलंग लोखंडाचे व तंबूच्या आकाराचे होऊं लागले होते. श्रीमंत लोक टोलेजंग हवेल्यांतून रहात व त्यांचीं घरें अत्यंत श्रीमंती थाटाचीं असत. त्यांतून नोकराचाकरांस राहण्याकरितां स्वतंत्र पण घराच्या बाजूला लहान लहान खोल्या असत. किंवा तळघरांत त्यांना रहावयास जागा मिळे. त्यावरून नोकरांस त्या काळीं कसें वागविण्यांत येई तें कळतें. अत्यंत गरीब लोक झोपड्यांतूनच रहात. या झोपड्या लांकूड, माती व मिळाल्यास चुना यांच्या असत. त्यांस खिडक्या फार थोड्या असत; बहुधा नसतच. घरांत शेगड्या असत व त्यांच्यामुळें थंडीपासून त्यांचें निवारण होई. उजेडाकरितां श्रीमंत लोक मेणबत्त्यांचा उपयोग करीत, गरीब लोक लव्हाळीं वापरीत. मात्र तीं वापरण्यापूर्वीं त्यांना चरबींत बरेच दिवस भिजत ठेवावें लागे. सध्यांप्रमाणें त्या वेळीं गुलाच्या आगकाड्या नव्हत्या, चकमकीच्या पेट्या घरोंघरीं असत. त्यांच्या साहाय्यानें दिवे अगर चूल पेटवावी लागे. घरांत धुरांडीं असत, पण तीं लहान ठेवण्यांत येऊं लागलीं. त्यामुळें तीं वेळोवेळीं स्वच्छ करतां येत नसत. त्याकरितां लहान लहान मुलें मोलानें आणावीं लागत. तीं धुरांड्यांत शिरून तीं स्वच्छ करीत. एक धुरांडें स्वच्छ व साफ केलें तर एका मुलाला फक्त सहा पेन्स मिळत. राजवाडेवजा मोठमोठीं घरें मात्र फारच सुंदर व आकर्षक असत. तीं अजूनही इंग्लंडमध्यें ठिकठिकाणीं दिसतात.

७. अन्न व खाद्यपेयें :—या शतकांतील लोकांच्या खाद्यपेयांत फारसा फरक पडलेला नव्हता. साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतून तांदूळ, गहूं, मका, फळें, चहा, कॉफी, साखर, दारू वगैरे अनेक प्रकारचे जिन्नस इंग्लंडमध्यें येऊं लागले होते; व ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें जो तो ते घेऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जेवीत असे. श्रीमंत लोक मांस, मासे, अंडीं, गव्हाची भाकरी, लोणी, दूध, फळें वगैरे पदार्थ नित्य सेवीत. चांगली दारू, चहा, कॉफी वगैरे पेयेंही श्रीमंती म्हणून समजण्यांत येत असत. हातानें जेवण्यापेक्षां कांटे-चमचे-सुऱ्या यांच्या साहाय्यानें जेवण्याची श्रीमंतांची पद्धति होती. चमचमीत पदार्थ खार-वलेले मासे, मांस व इतर जिन्नस, मुरंबे, चीज वगैरे जिन्नसाही श्रीमंतांच्या जेवणांत येत. भाज्यांमध्यें कोबी, बटाटे, बीट, मुळे, पावटे वगैरे अनेक कंद-मुळें-फळें असत. गरिबांचें अन्न अत्यंत साधें व हलकें असे. मध, मांस, चहा-कॉफी व मासे त्यांच्या जेवणात क्वचितच असत. ओटच्या भाकरी, लोणी, कांदे, बटाटे, वगैरे जिन्नस ते खात. सणावारीं मांस अगर मासे ते खात; परंतु तें त्यांस परवडत नसे. दारू अत्यंत महाग असल्यामुळें ते ती पीत नसत. त्या ऐवजीं ते बियर अगर एल दारू पीत. ती दारू हलकी व स्वस्त असे. तरी तीही प्रत्यहीं पिण्याइतकी त्यांच्यांत ऐपत नव्हती. मोठमोठ्या शहरांतून खाणा-वळींतून जेवण्यास हळूहळू सुरुवात झाली होती. खेड्यांत ती सोय नसल्यानें स्त्रियाच सर्व स्वयंपाक करीत. शहरांतून श्रीमंतांच्या घरीं स्वयंपाकाचें काम स्त्रियांकडून मोलानें करवण्यांत येई. गरीब लोक लंडनसारख्या मोठ्या शह-रांत घरांच्या माळयावर रहात, तेथें फक्त रात्रीं झोंपत व दिवसभर शहरांतील मित्रांकडे अगर कॉफीगृहांत बसून गप्पा मारीत! रात्रीं आपल्या माळयावर झोंपावें, सकाळीं उठून एका पेन्समध्यें सकाळची न्याहारी उरकावी, मग दुपारीं कॉफीगृहांत बसून गप्पा मारीत तीन पेन्स देऊन यथेच्छ कॉफीपान करावें, संध्याकाळीं सहा पेन्स देऊन कोठें तरी जेवण उरकावें व रात्रीं थंडा फराळ करून पुन्हां आपल्या माळयावरील जागेंत जाऊन झोपावें असा त्यांचा जीवनक्रम होता! डॉ. जॉनसनला तो फार आवडे. यावरून गरिबांचे हाल किती होत असतील याची कल्पना येते. आणि म्हणूनच सन १७९५ मध्यें 'आम्हांस भाकरी द्या भाकरी' असें म्हणत लोकांनीं राजपालकाच्या गाडीवर हल्ला केला होता.

८. पोषाख–कपडे-लत्ते :—या शतकांत कपड्यांत पुष्कळच फरक पडलेला होता. ट्यूनिक झगा जाऊन त्याची जागा सध्यांच्यासारख्या कोटानें घेतली होती. जाकीटें व विजारी वापरण्यास सुरुवात झाली होती. कोट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



सन १८०७-०९ च्या सुमाराचे शास्त्रीय संशोधक (पोषाखाकरितां)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पायमोजापर्यंत पोंचतील इतके लांब असत. त्यांच्या बाह्यांतून शर्टचे कफ बाहेर दिसत. शर्ट पांढरे अगर रंगीत पट्ट्यांचे असत. श्रीमंत लोक रेशीम, सॅटिन अगर मखमलीचे कपडे वापरीत व त्यांना फिती लावीत. गळ्याभोवतीं गळपट्टे वापरण्याची पद्धति होती. लोक डोक्यावर लांब केस ठेवीत व केसांचे टोपही वापरीत. मोठ्या समारंभास जावयाचें असल्यास ते आपल्या केसांस अगर टोपांस अत्तरें, सेंट, पावडर वगैरे फांसून त्यांना मुद्दाम कुरळे वळण देत. डोक्याला तिकोनी टोप्या घालण्याची पद्धति होती. पायांत बूट, हातांत काठी अगर छत्री, कोटाच्या खिशांत तपकिरीची डबी व बाजूला लटकत असलेली तरवार अशा थाटांत लोक सदैव मिरवीत. रात्रीच्या वेळीं कानटोपी व झगा वापरण्यास सुरुवात झाली होती. स्त्रियांच्या पोषाखांतही क्रांति झाली होती. त्य ‾ ठमलीचे, चिटाचे, रेशमाचे अगर मखमलीचे कपडे वापरीत. त्याही लांब कोट वापरूं लागल्या होत्या व त्यारून घेरेदार झगे वापरीत. डोक्यास लांब केस असूनही त्या गंगावनें वापरीत. केसांचें चक्कर बांधून पावडर फांशीत व मग त्यावर टोप्या घालीत. त्यांच्या टोप्या लहान असत. केसांवर लावलेल्या फळें, होड्या, फुलें, लहानग्या उशा वगैरे कृत्रिम जिन्नसा उठून दिसत. त्यांचा डोक्यावर भार झाल्यानें त्यांना चालतांही येत नसे. त्यामुळें श्रीमंतांच्या बायका ‘ सेडन ’ नामक खुर्चीतून जात. उंच अगर सपाट टाचांचे बूट वापरण्याची पद्धति होती. चिखलांत बूट भरूं नयेत म्हणून त्यांच्या टाचांना लांकडी खडावाही ठोकण्यांत येत. पायमोजे, कपडे, बूट वगैरेंची रंगसंगति साधण्याकडे स्त्रिया लक्ष देत असत. पावडर, अत्तरें, रंगीबेरंगी फिती, सोन्याचांदीचे दागिने यांची स्त्रियांस फार आवड असे.

९. खेळ–करमणूक :—पूर्वीच्यासारखेच खेळ खेळले जात. खरें पाहतां, युद्धामुळें खेळ खेळण्यास लोकांस फारसा वेळ मिळाला नाहीं; तरी क्रिकेट, टेनिस, फुटबॉल, पालमाल, स्केटिंग, निशाणबाजी वगैरे खेळ खेळले जात. श्रीमंतांस शिकारीचा व घोड्यांच्या शर्यतींचा फार शोक होता. कोंबडीं, बैल, अस्वलें वगैरेंच्या झुंजी लावल्या जात; परंतु त्यांचें प्रमाण पूर्वीपेक्षां फारच कमी झालेलें होतें. द्वंद्वयुद्धें, मुष्टियुद्धें वगैरेही नेहमीं चालत. त्यांना राजाश्रय असे. भांडणावरूनही कधीं कधीं भररस्त्यांत द्वंदयुद्धें चालत. द्वंद्वयुद्ध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खेळून तें जिंकल्यानें आपली बाजू खरी आहे असें सिद्ध होतें अशी लोकांची कल्पना होती. नाटकें पाहण्याची लोकांस अत्यंत हौस असे. शेक्सपियर, शेरिडिन, गोल्डस्मिथ, बेन जॉनसन, वगैरेंचीं नाटकें त्यावेळीं होत. गॅरिक या प्रसिद्ध नटानें कपडे, देखावे, नेपथ्यरचना, संगीत वगैरे बाबतींत थिएटरांची सर्व प्रकारांनीं सुधारणा केल्यानें लोकांस नाटकें पहावींशीं वाटत. तशांतच गॅरिकसारख्या नटाचें कामही चित्ताकर्षक होई. स्त्रियांचीं कामें स्त्रियाच करीत. थिएटराचे दरवाजे पांच वाजतां उघडून खेळाची सुरुवात सहाला होई. नाटकाप्रमाणेंच सर्कशीनेंही लोकांस वेड लावलें होतें. घोडे, कुशल स्त्रिया, विदूषक, हत्ती वगैरेंचीं कामें लोकांस फार आवडत. जुगारीचें व्यसन लोकांस फार लागलें होतें. अनेक प्रकारचे खेळ पैसे लावून खेळले जात. संगीताची, विशेषतः वाद्यसंगीताची, लोकांस चटक लागली होती. इतके दिवस गवय्याचे जलसे होत नसत, परंतु अठराव्या शतकांत ते होऊं लागले व मोठ्या आवडीनें, पैसे देऊनही, ते ऐकण्याकरितां लोक जात. गेल्या शतकांत स्थापन झालेलीं कॉफीगृहें अजूनही होतींच. तेथें गप्पाष्टकांचे अड्डे नेहमींच चालत. वादविवाद, राजकारणचर्चा, टवाळी व निंदा यांना तेथें नुसता ऊत येई. परंतु अठराव्या शतकांत कांहीं ठिकाणीं क्लब ऊर्फ मंडळें स्थापण्यास सुरुवात झाली होती. कॉफीगृहांत सर्वांनाच बसणें योग्य वाटत नसे व त्यामुळें त्यांचा सामाजिक दर्जाही थोडा आड येई. यामुळेंच उच्चवर्णीय लोक, राजकारणांत मुरलेले मुत्सद्दी, खानदानीचे गृहस्थ, श्रीमंत वगैरेंना कॉफीगृहें अयोग्य वाटत. त्यामुळेंच मंडळांची प्रतिष्ठा वाढली. हीं मंडळें खाजगी व्यक्तींचीं असत व त्यांचें उत्पन्न त्या मंडळाच्या मालकास मिळे. या मंडळांतही वादविवाद, चर्चा, मद्यपान व जुगार चाले. ‘ बॉल ’ नामक नाचाचे प्रकारही या काळांत रूढ होऊं लागले होते. मंडळाप्रमाणेंच सार्वजनिक नाचाकरितांही कांहीं जागा राखून ठेवण्यांत येत. त्या व्यक्तीच्या मालकीच्या असत व ज्या कोणाला नाचांत भाग घ्यावयाचा असेल त्याच्याकडून पैसे घेऊन तो त्याला ‘ नाचगृहांत ’ सोडी. सर्व उत्पन्न एकाचेंच असे. अशीं नाचगृहें लंडनमध्यें बरींच असत व अनेक स्त्रीपुरुष त्यांचा फायदा घेत. दारू पिण्याची चटक लोकांना चांगलीच लागली होती; व त्यामुळें ठिकठिकाणीं गुत्तेही दिसत. या गुत्त्यांतून अनेक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकारची दारू नेहमीं मिळे व लहानथोर, स्त्रीपुरुष, सर्वजण दारू पिऊन झिंगत. पुढें दारूचें व्यसन फार वाढलें. त्यामुळें दारूवर कर बसविण्यांत आला. गरिबांना मात्र दारू पितां येत नसे. कधींमधीं अगर सणावारीं अगर फारच तल्लफ आली तर ते गुत्त्यांत शिरत! लहान मुलें गोट्या, फुटबॉल, आंधळीकोशिंबीर, भोवरे वगैरे अनेक खेळ खेळत असत. मुलांकरितां लहान लहान खेळणींही या शतकांत प्रथमच इंग्लंडांत तयार होऊं लागलीं होतीं. पशुसंग्रहालयही त्या वेळीं लंडनमध्यें होतें. त्यांत हत्ती, सिंह, जिराफ, वाघ वगैरे प्राणी ठेवलेले असत. त्या ठिकाणीं मुलांस नेण्यांत येई.

१०. शिक्षण–शाळा :—खेडीं उध्वस्त झाल्यानें त्यांतून शिक्षण मिळत नसे. शाळाच नव्हत्या आणि असत्या तरी शिक्षण घेण्याकरितां लोकही फारसे उत्सुक नसत. त्यांच्याजवळ पैसा नव्हता व त्यामुळें मुलें-माणसें मोलमजुरी करण्यांत गुंतलेलीं असत. अर्थात त्यांचें शाळांकडे फारसें लक्ष नव्हतेंच. शिक्षणाशिवाय मुलांना राहूं देण्यापेक्षां त्यांना थोडें तरी शिक्षण मिळावें म्हणून खेड्यांतून रविवारच्या शाळा कांहीं पाद्री लोकांनीं काढल्या. त्या सर्वच खेड्यांतून होत्या असें नाहीं. त्याचप्रमाणें कांहीं खेड्यांतून सबंध आठवडाभर चालणाऱ्या शाळाही त्यांनीं काढल्या. या शाळा चर्चमध्यें भरत व त्यांनीं लोकांमध्यें थोडेंफार कौतुकही जागृत केलें होतें. ज्या ठिकाणीं खाणी होत्या तेथेंही मजुरांना शिक्षण देण्याकरितां शाळा स्थापन झाल्या होत्या. मुलांना व मजुरांना सहज समजतील अशीं पुस्तकेंही त्या वेळीं निघूं लागलीं होतीं. सरकारी प्रयत्नानें एकही शाळा त्या वेळीं चालविण्यांत येत नसे हें लक्षांत घरण्यासारखें आहे. सर्व शाळा खाजगी होत्या. दुय्यम शिक्षणाकरितांही खाजगी शाळा होत्या. ईटन, हॅरो, विंचेस्टर, वेस्टमिन्स्टर वगैरे ठिकाणीं 'पब्लिकस्कूलस' असत. या शाळांमधून श्रीमंतांचीं मुलें शिकत. भावी मुत्सद्दी, दर्यासारंग, सेनापति वगैरे मान्यतेस चढलेल्या लोकांचें शिक्षण याच शाळांतून होत असे. तेथील शिस्त वाखाणण्यासारखी असे; मुलें चांगलीं तयार होत. त्यामुळेंच त्या शाळांकडे लोक मोठ्या अभिमानानें व कौतुकानें पहात. 'वॉटर्लूसारख्या मोठमोठाल्या लढाया ईटन व हॅरो या शाळांच्या क्रीडांगणावर जिंकल्या गेल्या' असें इंग्रज लोक म्हणत त्याचें मर्म वरील गोष्टींवरून सहज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समजेल. दुय्यम शिक्षणानंतर मुलें ऑक्सफर्ड व केंब्रिज येथील विश्वविद्यालयांत प्रवेश करीत. इंग्लंडमधील प्रस्थापित धर्मपंथावर ज्यांचा विश्वास असे त्यांसच तेथें प्रवेश मिळे. श्रीमंतांच्या मुलांसच विश्वविद्यालयीन शिक्षण घेतां येई. पैशाच्या अभावीं गरिबांस तें घेतां येत नसे. कांहीं कांहीं शाळांना वसतिगृहें जोडलेलीं असत. मुलींच्याकरितांही वसतिगृहयुक्त शाळा होत्या; परंतु मुलींच्या शिक्षणाची एकंदरीनें आबाळच होती. त्या सुमाता व सुगृहिणी व्हाव्या म्हणून त्यांना पुस्तकी शिक्षण न देतां ललितकलांचें शिक्षण देण्यांत येई.

११. पुस्तकें व वर्तमानपत्रें :—त्या काळीं शिक्षणाचा प्रसार फारसा झालेला नव्हता; परंतु लोकांना वाचनाची गोडी लागलेली होती. त्यामुळें पुस्तकविक्रेत्यांचीं दुकानें हळूहळू निघूं लागलीं; व त्यांतून पुस्तकें विकलीं जात. इंग्रजी भाषेसंबंधीं अगर इतर विषयांसंबंधीं व्याख्यानें देण्याचीही वहिवाट पडूं लागली होती. दळणवळणाचे मार्ग चांगले झाल्यानें पुस्तकें अगर वर्तमानपत्रें यांची नेआण सुकर होऊं लागली. परदेशांतील लेखकांचीं पुस्तकेंही इंग्लंडमध्यें येत. एकंदरींत लोकांत वाचनाची आवड वाढल्यानें वाङ्मयाचीही वृद्धि झपाट्यानें होऊं लागली. त्यांतच वर्तमानपत्रांचीही भर पडलेली. टॅटलर, स्पेक्टेटर, गार्डियन, रँबलर वगैरे वर्तमानपत्रें त्या वेळीं अस्तित्वांत होतीं. 'लंडन गॅझेट' हें सरकारी पत्र चालू होतें. टाइम्ससारखीं दैनिकेंही चांगलीं खपत. हीं वर्तमानपत्रें सरकारी धोरणावर कडक टीका करण्यास कचरत नसत. हें 'नॉर्थ ब्रिटन' च्या उदाहरणानें सांगतां येईल. 'ज्यूनियसचीं पत्रें' अगर 'ड्रेपियरचीं पत्रें' हींही सरकारवर कडक टीका करीत. सामाजिक जागृतीच्या दृष्टीनें वर्तमानपत्रें अत्यंत महत्त्वाचीं मानलीं जातात.

१२. उपसंहार :—एकंदरींत पाहतां त्या वेळचा समाज अनेक बाबतींत पुढारलेला होता. आजच्या सारखे रीतिरिवाज त्या समाजांत बोकाळलेले नव्हते. शिष्टाचाराच्या दडपणाखालीं तो समाज भारावलेला नव्हता. साधेपणा, सुटसुटीतपणा वगैरे त्या वेळच्या शिष्टाचाराचे गुण सांगतां येतील. कडक शिष्टाचार नव्हता. चालीरितींचीं बंधनेंही हल्लींच्या मानानें शिथिल होतीं. शिक्षणाचा फैलाव झाला नसल्यानें अडाणीपणा पुष्कळ होता. ओळख करून देण्याचा प्रकार त्या काळीं रूढ नसल्यानें कोणाचीही कोठेंही गांठ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पडल्यास अघळ पघळ बोलणें चालणें होई. अच्यावाच्या बोलणें, मोठमोठ्यांदां हंसणें, शिंकणें, ढेकरा देणें वगैरे प्रकार आज शिष्ट समाजांत मना समजले जातात. त्या वेळीं हीं बंधनें नव्हतीं. चालीरितींत जो एक प्रकारचा भारदस्तपणा यावयास पाहिजे, तो त्या वेळीं आलेला नव्हता. त्यामुळें वाटेल तेथें थुंकणें, नोकराचाकरांस शिव्या देणें, रस्त्यावरच उभें राहून अगर तेथेंच बैठक मारून खात बसणें, नोकरांस यथेच्छ बडविणें, नवऱ्यांनीं बायकांस मारणें, नीच प्रकारच्या ख्यालीखुशालींत रमणें, 'हाईड पार्क' सारख्या उजाड उद्यानांत संध्याकाळीं गमतीखातर उगाच भटकणें, उघडपणें जुगार खेळणें वगैरे अनेक गोष्टी नित्यशः चालत. साध्या गोष्टींच्या वादविवादावरून द्वंद्वास सुरुवात होई. त्यामुळें विजयी वीराची अब्रू साफ होते असा त्या वेळीं समज होता. साध्या बोलण्या-चालण्यावरूनही प्रकरण हातघाईस येई व इरेस पडून लोक अनेक शपथा घेत, पैजा मारीत व त्या हरल्यावर हजारों पौंड बुडवून घेत. जुगाराचें व्यसन स्त्रीपुरुषांस सारखेंच जडलेलें होतें. मात्र स्त्रिया द्वंद्वयुद्धाच्या भरीस पडत नसत ! लोकांत अस्वच्छपणा कमालीचा होता; व त्यामुळें देवी, प्लेग व निरनिराळे आजार यांच्या सांथी नेहमींच्याच होत्या. अगदीं संध्याकाळ होईपर्यंत लोक रस्त्यांवरून भटकत. लंडनसारख्या शहरांत रस्त्यांवरून मिणमिणे दिवे लोकांच्या हालचाली अस्पष्टपणें दर्शवीत; तशांतच त्याचा फायदा घेणारे अनेक बदमाष असत. 'मोहॉक्स' नामक गुंड चांगला पोषाख करून वाटसरूंवर हल्ले करीत, 'स्कोवेरर्स' नामक बदमाष, खाणावळी व सभा यांच्यावर चाल करून जात व 'निकर्स' नामक गुंड पेनी अगर दगड फेकून घरांचीं तावदानें फोडीत. हत्यारबंद घोडेस्वारांसही वरील प्रकारच्या गुंडांचा नीट बंदोबस्त ठेवतां येत नसे. या सर्व गोष्टींवरून त्या वेळच्या इंग्रजांच्या चालचलणुकीसंबंधीं बरीच माहिती कळण्यासारखी आहे. समाजाचें पाऊल पुढें पडत होतें. लोकांत सचोटी व धंद्यांत प्रामाणिकपणा येऊं लागला होता. धर्माचें बंधन कमी होऊं लागल्यानें नीतिअनीतीच्या कल्पना मागें पडूं लागल्या होत्या व नाच, नाटकें, तमाशे, दारूबाजी, जुगार वगैरेमध्यें लोक रमून जाऊन, आपले दुःखमय संसार सुखाचे करण्याचा प्रयत्न करीत होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. अठराव्या शतकांतील लोकांच्या राहणीसंबंधीं थोडक्यांत विवेचन करा.

२. त्या काळीं तुम्ही लंडन शहरांतील रस्त्यांतून चालत जात आहांत अशी कल्पना करून तेथील घरें, माणसांचा पोशाख, करमणूक वगैरेसंबंधीं हकीकत सांगा.

३. त्या वेळीं दळणवळणासंबंधीं कोणत्या सोई होत्या? सडकांवरून त्रास होई का? कशामुळें? त्या वेळीं दळणवळणाचीं साधनें कोणतीं होतीं?

४. स्त्रीपुरुषांच्या पोषाखासंबंधीं व त्यांच्या खाद्यपेयांसंबंधीं माहिती सांगा.

५. त्याकाळच्या सामाजिक व धार्मिक स्थितीसंबंधीं माहिती सांगा.

६. त्या वेळीं मुलांस शिक्षण मिळे? कां नाहीं? श्रीमंतांच्या मुलांस कोठें शिक्षण मिळे?

७. खालीलसंबंधीं थोडक्यांत माहिती सांगा.

कॉफीगृहें, क्लब, गुत्ते, नाटकें, वर्तमानपत्रें, स्टेजकोच, शिक्षा, शहरांतील रस्ते, पेन, फ्रँकलिन, वेस्ले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पारिभाषिक शब्दांचा कोश

Gun Powder Plot—दारूचा कट
Outlaw—रक्षणबाह्य
Thorough—स्वयंपूर्ण राज्यपद्धति
Short Parliament—लघु पार्लमेंट
Long Parliament—दीर्घ पार्लमेंट
Iron Sides—अभेद्य पलटणी
Model Army—आदर्श लष्कर
Ship money—नौकाकर
Exclusion Bill—वारसा रद्दीचें बिल
Bill of Rights—हक्कांचा कायदा
Peerage Bill—सरदारी नियंत्रण बिल
Septennial Act—सप्तवार्षिक कायदा
Act of Indemnity—माफीचा कायदा
Excise Bill—जकातीचें बिल
Sinking Fund—गंगाजळी
Pragmatic Sanction—राजाज्ञा
King's Friends—राजपक्ष
General Warrant—निनांवी वारंट
Five mile Act—पंचक्रोशीचा कायदा
Addled Parliament-फुसकी पार्लमेंट
Petition of Right—हक्क मागणीचा अर्ज
Root and Branch Bill—आमूलाग्र फरकाचा कायदा
Grand Remonstrance—तक्रारींचा खलिता
Convention Parliament—अनधिकारी पार्लमेंट
Conventicle Act—गुप्तसभाबंदीचा कायदा
Freedom from arrest—अटक—स्वातंत्र्य
Habeas Corpus Act—व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा
Dispensing Power—व्यक्तीस माफी देण्याचा अधिकार
Suspending Power—कायदा तात्पुरता रद्द करण्याचा अधिकार
Declaration of Rights—हक्कांचा जाहीरनामा
Toleration Act—धर्मस्वातंत्र्याचा कायदा
Act of Settlement-वारशाचा कायदा
Cabinet System of Govt.—प्रधानमंडळात्मक राज्यपद्धति
Divine Right of Kings—राजाचा ईश्वरदत्त अधिकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालदर्शी : १७१४–१८२०

राजे	लढाया	कायदे	धार्मिक गोष्टी	प्रमुख व्यक्ति	महत्त्वाच्या गोष्टी	हिंदुस्थान	युरोप
पहिला जॉर्ज १७१४–१७२७	जॅकोबाईट बंड १७१५ शेरीफमूरची लढाई १७१५ स्पेनशीं युद्ध १७१७–२०	सप्तवार्षिक कायदा १७१६	कॅथॉलिकांवरील निर्बंध रद्द १७१९	स्टॅनहोप, टाऊनशेंड वॉलपोल अल्बेरूणी, पूलटने, कार्टरेट, बोलिंगब्रोक बाळाजी विश्वनाथ बाजीराव	चौ. लुईचा मृ. १७१५ सरदारी नि. बि. १७१९ साउथ सी कं. बोजवारा १७२० वुडचें पेटंट १७२४	शाहू १७०८– १७४९ पेशवा बा. विश्वनाथ १७१४–२० चौथाई स. १७१९ पे.वा. १७२०–४०	पंधरावा लुई. १७१५–
दुसरा जॉर्ज १७२७–१७६०	स्पेनशीं युद्ध १७३९ ऑ. वारशाचें यु. १७४०–४८ डेटिं. ल. १७४३ दु. जॅकोबाईट बंड १७४५ कलो. ल. १७४६ सप्तवार्षिक युद्ध १७५६-६३	पंचांगाची सुधा- रणा १७५१	कर्मनि. चळवळ १७३९	विल्यम पिट, जॉन वेस्ले. पेलहॅम, मराया थे. बाळाजी विश्वनाथ, क्लाइव्ह, डुप्ले, बाजी- चिमाजी, वूल्फ, क्लाइव्ह नानासाहेब, सदाशिवराव,	जॉर्जिया वसाहत स्थापना १७३२ पोर्चसमुळें दंगे १७३६ एलाशापेलचा तह १७४८	डभईची ल. १७३१ वसईची मो. १७३९ पेशवा नानासाहेब १७४०–६० अर्कोटचा वेढा १७५१ प्लासीची ल. १७५७	फ्रा. स्पे. पहिला कौ. संघ १७३३ ऑस्ट्रि. सहाव्या चार्ल्सचा मृत्यु १७४० दु. कौटुंबिक संघ १७४३
तिसरा जॉर्ज	अमेरिकेशीं युद्ध	स्टँपॲक्ट १७६५			पॅरिसचा तह १७६३	उदगी. ल. १७६०	

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

तिसरा जॉर्ज १७६०-१८२०	अमेरिकेशीं युद्ध १७७५-१७८२ सॅराटोगा १७७७ सशस्त्र-तटस्थ संघ १७८० यॉर्क. शरणागति १७८१ फ्रान्सशीं युद्ध १७९३-१८०२ सेंट व्हिन्सेंट १७९७ कँपर डा. १७९७ नाई. ल. १७९८ ऑस्टरलिट्झची लढाई १८०५ ट्रफाल्गरची लढाई १८०५ कोपनहेगन १८०७ द्वीपकल्पां. युद्ध १८०८-१८१४ वॉटर्लूची लढाई १८१५	स्टँपॲक्ट१७६५ रेग्यु. ॲक्ट १७७३ पिटचें बिल १७८४ रीजन्सी बिल १७८९ धान्याचा कायदा १८१५	कॅथॉलिकांवरील निर्बंध रद्द १७९१ पवित्र संघ१८१५	ब्यूट, विल्कस, ग्रेन, टाऊनशेंड, चॅटहॅम. कॅप्टन कुक, ॲडॅम स्मिथ, वॉशिंग्टन, हेन्री ग्रॅ. धा. पिट, बर्क, शेरि. टॉमस पेन पहिला माधवराव नाना फ. मल्हारराव. महादजी, अहिल्याबाई, राघोबा, नेल्सन, नेपोलियन बोनापार्ट वेलिंग्टन कॅसलरे, सिड्मथ, लिव्हरपूल	पॅरिसचा तह १७६३ विल्कस प्रकरण १७६३-६४ बोस्टनची क. १७७० अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा १७७६ अमेरिकन स्वातंत्र्यास मान्यता १७८३ व्हर्सायचा तह १७८३ औद्योगिक क्रांति हेस्टिंग्जवर खटला १७८६-९५ इं. आय. एकी. १८०० अमीन्सचा तह १८०२ गुलाम व्या. बंद १८०७ बर्लीनचें फ. १८०६ पॅरिसचा तह १८१५ पीटर्लू. १८१९	उदगी. ल. १७६० वांदी. ल. १७६० पानि. ल. १७६१ अलाहाबादचा तह १७६५ म. इं. १ लें युद्ध १७७८-१७८२ सालबाई. त. १७८२ खर्डे. लढाई. १७९५ श्रीरंगपट्टण लढाई १७९९ वसईचा तह १८०२ पेशवाईची अखेर १८१८	स्पे. इं. यु. १७७९ आयरिश पार्ले. स्वतंत्र १७८२ फ्रें. राज्यक्रांति १७८९ राजाराणीचा वध १७९३ मोरेंगो व होहेन लिंडन १८०० मास्को. मोहीम १८१२ लेपझिक १८१४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आधारभूत ग्रंथांची यादी

1. A New History of Great Britain—R. B. Mowat.
2. A Middle School History of England, Vols. I & II—R. M. Rayner.
3. History of England—A. D. Innes.
4. An Advanced History of Great Britain, Parts II & III,—T. F. Tout.
5. Concise History of the World—Sir John Marriott.
6. History of England, Parts I & II—G. M. Trevelyan.
7. A Text-book of Modern English History—Books I & II—C. W. Southgate.
8. Economic History of England—Lipson.
9 Groundwork of British History, Parts I & II—Warner & Marten.
10. The Piers and Ploughman Social and Economic Histories-Books V & VI—General Editor, E. H. Splading.
11. Short History of England—Ransome.
12. Cambridge School Histories—Books II and III.
13. Blackie's Senior Histories—Books I and II—Alfred Flavell.
14. Collin's Biographical Histories—Vol. III—H. K. Prescot.
15. Bell's Modern School Histories—Vol. II—R. B. Mowat.
16. Marten and Carter's Histories—Books III & IV—Marten and Carter.
17. Britain and her Neighbours—Book V—Blackie & Sons.
18. Economic History of England—Waters.
19. Social History of England—Frederick Bradshaw.
20. English History from original Sources—Books III & IV—Morgan & Bally.
21. Outlines of British Social History—Dance.
22. English People of the Past—Vols. I & II—M. J. Whicher and M. S. Mitchel.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

23. A History of English Life—Vols. I & II—A. William Ellis & Fisher.
24. A Source Book of English Social History—Jones.
25. Source Book of English History—Kendall.
26. A History of England for Schools, Parts I & II—Keatings & Frazer.
27. Our English Towns and Villages—Wilton Hall.
28. Oxford History of India—V. Smith.
29. A Note Book of English History—Margaret Rollestone.
30. Notes on British History—Vols. III & IV—William Edwards.
31. Teaching of History—Jarvis.
32. Learning of History—Forth.
33. History of Schools—Drummond.
34. Teaching of History in Schools—F. R. Worts.
35. Graphic Charts of British History—Newman.
36. History Time Charts—H. G. Wood.
37. Philips New School Atlas of Universal History—Ramsey Muir.
38. Historical Atlas of the British Empire—Macmillan & Co.
39. A History of Everyday things in England—Vols I, II & III—Marjorie and C. H. B. Quennell.
४०. हिंदुस्थानचा इतिहास—प्रो. शं. रा. कानिटकर.
४१. इंग्लंडचा अर्वाचीन इतिहास—रा. प. ह. बर्वे.
४२. इंग्रजांचें स्वराज्य—रा. अ. वा. मराठे.
४३. इंग्लंडचा इतिहास—रा. गो. अ. मोडक.
४४. महाराष्ट्र सांवत्सरिक—प्रो. श्री. म. माटे.
४५. अर्वाचीन इंग्लंड–स्टुअर्ट व हॅनोव्हर अमदानी—रा. वि. के. पानसे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूची

अ

अन्न १८०, ३९८, ३९९.
अग्निप्रलय ७२, ७८, ७९.
अमेरिका १६०-१६३, २६१-६४.
अमेरिकन युद्ध २६५-२७२, ३६३.
ॲन (राणी) १२७, १२८, १३३-३७.
ॲडॅम स्मिथ २८७, २९२.
ॲडिंगटन ३२७, ३३९, ३६९.

आ

आल्बेरूणी २०२, २०३.
आर्कराइट ३०५, ३०६.
ऑस्टर्लिट्झ ३४०, ३४५.
ऑस्ट्रिया (वारशाचें युद्ध) २२८-२३०.
ऑस्ट्रेलिया २७३, २९२, ३८०–८१.

इ

ई. इं. कंपनी १६२, १६३, २६८, २८०, २८४, २८५, २९१, ३७८, ३८०.

उ

उद्योगधंदे १६५, १६६, ३०३-३१०.

ए

एकीकरण (इंग्लंड-स्कॉटलंड) १३४, १३५, १३६.
एकीकरण (इंग्लंड-आयर्लंड) २९९-३०१.
एलाशापेल २९९, ३००.
एजहिल ३८.

औ

औद्योगिक क्रांति ३०३-१६, ३६३, ३७०.

क

करमणूक १८१-१८२, ४०१–४०२.
कपडे १७८-१८०, ३९९–४०१.
कर्मनिष्ठांची चळवळ २२३, २२४.
कार्टराइट ३०६.
कार्टरेट २०८, २१०, २१८.
कारखाने ३७१
कोक (सर एडवर्ड) १०.
कौन्सिलांतील फर्मानें ३४६–३४७.
कॅटस्वी ४, ५.
कॅनिंग (जॉर्ज) ३६२
कॅबॉल ८०-८१, ८४-८५.
कॅसलरे ३५८, ३६२, ३६४, ३७०.
कॉफीगृहें १५८, ३९९
कॉर्पोरेशन कायदा ६९.
क्रॉम्पटन ३०६.
क्रॉम्वेल ३९-४२, स्वभाव ५०-५१, ५९, ६५.
— परराष्ट्रीय धोरण ५१-५४, ५८.
— धार्मिक धोरण ५७–५८.
—पार्लमेंट ५५, ५६, ५८.
क्लॅरेंडन ६८-७०, ७५-६०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ख

खुला व्यापार २१०, २१५, २९२-९४.
खेळ १८१-८२, ४०१, ४०२.
खेडेगांव १७१-७३, ३९३, ३९५.

ग

गायफॉक्स ४, ५.
गिबन ३८५.
गुलामगिरी २९२, ३४५, ३५७.
गेटस् २७१.
ग्रेनव्हिल २६५, २६६.
गॉर्डन २८२.
ग्लेंको १११–११२.

घ

घरें–इमारती १७७, ३९७–९८.
घटनापत्रक ५६.

च

चार्ल्स (१ ला)–स्वभाव, १७, १८.
— पार्लमेंट १८–२२.
— अनियंत्रित कारभार २५–२८.
— दीर्घ पार्लमेंट ३१–४२.
चार्ल्स (दुसरा) ६४, (स्वभाव) ६५–६७.
— क्लॅरेंडन ६८–७१, ७३–७६.
— कॅबॉल ८०–८४,–लॉर्ड डॅन्बी– ८५–८७.
— परराष्ट्रीय धोरण ७१, ७३–७५, ८०, ८३ ८४.
— धार्मिक धोरण ६९–७०, ७७, ८१, ८३, ८९, ९१.
— पार्लमेंट ६७, ६८, ७५, ७६, ८१, ८३, ८५, ८७–९१.
चार्ल्स (स्पेनचा) १२१–१२३.
चार्ल्स (ऑस्ट्रिया) २११–२१२,२२८.

ज

जत्रा १६७–६८.
जेम्स (१ ला)–स्वभाव १, धार्मिक धोरण ३–६.
— परराष्ट्रीय धोरण ११–१२.
— राजकीय धोरण ७–१०.
जेम्स (२ रा) ९३, ९४, ११२–११३, १२३.
— कॅथॉलिकपंथ ९३, ९४, ११२–११३, १२३.
— पार्लमेंट ९४, ९७–९८, १०१.
जेफ्रेज ९५, ९६.
जॅकोबाईट १९९–२००, २०३, २०८, २०९, २२९–२३१.
जॉनसन ३८५, ३९९.
जॉर्ज (१ ला) १२०, १३७, १९७, १९८, २०१.
जॉर्ज (२ रा) २१०, २१४, २३६, २३९.
जॉर्ज (३ रा) २३९, २५२–२५६.
—व जॉन विल्कस २५९–६०, २६९, २७६.
—अमेरिकन युद्ध २६५–७३, २७६. २८३–८५, २८८, २९५, २९९,३७१.

ट

टनेज ८, १८, २१, ३३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टायटस ओटस् ८७, ९५.
टाऊनशेंड १९८, २०२, २०८, २१९, ३१२.
टिलसिट ३४७, ३५१.
टोरी ८८, ८९.
ट्रफाल्गार ३३९, ३४०, ३४४, ३६०.

ड

डीडेरॉट ३२०, ३२१.
डेव्ही (हंफ्री) ३१०.
डोव्हरचा तह ८०, ८१, ८२.
डंकन ३३५.
डॅन्बी ८५, ८७, १०८.
डेरियन १३४.
ड्रायडन १८८, १८९.

त

तक्रारींचा खलिता ३३, ३४.
तोतया (तरुण) १९८-२००, २०९.
त्रैवार्षिक निव. कायदा ३३, ११७.

द

दळणवळण १८३, १८५, ३१३–१४, ३९५–३९६.
दारूचा कट ५.
दीपकल्पांतील युद्ध ३४८–३५१.

ध

धर्मस्वातंत्र्याचा कायदा ११०.
धर्मकसोटीचा कायदा ८४, ८५, ९७.
धान्याचा कायदा ३६६–६७.
धार्मिक स्थिति १५४-१५७,३९०-९१.

न

नाईलची लढाई ३३६.
नेपोलियन ३२९, ३३२–३५७.
नेल्सन (लॉर्ड) ३३५, ३३६, ३३९–४४, ३४७–३५६.
नेसबी ४०.
नौकाकर २६, १४३.
नौकानिर्बंधाचा कायदा ५३, ५४, ६८, ७४, १६१.
नॉर्थ (लॉर्ड) २५५-५६, २६७–६८, २८०, २८३-८४, २८९.
नॉन ज्यूरर्स ११०.
नॉर्थ ब्रिटन २५७-५८.
न्यूकासल (ड्यूक) २३६, २३९, २४५-२४६,
न्यूटन ९७, १४४, १४७.

प

पवित्र संघ ३५८–५९.
पक्षनिष्ठ राजकारण ११८, ११९, १४०, १४१.
पार्लमेंट (दीर्घ) २९, ३१-३६.
—(रंप) ४२, ५५.
पार्लमेंटची सुधारणा २८०-८१, ३६८.
पिट (लॉर्ड चॅटहॅम) २१९, २३५-३९, २४५, २४६, २६६, २७०-७१, २७८-७९, २८१.
पिट (धाकटा) २८५, २८७-८८, २८९-९५, २९९, ३२७-२९, ३३९-४१.
पिम २२, ३१, ३२, ३४-३५, ३९.
पिल्ग्रिम फादर्स ६, ७, १६०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पीटर्ल्ड ३६८-६९, ३७२-७३.
पूलटने २०८, २१०, २१९.
पोर्चस् २१८, २१९.
प्रवास १८३–१८४, ३९६.
प्लेग ७२, ७७, ७८.
पंचक्रोशीचा कायदा ७०.

फ

फॉक्स २८३–२८५, २८८, २९४-३२६, ३४४-४५.
फ्रेंच राज्यक्रांति ३१८-२५, ३५७-५८.
फ्रँकलिन २६६, २७०, २७७.

ब

बन्यन ७१, १८८.
बकिंगहॅम (ड्यूक) ३, ९, १२, १८-२०.
बर्क २७०, २७७-७८, २८१, २८८, ३२६-२७.
बरगॉइन २७१.
बर्लिनचें फर्मान ३४५–४७.
बेकवेल ३१३.
बेकन (लॉर्ड) १०, १८८.
बोलिंगब्रोक १३६, १३७, १९८, २०९, २१०, २१९.
बोस्टन २६७–६८.
बॅस्टील ३२३.
ब्लेनहिम १३१.
ब्यूट (लॉर्ड) २३९, २५४, २५५, २५७, २६५.
ब्रॅडशा ४२, ४६, ६७.
बँक– इंग्लंडची ११६, २०६, ३६६.

म

मन्मथ ९१, ९५, ९६.
मराया थेरिसा २११, २२८, २२९, २३१.
मार्लबरो (ड्यूक) १२७–१२९, १३०, ३२, २०७.
मिल्टन ७१, १८८.
मेटर्निक ३५८, ३५९.
मंक ६०-६२, ६४, ६७.

य

यादवी युद्ध ३७, ३८, ३९, ४०, ४१.
युट्रेक्टचा तह १३२, १९८, २०२.

र

रस्ते १७४, १७५, १८३-१८५.
राजाची दैवी सत्ता ७, ८, १३, १५, ९३, १०४, १३९.
राजपक्ष २८५.
राष्ट्रीय कर्ज ११६ २०३, २४४, २६५.
रूसो ३२०, ३२१.
रेन (क्रिस्टॉफर) ७३, १४६.
रॅले ३, ११.
रॉकिंगहॅम २६६, २८१–८३.
राज्यक्रांति (उज्ज्वल) १०१–१०५, १०८.
(रक्त) ३१–४२.

ल

लुई (१४ वा) ६६, ८०-८३, ८४-८६, ९०, ९४, ९८, १००, १०७, ११३-११५, १२१-१२४-१२९-३२, २०२.
लेंथॉल ३५.
लॉड (आर्चबिशप) १८, २३-२५, २७-२९, ३२, ७१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व

वारसारद्दीचें बिल ८९-९०.
वारशाचा कायदा ११९, १२०.
विणकलेंतील शोध ३०४-३०८.
विल्यम (तिसरा) १००-१०३, १०६-११०, ११३-११६, ११७-११९, १२२-१२४.
विल्कस (जॉन) २५६-२६०, २८.
वुड २०९-१०, २४९-५०.
वूल्फ २३७, २३८.
वेस्ले २२३, २२४.
वेलिंग्टन (ड्यूक) ३४९, ३५१-५२, २५४-५५.
वेंटवर्थ (स्ट्रॅफर्ड) १८, २३, २६.
वॉटर्लू ३५४–५५
वॉलपोल (रॉबर्ट) १९८, २०१-२, २०५-१२.
— आर्थिक धोरण, २१०-११, २१५-१६.
— परराष्ट्रीय धोरण २११-१२, २२०-२२२.
— घटनात्मक २१२, २२४.
— धार्मिक २१५, २२४, २२५, २६४, २७५, २७६, २८९-९०, २९३.
वॉशिंग्टन २७०, २७१-७४, ३२३.
व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा ८७, ८८, ३६९.
वॅट (जेम्स) ३०९, ३१६, ३१७.
व्हॉल्टेर ३१९, ३२१.
व्हिग ८८, ८९.

श

शहरें १७४-१७७, ३९२, ३९३.
शिक्षण-शाळा १८६-८७, ४०३-४०४.
शिक्षा १९१.
शेती १६८, १६९, ३११-१३.

स

सडका १८३-८५, ३९६.
सामाजिक स्थिति १५०-१५४, १५७, ३८८–८९.
सरदारी नियंत्रण कायदा २०१.
सवलतींचा जाहीरनामा ८३, ९८, ९९. ३८८-८९.
सप्तवार्षिक कायदा २००, २०१.
सप्तवार्षिक युद्ध २३१-३४, २३६-४०, २५४.
साऊथ सी कंपनी १६४, २०३-२०६, २०७, २४८, २४९.
सात विशपांवरील खटला ९९, १००
सिड्मथ (लॉर्ड) ३६४, ३६९-७०.
सॅचेव्हरल १३३, १३४.
स्पॅनिश वारशाचें युद्ध १२१-२३, १२९-३२.
स्टॅनहोप १९८, २०२, २०५, २०७.
स्टॅंप ॲक्ट २६५-६६.
स्ट्रॅफर्ड १८, २३, २४, २६, ३१-३२
स्टारचेंबर २५, २७, ३२.

ह

हक्कमागणीचा अर्ज २०, २१.
हक्कांचा कायदा १०२, १०३, १०८.
हारग्रीव्हज ३०५.
हाय कमिशन कोर्ट २५, २७, ३२, ९७, १०२.
हार्ले १३५, १३६, १९८.
हॅम्पडन २६, ३४, ३५, ३९.

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri







CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri





CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंमत १॥ रु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar